# यशवंतराव चव्हाण

## विधिमंडळातील निवडक भाषणे
## १९४६ ते १९६२



# यशवंतराव चव्हाण
# विधीमंडळातील निवडक भाषणे
# १९४६-६२

**YESHWANTRAO CHAVAN**
Selected Speeches (Marathi)
in the
State Legislatures 1946-62

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
जन. जगन्नाथ भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१.

अध्यक्ष
**शरद पवार**

उपाध्यक्ष
**हुसेन दलवाई**

कार्याध्यक्ष
**अरुण गुजराथी**

सरचिटणीस
**श.गं. काळे**

खजिनदार
**डॉ. रविंद्र बापट**

विश्वस्त
**मोहन धारिया**
**शिवाजीराव पाटील निलंगेकर**
**डॉ. निळकंठराव कल्याणी**
**प्रि.पी.बी.पाटील**
**राम प्रधान**
**गुलाम गौस**
**लक्ष्मण माने**
**वसंतराव कार्लेकर**
**ज्ञानेश्वर खैरे**
**सौ. सुप्रिया सुळे**
**शासन प्रतिनिधी**
**शासन प्रतिनिधी**

# यशवंतराव चव्हाण विधीमंडळातील निवडक भाषणे

- लेखक
  **यशवंतराव चव्हाण**
- प्रकाशक / सर्वाधिकार
  © **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई**
  जन. जगन्नाथ भोसले मार्ग,
  मुंबई - ४०० ०२१
- ई बुक प्रथमावृत्ती
  २००६
- ई बुक निर्मिती
  संगणक प्रकाशन, मुंबई
  ५/६, शांती निवास , संत रामदास रोड,
  मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१

विशेष आभार :
सौ.वेणूताई चव्हाण प्रतिष्ठान, कराड

# यशवंतराव चव्हाण

विधीमंडळातील निवडक भाषणे

# YESHWANTRAO CHAVAN

Selected Speeches (Marathi) in the
State Legislatures 1946-62

**VOLUME 1**

*Foreword by*
**Shri Sharadchandra Pawar**
Chief Minister, Maharashtra

*Edited by*
**Dr. V. G. Khobrekar**
M.A.Ph.D
Director, Itihas Sanshodhan Mandal
Post Graduate Research Centre.
(Affiliated to Bombay University) and
Director, Yeshwantrao Chavan Jeevankarya
Sanshodhan Kendra, Bombay

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई

**CHIEF MINISTER**

Mantralaya, Bombay 400 032

सत्यमेव जयते

**MAHARASHTRA**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार थोर विचारवंत द्रष्टे नेते मा. कै. यशवंतराव चव्हाण यांचे विचारधन व चरित्रसाधने या मालिकेद्वारा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई ही संस्था प्रसिद्ध करित आहे. ती सर्व वाचक वर्गास व अभ्यासूंना उपयुक्त ठरेल असा मला विश्वास आहे.

श. गो. पवार

१ नोव्हें १९८८

# प्रकाशकीय

यशवंतराव चव्हाण निवर्तल्यावर त्यांचे सहकारी, हितचिंतक, अनुयायी यांनी त्यांचे यथोचित स्मारक करण्याचे ठरवून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ही संस्था स्थापिली. या संस्थेने यशवंतरावांच्या इ.स. १९४६ ते १९७७ पर्यंतच्या कालखंडातील मुंबई/महाराष्ट्र विधीमंडळातील व संसदेतील त्यांची भाषणे, आणि त्यांच्या वैयक्तिक पत्रव्यवहारांचे खंड यांच्या मालिका छापण्याची एक महत्त्वपूर्ण अशी योजना आखली.

ही योजना पार पाडण्यासाठी प्रतिष्ठानने यशवंतराव चव्हाण जीवनकार्य संशोधन केंद्र या नावाने एक स्वतंत्र विभाग निर्माण केला. या विभागांची संशोधकीय व संपादकीय कामे सुप्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ.वि.गो. खोबरेकर यांच्या नेतृत्वाखाली व्हावीत असे ठरविले व या विभागाच्या संचालकपदी त्यांची नेमणूक केली. प्रतिष्ठानच्या या संशोधन केंद्राने मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या विधीमंडळातील मराठी भाषणांचा हा प्रथम खंड तयार केला.

या खंडात प्रसिद्ध झालेली त्यांची विधानसभेतील भाषणे एखाद्या सराईत मुत्सद्याला शोभण्यासारखी अभ्यासपूर्ण व विपुल माहितीने भरलेली आढळतात. याचे कारण इ. स. १९४० पर्यंत मा. श्री. यशवंतरावांना बुद्धीमंतांच्या सान्निध्यातून व उदंड ग्रंथाध्ययनातून भरपूर वैचारिक खुराक मिळाला. राजकीय विचारांच्या वेगवेगळ्या छटा आणि त्यांचा परस्परांशी असलेला संबंध त्यांना उमगला. समाजवाद, साम्यवाद, मार्क्सवाद, गांधीवाद वगैरे विचारसरणीमधील बारकावे त्यांच्या लक्षात आले ते केवळ त्यांनी केलेल्या विविधांगी सतत वाचनामुळेच होय. शेवटी त्यांनी आपल्याला इ.स. १९४० पासून काँग्रेसच्या वैचारिक बैठकीत झोकून दिले ते शेवटपर्यंत. वैचारिक ज्ञानाची

एवढी शिदोरी बरोबर घेऊन मा. श्री. यशवंतराव लोकशाही तंत्राने राज्य-कारभार करण्यासाठी विधानसभेत निवडून आले व इ.स. १९४६ मध्ये पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले.

या विधीमंडळातील भाषणात मा. श्री. यशवंतराव चव्हाणांच्या संसदपटुत्वाच्या अनेक छटा आढळतात. ही भाषणे वाचताना आपल्या लक्षात येते की मा. श्री. चव्हाण हे प्रतिपक्षियांना आपल्या वादविवाद कौशल्याने लीलया नामोहरम करीत असत. हे करीत असताना ते कटू व बोचरी भाषा क्वचितच वापरीत. उलट, नर्म विनोद, उपरोधिकपणा यावर त्यांचा भर असे.

मा. श्री. यशवंतराव चव्हाण १९५३ मध्ये मुंबई राज्याचे पुरवठा मंत्री असताना गोवध बंदी विधेयक विरोधी पक्षांनी विधानसभेत मांडले.

२ एप्रिल १९५३ ला सभागृहापुढे गोवध बंदी विधेयक चर्चेला आले. वास्तविक गोवध बंदीच्या विधेयकावर बोलण्याचे कार्य त्या खात्याचे मंत्री भाऊसाहेब हिरे यांचे. पण ते त्यावेळी आजारी होते म्हणून मा. श्री. यशवंतराव चव्हाणांनी गोवध बंदी विधेयकावरील चर्चेस सरकारतर्फे उत्तर दिले. ते सभागृहास उद्देशून म्हणाले की, ''या प्रश्नाचा विचार करताना कृपा करून धार्मिक, सांस्कृतिक त्याचप्रमाणे मनात दडलेले राजकीय प्रश्न उभे करू नका. या प्रश्नाचा आर्थिक दृष्टीने विचार करून घटनेमध्ये ४८ वे कलम घालण्यात आले आहे त्याकडे सभागृहाचे लक्ष वेधून आर्थिक दृष्टिकोनातून या प्रश्नाचा विचार करावयास हवा असे त्यांनी सभागृहास सांगितले व हे विधेयक मांडणारे ज्या विचारसरणीचे प्रतीक म्हणून या सभागृहापुढे मांडतात ती विचारसरणी इतिहासजमा झालेली आहे. असे आग्रही प्रतिपादन करून ती पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न या पद्धतीने यशस्वी होणार नाही'' असे सांगितले. शेवटी ते म्हणाले की, ''हिंदुस्तानात गाईचे स्थान उच्च राखावयाचे असेल आणि ती खऱ्या अर्थाने गोमाता व्हावी असे सन्माननीय सभासदांना खरोखरीच वाटत असेल तर हा मनुष्य मुसलमान धर्माचा आहे की इतर कोणत्या धर्माचा आहे हे लक्षात न घेता गायीबद्दल त्याग करण्याची भूमिका आपण त्यांच्या मनात निर्माण केली पाहिजे. गायीची सर्व प्रकारे जोपासना करून तिच्या दुधाबद्दल आवड निर्माण करणे आणि तिच्या रक्षणाची जबाबदारी घेणे किती जरूरीचे आहे ही भावना समाजाच्या सर्व थरापर्यंत निर्माण केली गेली तर गोपालनाचा प्रश्न आपण यशस्वी रीतीने सोडवू आणि शेतीच्या क्षेत्रातही गायीचे जे महत्त्वाचे स्थान आहे ते पुन्हा परत मिळवून देऊ'' असे सांगून या विधेयकाला सरकारतर्फे

विरोध केला. शेवटी गोवध बंदी विधेयक फेटाळण्यात आले.

मा. श्री. यशवंतराव हे स्थानिक स्वराज्य संस्था खात्याचे मंत्री असता १९५५ मध्ये ग्रामपंचायत (दुरुस्ती) विधेयक मांडले गेले. या विधेयकाचे त्यांनी त्यावेळीही जोरदार समर्थन केले होते परंतु ग्रामपंचायतीच्या खर्चात कपात करणे का अत्यावश्यक आहे, हेही मांडायला ते विसरले नाहीत. पुरवठा विभागाच्या मागण्यावरील चर्चेस उत्तर देताना मा. श्री. चव्हाणांनी कोळसा व कापड व्यवहारातील तोट्याचे समर्थन केले.

राज्य पुनर्रचना विधेयक सभागृहापुढे मांडताना ते म्हणाले की आपल्यापुढे असलेल्या मसुद्यातील तपशिलाचा विचार करण्यापूर्वी राज्यपुनर्रचनेचा प्रश्न ज्या परिस्थितीतून निर्माण झाला त्या परिस्थितीचे परिशीलन व समीक्षण काही वैचारिक कसोटीवर करावयास हवे. स्वातंत्र्यानंतर जनतेमध्ये आर्थिक समता व सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी राज्यकारभारविषयक रचना असावी असा विचार आपल्या देशातील विचारवंतांपुढे व कार्यकर्त्यांपुढे आला. भाषिक राज्यांचा प्रश्न हा या विचारांचा परिपाक आहे. मुंबई महाराष्ट्राची आहे की नाही या विषयी बोलताना ते म्हणाले की, मुंबई महाराष्ट्रात आहे. मुंबई कोठे आहे याचे उत्तर भुगोलाने दिले आहे. मुंबई महाराष्ट्रात का असावी ह्याबद्दलची एकशे पाच कारणे मी देऊ शकेन, पण मुंबई महाराष्ट्रात आहे ही गोष्ट उघड असल्यामुळे सर्व कारणे मी येथे मांडत नाही. पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्रात मुंबई घातली नाही तर महाराष्ट्राचे अकल्याण होईल असे जर मी सिद्ध केले तर मुंबई महाराष्ट्रास द्याल का ? पुढे ते राष्ट्रीय नेत्यांना विनंती करतात की त्यांनी मुंबई बाजूला काढून महाराष्ट्राचे अकल्याण करू नये. जी गोष्ट मुंबईसंबंधी आहे तीच सीमा प्रांतासाठी आहे, हे आपले स्पष्ट मत त्यांनी सांगितले.

१३ एप्रिल १९५६ रोजी स्थानिक स्वराज्य संस्था व प्राथमिक शिक्षण कायद्यात सुधारणा सुचविणारे विधेयक त्यांनी मांडले व हे विधेयक मांडण्याचा सरकारचा हेतू त्यांनी आपल्या भाषणात विशद करून सांगितला. स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चालू असताना एखादी स्थानिक स्वराज्य संस्था चुकीच्या पद्धतीने कारभार करू लागली तर निर्माण होणाऱ्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी ही सुधारणा सुचविणारे विधेयक आहे असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

मुंबई महानगरपालिकेस मुदतवाढ देणारे विधेयक मांडल्यावर एका सदस्याने सरकारचे सल्लागार कोण असा प्रश्न केला, तेव्हा सरकारचे सल्लागार विरोधी पक्षांचे

सभासद व देशातील स्वतंत्र अशा तऱ्हेची वृत्तपत्रसृष्टी असे मा. श्री. चव्हाणांनी उत्तर दिले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील गोळीबारात १०० व्यक्ती मृत्युमुखी पडल्या त्या निषेधार्थ विरोधी सदस्यांनी सरकारविरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव मांडला. या ठरावावर बोलताना श्री. एस्. एम्. जोशींनी सांगितले की तुम्ही राज्यकर्त्यांनी लोकांची फसवणूक केली आहे व त्यातून हा असंतोष निर्माण झाला आहे. तेव्हा तुम्ही महाराष्ट्रीय मंत्र्यांनी राजीनामे द्यावेत. तेव्हा मा. श्री.चव्हाण उत्तरले की, श्री. एस्.एम्. जोशींनी महाराष्ट्राच्या ज्या पिढीस २०/२५ वर्षे राष्ट्रप्रेमाचे धडे दिले त्या पिढीपैकी आपण एक आहोत असे प्रतिपादून त्यांच्याविषयीची कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आणि ते पुढे म्हणाले की, तुम्ही लोकांच्या मनातील असंतोषाच्या भावना तीव्र ठेवण्याच्या हेतूने चर्चा करीत असून राष्ट्राची सेवा करीत नाही.

मातंग समाजावर सवर्ण हिंदूंकडून झालेल्या हल्ल्याबाबत विरोधी पक्षियांनी तहकुबी सूचना मांडली. विरोधी सदस्यांच्या या तीव्र प्रतिक्रियेबद्दल सहानुभूती दर्शवून ते म्हणाले की आजपर्यंत ज्यांना आम्ही अस्पृश्य मानले त्यांच्यावर होणारे सामाजिक अन्याय दूर करणे आपले कर्तव्य आहे ही गोष्ट सर्वांनी मान्य केलेली आहे. शेवटी त्यांनी शासनातर्फे व स्वतःतर्फे सभागृहाला असे निश्चित आश्वासन दिले की, अस्पृश्य म्हणून मानल्या जाणाऱ्या समाजावर कोठेही अन्याय झाला असेल तर पक्षीय भूमिकेवरून त्या प्रश्नाचा विचार केला जाणार नाही.

२३ डिसेंबर १९५७ रोजी प्रतापगडावर जाणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सदस्यांबद्दल सरकारने दाखविलेल्या पक्षपाती धोरणासंबंधी विरोधकांनी सभागृहात चर्चा घडवून आणली. प्रतापगडावर छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचा निर्णय शासनाने घेऊन त्याच्या उद्घाटनासाठी १९५७ मध्ये मा. श्री. चव्हाण यांनी पं.जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण करण्याचे ठरविले. या समारंभाच्या वेळी संयुक्त महाराष्ट्र समितीने संयुक्त महाराष्ट्र व्हावा म्हणून उग्र निदर्शने केली. त्यावेळी वातावरण तंग झाले होते. म्हणून निदर्शने करणाऱ्यांना वाईजवळील एका मैदानाजवळ अडविले व संघर्ष टाळण्यासाठी त्यांना तेथेच थांबविण्यात आले. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीने आपण लाखोंच्या संख्येने छत्रपती शिवाजी महाराजांना मुजरा करण्यासाठी जात आहोत असे जाहीर केले. सरकारने समारंभ योग्य प्रकारे पार पडावा व निदर्शने करू इच्छिणाऱ्यांनाही ती

निर्धास्तपणे करता यावीत अशी सावधगिरी घेतली हे सभागृहाच्या निदर्शनास मा. श्री. यशवंतराव यांनी आणून दिले.

१० मार्च १९५८ रोजी अकोला येथील झालेल्या लाठीमारासंबंधी विरोधी पक्ष सदस्यांनी सभागृहात चर्चा घडवून आणली. त्यास उत्तर देताना मा. श्री चव्हाण म्हणाले की, कोणत्याही गोष्टीविरुद्ध सनदशीर चळवळ करण्याचा जनतेला हक्क आहे व त्या हक्काला संरक्षण दिले पाहिजे हीच आमचीही भावना आहे. परंतु विरोधकांचा विरोध लोकशाहीच्या विशिष्ट मर्यादेबाहेर जाऊ लागला आहे असे दिसले तर मात्र पोलिसांना त्या ठिकाणी येऊन आपले कर्तव्य पार पाडावे लागते. या प्रकरणामध्ये पोलिसांनी आपले कर्तव्य योग्य वेळी व योग्य रीतीने पार पाडले आहे असे आपले मत सभागृहासमोर स्पष्टपणे मांडले. त्याच भूमिकेतून येवले येथील जातीय दंगल शमविण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबाराचे समर्थन केले आणि जातीय दंग्याच्या बाबतीत सरकार जास्तीत जास्त कडक धोरण स्वीकारण्यास तयार आहे असे मा. श्री. चव्हाणांनी सांगितले.

१९५६ मध्ये राज्य पुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाला आणि त्यातील तत्त्वांच्या अनुरोधाने म्हैसूर राज्याची निर्मिती झाली. त्यावेळी म्हैसूर राज्यात सीमेवरील मराठी भाषिक प्रदेश समाविष्ट करण्यात आला. हा सीमा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र शासनाने झोनल कौन्सिल तयार केले. मा. श्री. चव्हाण म्हणतात की या सरकारने १९५७ सालीच हा प्रश्न हाती घेतला आणि ६०% लोकवस्तीचे प्रमाण धरून हा प्रश्न सोडवावा अशी भूमिका सुस्पष्ट शब्दात सभागृहासमोर या सरकारने मांडली होती. पण म्हैसूर सरकारने हे म्हणणे मान्य केले नाही. तेव्हापासून तो त्या वेळेपर्यंत हा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने जो पाठपुरावा केला त्याची पार्श्वभूमी त्यांनी सांगितली. मुंबई सरकारने हा प्रश्न कोणत्या तत्त्वावर सोडविण्यात यावा ती तत्त्वे केंद्र सरकारला पाठविलेल्या खलित्यात स्पष्ट केली. त्या खलित्याचा सारांश त्यांनी सभागृहापुढे वाचून दाखविला. शेवटी हा ठराव मांडल्यानंतरही ते म्हणाले मुंबई सरकार व म्हैसूर सरकार या दोन सरकारांच्या इभ्रतीचा हा प्रश्न नसून त्या दोन राज्यांच्या काही विभागातील जनतेच्या मागणीचा आणि न्यायाचा तो प्रश्न आहे. या भावनेनेच या प्रश्नाकडे आपण पाहिले पाहिजे व म्हैसूर सरकारनेही या दृष्टीनेच या प्रश्नाचा विचार करावा असे त्यांनी सांगितले.

मुंबई राज्य पुनर्रचना विधेयक १७ मार्च १९६० रोजी मांडले. या विधेयकाद्वारे

विशाल मुंबई राज्यातून दोन वेगळी राज्ये-महाराष्ट्र व गुजरात अशी होण्यासंबंधी हे विधेयक होते.

ह्या विधेयकावर चर्चा करताना त्यांनी प्रामुख्याने जे विचार मांडले ते सामान्यपणे लक्षात घेऊन या सभागृहाने चर्चा केल्याबद्दल सभागृहाचे त्यांनी आभार मानले व पुढे त्यांनी विश्लेषण केले की, डांग-उंबरगाव यासंबंधीचे निर्णय तत्त्व स्वीकारून घेतले. आम्हाला गुजरात राज्यास मदत करावयाची होती. ह्यासाठी आम्ही बसलो होतो. सीमेसंबंधी जो वाद तडजोडीने मिटविण्याचा प्रयत्न केला तो चांगल्या बंधुभावाने स्वीकारणे यातच दोन्हीही समाजाचे कल्याण व हित आहे. सीमेच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे शंकेचे वातावरण ठेवू नये, कारण अशी शंका ठेवल्याने कोणतेही महत्त्वाचे प्रश्न सामोपचाराने सुटणार नाहीत. गुजरात-महाराष्ट्र सीमाप्रश्न सोडविण्यासाठी आम्ही पाटसकर फॉर्म्युला तत्त्वाचा पुरस्कार केलेला आहे असे मा.श्री. चव्हाणांनी सभागृहास सांगितले. तदनंतर त्यांनी नागपूर करारामध्ये काय ठरविण्यात आले त्याचे स्पष्टीकरण केले. ३७१ हे कलम राज्य पुनर्रचना विधेयकात अंतर्भूत करण्यात आले. हे कलम नागपूर करारास कायदेशीर अधिष्ठान देण्याच्या हेतूने आणले गेले - तसेच महाराष्ट्र निर्मितीनंतर नवबौद्धांचे स्थान काय? असा प्रश्न आपल्याला अनेक लोकांनी विचारला त्याची आठवण देऊन मा. श्री. यशवंतराव चव्हाण सभागृहास उद्देशून जाहीरपणे म्हणाले की, नवबौद्धांचा प्रश्न हा नव्या महाराष्ट्रातील समाज जीवनाचा एक अतिशय नाजूक प्रश्न आहे आणि तो प्रश्न जिव्हाळ्याने, समझोत्याने आणि समाज जीवनामध्ये एकजिनसीपणा येईल या दृष्टीने सोडविला पाहिजे. तसा तो सोडविला जाईल असा मला विश्वास वाटतो. १८ मार्च १९६० साली झालेल्या चर्चेत कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या भागांना नव्या महाराष्ट्रात न्याय कसा मिळणार असे प्रश्न उपस्थित केले गेले. त्यास उत्तर देताना मा. श्री. चव्हाण म्हणाले की आपल्याला सर्व विभागात एकजिनसी महाराष्ट्र निर्माण करावयाचा आहे, हा विचार ठरलेला आहे, ही प्रतिज्ञा एका पक्षाची नव्हे तर तुम्हा आम्हा सर्वांची आहे.

दि.२५ मार्च रोजी महाराष्ट्र व गुजरात या द्वैभाषिक राज्याचे सर्व विधानसभा सदस्य, मंत्रीमंडळ व अध्यक्ष यांनी आपणास चांगले सहकार्य दिले याबद्दल सभागृहासमोर कृतज्ञता व्यक्त करून मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सर्वांचे आभार मानले.

रोहा येथील सत्याग्रहींवर पोलिसांकडून अमानुष लाठीहल्ला झाला, त्यावर विरोधी

सदस्यांनी कपात सूचना मांडली असता मा. श्री. यशवंतरावांनी त्यास कडाडून विरोध केला. लोकमत जागृत करण्यासाठी प्रशासन बंद पाडण्याची आवश्यकता नाही असे मा. श्री. चव्हाण म्हणाले.

गृहरक्षक दलाच्या कामगिरीबद्दल बोलण्याची संधी त्यावरील विरोधी सदस्यांनी मांडलेल्या कपात सूचनेने आणून दिली. गृहरक्षक दल या संघटनेने हिंदुस्तानातील सर्व राज्यात जनतेची उपयुक्त सेवा कशी केली हे सांगितले; त्यांना वाहतुक नियंत्रण, आग विझविण्याचेही शिक्षण दिले जाते. कोणतेही काम असो, गृहरक्षक दलाचे लोक ते अगदी निरपेक्षपणे व लोकांची सेवा करण्याच्या वृत्तीनेच करत असतात. हे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

विधानसभेत पाकिस्तान व चीन धार्जिणे पक्ष व व्यक्ति यांच्या कृत्यांना आळा घालण्याची कपात सूचना विचारार्थ आली. या कपात सूचनेस उत्तर देताना ''कोणत्याही राष्ट्रविरोधी कृत्यांपुढे सरकार नमणार नाही'' अशी निःसंदिग्ध भाषा त्यांनी वापरली होती. लोकशाही विकेंद्रीकरण समितीच्या अहवालावर बोलताना ते म्हणाले की, लोकशाही संघटनांचे प्रत्यक्ष राज्यकारभाराच्या स्वरूपात अभिव्यक्तिकरण (Expression) कोणत्या स्वरूपात करावे यासंबंधी सर्व देशभर चर्चा चालू आहे. या गोष्टीलाच अनुलक्षून असे मानले जाते की आम्हाला पंचायत राज्य निर्माण करावयाचे आहे. ते पुढे सांगतात, ग्रामपंचायत म्हटलं की माझ्या डोळ्यापुढे नवीन तऱ्हेचे शिक्षण आणि नवीन तऱ्हेच्या शक्ती उभ्या रहातात. खेड्यापाड्यात आज सहकारी चळवळ पसरत असून औद्योगिक वाढ होण्याकरिता खेड्यापाड्यात विद्युतशक्ती देण्यासंबंधीचे विचार पोहोचत आहेत. हे लक्षात ठेवून आम्हाला ग्रामीण जीवनातील लोकशाही संघटना उभी करावयाची आहे, हा लोकशाही विकेंद्रीकरणाच्या पाठीमागचा खरा विचार, खरी समस्या आहे.

ग्रामसंघटना ही शेवटची संघटना आणि राज्यसंघटना ही सर्वात वरची संघटना. या संघटनांना सत्ता दिली पाहिजे हे निश्चित. विकासाची जबाबदारी ह्या संघटनांवर टाकावयास हवी.

औद्योगिक विकास महामंडळ विधेयक मांडताना राज्याचा औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी एका वैधानिक औद्योगिक विकास मंडळाची आवश्यकता कशी आहे हे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

पानशेत दुर्घटनेबाबत विरोधकांनी मांडलेल्या अविश्वासाच्या ठरावास मा. श्री.

यशवंतरावांनी उत्तर दिले. पानशेतचे धरण फुटल्यानंतर खूपच संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यात एक महत्त्वाचा कागदच गहाळ झाला. त्यावर कडी म्हणजे ज्या न्या. बावडेकर यांचा आयोग नेमला होता त्यांनी आत्महत्या केली. त्यामुळे संशयाचे वातावरण आणखी गडद झाले. यासंबंधी काही सूचना सभेत झाल्या. त्यांना उत्तर देताना यशवंतराव जे बोलले त्यातून त्यांचा मोठेपणा, लोकशाहीवरील विश्वास आणि विरोधकांविषयीचा आदरच व्यक्त होतो. ते म्हणाले होते, ''सन्माननीय सभासद श्री. अत्रे आणि श्री. डांगे हे माझ्यापेक्षा वयाने मोठे आहेत आणि ज्या वातावरणात मी वाढलो आहे त्यात वयाचा मोठेपणा मानावयास शिकविले आहे...'' आम्ही जी यंत्रणा उभारली आहे आणि ज्या पद्धतीने आम्ही काम करीत आहोत ती लोकशाहीला धरून आहे की नाही हे आपण पहा. माझ्याही पक्षातील लोकांना ह्याबाबतीत स्वतंत्र मतदान करण्याची इच्छा असेल तर याच ठिकाणी उघडपणे मी माझ्या पक्षातील सदस्यांनाही अशा प्रकारचे स्वातंत्र्य देत आहे की, त्यांनी कोणत्याही बाजूने मतदान करावे.

लोकशाही विकेंद्रीकरण समितीच्या अहवालावरील चर्चेस उत्तर देताना श्री. चव्हाण सभागृहात म्हणाले की, विकेंद्रीकरण लोकशाही पद्धतीने अंमलात आणण्यात येईल आणि पंचायत राज्य व सहकारी संस्था यांचे सहाय्य हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी घेण्यात येईल.

अशा प्रकारे मा. श्री. यशवंतराव चव्हाण हे आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रात नवचैतन्य निर्माण करण्यात यशस्वी झाले. संरक्षणमंत्री पदाची सूत्रे स्वीकारण्यासाठी पं. नेहरूंनी मा. श्री. यशवंतरावांना दिल्लीस बोलाविले. सरंक्षणमंत्री पदाची सूत्रे घेण्यासाठी दिल्लीस जाण्याच्या प्रसंगी सभागृहाने त्यांच्या कारकीर्दीचा गौरवपूर्ण शब्दांनी उल्लेख केला. त्यावेळी ना. श्री. यशवंतरावांनी कृतज्ञतापूर्ण भाषण केले- हे भाषण इतके उत्कृष्ट आहे की ते वाचकांस उत्स्फूर्त वाटावे. अशा प्रकारच्या विधीमंडळात मा. श्री. यशवंतरावांनी केलेल्या भाषणांपैकी ४७ निवडक भाषणे आम्ही जनतेपुढे या ग्रंथाद्वारे ठेवीत आहोत. मराठी जनता ह्या ग्रंथाचे स्वागत करील अशी आशा बाळगतो. भारताच्या आधुनिक इतिहासाच्या अभ्यासकास या मालिकांचा उपयोग इतिहासाचे अव्वल साधन म्हणून मौलिक ठरेल असा विश्वास वाटतो.

या संग्रहात समाविष्ट केलेली भाषणे ही संबंधित विषयांच्या संदर्भात केलेली भाषणे

आहेत. तसेच त्या कालखंडातील राजकीय व सामाजिक परिस्थितीची पार्श्वभूमी लक्षात घेऊन ही भाषणे केलेली आहेत. जनसामान्यांच्या मनातील आशा-आकांक्षा समजून घेण्याच्या बाबतीत तर मा.श्री.यशवंतरावांचा हातखंडा होता. महाराष्ट्रातील सर्व सामाजिक थरातील जनतेबरोबर सुसंवाद स्थापन करण्यात मा. श्री. यशवंतराव यशस्वी झाले होते. मा. श्री. यशवंतरावांची सामाजिक एकात्मतेची तळमळ, महाराष्ट्राच्या विकासासंबंधीच्या कल्पना, मा. श्री. यशवंतरावांचा सुसंस्कृतपणा, राजकारणातील सहिष्णुता, राजकारणातील मतभेद असलेल्या पक्षाच्या व्यक्तींशीही आदराने वागण्याची सौजन्यशील दृष्टि आणि खरा लोकशाही दृष्टिकोन या भाषणात पदोपदी प्रतिबिंबित झालेला आहे.

**आण्णासाहेब शिंदे**
उपाध्यक्ष
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई
उपाध्यक्ष
राज्यनियोजन मंडळ,
नियोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

# FOREWORD

Shri Y.B.Chavan was one of the prominent leaders of independent India. He served Bombay State as a minister from 1946 to 1956. He became the Chief Minister of Bilingual Bombay State on 1st November 1956 and adorned the same position with great aplomb till the breakup of Bombay state in 1960. Therefore, his two-year stint as Chief Minister of Maharashtra till November 1962 when he was called to Delhi to become Defence Minister was eventful.

Shri Y.B.Chavan was a great patriot, an astute politician, perspective thinker and one of the political stalwarts of modern India. Integrity and strength of character were the basic facets of his unique personality. He stood for revolution wherever social welfare was being stifled. He was influenced by Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj of Kolhapur, Lokmanya Tilak, M.N.Roy, Mahatma Gandhi and Pandit Jawaharlal Nehru. As an ardent freedom-fighter, as Minister and Chief Minister of Bilingual state of Bombay and Maharashtra, as a Defence Minister, Home Minister, Finance Minister and Minister for External Affairs of India he rendered yeoman services to India and left an indelible mark on our contemporary public life.

While he was a minister in the State cabinet he introduced agrarian reforms such as the Tenancy Act, Anti-

fragmentation of Land Act and Warehousing Laws which benefited the long suffering peasants and working classes. He achieved his long cherished dream of placing the village economy on a democratic basis by giving more functions and powers to the Village Panchayats under the New Bombay Panchayats Act (1958).

He took specific steps to bring about an industrial truce and encourage industrialists to set up industries in Maharashtra. One of the important aspects of his work was the democratic decentralisation of administration. He brought into being the Zilla Parishads. The Zilla Parishads (District Councils) set up by him in early 1962 were democratically elected district councils entrusted with the primary responsibility of implementing the development projects in the district.

The Zilla Parishads have the same authority in the District as the State Government has in the State or the Union Government at the Centre.

Yeshwantrao though a consummate Politician, was an intellectual turned politician. His familiarity with social problems and socialism were deep enough to describe him as a scholarly man. His versatility was indeed admirable, as he was not only just interested but could delve deep into the intricacies of art, literature, science, music, agriculture, co-operative movement, history, culture and other subjects.

It is he who for the first time, like a patriarch of the family boldly set out to realign and modify the social, educational, cultural and agro-industrial fabric of Maharashtra and he achieved it in an admirable manner. He saw to it that the toiling and hardworking masses of this state stand firmly on the path of progress and development with all the might at their disposal.

As a statesman both on national and international levels he had few peers with the insight of a true seasoned politician, into the problems plaguing the country.

Social sciences, politics and finance were the spheres in which he excelled. The various disciplines branching off from these subjects kept him engaged and his interest were variegated. This independent, fundamental thinking has been reflected in his speeches.

But he hated doctrinaire approach to anything. Conciliation was his way of solving the problems.

Yeshwantrao Chavan Pratishthan Mumbai, a Registered body has been established mainly among other things, to perpetuate his memory.

Its principal aims are:-

(1) to collect available data, to study the social history of modern Maharashtra in general and various facets of the life and work of Yeshwantrao Chavan in particular,

(2) to organise advanced research in social sciences and

(3) to undertake academic activities for the diffusion of the various aspects of the glorious culture of Maharashtra.

As a beginning, Yeshwantrao Chavan Pratishthan decided to collect and edit the source material pertaining to the life history, efforts and achievements of Shri Y.B.Chavan who made a deep impact on the history of Maharashtra and India as a benevolent and able administrator. This volume is a collection of his selected speeches in the State Legislatures.

I feel confident that this volume will prove useful to the research scholars and others as it focuses on the most important role of Shri Y.B.Chavan as an outstanding Parliamentarian and an able administrator.

**SHARADCHANDRA PAWAR**

Chief Minister,
Maharashtra

# INTRODUCTION

The Yeshwantrao Chavan Pratishthan has launched an ambitious scheme of bringing out a series of publications containing the selected speeches delivered by the late Shri Yeshwantrao Chavan in the Bombay/Maharashtra State Legislatures and Parliament between 1946 to 1977 and his private correspondence. This series, it is hoped, will serve as valuable and useful source material for the students of modern History. They will also provide rare source material of great historical significance to the public in general and to the research scholars in particular enabling them to undertake a comprehensive and balanced study of social and political change in modern Maharashtra boldly carried out by Shri Yeshwantrao Chavan during his ministership in the State and at the Centre from 1946 to 1977. In this series, Volume I pertains to the important period of 1946 to 1962 and contains the notable speeches in Marathi delivered by Shri Yeshwantrao Chavan. These speeches mainly throw new light on the varied administrative reforms carried out with rare foresight, tact and zeal by Shri Yeshwantrao Chavan.The advantage of such a collection of speeches in a handy volume call for little remark.

Shri Yeshwantrao Chavan was in Bombay and in Maharashtra Legislature from 1946 to 1962 and in

parliament from November 1962 to 1977 as a minister. He made several speeches in the State Legislatures which are found in several debate volume, each volume containing on an average about one thousand closely printed pages. So also the speeches made in Parliament by Shri Yeshwantrao Chavan are found in the Parliamentary debates volumes.

This is a formidable and unwieldy work of reference and by no means everywhere available. Therefore, the Pratisthan entrusted this work of selecting notable speeches of Shri Yeshwantrao Chavan to me. I put them in shape as handy reference book.

The following collections of speeches delivered by Yeshwantrao Chavan, can be described as a broad spectrum of a gamut of subjects that came up for discussion in the Legislative Assembly first of Bombay State, then of Bilingual Bombay State and then of Maharashtra State during 1946-1962. The outstanding feature of these speeches is that they more than conclusively establish the fact that Shri Chavan is a consummate born parliamentarian. He disarms the opposition whenever it comes out with carping criticism of Government policies with candour coupled with firmness, be it ban on cow-slaughter or Socialism or Marxism. At the same time he is a respecter of persons and their opinions. He returns the opposition sallies with patience and a pragmatic approach though one finds him often repulsing the opposition attacks with banter and sarcasm and anecdotes. Truly, one feels often that Shri Chavan would have been a highly successful diplomat with his refined manners and infinite charm.

Thus he lucidly explains how ban on cow-slaughter may not be in the best interests of the country as an economic measure and like a cautious housewife stresses the need to drastically curtail the expenditure of the Gram Panchayats which are not realistic in their lavishness. All administrative

measures do not yield expected returns always. Thus the losses incurred in the deal over coal and cloth are justified by him in a precise manner by quoting facts and figures.

The opposition never loses an opportunity to pooh-pooh the ruling party on the sensitive issues of Maharashtra-Mysore border issue. But the seasoned statesman in him does not permit him to agree with the extremist solutions put forward by the opposition and he advises a cautious approach to the problem. Although he is a champion of the maximum autonomy to local self-government bodies he is of the opinion that supersession is the only remedy to the municipalities that tend to go astray. Though he is an ardent advocate of Samyukta Maharashtra he condemns the lawlessness to achieve the goal and hence one finds him defending the measures taken by the Government to establish law and order at the time of the peak of the Samyukta Maharashtra movement in which at a particular time the possibility of complete collapse of law and order situation, could have materialised. Thus as an administrator par excellence we find him often justifying police measures to curb lawlessness at various places in the State, be it bilingual Bombay State or the Unified Maharashtra State. The same administrative perspicacity does not allow him to agree to a proposal to hold Legislative Assembly Sessions at Nagpur and in Gujarat in the bilingual Bombay State. Far-sightedness, spirit of give and take and long term benefits guided him when he made some concessions, here and there at the time of the State's reorganisation. These are reflected in his speech made in reply to the various issues like the Dangs and other matters which were raised by the Opposition. His plea to the opposition to look at the brighter side of the Home Guards and suggest proposals to revamp the organisation is one more instance of his keenness to tap good resources for the welfare of the State. Similarly his advice to the opposition members not to be panicky by the activities of some anti-national and fissiparous elements

because in his opinion if we stand united as a rock no force on earth can break our unity, reflects the dour spirit of the Maratha leader.

He is an advocate of democratic decentralisation and sincerely believes that Gram Panchayats have an important role to play in this respect. Shri Chavan vehemently denied that Government was dormant regarding succour to the victims of the Panshet disaster. He is very scrupulous about the misuse of Government machinery for party purposes during election period and assures opposition members that he has issued instructions to prevent the recurrence of such type of malpractices.

In the matter of Government's advertisements to newspapers he was quick to point out that Government had never patronised any particular newspaper and that he was aware about its responsibility towards the small newspapers.

Shri Chavan favours increase in grants for ameliorating the condition of the Police, but is opposed to trade unionism among the police.

With the formation of united Maharashtra, Shri Chavan consents to holding of Legislative Assembly Sessions once a year at Nagpur, The common denominator of most of the speeches of Shri Chavan on various issues is restraint. Be it a case of firing, lathi-charge on some other controversial issue, Shri Chavan handles them deftly, showering praises on some one or pointing out at some shortcomings, making use of banter, sarcasm and wittiness, which endears him to all, friend or foe. And then comes the hour of glory, the reward of nurturing of the values that he considers most precious, conciliation and understanding. This is the bed-rock of his political career. The Prime Minister has chosen him to be at the helm of the affairs of the Defence Ministry after the China debacle. Naturally, every one in the House is happy because 'Sahyadri has been called upon to defend

the Himalayas', as they call it.

Now it is time for him to receive only bouquets, though he says he leaves Maharashtra with a heavy heart to discharge a far more important responsibility.

A special effort has been made to enhance the utility of this volume by providing summary in English of each speech, notes, index and titles. It is felt that this volume will meet adequately the requirements of the researchers in the field.

Shri Yeshwantrao Chavan was to many of my generation a unique embodiment of patriotism and was a beacon light to us. I was craving to put in shape his speeches and correspondence. I am indebted to Shri Sharadrao Pawar, present Chief Minister, Maharashtra and Chairman of Yeshwantrao Chavan Pratishthan, who gave me an opportunity to fulfil my desire. I am also thankful to him for writing the Foreword to this volume. I express my thanks to the members of Advisory Committee for their valuable guidance in this matter. I must also express my gratitude to Shri Anant Thorat, Librarian, Vidhan Bhavan Library and his staff particularly Sarvashri S.K.Upadhyay and Pashtekar for their voluntary and ungrudging help in making debates volumes and other relevant material available to us. I am grateful to my colleagues for their unstinted co-operation and help in preparing the press copy of this volume. Finally my thanks are due to the soft-spoken Madhavrao Bhagwat of Mouj Printing Bureau and his staff for printing this publication without delay.

V.G.Khobrekar

Bombay.

4-11-1989

# CONTENTS


प्रकाशकीय 7

Foreword 16

Introduction 19

**Part I : Speeches in The Assembly**
**भाग १ : विधानसभेतील भाषणे**

1. Prevention of Cow-Slaughter Bill 30
   गोवध बंदी विधेयक
2. Village Panchayat (Amendment) Bill 37
   ग्रामपंचायत (दुरुस्ती) विधेयक
3. Demands of Supply Departments 43
   पुरवठा विभागाच्या मागण्या
4. States' Reorganisation Bill 49
   राज्यपुनर्रचना विधेयक
5. Local Authorities and Primary Education (Amendment) Bill 62
   स्थानिक स्वराज्य संस्था व प्राथमिक शिक्षण कायद्यात सुधारणा सुचविणारे विधेयक
6. Bombay Municipal Corporation (Extension of Term) Bill 69
   मुंबई महापालिकेस मुदतवाढ देणारे विधेयक
7. No-Confidence Motion 71
   सरकारविरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव
8. Bombay Municipal (Further Extension of Limits and Schedule B.B.A. (Amendment) Bill 78
   मुंबई महानगरपालिकेस पुन्हा मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव

9. Attack by Caste Hindus on Members of Matang Community 90
सवर्ण हिंदूंकडून मातंग समाजातील लोकांवर झालेल्या हल्ल्यासंबंधी तहकुबी सूचना

10. Partial Attitude towards Samyukta Maharashtra Samiti 96
प्रतापगडावर जाणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सदस्यांबद्दल सरकारने दाखविलेल्या पक्षपाती धोरणासंबंधी चर्चा .

11. Holding of Assembly Session at Nagpur and Rajkot 104
नागपूर व राजकोट येथे विधीमंडळ अधिवेशन घेण्याच्या प्रस्तावावर चर्चा

12. Lathi- Charge in Akola City 110
अकोला येथे झालेल्या लाठीमारावर चर्चा

13. Indiscriminate Police Firing in Yeola 117
येवले येथील दंगलीत पोलिसांनी केलेल्या गोळीबारावरील चर्चा

14. Readjustment of Boundaries between Mysore and Bombay States 123
म्हैसूर-मुंबई राज्यांच्या सीमांची पुनर्आखणी करण्याचा प्रस्ताव

15. Bombay Reorganisation Bill 133
मुंबई राज्य पुनर्रचना विधेयक

16. Bombay Reorganisation Bill 145
मुंबई राज्य पुनर्रचना विधेयकावरील चर्चा

17. Appreciative References 149
सहकार्याबद्दल कृतज्ञता

18. Indiscriminate and Vicious Lathi-Charge on Satyagrahis at Roha 153
रोहा येथील सत्याग्रहींवर झालेल्या लाठीहल्ल्यासंबंधी कपात सूचना

19. Unsatisfactory Working of Home Guards 156
होमगार्डस्च्या असमाधानकारक कामगिरीबद्दलच्या कपात सूचनेवरील चर्चा

20. Check on Parties and Persons Having
Extra-Territorial Loyalties 161
पाकिस्तान व चीन धार्जिणे पक्ष व व्यक्ती यांच्या
कृत्यांना आळा घालण्याची कपात सूचना

21. Report of Democratic Decentralisation Committee 167
लोकशाही विकेंद्रीकरण समितीचा अहवाल

22. Condolatory References 182
दिवंगत मान्यवर व्यक्तींना आदरांजली

23. Industrial Development Bill 185
औद्योगिक विकास महामंडळ विधेयक

24. No-Confidence Motion 191
सरकारविरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव

25. Failure to get Marathi-speaking Border Areas
of Mysore state included into Maharashtra State 201
म्हैसूर राज्यातील मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रात सामील करून घेण्यात
अपयश आल्याबद्दल कपात सूचना

26. Use of Government Machinery during
General Elections 204
निवडणुका व शासकीय वाहनांचा वापर

27. Appreciative Reference to the Speaker 211
सभापती श्री. सिलम यांच्या कार्याचा गौरव

28. Adoption by Kolhapur Chatrapati 215
कोल्हापूर दत्तकविधान

29. Condolatory References 222
डॉ.बिधनचंद्र रॉय व श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव

30. Discussion on Police 225
पोलीस प्रशासनावरील चर्चा

31. Condolatory Reference 237
श्री. लक्ष्मण गोविंद पाटील यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव

32. Condolatory References 239
मान्यवरांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव

33. Appreciative Reference to the Services of Shri Y. B. Chavan 244
गौरवोद्गारांबद्दल कृतज्ञता

## Part II : Speeches in the Council
**भाग २ : विधानपरिषदेतील भाषणे**

34. Holding of Bombay Legislature Monsoon Session In Nagpur 248
मुंबई विधानसभेचे पावसाळी अधिवेशन नागपूर येथे भरविण्याबाबतचा प्रस्ताव

35. Commission to Frame a Scheme for Exchange of Territories between States 252
सीमा प्रदेश वाद

36. Holding of one State Legislature Session at Nagpur 259
राज्य विधान सभेचे एक अधिवेशन दरवर्षी नागपूरला भरविण्यासंबंधीचा प्रस्ताव

37. Discussion on Approach to Third Five-Year Plan 272
तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या दृष्टीकोनासंबंधी चर्चा

38. Restrictions on Government and Semi-Government Employees 281
कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षांचे सदस्य होण्यावर असलेल्या निर्बंधांचे शिथिलीकरण

39. Discussion on Governor's Address 286
राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा

40. Lathi-charge by Police near Belgian Consulate in Bombay 301
मुंबईतील बेल्जियन वाणिज्य दूतावासासमोर निदर्शने करणाऱ्यांवर पोलिसांकडून लाठीहल्ला

41. Report of the Committee on
Democratic Decentralisation 306
लोकशाही विकेंद्रीकरण समितीच्या अहवालावरील चर्चा

42. Condolatory Reference 311
डॉ. भास्कर पटेल यांच्या निधनाबाबत शोकप्रस्ताव

43. Discussion on Governor's Address 314
राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा

44. Condolatory Reference 325
डॉ. बिधनचंद्र रॉय व श्री. पुरुषोत्तम टंडन यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव

45. Development Authority for Konkan Region 327
कोकण विकास प्राधिकरण प्रस्ताव

46. Intimidation by Workers of Congress Party 333
काँग्रेस पक्षाकडून धाकदपटशा दाखविला गेल्यामुळे विरोधी
पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये पसरलेल्या घबराटीसंबंधी
नियम ९६ नुसार चर्चा

47. Appreceiative Reference to the Services
of Shri Y. B. Chavan 340
संरक्षण मंत्रीपदाची सूत्रे घेण्यासाठी दिल्लीस जाण्यापूर्वी
मा.यशवंतराव चव्हाण यांनी केलेले भाषण

48. Fragmentation of land - a disaster 342

49. Role of the Police praised, better deal recommended 347

50. Police force in districts 349

Notes 356
टिपा

Select Bibliography 369

# भाग १
# विधानसभेतील भाषणे

# गोवध बंदी विधेयक*

**२ एप्रिल १९५३**

*इ.स. १९५३ मध्ये मा. यशवंतराव चव्हाण मुंबई राज्याचे पुरवठा मंत्री असताना वरील विधेयक विरोधी पक्ष सदस्यांनी विधान सभेत मांडले. ह्या विधेयकास सरकारतर्फे विरोध करताना आर्थिक दृष्टिकोनातून गोवध-बंदी कशी अव्यवहार्य आहे हे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले आहे.*

अध्यक्ष महाराज, गोमातेसंबंधीच्या या प्रश्नावर मी माझ्या मातृभाषेत बोलत आहे याबद्दल आपण मला क्षमा करावी. गेले दोन दिवस या प्रश्नावर येथे जी चर्चा झाली आहे त्या चर्चेतील तपशिलाच्या मुद्यात शिरण्याची मला जरूरी नाही. हे बिल मांडणाऱ्यांच्या बाजूने आणि बिलाला पाठिंबा देणाऱ्या सन्माननीय सभासदांनी केलेल्या भाषणात त्यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्यांचा भरपूर समाचार-समाचार हा शब्द मी योग्य अर्थाने वापरीत आहे - या सभागृहात घेतला गेला असल्यामुळे त्या तपशिलाच्या मुद्यात शिरण्याऐवजी या प्रश्नाबाबत सरकारची काय भूमिका आहे ते थोडक्यात सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

या खात्याचे नामदार मंत्री **श्री. भाऊसाहेब हिरे** हे आजारीपणामुळे आज हजर राहू शकले नाहीत. ते हजर असते तर त्यांनीच या प्रश्नाबाबत सरकारची बाजू मांडली असती. पण या निमित्ताने या विषयावर बोलण्याची संधी मला मिळाली याबद्दल मला आनंद होत आहे.

* Bombay Legislative Assembly Debates, Vol.23, Part II, March-April 1953, 2nd April 1953, pp. 1967-70.

अध्यक्ष महाराज, हे बिल मांडणाऱ्या मंडळींनी प्रामुख्याने तीन प्रकारचे मुद्दे अुपस्थित केले आहेत. अेक आर्थिक स्वरूपाचा, दुसरा बिन आर्थिक स्वरूपाचा आणि तिसरा घटनात्मक स्वरूपाचा असे तीन प्रकारचे मुद्दे मांडण्याचा येथे प्रयत्न केला गेला आहे. यापैकी आर्थिक स्वरूपाचा जो मुद्दा मांडण्याचा प्रयत्न केला गेला तो बिल मांडणाऱ्यांच्या मनात हे बिल पाठविताना कितपत होता याबद्दल मला शंका आहे. पण ज्या अर्थी, त्यांनी आर्थिक प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला त्या अर्थी, या प्रश्नाला आर्थिक दृष्टीने महत्त्व आहे हे त्यांनीच कबूल केले आहे. अध्यक्ष महाराज, या प्रश्नासंबंधी आपण या सभागृहामध्ये विचार करतो तेव्हा या सभागृहाच्या बाहेर सबंध देशामध्ये जी चळवळ चालू आहे तिचा विचार केल्याशिवाय कोणतेही मत देणे अशक्य आहे असे माझे मत आहे. या प्रश्नासंबंधाने गेले कित्येक महिने या देशामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि तत्सम मंडळींनी जी भूमिका निर्माण केली आहे तिकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही. या प्रश्नासंबंधाने जनमतसंग्रहासाठी या देशातील काही कोटी लोकांच्या सह्या जमविण्याचा जो अलौकिक विक्रम या लोकांनी केला तो पुरा झाल्यानंतर संघचालकांनी दिल्ली येथे जे भाषण केले होते त्यात त्यांनी असे स्पष्टपणे सांगितले होते की - ''काही लोक या प्रश्नाचा आर्थिक भूमिकेवरून विचार करतात, परंतु या प्रश्नाकडे'' - म्हणजे गोवधाच्या प्रश्नाकडे - मी आर्थिक दृष्टीने पाहात नाही. या बाबतीत मला केवळ भावनात्मक विचार अभिप्रेत आहेत.''

म्हणजे संघचालकांना भावनात्मक प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधावयाचे आहे आणि त्यांनी तसे प्रामाणिकपणे कबूल केले आहे. असे असताना या सभागृहापुढे बिल घेअून येताना या प्रश्नांशी निगडित असलेला आर्थिक भाग येथे मांडला गेला यावरून हा प्रश्न जनतेपुढे मांडताना अेक प्रकारची अधिक काळजी घेणे जरुरीचे आहे याची त्यांना जाणीव आहे ही गोष्ट स्पष्ट झाली आहे.

आर्थिक प्रश्नाच्या दृष्टीने विचार करावयाचा झाला तर मी असे सांगू इच्छितो की, गोवधाच्या प्रश्नाबाबत या सरकारची भूमिका काय आहे ही यापूर्वी अत्यंत स्वच्छपणाने मांडली गेली आहे. १९५० साली कौन्सिलमध्ये असेच बिल आले होते त्या वेळी सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली होती. काँग्रेस सरकार, काँग्रेस पक्ष आणि काँग्रेसचे सभासद गोवधासाठी आतुर झालेले नाहीत, या देशात गोवध होअू नये अशीच त्यांची इच्छा आहे; परंतु या प्रश्नाची जी आर्थिक बाजू आहे तिचा विचार करताना पुन्हा धार्मिक चष्म्यातून या प्रश्नाकडे पाहिले जाअू नये. हा प्रश्न सोडविताना आपल्याला मुख्यतः गाअी पाळणाऱ्या लोकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करावा लागेल.

अध्यक्ष महाराज, या बाबतीतले काही आकडे मी येथे सांगितले तर ते अधिक अुपयुक्त ठरेल. गेल्या चार वर्षांपूर्वी या दुभत्या जनावरांच्या प्रश्नाचा विचार करण्याकरिता सरकारने अेक कमिटी नेमली होती. या कमिटीच्या अेकंदर संशोधनावरून असे दिसून आले की, जवळ जवळ १० टक्के जनावरे म्हणजे सुमारे १ कोटी ४० लक्ष जनावरे अशी आहेत की, ज्यांचा अुत्पादनाच्या दृष्टीने किंवा शेतीच्या कामाच्या दृष्टीने काही अुपयोग नाही. अर्थात अशा प्रकारची जनावरे या देशातील शेतीच्या धंद्यावर अेक प्रकारचा बोजा आहेत. कडबा किंवा चाऱ्यासाठी लागणाऱ्या वस्तूंवर जवळ जवळ १०० कोटी रुपयांचा खर्च होत असून शेतीच्या धंद्यावर अेका दृष्टीने हा मोठाच बोजा होअून बसला आहे. अशा परिस्थितीत या प्रश्नाचा आर्थिक दृष्टीने विचार करीत असताना कृपा करून धार्मिक, सांस्कृतिक त्याचप्रमाणे मनात दडलेले राजकीय प्रश्न अुभे करू नका असे मला सांगावयाचे आहे. या प्रश्नाचा आर्थिक दृष्टीने विचार करून घटनेमध्ये अेक ४८ वे कलम घालण्यात आले आहे. घटनेच्या डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्समध्ये असलेल्या या कलमाचा सन्माननीय मित्र श्री. पटेल यांनी जो अर्थ केला तो मात्र आम्हाला अमान्य आहे. त्या कलमाचा तसा अर्थ होअू शकत नाही.

हे ४८ वे कलम खाली दिल्याप्रमाणे आहेः

"The State shall endeavour to organise agriculture and animal husbandry on modern and scientific lines and shall, in particular, take steps for preserving and improving the breeds, and prohibiting the slaughter, of cows and calves and other milch and draught cattle."

या कलमाच्या मागे मूलभूत असा आर्थिक प्रश्न आधारभूत धरण्यात आलेला आहे. या कलमाचा अर्थ काही विद्वान पंडित कसाही लावीत असले तरी या कलमाचा आणि अेकंदर प्रश्नाचा अर्थ कसा लावावयाचा ते हिंदुस्थान सरकारने या कलमात स्पष्टपणे सांगितलेले असून मीही तोच अर्थ या सभागृहापुढे ठेवीत आहे. शेतीच्या कामाकरिता अुपयुक्त असणारी जनावरे आणि त्यांची प्रजा सुधारून वाढविणे आणि त्यांची जोपासना करणे आणि अशा अुपयुक्त जनावरांच्या वधाला बंदी घालणे हे मूलभूत तत्त्व या कलमाच्या मुळाशी आहे, आणि ही सूचना येण्यापूर्वीच आर्थिक दृष्टीवर आधारलेला असा अेक कायदा या सरकारने केलेला आहे. सन्माननीय सभासद श्री.जाधव यांनी पूर्वी कधीही न केलेली कामगिरी या प्रसंगी केली आहे आणि ती म्हणजे या कायद्यातील अुपयुक्त असे कलम त्यांनी सभागृहाला वाचून दाखविलेले असल्यामुळे मी पुन्हा तेच कलम वाचून सभागृहाचा वेळ घेत नाही. त्यांनी असे सांगितले की, शेतीच्या धंद्याकरिता अुपयुक्त असणारी आणि अुत्पादनाच्या दृष्टीने

अुपयुक्त असणारी जी दुभती जनावरे असतील ती मारली जाअू नयेत, त्यांची जेवढी काळजी घेता येअील तेवढी घ्यावी. तेव्हा यावरून आपल्याला असे दिसून येअील की, सरकारने या बाबतीत जे धोरण स्वीकारले आहे ते घटनेत घालून दिलेल्या आदेशाशी अगदी अेकरूप असेच आहे.

आर्थिक दृष्टीकोनातून आपण या प्रश्नाचा विचार करावयास पाहिजे; पण तो करीत असताना काही मंडळी भावनेच्या दृष्टीने त्याकडे पाहात असल्याचे दिसून येते. हिंदुस्थानातील लोकांच्या मनात गोमातेबद्दल पवित्र भावना आहेत हे मला माहीत आहे; पण एक गोष्ट मला आग्रहाने सांगावयाची आहे की ज्यांना गायी पाळाव्या लागणार आहेत त्यांच्या अडचणीचा विचार या बिलाच्या पुरस्कर्त्यांनी केलेला दिसत नाही. गायीचे किंवा म्हशीचे दूध पुढे आले असता कोणते दूध पातळ आहे, कोणते घट्ट आहे, कोणते कमी पाणी घातलेले आणि कोणते स्वस्त मिळणारे आहे हे पाहून मग काळ्याकुट्ट म्हशीचे असले तरी घट्ट असल्यामुळे तेच दूध आम्हाला पाहिजे असे म्हणणाऱ्या लोकांनी गोमातेचे रक्षण झाले पाहिजे असे म्हणावे यात काय अर्थ आहे? दुसऱ्यांनी अुपाशी राहून गायीचे रक्षण केले पाहिजे आणि त्यांनी मात्र खिशाला झेपेल असे म्हशीचे दूध घेतले पाहिजे असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ होतो. या गायी जर कोणाला सांभाळाव्या लागणार असल्या तर त्या शेतकऱ्यांनाच सांभाळाव्या लागणार आहेत. तेव्हा ज्या गायींचा अुपयोग नाही अशा गायी शेतकऱ्यांना सांभाळणे शक्य आहे की नाही या दृष्टीने आपण या बिलाकडे पाहिले पाहिजे. पूर्वीच्या काळी काही अेका विशिष्ट हेतूने धार्मिक कल्पना म्हणून या प्रश्नाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते म्हणून आताही त्याच भावनेने पाहून या कायद्याचे समर्थन करणे योग्य ठरणार नाही. आपली जर या कायद्याकडे पाहाण्याची धार्मिक दृष्टी असेल तर आपण तसे स्पष्ट सांगावे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते श्री.गोळवलकर यांनी सांगितले आहे की, आमची या प्रश्नाकडे पाहाण्याची आर्थिक दृष्टी नसून सांस्कृतिक मानबिंदू म्हणून आम्ही या प्रश्नाकडे पाहातो. तशा प्रकारे भावनात्मक दृष्टीने या प्रश्नाकडे पाहाण्याचा या लोकांचा दृष्टीकोन असेल तर हा दृष्टीकोन आम्हाला मान्य नाही असे मी पूर्वीच सांगितले आहे. तसेच गायीबद्दल आपल्या मनात कितीही पूज्य भावना असली तरी त्याचा अुपयोग राजकीय दृष्टीने करणे योग्य होणार नाही. गायीसंबंधी तुमच्या आमच्या आणि सर्वांच्या मनात पवित्र भावना आहेत, पण या प्रश्नाचा विचार करताना दुसरी अेक बाजू लक्षात घेतली पाहिजे. या प्रश्नामागे मुळातच असलेल्या धार्मिक श्रद्धेच्या भावना काही कारणामुळे पुढे कमी झाल्या म्हणून त्या धार्मिक भावनांना प्रोत्साहन

देण्यासाठी कायदे मंडळात बिल आणून शासनसंस्थेचा आधार घेणे अिष्ट ठरणार नाही. या बाबतीत आमचा त्यांच्याशी मुळातच मतभेद आहे हे मी त्यांना सांगू अिच्छितो. या जीर्ण श्रद्धा व भावना कायद्याने पुनरुज्जीवित होणार नाहीत; त्यासाठी जनतेत विधायक स्वरूपाची गोरक्षणाची वृत्ती निर्माण केली पाहिजे. अध्यक्ष महाराज, या प्रश्नाकडे पाहाण्याची दृष्टी आणि हे बिल मांडणाऱ्यांची अिच्छा यासंबंधी मी असे सांगू अिच्छितो की ज्या विचारसरणीचे प्रतीक म्हणून ते ही गोष्ट सभागृहापुढे मांडतात ती विचारसरणी अितिहासजमा झालेली आहे. कदाचित् अितिहासातील मूल्यवान् वस्तूंची यादी करावयाची झाली तरीदेखील या प्रश्नाला जागा मिळेल की नाही अितकी जीर्ण अशी ही विचारसरणी आहे. ती पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न या पद्धतीने यशस्वी होणार नाही हे मी त्यांच्या लक्षात आणून देऊ अिच्छितो.

यानंतर मला आणखी अेका गोष्टीचा अुल्लेख करावयाचा आहे आणि तो म्हणजे माझे मित्र सन्माननीय सभासद **श्री.अेस्.अेम.जोशी**[२] यांनी या बिलावर केलेल्या भाषणाचा होय. या विषयावर त्यांनी जे भाषण केले ते मी लक्षपूर्वक अैकले आहे. आता या ठिकाणी ते हजर नाहीत, पण ते जे बोलले त्याचा अुल्लेख करणे जरूरीचे असल्यामुळे मी तो करणार आहे. त्यांचे भाषण अैकताना मला अेक प्रकारे सखेदाश्चर्य वाटत होते, ते अशाकरिता वाटत होते की त्यांनी या बाबतीत आपली मते मांडताना हा आर्थिक प्रश्न आहे आणि तो सोडविण्याचा कायदा हा अुपाय नव्हे असे सांगत असताना अितके 'तथापि' आणि 'परंतु' वापरले की त्यामुळे त्यांना काय म्हणावयाचे आहे हे स्पष्ट होणे कठीण झाले. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून जी गोहत्या प्रतिबंधक चळवळ सुरू झाली होती तीवर आपण सही का केली याची कारणे देताना त्यांनी ज्या गोष्टी विशद केल्या त्यावरून हे संधिसाधूपणाचे पाअूल त्यांनी टाकले आहे असे म्हणावे लागते. ते स्वतः प्रामाणिक आहेत, त्यांची विचारसरणीही प्रामाणिक आहे, पण अशा तऱ्हेची विसंगत कृती पाहिली म्हणजे त्यामागे काय भूमिका आहे हे स्पष्ट होत नाही. वैचारिक गोंधळ कसा असतो याचे त्यांचे या विषयावर झालेले भाषण हे अुत्कृष्ट प्रतीक आहे असे म्हणावयाला हरकत नाही. तेव्हा मला असे म्हणावयाचे आहे की, या प्रश्नामागे असलेल्या वैचारिक भूमिकेचे पृथःकरण करून हा प्रश्न सभागृहाने समजावून घेतला पाहिजे. आमच्या कोणाच्याही मनात गोवधाबद्दल सहानुभूती नाही. सन्माननीय सभासद **श्री.लल्लूभाअी पटेल**[३] यांनी या बाबतीत आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. अेका अर्थाने त्यांनी गव्हर्नमेंटचीच बाजू मांडली आहे असे मी म्हणेन. त्यांनी गोपालनाच्या आणि गोरक्षणाच्या बाबतीत स्पष्टपणे आपले

विचार मांडले आहेत. हिंदुस्थानात गायीचे स्थान अुच्च राखावयाचे असेल आणि ती खऱ्या अर्थाने गोमाता व्हावी असे सन्माननीय सभासदांना खरोखरीच वाटत असेल, तर हा मनुष्य मुसलमान धर्माचा आहे की अितर कोणत्या धर्माचा आहे हे लक्षात न घेता गायीबद्दल त्याग करण्याची भूमिका आपण त्याच्या मनात निर्माण केली पाहिजे. गायीची सर्व प्रकारे जोपासना करून तिच्या दुधाबद्दल आवड निर्माण करणे आणि तिच्या रक्षणाची जबाबदारी घेणे किती जरूरीचे आहे ही भावना समाजाच्या सर्व थरापर्यंत निर्माण केली गेली तर गोपालनाचा प्रश्न आपण यशस्वी रीतीने सोडवू आणि शेतीच्या क्षेत्रातही गायीचे जे महत्त्वाचे स्थान आहे ते पुन्हा परत मिळवून देअू. नुसते बिल सभागृहापुढे मांडून किंवा ते पास करून हा हेतू साध्य होणार नाही. ज्यांनी हे बिल आणले आहे त्यांना गायीबद्दल खरे प्रेम दिसत नसून त्यांचा हेतू काहीतरी निराळाच दिसतो. त्यांनी सांगितले की गाय ही कम्युनल नाही. चार पायाचा कोणताही मुका प्राणी कम्युनल असू शकत नाही ही साधी गोष्ट त्यांच्या लक्षात यावयास पाहिजे होती. आपले दूध मुसलमानाला जाणार आहे, पारशाला जाणार आहे की हिंदूला जाणार आहे याबद्दल गाय शंका घेत नाही. तिच्या मनात सर्वांबद्दल सारखीच भावना असते, पण दुर्दैवाने गायीवर धार्मिक प्रेम करण्याचा आव आणणाऱ्यांच्या मनात मात्र तशी भावना निर्माण होत नाही. गायीपासून आपल्याला पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत आणि आम्ही त्या थोड्याफार शिकलो आहोत. आपल्याजवळ जे अुत्कृष्ट असेल ते समाजाला द्यावे ही गायीची वृत्ती गांधीजींनी स्वीकारली होती आणि ती चालू ठेवण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. अध्यक्ष महाराज, सभागृहापुढे असलेल्या बिलाबाबत मी माझी भूमिका स्पष्टपणे मांडली आहे आणि माझ्या मित्रांना गोमातेच्या कृपेने सद्बुद्धी होवो अशी अिच्छा मी व्यक्त करतो.

या बिलावर बोलताना त्यांनी भांडवलशाहीचा याच्याशी संबंध नाही असे म्हटले होते. मला त्यांना विचारावयाचे आहे की, मग दुसऱ्या कोणाचा याच्याशी संबंध येतो? आज या ठिकाणी श्रीमंतांच्या प्रतिनिधींना आणि राजेमहाराजे यांना गायीचा अचानक पान्हा फुटलेला दिसत आहे. आज हे सगळे राजेरजवाडे जणू काय दिलीप राजाचेच आपण आधुनिक वारसदार आहोत या थाटात गायींचे आपण रक्षण केले पाहिजे असा मुक्तकंठाने आक्रोश करू लागले आहेत. परंतु आजपर्यंत त्यांच्यापैकी कोणी गोशाळा किंवा पांजरपोळ काढल्याचे आपल्या फारसे अैकिवात नाही. उलट, रेससाठी असलेल्या घोड्यांचे तबेले त्यांच्याकडे असल्याचे मात्र जगजाहीर आहे. तेव्हा यात राजकीय प्रतिगामी वृत्तीचे जे प्रतीक आहे त्याला सरकारचा विरोध आहे,

गोवधाला सरकारचा विरोध नाही, अेवढेच मला म्हणावयाचे आहे.

आतापर्यंत सरकारची भूमिका मी मांडली आहे व सरकारतर्फे मी या बिलाला विरोध करीत आहे. मी सांगितलेल्या सर्व गोष्टी लक्षात घेअून सन्माननीय सभासद **श्री. पुरुषोत्तमभाई पटेल**[४] यांनी आपले बिल परत घ्यावे अशी मी त्यांना विनंती करतो. परंतु त्यांनी जर ते परत घेतले नाही तर सन्माननीय सभागृह ते अेकमुखाने नामंजूर करील अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे भाषण पुरे करतो.

■ ■ ■

On 2nd April 1953, a non-official Bill No.XL of 1952 to provide for the Prevention of Cow Slaughter in the Bombay State was introduced by the Opposition Members, Maharaj Kumar Daljitsinghaji Himatsinghaji, Jaswantlal Saubhagyachand Shah, Shanubhai, M.A.Patel, etc. who spoke on the Bill in Gujarati. Thereafter Shri Y.B.Chavan, Minister for Civil Supplies, replied to the discussion in Marathi and drew the attention of the House to Article 48 of the Constitution which states that the State shall take steps for preserving and improving the breed, and prohibiting slaughter of cows and calves etc. He defended the Government's action for not entertaining such kind of Bill.

# ग्रामपंचायत (दुरुस्ती) विधेयक*

**२९ मार्च १९५५**

*इ.स. १९५५ मध्ये मा. यशवंतराव चव्हाण मुंबई राज्याचे ''स्थानिक स्वराज्य संस्था'' विभागाचे मंत्री असता वरील दुरुस्ती विधेयक त्यांनी विधानसभेत मांडले. ह्या विधेयकाचे जोरदार समर्थन करताना ग्रामपंचायतींच्या खर्चात कपात करणे का आवश्यक आहे हे आपल्या भाषणात प्रतिपादन केले.*

अध्यक्ष महाराज, माझे मित्र सन्माननीय सभासद **श्री. देशमुख**[१] यांनी या कलमाला विरोध करताना जे मुद्दे मांडले आहेत त्या मुद्यांची यापूर्वी दखल घेतली गेली आहे पण त्यांनी ज्या दोन तीन नवीन कल्पना मांडण्याचा प्रयत्न केला आहे त्यांचे स्पष्टीकरण मला केले पाहिजे. अध्यक्ष महाराज, मी असे सूचित केलेले नाही की, सेक्रेटरीज हे ग्रामपंचायतीचे शत्रू आहेत किंवा सगळे सेक्रेटरी वाईट आहेत असेही मी सूचित केलेले नाही. माझ्या म्हणण्याचा आशय काय होता हे मी पुन्हा एकदा स्पष्ट करू इच्छितो. सरकार ज्या काही चांगल्या उद्देशाने ग्रामपंचायतींना पैसा देते तो ग्रामपंचायतींच्या नोकरांच्या पगारात जातो आणि असे पगारी नोकर ठेवण्याशिवाय दुसरे काम त्यांना राहात नाही, अशा तऱ्हेचा एक आक्षेप ज्या खेड्यांकरिता आपण ग्रामपंचायतींना पैसा देतो त्यांच्याकडून घेण्यात येतो; पण त्याबद्दल सन्माननीय सभासदांनी दखल घेतलेली नाही. या ग्रामपंचायती वास्तव वातावरणात खेड्यात काम करतात असा अनुभव येत नसल्यामुळे हे वातावरण त्यांच्यात निर्माण करणे जरूरीचे आहे. तेव्हा

* Bombay Legislative Assembly Debates, Vol.28. Part II, March-April 1955, 29th March 1955, pp.1574-77

छोट्या छोट्या खेड्यात ग्रामपंचायती यामुळे अनुकूल असे वातावरण निर्माण करू शकत नाहीत आणि काही नोकर ठेवणाऱ्या संस्था अशीच त्यांची ख्याती होते. या बाबतीत ग्रामपंचायतीसंबंधी सगळी चर्चा होईल त्या वेळी माहिती देण्याची माझी तयारी आहे. न्यायदानाचा अधिकार त्यांना दिल्यानंतर काही जिल्हेच्या जिल्हे असे सापडले की, तेथील ग्रामपंचायतींनी या अधिकाराचा वापर केलेला नाही. सर्व ग्रामपंचायतींना हा अधिकार दिला नाही याबद्दल सरकारवर दोष असेल तर तो स्वीकारण्याची माझी तयारी आहे. पण हे का घडले याच्या मुळात जाऊन चौकशी करण्याची जरूरी आहे असे मला वाटते.

या ग्रामपंचायतीच्या कारभाराकडे तेथील लोकांच्या दृष्टीतून या ग्रामपंचायतीकडे पाहाण्याचा त्यांनी प्रयत्न केला पाहिजे म्हणून मी त्यांना अशी विनंती करतो की, ते खेड्यात राहणारे आहेत तेव्हा खेड्यांच्या दृष्टीतून या ग्रामपंचायतीकडे पाहण्याचा त्यांनी प्रयत्न करावा, म्हणजे वास्तववादी वातावरण येथे दिसत नाही ही गोष्ट त्यांना मान्य करावी लागेल. मी असे म्हणू शकतो की, बहुतेक सगळ्या ग्रामपंचायतींना पार्ट टाईम सेक्रेटरी नेमावे लागतील कारण ८-१० तास लिखापढीचे काम करावे लागेल अशा प्रकारचे काम तेथे नाही. तसेच दिवाबत्तीचे काम करण्यासाठी फुल टाईम माणसाची जरुरी आहे असे ते म्हणू शकतात काय ? दररोजचा उद्योग करून एखादा दुसरा तास या कामासाठी देणारा मनुष्य खेड्यामध्ये सहज मिळू शकेल आणि एका तासाच्या कामासाठी फुल टाईम माणसाचा पगार देण्याची जरूरी नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊनच ग्रामपंचायतींना आपण अधिकार देणार आहोत आणि नोकरांचे पगार देण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकणार आहोत. सरकारने नोकरांना कायद्याने अशी गॅरंटी दिली म्हणजे ग्रामपंचायतींचा कारभार चांगल्या प्रकारे होईल हा चुकीचा दृष्टीकोन आहे. या ग्रामपंचायतींचा कारभार ज्या उद्देशाने सुरू केला आहे त्यासाठी लागणारी मदत देण्याची दृष्टी सरकारने कायम ठेवली आहे आणि या बाबतीत दोन तीन वेळा चर्चा झाली असली तरी मी पुन्हा एकदा स्पष्ट करू इच्छितो की, पगाराच्या बाबतीत दिली जाणारी मदत बंद केल्याने त्यांच्या कारभारावर अनिष्ट परिणाम होईल असे मला वाटत नाही. पगार जास्त दिल्याने काम चांगले होते अशी कल्पना असली तर ती चुकीची आहे. खेड्यापाड्यात जी विकासाची कामे करावयाची आहेत त्यासाठी निश्चित पगाराची माणसे असली म्हणजेच काम होऊ शकेल असे म्हणता येणार नाही. खेडेगावातील लोकांना एकत्र आणून कार्यप्रवृत्त करणे, लोकांचा विश्वास संपादन करणे व त्यांच्यामध्ये सेवा भावनेने वागून ही प्रचंड शक्ती आपल्याकडे ओढून

घेणे हे महत्त्वाचे कार्य फुल टाईम पगार घेणारी मंडळी करू शकतील काय ?

मी आपल्या दृष्टीकोनाला मदत करू शकत नाही. आपले तत्त्वज्ञान काहीही असले तरी मी सन्माननीय सभासदांना असे सांगू इच्छितो की, जर आपण वेळ खर्च करावयास तयार असाल तर या राज्यातील शेकडो खेड्यातून मी असे दाखवून द्यावयास तयार आहे की, ही कामे करणारी मंडळी सावकार नाहीत. कोठल्याही कल्पनेने आपण त्यांना सावकार म्हणू शकणार नाही आणि गावाच्या कामासाठी कसल्याही प्रकारची अपेक्षा न करता काम करण्यास ती मंडळी नेहमी तयार असतात. ज्यांची परिस्थिती चांगली आहे त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटलेला आहे म्हणून त्यासंबंधी काही विचार करण्याचे कारण नाही. पण जे उपाशीपोटी काम करतात त्यांना थोडीबहुत मदत करून ते भरल्या पोटाने रस्त्यावरून चालू लागले तर त्याबद्दल वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. आपण आपल्या मनाशी योजलेले ठोकताळे मांडून व काही खेड्यांची उदाहरणे घेऊन त्रैराशिक मांडू लागलो तर त्यामुळे फसवणूक होणार आहे. यासाठी सन्माननीय सभासदांनी असा ठोकताळा न करता खेड्यामध्ये वास्तव परिस्थिती काय आहे याबद्दल विचार करावा अशी मी त्यांना विनंती करतो. ग्रामपंचायतींकडे जी साधने आहेत व कामे आहेत याचा साकल्याने विचार केला तर सन्माननीय सभासदांच्या कल्पनेशी मी सहमत होऊ शकत नाही. ही कल्पना खेड्यातील वस्तुस्थितीला लागू होणार नाही. बांधलेली शिदोरी निश्चितपणे ग्रामपंचायतींच्या नोकरांना दिली पाहिजे ही पद्धत चुकीची आहे म्हणून सरकारने ही मदत बंद करण्यासाठी कायदा पुढे आणला आहे. तेव्हा या कलमाच्या पाठीमागे जे तत्त्व आहे ते लक्षात घेऊन सन्माननीय सभागृहाने या कलमाला पाठिंबा द्यावा अशी मी आग्रहाने विनंती करतो.

अध्यक्ष महाराज, माझ्यापूर्वी सन्माननीय सभासद श्री.देशमुख यांनी जे भाषण केले आहे, त्यामुळे उत्तरादाखल भाषण करण्याचे माझे काम सोपे झाले आहे. ग्रामपंचायतींना जमीन महसुलाच्या पन्नास टक्के द्यावा की पंचाहत्तर टक्के पैसा द्यावा यासंबंधी विरोधी पक्षियात एकमत का नाही आणि असे निरनिराळे आकडे देण्यामागे काय तत्त्व आहे याचा मला विचारच पडला होता, परंतु सन्माननीय सभासद श्री.देशमुख यांनी याचा असा खुलासा केला की, जमीनधाऱ्याचा क्रमशः वाढता हिस्सा ग्रामपंचायतींना मिळावा ही या उपसूचनांमागील भूमिका आहे. जर या उपसूचनांच्या पाठीमागे हे तत्त्व असेल तर त्याबद्दल कोणाचे दुमत होण्याचे कारण नसून या तत्त्वांशी मीही सहमत आहे. तथापि या उपसूचना मान्य करण्याच्या परिस्थितीत सरकार नाही.

जमीनमहसुलाच्या ७५ टक्केच काय, पण १०० टक्केही पैसा ग्रामपंचायतींना देण्याच्या परिस्थितीत सरकार असते तर मला आनंद वाटला असता, पण सन्माननीय सभासद श्री.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे एवढी रक्कम देण्याची शक्यता सध्याच्या सरकारच्या परिस्थितीप्रमाणे नाही. व्यावहारिक मर्यादांचा विचार करून सरकारला जेवढे देता येणे शक्य आहे त्या शक्यतेचा विचार करून आपण पन्नास टक्के हिस्सा ग्रामपंचायतीला देण्याची मागणी करीत आहोत असे सन्माननीय सभासद श्री. देशमुख म्हणाले, पण एवढा हिस्सा देण्याची सरकारची आर्थिक शक्ती आज नसल्यामुळे यांची उपसूचना मला मान्य करता येत नाही. या उपसूचनांमागे असलेले तत्त्व मलाही मान्य आहे हे मात्र मी स्पष्ट करतो.

त्यानंतर सन्माननीय सभासद श्री.देशमुख यांनी सिमला व नगर येथील ज्या दोन परिषदांचा उल्लेख केला त्यापैकी सिमला परिषदेला मी स्वतः हजर होतो. त्या परिषदेत असे ठरले की, जमीन-महसूल हा एक ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचा भाग झाला पाहिजे आणि तो मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे. त्याप्रमाणे या सरकारने ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या १५ टक्के हिश्श्याऐवजी ३० टक्के केला आहे आणि पूर्वीपेक्षा हे प्रमाण मोठे आहे हे उघड आहे. सरकारला जेवढे देता येणे शक्य आहे त्याचा विचार करून प्रथमतः२५ टक्के देण्याचे ठरविले असताना ग्रामपंचायतींचा हिस्सा वाढवून ३० टक्के देण्याला सरकारने मान्यता दिली आहे. २५ टक्क्यांऐवजी २४ १/२ टक्के सरकारने केले नाहीत तर ३० टक्के केले आहेत. यावरून सरकारला ग्रामपंचायतीला जितका जास्त हिस्सा देण्याची शक्यता आहे तेवढा देण्याची इच्छा आहे हे उघड होते. या बाबतीत अधिक सांगावयाचे म्हणजे पूर्वीच्याच मुद्यांची पुनरावृत्ती करण्यासारखे असल्यामुळे मी त्यांचा उल्लेख करीत नाही. सन्माननीय सभासद **श्री. जाधव**[६] यांनी बऱ्याच सूचना केल्या आहेत व त्यातील काही विचारार्ह असल्यामुळे त्यांचा जरूर विचार केला जाईल. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे ग्रामपंचायतीवर अधिक जबाबदारी टाकताना त्यांना पैशाची मदत केली पाहिजे याबद्दल तिळमात्र शंका नाही. तसेच ग्रामपंचायतीच्या हाती असलेली साधने कमी आहेत याकडे सरकारने दुर्लक्ष केलेले नाही आणि ज्या वेळी त्यांच्यावर अधिक जबाबदाऱ्या टाकल्या जातील त्या वेळी ही साधने त्यांना उपलब्ध करून दिली जातील ही गोष्ट त्यांनी लक्षात घ्यावी. त्यांनी खेड्यामध्ये काय काय असावे याची एक यादी दिली असून चीनचे उदाहरण दिले आहे. ह्या सर्व गोष्टी तेथे आहेत की नाहीत हे मला माहीत नाही, पण मला त्यांना सांगावयाचे आहे की,

खेड्यांची सुधारणा करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या रूपाने आपण बरेच पैसे खर्च करीत आहोत.

यानंतर सन्माननीय सभासद श्री.जोशी यांनी जी भावना व्यक्त केली आहे तिच्याशी मी सहमत आहे. खेड्यांमध्ये सांस्कृतिक जीवन निर्माण करून खेड्यांची सुधारणा करावी ही हिंदुस्थानच्या सामाजिक जीवनाची एक महत्त्वपूर्ण समस्या आहे आणि ती सोडविण्याचा ग्रामपंचायत हा एक मार्ग आहे असे मी समजतो. खेड्यामध्ये शिक्षणासाठी पैसा जातो. विकास योजनेसाठी पैसा जातो. खेड्यातील शेतीचा प्रश्न सोडविण्यासाठी, पाटबंधारे बांधण्यासाठी, चावड्या बांधण्यासाठी अशा निरनिराळ्या रीतीने पैसा जातो.  इतकेच नव्हे तर 'नॅशनल एक्स्टेन्शन स्कीम' आणि 'कम्युनिटी प्रोजेक्ट'च्या मार्फत लक्षावधी रुपयांची कामे होत आहेत, पण ग्रामपंचायती त्यामध्ये भागीदार होण्याची शक्यता दिसत नाही. याचे कारण काय आहे हे आपण पाहिले पाहिजे व त्यांना या कामासाठी प्रवृत्त केले पाहिजे; हा महत्त्वाचा प्रश्न आहे, ही विकासाची कामे लाखो रुपयांची होत असून त्या कामात भागीदार होण्यास प्रवृत्त करण्याचा प्रश्न निव्वळ पैसे दिल्याने साध्य होईल असे मी मानत नाही. हा जो लोकशाहीचा प्रयोग खेड्यांमध्ये आणण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत तो सामाजिक प्रश्न आहे, या मनोवृत्तीतून सोडवावयाचा आहे आणि तो सगळ्यांच्या सहकार्याने सोडविला तरच सुटणार आहे. निव्वळ हजारो रुपये देऊन तो सुटणार नाही आणि मी असे सांगू इच्छितो की, यामध्ये पक्षबाजीचा जो आरोप करण्यात आलेला आहे, तशी दृष्टी सरकारने ठेवलेली नाही. आपल्या देशातील लोकांचे जीवन राजकीय पक्षांशी सरमिसळ झाले आहे ही गोष्ट मी नाकारत नाही परंतु खेड्यातील जीवनाचा विचार करून ग्रामपंचायतींच्या कारभारात पक्षाचा विचार बाजूला ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. काँग्रेस पक्षाने देशातील प्रमुख पक्ष म्हणून या बाबतीत आपले धोरण जाहीर केले असून यामध्ये पक्ष म्हणून सामील न होण्याचे ठरविले आहे. अर्थात काँग्रेसच्या माणसाला व्यक्तीशः तू यात भाग घेऊ नको अशी बंदी घालता येणार नाही. तेव्हा पक्षबाजीचा जो आरोप करण्यात येतो तो बरोबर नाही एवढे दाखविण्यासाठी मी हे सांगितले आहे. या ग्रामपंचायतींचा कारभार निव्वळ जास्त पैसे दिल्याने सुधारेल हे जे त्रैराशिक मांडण्यात आले आहे ते तितकेसे बरोबर नाही. तेव्हा तत्त्वाच्या दृष्टीने ह्या पैशाच्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. सन्माननीय सभासद श्री.जोशी यांनी असे सांगितले की, खेड्यातील जो पैसा आपण मुंबईला आणतो तो पुन्हा तेथे परत जात नाही. तेथे जो

पैसा निर्माण होतो तो पुन्हा परत गेला पाहिजे हे तत्त्व योग्य आहे पण त्याची अंमलबजावणी व्यवहारात शक्य होईल तसतशी केली पाहिजे. तेव्हा उपमंत्री श्री. देशमुख यांनी जी सूचना मांडली आहे ती मी मान्य करतो आणि इतर सूचना व्यावहारिकदृष्ट्या स्वीकारता येणार नसल्यामुळे त्या अमान्य करतो.

■ ■ ■

Shri Chavan suggested in the Bill that Gram Sevak would be appointed as part time servant and his salary would be met from the 30% Land Revenue grant which would be given to the Gram Panchayat by the Government.

# पुरवठा विभागाच्या मागण्या*

१२ सप्टेंबर १९५५

*मा. यशवंतराव चव्हाण यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री असताना विधानसभेत आपल्या खात्याच्या संकीर्ण मागण्यांवरील चर्चेस उत्तर देताना कोळसा व कापड व्यवहारातील तोट्याचे समर्थन केले.*

अध्यक्ष महाराज, ही जी मागणी सभागृहापुढे आहे त्या मागणीचे दोन भाग करून कोळशावर झालेला तोटा आणि कापड व सूत यावर झालेला तोटा यामध्ये ती विभागलेली आहे. हा जो १९४३ ते ४६ चा जुना उल्लेख आहे त्या बाबतीत चर्चा करण्याचा सन्माननीय सभासदांचा हक्क आहे आणि कोळसा उगाळल्याप्रमाणे याचे कितीही वर्णन केले तरी ते पुरेसे होणार नाही. या सरकारची, ते जुन्या सरकारचे वारस असल्यामुळे जिम्मेदारी आहे असे सांगण्यात आले व ती गोष्ट मी मान्य करतो. ह्या विषयावर बोलताना सन्माननीय सभासद **श्री. भरुचा**[७] यांनी एक महत्त्वाची गोष्ट सांगून असा आक्षेप घेतला आहे की, सोसायटी ही सरकारची एक आवडती वस्तू आहे व तिच्याकडे आपुलकीच्या भावनेने बघून ही व्यवस्था झालेली असल्यामुळे हा तोटा आलेला आहे. तेव्हा मी त्यांना असे सांगू इच्छितो की, हा निर्णय १९४३ ते ४६ मध्ये असलेल्या सरकारचा असून ते म्हणतात त्या दृष्टीने ही गोष्ट घडलेली नाही.

हा जो करार केला गेला तो या बाजूने केला गेला नाही हे त्यांनी मान्य केले तर पुढचा खुलासा करून त्यांचे समाधान करता येईल. त्यांनी पहिली गोष्ट मान्य केली तर

* Bombay Legislative Assembly Debates, Vol.29, Part II, August-October, 1955. 12th September, 1955. pp. 814-18.

दुसरीही त्यांना मान्य करावी लागेल, पण कितीही खुलासा केला तरी ते ती स्वीकारतील असे मला वाटत नाही. ही जी गोष्ट घडलेली आहे ती विशिष्ट काळात घडलेली आहे आणि मला असे सांगावयाचे आहे की, पुरवठा खात्यासंबंधी निर्माण झालेल्या प्रश्नाबाबत तो काळ निघून गेल्यानंतर शहाणपण दाखविणे सोपे आहे. त्या वेळी कसल्याही प्रकारची जाणीव नसताना अडचणी येत होत्या, संकटे आ वासून पुढे उभी रहात होती व त्यांना न कळत तोंड द्यावे लागत होते. या कोळशाच्या बाबतीत बोलावयाचे तर पावसाळा जवळ आला होता, पेट्रोल मिळणे शक्य नव्हते व मोटारींनाही तो घेऊन वापरणे शक्य नव्हते. तेव्हा पावसाळ्यामध्ये तो पडून राहिला तर त्याचा पुढे उपयोग होणार नाही. अशा प्रकारची ही निरुपयोगी वस्तू ठरणार असल्यामुळे ती कोणाच्या ताब्यात द्यावी हा सरकारपुढे प्रश्न होता आणि त्या वेळच्या सरकारने कोठल्या तरी धनिक माणसाची किंवा सटोडियाची निवड न करता को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटीकडे हे काम सुपूर्त केले. सोसायटी निवडण्यामध्ये त्यांचा हेतू चांगला होता यात वाद नाही.

तसेच कोर्टामध्ये जाऊन या सोसायटीकडून पैसे का वसूल करून घेतले जात नाहीत असे येथे विचारण्यात आले आहे. या बाबतीत कोणताही लेखी करार न करता तोंडी चर्चा होऊन या सोसायटीवर जबाबदारी टाकली गेली होती आणि अध्यक्ष महाराज, सगळ्यात मोठी अडचण जर कोणती उभी राहिली असेल तर ती करार न केल्यामुळे उभी राहिली आहे.

ही सोसायटी लाडकी नव्हती तर कोर्टात जाऊन पैसे का वसूल केले नाहीत असे श्री.भरुचा यांचे म्हणणे आहे. ते स्वतः चांगल्या प्रकारचे वकील आहेत, तेव्हा कोर्टात जाण्यासाठी मूलभूत गोष्ट म्हणजे करार लागतो ही गोष्ट त्यांना माहीत असली पाहिजे आणि मुळात करार झाला नव्हता हीच खरी अडचण आहे.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद श्री.भरुचा यांची व्यक्तीशः कोणीही खात्री करू शकणार नाही, कारण त्यांचा दृष्टीकोनच निराळा आहे. परंतु कायद्याची अडचण काय होती हे मी त्यांना सांगितले आहे. ह्या सोसायटीने असा प्रश्न निर्माण केला होता की, व्हॉल्युम बेसिसवर आम्हाला दिलेला कोळसा कमी भरण्याची शक्यता आहे व तसा फॉरेस्ट खात्यावर त्यांनी आक्षेप घेतला होता म्हणून फॉरेस्ट डिपार्टमेंटमधील अधिकाऱ्यांकडून चूक झाली आहे काय या बाबतीत अधिकारी नेमून चौकशी केली होती. या बाबतीत फॉरेस्ट अधिकाऱ्यांचा दोष असला तर त्यांना शासन करण्याची आवश्यकता होती, परंतु काही करता येणे शक्य नाही असा एक्झिक्युटिव्ह

ऑफिसरकडून निर्णय घेण्यात आल्यामुळे सरकारला तो स्वीकारावा लागला. मी अगोदर स्पष्ट केल्याप्रमाणे सोसायटीने करार करण्याचे नाकारल्यामुळे सरकारला अधिक हुशारी व व्यवहारदक्षता दाखवावी लागली व मार्जिनचे अंतर वाढवावे लागले. सरकारला या बाबतीत एकंदर २४ लाखांच्यावर तोटा आला होता. त्यासाठी सरकारने १९४५-४६ च्या हिशेबामध्ये या योजनेखाली झालेल्या नफ्यापैकी २० लाख रुपये रक्कम बाजूला काढली. ही रक्कम सोडून सरकारला १९४५-४६ सालाच्या शेवटी जवळ-जवळ १ लाख रुपयांच्यावर निव्वळ नफा झाला. बाकीची राहिलेली ३ लाख रुपयांची रक्कम सरकारला कायदेशीररीत्या वसूल करता येणे शक्य नव्हते. यामध्ये मुख्य मुद्दा असा आहे की सोसायटीशी कायदेशीर करार झाला नसल्यामुळे कोर्टात जाणे शक्य नव्हते. हे प्रकरण कोर्टात नेले असते तर छळवाद करण्याची परिस्थिती निर्माण झाली असती असे मला वाटते. अशा परिस्थितीत पैसे सोडून देण्याखेरीज सरकारपुढे दुसरा मार्ग नव्हता, ही गोष्ट माननीय सभागृहाच्या लक्षात आल्यावाचून राहणार नाही. या सर्व कारणास्तवच सरकारला सभागृहापुढे मागणी मांडणे क्रमप्राप्त झाले.

दुसरा प्रश्न आहे कापडासंबंधीचा. ज्याअर्थी, अध्यक्ष महाराज, सरकार नुकसानीची रक्कम विचारात घेऊन माननीय सभागृहापुढे मागणी करीत आहे, त्याअर्थी या बाबतीत जो प्रश्न निर्माण झाला आहे, तो समजावून घेण्याचा या सभागृहाला वाजवी व जरूरीचा हक्क आहे. विषयांतर होत नसेल तर, अध्यक्ष महाराज, कापडाच्या व्यवहाराच्या बाबतीत मला एक गोष्ट सांगावीशी वाटते ती अशी की, याच्या अनुषंगाने जो प्रश्न निर्माण झाला आहे तो नीट समजावून घेण्यासाठी कापडाच्या व्यवहाराचा इतिहास लक्षात घेणे जरूरीचे आहे. १९४७-४८ पर्यंतचा नियंत्रणाचा काळ सोडला तर १९४८-१९५५ या सहा-सात वर्षांमध्ये कापडाच्या व्यवहारामध्ये ज्या घडामोडी झाल्या त्यांचा विचार केला तर कापडाच्या नियंत्रण पद्धतीमध्ये व व्यापाऱ्यांच्या परिस्थितीमध्ये आपणाला वेळोवेळी फेरफार करावा लागेल असे दिसून येईल. या काळामध्ये अध्यक्ष महाराज, सरकारने जवळ जवळ ३६ कोटी रुपयांची आवक येईल असा कापडाच्या धंद्यावर व्यवहार केला. जेव्हा जेव्हा कापड व सूत पुरवठ्याच्या योजना सरकारने आपल्या हातात घेतल्या तेव्हा तेव्हा सरकारने घोषणा केल्या की, फायदा व तोटा याकडे लक्ष न देता जनतेला कापडाचा पुरवठा कसा केला जाईल याकडे प्रामुख्याने लक्ष दिले जाईल. कारण फायदा किंवा तोटा होईल या दृष्टीने या धंद्याचे धोरण आखण्यात आले नव्हते. याचा अर्थ असा आहे की, जेव्हा योग्य तो

फायदा मिळण्याची शक्यता असते तेव्हा तो मिळवून कापडाचा साठा एकत्रित करण्याची अवस्था निर्माण होते. परंतु पुढे अशी परिस्थिती निर्माण होते की त्या वेळी नियंत्रणाची आवश्यकता संपते. त्या वेळी या प्रश्नाच्या पाठीमागे असणाऱ्या आर्थिक शक्तीचा आपणाला विचार करावा लागतो. जेव्हा वस्तूंची कमतरता भासते, लोकांची मागणी वाढते व मालाचा पुरवठा कमी असतो तेव्हा नियंत्रण करण्याची आवश्यकता असते. अशा परिस्थितीत लोकांच्या रांगाच्या रांगा उभ्या राहातात व कापड मिळत नाही म्हणून त्यांच्या तक्रारी वाढतात. अशा वेळी योग्य तो पुरवठा करण्याच्या दृष्टीने व धंद्याला संरक्षण देण्यासाठी सरकारला जादा पैशाची मागणी करावी लागते. याच्या उलट ज्या वेळी नियंत्रण काढण्याची परिस्थिती निर्माण होते त्या वेळी मालाचा पुरवठा खूप वाढलेला असतो व किंमती भरमसाट पडू लागतात. या बाबतीत सरकारला जो तोटा आलेला आहे तो एकदम आलेला नाही, ही गोष्ट मी या निमित्ताने स्पष्ट करू इच्छितो. नियंत्रणाच्या काळात नियंत्रण योग्य पद्धतीने चालावे म्हणून पुरवठा माल साठवून ठेवावा लागतो व जेव्हा नियंत्रण काढण्याची आवश्यकता निर्माण होते त्या वेळी तोटा येण्याखेरीज गत्यंतर नसते. अशा वेळी या व्यवहाराच्या पाठीमागे असणाऱ्या कामाच्या रचनेचा साकल्याने विचार करावा लागतो. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे जेव्हा नियंत्रण चालू राहाते तेव्हा नियंत्रणाच्या काळामध्ये पुष्कळसा फायदा मिळवून ठेवावा लागतो. परंतु निर्नियंत्रणाच्या काळामध्ये सरकारला तोटा सहन करावा लागतो. ही स्थिती सर्व धंद्यांच्या बाबतीत आहे. माझ्या माहितीसाठी मी कापड व सूत या धंद्यांच्यासंबंधी वर्षानुवर्षाचे आकडे जमा केले आहेत. पहिल्या तीन चार वर्षांमध्ये सरकारला जवळ जवळ १,९३,००० रुपयांचा तोटा सहन करावा लागला. शेवटी हा तोटा २३ लक्ष रुपयांवर गेला. परंतु या धंद्यामध्ये सुरवातीला जो फायदा झाला त्यापैकी १३ लक्ष ८२ हजार रुपये कॉटेज इंडस्ट्रीजसाठी मदत म्हणून देण्यात आले. या बाबतीत सरकारचा प्रत्यक्ष व्यवहार पाहिला तर, नो प्रॉफिट नो लॉस या बेसिसवर सरकारला या धंद्यामध्ये फक्त ९ लाख ४९ हजार रुपये तोटा झाला आहे असे दिसून येईल. गेल्या सहा-सात वर्षांमध्ये ३६ कोटी रुपये किंमतीच्या कापडाची जी आवक झाली तिच्याशी या तोट्याचे मोजमाप करावयाचे झाले तर ह्या तोट्याचे प्रमाण फक्त २ टक्क्यांवर जाते. हा तोटा विवक्षित व्यवहाराचा विचार केला तर मोठा दिसत असला तरी त्याचे मोजमाप करण्यासाठी आपणाला सर्व कापडाच्या व्यवहाराचा साकल्याने विचार करावा लागेल. एवढेच नाही तर आपण सिव्हिल सप्लाईज रकमेचा विचार केला तर या खात्याने बजेटमध्ये दर्शविल्याप्रमाणे जवळ जवळ साडेतीन कोटी रुपये दुसऱ्या

स्कीम्सना मदत म्हणून दिले आहेत व आणखी कोटी दीड कोटींची रक्कम देण्याची शक्यता आहे. ही गोष्ट मी एवढ्याचकरिता सांगितली की तोट्याचा विचार करताना सर्व पुरवठा खात्याच्या योजनांच्या पार्श्वभूमीचा विचार करावा लागतो.

यानंतर सन्माननीय सभासद श्री.एस्.एम्.जोशी यांनी पोतदार कंपनीसंबंधी जो उल्लेख केला, त्यासंबंधी मला जो खुलासा करावयाचा आहे तो असा की १९४८ साली ज्या वेळी नियंत्रण बसविण्याचा प्रश्न निर्माण झाला, त्या वेळी सरकारने पोतदार कंपनीला मुद्दाम हाक मारली नाही. सरकारने इतर कंपन्यांबरोबर या बाबतीत वाटाघाटी केल्या. परंतु सरकारचा तो प्रयत्न निष्फळ ठरला. अहमदाबादच्या एका व्यापारी संस्थेने तर भरमसाट कमिशनची मागणी केल्यामुळे त्या संस्थेने केलेली मागणी सरकारला नाकारावी लागली. या कामासाठी शेवटी टेंडर्स मागविणे भाग पडले. पोतदार कंपनीला बोलावून काम घ्या असे सांगण्यात आले नाही. त्या कंपनीचे कमी टेंडर होते म्हणून तिला काम देण्यात आले. परंतु ह्या कंपनीला ज्या अटी अनुकूल वाटल्या त्या पुढे पुऱ्या करता आल्या नाहीत. या बाबतीत मला असा खुलासा करावयाचा आहे की प्रत्यक्ष व्यवहारामध्ये ज्या अडचणी निर्माण होतात त्या अंमलात आणणे कठीण जाते असा आपला अनुभव आहे. मला सभागृहाला मुद्दाम सांगावयाचे आहे की, हा सगळा व्यवहार एकाच कंपनीला दिला असे नाही. काही सहकारी सोसायट्यांनाही त्या वेळी काम देण्यात आले होते. त्यापैकी प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल सोसायटीला काम दिले गेले. इतकेच नाही तर सर्व जिल्ह्याच्याच नव्हे तर झोनल असोसिएशन्स नेमण्याचा प्रयत्न करण्यात आला व शेवटी पोतदार कंपनीचा कमी रेट असल्यामुळे सरकारला तो स्वीकारावा लागला.

अध्यक्ष महाराज, एकंदर तोट्याच्या प्रश्नाचे मी जे विवेचन केले व या प्रश्नाची मी जी पार्श्वभूमी सांगितली त्यावरून मला खात्रीने असे वाटते की, ज्या परिस्थितीमुळे तोटा आला ती परिस्थिती अपरिहार्य होती. ज्या काळामध्ये तोटा झाला त्या काळामध्ये सरकारने आपल्या लहरीप्रमाणे वागून कापडाची विक्री करण्याचा प्रयत्न केला नाही. १९५२ च्या फेब्रुवारी-मार्च पासून कापडाच्या धंद्यामध्ये ज्या वेळी स्लंप सुरू झाला त्या वेळी सरकारने योग्य ती खबरदारी घेऊन फायनॅन्शिअल ॲडव्हायझर्स व जिल्ह्याजिल्ह्यातील कलेक्टर्स इत्यादी यांची कमिटी नेमून निगोशिएशन्स करण्याचा व टेंडर्स मागविण्याचा प्रयत्न केला व कापडाच्या साठ्यांची विक्री केली. असे करीत असताना सरकारला जितका अपरिहार्य तोटा होता तितकाच स्वीकारावा लागला. अशी अवस्था निर्माण होत होतच देशाची प्रगती होत असते. कापडाचे निर्नियंत्रण

यशस्वी होण्यासाठी ज्या अपरिहार्य गोष्टी होत्या त्या गोष्टी विचारात घेऊन सभागृह माझ्या सूचनेला मान्यता देईल अशी आशा करून मी माझे भाषण संपवितो.

On 12th September 1955, Shri Y.B.Chavan, Minister of Civil Supplies, made a demand before Legislative Assembly for a Supplementary Grant of Rs.68,32,717 under major head of account "47, Miscellaneous Departments (except Labour)" and defended the cause.

# राज्यपुनर्रचना विधेयक *

## २८ मार्च १९५६

*इ.स. १९५६ मध्ये वरील विधेयक सभागृहाच्या मतप्रदर्शनाकरिता मांडताना मा. यशवंतराव चव्हाण यांनी राज्यपुनर्रचना मंडळाच्या शिफारशीचे जोरदार समर्थन केले.*

---

अध्यक्ष महाराज, राज्यपुनर्रचना प्रश्नावरील कायद्याचा जो मसुदा या सभागृहापुढे मत प्रदर्शनासाठी ठेवण्यात आला आहे त्यावर माझे विचार मांडण्याची जी संधी मला या निमित्ताने मिळाली आहे, ही माझ्या स्वतःच्या दृष्टीने मी मोठी भाग्याची गोष्ट समजतो. राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नासंबंधी माझ्याविषयी अनेक वेळी जे लिहिले व बोलले गेले आहे त्याचा विचार करता, माझ्या मतदार-संघाचा प्रतिनिधी या नात्याने माझे जे विचार आहेत ते शंभर टक्के व्यक्त करण्याची मला संधी मिळाली यातच मला खरा आनंद वाटत आहे. अध्यक्ष महाराज, या प्रश्नासंबंधी आपल्या देशामध्ये व राज्यामध्ये इतके लिहिले व बोलले गेले आहे की, ज्या योगाने हा प्रश्न सोडविण्याला मदत होण्याऐवजी अधिक गुंतागुंत होईल असे आणखी काहीतरी सांगून त्यामध्ये भर टाकण्याची माझी बिलकूल इच्छा नाही. तशी कोणाचीच इच्छा असणार नाही. परंतु ह्या प्रश्नाच्या बाबतीत जनतेच्या ज्या काही मूलभूत भावना आहेत व या प्रश्नाच्या पाठीमागे जे मूलभूत कारभारविषयक मुद्दे व राजकीय प्रश्न आहेत त्यांची अर्थातच खुल्या दिलाने चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते. ह्या दृष्टीने या मसुद्याच्या

---

* Bombay Legislative Assembly Debates. Vol.31, Part II. 26th March 1956. pp 1404 to 1412

बाबतीत मी माझे विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करणार आहे. आपल्यापुढे असलेल्या मसुद्यातील तपशिलाचा विचार करण्यापूर्वी राज्यपुनर्रचनेचा प्रश्न ज्या परिस्थितीतून निर्माण झाला त्या परिस्थितीचे परिशीलन करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. हे परिशीलन वा समीक्षण काही वैचारिक कसोटीवर केल्याशिवाय आपणाला निश्चित अशा निर्णयाप्रत जाता येणार नाही असे माझे स्वतःचे मत आहे. समीक्षणाची ही कसोटी, अर्थात्, व्यक्तीव्यक्तीच्या दृष्टीने भिन्न असण्याची शक्यता आहे. याचे कारण असे आहे की, कोणती व्यक्ती कोणत्या राजकीय दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पाहाते याच्यावर ही समीक्षणाची कसोटी व परिशीलन अवलंबून राहाणार आहे. माझी कसोटी त्यांच्या कसोटीपेक्षा वेगळी ठरली तर ते मला माफ करतील अशी आशा मी व्यक्त करतो. परंतु मला सभागृहाला असे सांगावयाचे आहे की, माझी या बाबतीत जी कसोटी राहील ती मात्र निश्चित अशीच राहील.

अध्यक्ष महाराज, आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ज्यांचे युगप्रेरणा असे वर्णन करता येईल अशा दोन तऱ्हेच्या आकांक्षा आपल्या देशाच्या राजकीय जीवनामध्ये निर्माण झाल्याचे आपण पाहात आहोत. त्यातली पहिली आकांक्षा ही ह्या देशातील आर्थिक समानतेसंबंधी होती, आणि दुसरी सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेची होती. या प्रेरणा प्रस्थापित करण्याकरिता म्हणून ज्या काही अनेक साधनांचा विचार आपण आपल्या मनामध्ये करीत राहिलो त्यात ही आर्थिक समानता आणि सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी त्यांना पोषक आणि उपयुक्त अशा तऱ्हेची राज्यकारभारविषयक रचना असावी हा विचार आपल्या देशातील विचारवंतांपुढे आणि कार्यकर्त्यांपुढे आला. भाषिक राज्यांचा प्रश्न या विचाराचा परिपाक आहे. आपण असे पाहिले की भाषाविषयक प्रश्न आणि त्याला अनुलक्षून राज्यांची रचना याचा इतिहास कितीही जुना असला तरी त्यासंबंधीची तीव्रता, व्यावहारिक तीव्रता जिला म्हणता येईल ती तीव्रता स्वराज्य प्राप्त झाल्यानंतर अधिक वाढीस लागली यात शंका नाही.

अध्यक्ष महाराज, आपणाला माहीत आहे की, देशातील पुष्कळ नेते, अगदी पंडित जवाहरलाल नेहरूंपासून आपल्या सभागृहाचे नेते **श्री. मोरारजीभाई देसाई**[६] ह्यांच्यापर्यंत सर्व भाषाविषयक तत्त्वाचा आणि त्यावर आधारलेल्या राज्य पद्धतीचा जोराने पुरस्कार केला होता किंवा त्याबद्दल आपुलकी दाखविली होती किंवा आग्रह धरला होता असे दिसले नाही. ज्या ज्या वेळी संधी मिळाली त्या त्या वेळी ह्या नेत्यांनी ह्या प्रश्नाबाबतचे आपले मत निराळ्या तऱ्हेने सांगितले होते. असे असताना

आपण असे पाहतो की, राज्यकारभारविषयक अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांची उकल करीत असताना देशामध्ये निर्माण झालेले लोकमत लक्षात घेऊन त्या दिशेने पाऊल टाकीत असताना त्यांनी आपल्या मतात योग्य असा बदल केलेला आहे असे मला वाटते. आणि म्हणून मी असे म्हणेन की ह्या बिलाचा विचार करताना माझ्या कल्पनेप्रमाणे अत्यंत महत्त्वाची कसोटी मी ही लावीन की, आर्थिक समानता व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी जी एक नव्या प्रकारची राज्यकारभाराची रचना पाहिजे आहे, जी नवी यंत्रणा पाहिजे आहे ती यंत्रणा समाजाच्या मनाजवळ जाऊन समाजाच्या अंतःकरणाशी जाऊन भिडेल अशी असली पाहिजे. आणि ही पद्धती म्हणजेच जनभाषेतून चाललेला राज्यकारभार किंवा भाषिक राज्ये होत. म्हणून ह्या बिलाचा विचार करताना कोणता भाग कोणत्या राज्यात गेला आहे हे व्यावहारिक दृष्ट्या जरी पाहिले पाहिजे तरी भाषेवर आधारलेली राज्यरचना ह्या दृष्टीने ह्या बिलाने किती प्रगती केली आहे ही अत्यंत महत्त्वाची कसोटी आहे आणि ही कसोटी लावून मग हे बिल योग्य आहे की अयोग्य आहे किंवा समाधानकारक आहे की असमाधानकारक आहे हे आपण पाहिले पाहिजे. राज्यपुनर्रचना मंडळाने काय केले याचा आता विचार करण्याचे फारसे कारण नाही, राजकारणात कोणाचे हेतू काय आहेत वा इच्छा काय आहेत हे तपासून काही उपयोग नसतो. तर, प्रत्यक्ष काय घडले हे पारखून घ्यावे लागते. जे प्रत्यक्ष घडत आहे ते कसे आहे हे आपण पाहिले पाहिजे. एस्.आर्.सी.ने भाषावार प्रांतरचनेचा जो नकाशा तयार केला आहे त्यावरून आपल्याला दिसून येते की, कमिशनचे खरे मत काय होते? हिंदुस्थान सरकारच्या मान्यतेने जे बिल आज आपल्या सभागृहापुढे आले आहे त्याचा विचार केला तर किती शब्दात भाषाविषयक तत्त्व मान्य केले आहे हे सोडले तरी त्या सरकारलाही हे तत्त्व टाळता आलेले नाही, स्वीकारावे लागले आहे, असेच दिसून येते. जी नवीन राज्ये निर्माण करण्यात आली आहेत त्यांच्या नकाशाकडे पाहिले तर आपल्याला असेच दिसून येते की, महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, विशालांध्र वगैरे जे निरनिराळे प्रांत निर्माण करण्यात आले आहेत ते भाषेच्या मूलभूत आधारावरच करण्यात आलेले आहेत. मध्य प्रदेश फोडला आणि त्यातून हिंदी बोलणारांचा भाग वेगळा केला, यावरून आपल्याला असेच दिसून येते की, भाषाविषयक राज्यरचना झाली पाहिजे हेच तत्त्व स्वीकारले गेले आहे. या नव्या प्रांत रचनेने त्या त्या प्रांतातल्या लोकांना समाधान झाले असले पाहिजे आणि निदान आपल्या भागाबद्दल बोलावयाचे तर ह्याबद्दल मला तरी समाधान होते. कोणाला काय वाटते हा प्रश्न येथे विशेष महत्त्वाचा

नाही, कोणाला काय आवडते आणि आवडत नाही, अथवा कोणाची आवड किंवा नावड ही राजकारणात निर्णायक ठरू शकत नाही, परंतु नवीन राज्यांची निर्मिती करीत असताना ती भाषेच्या मूळ तत्त्वावर आधारलेली असावी ही जी जनतेची आकांक्षा आहे तिचा विचार केला तर हे बिल म्हणजे फार मोठा विजय आहे असेच म्हणायला पाहिजे. म्हणून मी ज्या कसोटीचा उल्लेख केला ती कसोटी लावून ह्या बिलाचा विचार केला तर ह्या बिलाचे अंतःकरणपूर्वक स्वागत केले पाहिजे असे मला वाटते. मी हे ह्या अर्थाने म्हणतो की, ज्या प्रश्नाबद्दल लोकांना इतका जिव्हाळा होता तो प्रश्न जनतेच्या मनाशी अगदी जवळ जाऊन आणि समजावून घेऊन ते मूलभूत तत्त्व ह्या बिलात स्वीकारले गेले आहे याचा मला आनंद आहे. एकमत आहे ते येथपर्यंत पण हे तत्त्व तपशिलात जाऊन कोठे किती लावले आहे आणि कोठे लावलेले नाही याचा विचार केल्यानंतर मात्र मतभेदाचे प्रश्न निर्माण होतात; आणि ह्या मतभेदाच्या बाबतीत माझी भूमिका मला ह्या सभागृहापुढे स्पष्टपणे मांडली पाहिजे. अर्थात याच वेळी मी हेही स्पष्ट करू इच्छितो की नवी राज्यरचना करीत असताना एकमेव भाषेचेच तत्त्व घ्यावे असा माझा हट्टाग्रह नाही. आर्थिक व इतर बाबींचाही त्यावेळी विचार करावा लागतो हे मला अमान्य नाही.

मतभेद कोठे निर्माण होतो? ह्या बिलाचा या सभागृहात आपण विचार करीत असल्यामुळे ह्या बिलाशी मर्यादित आणि ह्या सभागृहापुढे बोलणेच जेवढे योग्य आहे तेवढ्यापुरतेच मी बोलणार आहे. मी जर हिंदुस्थानच्या पार्लमेंटमध्ये बोलत असतो तर ह्या इतरही काही विभागांबद्दलही मी बोललो असतो. परंतु मुंबई राज्याच्या ह्या सभागृहापुढे बोलत असताना मुंबई राज्याशी निगडित विभागांचा ह्या बिलात जेवढा निर्देश आलेला आहे तेवढ्यापुरतेच बोलले पाहिजे. ह्या दृष्टीने पाहिले तर असे दिसून येईल की, महाराष्ट्र, गुजराथ आणि कर्नाटक ही जी तीन राज्ये निर्माण करण्यात आली आहेत त्यापैकी कर्नाटकाला १०५ टक्के मिळालेले आहे. गुजराथलासुद्धा त्यांच्या मनाप्रमाणे मिळालेले आहे. मी त्यांचे त्यांच्या राज्यनिर्मितीबद्दल अभिनंदन करतो. महाराष्ट्राचेही अभिनंदन केले पाहिजे; पण ते निर्भेळ अभिनंदन नाही. गुजराथला जे पाहिजे होते ते त्या लोकांना मिळाले आहे, कर्नाटकच्या लोकांना जे पाहिजे होते त्यापेक्षा त्यांचे काम १०५ टक्के झाले आहे असे म्हणायला हरकत नाही, पण महाराष्ट्राचे राज्य निर्माण करीत असताना त्यात जो महत्त्वाचा अपुरेपणा राहिलेला आहे त्याबद्दल मला दुःख वाटते, आणि ती दुःखाची भावना व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. एक गोष्ट चांगली झाली आहे ती मराठवाड्याच्या बाबतीत. निजामाचे राज्य

शतकानुशतके हिंदुस्थानात होते ते राज्य स्वराज्य मिळाल्याबरोबर आपल्या देशात सामील करण्यात आले आणि तेथील जनतेची निजामी राजवटीतून मुक्तता करण्यात आली. आम्हांला ह्या राज्यातील मराठवाड्याबद्दल जिव्हाळा किंवा आपलुकी वाटते याचे तसेच महत्त्वाचे कारण आहे. ह्या विभागांशी मराठी बोलणारांचे नाते अत्यंत जवळचे आहे. आमच्या एका मराठी कवीने यासंबंधीची आमची भावना फार सुंदर रीतीने व्यक्त केली आहे. तो म्हणतो, मराठी बोलणारा मनुष्य जेव्हा मराठवाड्याकडे जायला निघतो तेव्हा माहेराला जायला निघालो आहे असे त्याला वाटते. मराठीतील उत्कृष्ट काव्य मराठवाड्यातल्या पैठणला लिहिले गेले आहे. एकनाथ, ज्ञानेश्वर ह्यांसारखे महाराष्ट्राचे मोठे संत त्या ठिकाणी होऊन गेलेले असल्यामुळे मराठवाड्याबद्दल महाराष्ट्रीयांना आपुलकी वाटते. थोडक्यात सांगावयाचे तर महाराष्ट्राचे अंतःकरण ह्या भागाशी एकजीव झालेले आहे अशी ह्या मराठवाड्याबद्दल भावना आहे. म्हणून हैद्राबादच्या निजामशाहीच्या कचाट्यातून मराठी भाषिकांची मुक्तता झाली याबद्दल मला आनंद वाटला असून या भावनेमागे निर्भेळ आनंदाशिवाय अन्य कोणतीही भावना नाही. एका मराठी भाषिकाला दुसऱ्याबद्दल जी आपुलकीची भावना वाटत असते, त्या भावनेमुळे मराठवाडा महाराष्ट्राला मिळाला यामध्ये महाराष्ट्राला फार मोठा आनंद वाटत आहे. विदर्भाचे छोटे राज्य असावे असा आपला आग्रह राष्ट्रनेत्यांच्या विनंतीला मान देऊन तेथील काही पुढाऱ्यांनी सोडला आणि विदर्भासह महाराष्ट्र निर्माण होत आहे याबद्दल मला आनंद वाटतो. एका भाषेला एका राज्यात एकत्र आणण्याचा जो प्रवाह व जी प्रक्रिया दिसत आहे, ती स्वागतार्ह आहे. ज्या प्रमाणात असे एकत्रीकरण झाले आहे त्या प्रमाणात मी माझ्या या विधेयकावर आनंद व्यक्त करतो. पुरा महाराष्ट्र निर्माण झाला नसून त्यात थोडा दुःखाचा भाग आहे आणि मुंबई महाराष्ट्रात न घातल्यामुळे हे दुःख निर्माण झाले आहे. महाराष्ट्रात मुंबई सामील न केल्यामुळे प्रत्येक मराठी भाषिकाला दुःख झाले आहे. मराठी भाषिक जनतेचे प्रतिनिधी किंवा त्यांच्यातील एक म्हणून मीही दुःखी झालो आहे.

मुंबई महाराष्ट्राची आहे की नाही याविषयी बोलताना कोणती परिभाषा वापरावी याबद्दल मी थोडासा संकोचलो आहे. शब्दांनी भावना पूर्णतया व्यक्त होतातच असे नाही आणि कधी कधी शब्दांनी गैरसमज व गोंधळ वाढण्याचा प्रकार घडतो असा माझा अनुभव आहे. म्हणून शब्दांचा वापर करताना मी काळजी घेत आहे. मुंबई महाराष्ट्राची आहे की नाही हा शब्दप्रयोग माझ्या कल्पनेप्रमाणे चुकीचा आहे. महाराष्ट्र कोणाचा, गुजराथ कोणाचा किंवा कर्नाटक कोणाचा असल्या प्रश्नाचे उत्तर आम्ही

सगळे हिंदुस्थानचे आहोत हे आहे. तेव्हा मुंबईबाबत प्रश्न कोणता आहे तर मुंबई कुठे आहे? गुजराथ, कर्नाटक किंवा महाराष्ट्र हिंदुस्थानात आहेत, त्याप्रमाणे मुंबई महाराष्ट्रात आहे. मुंबई कोठे आहे याचे उत्तर भूगोलाने द्यावे लागेल आणि निसर्गाने ते आधीच देऊन ठेवले आहे. मुंबई कोणाची याचे उत्तर भूगोलाच्या परिभाषेतच मिळाले पाहिजे आणि मुंबई भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्रात आहे हे आजपर्यंत या विषयावर बोलताना कोणीही नाकारलेले नाही. एवढेच नव्हे तर पंडित जवाहरलाल नेहरूनींही ही गोष्ट मान्य केलेली आहे. इंग्रजी भाषेतील एका सुभाषितात बदल करून मी असे म्हणेन की

"History may conceal certain things but Geography cannot."

इतिहास काही गोष्टी दडवून ठेवत असेल, पण भूगोल काही दडवू शकत नाही. या दृष्टीने मुंबई महाराष्ट्रात आहे यासंबंधी कोणाचेच दुमत नाही, आणि ही गोष्ट महत्त्वाची आहे.

मुंबईच्या प्रश्नाचा विचार करताना औत्सुक्याने इतिहासाकडे पाहिले तर मुंबईच्या इतिहासाचे दोन कालखंड पडलेले आढळून येतात. मुंबईत ब्रिटिशांची राजवट येण्यापूर्वीच मुंबईचा इतिहास आणि ब्रिटिश राजवट आल्यानंतरचा मुंबईचा इतिहास असे दोन मुंबईच्या इतिहासाचे भाग पडतात. आज वारंवार ज्या इतिहासाचा उल्लेख केला जातो तो इतिहास हा ब्रिटिश राजवट सुरू झाल्यानंतरचा आहे. मुंबईमध्ये ब्रिटिशांची राजवट येण्यापूर्वी मुंबई हे महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक मागासलेले बेट होते आणि त्याप्रमाणे हिंदुस्थानच्या इतर समुद्रकिनाऱ्यावरील बंदरांची थोडीफार हीच स्थिती होती. पोर्तुगालच्या राजाने इंग्लंडच्या राजाला मुलीच्या लग्नाच्या वेळी मुंबई बेट आंदण देऊन टाकले. मुंबई बेट आंदण देऊन टाकताना त्या बेटाची अवस्था अत्यंत मागासलेली होती.

इंग्रजांपूर्वी प्राचीन काली मुंबईत काय परिस्थिती होती हे पाहिले तर मुंबई व दमणपर्यंतच्या समुद्र किनाऱ्यावरील पट्टीला अपरांत म्हणत असत. वसईजवळ सोपारा हे त्या वेळी त्या प्रांताचे राजधानीचे नगर होते आणि शिलाहार या प्रांतावर राज्य करीत होते. आणखीही बरीच माहिती देण्यासारखी आहे आणि आजकाल होणाऱ्या ऐतिहासिक उल्लेखामुळे या राजांची नामावळी पुष्कळांच्या तोंडपाठ झाली असेल. या नामावळीसाठी वेळ न दवडता एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की प्राचीन कालापासून मुंबईत राहाणाऱ्या समाजात महाराष्ट्रीय बहुसंख्य होते. मुंबईमध्ये पाठारे प्रभु, यजुर्वेदी ब्राह्मण किंवा कोळी हे मराठी भाषिकच होते. मुंबईमध्ये असलेली जुनी मंदिरे पाहिली तर वाळकेश्वरचे मंदिर हे मराठी भाषिकांनी बांधले होते. मुंबईचे नाव

ज्या मुंबादेवीवरून आले आहे ती मराठी भाषिक कोळ्यांची देवता आहे एवढे सांगितले म्हणजे मुंबईत मराठी भाषिक लोक पूर्वापार आहेत हे सिद्ध होते.

मुंबईवर कोणाचा हक्क असावा हा प्रश्न निर्माण झाला याचे कारण हल्लीच्या नव्या इतिहासात सापडते. मुंबईच्या नव्या इतिहासाची आणि हिंदुस्थानच्या नव्या इतिहासाची सांगड झाली आहे. मुंबईच्या वाढीचे कारण काय आहे हे चिकित्सक बुद्धीने तपासून कारणांचे पृथक्करण केले तर मुंबईच्या वाढीस ब्रिटिश राजवट कारणीभूत आहे असे दिसून येते. ब्रिटीश सत्ता आली याचा अर्थ असा आहे की, आमच्यावर एक व्यापारी पद्धतीचे राज्य आले. मुंबईत ब्रिटिशांना पाय रोवता आले नसते आणि मुंबईमध्ये प्रबळ देशी आरमारी सत्ता असती तर हिंदुस्थान परतंत्र झाला नसता. मुंबईमध्ये देशी सागरी सत्ता असती तर परदेशाशी व्यापार करून त्यांनी हिंदुस्थानचे स्वातंत्र्य राखले असते. मुंबईची एकंदर मोक्याची जागा असल्यामुळे मुंबईची वाढ होणे अपरिहार्य होते आणि तशी ती झालीही, पण तिला पारतंत्र्याची जबर किंमत द्यावी लागली. मुंबईमध्ये ब्रिटिश सत्ता आल्यानंतरच्या इतिहासाचा आधार घेऊन चुकीचे निष्कर्ष काढण्यात येत आहेत अशी मला शंका येते. मुंबई कोणाची हा प्रश्न भौगोलिक कसोटीवर सोडवावा लागेल आणि त्या कसोटीने मुंबई ही महाराष्ट्राची आहे हे सत्य आतापर्यंत कोणीही नाकारलेले नाही. महाराष्ट्राबाहेरच्या काही समाजांनी मुंबईच्या बांधणीसाठी व वाढीसाठी जे प्रयत्न केले आहेत, त्यांचे आम्ही ऋणी आहोत. मुंबईचाच व्यापार महाराष्ट्रीयेतरांनी वाढविला आहे असे नसून महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात महाराष्ट्राबाहेरच्या मंडळींनी आपला व्यापार चालविला आहे. छत्रपति शिवाजी महाराजांनी इतर राज्यातील व्यापारी वर्गाला आग्रहाने निमंत्रण पाठवून महाराष्ट्रात व्यापार सुरू करण्याला सवलती दिल्या. महाराष्ट्रात व्यापारउदीम वाढला पाहिजे अशी आमची दृष्टी भूतकाळी होती आणि आताही तीच राहील. मुंबईच्या वाढीस पुष्कळांची मदत झाली हे आम्ही नाकारीत नाही. किंबहुना अशा तऱ्हेच्या विकासासाठी देशव्यापी सहकार्याची गरज आहे असे माझे मत आहे. परंतु मराठी भाषिकांना दुःख एवढेच आहे की कोणतेही सयुक्तिक कारण नसताना मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचे ठरविण्यात आले आहे, याबद्दल कोणत्या तत्त्वावर मुंबईचा अंतर्भाव महाराष्ट्रात करण्यात आला नाही हे मराठी भाषिकांना न कळल्याने त्यांना दुःख झाले आहे. मुंबई महाराष्ट्रात का असावी याची कारणमालिका मी एक, दोन, तीन एवढेच काय अशा तऱ्हेने एकशेपाच कारणेही मी सांगू शकेन. तथापि हातच्या काकणाला आरसा कशाला

अशी जी मराठीत म्हण आहे, त्या म्हणीला अनुसरून मुंबई महाराष्ट्रात आहे ही उघड गोष्ट असल्यामुळे सर्व कारणे मी येथे मांडत नाही.

मुंबई महाराष्ट्राला का दिली गेली नाही हेच समजत नाही. मुंबईला महाराष्ट्रापासून बाजूला काढल्यामुळे कोणाचे कल्याण झाले आहे हे सांगण्यात आले असते तर बरे झाले असते. मुंबई महाराष्ट्राला मिळाली नाही म्हणून अमुक एका समाजाचे कल्याण झाले आहे असे सांगण्यात आले असते तर महाराष्ट्रात त्यागी वृत्ती असल्यामुळे कदाचित् महाराष्ट्राने या गोष्टीचा विचार केला असता. तथापि तसे काही सांगण्यात येत नाही. मुंबई महाराष्ट्रात न टाकल्यामुळे महाराष्ट्राचेच मात्र अकल्याण झाले आहे असे म्हटल्याखेरीज मला राहावत नाही. अध्यक्ष महाराज, मी येथे माझे म्हणणे मांडत आहे, त्याचा उद्देश असा आहे की, आपल्यामार्फत आमचे म्हणणे भारताच्या लोकसभेपुढे जावे आणि तेथील प्रतिनिधींनी याचा विचार करावा. मी बोलत आहे ते जनतेमध्ये सध्या चाललेल्या आंदोलनाला प्रोत्साहन देण्यासाठी मी बोलत नाही. आंदोलन मार्गासंबंधीची माझी मते मशहूर असून त्याची पुनरुक्ती मी करीत नाही. मुंबईचा प्रश्न कोणत्याही तऱ्हेच्या असंतोषाची चळवळ पेटविणाऱ्या मार्गाने सोडविला जाऊ नये असे माझे मत आहे. दुसऱ्यांना आपले म्हणणे पटवून मतपरिवर्तनाच्या मार्गाने हा प्रश्न सोडविला पाहिजे असे माझे मत आहे. मुंबईच्या प्रश्नासंबंधी माझ्या अंतःकरणातील विचार हिंदुस्थानच्या लोकसभेपुढे जावेत म्हणून मी हे विचार येथे मांडत आहे. महाराष्ट्रात मुंबई घातली नाही तर महाराष्ट्राचे अकल्याण होईल असे जर मी सिद्ध केले तर मुंबई महाराष्ट्राला द्याल? राष्ट्रनेत्यांना माझी प्रार्थना आहे की त्यांनी मुंबई बाजूला करून महाराष्ट्राचे अकल्याण करू नये.

महाराष्ट्राला मुंबई हेच महत्त्वाचे बंदर आहे. हिंदुस्थानातील प्रत्येक समुद्र किनाऱ्यावरील राज्याला स्वतःचे असे एक चांगले बंदर आहे असे हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरील बंदरांकडे लक्ष दिले की दिसून येते. प्रत्येक राज्याला छोटे का होईना एक बंदर आहे. आपण विचार केला तर असे दिसून येईल की सौराष्ट्राला ओखा व कांडला बंदर आहे, त्रावणकोर-कोचीनला कोचीन बंदर आहे, तामिळनाडूला मद्रास बंदर आहे, आंध्रला विजगापट्टम बंदर आहे, ओरिसाला कटक बंदर आहे, बंगालला कलकत्ता बंदर आहे, पण महाराष्ट्राला मुंबईशिवाय दुसरे कोणतेही बंदर नाही, तेव्हा मुंबई महाराष्ट्राला का नाकारावी हे कळत नाही.

दुसरी गोष्ट अशी की महाराष्ट्राचे नवीन राज्य निर्माण होऊन नवीन संसार उभारला

जाईल त्या वेळी महाराष्ट्राची राजधानी कोठे असावी हा प्रश्न निर्माण होईल आणि मुंबई महाराष्ट्राला दिली नाही तर हा वाद बंद न होता तो वाढीला लोगल. तेव्हा तीन कोटींच्या ह्या नवीन संसाराला आशीर्वाद देताना नवीन भांडण सुरू होण्याऐवजी हा संसार सुखाने कसा चालेल यासाठी मुंबई शहर महाराष्ट्राला दिले पाहिजे अशी आमची हाक आहे. राजकीय दृष्ट्या मुंबई शहर महाराष्ट्रापासून अलग करावयाचे तर ते कोठल्या तत्त्वावर करता या बाबतीत महाराष्ट्रीयांचे समाधान करावे म्हणजे महाराष्ट्रीयांवर जो आक्षेप घेण्यात येत आहे तो दूर करण्याची संधी त्यांना मिळू शकेल. कदाचित् असे म्हटले जाईल की मुंबई शहरातील उद्योगधंद्यासंबंधी काही लोकांच्या मनामध्ये गैरसमज आहेत. अध्यक्ष महाराज, उत्तर देण्यासाठी म्हणून मी हे बोलत नाही पण मला असे म्हणावयाचे आहे की मुंबई शहरातील उद्योगधंदे बाहेर नेऊन त्यांची विकेंद्रीकरणाच्या तत्त्वावर वाटणी करावी अशी कोणाचीही इच्छा नाही. कोठलाही धंदा बाहेर नेऊन त्याची हेळसांड करावी अशी कोणाही महाराष्ट्रीय मनुष्याची इच्छा नाही आणि मी असे आश्वासन देऊ इच्छितो की, मुंबईचे उद्योगधंदे वाढविण्यात महाराष्ट्राचेच नव्हे तर भारताचे कल्याण आहे. तेव्हा उद्योगधंद्याची हेळसांड करावी अशी एक टक्कादेखील आमच्या मनात शंका येत नाही याची त्यांनी खात्री बाळगावी. डॉक्टर गाडगीळ यांनी 'फ्यूचर ऑफ बॉम्बे' या नावाची जी पुस्तिका लिहिली आहे, त्यामध्ये असे म्हणण्याचा त्यांचा आशय होता असे कोठेही दिसून आलेले नाही. शब्दांवरून ह्या पुस्तिकेची तपासणी करावयाची तर त्यामध्ये कोठेही असा अर्थ दिसत नाही. मनुष्याचा अंतःकरणात काय आहे हे मला सांगता येणार नाही पण शब्दावरून व त्यांच्या अर्थावरून काय दिसते ते मी आपल्याला सांगितले आहे. तेव्हा मुंबईतील उद्योगधंद्याची मोडतोड करावी अशी कोणाचीही इच्छा नाही हे मी पुन्हा आग्रहपूर्वक सांगू इच्छितो.

मुंबई महाराष्ट्राला देणे किनाऱ्याच्या किंवा बंदराच्या दृष्टीने कसे सयुक्तिक आहे हे मी सांगितलेच आहे. तसेच लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केला तरी मुंबई महाराष्ट्राला द्यावी असे आम्ही म्हणतो याला दोन कारणे आहेत. मुंबईमध्ये महाराष्ट्रीय माणसे जास्त आहेत हे एक कारण तर खरेच. मी असे सांगू इच्छितो की महाराष्ट्रातील माणसे जशी मुंबईवर अवलंबून आहेत तशी इतर भागातील माणसे मुंबईवर अवलंबून आहेत पण त्यामध्ये मोठा फरक आहे. महाराष्ट्रातील एक माणूस मुंबईमध्ये असला तरी त्याच्या मागे असलेले त्याचे कुटुंब देशावर असते. देशावरील जवळ जवळ १० माणसे त्याच्या रोजगारावर अवलंबून असतात. तेव्हा मुंबईतील १९ लाख लोकांचा हा प्रश्न

नसून दीडदोन कोटी लोकांचा प्रश्न निर्माण होतो. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या मनात आमचे भवितव्य काय आहे अशी ज्या वेळी शंका निर्माण होते त्या वेळी त्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे मला वाटते. ह्या सर्व गोष्टींचा विचार करता एक मार्ग आपल्याला दिसू शकतो. इतरांच्या बरोबर मुंबईतील लोकांचा विचार झाला पाहिजे असे वाटते तर ह्या राज्यपुनर्रचना विधेयकात पंजाबचा अवघड प्रश्न सोडविण्यासाठी जी दृष्टी ठेवली आहे निदान ती तरी मुंबईसाठी का घेतली नाही? पंजाबमध्ये एक समाज दुसऱ्या समाजाबद्दल साशंक आहे असे गृहित धरले तरी त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. अ समाज ब समाजाबद्दल साशंक आहे म्हणून त्यांना एकमेकांपासून काही वेगळे केले नाही. एक राज्य व एक कायदेमंडळ कायम ठेवून रीजनल कमिटीची जी सूचना केली आहे त्यामुळे त्या त्या विभागाकरिता जे प्रश्न निर्माण होतील ते ही कमिटी सोडवू शकेल अशी प्रथा पडली आहे; त्याप्रमाणे मुंबईकरिता महाराष्ट्राच्या विधिमंडळात छोटीशी समिती निर्माण करून मुंबईचा प्रश्न सोडविता आला असता. तेव्हा मुंबईचा प्रश्न बिकट आहे असे मला वाटत नाही. भीती किंवा संशय ह्यावर राज्यपुनर्रचनेचे काम आधारले जाऊ नये ही आशा मी व्यक्त करतो.

जी गोष्ट मुंबईसंबंधी आहे तीच सीमा प्रांतासाठी आहे असे म्हटले पाहिजे. भाषेच्या दृष्टीने सीमा विभागाचा काटेकोर निर्णय करण्यात आला नाही, पण ते सत्य सामान्यतः स्वीकारले आहे. आपण अमुक एका भाषेचे राज्य निर्माण करता तर एका भाषिक विभागातील मोठा थोरला बहुसंख्य विभाग दुसऱ्या भाषिक राज्यात घालण्यात काय फायदा आहे हे मला तरी समजत नाही. तेव्हा हा प्रश्न सोडविण्यासाठी काही इतर गोष्टी विचारात घ्यावयास पाहिजेत. मला हे मान्य आहे की राज्यपुनर्रचना करताना काही थोड्या लोकांना दुसऱ्या भाषिक राज्यात राहाण्याशिवाय गत्यंतर नाही. कारण माणूस न माणूस वेचून काढणे शक्य नाही. तालुका किंवा त्याचा विभाग लक्षात घेवून भाषिक दृष्टीने ह्या प्रश्नाचा विचार झाला तर मी समजू शकेन की त्यात काही अर्थ आहे. पण ही जी ७० टक्क्यांची मर्यादा स्वीकारली आहे त्यामुळे एका भाषिक विभागातील बहुसंख्य लोकांना दुसऱ्या भाषिक विभागात जावे लागणार असल्यामुळे त्याचा फार मोठा अनिष्ट परिणाम होणार आहे. असे करण्याने जो मूळ प्रश्न सोडविण्याचा आपण प्रयत्न करतो त्यात एका बाजूने अडचण निर्माण करीत आहोत अशी भीती वाटते. म्हणून ह्या बाबतीत काही व्यवहार्य मार्ग काढण्याची शक्यता असेल तर हिंदुस्थान सरकारने किंवा लोकसभेने काढला पाहिजे. आवश्यक तर सीमा समिती नेमून किंवा

चार माणसे नियुक्त करून ह्या प्रश्नाचा विचार करा पण एक गोष्ट सत्य आहे की एका भाषेवर आधारलेले राज्य निर्माण करावयाचे तर त्या भाषेच्या विभागातील मंडळी शक्य तो व्यवहारात कमीत कमी दुसऱ्या भाषिक विभागात ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असे करण्यामध्ये दोन्ही राज्यांमध्ये स्नेहभाव वाढविण्यास मदत होईल. तेव्हा ह्या तत्त्वावर बेळगांव, कारवार, निपाणी वगैरे विभागाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तर सीमा प्रांताचे प्रश्न सुटू शकतील व त्या विभागाचे दुःख कमी होईल.

माझे मित्र सन्माननीय सभासद **डॉक्टर अमुल देसाई**[१] यांनी एक प्रश्न उपस्थित करून असे म्हटले की पंजाबचा प्रश्न चमत्कारिक झाला आहे आणि स्वतःसंबंधी विचार करताना राजीनामा द्यावा की देऊ नये असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होतो. एखादी गोष्ट करू की करू नको असा जो प्रश्न निर्माण होतो तो कोणाही प्रामाणिक माणसापुढे निर्माण होतो आणि त्याचे उत्तर सहज देता येत नाही. जगातील अवघड प्रश्नांची उत्तरे पुस्तकामध्ये लिहून ठेवलेली नसतात. ती तशी ठेवली असती तर आपणा सर्वांचे काम सोपे झाले असते. तेव्हा जीवनामध्ये ज्या निरनिराळ्या बिकट समस्या निर्माण होतात त्याला योग्य विचार करून उत्तर देणे किंवा ते देण्याचा प्रयत्न करणे यात खरा पुरुषार्थ आहे. भाषिक वादाचे तत्त्व एका टोकाला गेल्यामुळे त्यातून विष निर्माण झाले ही गोष्ट खरी आहे, पण हा अवघड प्रश्न कोणीतरी सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यापासून बाजूला राहाता येणार नाही. तेव्हा देशातील कोणी तरी मोठ्या व्यक्तींनी पुढे होऊन त्यातून मार्ग काढला पाहिजे आणि जरी विष निर्माण झाले असले तरी कोणीतरी ते प्याले पाहिजे. समुद्रमंथनातून निर्माण झालेले विष प्राशन करण्यासाठी महादेवांना पुढे यावे लागले किंवा विष प्याल्यामुळे महादेव निर्माण झाले असे सांगण्यात येते. त्याचप्रमाणे हा अवघड प्रश्न निर्माण झाला आहे तेव्हा हे विष कोणीतरी महादेवाने घेतले पाहिजे व ते पचविले पाहिजे.

ह्या प्रश्नाच्या मागे जो दृष्टीकोन आहे त्या संबंधाने मी बोलत आहे व त्या दृष्टीने माझे विचार सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. मी सांगितलेला दृष्टीकोन ठेवला तर अत्यंत कठीण प्रश्न सुटण्याला मदतच होणार आहे अशी मला आशा आहे. असे प्रश्न पक्षीय दृष्टीकोन न घेता सोडविता आले तर ठीकच. पण अनुभव असा आहे की, अवघड राजकीय प्रश्नांची उकल पक्षनिष्ठेशिवाय होत नाही. म्हणूनच मी पक्षनिष्ठा सोडलेली नाही. कारण असे आहे की पक्षनिष्ठा ही जर काही निश्चित तत्त्वावर व कार्यक्रमावर आधारलेली असेल तर हळूहळू तीच शेवटी आपली जीवन-निष्ठा होऊन

बसते. सन्माननीय सभासद डॉक्टर अमूल देसाई हे प्रजासमाजवादी असल्यामुळे त्यांच्या पक्षाची निष्ठा हीच त्यांची जीवन-निष्ठा होऊ शकेल व मी काँग्रेस पक्षाचा सभासद असल्याने काँग्रेस पक्षाची जी निष्ठा ती साहजिकच माझी जीवन-निष्ठा होईल. यासाठीच मी काँग्रेसच्या निष्ठेचा मार्ग पत्करला आहे. मला या वादात जास्त खोलवर शिरून आणखी आता बोलावयाचे नाही. मला इतकेच सांगावयाचे आहे की, राज्यपुनर्रचनेचा प्रश्न मूलभूत दृष्टीने सोडविण्याचा प्रयत्न केला तर अगदी अवघड प्रश्न सोडविल्याचे आपल्या देशाला समाधान मिळेल व त्यापासून होणारा आनंद सामान्य माणसापर्यंत जाऊन पोहोचेल यांत शंका नाही.

जाता जाता मी दुसऱ्या दोन महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधी उल्लेख करणार आहे. पहिला प्रश्न हायकोर्टासंबंधीचा आहे. या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, आम्ही ज्या वेळी एकभाषिक राज्याचे तत्त्व स्वीकारतो त्या वेळी एकच हायकोर्ट ठेवून दुसऱ्या काही कारणाकरिता दोन वेगळी भाषिक राज्ये एकत्रित गुंतविली गेल्याने त्या राज्यांना न्यायाच्या दृष्टीने काही फायदा होणार नाही असे माझे स्वतःचे मत आहे. आपण फेडरल संविधानाच्या पाठीमागचे तत्त्व पाहिले व सर्वोच्च न्यायालयाच्या घटनेचा विचार केला तर असे दिसून येईल की प्रत्येक राज्याला उच्च न्यायालय वेगळे असावे अशी दृष्टी ठेवण्यात आली आहे. प्रत्येक राज्याच्या विधिमंडळाचा कायदेकानूंसंबंधी स्वतःचा असा विशिष्ट सामाजिक दृष्टीकोन व आग्रह असणे शक्य आहे व स्वतःचे असे वेगळे प्रश्नही असणे शक्य आहे. उदाहरणादाखल सांगावयाचे झाले तर मुंबई शहरामध्ये लँड लेजिस्लेशनचा फारसा उपयोग होणार नाही. परंतु जमीनविषयक कायदा महाराष्ट्र व गुजरातमध्ये अधिक महत्त्वाचा मानला जाईल. त्याचप्रमाणे मुंबईमध्ये ज्या प्रमाणात लेबर लेजिस्लेशन महत्त्वाचे मानले जाईल त्या प्रमाणात महाराष्ट्र व गुजरातमध्ये कदाचित मानले जाणार नाही. अर्थात हे सर्व तुलनेनेच लक्षात घ्यावयाचे आहे. माझा हे सर्व सांगण्याचा हेतू इतकाच की, ज्या त्या राज्याचा कारभार सुसंघटित व सुव्यवस्थित राहाण्यासाठी त्या त्या राज्याला स्वतंत्र हायकोर्ट असण्याची गरज आहे. माझ्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. माझ्या ह्या सूचनेच्या पुष्टीदाखल आणखी काही कारणे मला सांगता आली असती पण वेळेच्या अभावी मी या बाबतीत विस्ताराने सांगू शकत नाही. महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही राज्यात स्वतंत्र हायकोर्टे असावीत असे माझे स्पष्ट मत आहे.

अध्यक्ष महाराज, व्यक्तिशः मला दुसरी एक महत्त्वाची सूचना करावयाची आहे.

ही सूचना लेजिस्लेटिव्ह कौन्सिलसंबंधी आहे आणि ह्या बाबतीत माझे हे मत आहे ते वैयक्तिक आहे. हे कौन्सिल असू नये म्हणून आपल्या सभागृहाने मागे जो ठराव पास केला त्या ठरावाला अनुकूल मत देणाऱ्यांपैकी मी एक होतो. त्या वेळी माझी अशी कल्पना होती व आजही आहे ती अशी की सर्व राज्यांनी जर आपआपल्या विधानपरिषदा बरखास्त केल्या तरच आपल्या राज्याला ही चेंबर असण्याची काही आवश्यकता नाही. या कारणास्तव मी मतदानप्रसंगी मी माझे त्या ठरावाला अनुकूल असे मत दिले होते. परंतु आज असे दृश्य दिसत आहे की केवळ मुंबई राज्याने मागणी केली म्हणून विधानपरिषद काढून टाकण्यात येत आहे. याच्या उलट बाकीच्या राज्यांनी आपआपल्या विधानपरिषदा काढून घेण्याची मागणी केली नाही म्हणून त्या त्यांना बहाल करण्यात आल्या आहेत. मला सभागृहाला असे सांगावयाचे आहे की महाराष्ट्राच्या नवरचनेच्या दृष्टीने या दुसऱ्या गृहाची आवश्यकता आहे असे माझे स्पष्ट मत आहे. महाराष्ट्रापुरत्या विधानपरिषदेची ही सूचना करून मी माझे भाषण पुरे करतो.

■ ■ ■

On 28th March 1956, Shri Morarji Desai, Chief Minister of Bombay, moved in the Legislative Assembly the motion for consideration of the State's Reorganisation Bill, 1956, and the proposals for the amendment to the Constitution of India. Several Members took part in the debate. On 28th March 1956, Shri Y.B.Chavan, Minister for Local Self-Government and Forests, intervened in the debate and delivered the speech in Marathi by defending the action of Parliament and the Government of India for redistribution of the country on linguistic principles.

# स्थानिक स्वराज्य संस्था व प्राथमिक शिक्षण कायद्यात सुधारणा सुचविणारे विधेयक*

## १३ एप्रिल १९५६

*हे विधेयक मांडण्याचा सरकारचा हेतू मा. यशवंतराव चव्हाण यानी आपल्या भाषणात विशद करून सांगितला.*

अध्यक्ष महाराज, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थासंबंधीच्या निरनिराळ्या कायद्यामध्ये सुधारणा करावी म्हणून जो प्रस्ताव मांडण्यात येत आहे, त्या संदर्भात एक महत्त्वाचे स्पष्टीकरण करण्यात येत आहे. अलिकडेच उच्च न्यायालयाने दिलेल्या एका निर्णयामुळे हे करणे भाग पडत आहे. एका पंचायतीच्या बरखास्ती प्रकरणी उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, सध्या कायदा ज्या स्वरूपात आहे त्या स्वरूपात, एखादी ग्रामपंचायत ज्या मुदतीपर्यंत ती बरखास्त झाली नसती तर अस्तित्वात राहिली असती त्या मुदतीपर्यंत त्या पंचायतीला बरखास्त करता येत नाही. एखादी नगरपालिका किंवा दुसरी कोणतीही स्थानिक संस्था, बरखास्त करण्याची पाळी त्यातील काही अंगभूत दोषांमुळे उद्भवते, आणि एखादी स्थानिक संस्था बरखास्त करावयाचीच असली तर, निदान सरकार तरी कोठलीही स्थानिक संस्था ती मोठ्या आनंदाने किंवा हर्षाने करीत नाही. स्थानिक संस्थेच्या कारभाराचा अगदीच विचका करून टाकला असेल तेव्हा राज्य शासनात, स्थानिक अधिकाऱ्याकडून दुःखित अंतःकरणाने संस्थेचा कारभार हाती घ्यावा लागतो. एखाद्या स्थानिक संस्थेचा कारभार शासनास हाती घ्यावयाचा असला तर तो एवढ्यासाठीच की तो कारभार व्यवस्थित मार्गावर आणून

* Bombay Legislative Assembly Debates, Vol. 31, Part II, 13th April 1956, pp. 2173-74, 2181-2183, 85.

संस्था जेव्हा तो कारभार पुन्हा हाती घेण्यास पात्र होईल तेव्हा तिला तो कारभार, विशेष करून, आर्थिक बाबतीत योग्य रीतीने चालविता यावा.

ही माहिती मी सर्वसाधारण कारणासाठी सदनापुढे ठेऊ इच्छितो. मी सर्वसाधारण म्हणतो कारण सध्या या राज्यात अनेक नगरपालिका व स्थानिक संस्था बरखास्त करण्याचे कटू सत्य सरकारला करावे लागले आहे. सुमारे अकरा नगरपालिका बरखास्त करण्यात आल्या आहेत. या स्थानिक संस्था मुख्यतः त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे इतक्या खालच्या पातळीवर आल्या होत्या की त्या संस्थांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालणे अगदी अशक्य झाले होते. या संस्थांचा कारभार हाती घेणे सरकारला भाग पडते, तेव्हा सरकारला किंवा प्रशासकाना या संस्थांचा कारभार सुरळीत करायला वाजवी काळ देणे आवश्यक असते. मला असे आढळून आले आहे की काही स्थानिक संस्था दोन वर्षासाठी बरखास्त केल्या आहेत. तेव्हा एखादी नगरपालिका, ती बरखास्त झाली नसती तर ज्या कालावधीपर्यंत ती अस्तित्वात राहिली असती त्यापेक्षाही अधिक काळपर्यंत ती बरखास्त करणे आवश्यक ठरते.

मला एकच मुद्यावर भर द्यावयाचा आहे व तो हा की, एखादी स्थानिक संस्था अपवादात्मक कारणासाठीच बरखास्त केली जाते, कारण कोणालाही ती नगरपालिका गंमत म्हणून बरखास्त करण्याची इच्छा नसते. जरूर पडल्यास वेगवेगळ्या अधिनियमामधील संबंधित कलमे मी उद्धृत करू शकेन. उदा. नगरपालिकांच्या बाबतीत, कलम २१९ अन्वये बरखास्त करण्यासाठी शासन पावले उचलते. मी सभागृहाला ते संबंधित कलम वाचून दाखवितो. म्हणजे एखाद्या स्थानिक संस्थेचा कारभार का हाती घेतला जातो हे लक्षात येईल.

''राज्य सरकारच्या मते जर एखादी नगरपालिका आपला कारभार चालविण्यास अपात्र ठरली, किंवा आपले कर्तव्य पार पाडण्याच्या दृष्टीने ही नगरपालिका कसूर करते, किंवा अधिनियमानुसार आपली कामे पार पाडीत नाही, किंवा कायद्याच्या दृष्टीने त्यांना दिलेल्या सत्तेचा जर त्यांच्याकडून अधिक्षेप किंवा गैरवापर होत असेल....''

अशा परिस्थितीत शासन एखाद्या स्थानिक संस्थेचा कारभार आपल्या हातात घेते. तेव्हा, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे कोणी काही गंमत म्हणून एखादी स्थानिक संस्था बरखास्त करीत नाही. सबंध स्थानिक संस्थेचा कारभार सुरळीत चालावा हा त्याच्यामागचा हेतू असतो.

समजा, तीन चार महिन्यात होऊ घातलेल्या सार्वजनिक निवडणुकांपूर्वी तीन चार महिने एखादी नगरपालिका बरखास्त करावी लागली तर त्या कालावधीत त्या नगरपालिकेच्या कारभाराची घडी नीट बसविणे हे अशक्यप्राय असते. म्हणून अशा परिस्थितीत नगरपालिकेचा कारभार प्रशासकाच्या हाती एक वित्तीय वर्ष तरी आधी येणे आवश्यक ठरते. हे अर्थातच तत्कालिन परिस्थितीवर किंवा ज्या निम्नस्तरावर नगरपालिकेचा कारभार बिघडला असेल त्यावर अवलंबून असेल, या कारणासाठी मी सांगितलेल्या कालापेक्षाही बरखास्तीची मुदत ओलांडण्याचा सरकारला अधिकार असला पाहिजे.

वरील सर्व कारणासाठीच उपरिनिर्दिष्ट सुधारणा जिल्हा नगरपालिका, बरो नगरपालिका, शाळा मंडळे आणि महानगरपालिका यांस लागू होणाऱ्या सर्व अधिनियमात करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. माझा हा खुलासा ऐकल्यावर सभागृह या बिलाचे प्रथम वाचन एकमुखाने मान्य करील अशी मला आशा वाटते.

सन्माननीय सभासद श्री.दत्ता देशमुख यांनी सरकारला आपण महत्त्वाच्या मुद्यात पकडले आहे अशी समजूत करून घेऊन ग्रामपंचायतींच्या बाबतीत हा कायदा का लागू केला नाही असा प्रश्न वारंवार विचारला. त्यांना असे वाटले की, आपण सरकारचे एक रहस्य उघडकीस आणण्यामध्ये शिखर गाठले आहे व त्यांची तशी समजूत झाल्यामुळेच ते प्रश्न विचारीत होते. परंतु ह्या बाबतीत जो दोष आहे तो त्यांचा नसून त्यांच्या गैरहजेरीचा आहे असे मला वाटते. वर्तमानपत्रात ज्या गोष्टी येतात त्यापैकी आवडत्या अशा गोष्टी आपण वाचीत असल्यामुळे ज्याप्रमाणे इतर गोष्टी आपल्या लक्षात येत नाहीत त्याचप्रमाणे कायद्याच्या बाबतीत आपणाला आवडत्या अशा गोष्टी पाहिल्या जातात व न आवडणाऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले जाते. या वर्षाच्या ता. २० फेब्रुवारी रोजी या सभागृहाने जो कायदा मंजूर केला त्यामध्ये सन्माननीय सभासद श्री.दत्ता देशमुख यानी ग्रामपंचायतींच्या बाबत जी सूचना केली ती स्वीकारली गेल्याने या कायद्यामध्ये त्या गोष्टीचा साहजिकच उल्लेख करण्यात आला नाही. तेव्हा या सर्व गोष्टींचा खुलासा पूर्वी होऊन गेलेला असल्यामुळे त्यांची पुनरुक्ती यावेळी करण्यात आलेली नाही.

कोणती व्हिलेज पंचायत याचे नाव बिलामध्ये दिलेले नाही यात काही तरी रहस्य आहे असा एक तर्क करण्यात आला, पण तो बिनबुडाचा असून यात काही रहस्य नाही. संकेश्वरच्या ग्रामपंचायतीची केस हायकोर्टात गेली असताना हायकोर्टाने

दिलेल्या निर्णयामुळे या बिलाची आवश्यकता निर्माण झाली, आणि तसे बिलाच्या उद्देशात दिलेले होते. काहीतरी भयंकर प्रकार चालला आहे असा बिनबुडाचा तर्क करण्यात आलेला पाहून संशयग्रस्त मन झालेले असल्यामुळे त्या सन्माननीय सभासदांनी असला तर्क केला असे मला वाटते, आणि संशयग्रस्त मनामुळे या बिलाच्या आवश्यकतेच्या खऱ्या कारणांचा विचार त्यांच्याकडून झाला नाही.

सन्माननीय सभासद **श्री. कांबळे**[१०] यांनी मान्य केले की स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार ताब्यात घेण्याची आवश्यकता कधी कधी निर्माण होते. त्यांनी दिलेली मान्यता पाहून त्यांची लोकशाहीकडे पाहाण्याची दृष्टी व्यावहारिक आहे असे दिसून येते. लोकशाही आणि निवडणूक पद्धत मला मान्य आहे की नाही असा प्रश्न मला विचारल्यास लोकशाही आणि निवडणूक पद्धत मला मान्य आहे असेच उत्तर मी देईन. या देशात लोकशाहीचा विकास होत आहे याविषयी मला तिळमात्र संशय नाही. पण लोकशाहीच्या पाश्चात्य कल्पनांना कधी कधी येथील परिस्थितीनुसार मुरड घालावी लागते असे मला म्हणावेसे वाटते. लोकशाही ही पुराणातील गोष्ट नाही किंवा एखादी पूजेअर्चेची अथवा त्यावेळी वाचायची पोथी नव्हे. लोकशाही ही लोकांच्या दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी आणि जनहिताच्या गोष्टी अंमलात आणण्याचा आचार-धर्म आहे. लोकशाहीमागे व्यावहारिक तत्त्व असून कोट्यावधी लोकांचे छोटे आणि मोठे प्रश्न सोडविण्याचा लोकशाही हा एक मार्ग आहे. लोकशाहीला व्यवहार्य बाजू आहे आणि त्या व्यवहाराच्या दृष्टीने या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे हे तत्त्व सर्वांना मान्य करावे लागेल. अशी मान्यता दिली गेल्यावर प्रश्न एवढाच राहातो की, एखादी स्थानिक स्वराज्य संस्था स्वतःचा कारभार चांगल्या रीतीने चालवीत नसल्यास ती सरकारने ताब्यात घेणे व्यावहारिक आहे की नाही? कार्यक्रम नसलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेला तिचा कारभार तसाच चालवू दिल्यास ते त्या संस्थेच्या हिताचे नाही, ज्या लोकांसाठी ती संस्था आहे त्यांच्या हिताचे नाही. अशी परिस्थिती आल्यास ती संस्था सरकारने ताब्यात घेणे हा एक व्यावहारिक मार्ग आहे याबद्दल कोणाचे दुमत होणार नाही. अकार्यक्षम अशी स्थानिक स्वराज्य संस्था सरकारने ताब्यात घ्यावी हे तत्त्व मान्य केले गेले तर किती कालापर्यंत ती संस्था सरकारने ताब्यात ठेवावी हा तपशिलाचा प्रश्न आहे. म्हणून मूलभूत तत्त्व मान्य आहे की नाही हे प्रथम ठरविले पाहिजे. सन्माननीय सभासद श्री. देशमुख यांनी काही स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार सरकारी खात्यापेक्षाही चांगल्या तऱ्हेने चालतो असे एक विधान केले. काही स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चांगल्या तऱ्हेने चालतो याविषयी मी

आक्षेप घेतलेला नाही. काही विशिष्ट स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार असमाधानकारकपणे चालतो आणि ही परिस्थिती पालटण्याचा एक मार्ग म्हणून सरकारने हे बिल आणले आहे. किंबहुना, स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अधिक व्यवस्थितपणे चालावा आणि काही ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्था चुकीच्या पद्धतीने कारभार करू लागल्यास काय करावे याचा एक मार्ग त्यांचा सरकारने ताबा घेणे हा आहे. पुणे, अहमदाबाद इत्यादी कॉर्पोरेशनच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण झालेली नसताना तशी परिस्थिती ओढवल्यास काय करावे या दृष्टीने कायद्यात तरतूद केली होती. ज्यावेळी कायदा केला जातो त्यावेळी पुढच्या काळात निर्माण होणाऱ्या अडीअडचणींचा विचार करून त्यांचे निराकरण करण्याची तजवीज करावी लागते. पुणे, अहमदाबाद यांसारख्या कॉर्पोरेशनच्या कायद्यात त्यांच्या सुपरसेशनसंबंधीची तजवीज करून ठेवण्यात आली आहे याचा अर्थ त्यांच्या कारभारावर सरकार अविश्वास दाखविते असा नाही. कधी काळी सुपरसेशन करण्याजोगी परिस्थिती ओढवली तर तसे करता यावे या दृष्टीने ती तजवीज केलेली आहे. या बिलाच्या मागे असलेली व्यावहारिक बाजू मी आता सांगितल्याप्रमाणे आहे. जोपर्यंत व्यावहारिक तत्त्वाची चर्चा चालू आहे तोपर्यंत त्या चर्चेला मी उत्तर देऊन शकेन, पण केवळ संशयाच्या आधारावर विधाने करण्यात येऊ लागली तर त्यांना माझ्याकडे उत्तर नाही असे मला म्हणावे लागत आहे. ज्यांचे मन संशयग्रस्त झाले आहे त्यांनी प्रश्न करण्यापूर्वी त्यांचे उत्तर स्वतःच्या मनात शोधले तर बरे होईल. त्यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या मनात सापडले नाही तर ते सापडावे अशी मी परमेश्वराची प्रार्थना करीन. संशयग्रस्त मनुष्याला मदत करणे माझ्या आवाक्याबाहेरचे असून परमेश्वरच त्याला मदत करू शकणार असल्यामुळे परमेश्वराने त्याला मदत द्यावी एवढीच प्रार्थना मी करू शकेन. सन्माननीय सभासद श्री.देशमुख यांनी संशयग्रस्त मनाने काही विधाने केली. मुंबईविषयीही काही विचार त्यांनी मांडले. काही दिवसापूर्वी या सभागृहात त्या प्रश्नाची चर्चा चालू असताना ते विचार शोभून दिसले असते, पण ते त्यांना मांडता आले नसल्यामुळे ही संधी ते घेत आहेत असे दिसते. तसे असेल, तर अध्यक्ष महाराज, आपण त्यांना आणखी एक तास बोलण्याची संधी दिलीत तरी माझी हरकत नाही. तसे नसेल तर, मुंबईचा आणि भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न या बिलात कोठे निर्माण होतो हे मला समजत नाही. ज्यांनी भाषावार प्रांतरचनेच्या मुद्यावर राजीनामे दिलेले आहेत अशा स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चालू ठेवण्यासाठी सरकारने एक वेगळा कायदा केलेला आहे. सन्माननीय सभासद श्री.देशमुख हे त्यावेळी सभासद राहिले

नसल्यामुळे त्यांना त्या कायद्याची माहिती नाही. म्हणून त्यांनी तो मुद्दा उपस्थित केला. माझी त्यांना विनंती आहे की त्यांनी ते सभासद राहिलेले नसताना जे काही कायदे या सभागृहात मंजूर झाले आहेत, त्यांचा अभ्यास करावा, म्हणजे त्यांच्या मनात काही शंका निर्माण होणार नाहीत.

आता जी दुरुस्ती कायद्यात सुचविली आहे ती नॉर्मल ॲक्टाप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चालू असताना एखादी स्थानिक स्वराज्य संस्था चुकीच्या पद्धतीने कारभार करू लागली तर निर्माण होणाऱ्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सुचविण्यात आली आहे. हे अधिकार काही विशिष्ट परिस्थितीतून अनुलक्षून घेतलेले आहेत. कोणकोणत्या परिस्थितीत या अधिकारांचा वापर करावा लागेल या दृष्टीने मी एक उदाहरण सांगतो. एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा कारभार नीट नसल्यामुळे तो ताब्यात घेण्याची आवश्यकता सरकारला वाटली आणि त्याप्रमाणे तो घेण्यात आल्यावर तो कारभार सुधारण्यापूर्वीच निवडणूक आली तर तसे इष्ट नाही. निवडणुकीला दोन महिने अवकाश असतानाच सरकारने ती स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेतली असेल तर दोन महिन्यात त्या संस्थेचा कारभार सुधारणे शक्य नसल्यामुळे योग्य त्या काळापर्यंत सरकारला ताबा ठेवता यावा यासाठी ही तरतूद केली आहे. सरकार आपल्या हातात असलेल्या अधिकारांचा अनावश्यक उपयोग करणार नाही. सुपरसेशनची अकरा उदाहरणे दिसण्याऐवजी सरकारने ते तंत्र सर्रास वापरले असते तर सुपरसेशनची शेकडो उदाहरणे दिसली असती. सन्माननीय सभासद श्री.देशमुख यांना नगर जिल्ह्यातील वांबोरी ग्रामपंचायतीचे उदाहरण ठाऊक आहेच. तेव्हा सरकार अपरिहार्य ठिकाणीच या अधिकारांचा वापर करील असा विश्वास त्यांनी बाळगण्यास हरकत नाही. सरकारची लोकशाहीवर श्रद्धा असल्यामुळे घेण्यात येणाऱ्या अधिकारांचा गैरउपयोग होईल अशी काडीमात्र शंका कोणी घेऊ नये. ज्या ज्या नगरपालिकांना सरकारने सुपरसिड केले आहे, त्यांचा कारभार सरकारने आवश्यकतेहून जास्त वेळ आपल्या हाती ठेवला आहे असे एकही उदाहरण कोणी सांगावे असे मी आव्हानपूर्वक विचारतो. वस्तुस्थिती नजरेसमोर ठेवून हे बिल सभागृहापुढे आणण्यात आले असून भाषिक प्रश्नासाठी ज्यांनी राजीनामे दिले आहेत, त्यांच्यासाठी वेगळा कायदा यापूर्वीच सभागृहात पास करण्यात आला आहे. संशयाचे भूत मानेवर बसल्यामुळे ज्यांना या बिलामागील व्यावहारिक तत्त्व समजले नसेल त्यांचे समाधान मी करू शकत नाही. त्यांचे मन संशयरहित असते तर त्यांनी वेगळ्या तऱ्हेने या बिलाचा विचार केला असता अशी माझी खात्री आहे. शेवटी सभागृहाने या बिलाचे पहिले वाचन मंजूर

करावे एवढी प्रार्थना करून मी माझे भाषण पुरे करतो.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद श्री. कांबळे यांनी जी उपसूचना आणली आहे ती मी स्वीकारू शकत नाही. त्यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला असे सांगितले की, तत्त्वाच्या दृष्टीने मुदत संपल्यानंतर सरकारने कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या ताब्यात एक दिवसही जास्त काल ठेवता कामा नये आणि त्या तत्त्वाच्या नेमकी विरुद्ध म्हणजे सहा महिने मुदत घालण्याची उपसूचना त्यांनी आणली आहे. त्यांनी एक तर त्यांच्या विचारसरणीप्रमाणे पूर्णपणे वागावे किंवा सरकारने जी भूमिका घेतली आहे ती तरी स्वीकारावी. ह्या बिलात जरी कालमर्यादा घातलेली नसली तरी मी त्यांना असे सांगू इच्छितो की कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था दोन वर्षांच्या पलीकडे आपल्या ताब्यात ठेवण्याचा सरकारचा इरादा नाही आणि तशी प्रथाही नाही. माझ्या ह्या आश्वासनाने जर सन्माननीय सभासदांचे समाधान होत असेल तर त्यांनी आपली उपसूचना मागे घ्यावी अशी मी त्यांना विनंती करतो. सहा महिन्यांची मुदत घालूनही त्यांनी जे एक व्यावहारिक तत्त्व सभागृहापुढे मांडले तेही त्यांच्या पदरात पडणार नाही. सरकारने आजपर्यंत शक्यतो व सामान्यतः कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था दोन वर्षांच्या पलीकडे आपल्या हातात ठेवलेली नाही, व यापुढेही ह्या मर्यादेपलीकडे सरकार मुळीच जाऊ इच्छित नाही. हे आश्वासन त्यांना पटत असेल तर त्यांनी विचार करावा. पण सरकारने दिलेले आश्वासन त्यांना बहुतेक कधी पटत नाही असा अनुभव आहे. तेव्हा ह्या सगळ्या गोष्टींचा विचार करता त्यांनी सुचविलेली उपसूचना सरकारला स्वीकारता येत नाही एवढेच मला सांगावयाचे आहे.

■ ■ ■

On 13th April 1956, Shri. Y.B.Chavan, Minister for Local Self Government, introduced in the Legislative Assembly, Bill No. XX.VIII of 1956 for amending certain acts relating to Local Authorities and the Bombay Primary Education Act, 1947, relating to finances of these bodies and stated that the Government should have powers to extend the period of supersessions beyond the stipulated time.

# मुंबई महानगरपालिकेस मुदतवाढ देणारे विधेयक *

**१२ ऑक्टोबर १९५६**

*परिस्थितीत होणाऱ्या बदलामुळे सरकारने हा निर्णय घेतला असे स्पष्टीकरण मा. यशवंतराव चव्हाण यांनी केले.*

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद **श्री. साने**[११] यांना परिस्थिती बदलण्याचे गमक काय आहे व या बाबतीत सरकारचा सल्लागार कोणी आहे काय याची माहिती पाहिजे आहे. त्यांच्या माहितीसाठी मी असे सांगू इच्छितो की, लोकशाही सरकारला ह्या प्रश्नाबाबत सल्ला देण्याची काही मूलभूत परिस्थितीत योजना आहे. उदाहरणार्थ विरोधी पक्षाचे सन्माननीय सभासद परिस्थितीनुसार सूचना करीत असतात. तसेच आपल्या देशातील स्वतंत्र अशा तऱ्हेची जी वृत्तपत्र सृष्टी आहे त्यातून सरकारला सल्ला मिळतो. तेव्हा सल्लागार म्हटले तर लोकशाहीमध्ये अस्तित्वात असलेल्या ज्या स्वतंत्र विचारांच्या योजना आहेत त्यामध्ये मतस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, हे येते व त्यातून ह्या प्रश्नावर वारंवार सल्ला मिळतो. तसा ह्या प्रश्नाबाबत सल्ला मिळत गेला परंतु ह्या प्रश्नावर निर्णय घेण्याचे गमक परिस्थितीतील होणारे बदल हे आहे एवढे मी सन्माननीय सभासदांनी विचारलेल्या माहितीसंबंधी सांगू इच्छितो.

सरकारला नेहमी निरनिराळे सल्ले देण्यात येत असतात, आणि त्यांचे सरकार स्वागतच करते. अमुक एका गृहस्थाने सल्ला दिल्यास तो स्वीकारावयाचा आणि दुसऱ्या कोणी दिल्यास तो नाकारावयाचा अशी सत्यस्थिती नाही. कोणता सल्ला

* Bombay Legislative Assembly Debates, Vol.32, Part II (Inside No.9), October 1956. 12th October, 1956. pp. 368-369.

योग्य आहे यासंबंधीचा अखेरचा निर्णय घेण्याची शक्ती सरकारला असली पाहिजे. विशिष्ट परिस्थितीचे कोणते स्वरूप आहे याचा अखेरचा निर्णय सरकार घेत असते आणि योग्य तो सल्ला मानत असते. एका सन्माननीय सभासदाला अशी भीती पडली आहे की त्याचा सल्ला मानला जात नाही. एखाद्या विशिष्ट पक्षाच्या हिताच्या दृष्टीने सरकार सल्ला स्वीकारते ही त्यांची कल्पना बरोबर नसून त्यांनी या बाबतीतील आपल्या मनातील संशय दूर ठेवला पाहिजे. त्यांच्या मनातील संशयाचे हे पटल दूर होताच जेथे अंधार नाही तेथे त्यांना तो भासणार नाही. एखाद्या विशिष्ट पक्षाच्या हितसंबंधाच्या सुरक्षिततेसाठी सरकार निर्णय घेत नाही अशी मी त्या सन्माननीय सभासदांची खात्री, ते या बाबतीत माझ्याकडे चर्चेस आल्यास, करून देईन आणि या दृष्टीने यासंबंधी मी सभागृहाचा जास्त वेळ घेऊ इच्छित नाही.

■ ■ ■

---

On 12th October 1956, Shri Y.B.Chavan, Minister for Local Self-Government, moved in the Legislative Assembly, Bill (No.XLV of 1956) to amend the Bombay Municipal Corporation (Extension of Term Act, 1956), enabling bye-elections to be held by the Bombay Municipal Corporation. In his speech he gave information to the House as required by some Members.

# सरकारविरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव*

**१६ ऑक्टोबर १९५६**

*संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील गोळीबारात १०० व्यक्ती मृत्युमुखी पडल्याच्या निषेधार्थ हा प्रस्ताव विरोधी सदस्यांनी मांडला असता मा. यशवंतराव चव्हाण यांनी मांडलेले विचार.*

---

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभागृहापुढे विरोधी पक्षाचे सन्माननीय सभासद श्री. भरूचा यांनी सरकारविरुद्ध जो अविश्वासाचा ठराव आणला आहे त्यासंबंधी माझे विचार मांडणे आवश्यक वाटले म्हणून मी बोलावयास उभा राहिलो आहे. विशेषतः मी सन्माननीय सभासद श्री. भरूचा, श्री.एस्.एम्.जोशी व श्री. दत्ता देशमुख यांची भाषणे काळजीपूर्वक ऐकली आहेत, आणि त्यासंबंधी दुसरी एक बाजू आहे ती त्यांच्यापुढे, जनतेपुढे आणि सभागृहापुढे ठेवणे आवश्यक आहे म्हणून मी ह्या चर्चेत भाग घेत आहे. सन्माननीय सभासद श्री.एस्.एम्.जोशी यांनी आपल्या भाषणाला सुरवात करताना एक प्रकारचे औदार्य दाखविले आहे त्याबद्दल आदराची भावना ठेवून उत्तर देण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

अध्यक्ष महाराज, येथे जो प्रश्न निर्माण होतो तो माझ्या मताप्रमाणे दोन तीन तऱ्हेचा प्रश्न निर्माण होतो. पहिली गोष्ट अशी की, ज्या प्रश्नासंबंधी गेले वर्षभर जनतेमध्ये असंतोषाचे वातावरण होते त्या प्रश्नासंबंधी काय काय घडत गेले आणि त्याच्या अनुरोधाने सरकारला काय काय करावे लागले, कोणत्या गोष्टींची उपाययोजना करावी लागली याबाबत विचार करण्याची आवश्यकता स्वाभाविक निर्माण होते. विशेषतः

---

* Bombay Legislative Assembly Debates, Vol.32, Part II (Inside No. 12), October 1956, 16th October 1956, pp.477 to 482.

माझे मित्र सन्माननीय सभासद श्री.एस्.एम्.जोशी यांनी आग्रहाने महाराष्ट्रीय मंत्र्यांचा उल्लेख केला आणि साधना वृत्तपत्राचा उल्लेख करून त्या पत्राने त्यांना व पुढाऱ्यांना प्रायश्चित्त देण्याचा सल्ला दिला असल्याचे निदर्शनास आणले. महाराष्ट्रीय मंत्री म्हणून नव्हे पण मी एक मंत्री आहे, महाराष्ट्रीय आहे आणि वैयक्तिक रीत्या माझा यात संबंध येत असल्यामुळे मला ह्या गोष्टीचा उल्लेख करावा लागतो.

राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नासंबंधी त्यांनी असा उल्लेख केला की, महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीने काही एका प्रकारची आश्वासने दिली होती व त्या आश्वासनांचा उघड उघड विश्वासघात केलेला आहे. त्यांचे निश्चित शब्द काय आहेत हे माझ्या लक्षात नाही, पण त्यांनी असे सांगितले की लोकांची तुम्ही फसवणूक केली आहे व त्यातून हा असंतोष निर्माण झालेला आहे. म्हणून हे प्रायश्चित्त तुम्ही घेतले पाहिजे. अध्यक्ष महाराज, या संबंधाने वारंवार बोलल्या जाणाऱ्या गोष्टींची पुनरावृत्ती करावी लागते याबद्दल क्षमा मागून मी असे म्हणतो की विरोधी पक्षातील सभासद आणि विशेषतः सन्माननीय सभासद श्री.एस्.एम्.जोशी यांनी ह्या प्रश्नाचा शांतपणे विचार करण्याची वेळ आली आहे. त्यांनी हा जो ठराव सभागृहापुढे आणला आहे तो पास होणार नाही याची त्यांना खात्री आहे पण दुसरी एक बाजू लोकांच्या पुढे असावी म्हणून हा प्रश्न त्यांनी येथे आणला आहे. मी समजू शकतो की विरोधी पक्षाचे हे काम आहे पण ही दुसरी बाजू लोकांच्या पुढे ठेवताना आज ते कोणत्या मार्गाने जात आहेत याचाही विचार करावा लागेल. विशेषतः श्री.एस्.एम्.जोशी यांच्याबाबतीत मी असे म्हणेन की, राष्ट्रप्रेमाचे धडे गेली २०-२५ वर्षे महाराष्ट्रात ते ज्या एका पिढीला देत आले आहेत त्या पिढीतील मी एक आहे. पुष्कळ मंडळी पुरोगामी राष्ट्रवादाचा विचार त्यांच्यापासून शिकली आहेत. म्हणून कृतज्ञतेची भावना ठेवून असे सांगू इच्छितो की, आज तुम्ही लोकांच्या मनातील असंतोषाच्या भावना तीव्र ठेवण्याच्या हेतूने चर्चा करीत असून राष्ट्राची सेवा करीत नाही. एकभाषिक राज्यासंबंधी जनतेची मागणी होती याचा ते वारंवार उल्लेख करीत होते. मी आपणास सांगू इच्छितो की, एकभाषिक राज्याचा मी देखील पुरस्कार केलेला होता, परंतु हा पुरस्कार कोणत्या टोकापर्यंत करावयाचा याला काही मर्यादा आहेत. लोकशाही पद्धतीमध्ये एकदा लोकसभेने एखाद्या प्रश्नासंबंधी निर्णय जाहीर केल्यानंतर त्याच प्रश्नाबाबत शेंडी तुटो अगर पारंबी तुटो आमचे म्हणणे मान्य झाले पाहिजे असा आग्रह धरणे योग्य ठरणार नाही. विरोधी पक्षाच्या मंडळींचा तसा आग्रह दिसत असून त्या मागणीच्या मागचा शहाणपणाचा मक्ता ते आपल्याकडे घेऊ इच्छितात. एका विशिष्ट दृष्टीकोनातून ते ह्या प्रश्नाचा विचार

करीत आहेत. एकभाषिक राज्य निर्माण व्हावे ह्या दृष्टीने जी मागणी करावयाची होती ती आपण केलेली आहे. देशामध्ये अशा अनेक तऱ्हेच्या मागण्या होणार आहेत आणि ही मागणी संपली म्हणजे सर्व प्रश्न संपले असे होत नाही, तर अनेक मूलभूत मागण्या निर्माण होण्याची शक्यता आहे. तेव्हा ह्या मूलभूत मागण्या मान्य करून घेताना कोणते संकेत पाळावयाचे यासंबंधी लोकशाही राज्यात काही नियम आहेत की नाहीत? आम्ही मागणी करतो ती प्रत्यक्षात येईपर्यंत तिच्यासाठी शवेटपर्यंत आग्रह धरणारे काही लोक लोकशाहीत असतात आणि ह्या बाबतीत केवळ पक्षीय भूमिका आम्ही घेतल्याचे सन्माननीय सभासद श्री.देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितल्याचे दिसून येते.

राज्यपुनर्रचनेसंबंधी आम्ही जी मागणी केली होती ती केल्यानंतर कोणत्या टोकापर्यंत जावयाचे याला काही मर्यादा आहेत, नाही तर लोकशाहीमध्ये पक्ष कशासाठी पाहिजेत? राजकीय जीवनात निवडणुकीसाठी म्हणा, युद्धासारख्या प्रश्नासंबंधी म्हणा अगर राज्यकारभारातील काही विशिष्ट प्रश्नासंबंधी म्हणा पक्षनिष्ठेला व पक्षाच्या संघटनेला विशेष महत्त्व असते. तसे नसेल तर पक्षाच्या तत्त्वांना प्रदर्शनामध्ये शोभेसाठी मांडलेल्या चित्रापेक्षा जास्त किंमत उरणार नाही. पक्षनिष्ठेला राजकीय जीवनात फार महत्त्व आहे. पक्ष म्हटला म्हणजे त्याला एक प्रकारची शिस्त असली पाहिजे व राजकीय प्रश्न सोडविताना त्यांनी ती शिस्त पाळली पाहिजे. ती जर पाळता आली नाही तर पक्षाची जरूरी काय? येथे असे सांगण्यात आले की पक्षाची निष्ठा ही जनतेच्या विरोधी होती, तेव्हा मी असे म्हणतो की, जनतेच्या भावना काय आहेत हे निवडणुकीच्या वेळी समजावून घेता येणे शक्य आहे व त्या घेण्याचा लोकशाहीमध्ये रास्त मार्ग आहे.

अध्यक्ष महाराज, मागे एकदा राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नासंबंधी महाराष्ट्रातील पुढारी मंडळींनी आणि मंत्र्यानीही एक भूमिका स्वीकारली होती व त्या दृष्टीने संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली होती. तसेच ही मागणी काही मर्यादेपर्यंत राज्यकर्त्यांच्या पुढे मांडली होती, पण शेवटी ह्या संबंधी पाचामुखी परमेश्वर हे जे तत्त्व आहे त्याला अनुसरून दिलेला न्याय स्वीकारावा लागला. लोकशाहीचा अर्थ मी हाच समजतो की पाच माणसे जो निकाल लावतील तो सोयीस्कर समजून मान्य केला पाहिजे. एखादा निर्णय आपल्याला सोयीचा असेल तेव्हा तो मान्य करावयाचा आणि सोयीचा नसेल त्या वेळी तो निर्णय फेकून बाजूला टाकावयाचा हे बरोबर होणार नाही. मुंबईच्या प्रश्नाच्या बाबतीत जे एका तऱ्हेचे दूषित वातावरण तयार करण्यात आले, त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा व महागुजरातचा प्रश्न अवघड झाला. या राज्यातील दोन

जमातीमध्ये एक प्रकारची वैराची भावना फैलावण्यात आली व म्हणून महाद्विभाषिकाचा निर्णय राष्ट्राला घ्यावा लागला. समोरच्या बाजूकडच्या मंडळींनी ही वैर भावना दोन जमातीमध्ये निर्माण केली असे मी म्हणत नाही. कोणत्याही व्यक्तीला उद्देशून मी बोलत नाही. तथापि वैरभावाची भावना निर्माण झाल्यामुळे राष्ट्राला निर्णय घेण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. या निर्णयामुळे परिस्थितीत बदल झाला आहे. महाराष्ट्रापुरते पाहावयाचे झाल्यास पूर्वी विरोधी पक्षीयांच्या सभांना हजारांनी, लाखांनी लोक जमत होते.

राज्य पुनर्रचनेसंबंधी जे अनेक मुद्दे उपस्थित केले होते, त्यापैकी काहींचा मला उल्लेख केला पाहिजे. द्विभाषिक येण्यापूर्वी विरोधी पक्षीयांच्या सभेला हजारांनी, किंबहुना लाखांनी, मंडळी येत असताना द्विभाषिकाचा निर्णय घेतला गेल्यानंतर पाच पंचवीसशे लोक हजर राहाण्याची मुष्किल झाली आहे असे एका सद्गृहस्थाने माझ्याजवळ सांगितले. या निर्णयामुळे एका प्रकारचे समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही समाधानाची भावना वाढविण्यासाठी, राष्ट्राने एकदा निर्णय घेतल्यानंतर, त्याची अंमलबजावणी होण्यासाठी, या देशातील प्रत्येक नागरिकाने प्रयत्न केला पाहिजे असे माझे मत आहे. अशा परिस्थितीत सभागृहासमोर आलेल्या या ठरावाची कितपत उपयुक्तता आहे याचा नीट विचार केला गेला पाहिजे. ठराव आणण्यामागे अशी भूमिका दिसत आहे की या ठरावाच्या चर्चेच्या निमित्ताने प्रचार करून त्यांना एक असंतोषाचे वातावरण निर्माण करावयाचे आहे. असा हेतू या ठरावामागे असल्यास ते चुकीचे ठरेल. आता घेतल्या गेलेल्या निर्णयात काही फेरफार होण्याची शक्यता नाही व परिस्थितीतला बदल विचारात घेता या ठरावाची काही उपयुक्तता नाही.

अध्यक्ष महाराज, गोळीबाराविषयी या असेंब्लीत पुष्कळ भाषणे झाली आहेत व त्या संबंधी निरनिराळे प्रश्नही विचारले गेलेले आहेत. मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो की गोळीबारात मृत्यू पावलेल्यांबद्दल जेवढे दुःख विरोधी पक्षाच्या मंडळींना होत आहे, तेवढे दुःख आमच्या मनातही आहे. तथापि राज्यकारभार चालविताना जी जबाबदारी राज्यकर्त्यांवर असते ती पार पाडण्यासाठी काही काही वेळा गोळीबाराचे प्रसंग येणे अपरिहार्य असते. सन्माननीय सभासद श्री.एस्.एम्.जोशी यांनी आपल्या भाषणात त्यांच्या पक्षाच्या एका राज्यातील मंत्रिमंडळावर असाच गोळीबार करण्याचा प्रसंग आला होता असे सांगितले. सतरा, अठरा, एकोणीस जानेवारीला मुंबईत जी भयंकर परिस्थिती निर्माण झाली होती, त्या परिस्थितीत गोळीबाराशिवाय दुसरा मार्गच नव्हता. मुंबईचे समाज जीवन संपूर्णपणे उध्वस्त होते की काय अशी शंका येण्याजोगी भीषण परिस्थिती मुंबईत होती. मुंबईच्या बाहेर राहून वर्णने वाचून सरकारवर टीका

करणे योग्य होणार नाही. वाईटपणा येण्याच्या भीतीने सरकारला शांतता व सुव्यवस्था राखण्याची आपली जबाबदारी टाळता येत नाही. गोळीबार करणे आवश्यक झाल्यामुळेच तो करावा लागला. गोळीबारात मरण पावलेल्या इसमांबद्दल नामदार मुख्यमंत्र्यांना काही कमी दुःख झालेले नाही. त्यांचे अंतःकरण दुःखाने भारावून गेले तरी शांतता राखण्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांना गोळीबाराचे हुकूम द्यावेच लागले. माझ्या समजुतीप्रमाणे ज्या दिवशी दंगल झाली त्या दिवशी मुंबई सोडून ते दिल्लीच्या वाटेवर होते. मुंबईची परिस्थिती चिघळलेली ऐकून त्यांना परत मुंबईला यावे लागले. रस्त्यारस्त्यावर बॅरीकेड उभारून वाहतूक रोखून धरण्यात आली होती. जिकडे तिकडे लुटालुटीचे प्रकार होत होते. अशी मुंबई शहराची त्या तीन दिवसामध्ये परिस्थिती होती. ही परिस्थिती ऐकून ज्यांना आता समाधान झाल्याचे दिसत आहे, त्यांना गोळीबाराचा निषेध करण्याचा अधिकार नाही असे मला वाटते. भयानक दंगलीची परिस्थिती असताना अधिकाऱ्यांना शांतता आणण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करू दिल्या नाहीत, तर कोणतेही सरकार चालणे कठीण पडेल. ती दंगल आटोक्यात आणण्यासाठी त्या वेळी गोळीबार करणेच योग्य होते.

गोळीबाराची न्यायालयीन चौकशी व्हावी असे विचारी माणसाला वाटते, पण अशा चौकशीसाठी जे वातावरण पाहिजे ते सध्या नाही. या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी करण्याने काही हेतू साध्य होणार नाही. उलट, या चौकशीच्या निमित्ताने समाजामध्ये वैराची भावना वाढून भांडणे होण्याची जास्त शक्यता आहे. खऱ्या-खोट्याची एवढी गल्लत होण्याचा संभव आहे की न्यायापेक्षा अन्याय होण्याची जास्त शक्यता आहे. सध्याच्या परिस्थितीत न्यायालयीन चौकशीची मागणी करणे हे शहाणपणाचे ठरणार नाही. या ठरावाने आपण सरकारवर अविश्वास व्यक्त करू शकता, पण हा ठराव मंजूर होऊ शकणार नाही हे उघड आहे. गोळीबारामध्ये मृत झालेल्या माणसांना न्याय मिळावा या हेतूने न्यायालयीन चौकशी व्हावी एवढीच भावना या ठरावात नसून, आपल्या पक्षांना राजकीय भांडवल तयार करण्याची बुद्धी ठराव आणण्यामागे अजिबात नाही असे नाही. विरोधी पक्षीयांना असे राजकीय भांडवल करावयाचे असेल तर याहून सुवर्णसंधी त्यांना मिळणार नाही! अध्यक्ष महाराज, कम्युनिस्ट पक्षाच्या एका पुढाऱ्याने सांगितलेले एक राजकीय धोरण मला या अनुषंगाने आठवते. त्याच्या मताप्रमाणे, एखादी चळवळ चालू केल्यावर गोळीबार झाले तर काही हरकत नाही. गोळीबारात माणसे मेली तरी काही हरकत नाही. जितकी जास्त माणसे मरतील, तेवढा जास्त असंतोष निर्माण करता येईल. या असंतोषामुळे चळवळीचे पाऊल पुढे पडते आणि पक्षाचा लाभ होतो. राजकीय शिक्षणासाठी आमच्या

लहानपणी जे अभ्यास मंडळ चालविले जाई, त्यात अशा तऱ्हेचा एक पाठ एका कम्युनिस्ट पुढाऱ्याने दिला होता. असंतोषाच्या सहाय्याने आपली राजकीय प्रगती करून घेण्याची त्यांची दृष्टी आहे. या ठरावाप्रमाणे तशी दृष्टी असेल, तर ते चुकीचे ठरेल. हा ठराव चुकीच्या वेळी मांडलेला असून त्याला यश येण्याची मुळीच शक्यता नाही आणि या ठरावाने राजकीय भांडवल करण्याचा त्यांचा हेतूही सफल होणार नाही.

या ठरावाला सन्माननीय सभासद श्री.एस्.एम्.जोशी यांनी पाठिंबा दिलेला पाहून मला जरा धक्का बसला. आमच्या डोळ्यासमोर त्यांचे जे चित्र आहे, त्याच्याशी ते जरा विसंगत वाटले. त्यांनी समाजवादी विचार जनतेत रुजविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्यासारख्या व्यक्तीने भाषिक असंतोषाचे नेतृत्व किती दिवस करावयाचे? आमच्या डोळ्यांसमोर असलेल्या सन्माननीय सभासद श्री.जोशींच्या चित्राशी त्यांचे सध्याचे चित्र जुळत नाही. म्हणून मी विशेषेकरून त्यांना अशी विनंती करतो की भाषावादाच्या प्रश्नात त्यांनी किती दिवस स्वतःला गुंतवून घ्यावयाचे याचा विचार करून, त्यांच्या नेतृत्वाचा फायदा इतर मंडळींना मिळू देऊ नये.

द्विभाषिकाचा हा निर्णय राष्ट्राने दिलेला निर्णय आहे. आम्ही संयुक्त महाराष्ट्राची केलेली मागणी सोडून राष्ट्राने दिलेला हा निर्णय मानला आहे. राष्ट्राने दिलेला निर्णय शिरसावंद्य मानला गेला पाहिजे आणि आम्ही तसा मानतो. आमच्यासारख्या छोट्या छोट्या माणसांच्या निर्णयापेक्षा राष्ट्राच्या निर्णयाला जास्त महत्त्व आहे. द्विभाषिकाचा हा निर्णय राष्ट्राचा आहे असे समजून प्रत्येकाने तो मानला पाहिजे. आपल्या लोकशाही सरकारने राष्ट्राच्या पार्लमेंटमध्ये सर्व गोष्टींचा विचार करून घेतलेला निर्णय सर्वांनी मानणे जरूरीचे आहे.

अध्यक्ष महाराज, या ठरावाच्या पाठीमागे विरोधी पक्षातील मंडळींची जी दृष्टी आहे ती पाहिली तर ज्या महत्त्वाच्या विधायक गोष्टी आहेत त्या बाजूला ठेवून विरोधी गोष्टींचे वातावरण कसे निर्माण होईल हाच, हा ठराव मांडण्यामध्ये, विरोधी पक्षातील सदस्यांचा मुख्य हेतू आहे. यामुळे राष्ट्राला धोका निर्माण होतो म्हणूनच माझ्याकडून त्या प्रश्नाचा अधिक विस्ताराने उल्लेख केला गेला. परंतु असे करीत असताना विषयांतर करण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती. मी विरोधी पक्षाच्या सदस्यांना अशी विनंती करीन की, त्यांनी आपली आग्रहाची दृष्टी सोडून द्यावी व वैषम्याचे वातावरण निर्माण होईल अशी आपली दृष्टी न ठेवता विधायक शक्तींची वाढ होईल याकडे आपली दृष्टी ठेवावी. ज्यांना लोकांची मने खरोखरच जिंकावयाची असतील त्यांनी अशा रीतीने ठराव मांडून मंत्रीमंडळावर अविश्वास दाखविण्यापेक्षा निवडणुकांचे क्षेत्र जवळच

आले आहे त्यावर आपले लक्ष केंद्रित करून आपली संपूर्ण शक्ती खर्च करून योजनात्मक कार्यक्रम आखला तरी त्यांना जे साधावयाचे आहे ते साध्य करून घेता येईल. उलटपक्षी, सरकारवर अशा रीतीने अविश्वास दाखविण्यात आला तर ते अधिक शहाणपणाचे होईल असे मला वाटत नाही एवढे बोलून मी माझे भाषण पुरे करतो.

On 16th October 1956, the Opposition Member, Shri Nausher Bharucha, proposed a no-confidence motion for Government's alleged failure to institute a Judicial inquiry into the indiscriminate firings resorted to by the Police during the agitation in connection with the formation of Samyukta Maharashtra and Maha Gujarat in which more than one hundred persons were killed and also on the detentions of innocent persons under the Preventive Detention Act. Shri Y.B.Chavan, Minister for Local Self-Government, defended the Government's action.

# मुंबई महानगरपालिकेस पुन्हा मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव *

**१६ ऑक्टोबर १९५६**

*प्रस्तावात मुंबई शहराच्या क्षेत्रवाढीसाठी जो भाग घेतला जाणार त्यास सभागृहाची मंजुरी मिळविण्यासाठी मांडलेल्या विधेयकावरील मुख्य आक्षेपाना उत्तर देणारे मा. यशवंतराव चव्हाण यांचे निवेदन.*

---

अध्यक्ष महाराज, या बिलाच्या पहिल्या वाचनावरच मी बरीचशी भाषणे ऐकलेली आहेत. थोड्या भाषणांचा सारांशही माझ्याजवळ आहे. त्या भाषणांमधून त्याच त्याच गोष्टींची पुनरावृत्ती झालेली आहे. त्यांनी ह्या बिलावर सर्वसाधारणपणे जे आक्षेप घेतले ते संक्षेपाने सांगावयाचे झाल्यास, त्यांनी पहिला मुद्दा असा उपस्थित केला की, हे बिल आणण्यामध्ये फार घाई होत आहे. त्यांचा दुसरा मुद्दा असा आहे की, मुंबई शहराच्या क्षेत्रवाढीसाठी जो भाग घेतला जाणार आहे त्याची आबाळ होण्याची शक्यता आहे आणि याच्या पूर्वी जे भाग घेण्यात आले त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यांच्या भाषणातील तिसरा मुद्दा जो आहे तो राजकीय स्वरूपाचा आहे व त्याला अनुसरून आम्ही आज जे काही करीत आहोत ते राजकीय हेतूनेच करीत आहोत असा त्यांचा आक्षेप आहे. अशा तऱ्हेने या बिलावर सर्वसामान्यतः जे तीन आक्षेप घेण्यात आले आहेत त्या आक्षेपांना उत्तर देणे आवश्यक आहे असे मी मानतो.

अध्यक्ष महाराज, मी माझ्या पहिल्या भाषणाच्या वेळी असे सांगितले होते की, सन्माननीय सभासदांनी कृपा करून या बिलाकडे राजकीय हेतूने पाहू नये. हे सांगितल्याबद्दलच त्या बाजूच्या एका सन्माननीय सभासदांनी आक्षेप घेतला व तो घेत

---

* Bombay Legislative Assembly Debates, Vol. 32, Part II (Inside No. 12), 23rd October, 1956, pp. 741 to 749.

असताना ‘खाई त्याला खवखवे’ या मराठी म्हणीची त्यांना आठवण झाली. त्यांनी केलेल्या या भाषणाबद्दल कुरापत काढून त्यांना अकारण दुखवू नये असे मी ठरवले होते, तरीपण मला सभागृहाला खुलासेवजा असे सांगावयाचे आहे की, या सभागृहाच्या विरोधी पक्षातील सन्माननीय सभासदांबरोबर माझी वारंवार अनौपचारिक चर्चा होत असते. त्यापैकी एका चर्चेमध्ये मी अनौपचारिक रीत्या जे बोललो ते एक दोन सदस्यांनी मनात ठेवून भाषणे केली आहेत. त्यांच्याजवळ मी जे बोललो त्यात कोणाच्या खवखवीचा प्रश्न नव्हता असे मला नम्रपणे त्यांच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे.

यानंतर, अध्यक्ष महाराज, दुसरे जे दोन आक्षेप आहेत त्यांना मात्र निश्चित अशी उत्तरे दिली पाहिजेत असे मला वाटते, कारण त्या तशाच महत्त्वाच्या बाबी आहेत. पहिला आक्षेप स्टेटमेंट ऑफ् ऑब्जेक्ट्सबद्दलच घेण्यात आलेला आहे. त्या बाजूचे सन्माननीय सभासद श्री.दत्ता देशमुख हे आता सभागृहामध्ये हजर नाहीत. ते नेहमी विचारपूर्वक व माहितीपूर्ण अशी भाषणे करतात. त्यांनी असा आक्षेप घेतला की, प्रस्तुत बिलामध्ये ज्याअर्थी द्विभाषिक राज्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे त्याअर्थी द्विभाषिक राज्य निश्चित येणार ही गोष्ट गृहीत धरूनच हे बिल मांडण्याचा आमचा रोख आहे म्हणून त्याला विरोध करावयाचा आहे. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासदांच्या भाषणामध्ये इतकी विसंगती व अशा रीतीने विचार करण्याचा परिपाठ असू नये असे मला वाटते. तरीपण द्विभाषिक राहाणार आहे व राहाणार नाही या दोन्ही गोष्टी मी केवळ चर्चेसाठी गृहीत धरतो. ही गोष्ट गृहीत धरून मुंबई शहराची वाढ होणे आवश्यक आहे किंवा नाही व वाढ झालेल्या मुंबई शहरातील एका महानगरपालिकेच्या कारभाराखाली इतर भाग आणणे आवश्यक आहे किंवा नाही याचा प्रामुख्याने विचार झाला पाहिजे असे मला वाटते. या बिलावर चर्चा करताना एवढे मोठे शहर असावे की असू नये अशा प्रकारचे ज्याला इंग्रजीमध्ये ॲकॅडेमिक डिस्कशन म्हणतात ते, त्या बाजूच्या सन्माननीय सभासदांकडून करण्यात आले. या ॲकॅडेमिक डिस्कशनचे मराठी भाषांतर करावयाचे झाल्यास ज्याला आपण पोकळ तात्त्विक विचार म्हणू शकू व ज्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग करावयाचा नसतो असे विचार प्रकट केले गेले. अर्थात मोठमोठी शहरे झाली तर ती समाजावर संकट आणणारी गोष्ट होते हे मला मान्य आहे. परंतु या बाबतीत तुम्ही आम्ही विचार करून उपयोगी नाही. मुंबई शहर हे आताच मोठे शहर झालेले आहे. त्याला तुम्ही आम्ही काय करणार? आताच या

शहराची लोकसंख्या जवळ जवळ तीस लक्षापर्यंत गेलेली आहे. अशा परिस्थितीत या तीस लक्ष लोकवस्तीच्या शहराचा आरोग्यविषयक व अंतर्गत कारभार चांगला व सोयीचा कसा करता येईल हा सरळ आणि साधा प्रश्न आहे. केवळ द्विभाषिक राज्य आल्यावर इन्फ्लक्स येणार म्हणून सर्व काही केले असे म्हणून चालणार नाही. मला सभागृहाला असे सांगावयाचे आहे की, आपण स्टेटमेंट ऑफ् ऑब्जेक्ट्सकडे मर्यादित अर्थाने पाहावयास पाहिजे. स्टेटमेंट ऑफ् ऑब्जेक्ट्समध्ये सगळीच कारणे एक्झॉस्टिव्ह रीतीने ग्रथित केलेली नसतात असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. कालच सन्माननीय सभासद श्री.दत्ता देशमुख यांनी मुंबई शहराची क्षेत्रवाढ करण्यासंबंधी ज्या कमिट्या नेमल्या गेल्या त्यांचा इतिहास वाचून दाखविला. त्याप्रमाणे मुंबई शहर वाढले पाहिजे या दृष्टीने गेली पन्नास वर्षे विचार झालेला आहे, परंतु कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. उलट, हा क्षेत्रवाढीचा निर्णय पुढेच ढकलला गेला या गोष्टीवर त्यांनी जोर दिला. मला सभागृहाला असे सांगावयाचे आहे की, कोणताही निर्णय पुढे ढकलण्याची परंपरा ब्रिटिश राज्यात होतीच परंतु काही प्रश्न त्यांनी पुढे टाकले म्हणून तुम्ही आम्ही, जे विधायक स्वरूपाचे प्रश्न आहेत ते पुढे टाकू शकणार आहोत काय? असे प्रश्न पुढे ढकलण्यात आले तर मग स्वराज्याची जरूर काय राहाणार? अशा प्रश्नांना आता तोंड देण्याची पाळी आलेली आहे.

दुसरी गोष्ट मला सांगावयाची आहे ती अशी की, त्या बाजूच्या सन्माननीय सभासदांनी इन्फ्लक्स ह्या शब्दाचा अर्थ शब्दकोशामध्ये जरूर पाहावा. शब्दकोशामध्ये दिलेल्या व्याख्येप्रमाणे सोपा, सोयीचा, 'लोंढा' असा अर्थ अभिप्रेत आहे. जसा महापुराचा लोंढा तसा माणसांचा लोंढा असा इन्फ्लक्स या शब्दाचा अर्थ नाही. स्वाभाविकपणे मुंबई शहराच्या राज्यकारभाराच्या बाबतीत जास्त क्षेत्र आल्यावर येणाऱ्या जाणाऱ्यांची आवक जावक वाढणार व या शहरात लोक राहावयाला येतील, लोक राहावयाला आले म्हणजे त्यांचे व्यवहार वाढतील व असे व्यवहार वाढले म्हणजे स्वाभाविक रीतीने त्या लोकांच्या गरजा भागविण्यासाठी उद्योगधंद्यांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. या बाबतीत मास्टर प्लॅनमध्ये जी योजना केली आहे तिची पूर्ण कल्पना येण्यासाठी मी सन्माननीय सभासदांना शिफारस करीन की, त्यांनी हा मास्टर प्लॅन केव्हा ना केव्हा तरी पाहावा. त्यांनी हा प्लॅन एका गोष्टीकरिता पाहावा. ती गोष्ट अशी की, मुंबई शहराची जी वस्ती आहे ती आताच इतकी वाढली आहे की आता या शहरामध्ये जे लोक आहेत त्यांच्या राहाणीचा विचार करावयाचा झाला तर आज जे

क्षेत्र घेतले गेले आहे त्यापेक्षा जास्त क्षेत्र घेतले गेले पाहिजे अशी निकड निर्माण झाली आहे. मास्टर प्लॅनचे पुरस्कर्ते जे महाराष्ट्रीय इंजिनियर आहेत त्यांनीच ही गोष्ट सुचविलेली आहे. अशी परिस्थिती आपणासमोर असताना द्विभाषिकामुळे पुढे जो इन्फ्लक्स वाढणार आहे त्याच्या चर्चेत जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. या शहरात मुळातच इतकी गर्दी झालेली आहे की हा अधिक गर्दीचा प्रश्न सोडविण्याच्या विचारांना ग्रेटर बाय-लिन्युअलच्या प्रश्नाने चालना मिळाली व त्याप्रमाणे तातडीने विचार करण्याची परिस्थिती निर्माण झाली ही गोष्ट खरी आहे. मध्यंतरीचा काळ असा गेला की, त्या काळामध्ये मुंबई शहर स्वतंत्र राज्यकारभाराचा घटक किंवा युनिट होण्याची शक्यता होती. परंतु त्यानंतर राज्यकारभाराचा प्रश्न जेव्हा जोराने व उत्कटतेने प्रतीत झाला तेव्हा या शहरातील अधिक गर्दी सोडविण्याच्या प्रश्नाला केव्हाना केव्हा तरी तोंड देण्याची आवश्यकता आहे अशी जाणीव निर्माण झाली.

हे बिल याच सेशनमध्ये का पुढे आणण्यात आले असा त्या बाजूच्या सन्माननीय सभासदांनी जो प्रश्न उपस्थित केला तो फार अवघड आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, त्यांनी हा जो प्रश्न उपस्थित केला त्यामध्ये ज्याला 'अशोक वाटिका' न्याय म्हणतात तो आहे. रावणाने सीतेला पळवून नेल्यावर लंकेमध्ये जेव्हा तिला अशोक वृक्षाच्या झाडाखाली ठेवले तेव्हा अशोक वृक्षाऐवजी तिला आंब्याच्या झाडाखाली का ठेवले नाही असा प्रश्न एकाने केला. तिला आंब्याच्या झाडाखाली ठेवले असते तरी आंब्याच्याच झाडाखाली का असा प्रश्न विचारला गेला असता. प्रस्तुत बिल या सेशनमध्ये ठेवण्याचे कारण इतकेच आहे की एखादे नवे क्षेत्र मुंबई कॉर्पोरेशनच्या हद्दीत येणार असेल तर कॉर्पोरेशनच्या अंदाजपत्रकामध्ये जी व्यवस्था करावयाची असते ती मार्च महिन्याच्या आधीपासून करावी लागते. अंदाजपत्रक एकाएकी तयार होत नाही. त्यासाठी योजना तयार करून विचार करावा लागतो व उत्पन्नाची व्यवस्था करावी लागते. हे करण्याकरिता कॉर्पोरेशनला दोन तीन महिन्यांचा तरी अवधी दिला पाहिजे. १ नोव्हेंबरपर्यंत जर हे बिल पास होऊन कायदा तयार झाला नाही तर हे काम एक वर्षभर पुढे ढकलावे लागेल. हे बिल आणण्याची इतकी घाई का करण्यात येत आहे असे अनेक सन्माननीय सभासदांनी विचारले आहे व त्याचे कारण मी आता सांगितले आहे. जी गोष्ट करावयाची एकदा आपण ठरविली ती करण्याचे ठरल्यानंतर ती आजच केली पाहिजे, ती उद्यावर टाकण्यात अर्थ नाही. चांगल्या कामाला काही मुहूर्त लागत नाही.

कॉर्पोरेशनने जरी ह्या कामाला विरोध केला असला तरी सर्व जनतेच्या हितासाठी सरकारला ते करावे लागले असते. कॉर्पोरेशनने ठराव पास केला आहे ह्या गोष्टीवर जास्त भर देण्याचे कारण नाही. कॉर्पोरेशनने नको म्हटले आणि सरकारला जर ही गोष्ट करणे आवश्यक आहे असे वाटले तर सरकारला ती करावी लागेल.

यानंतर दुसरा प्रश्न असा निर्माण होतो की, हे बिल आणण्यामागे काही राजकीय हेतू आहे की काय? वास्तविक, तसा कोणत्याही प्रकारचा राजकीय हेतू हे बिल आणण्यामागे असण्याची आवश्यकता नाही, पण ज्यांना प्रत्येक गोष्ट राजकीय दृष्टीकोनातून पाहाण्याची सवय झाली आहे त्यांना तसे दिसत असल्यास मला नवल वाटत नाही. एखादी गोष्ट चांगली असो, वाईट असो, त्यांना ही सवय जडलेली आहे त्यामुळे त्यांना ह्या बिलामागेही राजकीय हेतू दिसत असण्याचा संभव आहे. यानंतर, सन्माननीय सभासद श्री.दत्ता देशमुख जणू काही आपण मोठा पराक्रम करीत आहोत असा आविर्भाव आणून असे म्हणाले की, यशवंतराव आजपर्यंत यशवंतराव होते पण आता यशवंतभाई झाले आहेत. असे बोलून ते बोलणे माझ्या जिव्हारी लागावे असा त्यांचा हेतु असला आणि आपण मोठा पुरुषार्थ केला असे जरी त्यांना वाटत असले तरी त्याचा माझ्यावर फारसा परिणाम झाला आहे असे त्यांनी समजू नये. ते जसे ह्या गोष्टी बोलू शकतात तशा मलाही काही गोष्टी त्यांना सांगता येतील, पण मला तशा कुरापती काढावयाच्या नाहीत. तसे माझ्या मनात असते तर त्यांनाही जिव्हारी लागतील अशी उत्तरे त्यांना मला देता येतील, पण तसे करण्याची ही जागाही नाही, आणि तसे करण्याची माझी इच्छाही नाही.

ह्या बिलावर अनेक राजकीय आणि तात्त्विक आक्षेप घेण्यात आले, पण तसा विचार करू लागलो तर आपण ज्या चांगल्या कामाला सुरुवात करू पाहात आहोत ते कधीच होणार नाही. येथे असे विचारण्यात आले की, अशी किती लोकसंख्या वाढणार आहे अशी सरकारची कल्पना आहे? अध्यक्ष महाराज, मुंबई शहरात द्विभाषिक सुरू झाल्यानंतर लोकसंख्या किती वाढेल यासाठी ह्या सभागृहाला किती माहिती पाहिजे आहे तेवढी माझ्याजवळ आहे. मुंबई शहर किती ओव्हरक्राउडेड झालेले आहे, येथे घरांची टंचाई किती आहे हे काही मी सांगण्याची आवश्यकता आहे असे नाही. सन्माननीय सभासद श्री. भरूचा हे माझ्यासमोर बसलेले आहेत तेच सांगू शकतील की, खरोखरी ह्या शहरात लोकसंख्या किती वाढलेली आहे व ह्या वाढत्या लोकसंख्येला तोंड देण्यासाठी काही नवीन योजना करण्याची आवश्यकता आहे की

नाही? त्यांचा जो मतभेद असू शकेल तो पुढच्या प्रश्नाबाबत असू शकेल. ह्या वाढत्या लोकसंख्येची राहण्याची व्यवस्था करावयाची ती कशा प्रकारे करावी आणि किती प्रमाणात करावी ह्या बाबतीत त्यांचा मतभेद असू शकेल. ह्या दृष्टीने जर त्यांनी काही सूचना केल्या असत्या तर ते मी समजू शकलो असतो, पण मुद्दा सोडून त्यांनी हा नगररचना प्रश्न भाषिक प्रांतरचनेशी जो जोडला आहे त्याला माझा विरोध आहे. दुर्दैवाने आज अशी परिस्थिती झालेली आहे की, प्रत्येक प्रश्नाचा विचार करताना तो भाषिक राज्य रचनेच्या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवरून करण्याची काही सन्माननीय सभासदांना सवय लागलेली आहे. ही जी सवय त्यांना लागलेली आहे त्यामुळे प्रत्येक विषयावरील चर्चेत ते नेहमी भाषिक राज्यरचनेचा प्रश्न आणतात. यावरून त्यांची ह्या प्रश्नावर किती निष्ठा आहे हे मात्र दिसून येते. याबद्दल त्यांना मी सर्टिफिकेट दिले पाहिजे असे नाही. ह्यावरून मला पुराणातील एका गोष्टीची आठवण येते. सीतेने हनुमंताला त्याने केलेल्या कामगिरीबद्दल बक्षीस म्हणून आपला रत्नहार दिला, पण हनुमंत हा रामनिष्ठ होता, त्याला रत्नहाराचे विशेष काही वाटत नव्हते, म्हणून त्या रत्नहारात राम आहे की नाही हे पाहाण्यासाठी त्याने रत्नहारातील एक एक मणी फोडून पाहिला. हनुमंताने अशा प्रकारे जशी रामनिष्ठा दाखविली तशीच विरोधी पक्षातले काही सन्माननीय सभासद भाषिक प्रांतरचनेच्या प्रश्नावरील आपली निष्ठा दाखवीत आहेत असे म्हणावे लागते. पण प्रत्येक मण्यात राम आहे की नाही हे पाहाण्यासाठी हनुमंताने प्रत्येक मणी फोडून पाहिल्यामुळे रत्नहाराची जी अवस्था झाली ती अवस्था प्रत्येक प्रश्न भाषिक प्रांतरचनेच्या चष्म्यातून पाहिल्याने होईल. ज्या प्रश्नावर सन्माननीय सभासद त्यांची निष्ठा आहे असे दाखवीत आहेत ती निष्ठाही जावयाची आणि आपल्यापुढे जे काम आहे तेही व्हावयाचे नाही अशी परिस्थिती ओढवेल असे मला त्यांना सांगावयाचे आहे.

यानंतर, अध्यक्ष महाराज, द्विभाषिक यशस्वी होणार नाही असे येथे जे वारंवार सांगितले जाते त्या बाबतीत मला एक सूचना करावीशी वाटते, हे द्विभाषिक यशस्वी होणार नाही असे जरी आपण वादासाठी गृहीत धरून चाललो तरी, ह्या बिलाबाबत विरोधी पक्ष जी काही भूमिका घेत आहेत ती कशी चुकीची आहे हे मला दाखवून द्यावयाचे आहे. द्विभाषिकाचा हा निर्णय जो राष्ट्राने घेतलेला आहे तो अगदी निश्चित आहे. असे सांगताना अलीकडे ह्या सभागृहात विरोधी पक्षाकडून वारंवार असे सांगण्यात येते की, आता काँग्रेस पक्ष आणि लोकमत यांचा संबंध दुरावलेला आहे. काही काही

पक्षांचा आणि लोकमताचा संबंध अनेक वेळा तुटतो तसा काही काँग्रेस पक्षाचा संबंध तुटला असेल, नाही असे नाही. पण मी एक गोष्ट निश्चितपणे सांगतो की आज तरी काँग्रेस पक्षाची तशी परिस्थिती नाही, आणि काही महिन्यातच त्यांना मी म्हणतो याचा अनुभव येईल. हिंदुस्थानात काँग्रेस पक्षाच्या बाबतीतला इतिहास असा आहे की, सार्वत्रिक निवडणुकांच्या पूर्वी काही महिने काँग्रेस आणि लोकमत यांचा संबंध सुटलेला आहे असा विरोधी पक्षाचे लोक अंदाज करतात आणि प्रत्यक्ष निवडणुका झाल्यानंतर असे दिसून येते की, त्यांचा हा अंदाज सपशेल चुकलेला असतो. तेव्हा, ह्या बाबतीतही आपल्या राजकीय हेतूंसाठी काही तरी चुकीचे अंदाज करून काही गोष्टी करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षाने करू नये हे चांगले.

यानंतर, अध्यक्ष महाराज, ज्यासंबंधी ह्या ठिकाणी चर्चा झाली असा एक महत्त्वाचा मुद्दा विचार करण्यासारखा आहे, आणि त्याचा खात्रीने विचार केला पाहिजे, असे माझे मत आहे. सरकार हे जे नवीन क्षेत्र कॉर्पोरेशनच्या हद्दीत आणीत आहे त्याची व्यवस्था सरकार कशी काय करणार आहे असा प्रश्न येथे विचारण्यात आला. सध्या कॉर्पोरेशनच्या हद्दीत जो भाग आहे त्याचीच व्यवस्था कॉर्पोरेशन नीट करीत नसताना आणखी क्षेत्र जोडून घेणे हे बरोबर नाही असे सांगण्यात आले. ह्या बाबतीत थोडासा खुलासा मी सभागृहापुढे ठेवू इच्छितो. १९५० साली जेव्हा अशाच प्रकारचे बिल ह्या सभागृहात चर्चेसाठी आले होते त्यावेळी कै. नामदार वर्तकांनी ह्या नवीन भागांवर सरकार १० कोटी रुपये खर्च करील असे सांगितले होते, असे येथे एका सन्माननीय सभासदांनी सांगितले. ह्या बाबतीत मला अधिकृत अशी जी माहिती आहे ती पाहिली असता त्यांनी असे कोठे म्हटल्याचे माझ्या पाहाण्यात आले नाही. असे असताना असे बेछूट विधान कसे काय केले जाते याचे मला आश्चर्य वाटते. काही झाले तरी सभागृहात असे बेछूट विधान करणे योग्य नाही. त्यावेळी अशाच स्वरूपाचे जे बिल ह्या सभागृहापुढे आले होते तेव्हा अशा प्रकारचे विधान कै. वर्तकांनी केलेले नव्हते असे माझ्या स्नेह्यांनी मला सांगितले आहे आणि मीही जेव्हा स्वतः कै. वर्तक[१२] यांनी नेमके काय सांगितले होते हे पाहिले तेव्हा मला तरी १० कोटी रुपये खर्च केले जातील असे त्यांनी सांगितलेले पाहावयास मिळाले नाही.

आज जे गृहस्थ हयात नाहीत त्यांनी डेप्युटेशनच्या वेळी काय सांगितले होते याचा आधार घेऊन ह्या सभागृहामध्ये विधान करणे हे कितपत बरोबर आहे व यामुळे त्या दिवंगत माणसाला कितपत न्याय केल्यासारखे होत आहे याचा आपण विचार केला

पाहिजे. ह्या सभागृहात जेव्हा ह्या बिलाचा विचार आपण करतो त्या वेळी असा आधार घेणे योग्य होणार नाही. आज **कै. वर्तक** हयात नाहीत अशा परिस्थितीत त्यावेळी ते नेमके काय म्हणाले होते हे आपण कसे समजणार? सन्माननीय सभासद श्री.अमूल देसाई म्हणतात की, १० कोटी रुपये खर्च करू असे ते म्हणाले होते. पण ते १० कोटीच कशावरून बोलले असतील? कदाचित् १० लाखही बोलले असतील आणि सन्माननीय सभासदांचा गैरसमज झाल्यामुळे ते १० कोटींचा आकडा समजून चालले असतील, अशी शक्यता आहे. कदाचित् सन्माननीय सभासद श्री. अमूल देसाई यांनी नीट ऐकले नसेल. काही असले तरी ती गोष्ट गृहीत धरून ह्या बिलाच्या वेळी टीका करणे योग्य नाही. कै. वर्तक यांनी त्या वेळी नेमके काय सांगितले होते हे मी पाहिले आहे. त्यावेळी त्यांनीही मराठीतच भाषण केले होते, व ते काय म्हणाले होते हे मी या सभागृहाला वाचून दाखवितो. ते म्हणाले होते की,

''कॉर्पोरेशनला हा जो भार सहन करावा लागणार आहे तो सर्वस्वी सहन करण्याची कॉर्पोरेशनची तयारी नसल्यामुळे पुढील काही काळ म्हणजे १० वर्षेपर्यंत काही अटींवर म्युनिसिपालिटीला ग्रँट देण्याचे सरकारने ठरविले आहे आणि मदतीची ही रक्कम उपनगरात खर्च करावयाची असल्याने उपनगरांसाठी स्वतंत्र बजेटची तरतूद करणे जरूर आहे.''

असे म्हणून स्वतंत्र बजेटची तरतूद केली. खरोखरी त्याप्रमाणे ह्या सरकारने ह्या नवीन भागांसाठी काही केले की नाही ह्यासंबंधी माझ्याजवळ काही आकडे आहेत ते मी सभागृहापुढे ठेवू इच्छितो. जवळजवळ वेगवेगळ्या सहा बाबींखाली १,०८,५३,५६७ रुपये सरकारने ह्या भागांवर खर्च केले आहेत. ५० टक्के डिअरनेस अलौन्ससाठी खर्च दिलेला आहे. लँड रेव्हेन्यूचा १६५ टक्के इतका हिस्सा दिलेला आहे. त्याचप्रमाणे ७५ टक्के नॉन्-ॲग्रिकल्चरल ॲसेसमेंट मिळतो, त्यातील हिस्सा दिलेला आहे. शिवाय काही फिक्स्ड ग्रँट दिलेली आहे, आणि प्रायमरी एज्युकेशनसाठी काही लाख रुपये दिलेले आहेत.

I will give the figures, if you really want them. These are the figures:

| | | Rs. | |
|---|---|---|---|
| On 50 per cent dearness allowance | ... | 47,91,692 | |
| On 15 per cent land revenue | ... | 55,000 | and odd. |
| On 75 per cent non-agricultural assecssment | ... | 11,31,000 | and odd. |

अध्यक्ष महाराज, ही जी रक्कम दिलेली आहे ती मदत म्हणून दिलेली आहे, आणि ह्याशिवाय जवळ जवळ दोन ते अडीच कोटी त्या भागातील निरनिराळ्या योजनांच्या पूर्ततेसाठी दिलेले आहेत. हा खर्च अपुरा आहे हे मला मंजूर आहे. त्याचप्रमाणे मला हेही मंजूर आहे की, या बाबतीत जे प्रयत्न झाले आहेत ते पुरेसे झालेले नाहीत व त्यातून हा प्रश्न सुटलेला नाही. म्हणून, अध्यक्ष महाराज, ह्या प्रश्नासंबंधी जी जी टीका करण्यात आली तिच्या प्रती काढून त्या कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांकडे योग्य ती दखल घेण्यासाठी पाठविण्याची मी व्यवस्था करणार आहे, कारण ती योग्य अशीच टीका आहे. तेथे ज्या काही गैरसोयी आहेत त्याकडे लक्ष दिले पाहिजे व त्या दूर केल्या पाहिजेत आणि जे दोष मंजूर आहेत ते नाहीसे केले पाहिजेत याबद्दल कोणाचे दुमत नाही. परंतु दोष आहेत म्हणून कोणतीही नवी गोष्ट करू नये अशी दृष्टी ठेवणे बरोबर होणार नाही.

तसेच, एका सन्माननीय सभासदांनी सांगितले की महाराष्ट्रीय जास्त व गुजराती कमी व गुजराती जास्त व महाराष्ट्रीय कमी अशी दृष्टी ठेवून हे काम होत आहे. परंतु मला असे सांगावयाचे आहे की यापूर्वी अधिक महाराष्ट्रीय वस्तीचे भाग ह्या केंद्राच्या विभागात ठेवू नयेत असा हेतू सगळ्यांचा होता हे सन्माननीय सभासदांना माहीत आहे. म्हणून मास्टर प्लॅनप्रमाणे म्युनिसिपालिटीच्या कारभारामध्ये जी गावे जाणे जरूरीचे किंवा आवश्यक होते तेवढीच गावे किंवा भाग ह्या बिलामध्ये घातलेला आहे. किंबहुना मास्टर प्लॅनमध्ये नोंदलेल्या क्षेत्रापेक्षा किती तरी कमी भाग यामध्ये घेतला आहे. तेव्हा मला असे वाटते की एकदा हा दृष्टीकोन स्वीकारल्यानंतर हे शहर ५ लाखांचे व्हावे की ५० लाखांचे व्हावे ही चर्चा होऊ शकत नाही.

अध्यक्ष महाराज, मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे महात्मा गांधींनी असे म्हटले आहे की ही मोठी शहरे म्हणजे प्लेग स्पॉटस् आहेत. माझ्यासारख्या माणसाला मोठी शहरे म्हटल्यानंतर एक प्रकारची काळजी वाटते. कायमचे घर बांधण्याची पाळी आली तर मी असे म्हणेन की मोठ्या शहरांपेक्षा खेडेगावात घर बांधलेले चांगले. परंतु मोठी शहरे वाढत आहेत त्याला काही इलाज नाही. काही मंडळींनी हे शहर ३० लाख वस्तीचे झाले आहे ते आता ४० लाखांचे होणार की काय अशी भीती व्यक्त केली आहे. मला त्यांना सांगावयाचे आहे की सध्याच्या परिस्थितीत येणाऱ्या लोकांची व्यवस्था करण्यासाठी योजना करण्याची आवश्यकता आहे काय असा प्रश्न आल्यानंतर त्याचे उत्तर होकारार्थी देणे जरूरीचे आहे व ते ह्या बिलात नमूद केले आहे.

तेव्हा अपरिहार्यपणे ह्या उत्तराकडे गेल्यानंतर हे बिल आणण्याची घाई झाली, त्यात काही राजकीय हेतू आहे असे म्हणण्यात काही अर्थ नाही. हे बिल पुढे ढकलण्याने काही फायदा होणार नाही व घटनेच्या दृष्टीनेही ते बरोबर ठरणार नाही.

हे बिल सन्माननीय सभागृहापुढे आल्यानंतर ते चूक आहे असे म्हणता येईल, पण ते आता आणले हा दोष आहे हे म्हणणे बरोबर होणार नाही. हे बिल चुकीचे आहे म्हणून ते सभागृहाने फेकून द्यावे असा आग्रह धरला तर ते एक वेळ बरोबर होईल, पण तसा आग्रह न धरता हे बिल पुढे ढकलावे असे नुसते जे सांगितले जाते ते मला मान्य होत नाही. मला असे निश्चित वाटते की मुंबई शहराची हद्द वाढविणे जरूरीचे आहे ही गोष्ट एकदा पटल्यानंतर ती व्यवस्था लवकरात लवकर करणे आवश्यक आहे. एप्रिल महिन्यात कॉर्पोरेशनला नवीन बजेटची व्यवस्था करावी लागेल. तसेच, नोव्हेंबर महिन्यापासून नवीन राज्य निर्माण होणार आहे व त्या असेंब्लीपुढे बिल आणावयाचे म्हटले तर एक वर्ष ही गोष्ट लांबणीवर टाकावी लागेल आणि नंतर काय घडेल हे आताच सांगता येणार नाही. तेव्हा हे बिल ह्या वेळी आणू नये हे म्हणणे बरोबर होणार नाही.

सन्माननीय सभासदांनी जर काही नवीन सूचना केल्या असत्या किंवा प्रतिउपाय सुचविले असते तर त्याचा येथे विचार करता आला असता. सन्माननीय सभासद श्री.एस्.एम्.जोशी यांनी आपल्या भाषणामध्ये जी टीका केली, त्यामध्ये असे म्हटले की, कॉर्पोरेशनच्या ताब्यात असलेल्या क्षेत्राची जेवढी व्यवस्था होणे आवश्यक होते तेवढी झालेली नाही. त्यांची ती टीका रास्त आहे व त्याबाबत जरूर तो विचार केला जाईल. ज्या सन्माननीय सभासदांनी या बिलावर टीका केली आहे त्यांची भाषणे मी कॉर्पोरेशनकडे पाठविणार आहे असे मी मघाशीच सांगितले आहे. तेव्हा ज्या भागाची उपेक्षा झालेली आहे व जेथे दुर्लक्ष झालेले आहे अशा ठिकाणी सुधारणा व्हावी ही अट सरकार कॉर्पोरेशनला ग्रँट देताना घालण्याचा प्रयत्न करील हे मी त्यांना सांगू इच्छितो. पण त्याचबरोबर मला जी एक गोष्ट त्यांच्या निदर्शनास आणावयाची आहे ती ही की, मुंबईचे क्षेत्र न वाढविता येणाऱ्या वस्तीचा प्रश्न कसा सोडविता येईल याचा खुलासा येथे झालेल्या भाषणामध्ये ऐकावयास मिळालेला नाही. अमुक रीतीने हा प्रश्न सोडविता येईल असा युक्तिवाद करून किंवा उदाहरणे देऊन हे बिल लांबणीवर टाकावे असे काही सोल्युशन सन्माननीय सभासदांनी सुचविलेले नाही.

नव्या कारभाराची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने काही ऑफिसेस बाहेर ठेवली आहेत.

तुम्ही दुसऱ्या काही कारणासाठी ह्या ऑफिसेसबाबत टीका करू शकता, पण ही गोष्ट निश्चित आहे की ह्या ऑफिसेसमुळे मुंबईच्या लोकसंख्येचा प्रश्न बिकट होणार नाही. मुंबई शहरामध्ये नवीन उद्योगधंदे काढू नयेत असे आपण म्हटले तर ती गोष्ट मी समजू शकतो, पण प्रश्न असा आहे की आता जी मर्यादा वाढविण्यात येत आहे ती फार आहे काय? सन्माननीय सभासद श्री.एस्.एम्.जोशी यांनी मास्टर प्लॅन पाहिला आहे की नाही हे मला माहीत नाही, पण त्यांनी जर तो पाहिला असेल तर त्यांना असे दिसून येईल की मास्टर प्लॅनचा मूळ उद्देश मुंबई शहराची जी वस्ती आहे त्या वस्तीचे जीवन नैसर्गिक प्लॅनिंगच्या दृष्टीने चांगले करणे हा आहे व त्यामध्ये जे क्षेत्र सुचविले आहे ते आताच्या क्षेत्रापेक्षा जास्त आहे. सन्माननीय सभासद नुसते स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्ट्स आणि रीझन्सवर बोट ठेवून बोलणार असतील तर ते बरोबर होणार नाही. त्यामध्ये 'इन्फ्लक्स' हा जो शब्द वापरलेला आहे तो त्या वेळी घडलेली परिस्थिती लक्षात घेऊन नैमित्तिक कारण म्हणून उपयोगात आणलेला आहे. मुंबई शहराची एकसारखी वाढ होत आहे आणि द्विभाषिकामुळे त्यात आणखी भर पडणार आहे हे लक्षात घेऊन हा निर्णय घेतला हे मूळ कारण आहे. अध्यक्ष महाराज, मी ही पुनरुक्ती करीत आहे हे लक्षात घेऊन एवढेच सांगू इच्छितो की, येथे उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची जी उत्तरे देणे जरूरीचे होते ती मी दिली आहेत. शेवटी मला सभागृहाला एवढेच सांगावयाचे आहे की, या बिलामागे कोणताही राजकीय हेतू नाही, तेव्हा कृपा करून त्या दृष्टीने आपण त्याकडे पाहू नका. तेव्हा, ह्या बिलाचे पहिले वाचन मंजूर करावे एवढी विनंती करून मी माझे भाषण संपवितो.

■ ■ ■

---

On 23rd October 1956, the Government brought before the House, the Bombay Municipal (Further) Extension of Limits and Schedule BBA (Amendment) Corporation Bill. The Opposition Members thought that Government's motive of bringing the Bill so hurriedly was just to accommodate the influx of population due to proposed bilingual State, otherwise they asked the Government to state the reasons for passing the Bill. Shri Chavan,

Minister for Local Self-Government, defended Government's action in bringing the Bill before the House stating that the people of crowded Bombay should have room for expansion and the Municipal Corporation which would get its area extended because of this law should have an opportunity to frame the annual budget and make provision for the development of the new area which would come into the city limits. He also revealed that the Government has also decided to give additional grant to the Municipal Corporation for ten years for expending it on the suburban area which was to be merged with the Corporation.

# सवर्ण हिंदूंकडून मातंग समाजातील लोकांवर झालेल्या हल्ल्यासंबंधी तहकुबी सूचना *

**१६ डिसेंबर १९५७**

*मातंग समाजावर सवर्ण हिंदूंकडून झालेल्या हल्ल्यावरील विरोधी पक्षीय सदस्यांच्या तीव्र प्रतिक्रियेबद्दल मा. चव्हाण यांनी सहानुभूती दर्शविली. परंतु हा प्रश्न नाजुक असल्यामुळे तहकुबीची सूचना मागे घ्यावी अशी श्री.एस्.एस्. जोशी यांना विनंती केली.*

अध्यक्ष महाराज, ज्या हकीकतीसंबंधी ही सूचना सन्माननीय सभागृहापुढे आलेली आहे तो सर्वच प्रश्न न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यातील वस्तुस्थितीचा जो तपशील आहे तो सभागृहापसढे ठेवणे अडचणीचे झाले आहे आणि म्हणून सभागृहापुढे जेव्हा चर्चेसाठी हा प्रश्न आला त्या वेळी मी असे सुचविले होते की, ह्या हकीकतीच्या वस्तुस्थितीबाबत थोडासा संयम ठेवून चर्चा केली तर बरे होईल. मला सांगावयास आनंद वाटतो की ही सूचना ह्या प्रश्नावर चर्चा करताना जे सन्माननीय सभासद बोलले त्यांनी बव्हंशाने पाळलेली आहे. ही चर्चा विशिष्ट हकीकतीवर मर्यादित न होता या हकीकतीतून जो एक सामाजिक प्रश्न निर्माण झाला आहे त्या सामाजिक प्रश्नाकडे या सन्माननीय सभागृहाचे, सर्व पक्षांचे आणि सर्व जनतेचे लक्ष वेधले जावे हा जो मूळ हेतू ही सूचना आणण्याच्या पाठीमागे होता तो पूर्णांशाने सफल झालेला आहे. मी प्रथम असे सांगू इच्छितो की, सभागृहातील विरोधी पक्षाचे नेते सन्माननीय सभासद श्री. एस्.एम्.जोशी यांचा मूळ सूचना आणण्यामागे राजकीय हेतू होता असे मी म्हणत नाही किंवा तसे मी मानलेले नाही. त्यांचा हेतू विशाल होता आणि त्यांच्या भावनेशी

* (Bombay Legislative Assembly Debates. Vol.4. Part II (Inside No.13). 16th December, 1957. pp. 753 to 756.)

मी संपूर्णपणे सहमत आहे. पण ही ॲडजर्नमेंट मोशन पास करणे म्हणजे सरकारवर अविश्वास दाखविल्यासारखे होत असल्यामुळे मला ती मान्य नाही.

आपल्या हिंदुस्तानमध्ये एका विशिष्ट समाजावर हजारो वर्षे सामाजिक अन्याय होत राहिला आहे आणि त्या सामाजिक अन्यायाचे परिणाम आपल्या जीवनामध्ये खोल रुजले आहेत. त्यांचे अशा रीतीने वारंवार दर्शन घडले की, मन दिङ्मूढ होते. ह्या प्रश्नासंबंधी सन्माननीय सभासद श्री. मोरे यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यांच्याशी मी बव्हंशाने सहमत आहे असे सांगू इच्छितो. आजपर्यंत ज्यांना आम्ही अस्पृश्य म्हणून मानले त्यांच्यावर होणारे सामाजिक अन्याय दूर करणे आपले कर्तव्य आहे ही गोष्ट देशातील सर्वोत्कृष्ट माणसापासून ते सरकारपर्यंत सर्वांनी ती मान्य केलेली आहे. तेव्हा ही जी हकीकत घडली तीबद्दल जनतेचे प्रतिनिधी म्हणून मानल्या गेलेल्या लोकांनी या ठिकाणी जी भावना व्यक्त केली ती भावना मला मंजूर आहे आणि या राज्यातील शासनाचा प्रमुख म्हणून ती जबाबदारी मी स्वतःवर जास्त घेतली पाहिजे ही गोष्टही मला मंजूर आहे.

अध्यक्ष महाराज, या प्रश्नासंबंधाने पोलिसांनी काय करायला पाहिजे होते, त्यांनी काय केले आणि काय केले नाही या तपशिलात शिरून मी त्या भावनेतून बोलू इच्छित नाही. एक गोष्ट निश्चित आहे की, गेल्या काही दिवसांमध्ये एक तऱ्हेची तेढीची भावना समाजामध्ये अधूनमधून प्रत्ययाला येऊ लागली आहे आणि एक गंभीर सामाजिक प्रश्न आज आपल्या समोर उभा आहे. हा प्रश्न कोणत्या मार्गाने हाताळावा यासंबंधी काही निश्चित अशा कल्पना बांधणे इष्ट ठरणार नाही. म्हणून या प्रश्नासंबंधी मी आपले मन अगदी मोकळे ठेवले आहे. अध्यक्ष महाराज, मी आपणाला आणि या सभागृहाला सांगू इच्छितो की, विदर्भामध्ये जेव्हा नवबौद्धांसंबंधी काही तक्रारी आणि अडचणी माझ्या कानावर आल्या तेव्हा मी त्या विभागातील अधिकाऱ्यांना बोलावून सूचना दिल्या होत्या की, हा प्रश्न निव्वळ कायदेशीरपणे वागून सुटेल असे मानणे चुकीचे आहे. या संबंधाने सन्माननीय सभासद **श्री.व्ही.डी.देशपांडे**[१३] यांनी जे एक वाक्य उच्चारले त्याच्याशी मी सहमत आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे, या प्रश्नासंबंधी कायद्याने वागून आपण किती माणसांना शिक्षा करणार ? सर्व थरांमध्ये गेलेला आणि सगळ्यांच्या मनापर्यंत पोहोचलेला असा हा भेदभाव आहे. म्हणून हा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वांच्या प्रयत्नातून काही मार्ग काढता आला तर तो काढणे आवश्यक आहे. विदर्भामध्ये जेव्हा हा प्रश्न निर्माण झाला तेव्हा मी अधिकाऱ्यांना अशा सूचना दिल्या होत्या की, तंग झालेले वातावरण शांत करण्यासाठी पक्षाचे कोठल्याही तऱ्हेचे

नाते मनात न आणता सर्वपक्षीय कमिट्या नेमण्याचा त्यांनी जरूर प्रयत्न करावा. काही ठिकाणी हा प्रश्न यशस्वी झाला, काही ठिकाणी त्या प्रयत्नाला यश आले नाही. अध्यक्ष महाराज, शासनातर्फे आणि माझ्यातर्फे मी सभागृहाला असे निश्चित आश्वासन देऊ इच्छितो की, अस्पृश्य म्हणून मानल्या जाणाऱ्या समाजावर कोठेही अन्याय झाला असेल तर तो पक्षाचा प्रश्न केला जाणार नाही, कोठल्याही तऱ्हेच्या पक्षीय भूमिकेवरून त्या प्रश्नाचा विचार केला जाणार नाही. या प्रश्नासंबंधी जितकी जास्तीत जास्त तीव्र उपाययोजना करण्याची आवश्यकता असेल तितकी करण्यासंबंधी विरोधी पक्षाच्या मंडळींशी अत्यंत खुल्या मनाने चर्चा करण्यास मी केव्हाही तयार आहे. कारण त्या प्रश्नाकडे कोठल्याही प्रकारे पक्षीय दृष्टीकोनातून पाहून तो सुटणार नाही यासंबंधी माझ्या मनात बिलकुल संशय नाही.

अध्यक्ष महाराज, शब्दांचा वापर सर्वांनी जपून आणि संयमपूर्वक करण्यासंबंधी श्री. जोशी यांनी जी सूचना केली ती खरोखर विचार करण्यासारखी आहे. आजकालचा जमाना एक प्रकारचा स्फोटक जमाना आहे असे मानावयाला काही हरकत नाही. कोणत्याही एका प्रांतापुरती किंवा राज्यापुरती भूमिका ठेवून मी हे बोलत नाही. आज सबंध देशामध्ये आणि सर्व जगामध्ये अशा तऱ्हेचे वातावरण आहे की, त्या वातावरणात आपणास पाहिजे त्या दिशेने लोकांची मने विचारवंत किंवा स्वतःला लोकांचे नेते समजणारे लोक तयार करू शकतात. लोकांचे विचार आपणास पाहिजे त्या दिशेने बदलू शकतात. त्यांच्या हातामध्ये शब्द हे फार मोठे परिणामकारक असे साधन आहे. फार मोठे परिणामकारक असे शस्त्र आहे. या शस्त्राचा उपयोग अत्यंत हळुवारपणे आणि काळजीपूर्वक केला गेला तर फार चांगली गोष्ट होणार आहे आणि समाजाचे त्यामुळे फार मोठे कल्याण होणार आहे. म्हणून श्री.एस्.एम्.जोशी यांनी आपल्या भाषणात यासंबंधी अत्यंत तळमळीने जी सूचना केली त्या सूचनेला मी माझ्याकडून अगदी अंतःकरणपूर्वक पाठिंबा देतो आणि यासंबंधी काही सर्वपक्षीय प्रयत्न होणार असेल तर त्याबाबतीत मी माझा हिस्सा जरूर उचलेन असे आश्वासन मी या सभागृहास निःसंकोच मनाने देऊ इच्छितो. मी यासंबंधाने अधिक बोलू इच्छित नाही. आजच्या स्फोटक वातावरणात शब्दांचा वापर फार काळजीपूर्वक केला पाहिजे याबद्दल माझ्या मनात कोठलाही संशय नाही. शब्द हे एक जबरदस्त शस्त्र आहे. शब्दामध्ये जे सामर्थ्य आहे त्याचे यथायोग्य वर्णन एखादा साहित्यिकच करू शकेल, मी ते करू शकत नाही. शब्दाच्या सामर्थ्याचा उपयोग लोकांच्या जीवनातील मांगल्य वाढविण्याकरिता केला तर असा उपयोग करणाऱ्या व्यक्तीच्या पुढे मी आपले मस्तक नम्र करावयाला क्षणभरही

मागेपुढे पाहणार नाही. अर्थात्, जेथे मतभेदाचा प्रश्न असेल तेथे प्रत्येकाने आपला मतभेद मांडला पाहिजे. सगळेच गोड गोड आणि गुळगुळीत शब्द वापरून मतभेद झाकून ठेवावेत असे मी मुळीच म्हणणार नाही, परंतु मतभेद देखील व्यक्त करीत असताना चांगल्या शब्दांचा वापर आपण करू शकतो, ही जी सूचना श्री.एस्.एम्.जोशी यांच्याकडून आली आहे तीमुळे मला अधिक उत्तेजन मिळाल्यासारखे वाटते आणि म्हणून त्यांच्या सूचनेचे मी जाहीरपणे स्वागत करतो आणि त्या सूचनेला अत्यंत मनःपूर्वक पाठिंबा देतो. मी आशा करतो की, ते या सूचनेची अंमलबजावणी या सभागृहात आणि सभागृहाबाहेरही चालू ठेवतील. माझ्या पक्षाकडून याबाबतीत त्यांना संपूर्ण सहकार्य मिळेल आणि माझ्या पक्षातील कोणा व्यक्तीकडून अनुचित शब्दांचा वापर झाला तर त्याचा जाहीरपणे निषेध करण्याची माझ्या मनाची तयारी आहे, ही गोष्ट मी या ठिकाणी नम्रपणे नमूद करू इच्छितो.

श्री.जोशी यांनी आपल्या भाषणात ज्या तीनचार सूचना केल्या आहेत त्या अतिशय विचार करण्यासारख्या आहेत. त्यांची पहिली सूचना अशी आहे की, अशा तऱ्हेचा प्रश्न जेथे निर्माण होईल, म्हणजे दलित समाजावर काही अन्याय होत आहे किंवा झाला आहे अशी तक्रार जेथे निर्माण होईल तेथे त्या तक्रारीची चौकशी स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांकरवी न करविता ती चौकशी करण्याकरिता वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी तेथे गेले पाहिजे. ही जी त्यांची सूचना आहे ती मला मान्य आहे आणि त्या सूचनेची अंमलबजावणी मी करणार आहे म्हणजे अशा ठिकाणी जिल्ह्याचा वरिष्ठ पोलिस अधिकारी चौकशीसाठी जाईल आणि जरूर पडली तर त्याच्याही वरचा अधिकारी तेथे जाईल. यामध्ये त्या तक्रारीचा काय निकाल लागला याच्यापेक्षा त्या प्रश्नाकडे निःपक्षपातीपणे पाहिले गेले आहे आणि निःपक्षपाती भूमिकेवरून त्या तक्रारीची चौकशी झाली आहे असे सर्व लोकांना वाटण्यासारखे वातावरण निर्माण करण्याची जरूरी आहे आणि म्हणून त्यांनी जी सूचना केली ती मला महत्त्वाची वाटते, ती मला मान्य आहे आणि तिची मी अंमलबजावणी करणार आहे.

त्यानंतर त्यांनी बळीची बायको लक्ष्मीबाई हिला संरक्षण देण्याची व्यवस्था करण्यासंबंधी दुसरी सूचना केली. त्यासंबंधी मी आवश्यक ती व्यवस्था करीत आहे. हे एकंदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याकारणाने न्यायाच्या दृष्टीने जो काही पुरावा उपलब्ध होण्यासारखा असेल तो दाबला जाऊ नये किंवा नष्ट केला जाऊ नये अशी सरकारलाही काळजी वाटत आहे. या सर्व दृष्टींनी त्या बाईला आवश्यक ते संरक्षण देण्याची व्यवस्था सरकार करील असे मी या सभागृहाला आश्वासन देतो.

पाटलाच्या संबंधी जे सांगण्यात आले ते ऐकून मला खरोखर शरम वाटते. तो एका विशिष्ट जमातीतील आहे आणि आपल्या ग्रामीण जीवनाचा एक घटक आहे. या प्रश्नाची चर्चा या सभागृहातील आपण सगळेच लोक सभागृहाच्या बाहेर एकत्र बसून जर करू शकलो तर मला असे वाटते की, ती आपण अधिक मोकळेपणाने करू शकू. कोणत्याही तऱ्हेचा आडपडदा न ठेवता अगदी मोकळ्या मनाने या प्रश्नाची चर्चा या सभागृहाबाहेर करण्याची माझ्या मनाची तयारी आहे. कारण हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि सर्वांच्याच जिव्हाळ्याचा असा प्रश्न आहे. आपल्या ग्रामीण जीवनामध्ये जे जुनाट आचारविचार पूर्वीपासून चालत आले आहेत त्यांचा अंश अद्याप तेथे शिल्लक आहे. आज आम्ही विसाव्या शतकात राहात असलो आणि तोंडाने लोकशाहीच्या, न्यायाच्या आणि समतेच्या गोष्टी करीत असलो तरी प्रत्यक्ष आमच्या वागण्यामध्ये अनेक जुनाट चालीरीती, रूढी आणि परंपरा यांना अद्याप स्थान आहे. काही जातींना आपल्या जातीबद्दल इतका काही अभिमान, इतका काही अहंकार वाटतो की, त्यांच्या त्या अभिमानाला किंवा अहंकाराला थोडासा जरी धक्का लागला तरी एकदम भडका उडतो असा सगळ्यांचा अनुभव आहे. ही परिस्थिती नाहीशी करावयाची असेल तर सर्वांनी मिळून पक्षनिरपेक्ष भूमिकेवरून, पक्षमर्यादेच्या पलीकडे जाऊन या एकंदर प्रश्नाचा विचार केला पाहिजे, यासंबंधी माझ्या मनात बिलकुल शंका नाही आणि म्हणून तो करण्याची माझी मनःपूर्वक तयारी आहे.

या पाटलाच्या विरुद्ध जे काही कायदेशीर इलाज करणे आवश्यक असेल ते केले जातील आणि जे इलाज केले जातील ते या सभागृहाच्या निदर्शनास आणले जातील.

एका महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाकडे पक्षनिष्ठेच्या मर्यादेच्या बाहेर जाऊन या सभागृहाचे, सर्व समाजाचे, तुम्हा आम्हा सगळ्यांचे लक्ष वेधावे आणि झालेल्या एकंदर प्रकारामुळे हरिजन समाजाला ज्या यातना झाल्या त्यांची जाणीव तुम्हा आम्हा सर्वांना करून द्यावी हा जर ही तहकुबीची सूचना आणण्याच्या पाठीमागे श्री. जोशी यांचा उद्देश असेल तर तो सफल झाला आहे असे मला वाटते. तसेच, त्यांनी ही सूचना मांडताना ज्या काही व्यावहारिक सूचना केल्या त्या मी मान्य केल्या आहेत. तेव्हा आपली तहकुबीची सूचना त्यांनी परत घ्यावी अशी मी त्यांना विनंती करतो. कारण ती मांडण्यात त्यांचा जो काही हेतू होता तो साध्य झाला आहे. ही सूचना नापास करावी अशी माझी इच्छा नाही. कारण तिच्या पाठीमागील भावनेशी मी संपूर्णतः सहमत आहे. पण ती मी पासही करू शकत नाही. कारण ती पास झाल्यास ती या सरकारविरुद्ध निंदाव्यंजक ठराव होईल. म्हणून मी त्या सूचनेला मान्यता देऊ शकत

नाही. ज्या भावनेने त्यांनी हा प्रश्न सभागृहासमोर उभा केला त्या भावनेला मी प्रतिसाद देऊ इच्छितो आणि म्हणून त्यांनी ही सूचना परत घ्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

■ ■ ■

Speaking on the Adjournment Motion brought by Shri S.M.Joshi, Shri Y. B. Chavan, Chief Minister, said that he shared the feelings of Shri Joshi in respect of the atrocities on Harijans. He further said that he had asked the concerned officers to organise all-party meetings to create a healthy atmosphere. He also assured the House that such cases would not be dealt with from the party point of view only. He said that such problems would be solved after frank discussions with the Opposition parties. Appreciating Shri Joshi's suggestion, he stressed the need to use words carefully because they were more powerful and disastrous than weapons, and so, even while expressing differences of opinion one should use them with restraint. He remarked that all the three suggestions made by Shri Joshi were very valuable and he accepted them wholeheartedly. According to the first, the senior police officers would investigate the cases of atrocities on Harijans. According to the second, the wife of the deceased victim would get full protection and according to the third, the patil, who was responsible for the act, would be punished severely.

He also stated that some communities, which had undue casteist notions of superiority and which were standing on false prestige, should not allow their feelings to reach the point of explosion. Finally, he requested Shri Joshi to withdraw his motion.

# प्रतापगडावर जाणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सदस्यांबद्दल सरकारने दाखविलेल्या पक्षपाती धोरणासंबंधी चर्चा*

**२३ डिसेंबर १९५७**

*वरील चर्चेत उद्भवलेल्या कांही गोष्टींचा मा. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या भाषणात परामर्श घेतला.*

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र समिती पक्षाने माझ्या मते दोन चुका केल्या. एक चूक म्हणजे प्रतापगडावरील समारंभाच्या निषेधाची मोहीम उघडली आणि दुसरी चूक म्हणजे त्याबाबत या सभागृहात चर्चा सुरू केली. आज सभागृहात झालेल्या चर्चेला उत्तर देण्यापूर्वी प्रतापगडावरील समारंभापूर्वीचा थोडासा इतिहास सांगणे मी आवश्यक समजतो. तेव्हा, अध्यक्ष महाराज, थोडेसे विषयांतर होण्याचा संभव आहे. विषयांतर करणे इष्ट नाही असे आपण सांगितल्यास हा मुद्दा मी त्याच ठिकाणी सोडून देईन. सरकार पक्षावर या ठिकाणी जे आरोप केले त्यामागे पार्श्वभूमी आहे, इतिहास आहे. हा इतिहास सांगत असताना फार मागे, शिवाजी महाराजांच्या काळापर्यंत जाण्याचे कारण नाही. काँग्रेस पक्षाला शिवाजी महाराजांची एकाएकी आठवण झाली यात द्विभाषिकाला बळकट करण्याचा त्या पक्षाचा हेतू आहे आणि म्हणून आपण प्रतापगडावरील समारंभाला विरोध केला पाहिजे अशी भूमिका प्रारंभी महाराष्ट्र समितीतर्फे घेण्यात आली. अध्यक्ष महाराज, प्रतापगडावर शिवाजी महाराजांचा जो पुतळा उभारण्यात आला त्या मागचा इतिहास अगदी ताजा आहे. सन्माननीय सभासद श्री. दत्ता देशमुख यांना देखील तो माहीत आहे. **श्री. मेहताब**[१४] आणि

* Bombay Legislative Assembly Debates, Vol. 4, Part II (Inside No.19), 23rd December 1957, pp. 1203 to 1210.

**श्री. नाईकनिंबाळकर**[१५] यांची एकदा भेट झाली असता प्रतापगडावर शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी द्विभाषिकाचा प्रश्न मुळीच अस्तित्वात आलेला नव्हता. हा ऐतिहासिक सत्याचा प्रश्न आहे. म्हणजे शिवाजी महाराजांची आम्हाला आताच का आठवण झाली ?

१९५४ साली आठवण न होता आताच आठवण का झाली ह्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी, अध्यक्ष महाराज, मी अशोक वाटिका न्यायाचे उदाहरण सभागृहापुढे ठेवले तर ते अस्थानी होणार नाही. अशोक वाटिका न्यायाची जी कथा आहे ती अशी आहे की, रावणाने सीतेला हिरावून लंकेत नेले. तिला अशोक वृक्षाच्या झाडाखाली ठेवण्याऐवजी आंब्याच्या झाडाखाली का ठेवण्यात आले नाही ? तिला आंब्याच्या झाडाखाली ठेवण्यात आले असते तरी आंब्याच्याच झाडाखाली का ठेवण्यात आले असा त्या शंकेखोर माणसाकडून प्रश्न विचारला गेला असता. आम्हाला १९५५ सालीच आठवण का झाली असा प्रश्न विचारणाऱ्या लोकांच्या बाबतीत हे उदाहरण तंतोतंत लागू पडते. ह्यावर मी असे म्हणू शकेन की, १९५५ साली आम्हाला आठवण झाली म्हणून झाली. किंबहुना शहाण्या माणसाला शिवाजी महाराजांची आठवण झाली नाही ती त्यावेळी आम्हाला झाली. त्यांच्यापुढे असलेल्या अनेक कामांमुळे त्यांना ती आठवण झाली नसेल तर मी त्यांना दोष देत नाही. १९५५ साली मोठेपणाचा आव आणून जे लोक हिंडत होते त्यांना जे सुचले नाही, ते आम्हाला सुचले. चांगली गोष्ट घडायला चांगली वेळ यावी लागते आणि अशी वेळ आल्यानंतरच आम्हाला शिवाजी महाराजांची आठवण झाली. पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांनी छत्रपती व लोकमान्य टिळक ह्यांच्या जयंतीनिमित्ताने सुट्टी का दिली नाही ह्या गोष्टीला मी जबाबदार नाही. त्यावेळी सन्माननीय सभासद श्री. दत्ता देशमुख हे सुद्धा विधानसभेत काँग्रेसपक्षाचे सदस्य म्हणून होते व तेही ह्या गोष्टीला थोडेफार जबाबदार आहेत.

मला ह्या निमित्ताने एवढेच सांगावयाचे आहे की, ज्या जुन्या गोष्टी आहेत त्या उकरून काढण्यात काही अर्थ नाही, परंतु जी गोष्ट चुकली असेल ती मात्र आपण दुरुस्त करू शकतो व ज्या गोष्टी आपणास आवडत नसतील त्या आपण मनात ठेवू शकतो. ज्या गोष्टी चुकल्या असतील त्या आमच्या पद्धतीनुसार दुरुस्त करण्याचा आम्ही जरूर प्रयत्न करतो व तो आज आम्ही केलेला आहे.

शिवस्मारक समितीच्या बाबतीत सर्वांच्या विचारानेच गोष्टी झाल्या असत्या ही गोष्ट मी समजू शकतो, त्याप्रमाणे माझ्या खाजगी चर्चेच्या वेळी, प्रतापगडच्या समारंभासाठी पंडित नेहरूंना बोलावण्यात येणार आहे ही गोष्ट मी सन्माननीय सभासद

श्री. दत्ता देशमुख ह्यांना सांगितली होती. हा समारंभ सर्वपक्षीय पातळीवरून व्हावा हे मात्र आम्हाला सुचले नाही. त्यानंतरच्या प्रयत्नामध्येही समितीला भाग घेण्याची इच्छा होती हे खरे आहे. परंतु त्या गोष्टीची त्यांनी आम्हाला कल्पना द्यावयास पाहिजे होती. कारण आम्हाला शिवाजी महाराजांबद्दल जितका अभिमान आहे तितकाच हिंदुस्तानातील प्रत्येक जिवंत माणसाला असला पाहिजे ही गोष्ट मला मान्य आहे. परंतु अध्यक्ष महाराज, ह्या प्रश्नास जी सुरुवात झाली तीच मुळात विचित्र तऱ्हेने झाली. पंडित नेहरूंना प्रतापगडच्या समारंभास जावयाचे असेल तर आमची प्रेते पडतील अशी भाषा वापरण्यात येऊन घोषणा देण्यात आल्या.

आम्हाला कोणाची प्रेते पाडावयाची नव्हती व प्रेते पाडण्याची आमची इच्छा नाही. माझा हे सर्व सांगण्याचा हेतू इतकाच की, अशा घोषणांना सुरवात झाल्यानंतर, वादाचे वातावरण निर्माण झाले. अर्थात् समितीच्या काही प्रमुख मंडळींनी हे वातावरण व परिस्थिती मोठ्या संयमाने हाताळण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. कारण जी गोष्ट योग्य आहे ती तशी मानून तिची दखल घेतली पाहिजे. अध्यक्ष महाराज, ह्या सर्व प्रश्नाच्या बाबतीत जातीयवादी प्रचाराचा थोडासा अंश निर्माण झाला ही गोष्ट खरी आहे. (Interruption) सन्माननीय सभासद **श्री. व्ही.एन्. पाटील**[१६] ह्यांना मला असे सांगावयाचे आहे की, आज १९५७ साली ज्यांनी राजकारणाची काही तत्त्वे स्वीकारली आहेत त्यांनी एक गोष्ट समजून घेतली पाहिजे ती अशी की, जातीयवादाविरुद्ध भाषणे करून व सभागृहामध्ये जातीयवादाविरुद्ध राग व्यक्त करून जातीयवाद जाणार नाही. जातीयवादाचे विष हिंदुस्थान देशाच्या सर्व वातावरणामध्ये भिनले आहे. ते विष काढून टाकण्याच्या दृष्टीने आपण स्वतः किती जातीयवादी आहोत असा प्रत्येकाने आपल्या अंतःकरणात विचार करून आत्मपरीक्षण केले पाहिजे व जातीयवाद नाहीसा करण्यासाठी प्रयत्न करावयास पाहिजे.

समितीच्या लोकांना शिवाजी महाराजांबद्दल आदर आहे ही गोष्ट मला मान्य आहे, परंतु ह्या सद्हेतूबरोबर त्यांनी निषेधाची वृत्ती धारण केल्यामुळे काही लोकांच्या मनात जे विचार आले ते मी सभागृहापुढे ठेवू इच्छितो. सतत ३०० वर्षे लोटल्यानंतरही ज्या थोर पुरूषाला जनतेने आपल्या अंतःकरणाच्या सिंहासनावर जागा दिली, त्या महात्म्याच्या स्मारकाला मानाचा मुजरा करण्यासाठी व स्मारक सत्कारार्थ हिंदुस्थानातील ३०-४० कोटी जनतेचे मुकुटमणी, भारताचे प्रतिनिधी पंडित नेहरू, ज्यावेळी येतात त्यावेळी त्यांचा निषेध करून अडथळे आणण्याची जी गोष्ट आहे ती चांगली नाही असे सर्वसामान्य माणसाला वाटले तर त्यात काही चूक आहे असे मला

वाटत नाही. हिंदुस्थानातील जातीयवादाचे राजकारण नाहीसे करावयाचे झाले तर जातीयवादी विचारसरणी व भावना निर्माण होणार नाही ह्या दृष्टीने केवळ काँग्रेस पक्षानेच नव्हे तर सर्व पक्षातील लोकांनी आपली पावले टाकली पाहिजेत. समितीच्या लोकांमध्ये द्विभाषिकाबद्दल जर खरोखरी राग होता तर लोकमान्य टिळकांच्या स्मारकाच्या वेळी पंडित नेहरूंविरुद्ध निदर्शने व निषेध केला गेला नाही, आणि ती निदर्शने व तो निषेध आताच करण्यात आला, असा भेदभाव का, असा विचार काही लोकांच्या मनामध्ये आला होता.

अध्यक्ष महाराज, अशा तऱ्हेचे विचार लोकांच्या मनामध्ये येणे चुकीची गोष्ट आहे. त्या दृष्टीने जे वातावरण निर्माण झाले ते टाळण्याची जबाबदारी सर्वांवर होती. जातीयवाद वाईट आहे अशी नुसती घोषणा करून तो कमी होत नाही. तो कमी होण्याच्या दृष्टीने पावलोपावली तुम्ही आम्ही सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे.

ह्या प्रश्नाची इतकी पार्श्वभूमी सांगितल्यावर, मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, लोकांची एक छावणी वाईला व दुसरी छावणी पोलादपूरला पडणार आहे असे समितीच्या नेत्यांनी जाहीर केले. छावणी असा शब्दप्रयोग केल्यामुळे एक प्रकारचे युद्धाचे वातावरण निर्माण झाले. छावण्या पडणार आहेत ह्या शब्दांमध्ये एक विशिष्ट अर्थ अभिप्रेत आहे.

कॅम्पस् सुरू होणार अशा बातम्या पसरल्यानंतर, स्वाभाविकपणे, शांतता प्रस्थापित करण्याची माझ्यावर जिम्मेदारी होती. त्याचबरोबर निदर्शने करण्यास जे लोक जमले होते त्यांनाही योग्य ती संधी मिळाली पाहिजे असाही आमचा हेतू होता. अध्यक्ष महाराज, निदर्शने करू इच्छिणाऱ्या लोकांना प्रतापगडाजवळ थांबा असे सांगितले तर ते थांबतील असा आमचा अंदाज होता व आपल्याला थांबवावे असे त्यांच्याही मनामध्ये असावे असे मला वाटत होते. आमचा अंदाज आमच्या सुदैवाने म्हणा अथवा त्यांच्या सुदैवाने म्हणा, खरा ठरला. अखेर ३६ व्या कलमान्वये त्यांना थांबविले गेले.

अशा रीतीने त्यांना थांबवावे लागले. स्वाभाविकपणे, दोन्ही बाजूची माणसे गरम डोक्याची असल्यामुळे त्यांच्या भावना भडकल्या होत्या. समितीमधीलच माणसे रागावली होती असे नाही तर काँग्रेसपक्षातील माणसेही रागावलेली होती. अशा परिस्थितीमध्ये दोन्ही बाजूंना एकत्र येऊ देण्यामध्ये फार मोठी अडचण निर्माण झाली असती असे मला वाटते. म्हणून निदर्शने करणाऱ्यांना गैरसोयीच्या ठिकाणी अडवण्यापेक्षा प्रतापगडच्या पायथ्याशी, वाईजवळ असलेल्या एका मैदानाजवळ

अडवण्याचे ठरविण्यात आले. त्या ठिकाणी मैदान असल्यामुळे निदर्शकांना बसण्याची सोय होती, जवळच कृष्णा नदी वाहात असल्यामुळे पाण्याच्या गैरसोयीचा प्रश्न नव्हता व इतर अडीअडचणी आल्या नसत्या, या सर्व बाबींचा विचार करून निदर्शकांना वाईजवळ थांबविण्याचा विचार केला. त्यांना थांबवण्यामागे संघर्ष टाळावा असा हेतू होता. घाटात थांबविले असते तर, रस्ते अरुंद असल्यामुळे त्यांना त्रास झाला असता. आमचा समारंभ नीटपणे पार पडावा व निदर्शकांना निदर्शने करता यावीत, पण संघर्ष होऊ नये अशा हेतूने त्यांना थांबविण्यात आले. असे करण्यामागे पक्षपाताचा हेतू नव्हता, तर शांतता राखण्याचा हेतू होता. समारंभ योग्य प्रकारे पार पडावा व निदर्शने करू इच्छिणाऱ्यांनाही ती निर्धास्तपणे करता यावीत अशी सावधगिरी घेण्यात आली, एवढेच मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, ट्रकसंबंधी जे धोरण मी स्वीकारले, ते धोरण स्वीकारल्यामुळे मी चुकलो असे मला वाटत नाही. शिवाजी स्मारक समितीतर्फे जाणाऱ्या मंडळींना जाण्यासाठी ट्रक्सची परवानगी देण्यात आली व निदर्शकांना नेण्यासाठी तशी परवानगी नाकारण्यात आली ही गोष्ट खरी आहे. संघर्षासाठी जाणाऱ्या मंडळींना ट्रक्सची परवानगी देऊन मदत करावयाची व नंतर लॉ अँड ऑर्डर सांभाळण्याची काळजी वाहावयाची हे मला योग्य वाटले नाही. एका बाजूने अशी थट्टा करण्यात येत होती की, ट्रकमधून जाणारे भाडोत्री आहेत. महाराष्ट्रातून शिवाजी महाराजांना मुजरा करण्यासाठी जाणारी लक्षावधी माणसे भाडोत्री आहेत असे म्हणणारे कोणाचे प्रतिनिधित्व करीत आहेत हे त्यांनी स्वतःला विचारून पाहावे. शिवाजी महाराजांना नमस्कार करणाऱ्या माणसांना जे भाडोत्री असा शब्दप्रयोग करीत आहेत त्यांना शिवाजी महाराजांबद्दल किती प्रेम असेल ते दिसून येत आहे. अध्यक्ष महाराज, आम्ही निदर्शकांना ट्रक्सची परवानगी दिली नाही, अशी तक्रार करण्यात आलेली आहे. त्यांना ट्रक्समधून भाडोत्री माणसे न्यावयाची होती काय असा प्रश्न मी त्यांना विचारू इच्छितो. तक्रार करून आम्हाला जाब विचारण्यापूर्वी त्यांनी आपल्या अंतःकरणाला विचारावे.

अध्यक्ष महाराज, ट्रकमधून माणसे नेण्यास निदर्शकांना परवानगी दिलेली नाही, ही गोष्ट खरी आहे. लॉ अँड ऑर्डर राखण्याची जबाबदारी माझ्यावर होती, काही बरावाईट प्रसंग ओढवला असता तर त्याची जबाबदारी माझ्यावर होती व ही जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीने मी निदर्शकांना ट्रक्समधून माणसे नेण्याची परवानगी दिली नाही. ट्रकची परवानगी देऊन निदर्शकांची संख्या वाढवू द्यावयाची व पुन्हा निदर्शनाला आळा घालावयाचा असा दुहेरी पेच निर्माण करण्यात अर्थ नव्हता. ट्रकमधून माणसे नेण्यास

निदर्शकांना परवानगी देऊन ती माणसे तेथे गेल्यानंतर त्यांना अडवून अडचणीत टाकणे सयुक्तिक नव्हते. त्यामुळे ट्रकमधून माणसे नेण्यास परवानगी नाकारल्यामुळे माझ्या हातून काही अयोग्य घडले आहे असे मला वाटत नाही.

या समारंभाच्या बाबतीत द्विभाषिकाशी संबंध जोडला जाऊ लागला त्यावेळी या समारंभाचा द्विभाषिकाशी संबंध नाही असे स्पष्ट करण्यात आले होते व भारताच्या पंतप्रधानांनीही हे सांगितले होते. मी असेही म्हटले होते की, संयुक्त महाराष्ट्राबद्दल बोलण्याचा किंवा आंदोलन करण्याचा अधिकार समिती पक्षाला आहे, पण तो प्रसंग शिवस्मारकाच्या वेळी नसून इतर अनेक प्रसंगी ते निदर्शने करू शकतील. शिवाजी महाराज हे सगळ्यांचे मानाचे स्थान आहे, त्यावेळी आपण निदर्शने करणार नाही अशी समितीच्या नेत्यांनी भूमिका घेतली असती तर मी त्यांना निमंत्रण देण्यासाठी त्यांच्याकडे चालत गेलो असतो, पण त्यांनी निदर्शनाचा निर्णय घेतला होता. ही हकीकत मी अशासाठी सांगत आहे की, या प्रकरणी सरकारची पक्षपाताची दृष्टी नव्हती व त्या दृष्टीने ही बाब हाताळलेली नाही. प्रतापगडचा समारंभ झाल्यानंतर समिती विजयी झाली की काँग्रेस विजयी झाली हा माझ्यापुढे प्रश्न नाही. मी एकच गोष्ट सांगू शकेन की, यामध्ये समिती किंवा काँग्रेस विजयी झाली अशी परिस्थिती नसून शिवाजी महाराजांची पुण्याई अजूनही श्रेष्ठ आहे, किंबहुना वाढत आहे असे या प्रसंगी दिसून आले. त्यांच्या पुण्याईमुळे हा प्रसंग यशस्वीपणे पार पडला असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. शिवाजी महाराजांच्या पुण्याईपेक्षा आपली पुण्याई जास्त आहे असे समजणाऱ्यांना मात्र राग आलेला आहे. आपण स्वतःला प्रतिशिवाजी म्हणवून घेता असे **श्री.अत्रे**[१७] आताच म्हणाले.

प्रतिशिवाजी म्हणवून घेण्याइतका मी मूर्ख किंवा अहंकारी नाही. अनेक तपे तपश्चर्या करूनही ती योग्यता कोणाला प्राप्त होणार नाही. माझ्यावर करण्यात येणाऱ्या टीकेविषयी एवढेच म्हणावेसे वाटते की, या टीकेमुळे किंवा शिव्यांमुळे मी दुबळा होणार नाही. सरकारवर टीका करण्याचा विरोधकांना अधिकार आहे आणि त्यांनी टीका करीत राहावे, पण या प्रकरणी सरकारने पक्षपाती दृष्टी दाखविली ही टीका बरोबर नाही, एवढे म्हणावेसे मला वाटते. प्रस्तुत प्रकरणी पक्षीय वृत्ती मी डोळ्यासमोर ठेवलेली नव्हती, व इतरांनीही कृपा करून असल्या प्रसंगी पक्षीय राजकारण खेळू नये असे मला सूचवावेसे वाटते.

अध्यक्ष महाराज, जातीयवादी प्रचारासंबंधी मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. मी नम्रपणे म्हणू इच्छितो की, जातीयवाद विषासारखा आहे आणि तो पसरू नये या

दृष्टीने सर्वांनी सावधगिरी घेतली पाहिजे. ज्यामुळे जातीयवादला पोषक होईल अशी चूक होणार नाही, लोकांना शंकास्पद वाटेल असे कृत्य आपल्या हातून घडणार नाही, हे पाहाण्याची जबाबदारी सर्वांवर आहे. केवळ दुसरे लोक जातीयवादी प्रचार करतात, अमुक गृहस्थ करतात, तमुक गृहस्थ करतात, असे म्हणून भागणार नाही. या बाबतीतील आपली जबाबदारी प्रत्येकाने पार पाडली पाहिजे. जातीय पत्रके वाटण्यात आलेली आहेत ही गोष्ट खरी आहे, पण ती पब्लिसिटी व्हॅन्समधून वाटलेली आहेत की काय याविषयी मी चौकशी केली असताना अद्यापपर्यंत तसा निश्चित पुरावा हाती आलेला नाही, असे मी सांगू इच्छितो. पण हाती असलेल्या पुराव्यावरून ती पत्रके सरकारी मोटारीतून वाटलेली नाहीत असे म्हणण्यास हरकत नाही.

आतापर्यंत जी वस्तुस्थिती आहे ती मी सभागृहासमोर ठेवलेली आहे आणि मी आता सभागृहाला अशी विनंती करीन की, प्रतापगडाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांचा राष्ट्राकडून गौरव झालेला आहे, तेव्हा कृपा करून या प्रकरणी निर्माण झालेला राग व इतर भावना विसरून जाऊन शिवाजी महाराजांविषयी आदर आणि त्यांची स्तुती, तेवढ्याच गोष्टी मनामध्ये ठेवाव्या.

■ ■ ■

On 23rd December 1957, Shri Y.B.Chavan, Chief Minister said that Samyukta Maharashtra Samiti made two mistakes the first one being to protest against the Pratapgad celebrations and the second being to discuss it in the House. He mentioned that the Opposition Members' charge that the Government remembered Shivaji Maharaj all of a sudden was not true. The decision to install the statue of Shivaji Maharaj on Pratapgad was made after the meeting between Shri Mehatab and Shri Naik-Nimbalkar. He said that the Congress Party and the Government remembered Shivaji Maharaj at the most opportune time.

He added that it was no use ranking up old grievances and we should correct our mistakes. In the course of his speech he said that all the arrangements for the ceremony on Pratapgad could have been made with the consent of all. Of course, it did not strike him that this should be an all party function. If the Samiti had expressed its desire to participate in the function, he would have been glad to invite them; but all the while they followed the policy of non-co-operation and confrontation. He admitted that there was an element of communalism in the propaganda. He admitted that there was an element of communalism in the propaganda. He also stressed that the spread of poison of communalism would not be stopped simply by making speeches; efforts in that direction should be made by all. He observed that the common man feels it proper that a popularly respected Prime Minister like Pandit Nehru should pay tribute to Shivaji, who is respected by the people even after 300 years. Then he maintained that he was justified in allowing the Congress workers to travel in trucks on that day and not giving the same facility to the Samiti followers. He further said that he did not wish that they should demonstrate on Pratapgad that day. He added that the demonstrators were obstructed under section 36, at a convenient place. He further pointed out that this function had in no way any connection with the bilingual State.

He acknowledged the right of the Opposition to criticise the Government but it was not fair to say that the Government was partial in the matter.

# नागपूर व राजकोट येथे विधीमंडळ अधिवेशन घेण्याच्या प्रस्तावावर चर्चा *

## २६ फेब्रुवारी १९५८

*या चर्चेत भाग घेऊन मा. चव्हाण यांनी केलेले निवेदन.*

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद **श्री.सथ्था**[१८] यांनी नागपूर व राजकोट ह्या ठिकाणी अधिवेशन नेण्यासंबंधी जो ठराव मागील अधिवेशनात मांडला होता त्यावर मागे पुष्कळ चर्चा झाली आहे व ती आजही आपण करीत आहोत. उभय पक्षांनी आपापले म्हणणे मांडण्याचा ह्या ठिकाणी प्रयत्न केला आहे. ह्या बाबतीत सरकारची जी भूमिका आहे ती थोडक्या वेळात व थोडक्या शब्दात मी स्पष्ट करू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, हा ठराव सरकार स्वीकारू शकत नाही याचे कारण मी देणार आहे. नागपूरचा प्रश्न हा ज्या विरोधी पक्षाच्या माननीय सभासदांनी हा ठराव मांडला आणि ज्या विरोधी पक्षाच्या इतर माननीय सभासदांनी त्याचा पाठपुरावा केला त्यांना जितका जिव्हाळ्याचा वाटतो तितकाच किंबहुना त्यापेक्षाही अधिक प्रमाणात आम्हाला जिव्हाळ्याचा वाटतो. जिव्हाळा अशासाठी वाटतो की, राजधानी म्हणून नागपूर शहराचे जे महत्व हाते ते आज राहिलेले नसल्यामुळे तेथील लोकांना वाईट वाटत आहे. परंतु गेल्या ५-१० वर्षांत या देशामध्ये जी स्थित्यंतरे झाली त्याकडे आपण वळून पाहिले तर या देशामध्ये अनेक राजधानी असलेली गावे होती आणि राष्ट्राचे एकसंधीकरण करीत असताना या राजधान्या कमी कमी होत गेल्या आहेत असे आपल्याला दिसून येईल. एकात्मता निर्माण होण्याच्या दृष्टीने राजधान्या कमी होणे हे एक प्रकारे योग्य लक्षण मानले पाहिजे असे मला वाटते. याचा अर्थ नागपूरची राजधानी गेली याचा मला आनंद होतो असा नव्हे. परंतु अध्यक्ष महाराज, मला या बाबतीत एका गोष्टीचा खुलासा करावयाचा आहे.

* (Bombay Legislative Assembly Debates, Vol.5, Part II (Inside No.8), February-March 1958, 26th February 1958, pp. 408 to 412.)

नागपूर कराराबाबत माझे मित्र माननीय **श्री.बर्धन**[११] यांनी आपल्या वक्तृत्वपूर्ण शैलीमध्ये मला एक सवाल टाकला आहे. नागपूर करारावर सह्या करणाऱ्यांमध्ये मी एक होतो ही गोष्ट खरी आहे. परंतु त्यावेळी ज्या भूमिकेवरून या प्रश्नांचा विचार झाला ती भूमिका आपण लक्षात घेतली पाहिजे. त्या विशिष्ट पॅरेग्राफमध्ये जे शब्द घातले आहेत त्यामध्ये उपराजधानीची कल्पना नव्हती. नागपूरच्या वैभवाबाबत तेथील जनतेच्या ज्या भावना होत्या त्यांच्याशी आणि एक राज्य चालविण्याच्या कल्पनेशी सुसंगत अशी ती भूमिका होती. नागपूर शहराचा राज्यकारभाराशी संबंध असावा एवढीच भूमिका त्यामध्ये होती. नागपूर शहर आणि आजूबाजूची जनता यांचा राज्यकारभाराशी निकटचा संबंध असावा याबाबतीत दुमत असण्याचे कारण नाही. नागपूरच्या लोकांच्या भावना मी समजू शकतो. प्रत्येक शहराचे काही अभिमान आणि अहंकार असतात. परंतु ते अभिमान आणि अहंकार चेतवून त्यावर फुंकर घालण्याने प्रारंभ चांगला वाटेल, परंतु त्याचा शेवट मात्र चांगला होणार नाही. हा ठराव येण्यापूर्वीही मी हेच म्हटले होते. वास्तविक, शहराचे महत्त्व ते शहर राजधानी असण्यावरच अवलंबून नाही ही गोष्ट आपण तेथील लोकांना समजावून सांगितली पाहिजे. राजधानीमुळे शहराला एक प्रकारचे वैभव असते, शोभा असते, ही गोष्ट खरी आहे, परंतु एवढ्या एका गोष्टीवरून शहराचे महत्त्व ठरविता येत नाही. माझे सन्माननीय मित्र श्री.एस्.एम्.जोशी यांनी ज्या एका गोष्टीवर भर दिला ती बरोबर आहे. राजधानीमध्ये गव्हर्नर राहतो, मंत्री राहतात, मुख्यमंत्री रोज दिसतात, प्रवास करावा न लागता विधानसभेतील कामकाज ऐकावयाला मिळते. मोर्चे आणता येतात. जनतेला मोर्चे आणण्याचा अधिकार आहे. मोर्चाला भेटण्यामध्ये मला आनंदच वाटतो. लोकशाहीच्या दृष्टीने मोर्चा आणणे गैर नसेल तर माझी त्याला हरकत नाही पण मोर्चा आणण्याची सोय होते म्हणून अमुक ठिकाणी राजधानी हवी असे म्हणणे असेल तर गावोगावी राजधानी नेली पाहिजे. तसे म्हटले तर नागपूरच्या आणि मुंबई शहराच्याच लोकांना हा फायदा का? आदिवासी खेड्यात आणि वाडीत देखील राजधानी नेली पाहिजे. तेव्हा मोर्चे आणता येतात म्हणून अमुक ठिकाणी राजधानी किंवा अधिवेशन ठेवा असे म्हणण्यात काही अर्थ नाही. (शहराचे खरे महत्त्व शहराच्या आर्थिक समस्या सोडविण्यावर आणि शहराचे आर्थिक सामर्थ्य वाढविण्यावर अवलंबून आहे. आम्हाला नागपूरचे महत्त्व कायम ठेवावयाचे असेल तर नागपूरचा व्यापार, नागपूरचे धंदे, तेथील औद्योगीकरण या गोष्टी कशा वाढीस लागतील या दृष्टीने आपण प्रयत्न केला पाहिजे.) नागपूरच्या प्रश्नाकडे सरकार या दृष्टिकोनातूनच पाहत आहे आणि, अध्यक्ष महाराज, या सभागृहामार्फत मी नागपूरच्या जनतेला असे आश्वासन देतो की, नागपूरच्या

अभिवृद्धीसाठी, औद्योगीकरणासाठी, व्यापार वृद्धीसाठी आपल्या हातात जेवढे करणे शक्य असेल तेवढे करावयाला हे सरकार बांधले गेले आहे आणि सरकार त्याप्रमाणे जरूर करील.

अध्यक्ष महाराज, नागपूरचा प्रश्न हा तेथील लोकांना भावनेचा प्रश्न वाटतो याची मला जाणीव आहे. परंतु त्या ठिकाणी एक अधिवेशन भरविण्यामुळे तो प्रश्न सुटणार नाही. आपल्याला हे माहीत आहे की, आपली जी सार्वभौम लोकसभा आहे तिची सर्व अधिवेशने दिल्लीसच भरविली जातात. पूर्वी उन्हाळ्यात अधिवेशन सिमल्यास भरविले जात असे. परंतु त्यावेळी राज्यकर्त्यांच्या चुकीच्या कल्पना होत्या. हवामानाच्या सोईनुसार राजधानी बदलावयाची अशी त्या वेळच्या राज्यकर्त्यांची वृत्ती होती. याच दृष्टीकोनातून मुंबई राज्याचे एक अधिवेशन पुण्यास भरविले जात असे परंतु ती प्रथा आता बंद करण्यात आली आहे. याचा अर्थ पुण्याचे महत्त्व कमी झाले असा होत नाही. अधिवेशन भरविण्याचा आणि शहराच्या महत्त्वाचा फारसा अन्योन्य संबंध नाही. ज्या ठिकाणी लोकप्रतिनिधींना चांगल्या प्रकारे आपली कामे करता येतील अशा ठिकाणी अधिवेशन भरविले जाते की नाही, त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी अधिवेशन भरविले जाते त्या ठिकाणी सरकारी सभासद जनतेच्या प्रतिनिधींना योग्य रीतीने जाब देऊ शकतील की नाही, जनतेची सेवाचाकरी चांगल्या प्रकारे करू शकतील की नाही, हे अधिवेशन कोणत्या ठिकाणी भरावयाचे हे ठरविण्याचे गमक असले पाहिजे. या दृष्टीकोनातून विचार केला तर एकापेक्षा अधिक ठिकाणी अधिवेशन भरविण्याची कल्पना चुकीची आहे असे आपल्याला आढळून येईल. अध्यक्ष महाराज, नागपूरला आणि राजकोटला विधानसभेचे अधिवेशन घेण्याचे ठरविले तर आपली जी कचेरी आहे ती वर्षातून तीन वेळा फिरवावी लागेल आणि त्यामुळे कचेरीची कार्यक्षमताही कमी होऊ शकेल. विरोधी पक्षाचे माननीय नेते **श्री.उद्धवराव**[२०] यांनी मला विचारले की, नागपूरसाठी तुम्ही काय करणार आहात? याचे उत्तर मी योग्य वेळी देणार आहे, आता नाही. त्यांचा प्रश्न मात्र योग्य आहे आणि त्याला उत्तर देणेही आवश्यक आहे आणि ते दिलेही जाईल एवढे मी त्यांना सांगतो. परंतु नागपूरला अधिवेशन घेतले नाही तर नागपूरचे महत्त्व कमी होईल अशी भीती त्यांनी बाळगण्याचे कारण नाही. कदाचित् विरोधी पक्षालाही ही कल्पना मान्य होईल, परंतु माझे मित्र **श्री.वैराळे**[२१] म्हणतात त्याप्रमाणे नागपूरच्या लोकांच्या भावना जाणणारे आम्ही आहोत आणि त्यांना आम्ही अधिक जवळचे आहोत हे दाखविण्यासाठीच या ठरावाचा उपयोग विरोधी पक्षाला करून घ्यावयाचा असेल तर त्यांनी तसा जरूर करून घ्यावा. माझे

काही म्हणणे नाही. परंतु नागपूरला अधिवेशन घेण्यामुळे नागपूरचा प्रश्न सुटणार नाही हे मी या ठिकाणी स्पष्ट करू चाहतो. नागपूर शहराचे आर्थिक आणि व्यापारविषयक प्रश्न सोडविता आले तर नागपूरचे महत्त्व कोणीही कमी करू शकणार नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नागपूरला भूगोलानेच एक महत्त्वाचे असे स्थान दिले आहे. भारताच्या केंद्रस्थानी ते वसलेले आहे. नागपूर शहराला नैसर्गिक दृष्ट्या हे जे भौगोलिक महत्त्व प्राप्त झाले आहे ते तर कोणीच हिरावून घेऊ शकत नाही, मग ते शहर राजधानी असो वा नसो.

या महत्त्वाच्या गोष्टी आपण समजून घेतल्या आणि नागपूरच्या जनतेला त्या पटविण्याचा प्रयत्न केला तर तेथील जनतेलाही अधिवेशन भरविण्याचे महत्त्व वाटणार नाही. नागपूरचे महत्त्व आम्ही मानतो की नाही हे आम्ही अधिवेशन भरविण्याला मान्यता देतो की नाही यावर निर्भर ठेवून जनतेचा खोटा समज करून देण्यापेक्षा अधिवेशन ही महत्त्वाची गोष्ट नाही, बाकीचे जे प्रश्न मी सांगितले ते महत्त्वाचे आहेत. या विचारसरणीला प्राधान्य देऊन ते प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने स्वतःला आम्ही बांधून घेतले आहे आणि त्या दिशेने आम्ही खटपटही करणार आहोत. अशा परिस्थितीत सभागृहासमोर असलेला ठराव मला स्वीकारता येत नाही असे मी नम्रपणे सांगतो. नागपूरच्या कल्याणाचा हा प्रश्न नाही, कारभाराचा हा प्रश्न नाही आणि कोणाचा अभिमान किंवा भावना दुखविण्याचा हा प्रश्न नाही. नागपूरची राजधानी हलल्यामुळे नागपूरकरांच्या भावना दुखविल्या गेल्या आहेत हे मी जाणतो. परंतु अध्यक्ष महाराज, या ठरावाच्या निमित्ताने मी या सभागृहाला हे सांगू इच्छितो की, शासकीय दृष्ट्या नागपूरला महत्त्व प्राप्त व्हावे या दृष्टीने भारत सरकारने आपल्या काही कचेऱ्या नागपूरला नेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्या कचेऱ्यांकरिता त्यांनी काही जागा मागितल्या असून मुंबई सरकारने त्या जागा त्यांच्या ताब्यात देण्याचा निर्णय घेतला आहे आणि हिंदुस्थान सरकारला अधिकृतरीत्या तसे कळविण्यातही आले आहे. अशा रीतीने हिंदुस्थान सरकारच्या काही महत्त्वाच्या कचेऱ्या नागपूरला येणार असल्याने नागपूरचे महत्त्व कायम राहण्यास पुष्कळ मदत होणार आहे. भौगोलिक दृष्ट्या नागपूरला जे केंद्रीय स्थान प्राप्त झाले आहे त्यामुळे नागपूरला स्वाभाविकपणे आणि आपोआपच महत्त्व येण्याखेरीज गत्यंतर नाही. अर्थात् एखाद्या ठिकाणी राजधानी असल्यामुळे त्या ठिकाणाला जे एक विशिष्ट वैभव किंवा दिमाख प्राप्त होतो तो नागपूरला लाभणार नाही ही गोष्ट खरी आहे आणि त्यामुळे काही लोकांच्या मनात नाराजी निर्माण होणे शक्य आहे. पण त्या नाराजीला भिऊन चालणार नाही. अशा

तऱ्हेने कोणाच्या नाराजीला भिऊन विधानसभेची अधिवेशने गावोगाव भरविण्याचे सरकारने ठरविले तर त्यामधून अनेक शहरांचे प्रश्न निर्माण होतील. उद्या औरंगाबादचे लोकही म्हणतील की औरंगाबादलाही विधानसभेचे अधिवेशन भरविण्यात यावे. त्यांना जर आम्ही म्हटले की पूर्वी राजधानी तुमच्या येथे नव्हती म्हणून तुमच्या येथे अधिवेशन भरविता येत नाही, तर मराठवाड्यातील लोकांना राग येईल. कारण प्रत्येकाला आपापल्या भागाबद्दल अभिमान वाटत असतो. पण मी अशा तऱ्हेच्या भावनेला उत्तेजन देऊ इच्छित नाही. एखाद्या ठिकाणी केवळ विधानसभेचे अधिवेशन भरविल्याने त्या ठिकाणाला महत्त्व प्राप्त होते असे मी मानीत नाही आणि म्हणून नागपूरला विधानसभेचे अधिवेशन न देण्यामध्ये त्या शहराचे महत्त्व कमी करावे असा माझा मुळीच उद्देश नाही. वस्तुतः नागपूरला विधानसभेचे अधिवेशन भरविण्याने त्याच्या महत्त्वात काही विशेष भर पडणार आहे असे नाही. उलट, अशा तऱ्हेने भिन्न भिन्न ठिकाणी अधिवेशने भरविण्याने राज्यकारभारात मात्र अनिश्चितता, अव्यवस्था आणि अकार्यक्षमता निर्माण होण्याची भीती असल्यामुळे या ठरावाला सरकारला मान्यता देता येत नाही असे सांगणे माझे कर्तव्य आहे.

अध्यक्ष महाराज, या ठरावातील चर्चेच्या ओघात इतरही जे काही मुद्दे उपस्थित करण्यात आले त्यांना उत्तर देण्याची आवश्यकता मला वाटत नाही. फक्त सन्माननीय सभासद श्री.एस्.एम्.जोशी यांनी आपल्या भाषणात ज्या एका गोष्टीचा उल्लेख केला ती बाबत मात्र मी खुलासा करू इच्छितो. श्री.जोशी हे नागपूरला गेले असताना त्यांना तेथे काळे झेंडे दाखविण्यात आले आणि महात्मा गांधींच्या हत्येसंबंधात काही अनुचित घोषणाही करण्यात आल्या ही खेदाची गोष्ट आहे. याबाबतीत श्री.जोशी यांनी जे विचार व्यक्त केले त्यांच्याशी मी सहमत आहे. कारण आम्ही या पक्षाचे लोक असे मानीत नाही की, एखाद्या व्यक्तीने जर एखादी अनुचित गोष्ट केली तर तीबद्दल सबंध जमातीला, समाजाला किंवा प्रांताला जबाबदार धरण्यात यावे, पण काळे झेंडे ही गोष्टच अशी आहे की ते हातात आल्याबरोबर मनात पाप यावयाला लागते. काळे झेंडे दाखविण्यावर आम्ही कधी विश्वास ठेवला नाही किंवा काळ्या झेंड्यांना आम्ही भितो असेही नाही. परंतु काळे झेंडे हातात आल्याबरोबर मनात काळे विचार येतात म्हणून काळे झेंडे दाखविण्यावर बंदी घातली पाहिजे. असो एखाद्या व्यक्तीच्या कृत्याबद्दल सबंध समाजाला, जमातीला किंवा प्रांताला जबाबदार धरणे योग्य होणार नाही असे जे श्री.जोशी यांनी सांगितले त्याबाबतीत त्यांच्याशी माझे एकमत आहे.

■ ■ ■

On 26th February 1958, Chief Minister, Shri Chavan, rejected the resolution proposing Legislature Sessions, at Nagpur and Rajkot. He agreed that Nagpur people felt aggrieved because Nagpur did not have the old status of a Capital. Admitting that he was a party to the Nagpur pact, he said that at that time the concept of Nagpur as the second Capital did not arise; it was confined only to the point that Nagpur should have some connection with the administration. He further said that if we want to retain the importance of Nagpur, we must solve its economic and industrial problems and the Government was pledged to do so.

# अकोला येथे झालेल्या लाठीमारावर चर्चा*

**१० मार्च १९५८**

*चर्चेस मा. यशवंतराव चव्हाणांनी दिलेले उत्तर.*

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद श्री. बर्धन यांनी अकोला येथे झालेल्या लाठीमारासंबंधी जी चर्चा सुरू केली त्या चर्चेतील सर्व भाषणे मी अतिशय काळजीपूर्वक ऐकली. सन्माननीय सभासद श्री बर्धन हे आपले भाषण करताना सारखे सांगत होते की, ते अत्यंत जबाबदारीने बोलत आहेत. तसे त्यांनी खरोखर केले असते तर बरे झाले असते, असे मला म्हणावयाचे आहे. कारण आपल्या भाषणात त्यांनी केलेली पुष्कळशी विधाने खरी आहेत असे मानावयाला मी तयार नाही. ज्या दिवशी लाठीमार झाला त्या दिवशी श्री.बर्धन आणि विरोधी पक्षाचे नेते श्री. उद्धवराव पाटील हे माझ्याकडे आले होते. अकोल्याला लाठीमार झाला असल्याचे त्यांनी मला सांगितले आणि त्याचबरोबर त्या लाठीमाराच्या चौकशीचीदेखील त्यांनी मागणी केली. अध्यक्ष महाराज, अकोल्याला लाठीहल्ला झाल्याची माहिती इतक्या तातडीने विरोधी पक्षाचे नेते श्री. उद्धवराव पाटील आणि सन्माननीय सभासद श्री बर्धन यांनाच प्रथम टेलिफोनने मिळते ही घटना लक्षात घेण्यासारखी आहे, असे मला नम्रपणे या सभागृहाला सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महाराज, ऑक्ट्रॉय कराचा जो प्रश्न आहे त्यासंबंधीचा इतिहास लांबलचक आहे. हा कर आवश्यक आहे की अनावश्यक आहे या चर्चेत मी जाऊ इच्छित नाही

* Bombay Legislative Assembly Debates, Vol.5,Part II (Inside No.16), February-March 1958, 10th March 1958,pp.781 to 786.

पण या चर्चेच्या अनुषंगाने काही गोष्टींचा उल्लेख करणे आवश्यक आहे म्हणून मी करणार आहे. ह्या प्रश्नासंबंधी विरोधी पक्षाची व ऑक्ट्रॉय कर विरोधी परिषदेची काही मंडळी मला भेटली होती. त्यावेळी त्यांच्यापुढे ही गोष्ट स्पष्टपणे मांडण्यात आली होती की, ह्या प्रश्नाचा निर्णय लोकमताने निवडलेल्या नगरपालिकेच्या संमतीने करावयाचा आहे. तथापि ऑक्ट्रॉय कराला आमचा विरोध नाही किंबहुना आमचा असा अनुभव आहे की, ह्या राज्यातील बहुतेक नगरपालिकांचे उत्पन्न जास्तीत जास्त ऑक्ट्रॉय कराचे असते. काही व्यापारी मंडळींना ही गोष्ट नापसंत होती. ३ तारखेला जी गोष्ट घडली तिच्यामागे थोडा इतिहास आहे. ही गोष्ट घडली त्यापूर्वी ८ दिवस जे प्रकार घडले ते लक्षात घेता पोलिसांना अन्याय करावयाचा होता किंवा भांडणे करावयाची होती तर ती पूर्वीच करता आली असती. सन्माननीय सभासद श्री. उद्धवराव पाटील आणि सन्माननीय सभासद श्री. बर्धन यांनी आपल्या भाषणामध्ये असे सांगितले की तेथे पाच-पाच हजार माणसांची या कराविरुद्ध मिरवणूक निघत होती व ते सभा घेत होते. तेथे बंदी हुकूम असताना परवानगी दिल्यामुळेच मिरवणुका निघत होत्या व सभा भरत होत्या तर मग ३ तारखेला हा प्रकार का घडला ? पहिले आठ दिवस जे प्रकार चालले होते ते ३ तारखेला काहीतरी विशिष्ट घडावे म्हणून चालले होते. ३ तारखेला काय घडले हे मी सन्माननीय सभागृहाला सांगू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, ३ तारखेला सकाळी ह्या ऑक्ट्रॉय कराचे शेड्यूल तयार करण्यासाठी नगरपालिकेची सभा भरली होती. ह्या वेळी ऑक्ट्रॉय कर विरोधी चळवळ करणारांची अशी अपेक्षा होती की, आपण बहिष्कार टाकून, हरताळ पाडून लोकांना त्रास दिलेला आहे तेव्हा त्याचा परिणाम काही लोकांवर होऊन हे शेड्यूल मंजूर होणार नाही. अध्यक्ष महाराज, लोकमत व्यक्त करण्यासाठी आपल्या घटनेमध्ये तरतूद करून ठेवली आहे. त्याप्रमाणे लोकमत व्यक्त करण्याची योग्य पद्धत असताना लोकमताने नियुक्त झालेल्या म्युनिसिपालिटीच्या सभेत सर्व सभासद चर्चा करण्यासाठी बसले असताना सत्याग्रह करण्याकरिता एक गृहस्थ पूर्वीच तेथे येऊन बसतात आणि तेथे बसून आम्ही उपवास करणार असे जाहीर करून सांगतात. अध्यक्ष महाराज, आपल्या ह्या सभागृहामध्ये असे केले तर काय होईल ? मी असे म्हणतो की, एखादा निर्णय चुकीचा असला तर तो अमान्य आहे असे जाहीर करण्याचा हक्क सर्वांना आहे, पण त्यासाठी असे प्रकार करणे इष्ट नाही. सन्माननीय सभासद श्री.बर्धन यांनी सांगितले की त्या ठिकाणी २०० ते ३०० लोक होते व त्यांना हाकलण्यात आले. येथे जर असा प्रकार झाला तर गृहमंत्री या नात्याने पोलिसांना मी काय सांगणार ? जेथे लोकमताने

निवडून आलेले सभासद निर्णय घेतात त्या ठिकाणी काही शहाण्या लोकांनी उपवास करावा आणि त्यांना निर्णय घेऊ नये व पोलिसांनी हे सर्व मुकाट्याने पाहावे ह्या म्हणण्यात काय अर्थ आहे ? २०० ते ३०० माणसे तेथे शिरत होती व म्हणून हा प्रकार घडला ही गोष्ट उघड झालेली आहे.

येथे श्रावण भरड यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला. अध्यक्ष महाराज, श्रावण भरड यांना काही मंडळींनी अन्नधान्याची पोती आणण्यास बंदी केली आणि लोकांचा ऑक्ट्रॉय कराला जो विरोध होता त्याचा फायदा घेण्याचे ठरविले. म्युनिसिपालिटीमध्ये त्यावेळी ह्या कराराबाबत विरोध निर्माण झाला होता आणि म्युनिसिपालिटीतर्फे हे गृहस्थ अन्नधान्य आणीत होते, त्यावेळी त्या दोन गृहस्थांची व त्यांची बाचाबाची होऊन मारामारी झाली व पोलिसांनी त्या दोघांवर खटले भरले आहेत. सन्माननीय सभासद श्री. उद्धवराव पाटील यांनी सांगितले की त्यांच्यावर खटला भरला नाही. मला त्यांना सांगावयाचे आहे की, काही हितसंबंधी माणसांनी त्यांना चुकीची माहिती दिलेली आहे, तेव्हा कृपा करून त्यांनी अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करावा. अध्यक्ष महाराज, आपल्या माहितीसाठी मी असे सांगू इच्छितो की, त्या दोन्ही इसमांवर खटला भरला आहे. सभा संपल्यानंतर हा मनुष्य धान्याची पोती घेऊन चालला होता, त्यातील २ पोती खाली पाडून फोडली तेव्हा स्वाभाविकपणे गडबड होण्याचा संभव आहे म्हणून शक्य आहे की त्याने काठी घेतली आणि मारली. अशी एकंदर परिस्थिती आहे व याचा म्युनिसिपल सभेशी कांहीही संबंध नाही असे मला सांगावयाचे आहे.

अध्यक्ष महाराज, सव्वादहा ते साडेदहाच्या सुमाराला नगरपालिकेने ऑक्ट्रॉय करासंबंधी आपला निर्णय घेतला आणि ऑक्ट्रॉय विरोधी समितीच्या कार्यकर्त्यांना व त्यांच्या नेत्यांना हा निर्णय कळला तेव्हा त्यांनी एक प्रकारचा लढा सुरू करण्याचे ठरविले. आम्ही ह्या कराविरुद्ध आमचे विचार मांडीत असताना म्युनिसिपालिटीने ह्या बाबतीत निकाल घेतला म्हणून व्यापारी लोक, त्यांचे नोकर, हमाल व इतर काही मंडळी यांचे जथेच्या जथे तेथे पाठवून ४ ते ५ हजार माणसांच्या समूहाने नगरपालिकेला वेढा दिला. नगरपालिकेचे कांही सभासद बाहेर पडले होते, पण अध्यक्ष व इतर काही सभासद तेथे होते. साडेदहाच्या सुमाराला ज्यावेळी नगरपालिकेला लोकांनी वेढा दिला त्यावेळी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व पोलिस ऑफिसर्स १०० यार्डावर बसले होते. ते तेथे आले व त्यांनी प्रत्यक्ष परिस्थिती पाहून तिचा ताबा घेतला. त्या ठिकाणी जी ४-५ हजार मंडळी जमली होती त्यांनी निरनिराळ्या प्रकारच्या घोषणा करण्यास

सुरूवात केली व त्यापैकी एक घोषणा अशी होती की, ''जनता कर रही है पुकार, विनायक पराशरको कर दो ठार''. तसेच त्यांनी दगडाचा मारा चारी बाजूंनी सुरू केला होता. अध्यक्ष महाराज, अशा परिथितीतही डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी विरोधी पक्षाची मदत घेऊन लोकांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला. एका ठिकाणी लाउुड स्पीकरच्या सहाय्याने लोकांना निघून जा म्हणून सांगण्याचा प्रयत्न केला, पण लोक ऐकेनात तेव्हा त्यांना १४४ कलम जाहीर करावे लागले. येथे १४४ कलम लागू केले असे सांगण्याचा प्रयत्न त्यांनी लाअुड स्पीकरच्या साहाय्याने केला, परंतु लोक पांगले नाहीत. म्युनिसिपालिटीच्या रेकॉर्ड्सची नासाडी होईल व कोणाच्या प्राणावर संकट कोसळेल म्हणून त्यांनी ही दक्षता घेतली होती. पण लोकांना कोण चेतना देत होते हे कळत नव्हते, मात्र लोकांचे जथेच्या जथे तेथे होते. अध्यक्ष महाराज, अशा परिस्थितीत दोन वेळा १४४ कलम जाहीर केल्याचा इशारा देऊन व माहिती देऊनही लोक हलले तर नाहीतच उलट, त्यांनी दगडांचा वर्षाव करण्यास सुरवात केली. तेव्हा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी दोनदा इशारा देऊन मग लाठीहल्ला करण्याचा हुकूम दिला.

त्या ठिकाणी बायका-मुले होती व त्यांना मार बसला हे जे वर्णन केले ते चुकीचे आहे. सकाळी ८ वाजल्यापासून ६ तास हा गोंधळ चालू होता, अशा परिस्थितीत त्या ठिकाणी मुले व बायका येऊ शकल्या असत्या काय ? काही मुलांना आणि बायकांना मारण्यात आले असे वर्णन या ठिकाणी करण्यात आले. परंतु ही गोष्ट खरी नाही. कोणत्याही बाईला किंवा मुलाला मारण्यात आलेले नाही, किंवा कोणत्याही बाईला किंवा मुलाला जखम झालेली नाही, अशी माझी माहिती आहे. माननीय श्री बर्धन यांनी **श्री. ब्रिजलाल बियाणी**[२१] यांच्या वर्तमानपत्राचा आणि नागपूरच्या दुसऱ्या एका वर्तमानपत्राचा उल्लेख या ठिकाणी केला. आपली बाजू बळकट करण्यासाठी माननीय श्री बर्धन यांनी श्री. बियाणी यांच्या वर्तमानपत्राचा जो उपयोग केला तो पाहून त्यांचा हा प्रयत्न म्हणजे एक अस्वाभाविक विवाह आहे असे मला म्हणावेसे वाटते. हा विवाह फार दिवस टिकणारा नाही.

अध्यक्ष महाराज, या बाबतीत माझे असे स्वच्छ मत आहे की, ऑक्ट्रॉय करामुळे अकोला येथील व्यापाऱ्यांच्या मनात जी नाराजी निर्माण झाली त्याचा आपल्या राजकीय हेतूसाठी काही लोकांनी गैरफायदा घेऊन अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. नगरपालिकेची सभा झाली त्यापूर्वी पाच-सहा दिवस एकसारखे दंग्याधोप्याचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न काही लोकांकडून झाला आणि सातव्या दिवशी नगरपालिकेची मीटिंग बंद पाडण्याचे प्रयत्न चालू करण्यात आले.

किंबहुना पोलीस फायरिंग कसे करीत नाहीत हे आम्ही पाहतो अशी भाषाही बोलली जात होती.

अध्यक्ष महाराज, या ठिकाणी सत्याच्या नावाखाली असत्य सांगितले गेले. मी सत्य सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. हा सर्व प्रश्न राजकीय दृष्टिकोनातून हाताळण्याचा जो प्रयत्न होत आहे तो पाहून मला खेद होतो. नगरपालिका ही एक लोकशाही पद्धतीने आणि लोकमताने स्थापन झालेली संस्था आहे. निर्णय घेण्याचा अधिकार या संस्थेला आहे. अशा परिस्थितीत ऑक्ट्रॉय करासंबंधीचे आपले म्हणणे विशिष्ट पद्धतीने मांडावयाला हरकत नसावी. परंतु ते मांडल्यानंतर निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य नगरपालिकेला असले पाहिजे. त्या संस्थेवर अशा रीतीने दडपण आणण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष करणार असतील तर लोकशाहीचे संरक्षण कसे होईल हे कळत नाही. लोकशाहीविरोधी कृत्यांना आळा घालणे हे पोलिसांचे कामच आहे. परंतु लोकशाही विरोधी चळवळीचा बंदोबस्त करण्याची पोलिसांमधील हिम्मत कमी करण्याचा प्रयत्न काही राजकीय पक्षांकडून होतो. लाठीमार झाला याबद्दल कोणालाही खेदच होईल. मला स्वतःलादेखील त्याचे दुःख होते.

जखमी झालेल्या माणसांची नावे मी आणलेली आहेत. त्यामध्ये पोलीस सोडून ५९ माणसांना जखमा झाल्या आहेत. एकूण ३६ पोलीस अधिकारी आणि पोलीस जखमी झाले. जखमी झालेल्या ५९ माणसांपैकी ५ माणसांना फ्रॅक्चर्स झाली आहेत. त्यातील चार फ्रॅक्चर्स हाताच्या बोटांची आहेत. एकाच्या बोटाचे फ्रॅक्चर लाठीमाराचे नसून पळण्याच्या धांदलीत जमिनीवर पडल्यामुळे ते मोडले असले पाहिजे असा अभिप्राय डॉक्टरनी दिला आहे. इन्डिस्क्रिमिनेट फायरिंग केले जाते असा आमच्यावर नेहमी आरोप केला जातो. याबाबतीत शक्य तितकी दक्षता घेतली जावी म्हणून १०० यार्डाच्या पलीकडे लोकांना उभे करण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. तथापि लोक गल्ल्यांमध्ये बसून राहत होते आणि चढाई किंवा हल्ले करण्याचा प्रयत्न करीत होते. पोलिसांना लाठीमार किंवा गोळीबार करावयाला भागच पाडावयाचे अशी काही लोकांची योजना होती. नगरपालिकेला वेढा देवून जी माणसे उभी होती त्यांना बाजूला करण्यासाठी पोलिसांनी प्रथम टीअरगॅसचा उपयोग केला. गंभीर परिस्थिती निर्माण होऊ नये या दृष्टीनेच टीअरगॅसचे साधन पोलिसांना देण्यात आले होते आणि परिस्थिती पाहून त्यांनी ते वापरले. टीअरगॅसचा उपयोगदेखील पनिशमेंट म्हणून करण्यात आला नाही. केवळ प्रिव्हेन्टिव्ह मेझर म्हणूनच करण्यात आला. तथापि या प्रिव्हेन्टिव्ह मेझरचा जेव्हा उपयोग होईना आणि लोक गल्ल्यागल्ल्यांतून गनिमी काव्यासारखे दगडफेक

करून पोलिसांवर हल्ले करू लागले तेव्हा पोलिसांना लाठीमार करणे भाग पडले. ऑक्ट्रॉय कराचा विचार करण्यासाठी नगरपालिकेची सभा होणार होती त्या दिवसापूर्वीपासून पाच-सहा दिवस सभा भरवून, मिरवणुका काढून आणि घोषणा करून ऑक्ट्रॉय करविरोधी समितीने आपला निषेध व्यक्त केला होता. नगरपालिकेच्या सभासदांनी हा निषेध ऐकला होता, आणि तो विचारात घेऊन या कराबद्दलचा निर्णय ते घेणार होते. अशा परिस्थितीत निर्णय घेण्यासाठी नगरपालिकेचे लोकनियुक्त सभासद नगरपालिकेच्या सभागृहात जमले असताना आणि लोकशाही मार्गाने ते निर्णय घेणार असताना त्या ठिकाणी जमून सत्याग्रहाचे किंवा दगडफेकीचे वातावरण निर्माण करणे हे लोकशाहीला धरून आहे असे ज्यांना वाटत असेल त्यांना तसे वाटो, परंतु हे सरकार या राज्यात अशी कृत्ये कधीही चालू देणार नाही हे मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगतो. या राज्यात किंवा या देशात पोलिसांच्या हाती जे शस्त्र दिले आहे ते लोकशाहीचे संरक्षण करण्यासाठी दिले आहे आणि लोकशाहीविरोधी किंवा लोकशाहीचा खून करणारी कृत्ये जर या राज्यात होऊ लागली तर या शस्त्रांचा उपयोग करण्यास सरकार मागेपुढे पाहणार नाही. कोठेही आणि कोणत्याही प्रकारचे अडथळे निर्माण करण्याचे आणि कोठेही घुसण्याचे स्वातंत्र्य असावे हा लोकशाहीचा अर्थ असेल तर मग पोलिसांची आवश्यकता काय ? अकोल्यामध्ये परिस्थितीची दखल घेऊन पोलिसांनी जे केले ते केले नसते तर ते आपल्या कर्तव्याला चुकले असे झाले असते. त्या ठिकाणी पोलिसांनी आपली जबाबदारी पार पाडली आहे असे मला वाटते.

अध्यक्ष महाराज, दुसरी गोष्ट अशी की, त्या ठिकाणी हजर असलेल्या प्रमुख अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यानंतर शांततेला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे याची खात्री पटल्यानंतरच लाठीमाराचा हुकूम दिला. यामध्ये नगरपालिकेच्या लोकशाही अधिकारांचे रक्षण व्हावे ही भावना होती. त्यामुळे जे काही त्या ठिकाणी पोलिसांना करावे लागले ते लोकशाहीच्या संरक्षणासाठीच करावे लागले असल्यामुळे विरोधी पक्षाची टीका मी स्वीकारू शकत नाही. कोणताही लहानसहान प्रश्न निर्माण झाला की चौकशी झाली पाहिजे अशी हाकाटी केली जाते. चौकशी करण्यायोग्य गोष्ट असेल तर चौकशी जरूर झाली पाहिजे. परंतु या प्रकरणाची मी व्यक्तिशः लक्ष घालून माहिती घेण्याचा प्रयत्न केला आणि त्या माहितीवरून मी असे खात्रीपूर्वक सांगू शकतो की या सर्व घटनेमध्ये पोलिसांकडून कोणतीही चूक झालेली नाही. या सर्व दुर्घटनेला जबाबदार कोण असतील तर ही करविरोधी चळवळ ज्यांनी चुकीच्या मार्गांनी केली ते नेते याला जबाबदार आहेत. सरकार याला मुळीच

जबाबदार नाही. या दुर्घटनेमध्ये ज्यांना मार खावा लागला त्यांना त्याचा जाब विचारायचा असेल तर त्यांनी या नेत्यांना तो विचारावा असे मी म्हणेन.

लोकशाही चळवळीला सरकारचा विरोध नाही आणि त्यामध्ये पोलीस अडथळेही आणणार नाहीत. आपण ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की एकसारख्या सात दिवस सभा होत होत्या. मिरवणुका काढल्या जात होत्या, घोषणा होत होत्या, परंतु पोलिसांनी त्यामध्ये व्यत्यय आणला नाही. उलट, या चळवळीमध्ये कोणीही अडथळे आणू नयेत या दृष्टीने त्यांना मदत केली. याचा अर्थच असा की, विरोधी पक्षाचा कोणत्याही गोष्टीविरुद्ध सनदशीर चळवळ करण्याचा हक्क कायम ठेवला पाहिजे आणि त्या हक्काला संरक्षण दिले पाहिजे हीच आमची भावना आहे. परंतु विरोधकांचा विरोध लोकशाहीच्या विशिष्ट मर्यादेबाहेर जाऊ लागला आहे असे दिसले तर मात्र पोलिसांना त्या ठिकाणी येऊन आपले कर्तव्य पार पाडावे लागते. या प्रकरणामध्ये पोलिसांनी आपले कर्तव्य योग्य वेळी आणि योग्य रीतीने पार पाडले आहे असे माझे स्पष्ट मत असल्यामुळे या ठिकाणी जी टीका करण्यात आली ती मी स्वीकारू शकत नाही.

■ ■ ■

---

Justifying the lathi charge at Akola on 3rd March,1958, Shri Y.B.Chavan, Chief Minister, Said that the Opposition parties and the Anti-Octroi Duty Conference deliberately created the situation in which the lathi charge was inevitable. He said that his Government was not opposed to the Octroi Duty because for many Corporations it was a source of maximum income and so the problem could be sorted out only through its consent. He added that the tension was mounting up for eight days prior to 3rd March on which day the meeting of the corporation held the Octroi Duty Schedule. With the intention of making it impossible to prepare the Schedule, about 200-300 demonstrators rushed in; they were driven out by the Police later. He accused the Opposition of taking undue advantage of popular resentment.

# येवले येथील दंगलीत पोलिसांनी केलेल्या गोळीबारावरील चर्चा*

**१० मार्च १९५८**

*चर्चेनंतर केलेल्या निवेदनात मा. चव्हाण यांनी सरकारच्या कृतीचे केलेले जोरदार समर्थन.*

माननीय अध्यक्ष महाराज, नाशिक जिल्ह्यातील येवले गावी झालेल्या दंगलीसंबंधी आणि पोलिसांनी केलेल्या गोळीबारासंबंधी येथे जी चर्चा झाली ती मी लक्षपूर्वक ऐकली आहे. या प्रश्नाबद्दलची समग्र तपशीलवार माहिती जरी सध्या मजजवळ उपलब्ध नसली तरी येवले गावात ज्या दिवशी प्रत्यक्ष दंगा झाला त्या दिवशीची आणि त्यानंतरच्या एक-दोन दिवसांची माझ्याजवळ उपलब्ध असलेली हकीकत मी सभागृहाला सांगण्याचा प्रयत्न करीन.

अध्यक्ष महाराज, झालेल्या चर्चेतून महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले असे सारांशाने म्हणता येईल. एक प्रश्न असा उपस्थित केला गेला की येवले येथील पोलिस अधिकाऱ्यांना अशा तऱ्हेची दंगल होणार आहे अशी पूर्वसूचना काही घटनांच्या रूपाने मिळाली असतानाही, दंगलीची थोडीशी कुणकुण लागली असतानाही, त्यांनी दंगल होऊ नये याकरिता आवश्यक ते संरक्षक उपाय योजिले नाहीत. अध्यक्ष महाराज, एका बाबतीत मी माननीय सदस्यांशी सहमत होईन की पोलिसांना दंगल होणार अशी कुणकुण लागली असल्यास त्यांनी आगाऊ बंदोबस्त करावयास हवा होता. अध्यक्ष महाराज, या बाबतीतील चौकशी अजूनही संपलेली नाही. परंतु आजपर्यंत माझ्याजवळ या दंगलीसंबंधी जी जी माहिती उपलब्ध झालेली आहे तीवरून, स्थानिक पोलिसांना

* Bombay Legislative Assembly Debates, Vol.6,Part II (Inside No.26), 15th October 1958, pp. 1505 to 1508

या दंगलीला अनपेक्षितरीत्या तोंड द्यावे लागले असाच निष्कर्ष निघतो. अशा प्रकारची दंगल होणार आहे अशा तऱ्हेची पूर्वकल्पना त्यांना नव्हती असे मला मिळालेल्या माहितीवरून दिसून येते. अध्यक्ष महाराज, येवले गावी १९४९-५० च्या सुमारास जातीय तेढीचे काही वातावरण निर्माण झाले होते ही गोष्ट खरी आहे, परंतु ही गोष्ट सात-आठ वर्षांपूर्वीची आहे. अनेक शहरे अशी आहेत की जेथे गणपती उत्सवाच्या निमित्ताने, मोहरमच्या निमित्ताने जातीय तेढीचे वातावरण, अथवा त्या वातावरणाला पोषक परिस्थिती निर्माण होते. सरकारने सर्वच शहरांच्या बाबतीत आगाऊ काळजी का घेतली नाही असे विचारले जाते, परंतु मी या सभागृहाला विश्वासात घेऊन सांगू इच्छितो की, अशा परिस्थितीची अंधुकशी कल्पना आल्यानंतर सरकारने मे महिन्याच्या सुमारास राज्यातील सर्व जिल्हा अधिकाऱ्यांचे लक्ष या प्रश्नाकडे हेतुपूर्वक वेधले होते आणि आपापल्या जिल्ह्यातील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवा व कोणत्याही तऱ्हेची अशांतता निर्माण झाल्यास तिला संघटित रीतीने तोंड देण्याची तयारी ठेवा अशा तऱ्हेच्या सूचना त्यांना देण्यात आल्या होत्या. अशा प्रकारे धोरण ठरविण्याच्या प्रश्नाबाबत सरकारने वैचारिकदृष्ट्या आवश्यक ती खबरदारी घेतलेली होती. दुर्दैवाने धुळे, येवले आदि ठिकाणी या दंगलींचा अनपेक्षित रीतीने स्फोट झाला. माननीय सदस्य **श्री. हांडे**[२३] यांनी आपल्या भाषणात येवले येथे अस्तित्वात असलेल्या काही सामाजिक वादांचा उल्लेख केला. अध्यक्ष महाराज, सामाजिक वादांची पार्श्वभूमी लक्षात घेता पोलिस सावध का राहिले नाहीत हा वादाचा आणि चौकशीचा प्रश्न आहे. या बाबतीत मी अधिक चौकशी करणार आहे. अध्यक्ष महाराज, ज्या दिवशी दंगल झाली त्या दिवशी सकाळी येवले येथील एका रस्त्यावरच्या मशिदीवरून काही लोकांनी वाद्ये वाजवीत एक मिरवणूक नेली आणि त्यामुळेच वादाला सुरवात झाली. येथे ही गोष्ट सांगणे अनुचित होणार नाही की नगरच्या कोर्टाने वाद्ये वाजवीत जाण्याचा अधिकार आहे असा एक निर्णय दिलेला आहे. या निर्णयाचा कायदेशीर अर्थ काय, त्याच्या मर्यादा किती हा कायद्याचा प्रश्न आहे. परंतु कोर्टाने अशा प्रकारचा निर्णय दिल्यामुळे सर्वांना वाद्ये वाजवीत मिरवणुका नेण्याचा अधिकार आहे अशा प्रकारचे एक वातावरण येवले येथे निर्माण झाले असण्याचा संभव आहे. त्या रस्त्यावरील मशिदीवरून काही लोकांनी वाद्ये वाजवीत एक मिरवणूक गेल्यानंतर काही वेळाने दुसरीही मिरवणूक त्या रस्त्याने जावयास लागली तेव्हा या गोष्टीचा तेथील मुसलमानांवर परिणाम झाला व आपले म्हणणे त्यांनी तेव्हा पोलिसांच्या कानावर घातले. परिस्थितीच्या बदलत्या गांभिर्याची पोलिसांना किंचितशी कल्पना आली व

त्यांनी दुसऱ्या मिरवणुकीला परत पाठविण्याचा प्रयत्न केला. मिरवणुकीला परत पाठविण्याची एक साधी घटना घडल्यानंतर सर्व शहरात दंगलीचे वातावरण निर्माण झाले. यावरून या वातावरणाला जास्त विस्तृत पार्श्वभूमी असावी असा एक तर्क निघू शकतो हे मला मान्य आहे. पोलिसांनी याचवेळी ताबडतोब बंदोबस्त करावयास हवा होता परंतु तो त्यांनी केला नाही असे म्हणून माननीय सदस्यांनी या बाबतीत एरर ऑफ् जज्मेंट हा शब्द वापरला. त्यांच्या या शब्द योजनेशी मी सहमत आहे.

अध्यक्ष महाराज, यानंतर शहराच्या वेगवेगळ्या भागात चौका-चौकातून हिंदू आणि मुसलमान यांचे थवेच्या थवे जमा झाले आणि वादावादीला सुरवात झाली. शहरातील परिस्थितीची अद्ययावत माहिती मिळावी याकरिता ठिकठिकाणी जे सायकलवाले कॉन्स्टेबल ठेवले होते त्यापैकी एक कॉन्स्टेबल घाईघाईने पोलिस ठाण्यावर जाऊन सांगू लागला की शहरातील बुंदेलपुरा नावाच्या पुऱ्यात मारामारीला सुरवात झाली आहे. ह्या ठिकाणी ४-५ पोलीस होते, ही बातमी खरी आहे. ४ कॉन्स्टेबल्स आणि १५-१६ पोलीस संरक्षणाच्या दृष्टीने तालुक्याच्या ठिकाणी आवश्यक असतात आणि तेवढे पोलीस त्या ठिकाणी होते. तो बाजाराचा दिवस असल्यामुळे काही पोलिसांची वाटणी करावी लागली आणि काही पोलीस तिकडे पाठविण्यात आले व काही पोलीस स्टेशनवर ठेवावे लागले. तसेच दंगा होण्याची शक्यता आहे असे कळल्यानंतर सायकलवरून पोलीस पाठवावा लागला आणि मग त्या ठिकाणी आर्म्ड पोलीस हजर झाले. ज्यांनी त्या ठिकाणचे चित्र पाहिले त्यापैकी काही सांगतात की, ४-५ हजार लोक होते तर कोणी असे सांगतात की, १०० ते २०० लोक होते. कोणी त्याच्यामधला आकडा सांगतात. पण एक गोष्ट निश्चित आहे की हजारो नसले तरी शेकडो लोक जमा झाले होते. त्या ठिकाणी तंग वातावरण निर्माण होऊन दगडांचा वर्षाव चालू होता आणि एकमेकांच्या अंगावर जाण्याचा प्रसंग निर्माण झाला होता. त्यावेळी पोलिसांनी जे काही केले ते योग्य होते असे म्हटले तर वादविवाद निर्माण होईल म्हणून प्रत्यक्ष जी हकीकत घडली ती मी सन्माननीय सभागृहाला सांगू इच्छितो. दोन्ही बाजूंच्या लोकांच्यामध्ये उभे राहून पोलिसांनी लोकांना समजावण्याचा प्रयत्न केला आणि ज्यावेळी लोक ऐकेनात असे त्यांना दिसून आले, त्या वेळी त्यांनी तालुका मॅजिस्ट्रेटला बोलावून १४४ कलम जाहीर करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे तालुका मॅजिस्ट्रेट आले आणि त्यांनी १४४ कलम जाहीर केले. परंतु हल्ली असे वातावरण तयार झाले आहे की मामलेदारांनी किंवा मॅजिस्ट्रेटनी १४४ कलम जाहीर केले तरी आपला कार्यक्रम चालू ठेवावयाचा आणि त्याप्रमाणे मॅजिस्ट्रेटचा आदेश धुडकावण्यात

आला. दगडांच्या साधनाचा वापर करता करता प्रकरण हातघाईवर येऊन लढाई पुढे चालू झाली. त्या ठिकाणी सब-इन्स्पेक्टरच्या अंगावर दगड आले आणि दुसऱ्या एका कॉन्स्टेबलला खाली पाडण्यात आले. त्या वेळी त्यांना असे दिसून आले की एका मुसलमानाच्या कुटुंबाच्या दुकानाचा दरवाजा दगडांच्या माऱ्याने मोडला जाऊन तो पडू लागला आहे. आतून स्त्रियांच्या आणि मुलांचे ओरडण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. त्यावेळी पोलीस इन्स्पेक्टरने स्वतःच्या जबाबदारीवर पोलिसांना गोळीबार करावयास सांगितले. त्या ठिकाणी जे चार पोलीस होते त्यापैकी दोन पोलिसांना मुसलमानांच्याकडे आणि दोन पोलिसांना हिंदूंच्याकडे तोंड करून उभे राहण्यास सांगून गोळीबाराचा हुकूम दिला आणि ४ गोळ्या झाडण्यात आल्या. त्यापैकी एक गोळी हवेमध्ये उडविण्यात आली आणि ज्या तीन गोळ्या झाडल्या त्यामुळे कोणीही जखमी झाले नाही. गोळीबारामुळे कोणीही जखमी झाले नाही तेव्हा गोळीबार झाला, ही थाप असावी असे वातावरण  निर्माण करण्याची शक्यता होती. यावेळी लोक थोडेसे पांगले पण पुन्हा ते एकमेकांशी भिडू लागले असे दिसले तेव्हा इन्स्पेक्टर त्यांना आडवे गेले. हे पाहिल्यावर एका माणसाने आयर्न बार किंवा ज्याला आपण पाइप म्हणतो तो फेकून इन्स्पेक्टरला मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी इन्स्पेक्टरनी दोन गोळ्या रिव्हॉलव्हरमधून झाडल्या आणि त्यामुळे दोन माणसे जखमी झाली. माणसे जखमी होतात हे पाहिल्याबरोबर तीन बंदुकींच्या गोळ्यांनी जे घडले नाही ते रिव्हॉलव्हरच्या दोन गोळ्यांनी घडले आणि माणसांची पांगापांग झाली. हा प्रकार बुंदेलपुरा या ठिकाणी घडला.

यानंतर मुलतानपुरा येथे जे वातावरण होते ते अशाच प्रकारचे होते, आणि तेथेही असाच प्रकार झाला. दोन समाज समोरासमोर जमले होते आणि ३-४ ठिकाणाहून माणसे दगडांचा वर्षाव करीत होती. त्या ठिकाणी इन्स्पेक्टरनी जमाव पांगविण्यासाठी गोळीबार केला आणि दोन तीन गोळ्या झाडल्या पण त्याचा काही परिणाम झाला नाही. एका ठिकाणी लोक दुकान पेटवीत आहेत असे दिसून आल्यानंतर ते त्या ठिकाणी धावत जात असताना त्यांच्यावर हल्ला झाला. तेव्हा पोलीस इन्स्पेक्टरला आपल्या रिव्हॉलव्हरचा उपयोग करावा लागला आणि त्याने दोन गोळ्या झाडल्या. त्यापैकी एक गोळी एका इसमाच्या छातीला लागून तो मनुष्य जखमी झाला. रिव्हॉलव्हरच्या गोळीने मनुष्य जखमी झालेला पाहून लोक पांगू लागले. गोळीबार करण्यापूर्वी लाठीमार का केला नाही याबद्दल मला असे सांगावयाचे आहे की तेथे तेवढा बंदोबस्त नव्हता आणि लोकांना गोडीगुलाबीने शक्यतो हत्याराचा वापर न करता दंग्यापासून परावृत्त करावे हा शुद्ध हेतू होता. सन्माननीय सभागृहाच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की,

सन्माननीय सभासद **श्री. कानडे**[२१] यांनी मॅजिस्ट्रेटपुढे झालेल्या चौकशीत असे सांगितले की पोलिसांनी गोळीबार केला नसता तर वातावरण अधिक तंग झाले असते आणि पोलिसांनी जो गोळीबार केला तो योग्य होता असे ते म्हणाले.

गोळीबारासंबंधी त्यांनी आपले जे मत दिले ते मी सभागृहाला सांगितले आहे. एक गोष्ट खरी आहे की जातीय दंग्याच्या बाबतीत एक विलक्षण परिस्थिती निर्माण होते आणि ज्या काही पूर्वकालीन भावना असतात, जो काही अभिमान असतो किंवा स्थानिक परिस्थिती असते ती पुढे करून हा दंगा करण्यात येतो. अशा वेळी पोलिसांना गंभीरपणे काम करावे लागते. तेव्हा हा जो प्रकार घडला तो वाचल्यानंतर किंवा ऐकल्यानंतर पोलिसांनी गोंधळून जाण्यासारखे त्यात काही होते असे वाटत नाही. एका ठिकाणी तंग वातावरण असताना आणि दुसऱ्या ठिकाणी माणसे दगडांचा वर्षाव करीत असताना स्वतःचा जीव धोक्यात घालून प्रसंग पडला तर रिव्हॉलव्हरने परिस्थितीला तोंड देणारा मनुष्य घाबरला किंवा गोंधळला होता हे म्हणणे बरोबर होणार नाही. स्वतःचा जीव धोक्यात टाकून त्यांनी अडीच तास जमावाला शांत करण्याचा प्रयत्न केला होता.

अर्थात् गोळीबारामध्ये एक मनुष्य मेल्यानंतर दुसऱ्या दिवशी लोकांच्या मनावर स्वाभाविक परिणाम झाला असेल व त्यामुळे वातावरण तंग झाले असेल. या बाबतीत सरकारने काय केले असे विचारण्यात येते. सरकारने रिलिफ देण्याची आवश्यकता नव्हती. कारण स्थानिक लोकांनी ते काम केले आहे. ज्यांना ह्या दंग्यामुळे त्रास झाला त्यांना मदत म्हणून कर्ज देण्यासाठी, चौकशी करण्यासाठी, स्वतः कलेक्टर त्या ठिकाणी जाऊन राहिले आहेत. मी त्या ठिकाणच्या आमदार मंडळींना भेटलो आणि अधिक माहिती मिळावी म्हणून तेथील दोन स्थानिक अधिकाऱ्यांना बोलावणे पाठवून त्यांच्याकडून ताजी माहिती घेतली आहे. त्या लोकांना मदत करण्यासाठी कर्ज देण्याची व्यवस्था झाली आहे. ही येवला येथे झालेल्या गोळीबाराची हकीकत आहे. या बाबतीत एक गोष्ट निश्चित आहे आणि सन्माननीय सभासदांनीही ती मान्य केलेली आहे. त्यांचे मत असे आहे की, जातीय दंग्याच्या बाबतीत सरकारने कडक धोरण स्वीकारले पाहिजे. यापेक्षा कडक धोरण घेण्याची माझी तयारी आहे. त्याचबरोबर एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते ती ही की, कडक धोरण स्वीकारल्यामुळे प्रव्होकेशन झाले, तंग वातावरण निर्माण झाले असे म्हणण्याचा कदाचित प्रयत्न होईल. तेव्हा तो प्रसंग टाळण्यासाठी प्रयत्न करीत असताना संयम ठेवून बोलावे लागते. येवल्याच्या प्रकरणाचा विचार करून जातीय दंग्याच्या बाबतीत सरकार जास्तीत जास्त कडक

धोरण स्वीकारण्यास तयार आहे, हे मी सन्माननीय सभासदांना सांगू इच्छितो. अध्यक्ष महाराज, मला जो वेळ मिळाला होता त्यामध्ये आवश्यक ती माहिती मी सभागृहाला देण्याचा प्रयत्न केला आहे. यापेक्षा अधिक बोलणे इष्ट नाही असे मला वाटते.

On 1st October 1958, Shri Chavan, Chief Minister, defended Government's action of police firing to quell the riot at Yeola. He said that the police were caught unawares. He admitted that the police made an error of judgement in tackling the situation, and that it was as a last resort the police opened fire. In conclusion, he said that the Government would take stern measures to check communal riots.

# म्हैसूर-मुंबई राज्यांच्या सीमांची पुनर्आखणी करण्याचा प्रस्ताव*

**११ मार्च १९६०**

*सीमा-तंटा सोडविण्यासाठी सर्वसामान्य तत्त्वावर आधारित असे आपले म्हणणे सरकारने झोनल कौन्सिलपुढे मांडल्यावर चर्चा झाली त्याचा मा.चव्हाण यांनी सभागृहास दिलेला त्रोटक वृत्तांत.*

**RESOLUTION BY THE CHIEF MINISTER REGARDING READJUSTMENT OF BOUNDARIES BETWEEN MYSORE AND BOMBAY STATES**

Mr. Speaker, Sir, I beg to move the following resolution, namely :-

"Whereas the Government had on the 25th June 1957 moved the Zonal Council of the Western Zone to consider the readjustment of boundaries between the States of Mysore and Bombay and to advise the Central Government and the Governments of Bombay and Mysore with reference thereto and also submitted a memorandum in this behalf;

AND Whereas no progress has been made in the discussion on the subject before the Zonal Council and the matter has been pending for over $2^1/_2$ years;

AND WHEREAS on the enactment of the Bombay State Reorganisation Bill,1960, the Western Zonal Council comprising the State of Bombay and Mysore will cease to exist;

* Bombay Legislative Assembly Debates, Vol.10,Part II (Inside No.8), 11the March 1960, pp. 330 to 335.

AND WHEREAS it is desirable that the boundary adjustments between the States of Bombay and Mysore be effected without any further loss of time;

This Assembly declares its acceptance of and support to the memorandum submitted by the Government of Bombay to the Zonal Council and Strongly urges upon the Central Government to initiate immediate steps and pursue them with a view to arriving at a satisfactory settlement of the border so as to remove the feelling of frustration and despondency in the minds of a large section of the population of the border areas and the State of Bombay and the political uncertainty and tension resulting therefrom."

अध्यक्ष महाराज, हा महत्वाचा प्रश्न या सन्माननीय सभागृहापुढे या पद्धतीने मांडण्याची आवश्यकता जी निर्माण झाली, त्या पाठीमागे बऱ्याच काळाचा इतिहास आहे. त्याची हकीकत माझ्या शक्तीप्रमाणे मी आज सभागृहासमोर मांडू इच्छितो. १९५५ साली राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाला आणि तेव्हापासून आजपर्यंत हा सीमेचा प्रश्न महाराष्ट्राच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा म्हणून चर्चिला जात आहे. त्यासंबंधाने लोकसभेत, या राज्याच्या उभय सभागृहात आणि बाहेरही अनेक वेळा चर्चा झालेली आहे. त्याच चर्चेच्या अनुरोधाने आणि निष्कर्षित तत्त्वांच्या अनुरोधाने राज्यपुनर्रचनेनंतर जे राज्य अस्तित्वात आले, त्याने या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्वीकारला. या सीमा प्रश्नाबाबत मुंबई आणि म्हैसूर या राज्यांनी या दोन राज्यांसाठी जे झोनल कौन्सिल तयार झाले होते त्यात चर्चा करावी, एवढेच नव्हे तर त्यात चर्चा करणे आणि ती सोडविणे कर्तव्य आहे असे मानले गेले होते. तेव्हापासून हा प्रश्न मांडण्याचे निश्चित झाले होते आणि १९५७ च्या जूनमध्ये मुंबई सरकारतर्फे एक मेमोरॅन्डम सादर करण्यात आलेला आहे. या चर्चेपर्यंत हा अहवाल म्हणजे झोनल कौन्सिलपुढील खाजगी पत्रव्यवहार, कैफियत किंवा खलिता म्हणा हवे तर, म्हणून मानला जात होता. आज या ठरावाच्या अनुरोधाने झोनल कौन्सिलपुढे या सरकारने ज्या तत्त्वांचा आविष्कार करून आपले म्हणणे मांडले होते ते तत्त्व आणि आपण सादर केलेला मेमोरॅन्डम सभागृहासमोर ठेवलेला आहे, सभागृहाच्या स्वाधीन केलेला आहे. यावरून हे निश्चित होईल की, या प्रश्नाच्या संबंधाने या सरकारने आपली भूमिका सर्वसामान्य तत्त्वांवर आधारलेली आहे. अशा प्रकारे आपले म्हणणे झोनल कौन्सिलपुढे मांडल्यानंतर ज्या काही चर्चा झाल्या त्यांचा त्रोटक वृत्तान्त मी सभागृहाला सांगू इच्छितो.

हा मेमोरॅन्डम सादर केल्यानंतर त्यावेळचे म्हैसूर राज्याचे मुख्यमंत्री **श्री.निजलिंगप्पा**[२५] यांच्याशी पत्रव्यवहार सुरू झाला आणि १९५७ सालीच हा प्रश्न हाती घेण्यात आला. त्या पत्राला उत्तर देत असताना, श्री. निजलिंगप्पा यांनी अशी सूचना केली की, या सगळ्या प्रश्नांतून कारवारचा प्रश्न सोडून द्या, बेळगांवचा प्रश्न सोडून द्या, निपाणीचा प्रश्न सोडून द्या आणि बाकीच्या प्रश्नासंबंधी आपण ६० टक्के लोकवस्तीचे प्रमाण धरून विचार करू. ही गोष्ट या सरकारला स्वीकारता येणे शक्यच नव्हते आणि या संबंधातली आपली भूमिका सुस्पष्ट शब्दात या सरकारने म्हैसूर सरकारला कळविली की त्यांचे म्हणणे या सरकारला मान्य नाही. एवढे कळविल्यानंतर स्वस्थ बसून हा प्रश्न तेथेच सोडून देणे तर शक्य नव्हते आणि सोडून देण्यासारखा प्रश्न नव्हताही. या प्रश्नाची काहीतरी तड लावणे निकडीचे होते आणि त्यामुळे त्याचा पाठपुरावा करण्याची या सरकारला आवश्यकता वाटली. अध्यक्ष महाराज, या संबंधात एक गोष्ट मी प्रामुख्याने सभागृहाला सांगू इच्छितो. प्रश्न सुटण्यामध्ये मूळ अडचण अशी आहे की, म्हैसूर सरकारला या सीमा प्रश्नासंबंधाने फारसा जिव्हाळा वाटत नाही. औत्सुक्य वाटत नाही, कारण भारतातील राज्यांची १९५६ साली पुनर्रचना झाल्यानंतर म्हैसूर राज्याला न्यायाने जे मिळावयास हवे होते, त्यापेक्षा १० टक्के जास्तच त्यांना मिळालेले आहे. म्हैसूर राज्याची मागणी केवळ १०० नव्हे तर ११० टक्क्याने पूर्ण झालेली आहे. स्वाभाविकपणे, हा जो वादग्रस्त प्रश्न आहे, तो सुटला पाहिजे, हे मान्य करणे म्हैसूर सरकारला हिताचे वाटले नाही, आणि या प्रश्नाची सोडवणूक करण्यासंबंधाने त्या सरकारला फारसा जिव्हाळा वाटला नाही, वाटत नाही, ही गोष्ट खरी आहे. परंतु या सरकारची परिस्थिती तशी नाही. या सरकारचे हितसंबंध या प्रश्नात गुंतलेले असल्यामुळे हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सगळे प्रयत्न या सरकारला करावयाचे होते व आहेत. अध्यक्ष महाराज, हा प्रश्न समझोत्याच्या वातावरणात, विधायक प्रयत्नांच्या सहाय्याने सुटावा अशी या सरकारची इच्छा आहे परंतु कोणताही प्रश्न समझोत्याच्या वातावरणात, कटुतेची भावना निर्माण न होता सुटण्याकरिता प्रश्नाशी संबंधित असणाऱ्या दोन्ही बाजूंना त्या प्रश्नासंबंधाने जिव्हाळा असावा लागतो, तो प्रश्न लवकर सुटला पाहिजे अशी निकड असावी लागते, परंतु या प्रश्नासंबंधाने दुर्दैवाने तशी परिस्थिती नाही एवढेच नव्हे तर प्रश्न सुटल्यास त्यामुळे एका बाजूला अडचण वाटण्याचा संभव आहे. अशा परिस्थितीत सर्व बाजूंनी समतोलपणे विचार करून या सरकारला मार्ग काढावयाचा होता. त्यामुळे जेव्हा म्हैसूर राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. निजलिंगप्पा यांनी मी आताच

सांगितल्याप्रमाणे उत्तर दिले, त्यावेळी स्वाभिमानाची पहिली प्रतिक्रिया अशी झाली की, आता यापुढे चर्चा करण्यात काही अर्थ नाही, चर्चा करता कामा नये. परंतु असे करून भागण्यासारखे नव्हते; प्रश्न तर सोडवावयाचाच होता. तेव्हा श्री. निजलिंगप्पा यांच्याशी मुंबईत झालेल्या चर्चेतून जेव्हा काही निष्पन्न झाले नाही, तेव्हा या सरकारने असा विचार केला की, दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आपसात चर्चा करण्यापेक्षा दोन्ही राज्यांच्या मुख्य चिटणिसांनी या प्रश्नासंबंधाने आपसात चर्चा करावी. त्याप्रमाणे मुंबई राज्याचे त्यावेळचे मुख्य चिटणीस श्री. पंजाबी यांना म्हैसूर राज्याच्या मुख्य चिटणिसांशी चर्चा करण्याकरिता मी बंगलोरला पाठविलेही होते, परंतु त्या चर्चेतून काही निष्पन्न झाले नाही. ही चर्चा १९५८ च्या मे महिन्यात झाली. त्यानंतर म्हैसूर सरकारच्या मंत्रिमंडळात काही फेरबदल झाला आणि श्री. निजलिंगप्पा यांच्या जागी **श्री. जत्ती**[२६] हे म्हैसूर राज्याचे मुख्यमंत्री झाले. साहजिकच या प्रश्नासंबंधी श्री.जत्ती यांच्याशी चर्चा करणे प्राप्त होते. या संबंधात प्रथम मी सभागृहाला ही गोष्ट सांगू इच्छितो की, मुंबई आणि म्हैसूर या दोन राज्यांच्या सीमेसंबंधीचा वाद हा एक मायनर प्रश्न आहे, किरकोळ प्रश्न आहे, अशी श्री. जत्ती यांची भूमिका आहे. श्री. जत्ती यांच्याशी ८ जुलै १९५८ रोजी सीमाप्रश्नासंबंधाने माझी प्रथमतः चर्चा झाली. या प्रश्नासंबंधाने या सरकारने आतापर्यंत कशीकशी पाऊले उचलली याची माहिती या सभागृहाला व्हावी म्हणून मी झालेल्या या चर्चेची माहिती देत आहे. आमची चर्चा सुरू झाल्यानंतर पहिल्या पाच मिनिटांच्या आतच श्री. जत्ती यांनी सांगून टाकले की, तुम्ही निपाणी घ्या आणि हा प्रश्न सोडवून टाका. श्री. जत्ती यांच्या पूर्वी मुख्यमंत्री असलेले श्री. निजलिंगप्पा यांची तर तेवढीही तयारी नव्हती परंतु श्री. जत्ती यांनी निपाणी देतो म्हणण्याचा उदारपणा तरी दाखविला. अर्थात् ही गोष्ट मला पटणे शक्यच नव्हते. मी त्यांना स्पष्ट सांगितले की मी माझ्या सरकारतर्फे तुमच्याकडे काही गावांची भिक्षा मागत नाही. न्यायाने आणि सर्वमान्य अशा तत्त्वांना धरून जो काही प्रदेश मुंबई राज्यात समाविष्ट व्हावयाचा असेल तो घेण्यास आणि त्याच न्यायाने जो प्रदेश म्हैसूर राज्यात जावयाचा असेल तो देण्यास मी या ठिकाणी आलेलो आहे. उत्पन्नाला आणि न्यायाला धरून जी गावे अथवा जो भाग म्हैसूर राज्यात जावयास हवा असेल तो तुम्ही घ्या. अध्यक्ष महाराज, इतके बोलणे झाल्यानंतर आमची ती चर्चा संपली. झालेल्या चर्चेसंबंधाने आम्ही दोघांनी एक पत्रक प्रसिद्ध केले. त्याचा सारांश या सभागृहाच्या माहितीसाठी मी वाचून दाखवितो.

"These discussions revealed that there was no identity of views with regard to the approach to the problem. It was, therefore, agreed

that a stage had been reached when the matter should be formally considered by the Zonal Council."

याप्रमाणे १९५८ साली श्री. जत्ती व मी यांच्यात झालेल्या चर्चेवरून एक गोष्ट स्पष्ट झाली की, प्रश्न सोडविण्याच्या संबंधात आमच्या दोघांमध्ये ''आयडेंटिटि ऑफ् व्ह्यूज'' नाही आणि हा प्रश्न झोनल कौन्सिलकडे रिफर केला पाहिजे. अध्यक्ष महाराज, मी सुरवातीलाच सांगितले की या प्रश्नासंबंधाने म्हैसूर सरकारला फारसा जिव्हाळा नाही. हा प्रश्न सुटला पाहिजे अशी निकड नाही आणि गरज नाही. कारण त्या सरकारचे हितसंबंध या प्रश्नात गुंतलेले नाहीत अशी परिस्थिती आहे. हा प्रश्न सोडविण्याची निकड आणि गरज या सरकारला आहे आणि झालेल्या वाटाघाटींच्या फलनिष्पत्तीवरून या सरकारला हे कळून चुकले की दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी चर्चा करून हा प्रश्न सुटणार नाही. परिस्थिती काय होती, हे ज्यांना ज्यांना म्हणून या प्रश्नाबद्दल जिव्हाळा आहे, त्यांनी त्यांनी नीट समजून घेतले पाहिजे आणि म्हणूनच शक्य तितक्या विस्ताराने मी या प्रश्नाची पूर्वपीठिका सांगितली. या प्रश्नाने काय काय वळणे घेतली, त्याचा हा आजपर्यंतचा इतिहास आहे. जेव्हा श्री. जत्ती असे म्हणतात की, हा प्रश्न मायनर आहे असे समजून चर्चा करा, तेव्हा त्याचा अर्थ हाच की, ही मागणी मुंबई सरकारने सोडून द्यावी. या गोष्टीला मुंबई सरकार आणि मी कधीही मान्यता देऊ शकणार नाही. हा प्रश्न मायनर आहे हे आम्हाला मुळीच मान्य नाही. हा प्रश्न आम्हाला न्यायाने आणि समजुतीच्या वातावरणात सोडवावयाचा आहे आणि तसा तो सुटेल अशी आम्हाला आशा आहे. अमुक इतक्या अवधीच्या आत तो सुटेल अशी ग्वाही देण्याकरिता मी हा ठराव घेऊन आपल्यासमोर उभा राहिलेलो नाही. हा प्रश्न सोडविण्याची आणि न्यायाने सोडविण्याची इच्छा मात्र प्रखर आहे, परंतु तो केव्हा सुटेल हे सांगणे मी इतिहासाच्या स्वाधीन करणार आहे. (**श्री. व्ही.डी.चितळे**[२७]- ''इतिहास हा मनुष्याच्या कर्तृत्वानेच घडत असतो''.) अर्थातच इतिहास हा मनुष्य आपल्या कर्तृत्वाने घडवीत असतो हे मला मान्य आहे, परंतु हे कर्तृत्व विधायक असावे लागते एवढीच उपसूचना मी त्याला सुचवितो. अध्यक्ष महाराज, या प्रश्नामागची पार्श्वभूमी मी थोडक्यात सभागृहासमोर ठेवली आहे आणि आज या प्रस्तावाच्या द्वारे हा प्रश्न या सभागृहात उपस्थित करण्याचे कारण प्रस्तावातच स्पष्ट करण्यात आलेले आहे. मुंबई राज्याची पुनर्रचना करण्याचा प्रश्न आज पुनः एकदा निर्माण झालेला आहे, तेव्हा या वेळेला मुंबई राज्याच्या दक्षिण सीमेवरील वादग्रस्त भागासंबंधीचा हा प्रश्न जर सुटला तर एका फार मोठ्या जनसमूहाला न्याय मिळाल्याचे समाधान लाभणार आहे आणि म्हणून या वेळेला हा प्रश्न सुटावा अशी माझी अपेक्षा

आहे, इच्छा आहे. या प्रश्नासंबंधाने गेल्या दीड वर्षांत जे वातावरण या राज्यात निर्माण झाले आहे ते भारत सरकारपुढे, जनतेपुढे येणे आवश्यक आहे. या हेतूने मी हा ठराव आणलेला आहे. अध्यक्ष महाराज, माझी स्वतःची भावना अशी आहे की, या प्रश्नासंबंधाने स्टेलमेट निर्माण होता उपयोगाचे नाही, कोठेतरी हा प्रश्न मोकळा ठेवला पाहिजे, सोडवणूक करण्यास वाव ठेवला पाहिजे, त्या प्रश्नाचा सारखा पाठपुरावा केला पाहिजे अशी परिस्थिती आहे. अध्यक्ष महाराज, हा प्रश्न आर्बिट्रेटरकडे, लवादाकडे सोपवावा अशीही एक अनौपचारिक सूचना समोर आलेली होती आणि लवदापुढे प्रश्न नेण्यातील धोका पत्करूनही मी लवाद नेमण्याच्या तत्त्वाला मान्यता दिलेली होती. अर्थातच **पाटसकर**[२८] ॲवॉर्डप्रमाणेच या प्रश्नाचा उलगडा करण्यात यावा अशी भूमिकाच या सरकारतर्फे लवादापुढे मांडण्यात आली असती. खुद्द पाटसकर ॲवॉर्ड हाच एक लवादाने दिलेला निकाल आहे आणि म्हणून आर्बिट्रेशनची सूचना मी तत्त्वरूपाने स्वीकारली होती. परंतु दुसऱ्या बाजूतर्फे तिला नकार देण्यात आला. त्यानंतर भारत सरकारने म्हैसूर आणि मुंबई सरकारला अशी एक सूचना केली की, दोन्ही बाजूचे दोन दोन सदस्य समाविष्ट असणारी एक मीडिएशन कमिटी निर्माण करावी व तिच्या मार्फत हा प्रश्न सोडवावा. कोणत्याही प्रकारे का होईना, परंतु हा प्रश्न सुटावा अशी माझी इच्छा असल्यामुळे मी मीडिएशन कमिटी नेमण्याची सूचना स्वीकारली. या राज्यातर्फे दोन नावे सुचवावयाची होती. मी असा विचार केला की हा प्रश्न सोडविण्याकरिता ज्या पाटसकर ॲवॉर्डचा आधार घेतला जावा असा आमचा आग्रह आहे तो ॲवॉर्ड देणाऱ्या श्री. पाटसकर यांचेच नाव मीडिएटर म्हणून का सुचवू नये? तेव्हा श्री. पाटसकर यांचे नाव मी सुचविले आणि ते एका प्रांताचे गव्हर्नर असतानाही भारत सरकारच्या परवानगीने त्यांनी मीडिएटरचे काम करण्याचे कबूल केले. म्हैसूर सरकारतर्फे दोन नावे सुचविण्यात आली. आजपर्यंतची ही परिस्थिती आहे. आता या कमिटीने करावयाचे काय हा प्रश्न निर्माण झाला. सुरुवातीला अशी कल्पना होती की, त्यांनी झोनल कौन्सिलपुढे रिपोर्ट सादर करावा. परंतु म्हैसूर सरकारकडून असे सुचविण्यात आले की, या दोन्ही मंडळींनी आपापल्या सरकारांच्या मुख्यमंत्र्यांकडे रिपोर्ट सादर करावा. माझी स्वतःची त्यालाही तयारी होती. कारण कोणीही या प्रश्नाचे स्वरूप आणि न्याय पाहण्याचा प्रयत्न केल्यानंतर जर चार शहाणी माणसे त्यांचा विचार करतील तर त्यांना न्याय टाळता येणार नाही अशी माझी मूळ भावना आहे. त्यानंतर या मिडिएशन कमिटीपुढे टर्म्स ऑफ् रेफरन्स काय असाव्यात याबद्दल चर्चा सुरू झाली. म्हैसूर सरकारतर्फे असा आग्रह धरण्यात आला की या

कमिटीने जी चर्चा करावयाची ती मायनर प्रश्नांवरच आपल्याला चर्चा करावयाची आहे असे गृहीत धरून केली पाहिजे. म्हणजे गाडी पुनः मूळ पदावर गेली आणि त्यांना आम्हाला सांगावे लागले की, ही भूमिका आम्ही स्वीकारणार नाही. वाटल्यास काही टर्म्स ऑफ् रेफरन्स न देता या कमिटीने चर्चा करावी आणि मार्ग सुचवावा असे मी सांगितले. कारण हा मायनर प्रश्न आहे असे जोपर्यंत म्हैसूर सरकार म्हणत नाही तोपर्यंत वाटेल त्या गोष्टीला माझी तयारी होती.

म्हैसूर सरकारची दोन माणसे आणि मुंबई सरकारची दोन माणसे अशा चौघांनी या प्रश्नाची चर्चा करून आपला अहवाल हिंदुस्थान सरकारला सादर केल्यानंतर हिंदुस्थान सरकार त्याचा विचार करणार असेल तर त्याला माझी तयारी होती. आता ज्या झोनल कौन्सिलपुढे हा प्रश्न आम्ही मांडणार होतो ते झोनल कौन्सिल नवीन मुंबई राज्य विभाजन विधेयकानुसार संपुष्टात येणार आहे. त्याखेरीज मध्यंतरी ज्या घटना घडल्या त्यामुळेही हा प्रश्न लोकांच्या पुढे मांडण्याची आवश्यकता निर्माण झाली, आणि म्हणून अध्यक्ष महाराज, हा ठराव मी सभागृहापुढे मांडला आहे आणि माझी अशी विनंती आहे की, सभागृहाने एकमताने या ठरावाला पाठिंबा द्यावा. कारण यामुळे या ठरावामध्ये जी भूमिका मांडली आहे तिला या सभागृहाचा बिनविरोध पाठिंबा आहे हे स्पष्ट होईल.

या एकंदर प्रश्नाच्या बाबतीत मुंबई सरकारची जी भूमिका आहे ती भूमिका आणि ज्या तत्त्वांना धरून हा प्रश्न सोडविण्यात यावा असे मुंबई सरकारला वाटते ती तत्त्वे हा जो खलिता केंद्र सरकारला पाठविण्यात आला आहे त्यामध्ये स्पष्ट करण्यात आली आहेत. त्याचा सारांश या खलित्यातील परिच्छेद ९ मध्ये देण्यात आला आहे. तो मी सभागृहाला वाचून दाखवितो.

"We would summarise and re-state the general position as we see it. The demarcation of boundary between the State of Bombay and the State of Mysore having been in the main linguistic, for the readjustment of territories along this border the guiding principle must be that of linguistic homogeneity. It is the obvious duty of those in whom the appropriate authority is reposed, to demarcate this boundary so as to leave the problem of linguistic minorities in its smallest size. For the purpose of such demarcation neither the 'district' nor the 'taluka' nor the 'circle' would provide a dependable organic entity and that we must be prepared ultimately to fall back when necessary on the primary unit of habitation, namely , a village. For obvious reasons such demarcation can be in respect of only

contiguous territory without leaving 'islands' and 'corridors'. While the initial presumption would lie in favour of a readjustment of territories bringing the largest number of people speaking a particular language within the frontiers of the State comprising the major linguistic group, such a presumption may be rebutted if sufficiently strong factors point to the contrary in a particular case. These factors would include considerations of geographical unity, economic affiliation of administrative convenience."

या खलित्यात ग्रथित केलेल्या तत्त्वांचा, आणि भूमिकेचा हा सारांश आहे, आणि जो ठराव मी सभागृहापुढे मांडला आहे त्याच्या द्वारे या तत्त्वांना आणि भूमिकेला, ज्यावर हा खलिता आधारलेला आहे, मी या सभागृहाचा पाठिंबा मागत आहे. मला अशी आशा आहे की, ज्या हेतूने आणि भावनेने मी हा प्रश्न या सभागृहापुढे मांडला आहे तो हेतू आणि ती भावना लक्षात घेऊन उपसूचनांचा आग्रह न धरता हा ठराव सभागृह एकमताने स्वीकारील तर हा प्रश्न सोडविण्यास मदत होणार आहे. म्हणून सभागृह हा ठराव एकमताने स्वीकारील अशी मी अपेक्षा करतो.

अध्यक्ष महाराज, या महत्त्वाच्या ठरावावर या सभागृहात जी चर्चा झाली, ती ठरावाच्या महत्त्वाला आणि गंभीरतेला साजेशीच झाली आणि या ठरावाचे सर्वसामान्यपणे सभागृहाने एकमताने स्वागत केल्याबद्दल मी या सभागृहाचा अतिशय आभारी आहे.

ठरावाला ज्या दोन तीन उपसूचना सुचविण्यात आलेल्या आहेत, त्यांच्या संबंधात मी थोडेसे सांगू इच्छितो. अध्यक्ष महाराज, ''सॅटिस्फॅक्टरी'' या शब्दामागे ''जस्ट अँड'' हे शब्द घालावे अशी माननीय सदस्य श्री. देशपांडे यांची जी पहिली उपसूचना आहे, ती मी स्वीकारतो कारण जे जस्ट म्हणजे न्यायाचे असेल तेच आपणास हवे आहे तेव्हा ही उपसूचना स्वीकारण्यात काहीच प्रत्यवाय नाही. बाकीच्या उपसूचनांची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही, कारण त्यांचा आशय जस्ट या शब्दात ग्रथित होतोच आहे. या मेमोरॅन्डमच्या बेसिसवरच आम्हाला हा प्रश्न सोडवावयाचा आहे. तेव्हा माननीय सदस्य श्री. देशपांडे यांच्या उपसूचनेचा दुसरा भाग अनावश्यक आहे असे मला वाटते. त्यानंतर माननीय सदस्य **श्री.लाड**[२१] यांची उपसूचना लिंग्विस्टिक होमोजिनिटीच्या बेसिसवर हा प्रश्न सोडवावा अशी आहे, परंतु लिंग्विस्टिक होमोजिनिटीच्या बेसिसवरच सगळे मेमोरॅन्डम आधारलेले आहे. तेव्हा माननीय सदस्य श्री. देशपांडे यांनी आपली दुसरी उपसूचना आणि माननीय सदस्य

श्री. लाड यांनी आपली उपसूचना मागे घ्यावी अशी मी त्यांना विनंती करतो. त्या उपसूचनांची आवश्यकता नाही. मी जरूर असे म्हणणारा आहे की, जे जस्ट न्यायाचे असेल ते आपण करावे आणि या दृष्टीने जी उपसूचना आहे ती मी आनंदाने स्वीकारीन. कारण जस्ट आणि न्यायाचा असाच निवाडा आपल्याला हवा आहे. बाकीच्या ज्या उपसूचना मांडण्यात आल्या आहेत, त्या सन्माननीय सभासदांनी परत घ्याव्यात. त्याचा आग्रह धरू नये. ज्या तत्त्वावर आधारित आपल्याला ही केस उभी करावयाची आहे, त्या सर्व गोष्टींचा समावेश आपोआपच ''जस्ट'' ह्या शब्दात होतो.

काही सन्माननीय मित्रांनी मला धोक्याच्या सूचना दिल्या त्याबद्दलही मी त्यांचा आभारी आहे. सन्माननीय सभासद श्री. देशपांडे यांनी मागे एकदा मला तुम्ही असे मख्ख का बसून राहिला आहात असे विचारले होते व त्याबद्दल त्यांना आता पश्चात्ताप होत आहे असे तेच आता म्हणाले. त्यांनी हे स्पष्टपणे सांगितले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. केव्हा केव्हा आपल्याला मागे झालेल्या चुकीची जाणीव होते. माझ्या बाबतीतही केव्हा केव्हा असे होते आणि मागाहून चुकीची जाणीव होते. तेव्हा त्यांनी हे बोलून दाखविले हे फार चांगले झाले.

काही वेळा जोराने बोलणे म्हणजे त्या गोष्टीचा आग्रह धरणे असे समजले जाते. सन्माननीय सभासद श्री. देशपांडे यांनी आता जे सांगितले त्या बाबतीत एका वयोवृद्ध गृहस्थांनी मला असे म्हटले होते की, ज्या वेळी श्री. देशपांडे तुम्हाला असे म्हणाले त्यावेळी तुम्ही त्यांना एक गोष्ट सांगावयाला हवी होती. पुन्हा केव्हा तरी त्यांना मी ती गोष्ट सांगेन असे मी ठरविले होते. पण ती संधी इतक्या लवकर येईल अशी मलाही कल्पना नव्हती. ती गोष्ट अशी आहे. खूप तोंडाळ आणि भांडणारी बायको आणि शांतपणे तिचे बोलणे ऐकून घेणारा नवरा यांच्या कुटुंबातली ही गोष्ट आहे. ती बायको आपल्या नवऱ्याला म्हणाली की, मी तुम्हाला इतके ओरडून सांगत आहे आणि तुम्ही असे मख्खासारखे काय बसून राहिला आहात! ह्या कानांनी ऐकता आणि त्या कानांनी सोडून काय देता! तेव्हा नवऱ्याने उत्तर दिले की, मी निदान ह्या कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून तरी देतो, पण तू दोन्ही कानांनी ऐकूनही तुझ्या तोंडातून बाहेर येत आहे. तेव्हा ह्या गोष्टीवरून सन्माननीय सभासदांनी काय तात्पर्य घेता येईल ते घ्यावे, एवढेच मला सांगावयाचे आहे. माझ्याकडे शिष्टमंडळ आले होते, तेव्हा मला नक्की तारीख सांगता येणार नाही, असे मी म्हटले होते. जिवंत इतिहासाचा मी एक विद्यार्थी आहे. काही साक्षात्कार झालेला मोठा असा कोणी मी नाही. जिवंत इतिहासाचा नीट अभ्यास करणारा मी आहे. मी काही भविष्यवादी नाही. तेव्हा अमुक एका तारखेपर्यंत अमुक

एक गोष्ट होईल असे मी कसे सांगू? हा प्रश्न मला सुटला नाही, हिंदुस्थान सरकारलाही सुटला नाही इतका तो ज्वलंत आहे आणि म्हणूनच तो सुटल्याशिवायही राहणार नाही.

हे सांगत असताना, मला एका गोष्टीची काळजी घेतली पाहिजे. ज्या भावना व्यक्त करीत असताना, कानडी जनतेच्या विरुद्ध आमच्या मनात कोणत्याही प्रकारच्या विरोधाच्या भावना नाहीत. श्री. जत्तींचा उल्लेख येथे करण्यात आला असला तरी तो मित्रत्वाच्या भावनेनेच करण्यात आलेला आहे. निदान माझे आणि त्यांचे मैत्रीचे संबंध आहेत. मी हा ठराव मांडल्यानंतरही हे सांगू इच्छितो की मुंबई सरकार आणि म्हैसूर सरकार या दोन सरकारांच्या इभ्रतीचा हा प्रश्न नसून ह्या दोन राज्यातील काही विभागातील जनतेच्या मागणीचा आणि न्यायाचा तो प्रश्न आहे. ह्या भावनेनेच ह्या प्रश्नाकडे आपण पाहिले पाहिजे. म्हैसूर सरकारनेही ह्या दृष्टीनेच ह्या प्रश्नाचा विचार करावा असे मी सांगू इच्छितो.

▪▪▪

On 11th March 1960, while moving the resolution on the border issue between Mysore (now renamed Karnataka) and Maharashtra, Shri Chavan, Chief Minister, narrated the historical background of the dispute, He pointed out that unlike Maharashtra, Mysore did not have any urgency for the solution of the problem. He accepted one of the three amendments to the resolution and prefixed the words ”and Just” before the word “Satisfactory” in the resolution which was passed unanimously.

# मुंबई राज्य पुनर्रचना विधेयक*

**१७ मार्च १९६०**

*वरील विधेयकावर झालेल्या चर्चेस मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांनी दिलेले उत्तर.*

अध्यक्ष महाराज, सभागृहापुढे राज्यपुनर्रचनेचे जे विधेयक आले आहे त्यावर गेले तीन दिवस चर्चा चालू आहे. या चर्चेचे महत्त्व मी कमी लेखू इच्छित नाही. कारण हे विधेयक संसदेकडे जाऊन संसद ज्यावेळी शेवटचा निर्णय घेईल त्या निर्णयासाठी या चर्चेमध्ये जे विचार प्रदर्शित केले जातील त्याचा खात्रीने उपयोग झाल्याशिवाय राहाणार नाही. या विधेयकाची चर्चा सभागृहाने करावी अशी सूचना मांडताना मी प्रामुख्याने जे विचार मांडले होते ते सामान्यपणे लक्षात घेऊन या सभागृहाने चर्चा केल्याबद्दल सभागृहाचे मी आपल्या परवानगीने आभार मानू इच्छितो, कारण कठीण राजकीय समस्या सोडविण्याचा या विधेयकाने प्रयत्न केला असल्यामुळे होणाऱ्या चर्चेतून काही नवीन समस्या सुरू होऊ नयेत इतकी तरी निदान दक्षता घ्यावी असा विचार सूचना करण्याच्या पाठीमागे होता. सभागृहाने तशी दक्षता घेतल्याबद्दल मी आभार प्रदर्शित केले आहेत.

अध्यक्ष महाराज, या चर्चेमध्ये सर्वसामान्यतः या विधेयकाचे सार आले आहे. काही सन्माननीय सदस्यांनी त्यातील काही व्यवस्थेबद्दल आपला विरोध दर्शविला. काहींनी तीव्र विरोध दर्शविला, काही सन्माननीय सभासदांनी या विधेयकाचे स्वागत

* Bombay Legislative Assembly Debates. Vol. 10, Part II, 17th March 1960. pp.782 to 792, 794.

केले आणि काहींनी या विधेयकातील तरतुदींबद्दल शंका व्यक्त केल्या. आचार्य अत्रे यांनी फक्त वैशिष्ट्यपूर्ण रीतीने या विधेयकाची कीव केली; परंतु, अध्यक्ष महाराज, त्याबाबतीत माझी काही निराशा झाली नाही. सर्वसामान्यतः मी त्यांच्याकडून शिव्या अपेक्षिल्या होत्या. परंतु त्यांना कीव तरी आली.

यानंतर अध्यक्ष महाराज, या विधेयकावर चर्चा करताना माझ्याकडून उत्तराची अपेक्षा करण्यात येऊन जे तीन चार महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले गेले त्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे असे मी मानतो. या ठिकाणी एक महत्त्वाची टीका अशी करण्यात आली की या विधेयकातील काही तरतुदी आम्ही तडजोडीच्या रूपाने स्वीकारल्या आहेत. वस्तुतः एक गोष्ट मी स्पष्टपणे कबूल केली आहे ती अशी की, काही प्रश्नांच्या बाबतीत हे विधेयक तडजोडीवर आधारलेले आहे. कारण अशा समस्या तडजोडीशिवाय सुटत नाहीत, असा माझा नम्र अनुभव आहे. याच गोष्टीच्या आधारावर मी व माझे सहकारी यांनी या प्रश्नाकडे पहाण्याचा प्रयत्न केला. परंतु या बाबतीत अशी टीका करण्यात आली की, या सर्व तडजोडी तत्त्वशून्य आहेत. म्हणून मी काल सन्माननीय सभासद **श्री. टिळक**[३०] यांना समजण्यासाठी एक प्रश्न विचारला. आर्थिक मदतीची जी व्यवस्था या विधेयकात आहे तिचा तपशील अमान्य केला गेला असला तरी त्यासंबंधी तक्रार करता येणार नाही. त्यासंबंधात फार तर मतभेद होऊ शकतील. कारण ती व्यवस्था करण्याबद्दल शेवटच्या घटकेपर्यंत अनेक मतभेद होऊ शकतात. ह्या गोष्टीला अनुलक्षूनच मी सन्माननीय सभासद श्री. टिळक यांना प्रश्न विचारला. त्यांना पिनडाउन करण्यासाठी किंवा अडविण्यासाठी मी विचारला नाही. आर्थिक मदत करण्याचे जे तत्त्व त्यांना मंजूर आहे त्याचाच आम्ही पाठपुरावा केला आहे. या राज्यातील दोन समाज पुष्कळ वर्षे एकत्र राहिले. आज त्यांची वाटणी होत असताना बंधुभावाने वाटणी होणे आवश्यक आहे. अशा वेळी अमुक कोणी म्हटले की त्याची अडचण आहे तर त्याला मदत करावयाची की नाही हा प्रश्न निर्माण होतो. अशा वेळी त्यास मदत केली पाहिजे हे या प्रश्नाच्या पाठीमागचे तत्त्व आहे. हे तत्त्व आम्ही स्वीकारले असेल तर तपशिलाबद्दल टीका करण्याचा अधिकार मंजूर करीन; परंतु या प्रश्नाच्या बाबतीत तत्त्वशून्य म्हणण्याचा अधिकार राहात नाही. एखादे राज्य तुटीचे आहे की नाही हे ठरविण्याचे काम कठीण आहे. ते नुसतेच तपशिलाचे आहे असे नाही तर त्यांत तज्ज्ञतेचाही प्रश्न आहे. हे जे काम आहे ते आर्थिक घडामोडींचा निर्णय घेण्यासंबंधीचे परम काम आहे. ते तज्ज्ञतेवर अवलंबून असल्याकारणाने जे कोणी तज्ज्ञ आहेत त्यांच्यावर ते सोपविण्याखेरीज गत्यंतर नव्हते. माझ्या ठिकाणी विरोधी

पक्षातील जर कोणी प्रमुख असते तर त्यांनी हीच पद्धत अवलंबिली असती. अशा रीतीने या पद्धतीने आम्ही प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

यानंतर या ठिकाणी जी एक नोट सर्क्युलेट करण्यात आली तिच्यात असे म्हटले आहे की, राजधानीसाठी मदत करण्याची जी गोष्ट आहे ती अविवाद्य समजावयास काही हरकत नाही आणि ती चांगली गोष्ट म्हणून मान्य केली पाहिजे. परंतु त्याचबरोबर असे सांगण्यात आले आहे की, तुटीच्या राज्याला मदत करताना इनिशिअल स्टेजमध्ये मदत करण्यात आली पाहिजे. परंतु अध्यक्ष महाराज, इनिशिअल स्टेज कशाला म्हणावयाचे असा एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नाच्या पाठीमागे जो विचार होता तो मी सभागृहाला सांगू इच्छितो. सभागृहाने तो विचार मंजूर करावा अशी मी अपेक्षा करीन, परंतु त्यासाठी मी आग्रह मात्र धरणार नाही. या बाबतीत जी हकीगत आहे ती मी सर्वसामान्यपणे सभागृहापुढे ठेवू इच्छितो. कारण माझा समज असा आहे की, कोणत्याही वादग्रस्त प्रश्नाच्या संबंधात घडलेली हकीगत सभागृहापुढे आणि समाजापुढे ठेवण्याइतका उत्कृष्ट पाठपुरावा असू शकत नाही. या प्रश्नाच्या बाबतीत मला सुरवातीला असे वाटत होते की दोन वर्षांनी मुदत का ठेवू नये ? परंतु महत्त्वाची गोष्ट अशी की फिनान्स कमिशनचा निर्णय जसा कालखंडाचा विचार करू शकतो त्याचप्रमाणे योजनेचाही कालखंड हा त्या प्रश्नाचा दुसरा भाग होऊ शकतो. १९६२ साली येणाऱ्या फिनान्स कमिशनचा काळ गृहीत धरला तरी त्याच्या दरम्यान दुसरी गोष्ट होऊन जाते. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचे पहिले वर्ष पुरे होऊन जाते. दुसऱ्या फिनान्स कमिशनच्या निर्णयाची वाट पाहण्याचे ठरविले तर दरम्यानच्या काळात तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची आर्थिक व्यवस्था करण्याची जिम्मेदारी घ्यावी लागते. पाच वर्षाचा जो काळ आहे त्यातील एका वर्षाकरिता तुटीची व्यवस्था करण्याची जिम्मेदारी घेतल्यानंतर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतील बाकीची चार वर्षे वाऱ्यावर सोडून द्या हे म्हणणे बरोबर होणार नाही.

अध्यक्ष महाराज, हा जो निर्णय घेण्यात आला तो ही दोन वर्षे आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची पहिली चार वर्षे अशी एकूण सहा वर्षे अशा बेसिसवर घेण्यात आला. आपण वर्किंग कमिटीचा ठराव पाहिला तर आपल्या लक्षात येईल की अर्थव्यवस्था जी घेण्यात आलेली आहे ती पहिल्या सहा वर्षांच्या तुटीची घेण्यात आलेली आहे. पुढची चार वर्षे ही मुदत देण्यामागील दृष्टीकोन एवढाच आहे की, मदत ही एकदम काढून घेतली जाऊ नये. अनुभव असा आहे की दिली जात असलेली मदत एकदम तोडून टाकणे श्रेयस्कर नसते.

वाऱ्यावर सोडून देणे योग्य होणार नाही असे मी म्हणालो त्याचा अर्थ एवढाच की मदत देण्याचे तत्त्व एकदा स्वीकारल्यानंतर योग्य त्या मुदतीपर्यंत मदत दिली गेली पाहिजे. मध्येच मदत तोडता कामा नये. यासाठी केवळ या दोन वर्षांचा किंवा या फायनान्स कमिशनची मुदत संपेपर्यंत मदत करण्याचा प्रश्न नाही. नवे राज्य निर्माण होत आहे त्यावेळी ही नवीन जबाबदारी घेत असताना व ते राज्य आपला विकास करू इच्छित असताना आपणास मदत करावी अशी त्या राज्याची इच्छा असेल तर आपण ती का मान्य करू नये? तत्त्व म्हणून ही मदतीची गोष्ट मान्य करावयाची आणि तपशिलाच्या वेळी त्यापासून दूर जावयाचे हे बरोबर नाही. हे नवीन निर्माण होणारे राज्य तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची जिम्मेदारी उचलत असताना त्याला मदत करणे जरूरीचे आहे याच हेतूने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची पहिली चार वर्षे आणि पुढची चार वर्षे मदतीसाठी म्हणून स्वीकारण्यात आली. सुरू करण्यात आलेली मदत एकदम बंद करणे इष्ट ठरणार नसल्याने ही मदत हळूहळू कमी करत जावे एवढाच यामागील उद्देश आहे. १० वर्षांऐवजी ८ वर्षे एवढाच या मुदतीत फेरफार होऊ शकतो.

फायनान्स कमिशन या राज्याचा विचार करील तसा त्याही राज्याचा विचार करील. फायनान्स कमिशनपुढे काय विचार करील याचा विचार आम्ही विभाजनाचा विचार करीत असताना करण्याचे काही कारण नव्हते. आम्ही काय करू शकतो याचाच फक्त आम्ही विचार केला. १९६२ साली बसणारे फायनान्स कमिशन निव्वळ गुजरात राज्याचा विचार करील असे नाही तर आमच्याही राज्याचा विचार करील. माझ्या राज्यासाठी काही मदतीची आवश्यकता आहे असे मला वाटले तर त्यावेळी मी माझे विचार जरूर फायनान्स कमिशनसमोर मांडीन, मला मांडावे लागतील. फायनान्स कमिशन काही एखाद दुसऱ्या राज्याचा विचार करीत नाही. सगळ्याच राज्यांचा विचार करीत असते. १९६२ साली बसणाऱ्या फायनान्स कमिशनसमोर ज्या गोष्टी मांडणे त्यावेळी आम्हाला इष्ट वाटतील त्या गोष्टी आम्ही जरूर मांडू. ही मदत किती व किती काळपर्यंत द्यावयाची याची बैठक व्यावहारिक तत्त्वावर आधारलेली आहे असे मला वाटते. तत्त्वशून्य टीकेला मी उत्तर देऊ शकत नाही. तत्त्व आणि व्यवहार यांचा समन्वय साधल्याशिवाय पुढे जाता येत नसते. व्यवहाराशिवाय तत्त्व हा केवळ आंधळेपणा होईल.

तत्त्वाशिवाय व्यवहार होऊ शकत नाही हे त्यांच्याच पुढाऱ्यांचे वाक्य मी त्यांच्या माहितीकरिता सांगू इच्छितो. आपल्याला व्यवहार सोडून चालणार नाही. त्यानंतर मी दुसऱ्या गोष्टीकडे वळतो. डांग, उंबरगाव, यासंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आले.

शंका मांडण्यात आल्या. यासंबंधीचे निर्णय कसे घेण्यात आलेले आहेत याचा खुलासा मी माझ्या प्रास्ताविक भाषणात केलेला आहेच. मदत करण्याचे तत्त्व एकदा स्वीकारल्यानंतर त्याचा तपशील कसा आखावा याचा विचार करण्यासाठी आम्ही बसलेलो होतो. मध्यवर्ती सरकारने काय करावे हे ठरविण्याचे काम मध्यवर्ती सरकारचे आहे. मध्यवर्ती सरकारने काय करावे हे सांगण्याचे काम माझे नाही. या राज्यावर काही जबाबदारी येत असेल तर राज्याच्या आर्थिक परिस्थितीकडे लक्ष वेधण्याचे काम माझे आहे आणि वेळ आली तर ते केल्याशिवाय मी राहणार नाही. आम्हाला गुजरात राज्याला मदत करावयाची होती आणि त्यासाठी आम्ही बसलेलो होतो. मध्यवर्ती सरकारने काही मदत करावी अशी आमची अपेक्षा नव्हती आणि आम्हाला त्याची जरूरी वाटली नाही.

मी बाकीच्या दोन तीन प्रश्नांसंबंधी उल्लेख करीत होतो. पहिली गोष्ट अशी की, समितीने काय केले किंवा परिषदेने काय केले किंवा केले नाही याबाबत मनात काही योजून आम्ही या गोष्टी केलेल्या नाहीत.

डांगच्या प्रश्नासंबधी माझे मित्र श्री. दत्ता देशमुख यांच्या भावना किती तीव्र आहेत याची कल्पना मला आहे. समितीतदेखील त्यांनी याबाबत तीव्र विरोध केलेला होता याची मला वैयक्तिक रीत्या माहिती आहे. त्यांच्या ज्या भावना आहेत त्याबद्दल माझा विरोध नाही. त्यांच्या भावना मला समजू शकतात. सीमा प्रदेशाचा विचार करताना जनतेचे मत विचारात घेतले पाहिजे यांत शंका नाही. डांगचा हा प्रश्न सोडविताना लोकल बोर्डाचा निर्णय विचारात घेण्यात आलेला आहे. येथील लोकल बोर्डाने दोनदा ठराव पास केलेला आहे की, डांगचा समावेश गुजरातमध्ये करण्यात यावा. त्याकडे दुर्लक्ष करून तो आपल्या मताप्रमाणे सोडविणे आम्हाला इष्ट वाटले नाही. त्या मंडळींनी या प्रश्नाबाबत नापसंती व्यक्त केलेली असली तरी तिला ते शेवटपर्यंत चिकटून राहतील अशी मी आशा व्यक्त करतो. मी हे सर्व एवढ्यासाठी सांगत आहे की, ज्या मंडळींनी उकाईचा उल्लेख केला त्यांनी माझ्याजवळ असे मत प्रदर्शित केले की, डांगमधील ५०-५० टक्के भाग आपण दोन्ही प्रदेशात वाटून घेऊया. परंतु मी या गोष्टीला नकार दिला. ही सौदेबाजी मला पसंत नाही. डांगी लोकांची अशी ताटातूट करणे मला पसंत नाही. त्यांना गुजरातमध्ये राहावयाचे असेल तर तेथे त्यांनी राहण्यास माझी हरकत नाही. परंतु त्यांची दोन राज्यात फाटाफूट करावी असे मला मुळीच वाटत नाही. ही जनता एकाच राज्याच्या छत्राखाली गेली याबद्दल मला आनंद होत आहे. अर्धी जनता या राज्यात आणि अर्धी जनता त्या राज्यात ही गोष्ट

स्वीकारण्यास मी तयार नाही.

या उकाई धरणाच्या बाबतीत असा एक प्रश्न करण्यात आला की, त्याला मी प्रिसीडंट द्यावा. पुष्कळ प्रश्नांना प्रिसीडंट द्यावा असा आजचा काळ आहे. द्विभाषिक निर्माण करणाऱ्यांमध्ये मी नव्हतो हे मी आपल्याला सांगू इच्छितो. द्विभाषिक निर्माण करणाऱ्यांमध्ये आमचे पुष्कळ नेते होते. मी मात्र द्विभाषिक चालविण्याची जबाबदारी घेतली, पण द्विभाषिक आणण्याची जिम्मेदारी ज्यांची आहे त्यांच्यामध्ये मी भागीदार नाही हे मी आपल्याला स्पष्टपणे सांगू चाहतो. हे द्विभाषिक निर्माण करण्यातच हिंदुस्थानाच्या राज्यांमध्ये एक प्रिसीडंट घडत आहे. मी या प्रश्नामध्ये जास्त शिरू इच्छित नाही आणि सभागृहाचा वेळसुद्धा घेऊ इच्छित नाही. सीमेसंबंधी जो वाद तडजोडीने मिटविण्याचा प्रयत्न केलेला आहे तो चांगल्या बंधुभावाने स्वीकारणे यातच दोन्हीही समाजाचे कल्याण आणि हित आहे. हा प्रश्न ज्वलंत ठेवून, जिवंत ठेवून, वादग्रस्त ठेवून, कदाचित् आमचे राजकीय हितसंबंध साधले जाणे शक्य आहे, पण दोन समाजाच्या जीवनाचा विकास करण्याच्या दृष्टीने आणि दोन्ही राज्यांची कामे पुरी व्हावयाची असतील तर या प्रश्नांना कुठेतरी पूर्णविराम दिला पाहिजे. म्हणून महागुजरात परिषदेच्या कार्यकर्त्यांना विनंती आहे की त्यांना पुढेही आम्ही आमची गावे देऊ अशी आशा त्यांनी सोडून द्यावी. जी गावे आम्ही उकाई धरण बांधण्याच्या दृष्टीने गुजरातला दिली त्याचे कारण असे आहे की, ती योजना पुरी व्हावी आणि त्या योजनेच्या अंमलबजावणीच्या मार्गात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, या हेतूने प्रेरित होऊनच आम्ही ती गोष्ट स्वीकारली. मला जो अनुभव आहे त्यावरून मी सांगू चाहतो की, एकदा एक मागणी मंजूर झाली की लगेच दुसरी मागणी पुढे करण्यात येते. असे करू नये अशी मी महागुजरात परिषदेच्या कार्यकर्त्यांना विनंती करतो, आणि यापुढे हा वाद बंद करण्यात यावा. ही विनंती मी दोन्हीही बाजूंना करू इच्छितो. वर्किंग कमिटीने आपल्या ठरावात जो स्मूथ एक्झिक्यूशन हा शब्दप्रयोग केलेला आहे, त्यामुळे महाराष्ट्रावर काही ॲस्पर्शन उडविले असते तर मी जरूर ऑब्जेक्शन घेतले असते. त्या धरणाची उंची जास्तीत जास्त किती होईल आणि त्याकरिता जे रिझरव्हॉयर होणार आहे त्या आधारावरही ही खेडी ठरविण्यात आलेली आहेत. जी माहिती होती ती सांगितली गेलेली आहे. नकाशा वगैरे तयार आहे. माझे फक्त हेच म्हणणे आहे की, त्याची उंची अजून ठरलेली नाही आणि महाराष्ट्राला किती पाणी मिळावे हा चर्चेचा प्रश्न आहे. हा प्रश्न सोडविण्याकरिता आम्ही तो चौकशीकरिता इंजिनियरकडे सोपविणार आहोत. तसेच त्यांच्याकडे फॅक्ट फाइंडिंगचे काम देणार आहोत. तो प्रॉजेक्ट मंजूर झाल्यानंतर

जास्तीत जास्त किती मोठा होईल हे गृहीत धरूनच आम्ही ती गावे गुजरातला दिलेली आहेत. आता प्रॉजेक्टचा प्रश्न सोडवावयाचा नसून आपण सीमांचा प्रश्न सोडवीत आहोत.

सीमेच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे शंकेचे वातावरण ठेऊ नये कारण अशी शंका ठेवल्याने कोणतेही महत्त्वाचे प्रश्न सामोपचाराने सुटणार नाहीत. हा गुजरात आणि महाराष्ट्र यांच्या दरम्यानचा प्रश्न आहे.

आता एक प्रश्न माझ्या मित्रांनी केला आहे की, तालुका हे युनिट धरून या प्रश्नाचा निकाल लावावा. मी असे म्हणेन की, आम्ही पाटसकर तत्त्वांचा स्वीकार केलेला आहे. जास्तीत जास्त भाषिक दृष्टीने गावांची संख्या आणि त्याचप्रमाणे लोकांची इच्छा काय आहे इकडे लक्ष देऊन त्यावेळी त्या तत्त्वांची सरमिसळ केली गेली. १५-१६ गावांसंबंधी माझी माहिती अशी आहे की, ग्रामपंचायतींकडून जेव्हा हा प्रश्न गृहमंत्र्यापुढे म्हणजे **पंडित पंतांच्या**[३१] पुढे मांडण्यात आला तेव्हा मीही एक बाजू मांडण्याकरिता गेलो. त्यावेळी मला तेथे असे रेकॉर्ड दाखविण्यात आले की, ग्रामपंचायतीने ठराव केला आहे आणि म्हणून त्याला अनुसरूनच हा निर्णय घेतला गेला आहे. या सीमांचा प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही काही तत्त्वांचा स्वीकार केला आहे. पाटसकर फॉर्म्युला तत्त्वाचा स्वीकार केला गेला आहे, अशी माझी कल्पना आहे.

ही गावे महाराष्ट्रात यावी असे म्हणणारे जे लोक होते ते उत्तरेकडील भागातले होते आणि त्याचप्रमाणे गुजरातमध्ये जावे अशी दक्षिणेची बाजूही आहे. गुजरातमध्ये जावे असा ठराव केलेली काही गावे आता महाराष्ट्रातच आहेत. मी जास्त काही सांगू इच्छित नाही. सलगपणा आणि लोकांची इच्छा हे जर पाटसकर ॲवॉर्डाचे सूत्र असेल तर ते सबस्टॅन्शिअली घेतले आहे. अध्यक्ष महाराज, मी आता हा प्रश्न सोडून देतो. मी आता ठरविले आहे की, मी आता कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देणार नाही.

मला खरे प्रश्न जे महत्त्वाचे वाटतात आणि ज्यांचा मी या सभागृहासमोर केला पाहिजे त्या प्रश्नांचा विचार मी आता करतो. महाराष्ट्र राज्याची रचना झाल्यानंतर निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा येथे विचार करणे जरूर आहे. त्यासंबंधी पहिला प्रश्न हा आहे की, नागपूर ॲग्रीमेंटमध्ये काय काय ठरविण्यात आलेले आहे त्याचे येथे स्पष्टीकरण करणे जरूरीचे आहे. अध्यक्ष महाराज, त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, हे जे तत्त्व ठरविण्यात आलेले आहे त्याच्या पाठीमागे जी भावना होती ती आपण अगोदर पाहू या. म्हणजे जे जे ठरविण्यात आलेले आहे ते कितपत योग्य होते आणि कितपत अयोग्य

होते हे समजून येईल. मी पहिल्यांदा असे सांगू इच्छितो की, नागपूर ॲग्रीमेंट हा कोणाच्या सदिच्छेवर ठरविण्यात आलेला नाही. त्या ॲग्रीमेंटला कायद्याचे रूप दिले पाहिजे हे मी तत्त्वतः मंजूर करतो. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने जे पहिले मेमोरेंडम मांडले आहे त्यातही त्यांनी ही गोष्ट स्वीकारली आहे आणि ती माझ्याजवळ आहे. मी आपणाला वाचून दाखवू इच्छितो. त्यामध्ये त्यांनी ही गोष्ट तत्त्वतः स्वीकारलेली आहे असे दिसून येते. मलाही ती गोष्ट मंजूर आहे. मी त्या विचाराला मान्यता द्यावयाला तयार आहे.

All possible steps will be taken to give to the Nagpur Agreement legal and conventional sanction.

अशा काही गोष्टी आहेत की ज्यांना लीगल व्हॅलिडिटी देण्याची शक्यता आहे आणि काही अशा आहेत ज्यांना कन्वेन्शनल व्हॅलिडिटी देण्याची शक्यता नाही आणि म्हणून या गोष्टीची चर्चा जेव्हा केली गेली तेव्हा त्याबाबत मी असा खुलासा करू इच्छितो की, १९५६ साली जेव्हा रिऑर्गनाइझेशनबद्दल चर्चा झाली त्या चर्चेच्या वेळी हजर रहाण्याची संधी मला मिळाली होती. त्याच अनुषंगाने मी हा प्रश्नही हाताळू इच्छितो. त्यावेळी ज्या ज्या गोष्टी उपस्थित करण्यात आल्या होत्या त्याच प्रकारच्या पुष्कळशा गोष्टी येथेही उपस्थित करण्यात आल्या आहेत. असे प्रश्न सोडवीत असताना त्यांना कायद्याचे रूप कसे देता येईल याचाही पण त्यावेळी विचार झाला. त्यावेळचे देशाचे कायदेमंत्री यांनी त्याबाबतीमध्ये काही प्रयत्न केला. त्यांच्या या प्रयत्नाचे फलस्वरूप म्हणून ३७१ आर्टिकल आले आहे. मी याच संदर्भात हेही पण सांगू इच्छितो की, जेव्हा हे आर्टिकल तयार झाले तेव्हा द्विभाषिक अस्तित्वात नव्हते. ते मूळ आर्टिकल महाराष्ट्राच्या रचनेकरिता तयार केले गेले होते. नंतर द्विभाषिक आले. त्यात कच्छ, सौराष्ट्र आदींचा उल्लेख आला. ३७१ हे आर्टिकल नागपूर ॲग्रीमेंटला लीगल व्हॅलिडिटी देण्याच्या हेतूनी आणले गेले आहे. यामध्ये घालण्यात आलेले जे शब्दप्रयोग आहेत ते कॉन्स्टिट्यूशनल आहेत आणि सरकारने तीच भाषा आपल्या पॉलिसी स्टेटमेंटमध्ये वापरलेली आहे.

याबाबतीत माझे विचार असे आहेत की, नागपूर ॲग्रीमेंटचा महत्त्वाचा पहिला मुद्दा असा होता की, विदर्भ आणि मराठवाडा यांच्या विकासाच्या गतीला निश्चितता यावी याची काहीतरी व्यवस्था असली पाहिजे. महत्त्वाचा दुसरा प्रश्न असा होता की, शिक्षणाची म्हणजे तांत्रिक आणि इतर शिक्षणाच्या व्यवस्थेचा प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविला गेला पाहिजे, म्हणजे त्याची सरकारने काळजी घेतली पाहिजे.

तिसरा मुद्दा सरकारी नोकरांचा होता. त्यांना सरकारी नोकरीत योग्य प्रमाणात वाव मिळाला पाहिजे हा हेतू त्यामध्ये होता. याशिवाय आणखीही एक अट अशी होती की, त्या भागात विकासाची गती कशी आहे याचा एक अहवाल या सभागृहाला मिळाला पाहिजे. नागपूर ॲग्रीमेंटचे पहिले पाऊल हे कॉन्स्टिट्यूशनच्या ३७१ कलमाप्रमाणे स्ट्यॅट्युटरी बोर्ड निर्माण करणे हे होय. आणि त्याप्रमाणे स्ट्यॅट्युटरी बोर्ड निर्माण करण्याचे आश्वासन आणि धोरण सरकारने स्वीकारल्यानंतर यात आता ज्या ज्या अडचणी निर्माण होत आहेत त्या अडचणी सोडविण्याकरिता ३७१ आर्टिकलचा कितपत उपयोग होतो हे आपणाला पाहिले पाहिजे.

दुसरा प्रश्न हायकोर्टाच्या मागणीचा होता. तो मला मंजूर आहे ही गोष्ट जेव्हा चर्चेला आली तेव्हा असे सुचविण्यात आले होते की आता जी व्यवस्था आहे ती रिऑर्गनायझेशन ॲक्टप्रमाणे तशीच राहू द्यावी. मला कदाचित् ते चालेल. पण नंतर विचार केला की हे बरोबर नाही. संपूर्ण व्यवस्था केलेली बरी. हिंदुस्थान सरकारकडून याबाबतीत एक अमेंडमेंट किंवा उपसूचना या विधेयकाला सुचवली गेली आहे, ह्याचा आपण विचार करावा. जी गोष्ट नागपूर ॲग्रीमेंटमध्ये नव्हती त्या गोष्टीचा उल्लेख माझ्या एका मित्राने आपल्या भाषणात केला आहे. नागपूर ॲग्रीमेंटबाबत सरकारतर्फे एक पॉलिसी स्टेटमेंट देण्यात आलेले आहे. त्या पॉलिसी स्टेटमेंटमध्ये काही नवीन गोष्टींचा उल्लेख केला गेला आहे. Exploitation of Minerals etc... याचा आग्रहपूर्वक उल्लेख केला गेला आहे. विदर्भामध्ये बेसिक इंडस्ट्रीज वाढविण्याची आवश्यकता आहे. लोकांचे राहणीमान वर आणले पाहिजे. पॉलिसी स्टेटमेंटमध्ये या घोषणेचा मुद्दाम उल्लेख केला गेला आहे.

दुसरी गोष्ट जी राहते ती ही की, नागपूरला भरणारे अधिवेशन आणि सरकारचा नागपूरला मुक्काम. मी या संबंधात असे सांगू इच्छितो की, या सर्व गोष्टी या बिलात आल्या पाहिजेत असे नाही. आता यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी आहेत. मला असे वाटते की महाराष्ट्र राज्याची जी नवी असेंब्ली राहील ती या संबंधात तज्ज्ञांचा सल्ला घेऊन जे आवश्यक असेल तशा प्रकारचा कायदाही पास करील किंवा कायदा करू शकत नसेल तर एक ठराव पास करून तो ठराव अंमलात आणण्याची जिम्मेदारी सरकार स्वीकारील. हेही जरी शक्य नसेल तर त्यांना ऑल्टरनेटिव्ह म्हणून त्यास सेकन्ड कॅपिटल म्हणून मान्यता देऊ. सांगण्याचे तात्पर्य हे की जे काही जरूर आणि शक्य असेल ते सर्व करण्यात येईल. कायदा करण्याची शक्यता नसेल तर औपचारिक एक ठराव मंजूर करून सरकारवर त्या ठरावाच्या अंमलबजावणीचे बंधन असणार.

ठरावाच्या रूपानेही ते येऊ शकत नसेल तर त्यामध्ये कोठेतरी काहीतरी खळखळ आहे असे मानले पाहिजे. याच संदर्भात मी अशी विनंती करू इच्छितो की, नवीन राज्य होत असताना आपण कृपा करून कोणताही संशय मनात ठेऊ नये. काही लोक मनामध्ये संशय बाळगतात म्हणून मी या गोष्टीचा उल्लेख करीत आहे. नागपूर कराराला कायद्यात स्थान द्यावयास पाहिजे, दिले पाहिजे असे मलाही वाटते. पण ते आता देऊ शकत नाही याचे कारण आम्ही ह्या असेंब्लीमध्ये तसा ठराव आणलेला नाही आणि ते पार्लमेंटमध्ये अव्यवहार्य ठरू नये असे मला वाटते. सिलेक्ट कमिटीच्या स्टेजच्या वेळी दिल्लीमध्ये जाऊन यासंबंधी चर्चा करावयाची आवश्यकता असेल तर मी जरूर करीन.

दुसरा एक प्रश्न आहे की ज्याचा उल्लेख येथे करू नये असे माझ्या भाषणाच्या सुरुवातीस मला वाटले होते कारण या विभाजन बिलाच्या वेळी ते बोलणे कितपत रिलेव्हंट होईल अशी मला शंका होती आणि म्हणून मी बोललो नव्हतो. हा प्रश्न नवबौद्धांसंबंधीच आहे. ह्या प्रश्नासंबंधी माझ्या बऱ्याच सन्माननीय सभासद मित्रांनी उल्लेख केला आहे. त्याबाबत मी या सन्माननीय सभागृहाला जाहीरपणे असे सांगू इच्छितो की, नवबौद्धांचा प्रश्न हा नव्या महाराष्ट्रामध्ये समाज जीवनाचा एक अतिशय नाजूक प्रश्न आहे आणि तो प्रश्न जिव्हाळ्याने, समझोत्याने आणि समाज जीवनामध्ये एकजिनसीपणा येईल या दृष्टीने सोडविला पाहिजे असे धोरण आम्ही स्वीकारले आहे. तसा तो सोडविला जाईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टीने नवबौद्धांच्या मागणीसंबंधी, सवलतीसंबंधी पुनर्विभाजनानंतर तातडीने विचार करावयाचे ठरविले असून न्याय्य पद्धतीने तो सोडविण्याचा विचार केला आहे. विशेषतः संयुक्त महाराष्ट्र परिषदेने या बाबतीत जो खलिता पाठविला होता त्या खलित्याच्या १४ व्या पॅरिग्राफमध्ये ज्या भावना व्यक्त केल्या होत्या त्या भावना माझ्या विचाराच्या प्रतिनिधीक आहेत अशी चर्चा मी समितीच्या मंडळींशी आणि रिपब्लिकन पक्षाच्या मंडळींशी केली होती. ती भावना खरी आहे असे मी आवर्जून सांगू इच्छितो. मी माझ्या विचारांचे प्रदर्शन एवढ्यासाठी करतो की, जर चुकून रिपब्लिकन पक्षाच्या आणि नवबौद्धांच्या नेत्यांच्या मनात शंका असेल तर त्यांनी ती काढून टाकावी. मी असे म्हणेन की, संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे या त्यांच्या भावना अन्‌कंडिशनल होत्या आणि तो झाल्यानंतर त्यांनी आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. तो करीत असताना कंडिशन्स घालावयाच्या अशी भूमिका त्यांनी घेऊ नये अशी मी नवबौद्ध कार्यकर्त्यांना विनंती करीन.

त्या त्या गोष्टींचा पुनरुच्चार करू नये अशी माझी इच्छा होती पण एका सन्माननीय

सभासदांनी प्रश्न उपस्थित केला म्हणून मला बोलावे लागतेः सन्माननीय सभासद **श्री. शिर्के**[३२] हे बोलताना असे म्हणाले की मराठी भाषिक राज्य होणार की मराठा राज्य होणार याची भीती वाटते. अशा प्रकारे बोलून ते स्वतःवर आणि मराठा समाजावर अन्याय करीत आहेत. मी असे सांगू इच्छितो की, तसे होणार नाही आणि आम्ही तसे होऊ देणार नाही. या गोष्टींचा पुनरुच्चार मी टाळीत होतो पण मी जर बोललो नाही तर बाहेर बोलतो आणि येथे बोलत नाही असे म्हटले जाण्याचा संभव आहे. ह्या प्रश्नासंबंधी सर्वसाधारण भूमिका मी सभागृहापुढे ठेवली आहे. मला एक विनंती करावयाची आहे ती ही की, मराठवाडा, विदर्भ आणि महाराष्ट्र यांच्यामध्ये एकभावना निर्माण झाली पाहिजे.

मी असे मानतो की, मराठवाडा, विदर्भ, नवबौद्ध, मध्यमवर्ग ह्या सगळ्यांच्या अडचणी आपल्याला सोडवावयाच्या आहेत, तेव्हा सगळ्यांनी महाराष्ट्रामध्ये एकजिनसी समाज निर्माण करण्याचे काम केले पाहिजे. ते जर शक्य झाले तर बाकीचे काम होणार आहे. दुय्यम गोष्टींना प्रमुख स्थान दिले तर आपण काहीतरी चुकीचे करू असे वाटल्यामुळे मी हे बोललो आहे. कोणालाही देताना खळखळ करावी अशी भावना आम्ही ठेवणार नाही. आमच्या विदर्भातील मित्रांनी विदर्भाचे स्वतंत्र राज्य व्हावे अशी मागणी केली होती, पण ज्यावेळी काँग्रेस वर्किंग कमिटीचा निर्णय झाला त्यावेळी अमुक दिले तर राहावयाचे, नाही तर राहावयाचे नाही, अशी भूमिका त्यांनी सोडून दिली आहे. आपण एकत्र राहावयाचे तर तुमचे आमचे एकच भवितव्य आहे ही भावना ठेवली पाहिजे आणि तशी भावना ठेवली तरच आपण ह्या राज्याचा विस्तार करू शकणार आहोत. हे सगळे व्हावयाचे असेल तर सगळ्यांनी महाराष्ट्राचा उत्कर्ष करणे ही पहिली प्रतिज्ञा मानली पाहिजे. तसे केले तर जे स्वप्न डोळ्यापुढे ठेवले होते ते पूर्ण झाल्याचा आनंद होईल. नवीन राज्य व्हावे अशी सर्वांची इच्छा होती पण नवीन जन्म झाल्यानंतर पुढील प्रवास खडतर आहे याची जाणीव ठेवून प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. तसे झाले तर एकजिनसी राज्य निर्माण होईल आणि भावी महाराष्ट्राच्या आशा आकांशा पूर्ण होतील. नवीन गुजरात राज्य निर्माण होणार आहे त्याला मी सदिच्छा व्यक्त करतो. माझे मित्र सन्माननीय सभासद श्री. एस्.एम्. जोशी यांना मी असे सांगत होतो की, द्विभाषिक राज्यातही एकभाषिक राज्याचे फायदे होत होते, आता मी असे म्हणेन की, एकभाषिक राज्य निर्माण झाल्यानंतर त्यात द्विभाषिकाचे फायदे होतील.

तारीख २७ एप्रिलला जर नवीन राज्ये स्थापन करता आली असती तर मला

अत्यंत आनंद झाला असता. परंतु तारीख २७ एप्रिलला जर ही राज्ये स्थापन करता आली नाहीत आणि ती जर तारीख १ मेला स्थापन करावी लागली तर मी माझ्या मनाशी अशी समजून करून घेईन की, तारीख १ मेलाच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुनर्जन्म झाला आहे. सन्माननीय सभासदांच्या जीवनाशी आणि त्या दृष्टीने जर हा प्रश्न सोडविता येण्याजोगा असला तर तसा प्रयत्न जरूर केला जाईल.

■ ■ ■

Discussion on Bombay Re-organisation Bill was continued on 17th March 1960. The Chief Minister, Shri Y.B.Chavan, explained to the House why Maharashtra had agreed to give help of ten crores rupees to Gujarat to build its new capital and said that Dang and Umbergaon were made over to Gujarat as the respective District Boards had passed a resolution recommending merger with Gujarat.

# मुंबई राज्य पुनर्रचना विधेयकावरील चर्चा*

**१८ मार्च १९६०**

*वरील विधेयकावर दुसऱ्या दिवशी सभागृहात चर्चा झाली तेव्हा मा. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी दिलेले उत्तर.*

अध्यक्ष महाराज, मला आता जे काही बोलावयाचे आहे ते मी सरकारच्या दृष्टीने बोलत नसून विरोधी पक्षाकडून बोलत आहे असे समजतो. महाराष्ट्र राज्याची रचना होत असताना बाहेरच्या जनतेच्या काही विशिष्ट भावना असतात आणि त्या तशा राहणेही पण स्वाभाविक आहे. त्यांची ती भावना समजून घेण्याचा मी प्रयत्न करीत आहे. नागपूर ॲग्रीमेंटमध्ये जी काही तिथल्या जनतेला आश्वासने देण्यात आलेली आहेत ती आश्वासने पाळण्याचा आमचा विचार आणि निर्धार आहे, कारण एक नवीन राज्य निर्माण होत असताना जी काही एक प्रकारची गंभीर परिस्थिती निर्माण होत असते, तिकडे लक्ष देऊन लोकांच्या आशाआकांक्षा काय आहेत हे समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. पुष्कळ गोष्टी अशा असतात की, ज्या कायद्याच्या कक्षेत बसू शकत नाहीत. जी गोष्ट कायद्याने शक्य नसेल तिची पूर्तता इतर ज्या मार्गांनी शक्य असेल त्या मार्गांनी आम्ही करण्याचा प्रयत्न करू. आमचा हेतू स्पष्ट आहे. आणि तो हेतू हा की, कायद्यामध्ये जी गोष्ट आणता येते ती जरूर आणावी. हायकोर्टाच्या बेंचसंबंधी सभागृहासमोर जी विनंती आली आहे ती विनंती सभागृहाने स्वीकारली आहे. त्याचप्रमाणे इतर गोष्टीही करता येणे शक्य असेल त्या त्या सर्व गोष्टी पूर्ण करण्याचा माझा विचार आहे. ३७१ आर्टिकलमध्ये ज्या

* Bombay Legislative Assembly Debates, Vol. 10, Part II (Inside No. 13), 18th March 1960, pp. 896 to 899.

गोष्टींचा उल्लेख केला गेला आहे त्या बाबतीत अध्यक्षांनी सांगितलेल्या अडचणी मला मान्य आहेत. त्या आर्टिकलप्रमाणे बोर्ड स्थापित करण्याच्या संबंधाने सरकारचे धोरण जाहीर झाल्यानंतर मग त्यामध्ये शंकाकुशंका काढत बसण्याचे कारण उरणार नाही. शैक्षणिक सवलतीबद्दल काही विचार मांडण्यात आले. त्यांचे ते विचार खरे आहेत असे मला वाटते. माझे तर असेही म्हणणे आहे की, शिक्षणाच्या जास्तीत जास्त सवलती प्रत्येक विभागाला दिल्या गेल्या पाहिजेत. सरकार जर तसे करू शकत असेल तर त्याबद्दल मला अधिक आनंद वाटेल. ज्या ज्या म्हणून शैक्षणिक सवलती आतापर्यंत होत्या त्या काढून घेण्याचा प्रश्नच येत नाही. ९०० रुपयांपर्यंत ज्यांचे सालीना उत्पन्न आहे त्यांना मोफत शिक्षण देण्याची सरकारने व्यवस्था केली आहे. सरकारच्या या योजनेमुळे गरीब लोकांना बऱ्याच सवलती मिळतील. विदर्भाला आणि मराठवाड्यालाही मिळत राहतील. सरकारचा हा निर्णय सौराष्ट्रालाही पण लागू पडतो. अशा प्रकारे लोकांना शैक्षणिक सवलती अधिक प्रमाणात मिळू शकतील. ज्या ज्या म्हणून अधिक सवलती सध्या विदर्भात आणि मराठवाड्यात असतील त्या काढून घेण्याचा आमचा विचार नाही. त्या सर्व मिळत राहतील. सवलत देण्याचा किंवा सवलती मिळविताना त्या सवलतींचा अर्थ काय तेही समजून घेण्याचा प्रयत्न करावा अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. बहुजन आणि दलित समाजाच्या दृष्टीने विदर्भ आणि मराठवाड्याला ज्या काही सवलती दिल्या गेल्या असतील त्या कमी करण्याचा आमचा उद्देश नाही. आवश्यक असेल आणि होत असेल तर त्या सवलतींचे प्रमाण जास्तच करू. मराठवाड्यामध्ये खाजगी शाळा फार कमी आहेत. सरकारकडून जास्त प्रमाणात सरकारी शाळा निघू शकणार नाहीत. परंतु त्याचबरोबर खाजगी संस्थांना शाळा उघडण्याकरिता उत्तेजन मात्र दिले जाईल आणि अशा रीतीने सरकार सवलत देऊ शकेल. एवढे मात्र खरे की, एज्युकेशनचे पॅटर्न मात्र सरकार सगळीकडे एका पातळीवर आणू इच्छिते. त्या दृष्टिने थोडाफार फरक होत असेल तर असे समजण्यात येऊ नये की सरकार सवलती काढून घेत आहे. थोडा फार बदल होतच राहणार. तसा बदल सहन करावाच लागेल.

पॉलिसी स्टेटमेंट करीत असताना मी गोड गोड बोललो असे म्हटले जाते ते खरे नाही. कारण ज्या ज्या गोष्टी ठरवावयाच्या असतात त्या त्या सर्व गोष्टींचा संबंध फायनान्शियल इंप्लिकेशन्सशी असतो. म्हणून इतक्यात त्या गोष्टीसंबंधी तपशीलवार बोलता येत नाही. नवीन सरकारी हायस्कूल्स निघाली पाहिजेत असे म्हणणे बरोबर होणार नाही. खाजगी शाळा काढण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. सर्व गोष्टींचा सरकारवर

बोजा पडून चालणार नाही याचाही आपण विचार करावयाला हवा. मराठवाड्याला युनिव्हर्सिटी देताना असे म्हटले गेले होते की, युनिव्हर्सिटी देण्याकरिता जास्त प्रमाणात हायस्कूल्स आणि कॉलेजेसची आवश्यकता असते. मराठवाड्यात कॉलेजेसची संख्या फार कमी आहे म्हणून त्यास स्वतंत्र अशी युनिव्हर्सिटी देऊ नये. मी त्याला उत्तर दिले की, जोपर्यंत युनिव्हर्सिटी असणार नाही तोपर्यंत संस्था निर्माण होणार नाहीत. म्हणून युनिव्हर्सिटीचा विचार झाला पाहिजे. युनिव्हर्सिटीचा विचार त्यांनी त्यामुळे स्वीकारला. आमचे असे म्हणणे आहे की, शिक्षणाची वाढ झाली पाहिजे, अधिक प्रमाणात शिक्षणसंस्था उघडल्या गेल्या पाहिजेत. माझे फक्त एवढेच म्हणणे आहे की, या बाबतीत लोकांनी चालविलेल्या संस्थांची वाढ झाली पाहिजे. सध्या ज्या ज्या म्हणून सवलती देण्यात आल्या असतील त्या काही कारणामुळे कमी करणे भाग पडत असेल तर त्याबद्दल आम्ही एकटेच निर्णय घेणार नाही. त्यासंबंधी चर्चा होणे आवश्यक असेल तर तशी चर्चा घेण्यात येईल. जे काही करण्यात येईल ते एक पक्ष या दृष्टीने आम्ही करणार नाही एवढे मात्र निश्चित. महाराष्ट्र राज्याच्या सर्व पक्षांनी मिळून या गोष्टीचा विचार केला पाहिजे. मी आश्वासन देताना असे म्हटले होते की, शक्य असेल तर लेजिस्लेशन आणि लेजिस्लेशन शक्य नसेल तर रिझोल्यूशन करून आपल्याला या गोष्टी करता येतील. या ठिकाणी महाराष्ट्र राज्याला कोणत्याही प्रकारचे बंधन घालू नये असेच माझे म्हणणे आहे. इतक्या गोष्टी स्पष्ट केल्यानंतर मला असे म्हणावयाचे आहे की, अमुक गोष्ट कायद्यात आली पाहिजे ही विचारसरणी **श्री. जसवंत मेहता**[३३] यांनी व्यक्त केली तशी श्री. बर्धन यांनी केली आहे. काही डिपार्टमेंटस् नागपूरला न्यावी लागतील पण ती कोणती हा तपशिलाचा प्रश्न आहे. मला असे वाटते की, शासनाच्या सोयीवर हा तपशिलाचा प्रश्न सोडून दिला पाहिजे. उद्याच्या महाराष्ट्र असेंब्लीमध्ये याचा विचार करावा लागेल आणि त्यावेळी याची चर्चा करता येईल. तेथे काही ऑफिसेस नेण्याच्या बाबतीत विचार करण्यासाठी तज्ज्ञांची कमिटी नेमावयाची असेल तर ती नेमावी लागेल. किती ऑफिसेस न्यावयाची, कोणती ऑफिसेस न्यावयाची आणि किती ऑफिसेस तेथे सामावण्यात येतील या प्रश्नाचा देखील विचार करावा लागेल.

सन्माननीय सभासद श्री.व्ही.एन्.पाटील यांनी जो मुद्दा मांडला तो मला मंजूर आहे. सर्वांना मंजूर आहे ही गोष्ट चांगली आहे. आम्ही कितीतरी गोष्टी या भागासाठी मांडलेल्या नाहीत. कोकणचा उल्लेख केला, दुष्काळी भागाचा उल्लेख केला म्हणजे बाकीचा महाराष्ट्रातील भाग प्रगतिपथावर आहे असे म्हणता येणार नाही. आम्ही ज्या

भागातून आलो आहोत तो भाग प्रगतिपथावर आहे असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होणार आहे. तरी पण त्या गोष्टी येथे मांडलेल्या नाहीत. ज्या शंका आहेत किंवा जे तणाव आहेत ते तणाव आणि संशय दूर व्हावे म्हणून मी ह्या गोष्टीचा उल्लेख केला आहे. शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपल्याला सर्व विभागात एकजिनसी महाराष्ट्र निर्माण करावयाचा आहे हा विचार ठरलेला आहे. ही प्रतिज्ञा एका पक्षाची नव्हे तर तुम्हा आम्हा सर्वांची आहे. एवढा खुलासा केल्यानंतर सन्माननीय सभासद श्री.बर्धन यांनी आपल्या उपसूचनांचा आग्रह धरू नये असे मला वाटते.

■ ■ ■

---

On 18th March 1960, Shri Y. B. Chavan, Chief Minister spoke on various aspects of the Bombay Reorganisation Bill. In regard to the doubts and fears expressed by the hon. Member, Shri A.B. Bardhan, about the continuance or otherwise of the concessions and facilities to the people of Vidarbha and Marathwada, Shri Y. B. Chavan announced that the Government would not waver from its resolve of carrying out in letter and spirit, whatever concessions were promised to those regions under the Nagpur pact. Shri Chavan made it clear that the Government had accepted the proposal of establishing a High Court Bench at Nagpur. He further said that the Government was not contemplating any reduction in the educational or other facilities sanctioned for Vidarbha and Marathwada. Regarding the objection raised against the formation of the Marathwada University, on the ground of inadequate number of high schools, and colleges in Marathwada, Shri Chavan explained that when once the University was established there would definitely be an increase in the number of high schools, colleges and other allied educational institutions in that region. He assured the House that everything possible would be done by Legislation or even by passing Resolutions. Shri Chavan concluded his speech by saying that the vow to form a homogeneous State of Maharashtra was taken by all of us and not by one party.

# सहकार्याबद्दल कृतज्ञता*

**२५ मार्च १९६०**

*महाराष्ट्र व गुजरात या द्विभाषिक राज्याचे सर्व विधान-सभा सदस्य, मंत्रीमंडळ व अध्यक्ष यांनी आपणांस चांगले सहकार्य दिले याबद्दल सभागृहासमोर कृतज्ञता व्यक्त करून मा. यशवंतराव चव्हाण यांनी सर्वांचे आभार मानले.*

---

अध्यक्ष महाराज, आज ज्या स्वरूपात ही विधानसभा आहे त्या स्वरूपात आजचा या विधानसभेचा शेवटचा दिवस आहे. अशा प्रसंगी, आपल्या परवानगीने मी माझ्या काही भावना या सभागृहासमोर ठेवू इच्छितो. गेली १५ वर्षे या सभागृहाला सन्माननीय सदस्य या नात्याने काम करण्याची संधी मला मिळालेली आहे. या सभागृहात वेगवेगळ्या ठिकाणी बसून सभागृहाच्या कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव प्राप्त करण्याचे सद्भाग्य मला लाभले आहे. या अवधीत ज्यांच्या सहकार्याने, ज्यांच्या मदतीने, कधी वाटून, कधी एकमताने काम केले असे या सभागृहाचे अनेक सन्माननीय सदस्य आज या सभागृहापासून कायदेशीररीत्या का होईना परंतु दूर जाणार असल्यामुळे मन किंचितसे उदास झालेले आहे. आज ज्या स्वरूपात हे राज्य आहे ते राज्य असेच चालवून यशस्वी होऊ शकले असते तर चांगले झाले असते यात शंका नाही, परंतु तसे ते होऊ शकले नाही ही परिस्थिती आहे, वस्तुस्थिती आहे. वस्तुस्थितीला मान देऊन हा निर्णय घेतल्यानंतर ज्यांच्याबरोबर काम करण्याचे सद्भाग्य गेली तीन वर्षे मला लाभले ते गुजरातमधील, सौराष्ट्रमधील, कच्छमधील या बाजूचे आणि त्या बाजूचेही आमचे

---

* Bombay Legislative Assembly Debates, Vol. 10, Part 2 (inside No. 16), Friday, 25th March 1960, pp. 1079 to 1081.

सहकारी आज दूर जाणार आहेत. या वियोगाच्या कल्पनेमुळे मनात जी उदासीनता निर्माण झालेली आहे ती या सभागृहासमोर नमूद करणे मी माझे कर्तव्य समजतो.

अध्यक्ष महाराज, गेली तीन वर्षे या सभागृहाचा नेता या नात्याने काम करण्याची संधी मला मिळाली आहे. या काळात माझ्या पक्षातील माझ्या सहकाऱ्यांनी, माझ्या मंत्रिमंडळातील माझ्या सहकाऱ्यांनी जे उत्कृष्ट सहकार्य मला दिले तसे सहकार्य, मला वाटते भारतीय संघराज्यातील इतर प्रांतांच्या मुख्यमंत्र्यांना क्वचितच लाभले असेल. माझ्यापेक्षा वयाने आणि अनुभवाने ज्येष्ठ असणाऱ्या माझ्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी ज्या निष्ठेने आणि शिस्तीने मला हा राज्यशकट हाकण्यात सहकार्य दिले ती शिस्त आणि ती निष्ठा आठवली की माझे मन एक प्रकारच्या कृतज्ञतेच्या भावनेने भरून येते. निष्ठा कशी पाळावी, शिस्त कशी पाळावी हे गुजरातचे वैशिष्ट्य आहे आणि राजकारणातील शिस्तीचे, निष्ठेचे शिक्षण गुजरातकडून घेण्यात आम्हाला कमीपणा वाटण्याचे कारण नाही अशी परिस्थिती आहे, आणि ही त्यांची आठवण माझ्या मनात कायमची राहील. माझे सहकारी, **डॉक्टर जीवराज मेहता**[३४] यांचा उल्लेख मला विशेषेकरून केला पाहिजे. मुंबई राज्याचे अर्थमंत्रीपद सांभाळण्यापूर्वी एक तज्ज्ञ डॉक्टर म्हणून ते प्रसिद्ध होते. १९५२ साली या राज्याच्या अर्थमंत्रीपदाची धुरा खांद्यावर घेतल्यानंतर एक तज्ज्ञ अर्थमंत्री म्हणून जो लौकिक त्यांनी मिळविला आणि ज्या तऱ्हेने या राज्याच्या अर्थकारणाचा पाया त्यांनी मजबूत केला त्याबद्दल आम्ही सर्व त्यांचे सदैव ऋणी राहू. या वयातही प्रत्येक गोष्टीच्या तपशिलात जाऊन काम करण्याची त्यांची दुर्दम्य शक्ती तरुणांनाही अंतर्मुख होऊन विचार करावयास लावील अशी आहे. मला विश्वास आहे की, तरुणांनाही लाजविणाऱ्या ज्या उत्साहाने त्यांनी काम केले त्यामुळे या राज्याच्या वाटणीलाही काही उत्कृष्ट परंपरा आल्या आहेत. या परंपरांचा उपयोग भावी महाराष्ट्र राज्यात त्यांच्या जागेवर बसणारे महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री निश्चित करून घेतील आणि महाराष्ट्राचे अर्थकारण मजबूत करतील. गुजराती आणि महाराष्ट्रीय समाज आज जरी कायदेशीररीत्या विभक्त होत असला तरी हा सर्व भारत देश एक आहे अशी शिकवण देणारे महात्मा गांधी आणि लोकमान्य टिळक या दोन महापुरुषांच्या प्रतिमा या सभागृहात आहेत आणि या दोन राष्ट्रनेत्यांनी एकराष्ट्रीयत्वाचा जो धडा आम्हाला दिलेला आहे तो धडा आम्ही कधीही विसरणार नाही, विसरू शकणार नाही, हे मी आपणाला ठामपणाने सांगू इच्छितो. माझ्या म्हणण्यावर आपण विश्वास ठेवावा. या मुंबई शहरात किंबहुना महाराष्ट्र विभागात गुजराती समाज फार मोठ्या संख्येने राहणार आहे आणि त्यांचे साहचर्य आणि सहकार्य

आम्हाला मिळतच राहणार आहे हे सांगावयास मला अभिमान वाटतो. आता गुजरातचे नवे राज्य निर्माण होणार आहे. काही वेळी आमचे मतभेद झाले तरी ते मतभेद बाजूला सारीत सारीत भावी काळात आम्ही उत्तम शेजारी या नात्याने एकमेकांचे सहकार्य आणि मदत घेऊन चालणार आहोत. शेवटी आम्ही एकाच राष्ट्रीय शक्तीचे दोन भाग, दोन अवयव आहोत अशी दृष्टी ठेवून काम करणार आहोत असे मी सर्वांच्या वतीने एक आश्वासन देऊ इच्छितो.

विरोधी बाजूला जे गुजराती मित्र बसले आहेत त्यांचा आवाज ऐकावयास मिळणार नाही म्हणून दुःख वाटते. **श्री. खोडाभाई पटेल**[३५] यांच्यासारखे सोज्वळ वक्ते, आपल्याला अलंकारिक भाषणात चिमटे घेणारे **श्री. जयंतीलाल दलाल**[३६], चढाई करणारे परंतु खेळकर वृत्तीचे मुद्दे मांडणारे **श्री.गंगाराम रावळ**[३७] आणि सुवर्णपद्धतीने हसत हसत हृदयाचा ठाव घेणारे महाकुशल श्री.जसवंतराव मेहता यांच्यासारखी माणसे सापडणार नाहीत आणि त्यांची भाषणे ऐकावयास मिळणार नाहीत म्हणून मला दुःख वाटते. त्याचप्रमाणे आमच्या बाजूला बसलेले **श्री. माधवलाल शहा**[३८] यांच्यासारखे अनेक प्रश्न विचारणारे सभासद मिळणार नाहीत. प्रत्येक प्रश्नावर आग्रहाने मत प्रतिपादन करणारे श्री.लल्लुभाई पटेल अशा कितीतरी मंडळींची आठवण आमच्या मनात राहील. त्यांची आठवण सभागृहाच्या दप्तरात नमूद आहेच, परंतु या सभागृहात गेली चौदा, पंधरा वर्षे काम केलेल्या माणसांच्या मनातही ती आठवण नोंदली गेली आहे असे मी श्रद्धापूर्वक, मैत्रीच्या आणि सहकार्याच्या भावनेने सांगू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, महत्त्वाची गोष्ट म्हणजे सभागृहातर्फे मी आपले आभार मानू इच्छितो. तुफानामध्ये ज्याप्रमाणे कौशल्याने नौका चालवावी त्याप्रमाणे आपण गेल्या तीन वर्षांत या सभागृहरूपी नौकेची कर्णधारी केली आहे. सभागृहाच्या कामकाजात आपण समतोलपणाने आणि मोठ्या संयमाने काम केले. त्याचप्रमाणे आवश्यक वेळी कठोरपणे काम करण्याचे आपणांवर प्रसंग आले. या राज्याची आणि सभागृहाची प्रतिष्ठा राहील या सद्भावनेनेच आपण हे काम केले म्हणून मी आपले पुन्हा आभार मानतो. जय हिंद.

■ ■ ■

On 25th March, 1960, the last day of the Legislative Assembly Session of the Bilingual Bombay State, Shri Y.B.Chavan, Chief Minister, made a touching farewell speech stating that he as the man at the helm of affairs of the Bilingual Bombay State would always carry with him the sweet memories of stalwarts like Dr. Jivraj Mehta, who though a renoweed physician by profession, handled the finance portfolio like a financial wizard. Likewise he said, he had nothing but praise for other Gujarati legislators for their studiousness, alertness and party discipline. He also paid glowing tributes to the Speaker for conducting the business of the House in an atmosphere of camaraderie and bonhomie.

# रोहा येथील सत्याग्रहींवर झालेल्या लाठीहल्ल्यासंबंधी कपात सूचना *

**२५ मार्च १९६०**

*लोकमत जागृत करण्याकरिता प्रशासन बंद पाडण्याची आवश्यकता नाही. असे मा. यशवंतराव चव्हाणांचे निवेदन व कपात सूचनेस विरोध.*

अध्यक्ष महाराज, ह्या कपात सूचनेला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. ही जरी कपात सूचना असली तरी एखाद्या ॲडजर्नमेंट मोशनवर भाषणे व्हावीत अशी भाषणे मी ह्या कपात सूचनेवर झालेली ऐकली. माझी अशी अपेक्षा होती की, ह्या कपात सूचनेवर बोलताना पोलीस खात्यावर काही चर्चा होईल. पण रोह्याला जी काही घटना झाली तिच्या तपशिलासंबंधीच ही भाषणे झाली. ह्या वेळी सन्माननीय सभासद **श्री. सानप**[३९] यांनी स्वतःचा फोटोही काढला असे त्यांनी सांगितले.

पण मी ह्या सर्व तपशिलात जाऊ इच्छित नाही. मी ह्या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, सरकारच्या धोरणात कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नाही. लोकशाहीमध्ये जनतेला चळवळ करण्याचा अधिकार आहे. पण ती चळवळ शांततापूर्ण मार्गांनी झाली पाहिजे. अशी आमची अपेक्षा आहे. ह्या संबंधात मी पूर्वी जे निवेदन केलेले होते त्यात तसूभरही फरक झालेला नाही. सन्माननीय सभासद श्री. उद्धवराव पाटील आणि **श्री.भापकर**[४०] यांनी शंका निर्माण केली त्याप्रमाणे सरकारच्या धोरणात फरक झालेला नाही. त्यांनी दुसरे असे सांगितले की, हे डेमॉन्स्ट्रेशन नव्हते, तर सत्याग्रह होता आणि त्याबद्दल आगाऊ नोटीस दिलेली होती. पण ह्या सत्याग्रहींचा हेतू असा

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. III, Part 2 (Inside No. 30), 16th March 1961. pp. 1494 to 1495

होता की, कलेक्टरचे ऑफिस बंद पाडावयाचे अर्थातच सरकारची ॲडमिनिस्ट्रेशन बंद पाडावयाची असा हेतू याच्यामागे साहिजिकच येतो. अध्यक्ष महाराज, ह्या बाबतीत मी स्पष्टपणे सांगू इच्छितो, ह्या राज्यातील ॲडमिनिस्ट्रेशन चालविण्याची ह्या पक्षाने जबाबदारी स्वीकारली आहे आणि ह्या गोष्टीला मदत करण्यासाठीच हे सभागृहही आहे. मग ॲडमिनिस्ट्रेशन बंद पाडण्यासाठी केलेल्या चळवळीला हे सरकार कशी काय सहानुभूती दाखविणार ? ही राज्ययंत्रणा बंद पडणार नाही ह्या दृष्टीनेच शक्य होईल तेवढी व्यवस्था आपण केली पाहिजे आणि त्या दृष्टीनेच सरकारचे धोरण राहील. ॲडमिनिस्ट्रेशन बंद पाडले जाणार नाही आणि बंद पाडले जाऊ दिले जाणार नाही. बेळगावचा प्रश्न सरकारने त्वरेने सोडवावा म्हणून ॲडमिनिस्ट्रेशनचे लक्ष त्या प्रश्नाकडे बघण्याचा आमचा उद्देश या मोर्चामागे होता, असे सांगण्यात आले आहे. बेळगावचा प्रश्न सोडविण्याची या सरकारने एक भूमिका मान्य केली आहे व त्याकरिता एक चार माणसांची कमिटी काम करीत आहे. ही कमिटी आपले काम करीत असताना आणखी मोर्चाची काय गरज आहे ? ही गोष्ट मोर्चा काढणाऱ्यांना माहीत असून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आणि प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मोर्चे काढून काय साधणार हेच मला समजत नाही. मला इतकेच म्हणावयाचे आहे की हा चुकीचा कार्यक्रम आहे.

या सत्याग्रहाची महात्मा गांधींच्या सत्याग्रहाशी तुलना करण्यात आली आहे; मला त्यांना सांगावयाचे आहे की, या सत्याग्रहाची महात्माजींच्या सत्याग्रहाशी तुलना करणे बरोबर होणार नाही, त्यांचा विरोध परदेशी सत्तेला होता व तो कायमचा मोडण्याकरिता त्यांनी सत्याग्रहाचा अवलंब केला होता. सिंबॉलिक ॲडमिनिस्ट्रेशन बंद पाडण्याकरिता त्यांनी सत्याग्रह केला नव्हता किंवा एका दिवसाकरिता, एका तासाकरिता किंवा एका मिनिटाकरिता ॲडमिनिस्ट्रेशन बंद पाडण्याकरिता त्यांचा सत्याग्रह नव्हता तर हिंदुस्थानात जी परदेशी सत्ता होती ती कायमची मोडून टाकण्याकरिता किंवा बंद पाडण्याकरिता त्यांनी सत्याग्रहाचा अवलंब केला होता.

यामागे लोकमत जागृत करण्याचा हेतू असेल तर त्याकरिता ॲडमिनिस्ट्रेशन बंद पाडले जावे अशी आवश्यकता नाही, याकरिता निरनिराळे मार्ग आहेत, ऑफिसेस बंद पाडल्याने लोकमत जागृत करता येते असे मानणाऱ्यांपैकी मी नाही. अर्थात् कोणत्या गोष्टीकरिता कोणी काय करावे हे सांगण्याचा माझा हेतू नाही; हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे; परंतु याकरिता ॲडमिनिस्ट्रेशन बंद पाडण्याचा जो प्रयत्न झाला तो काही योग्य नाही असे मला स्पष्टपणे सांगावयाचे आहे.

पोलिसांनी लाठीमार केला आणि लोकांना दुखापती झाल्या. आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात लाठीमार झाला असेही सांगण्यात आले. असे झाले असेल तर या गोष्टीची चौकशी मी जरूर करीन. माझ्याकडे जी माहिती होती ती सभागृहाला सांगितली; परंतु झालेला लाठीमार हा आवश्यकतेपेक्षा जास्त होता अशा प्रकारची माहिती जबाबदार माणसे, या सभागृहाचे सन्माननीय सभासद देत आहेत तेव्हा मी या गोष्टीची परत एकदा चौकशी करीन.

मागच्या दोन-तीन प्रसंगी मी सभागृहाला सांगितले होते की, राजकीय चळवळी पोलिसांच्या साहाय्याने दडपून टाकाव्या अशी आमची इच्छा नाही. आपले मतप्रदर्शन करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. आम्हाला लोकशाहीच्या परंपरेप्रमाणे चालावयाचे आहे तेव्हा प्रत्येकाला आपले मत प्रदर्शन करण्याचा हक्क आहे परंतु त्यालाही काही मर्यादा असल्या पाहिजेत. मला जरूर सांगावयाचे आहे की अशा प्रकारचा सत्याग्रह करताना त्या सत्याग्रहाच्या नेत्यांनी फार विचार करून पाहावा. ही जी ऑफिसेस बंद पाडण्याची त्यांची कल्पना आहे ती बरोबर नाही. या कट मोशनला उत्तर देताना मला एवढेच सांगावयाचे होते. तेव्हा या कट मोशनला विरोध करून मी आपले भाषण संपवतो.

...

On 16th March 1961, Shri Y. B. Chavan, Chief Minister, in reply to a cut motion regarding the alleged indiscriminate and vicious lathi-charge on satyagrahis at Roha by the police, explained that picketeers' intention to force the closure of Collector's Office, thereby bringing Government machinery to a standstill; they were dispersed after a mild lathi charge. It is the primary function of Government to maintain law and order which the police did, said the Chief Minister, in conclusion.

# होमगार्डस्‌च्या असमाधानकारक कामगिरीबद्दलच्या कपात सूचनेवरील चर्चा*

**१६ मार्च १९६१**

*होमगार्डस् या संघटनेने जनतेची उपयुक्त सेवा केली असल्याने मा. यशवंतराव चव्हाण यांनी या कपात सूचनेस उत्तर देताना विरोध दर्शविला.*

अध्यक्ष महाराज, होमगार्डस्‌च्या निमित्ताने जी कपात सूचना या सन्माननीय सभागृहात मांडण्यात आलेली आहे, तिच्यासंबंधी मी माझे विचार मांडणार आहे. अध्यक्ष महाराज, कपात सूचनेच्या निमित्ताने या सभागृहामध्ये होमगार्डस् संघटनेसंबंधाने चर्चा झाली ही एक चांगलीच गोष्ट झाली असे मी मानतो. श्री. बर्धन यांनी भाषण करताना सुरुवातीलाच या संघटनेविषयी, विशेषतः या संघटनेच्या कामाच्या बाबतीत जे विचार व्यक्त केले आहेत, त्या संघटनेचा मी प्रमुख असल्याकारणाने याला उत्तर देणे मला आवश्यक आहे. मला ही गोष्ट मान्य आहे की, त्यांचा हेतू फक्त टीका करावयाचा नसून त्या संघटनेच्या कामाबद्दल त्यांना माहिती करून घ्यावयाचा आहे. म्हणून त्यांनी जे भाषण केले आहे ते कसल्याही प्रकारचे का असेना, त्याला उत्तर दिले गेलेच पाहिजे.

अध्यक्ष महाराज, मी आपणाला सांगू इच्छितो की, पोलीस खाते इनडिस्पेन्सिबल आहे, मी इनडिस्पेन्सिबल नाही, बर्धन नाहीत, परंतु हाऊस इनडिस्पेन्सिबल आहे. मला याच संदर्भात म्हणावेसे वाटते की, जगात कोणीही कोणत्याही कामाकरिता इनडिस्पेन्सिबल नाही. माझी अशी निश्चित भावना आहे की, परमेश्वराखेरीज कोणीही इनडिस्पेन्सिबल नाही. परंतु जर एखादा मनुष्य उपयुक्त असेल आणि तो १०-१२

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol.III, Part II (Inside No.30), 16th March 1961, pp. 1506 to 1509

वर्षापासून काम करीत असेल तर तो राहिला पाहिजे, अशा विचाराचा मी आहे, आणि तसे माझे मत असणे स्वाभाविक आहे. मागे होमगार्डस् संघटनेसंबंधी मी अनेक वेळा बोललो होतो. १५ वर्षापासून माझा या संघटनेशी संबंध आहे. होमगार्डस् संघटना चांगले काम करीत आहे असा माझा विश्वास आहे, कारण ही संघटना बऱ्याच दिवसापासून काम करीत आहे आणि त्याचा उपयोग आहे, म्हणून ती आजपर्यंत टिकली आहे. या संघटनेचे काम व्हॉलंटरी नेचरचे आहे. ती संघटना व्हॉलंटरी सर्विस करीत आहे, असे आपण समजले पाहिजे. नुसत्या एका महाराष्ट्रातच ही संघटना काम करीत नसून संबंध हिंदुस्थानातील प्रत्येक राज्यात ही संघटना आज काम करीत आहे. मला या सन्माननीय सभागृहाच्या नजरेला ही गोष्ट आणावयाची आहे की, महाराष्ट्रातल्या होमगार्डस्चे काम आणि त्या कामाचे स्वरूप पाहून पंडित पंत, जेव्हा ते १९५६-५७ मध्ये मुंबईला आले होते तेव्हा त्यांच्या कामाची स्तुती आणि वाखाणणी करताना असे म्हटले होते की, सबंध हिंदुस्थानच्या होमगार्डस्च्या संघटनेपेक्षा आमची ही संघटना अती उत्तम स्वरूपाची आहे आणि ती संघटना चांगले काम करीत आहे. माझे मित्र श्री.बर्धन आपल्या भाषणात म्हणाले की, विदर्भात पूर्वी जी होमगार्डस् संघटना होती ती फार चांगल्या स्वरूपाची होती आणि तेथे या होमगार्डस्चे रीजनल ऑफिस होते. परंतु विदर्भ महाराष्ट्रात आल्यापासून तेथील रीजनल ऑफिस अबॉलिश करण्यात आले आणि म्हणून पूर्वी मध्यप्रदेशमध्ये असताना ती संघटना चांगले काम करीत होती, ती आता तितकीशी उपयुक्त नाही. त्यांचे हे विधान मला बरोबर दिसत नाही. मला तरी असे वाटते ही महाराष्ट्रातील होमगार्डस् संघटना सबंध हिंदुस्तानात उत्तम प्रतीची म्हणून गणली गेली आहे. आता विदर्भ हा भाग महाराष्ट्रात आल्यामुळे स्वाभाविकपणे तेथे जी संघटना काम करते ती देखील चांगलीच म्हणावी लागेल. कारण विदर्भ आज महाराष्ट्राचाच एक भाग आहे. मला जास्त काही या बाबतीत बोलावयाचे नाही. कारण विदर्भाबद्दल त्यांच्याइतकी मला कदाचित् माहिती नसेल त्यांना तेथील जास्त माहिती असू शकेल. अध्यक्ष महाराज, मी येथे असेही म्हणू शकेन की, जेथे घाण असेल, जेथे वाईट असेल त्याचे रक्षण करावे असे माझे मत नाही. मी याबाबतीत त्यांना चेंबरमध्ये भेटावयाला तयार आहे. त्यांनी केव्हाही मला भेटावे. ते जे सांगतील ते मी ऐकून घेईन. त्यांच्याजवळ जी माहिती असेल ती त्यांनी मजकडे द्यावी. मी अवश्य त्याबद्दल चौकशी करीन. त्यांच्या मताने या संघटनेची आता आवश्यकता राहिलेली नाही. ते असे म्हणाले की, पर्पज काही सर्व्ह होत नाही. मला त्यांचे हे विचार मान्य नाहीत, कारण ज्या पर्पज करिता ही संस्था निर्माण करण्यात आलेली होती, ते पर्पज अजून काही संपले आहे, असे मला वाटत नाही. याचा अर्थ

असाच करावा लागतो की, ही संघटना आपले पर्पज सर्व्ह करीत आहे, आणि त्या संघटनेचे राहणे अनेक दृष्टीने उपयुक्त ठरेल असे मला वाटते.

अध्यक्ष महाराज, याचप्रमाणे माझे मित्र श्री. जोशी यांनीही आपल्या भाषणात असे म्हटलेले आहे की, या संघटनेची आता आवश्यकता नाही. परंतु मला निश्चित रीतीने असे वाटते की, या संघटनेची आवश्यकता पूर्वी होती आणि आज देखील आहे. ज्या दिवशी त्याची आवश्यकता नाहीशी होईल, त्याच दिवशी ती संघटना बंद करण्यात येईल, याची सन्माननीय सभासदांनी खात्री बाळगावी. आज १५ वर्षापासून ही संस्था काम करीत आहे, त्या संघटनेला विनाकारण एकदम काढून कसे काय टाकता येईल ? मला ही गोष्ट पसंत आहे की, त्या संघटनेच्या बाबतीत इव्हॅल्युअेशन करावयाला काहीच हरकत नाही. तज्ञ माणसाकडून, माहीतगार माणसाकडून इव्हॅल्युअेशन जरूर केले पाहिजे आणि तसे केले जाईल. प्रत्येक कामाचे इव्हॅल्युअेशन केले जाईल. कामाचे इव्हॅल्युअेशन केल्यानंतर कामाच्या बाबतीत किती प्रोग्रेस झालेला आहे हे आपणाला दिसून येईल. इव्हॅल्युअेशन म्हणजे त्या संस्थेने काय केले आहे याची चौकशी होणार. अध्यक्ष महाराज, मी पुन्हा असे सांगतो की, जोपर्यंत ही संघटना चांगले काम करीत नाही, असे मला वाटत नाही, तोपर्यंत ही संघटना चालू राहावी, असेच मी म्हणणार आणि माझा तसा अनुभव आहे. मी प्रत्येक बाबतीत चौकशी करावयाला तयार आहे. जरूर एव्हॅल्युअेशन केले पाहिजे असे मी म्हणेन. आम्हाला प्रत्येक खाते किंवा प्रत्येक संघटना काय काम करते याबद्दल जागरूक राहिले पाहिजे आणि तशी जागृती राहावी म्हणून एव्हॅल्युअेशन करणे जरूरीचे आहे, असे मला वाटते.

मला त्यांच्या या इव्हॅल्युअेशनची कल्पना मंजूर आहे आणि ती ही एक्सपर्टस लोकांकडून आणि पोलिसांकडून नाही. पोलीस हे होमगार्डस्‌चे काम एक्झामिन करावयाला एक्सपर्ट होऊ शकणार नाहीत. त्यांच्यामध्ये एक प्रकारची जेलसी आहे, असे मला वाटते. मला असे वाटण्याचे कारण हे आहे की, या संघटनेमुळे पोलीस लोकांची महती किंवा महत्त्व थोडेसे कमी झालेले आहे; असे पोलिसांना वाटत असावे आणि तसे वाटणे स्वाभाविकही आहे. या संघटनेच्या कामाबद्दल एक रिपोर्ट प्रसिद्ध व्हावा आणि त्यावर या सभागृहामध्ये चर्चा व्हावी अशी माझी इच्छा आहे. मी यापुढे ही पद्धत सुरू करू इच्छित आहे. तो रिपोर्ट जर प्रसिद्ध झाला तर सभागृहाला त्यावर चर्चा करण्याला संधी मिळेल. २६५ लोकांच्या नजरेला त्या संघटनेत जे काही दोष असतील ते लक्षात येतील, प्रत्येक मेंबरला दोन कान असल्यामुळे ५३० कानांना ते

दोष कळतील तर तो दोष खरा मानावयाला काहीच हरकत नाही. ते मी मानतो. पुढच्या वर्षापासून हा रिपोर्ट हमखास प्रसिद्ध करून त्यावर आपणाला चर्चा करता येईल.

अध्यक्ष महाराज, माझे मित्र श्री.जोशी यांनी आणखी एक मुद्दा असा मांडला आहे की, या संघटनेच्या लोकांना काहीतरी इतर विषयाचे शिक्षण दिले पाहिजे. त्यांनी जे काही सांगितले आहे ते बरोबर आहे असे मी म्हणतो. आम्ही देखील तेच करीत आहोत. त्यांना ट्रॅफिकचे शिक्षण दिले जात आहे. जवळ जवळ ७०० माणसे या ट्रॅफिकचे शिक्षण घेऊन तयार आहेत. निरनिराळ्या कामासाठी जेवढे ज्ञान आवश्यक आहे तेवढे आज त्यांच्याजवळ आहे आणि तरीसुद्धा त्यांना जर बोलवावयाचे म्हटले तर आपल्या खर्चात अकारण भर पडेल. त्याचप्रमाणे त्यांना जे शिक्षण दिले जाते ते सर्वसाधारण माणसाला आवश्यक असेच असते. उदाहरणार्थ, सन्माननीय सभासदांनी वेळ काढून त्यांना जे फायर फाइटिंगचे शिक्षण दिले जाते ते पाहिले तर अशा तऱ्हेचे शिक्षण सर्वसामान्य नागरिकांनासुद्धा आवश्यक आहे ही गोष्ट सन्माननीय सभासदांना पटेल. मुंबई महानगरपालिकेची फायर फाइटिंगची संघटना फार कार्यक्षम आहे हे मी कबूल करतो. परंतु अशा तऱ्हेची संघटना सर्वच जिल्ह्यातील सर्वच नगरपालिकांजवळ नाही. तेव्हा सामान्य माणसांनासुद्धा असे शिक्षण घेणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींच्या बाबतीत मला एवढेच म्हणावयाचे आहे की, होमगार्डस्ना ज्या तऱ्हेचे शिक्षण दिले जाते, त्यामुळे अत्यंत कुशल आणि ॲलर्ट असे नागरिक निर्माण केले जातात. त्यांच्यामध्ये अँटी-सोशल एलिमेंट येऊ लागले आहे असे काही सन्माननीय सभासद म्हणाले. परंतु अँटी-सोशल एलिमेंट हे कोठेही शिरू शकते. ते होमगार्ड्समध्येच शिरू शकते असे नाही. ते आपल्या पार्ट्यांमध्येसुद्धा शिरू शकते. परंतु होमगार्डस् या संघटनेमध्ये शिरू नये म्हणून भरतीच्या वेळी खबरदारी घेतली जाते. या रिक्रुटमेंटसाठी एक ॲडव्हायजरी कमिटी नेमलेली असून त्या कमिटीवर विरोधी पक्षाचे सन्माननीय सभासदसुद्धा घेतलेले आहेत. उदाहरणार्थ मुंबईतील ॲडव्हायजरी कमिटीवर **श्री. माने**[४१] हे आहेत. प्रत्येक ठिकाणी अशा रीतीने विरोधी पक्षाचे सन्माननीय सभासद घेतलेले आहेत. तेव्हा हा पार्टी इश्यु आहे असे समजण्याचे काही कारण नाही.

त्यानंतर संपाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. याबाबतीत सरकारचे धोरण असे आहे की, एखादे काम करणारा नोकरवर्ग जर संपावर गेला असेल तर ते काम करण्यासाठी होमगार्डस्चा उपयोग करावयाचा नाही. परंतु त्या काळात दुसऱ्या कामासाठी त्याचा उपयोग केला जातो. वादग्रस्त प्रश्नाच्या वेळी होमगार्डस्चा उपयोग ज्या बाबतीत वाद असेल ते काम करण्यासाठी करावयाचा नाही असे धोरण सरकारने

ठरविले आहे. आता ही संघटना अगदी निर्दोष आहे असा माझा दावा नाही. परंतु ज्या ज्या क्षेत्रात होमगार्डस्‌नी काम केले आहे त्या त्या क्षेत्रात त्यांनी चांगली कामगिरी बजावली आहे असा माझा जरूर दावा आहे - मग ते फायर फाइटिंगचे काम असो किंवा दुसरे कोणतेही काम असो. त्याचप्रमाणे हे काम त्यांनी अगदी निरपेक्षपणे व लोकांची सेवा करण्याच्या वृत्तीनेच केलेले आहे, हेही आपणा सर्वांनी कबूल केले पाहिजे. श्री. माणेकजी यांनी होमगार्डस्‌ची संघटना स्थापन करून मानवतेचीच सेवा केली आहे असे म्हणावयास काही हरकत नाही. हे लोण त्यांनी आता हिंदुस्थान सरकारपर्यंतसुद्धा पोहोचविले आहे आणि त्यामुळे हिंदुस्थान सरकारसुद्धा अशा तऱ्हेची एक सुसूत्र संघटना बांधण्याचा विचार करीत आहे. याचे सर्व श्रेय महाराष्ट्र राज्याला आहे ही आपण अभिमान बाळगण्याजोगी गोष्ट आहे. तेव्हा मी या कपात सूचनेला विरोध करतो.

■ ■ ■

On 16 th March 1961, while discussing Demands on Police Department, the cut motion was admitted regarding what was described as unsatisfactory working of Home Guards. In reply to this inisimation Shri Y. B. Chavan, Chief Minister, traced the history of Home Guards and requested the members to point out to him the defects in the organisation. He further dwelt on the usefulness of the organisation to the State.

# पाकिस्तान व चीनधार्जिणे पक्ष व व्यक्ती यांच्या कृत्यांना आळा घालण्याची कपात सूचना*

**१६ मार्च १९६१**

*कोणाच्याही राष्ट्रविरोधी कृत्यांपुढे सरकार नमणार नाही असे आत्मविश्वासपूर्वक उद्‍गार मा. चव्हाण यांनी या कपात सूचनेवर बोलताना काढले.*

अध्यक्ष महाराज, या कपात सूचनेच्या निमित्ताने एका महत्त्वाच्या प्रश्नावर या सभागृहात चर्चा झाली आणि पोलिसांविषयक चर्चा मात्र बाजूला पडली, हा यातील मुख्य मुद्दा. या चर्चेमुळे म्हटला तर फायदा झाला, म्हटला तर तोटा झाला असे म्हणता येईल. या चर्चेमुळे एका महत्त्वाच्या विषयाला तोंड फोडले गेले, सर्व पक्षांना आपला दृष्टीकोन सभागृहासमोर मांडण्याची संधी मिळाली, सरकारलाही आपली भूमिका सभागृहासमोर ठेवण्याची संधी मिळाली, ही एक चांगली गोष्ट आहे.

अध्यक्ष महाराज, या देशात, या राज्यात काही तरी घडत आहे अशा प्रकारची भावना काही सन्माननीय सभासदांनी करून घेतलेली आहे. असे काही घडावे असे कोणाच्या मनात नसेलही. काही घडत नसताना काही तरी घडत आहे, अशा प्रकारची भावना निर्माण करून घेणे अनाठायी आहे. काही तरी घडत आहे, घडत आहे असे सारखे म्हणत राहिल्यानेच भीती भाव निर्माण होत आहे आणि तोच देशाच्या हिताला जास्त मारक आहे असे मला वाटते. ॲन्टि-नॅशनल चळवळींबाबत जागृत असले पाहिजे, जागृत असण्याची आवश्यकता आहे, हे मी कबूल करतो पण सरकार जागृत आहेच असे मी म्हटले तर सभागृह ते मान्य करील असे मला खात्रीपूर्वक वाटते. श्री. म्हाळगी यांना मी स्पष्टपणे असे सांगू इच्छितो की प्रत्येक ठिकाणी काहीतरी घडत

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. III Part II. (Inside No.30), 16th March 1961. pp. 1532 to 1538.

आहे असा ज्यांना सारखा संशय येतो ते देशाचे संरक्षण करू शकणार नाहीत, स्वतःचे संरक्षण करू शकणार नाहीत आणि कोणाचेच संरक्षण करू शकणार नाहीत. असे काही घडत आहे किंवा घडावे असे श्री. वर्टी यांच्या मनात आहे असे मला मुळीच सुचवावयाचे नाही. परंतु मला एवढेच वाटते की लोकात अशी भावना निर्माण होण्याचा संभव आहे की, ज्या अर्थी महाराष्ट्राच्या विधानसभेने दोन तास खर्च करून जातीयतेवर आणि अराष्ट्रीयतेवर चर्चा केली त्या अर्थी या राज्यात काही तरी घडत आहे एवढे खास. आमची राष्ट्रीयता काही अलिप्तवादाच्या भूमिकेवर आधारलेली नाही. राष्ट्रीयतेला धोका निर्माण झाला आहे असे समजण्याचे कारण नाही. डोळ्यात तेल घालून आम्ही जागृत आहोत आणि या प्रश्नाकडे पाहत आहोत. पण जागृतता आणि भीतीभाव यात फरक आहे. आमचा हा भीतीभाव आहे तो कशासाठी आहे हे मी समजू शकत नाही. केवळ वाद घालण्याच्या भूमिकेवरून नाही तर प्रासंगिक म्हणून एक गोष्ट मला या ठिकाणी सांगावयाची आहे.

निसर्ग सौंदर्याची मजा घेण्यासाठी, आनंद लुटण्यासाठी दोघे मित्र शोकाने चांदण्यात फिरण्यासाठी म्हणून बाहेर पडले. थोडा वेळ गेल्यानंतर त्यातील एकजण म्हणाला की चांदण्यात फिरावयास जावयास नको. आकाशातील एखादा तारा निखळून पडला आणि नेमका तो आपल्याच डोक्यावर येऊन पडला तर काय करावयाचे ? अशी ही गोष्ट आहे. मला मान्य आहे की तारा निखळून डोक्यावर पडला तर अवस्था फार कठीण होणार आहे. बारकाईनेच पाहावयाचे झाल्यास असे घडण्याची शक्यता नाहीच असे काही सांगता येणार नाही.

अशाच प्रकारची अवस्था आज मला दिसत आहे. परंतु अशा प्रकारची भावना निर्माण होऊ देऊन चालणार नाही. राष्ट्रावर काही संकट येत आहे, संकट येत आहे असे सारखे म्हटल्याने देशाचे संरक्षण होण्याऐवजी देशाचा तोटाच होतो. अशा प्रकारचा भीतीभाव निर्माण करून संकट ओढवून घेण्याचे काही कारण नाही.

एकाची भीती कम्युनिझमची आहे तर दुसऱ्याची भीती मुस्लिमांसंबंधी आहे. कम्युनिस्टांना घाबरण्याचे काही कारण नाही, मुस्लिमांच्या जातीयवादाला घाबरावे असे म्हणणाराही मी नाही. कम्युनिस्टांना घाबरायचे म्हणजे देशात प्रतिगामी वृत्ती निर्माण होण्याची भीती आहे. मुस्लिमांची भीती बाळगल्याने आपल्या मनातील जातीयवाद जागा होण्याचा संभव आहे. या दोन वाईट गोष्टींना टाळून राजकारण आणि समाजकारण आपण पुढे नेले पाहिजे. जातीयवाद निर्माण होत आहे असे म्हणणारेच जातीयवाद आज निर्माण करीत आहेत असे मी म्हणेन. मी जातीयवादी नाही असे

छातीवर हात ठेवून कोणालाही सांगता यावयाचे नाही. पाकिस्तान झिंदाबाद, हिंदुस्थान मुर्दाबाद अशा घोषणा झाल्या नाहीत असे पुनः पुनः सांगून देखील अशा घोषणा झाल्याच होत्या असे सांगण्यात सन्माननीय सभासद **श्री. म्हाळगी** काय साधणार आहेत हे मला समजत नाही. अशा घोषणा झाल्या नाहीत असे सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितलेले आहे. एक सन्माननीय सभासद त्या वेळी स्टेशनवर उपस्थित होते असे श्री. म्हाळगी यांनी सांगितले, पण त्या सन्माननीय सभासदांनी उठून सांगितले की मी असे काही ऐकले नाही, मी ठिकाणी त्या दिवशी नव्हतो; पण ती गोष्ट मान्य करण्यास श्री. म्हाळगी[४२] हे तयार नाहीत. आपण म्हणता तर अशा घोषणा झाल्या नसतील असे म्हणण्याचा खेळकरपणा दाखवितील अशी अपेक्षा मी केली होती. पण मी म्हणतो तेच खरे, या भूमिकेतून त्यांनी आपले भाषण केले. सरकारमध्ये, सरकारी अधिकाऱ्यांमध्ये काही दोष असतील हे मी मान्य करतो. सरकार हे माणसांचेच बनलेले आहे, सरकारी अधिकारी हे देखील माणसेच आहेत. माणसात जे दोष आहेत ते यांच्या ठिकाणी असण्याचीही शक्यता आहे. पण अशा प्रकारची संशयी वृत्ती असेल तर आपण देशाचे संरक्षण करू शकणार नाही, आपल्या स्वतःचेही संरक्षण करू शकणार नाही. पाकिस्तानविषयी सद्भावना बाळगणारे लोक हिंदुस्थानात नसतील असे मी म्हणत नाही, बरेचसे असतीलही. सरकारच्या मनातही पाकिस्तानबद्दल सद्भावना आहे. इतर देशांप्रमाणे पाकिस्तानबद्दलही सरकारच्या मनात सद्भावना आहे. माझे मित्र श्री. म्हाळगी यांच्या मनातसुद्धा आहे असे मी म्हणेन.

असे असताना जर पाकिस्तानच्या लोकांच्या मनातदेखील अशाच प्रकारची एकत्र होण्याची भावना येत असेल तर आम्ही त्यांना दोष का द्यावा ? कदाचित त्यांची ती एकत्र होण्याची भावना वेगळ्या प्रकारची असू शकेल. या बाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की, फक्त मुसलमानांनाच दोष देण्यात काहीच अर्थ नाही. मुसलमान लोक अराष्ट्रीय भावनेचे आहेत, असे म्हणून कसे चालेल ? यामुळे दुसरे तिसरे काही होणार नसून आपसात द्वेषभावना मात्र वाढत जाईल, आणि जे मुसलमान अराष्ट्रीय नसतील, त्यांच्या मनामध्ये देखील अशी शंका येण्याचा संभव आहे. म्हणून कोणताही आरोप करताना सारासार विचार करून तसा आरोप करावयाला पाहिजे. हिंदुस्तानात काही लोक तशा प्रकारचे असतील, परंतु एकंदर रीतीने सर्वांनाच त्यामध्ये गोवणे बरोबर होणार नाही. अशाने पाकिस्तानच्या मुसलमानी धोरणाला पाठिंबा देण्यासारखे होईल. मी असे सांगू इच्छितो की, जिनांच्या पद्धतीचा विचार करणारे मुसलमान या राष्ट्रवादी हिंदुस्तानात आम्ही निर्माण होऊ देणार नाही. जिनांच्या वेळी मुसलमानांनी

जे काही केले आहे, ते सर्वांना माहीतच आहे. त्याकरिता १०-५ माणसांनी पत्रक काढले म्हणून आम्ही आता घाबरून जाणार नाही. ४० कोटी लोकांचे रक्षण करणे हे आमचे कर्तव्य आहे. मुसलमान जर म्हणत असतील की त्यांचा लोकशाहीवर विश्वास नाही, तर मी त्याची चिंता करीत नाही. मला असे विचारण्यात आले की त्यांचे भाषण प्रसिद्ध का केले नाही ? मला येथे असेही सांगावयाचे आहे की, त्यांचे भाषण मलाही पसंत नाही. मी असे म्हटले की हे त्यांनी म्हटलेले नाही. त्यांच्या भाषणाची प्रसिद्धी मी काय म्हणून करावी ? मला ही गोष्ट मंजूर नाही. ते भाषण मी का प्रसिद्ध करू नये असे मला विचारण्यात आले. मी ज्यावेळी असे म्हटले की त्यांनी तसे म्हटलेले नाही, या माझ्या बोलण्यावर त्यांनी विश्वास ठेवावयास हवा. तेव्हा प्रश्न असा आहे की, देशात अशा तऱ्हेची माणसे असण्याचा संभव आहे. याची तुम्हाला आणि आम्हाला चिंता करावयाला पाहिजे. मुसलमान लोकांच्या मनात एक प्रकारची शंका उत्पन्न करण्याची भावना माझ्या मनामध्ये नाही. माणसाच्या मनामध्ये विचार करण्याची जी प्रवृत्ती असते त्याला आपण आपल्याकडे वळवून घ्यायला पाहिजे.

मला असे सांगण्यात आले की सातारला फार गडबड झालेली आहे, त्यापासून आपणाला फारच सावध राहिले पाहिजे आणि त्यामुळे देशावर एखादे मोठे संकट येण्याची शक्यता आहे. याबद्दल, अध्यक्ष महाराज, मी एवढेच सांगू शकेन की देशावर कोणत्याही प्रकारचे संकट येणे शक्य नाही. ही एक लहान गडबड होती. थोडक्यात त्याची माहिती अशी आहे की, ''मुसलमानांची दोन तीन तरुण मुले रस्त्यावर बसली होती. त्याच बाजूने २ किंवा ३ आर.एस्.एस्. मध्ये काम करणारी मुले चाललेली होती. त्याना असे वाटले की ही जी मुसलमानांची मुले बसलेली आहेत, ती कदाचित काही तरी खोडी करण्याकरिताच बसलेली असावीत. त्यांनी त्या मुलांना दम दिला आणि त्यांना एक दोन धक्के दिले. ती मुले त्यांना म्हणाली असावी की आम्ही याचा बदला घेऊ. पोलीस खात्याला ही हकीगत समजलीच नाही. दोघांपैकी कोणीच पोलिसांकडे तक्रार घेऊन गेलेला नाही. दुसऱ्या दिवशी मुसलमान मुलांनी बरोबर चार पाच माणसे घेतली आणि परत त्यांच्यात बाचाबाची झाली, मारपीटही झाली. पण मला ही गोष्ट समजत नाही की यामध्ये हिंदुस्थानचा राष्ट्रवाद कुठे आला ? जे घडले असेल ते गैर घडले असेल असे म्हणावयाला मला काहीच संकोच वाटत नाही. त्यांच्यावर खटला भरला जात आहे. आपण अशा किरकोळ प्रश्नामध्ये राष्ट्रावर संकट आले, हा फार मोठा गंभीर प्रश्न होऊन बसला आहे, अशा प्रकारची चिंता करू लागलो तर मला असे म्हणावयाचे आहे की आपल्याला राष्ट्राच्या खऱ्या प्रश्नाच्या

वेळी चिंता करण्याकरिता वेळच राहणार नाही.

मी अशी विनंती करू इच्छितो की, आमचा जो हा विचार आहे, तो प्रजासोशियालिस्टांना आणि कम्युनिस्टांना मंजूर होता. यांना देखील तो मंजूर झाला असता, परंतु त्या दिवशी ते नव्हते. त्यांची माझी गाठही पडली नाही. माझा सांगण्याचा मुद्दा असा की, महाराष्ट्राची जी घडण आहे, ती फार मजबूत अशी आहे. मी असेही सांगू इच्छितो की, ह्या सह्याद्रीची छाती फारच बळकट आहे. असे म्हटले जाते की मुसलमानांत फ्रस्ट्रेशनची भावना आहे. त्या फ्रस्ट्रेशनचा आपण उगाच एक बागुलबुवाच करून बसलो आहोत. मुसलमानात जी दुःखाची भावना आहे, ती आम्ही समजून घेतली पाहिजे. वडील भाऊ या नात्याने आमचे ते कर्तव्यच आहे. मुसलमानात फ्रस्ट्रेशन आहे, हा सुद्धा एक महत्वाचा प्रश्न आहे. आपण ती फ्रस्ट्रेशनची भावना वाढू देता उपयोगी नाही. कारण त्यामुळे त्यांच्या नॅशनॅलिजमच्या फीलिंगवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. तसे पाहिले तर फ्रस्ट्रेशनची भावना प्रत्येक व्यक्तीमध्ये किंवा प्रत्येक समाजामध्ये काम करणाऱ्यामध्ये नेहमी असतेच. लेबरर्समध्ये काम करणाऱ्या श्री. बर्धन यांच्यामध्येही तशा प्रकारची ती भावना आहे. शेतकऱ्यांसंबंधी मी जेव्हा बोलतो तेव्हा माझ्यामध्ये तशी भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे. मात्र ती भावना वाढू देता उपयोगी नाही. याचे सोल्युशन दुसरे आहे.  नैराश्याची भावना जी मुसलमानांच्या मनामध्ये आहे, ती तुम्ही आम्ही दूर केली पाहिजे. त्यासाठी आपण कोणालाही विनाकारण ॲन्टी नॅशनल म्हणता उपयोगी नाही.

अध्यक्ष महाराज, कम्युनिस्ट पक्षांविषयी आमचे मूलभूत मतभेद नाहीत. चीनच्या बाजूने ते काही तरी करू शकतील अशी जर कोणाची कल्पना असेल तर ती चुकीची आहे असे मी म्हणेन. परंतु येथे असे सुचवावयाचे आहे की, त्यांना जे काही बोलावयाचे आहे ते त्यांनी स्पष्ट रीतीने बोलले पाहिजे. तसे जर ते करतील तर बरे होईल. आमचा देखील मानवतावादावर विश्वास आहे. आमचे नॅशनॅलिजम एक्सक्ल्युजिव्हली भाईबंदाचे होते. आम्ही हिन्दी चिनी भाई भाई असे म्हटले, परंतु त्याच एका भाईने आमचा विश्वासघात केला, यात मात्र संशय नाही. परंतु मला येथे स्पष्टपणे असे सांगावयाचे आहे की आमच्या मनगटात शक्ती आहे. जर तो आणखी काही करू म्हणत असेल तर आम्ही त्याला खेचून घेऊन, पुढे जाऊ देणार नाही. कम्युनिस्ट थोड्या संकोचाने या बाबतीत बोलतात, असे मला वाटते. त्यातदेखील पुष्कळशी चांगली माणसे आहेत. परंतु त्यांच्या काही अडचणी आहेत, हे आम्ही समजू शकतो. परंतु काय करतील बिचारे. त्यांनी साफ सांगितले पाहिजे, चीनचा चौ असो किंवा

आणखी कोणी असो, तो जर इकडे वाकड्या डोळ्यांनी पाहील तर त्याने लक्षात ठेवावे, आमची नजर घारीप्रमाणे तीक्ष्ण आहे. आम्ही त्याला ताबडतोब ठेचून टाकू. यामुळे काय होते, नेगेटीव्ह ॲक्टिव्हिटीजदेखील चुकीच्या मार्गांवर जातात. आयसेनहॉवरचा काळ असता तर तसे घडले असते. परंतु मला येथे देखील म्हणावेसे वाटते की, अँटी कम्युनिस्ट आणि अँटी मुस्लिम ॲटिट्युडने एक प्रकारचे फुटीरतेचे विचार निर्माण होतात. मी असे म्हणतो की, नेहमी पॉजिटिव्ह विचारसरणी घ्यावयाला पाहिजे. हिंदुस्थानच्या राष्ट्रैक्यावर संकट आले तर कुठलीही शक्ती काम करू शकणार नाही, म्हणून आपण राष्ट्रीय ऐक्याची जोपासना केली पाहिजे, आणि आत्मविश्वास जागृत ठेवून काम करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हिंदुस्थानातल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये जबरदस्त सामर्थ्य आहे. ब्रिटिशांच्या काळामध्ये देखील आमच्यात एकतेची भावना होती आणि त्यामुळेच आम्ही एका प्रबळ राष्ट्राचा विरोध करू शकलो. म्हणून या लहानसहान गोष्टीकरिता आपणाला मुळीच घाबरण्याचे कारण नाही. प्रत्येक बाबीचा सारासार विचार झाला पाहिजे, मग ते कम्युनिस्ट असोत, किंवा मुसलमान असोत जर कोणी राष्ट्रविरोधी कृत्य करण्याचा प्रयत्न करील तर त्याला तेथल्या तेथेच दाबले जाईल, अशा प्रकारची आत्मविश्वासाची भावना सबंध जनतेच्या मनात जागृत करावयाला पाहिजे आणि तसा प्रयत्न आम्ही करीत आहोत, असा मला विश्वास आहे.

■ ■ ■

On 16th March, 1961, Shri Y. B. Chavan, Chief Minister, expressed his views on a neccessity to put the check to anti-social activities. He said that though this House had spent two hours discussing this issue, nothing had happened that would endanger nationalism. Referring to the incident in Satara, he said that it was a very casual incident and no communal elements were involved in it. He added that branding the Muslims as anti-national would result in hatred. He stressed that frustration among the Muslims should be removed at all costs.

# लोकशाही विकेंद्रीकरण समितीचा अहवाल*

## १२ एप्रिल १९६१

*वरील चर्चेला उत्तर देताना मा. यशवंतराव चव्हाण म्हणाले की विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा गाभा असून, ते झाल्यानंतर एका पातळीवर केंद्रीभूत झालेली सत्ता खेड्यांच्या पातळीपर्यंत पोहोचेल.*

अध्यक्ष महाराज, हा एक अत्यंत महत्त्वाचा अहवाल या सभागृहासमोर चर्चेसाठी ठेवताना मला आणि माझ्या सरकारला एक प्रकारचे मानसिक समाधान वाटत आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर ज्या काही प्रमुख प्रश्नांची जबाबदारी या सरकारने स्वीकारली त्यात या प्रश्नाचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर दोन चार आठवड्यातच या लोकशाही विकेन्द्रीकरणाच्या प्रश्नाची सरकारने चर्चा सुरू केली. या कामासाठी सरकारच्या एका आदेशाप्रमाणे एक कमिटी स्थापन करण्यात आली. माननीय महसूल मंत्री **श्री. वसंतराव नाईक**[४३] या कमिटीचे अध्यक्ष होते. त्यानंतर **श्री.गाढे**[४४], रूरल डेव्हलपमेंट मिनिस्टर, **श्री. डी.एस्.देसाई**[४५], शिक्षण मंत्री, **श्री.यार्दी**[४६], सरकारच्या अर्थ खात्याचे सचिव, सरकारच्या सहकार व ग्रामीण विकास खात्याचे सचिव व विकास आयुक्त **श्री. साठे**[४७], पुण्याचे कमिशनर श्री. मोहिते हे या कमिटीचे सदस्य होते व **श्री. पी.जी. साळवी**[४८], डेप्युटी डेव्हलपमेंट कमिशनर, हे या कमिटीचे सचिव म्हणून काम पाहत होते. या कमिटीने या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाची गेले पाच-सहा महिने अत्यंत बारकाईने छाननी केली, तपासणी केली. या प्रश्नाशी संलग्न असणाऱ्या सर्व उपप्रश्नांचा अत्यंत सखोल विचार केला आणि निष्कर्षरूपाने एक अत्यंत महत्त्वाचा अहवाल सरकारला सादर केला. अध्यक्ष

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. III. Part II (Inside No.42), 7th April 1961. pp. 2072 to 2074, 2217-2224.

महाराज, आभार मानलेच पाहिजेत म्हणून औपचारिकपणे मी आभार मानतो आहे असे नव्हे तर या कमिटीच्या सदस्यांनी ज्या व्यासंगी बुद्धीने, कर्तव्यबुद्धीने, या प्रश्नाचा खोल, सूक्ष्म अभ्यास करून ज्याला एक व्हॅल्युएबल डॉक्युमेंट म्हणता येईल असा हा अहवाल तयार केला त्याबद्दल या सभागृहाचा नेता या नात्याने मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो, त्यांचे आभार मानतो.

अध्यक्ष महाराज, या अहवालाच्या गुणावगुणासंबंधाने मी आताच काही बोलणे युक्त ठरणार नाही, कारण या अहवालात जी मते मांडलेली आहेत, ज्या योजना समोर ठेवलेल्या आहेत त्यांच्या संबंधाने या सभागृहाचे काय मत आहे ते अजमावण्याकरिताच ही चर्चा घडवून आणण्यात येत आहे. कारण या सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरही या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी चर्चा झाल्यावर, लोकमत व्यक्त झाल्यावर, ते लक्षात घेऊनच सरकारला अंतिम निर्णय घेऊन मंजुरीसाठी या सभागृहासमोर यावे लागणार आहे आणि म्हणून या रिपोर्टाच्या गुणावगुणासंबंधाने, त्यात व्यक्त करण्यात आलेल्या मतांसंबंधाने, मांडलेल्या योजनांसंबंधाने या सरकारने अद्याप काहीही मत बनविलेले नाही. अर्थात् विकेन्द्रीकरणाचे मूळ तत्त्व या सरकारने स्वीकारलेले आहे यात शंका नाही. अध्यक्ष महाराज, पक्षीय दृष्टिकोनातून या प्रश्नावर चर्चा व्हावी अशी या सरकारची इच्छा नाही. मी ज्या पक्षाचा नेता आहे त्या पक्षाच्या सदस्यांना या प्रश्नावर आपले मत व्यक्त करण्याची पूर्ण मोकळीक आहे. पक्षाचे असे कोणतेही बंधन या चर्चेच्या वेळी त्यांच्यावर घालण्यात आलेली नाही. जे विकेन्द्रीकरणाचे मूळ तत्त्व या सरकारने स्वीकारले आहे, त्याच्या प्रकाशात तत्संबंधी कशा प्रकारची योजना असावी, यासंबंधी खुली चर्चा या ठिकाणी व्हावी अशी सरकारची इच्छा आहे. मला अशी आशा आणि खात्री आहे की या सभागृहातील सगळ्या पक्षांचे मान्यवर नेते आणि सदस्य याच दृष्टीने व याच भूमिकेवरून या प्रश्नावर चर्चा करतील. अध्यक्ष महाराज, हा प्राथमिक खुलासा झाला.

अध्यक्ष महाराज, एकदोन प्रमुख गोष्टींवर मी जरूर बोलू इच्छितो. लोकशाहीच्या विकेन्द्रीकरणाचा जो निर्णय आमच्या पक्षाने घेतला त्या पक्षातर्फे मी बोलत आहे. परंतु आमच्या पक्षाने निर्णय घेतलेला असो वा नसो, ज्या एका प्रमुख गोष्टीचा आपण विचार करावयास हवा ती अशी की, लोकशाही तत्त्वाचा स्वीकार करून ज्यांचा उल्लेख आमच्या देशाच्या संविधानात केलेला आहे, ती सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टेही आपण स्वीकारली आहेत. या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांची मूल्ये स्वीकारल्यानंतर, लोकशाहीचे संघटनात्मक स्वरूप कसे असावे हा एक अनुभवाचा

प्रश्न आहे. आज दुनियेमध्ये लोकशाहीच्या विचारांचा आचार दोन वेगवेगळ्या शक्तीत होत चाललेला आहे. स्वाभाविकच लोकशाहीचा विचार आणि आचार यांचा मेळ घालण्याचा या देशात प्रामाणिक प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. घटनेत आपण लोकशाहीचे मूलभूत तत्त्व स्वीकारले असले तरी आम्हाला जे नवीन समाजसूत्र निर्माण करावयाचे आहे त्याची अंमलबजावणी सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने होऊन त्याला लोकशाही स्वरूप कसे देता येईल या दिशेने प्रयोग करणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने लोकशाही संघटनांचे प्रत्यक्ष राज्यकारभाराच्या स्वरूपात व्यक्तीकरण (expression) कोणत्या रूपात करावे यासंबंधी सर्व देशभर चर्चा चालू आहे. या गोष्टीलाच अनुलक्षून असे मानले जाते की आम्हाला पंचायत राज्य निर्माण करावयाचे आहे. परंतु या शब्दप्रयोगाच्या बाबतीत दोन तीन प्रकारचे गैरसमज निर्माण झाले आहेत. काही लोकांना असे वाटते की पंचायतींची कल्पना आपल्या देशात फार जुनी आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, ग्रामपंचायतींची प्रथा आपल्या देशात जुनी असली तरी तिला आजच्या काळात एक नवीन अर्थ पण प्राप्त झाला आहे. या शब्दप्रयोगाच्या बाबतीत माझा व्यक्तिशः जो विचार आहे तो असा की, आमचे जे ग्रामीण जीवन आहे ते संघटित करून आम्हाला एक नवे ग्रामीण जीवन निर्माण करावयाचे आहे. ग्रामीण जीवन व त्या जीवनाची संघटना म्हटल्याबरोबर काही मंडळींच्या डोळ्यांसमोर भूतकाळाचे चित्र उभे राहते, परंतु माझ्या नजरेपुढे भूतकाळातील ग्रामीण जीवनाचे चित्र उभे राहत नाही. अर्थात् भूतकाळातील ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांचे जरूर आकर्षण होणार आहे. भूतकाळातील ज्या चांगल्या परंपरा आहेत त्यांचा विसर पडून चालणार नाही हेही मला मान्य आहे. परंतु ज्या वेळी आपण ग्रामीण जीवन आणि पंचायत राज्य या शब्दांचा उच्चार करतो त्या वेळी एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी ती अशी की, दुनियेमध्ये ज्या नव्या शक्ती आणि नवीन सामर्थ्य निर्माण झाले आहे त्या नव्या शक्तींनी आणि नव्या सामर्थ्याने आपल्या सामाजिक जीवनात प्रवेश केला आहे. या शक्तींच्या आणि सामर्थ्याच्या मदतीने घडणारे उद्याच्या नवीन ग्रामीण जीवनाचे मी एक चित्र पाहात आहे. ग्रामपंचायत म्हणजे कोणत्या तरी एखाद्या म्हाताऱ्या माणसाच्या नेतृत्वाखाली तुम्ही आम्ही चांगले या भावनेने काम चालविणारी संस्था, या तऱ्हेचे चित्र माझ्या डोळ्यांपुढे नाही, तर माझ्या डोळ्यांपुढे नवीन तऱ्हेचे शिक्षण आणि नवीन तऱ्हेच्या शक्ती उभ्या राहतात. एकंदरीत खेड्यापाड्यात आज सहकारी चळवळ पसरत असून औद्योगिक वाढ होण्याकरिता खेड्यापाड्यात विद्युत्शक्ती देण्यासंबंधीचे विचार पोहोचत आहेत; इतकेच नाही तर या विचारांच्या पाठीमागे विद्युत्-शक्तीही

खेड्यापाड्यात जाऊन पोहोचत आहे. त्याचप्रमाणे खेड्यापाड्यातील जीवनावर फार महत्त्वाचा परिणाम करणारे असे नागरी जीवनाचे आकर्षण निर्माण झाले आहे. ह्या ज्या सर्व शक्ती निर्माण झाल्या आहेत, त्यांचा विचार समोर ठेवून आम्हांला ग्रामीण जीवनातील लोकशाही संघटना उभी करावयाची आहे. हा लोकशाही विकेन्द्रीकरणाच्या पाठीमागचा खरा विचार - खरी समस्या आहे. आपण जी आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टे मानली आहेत ती कोणत्या तऱ्हेची संघटना निर्माण केली तर साध्य होऊ शकतील या दृष्टीने या देशात विचार करण्यात आला व असा विचार करीत असतानाच लोकशाही विकेन्द्रीकरणाचा मार्ग निघाला. ८० वर्षांच्या ब्रिटिश अमदानीच्या काळात लोकशाहीच्या ज्या प्रवृत्ती निर्माण झाल्या, त्यातील काही प्रवृत्ती हाताशी धरून आपल्या देशातील लोकशाही मूलगामी रीतीने अधिक गतिमान करता येईल, या दृष्टीने जो विचार करण्यात आला त्यातून एक विचार असा निघाला की सत्तेच्या विकेन्द्रीकरणाची गोष्ट केली तर कदाचित् काम पार पाडता येईल. ह्या मूळ कल्पनेचा विस्तार करण्यासाठी गेल्या चार पाच वर्षांत या देशात अनेक तऱ्हेची चर्चा झाली. त्यातून वेगवेगळ्या राज्यात सत्तेच्या विकेन्द्रीकरणाचा प्रयोगही सुरू करण्यात आला. ग्रामपंचायतींच्या राज्याचा प्रयोग, राजस्थान, मद्रास आणि आंध्र या राज्यात सुरू करण्यात आलेला आहे. मला असे सांगावयाचे आहे की, अमक्या ठिकाणी अमकी गोष्ट करण्यात आली आहे म्हणून लोकशाही विकेन्द्रीकरण समितीने त्या गोष्टीचे अनुकरण केलेले नाही. तशा तऱ्हेचे अनुकरण करावे असा आग्रह धरता कामा नये. इतर राज्यात या दृष्टीने चाललेल्या गोष्टीचे नुसते अनुकरण न करता ज्या त्या विभागातील अनुभव, परंपरा आणि राज्यकारभाराची परिस्थिती या गोष्टींचा विचार करून समितीने निर्णय घेतलेला आहे. समितीने हा अहवाल तयार करीत असताना इतर राज्यात अमुक पद्धतीने काम चालविण्यात येत आहे म्हणून ते या राज्यात केले पाहिजे अशा प्रकारचे स्वतःवर बंधन लावून घेतलेले नाही. विचार-स्वातंत्र्य देऊन प्रत्यक्ष आलेल्या सूचनांच्या गुणावगुणांचा विचार करण्यात येऊन हा अहवाल तयार करण्यात आलेला आहे. या अहवालात करण्यात आलेल्या सूचनांचा योग्यायोग्यतेसंबंधी कोणी विचार मांडले तर काही हरकत नाही. त्या विचारांचा सरकारवर फारसा परिणाम होणार नाही.

यानंतर, अध्यक्ष महाराज, मला असे सांगावयाचे आहे की या प्रश्नासंबंधी या राज्यात एक दोन प्रवृत्ती आढळून येतात. पहिला विचार असा की, खेड्यापाड्यातील ग्रामपंचायतींना सत्ता देण्याची फारशी आवश्यकता नाही. असा विचार करणाऱ्याचे

म्हणणे असे आहे की, खेड्यापाड्यातील ग्रामपंचायती म्हणजे निव्वळ अडाणी माणसांच्या हातात जाणाऱ्या संघटना असून त्यात थोडासा जातीयवाद आणि सरंजामशाही वृत्ती आहे. त्याचप्रमाणे खेड्यापाड्यात थोडेसे गुंडगिरीचे वातावरण असते. अशा लोकांच्या हातात लोकशाही विकेन्द्रीकरणाची सत्ता दिल्याने काय घडणार आहे? अशा प्रकारचे जे विचार व्यक्त केले जातात त्यांना अनुलक्षून घरगुती भाषेत म्हणावयाचे झाले तर असे सांगता येईल की, पचेल ते खावे, रुचेल ते बोलावे आणि शोभेल ते ल्यावे, याप्रमाणे आज विचार मांडण्याची आवश्यकता आहे. आज विचार मांडण्याची अशी जी प्रवृत्ती आहे ती सामाजिक जीवनाशी सुसंगत नाही. या प्रश्नाच्या बाबतीत जे बोलले जाते, लिहिले जाते व आणखी लिहिले जाण्याची शक्यता आहे ते असे की, यातून ही गोष्ट घडणार नाही. मला असे म्हणावयाचे आहे की, या देशात लोकशाही वाढवावयाची असेल तर लोकशाही विकेन्द्रीकरणासंबंधीचा निर्णय थोडासा ध्येयपूर्वक घेतल्याशिवाय मार्ग सापडणार नाही. म्हणूनच ध्येयपूर्वक मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे, हा पहिला विचार आहे. या विचारानुसार ग्रामपंचायतींना ध्येयपूर्वक अधिक सत्ता देण्याचा प्रयत्न करावयास हवा.

अध्यक्ष महाराज, विकेन्द्रीकरणाच्या बाबतीत मी मागे काही सूचना केल्या होत्या. त्या वेळी मी असे म्हटले होते की, आम्हांला विकेन्द्रीकरण करावयाचे आहे, त्याचे डिस्इंटिग्रेशन करावयाचे नाही. अगदी कलोक्विअल भाषेत सांगावयाचे झाले तर असे सांगता येईल की, जिच्यामुळे खुर्दा निर्माण होईल अशा तऱ्हेने आम्हाला सत्तेची वाटणी करावयाची नाही. अशी परिस्थिती निर्माण न करता आम्हाला ज्या जबाबदाऱ्या वाढवावयाच्या आहेत त्यांतील मुख्य जबाबदारी अशी आहे की, राज्य चालले पाहिजे. त्या जबाबदारीच्या संदर्भात आणि विकासाच्या ज्या काही प्रमुख जबाबदाऱ्या आहेत त्या पार पडतील किंवा नाही यासंबंधी जरूर पाहणी करण्याचा अधिकार आणि जिम्मेदारी राज्य शासनाची आहे, ही मूळ कसोटी विसरून चालणार नाही. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की, ग्रामपंचायत ही शेवटची संघटना आणि राज्य संघटना ही सर्वात वरची संघटना, या दोन संघटनांमध्ये कोणकोणत्या आणि किती संघटना असाव्यात, त्यांचे सामर्थ्य काय असावे, शक्ती काय असावी, मर्यादा काय असावी, यासंबंधात काहीसा मतभेद निर्माण होण्याची शक्यता आहे. या गोष्टी ठरविताना, दोन कसोट्या आपण समोर ठेवल्या पाहिजेत. या संघटनांना सत्ता दिली पाहिजे हे निश्चित. ही सत्ता सुपूर्द करताना उद्देश कोणता असला पाहिजे हे प्रामुख्याने लक्षात ठेवले पाहिजे. सत्तेचे विकेन्द्रीकरण होत असताना राज्य सरकारांनी स्वीकारलेली उद्दिष्टे लक्षात घेऊन

या संघटना म्हणजे त्या उद्देशपूर्तीची साधने बनली पाहिजेत. अत्यंत सावधानतेने मी असे म्हणत आहे. ज्या पक्षाच्या हातात राज्य सरकारच्या कारभाराची सूत्रे असतील त्या पक्षाच्या उद्दिष्टांच्या पूर्तीचे साधन या संघटना बनाव्यात असा माझा मुळीच हेतू नाही. विकासाची जबाबदारी आपल्याला या संघटनांवर टाकावयाची आहे. स्टेबल गव्हर्नमेंटची कल्पना या पाठीमागची आहे. शांतता राहिली, कणखरपणा राहिला तरच विकासाच्या योजना यशस्वीपणे पार पडणे शक्य आहे. या दोन कसोट्या समोर ठेवून आपल्याला लोकशाही विकेन्द्रीकरणाचा विचार करावा लागेल. या दोन कसोट्यांवरच आपल्याला सर्व गोष्टींचा निर्णय घ्यावा लागणार आहे.

सर्वसाधारणतः विकेन्द्रीकरणाच्या पाठीमागची जी भूमिका माझ्या मनाशी मी कल्पिलेली आहे ती मी या ठिकाणी थोडक्यात उद्‌धृत केली आहे. या अहवालावरील चर्चेला सुरुवात करून देताना यापेक्षा अधिक काही सांगावे असे मला वाटत नाही. या अहवालाच्या रूपाने अत्यंत महत्त्वाचा मसुदा आपल्यापुढे ठेवण्यात आलेला आहे. सर्व गोष्टींचा विचार त्यात केलेला आहे. या अहवालावर मोकळेपणाने चर्चा होऊन त्यातून सरकारला निश्चितपणे मार्गदर्शन होईल अशा प्रकारची अपेक्षा मी बाळगतो आणि त्या दृष्टीनेच माझे मुद्दे मी सभागृहापुढे ठेवलेले आहेत.

अध्यक्ष महाराज, या डेमॉक्रॅटिक डीसेंट्रलायजेशनच्या रिपोर्टवर आतापर्यंत बरीच चर्चा झालेली आहे. या चर्चेमध्ये जे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत, त्या मुद्यांना उत्तर दिले जावे अशी त्या त्या संबंधित सदस्यांची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे आणि म्हणून मी माझे जे काही विचार या रिपोर्टसंबंधी आहेत, ते सन्माननीय सभागृहापुढे मांडू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, मी सुरुवातीला असे स्पष्ट सांगू इच्छितो की, ज्या ज्या काही सूचना येथे या रिपोर्टसंबंधाने मांडण्यात आल्या, त्यावर सरकार अवश्य विचार करील आणि त्या अनुषंगाने यासंबंधीचा एक मसुदा तयार करील. मला याच संदर्भात असेही म्हणावयाचे आहे की, आमचे विचार केव्हाही बदललेले नाहीत. या गृहात या रिपोर्टावर भाषण करताना ज्यांनी ज्यांनी टीका केलेली आहे, त्यावरदेखील सरकार अवश्य विचार करील.

अध्यक्ष महाराज, विरोधी पक्षाचे नेते माझे सन्माननीय मित्र **श्री. भंडारे**[४९] यांनी आपल्या भाषणात एक मुद्दा मांडला आणि तो अत्यंत आग्रहाने मांडला. मला त्याबद्दल काही बोलावयाचे आहे. हा रिपोर्ट उपस्थित करण्यामध्ये सरकारचा एक राजकीय दृष्टिकोन आहे, अशी काही सदस्यांना भीती वाटते. अध्यक्ष महाराज, या बाबतीत

मला असे म्हणावयाचे आहे की, तशा प्रकारची भीती बाळगण्याचे कोणत्याही प्रकारचे कारण नाही. या रिपोर्टाच्या पाठीमागे कोणत्याही प्रकारचा राजकीय हेतू नाही, असे मी पहिल्यांदाच स्पष्ट करू इच्छितो. मुख्य मुद्दा जो बहुतेक सगळा विरोधी पक्षाच्या सदस्यांनी उपस्थित केलेला आहे, तो असा की, यामध्ये लोकनियुक्त प्रतिनिधींना कोणत्याही प्रकारचे अधिकार देण्यात आलेले नाहीत. या बाबतीत मी हे समजू शकलो नाही की, कोणत्याही प्रकारचे अधिकार त्यांना देण्यात आलेले नाहीत? डेमॉक्रॅटिक डीसेंट्रलायजेशनचा अर्थच मुळी असा होतो की, सत्तेचे विकेन्द्रीकरण करण्यात आले पाहिजे. जर या रिपोर्टावरून असे होत नसेल तर मी असे म्हणेन की, हॅम्लेटवाचून हॅम्लेटचे नाटक केल्याप्रमाणे ती गोष्ट होईल. वास्तविक पाहता हे असे नाही, असे मला म्हणावयाचे आहे. मला असे वाटले होते की, या रिपोर्टावर मला काही जास्त बोलावे लागणार नाही. परंतु खुलासा करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. पण शक्य तेवढा खुलासा करण्याचा प्रयत्न अवश्य करीन आणि तसे करणे हे आपले काम आहे, असे मी मानतो.

अध्यक्ष महाराज, तर मी असे म्हणेन की डेमॉक्रॅटिक डीसेंट्रलायजेशन याचा अर्थच मुळी असा आहे की जी काही सत्ता आज वरच्या पातळीवर दिसून येत आहे, त्या सत्तेचे विकेन्द्रीकरण करावयाचे. माझ्या स्वतःपुरतेच बोलावयाचे झाल्यास मी असे म्हणेन की, मी सेंट्रलायजेशनचा शोकीन नाही, पण डीसेंट्रलायजेशनचा शोकीन मात्र आहे, कारण लोकशाही तत्त्वाचा तो मूळ गाभा आहे. आमची जी मूळ कल्पना आहे ती अशी की, जी सत्ता केन्द्रित झालेली आहे तिचे विकेन्द्रीकरण करण्यात आले पाहिजे, अर्थात् ती सत्ता लोकांच्या प्रतिनिधींमध्ये विभागली गेली पाहिजे. अधिकारांची विभागणी याचाच अर्थ डेलीगेशन ऑफ पॉवर्स असा होतो. अध्यक्ष महाराज, मी या गोष्टीचे थोडे जास्त स्पष्टीकरण करून असे म्हणू इच्छितो की, लोकशाही सत्तेमध्ये निर्णय घेण्याचा जो अधिकार आहे, तो अधिकार येथून काढून दुसऱ्या सत्तेला द्यावयाचा असतो, आणि तशी ती सत्ता व्हेस्ट करावयाची आहे. म्हणून त्याची जी मूळ प्रक्रिया आहे, ती सामान्य स्वरूपाने अशा प्रकारची आहे. त्याचबरोबर मी असेही सांगितलेले आहे की, आता सत्ता जी एका वरच्या पातळीवर केंद्रीभूत झालेली आहे, ती विकेन्द्रीकरणानंतर खालच्या पातळीवर अर्थात जिल्हा आणि तालुका किंबहुना खेड्याच्या लेव्हलपर्यंत पोहोचेल. हीच डीसेंट्रलायजेशनच्या पाठीमागची आमची कल्पना आहे आणि त्याच दिशेने आम्ही पुढे पाऊल टाकू इच्छित आहोत. मी पुन्हा एकदा आपल्या विचाराचे रिपिटिशन करून असे स्पष्ट करू इच्छितो की, यामध्ये

सरकारचा कोणत्याही प्रकारचा राजकीय दृष्टिकोन नाही. अध्यक्ष महाराज, आता येथे असे विचारण्यात आले की, सत्ता कोणाला दिलेली आहे? मला हेच समजत नाही की, सत्ता याचा अर्थ या सदस्यांनी काय घेतला आहे. सत्तेसंबंधी त्यांची काय कल्पना आहे हीच गोष्ट मी समजू शकलो नाही. जर कोणतेही उदाहरण देऊन या गोष्टीचा त्यांनी खुलासा केला असता तर कदाचित मी समजू शकलो असतो. अध्यक्ष महाराज, अशी टीका केली असती की, आता तुम्ही दिलेले जे क्षेत्र आहे ते अपुरे आहे, तर मी ती टीका समजू शकलो असतो. अध्यक्ष महाराज, मी जर त्या बाजूला बसलो असतो तर मला काय दाखवावयाचे तेदेखील मी चांगल्या प्रकाराने दाखविले असते आणि या रिपोर्टावर विधायक अशी टीका केली असती. माझी जर खात्री पटली की या रिपोर्टामध्ये काही सुधारणा होणे आवश्यक आहे, तर मी येथे बसूनसुद्धा त्या दाखवू शकेन. अध्यक्ष महाराज, टीका करताना काही सदस्यांनी असे म्हटलेले आहे की, यात नेमणुकीची सत्ता देण्यात आलेली नाही. अध्यक्ष महाराज, विरोधी पक्षाच्या सभासदांनी फक्त अपेंडिक्स १२ वाचून पाहिलेले दिसत आहे. त्याशिवाय त्यांनी दुसरे काही वाचले नसावे असे मला मोठ्या खेदाने म्हणावे लागत आहे.

आपण जर अपेंडिक्स १२ वाचले असेल तर मी आता आपणास अशी विनंती करीन की, आपण कृपा करून अपेंडिक्स ५ पासून सुरू करू या. आपण यासंबंधाने जर थोडेसे पुढे जाऊन पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, ज्या पॉवर्स दिल्या गेल्या आहेत त्या फार मोठ्या प्रमाणात डेलिगेट करण्यात आलेल्या आहेत. आपण जर कृपा करून माझ्या बरोबर अपेंडिक्स ५ पर्यंत प्रवास केला तर अर्थात् पान १६१ पर्यंत i.e.a list of activities proposed to be included in the local sector.

या ॲग्रीकल्चर, इरिगेशन, ॲनिमल हस्बंडरी, हेल्थ आणि रुरल सॅनिटेशन अशा सर्व विषयांवर या कामाची वाटणी केलेली आहे. या ज्या योजना दिलेल्या आहेत, त्या योजना सर्व लोकल सेक्टरमध्ये ठेवण्यात येतील. मला आता असे विचारावयाचे आहे की, आपण याला विकेंद्रीकरण म्हणणार नाही काय ? जर म्हणणार नसाल तर काय म्हणणार ? कदाचित् आपली सत्तेची कल्पना अशी असली पाहिजे की, कोणालाही ज्याला सत्ता असते त्याला आपल्या समोरच्या माणसाला डिस्‌मिस् करता आले पाहिजे. तसा त्याला अधिकार असला पाहिजे, तरच त्याला सत्ता म्हणावयाचे. अध्यक्ष महाराज, माझी अशी कल्पना नाही. मी येथे एक गोष्ट स्पष्टपणे सांगू इच्छितो की नेमणूक आणि डिस्‌मिस् करण्याचे अधिकार फक्त एक्झिक्युटिव्हच्या लोकांनाच असावयाला पाहिजेत. कायद्याची अंमलबजावणी करण्याचे काम त्यांचे

आहे. त्यात आपण अर्थात् लोकनियुक्त प्रतिनिधींनी ढवळाढवळ करण्याचे कारण नाही, असे मला वाटते. मी असेही म्हणून शकेन की, या डेमॉक्रॅटिक सेटपमध्ये या मुख्य मंत्र्याला एका चपराशालादेखील कायम करता येत नाही. तसे जर मी करावयाचा प्रयत्न केला तर हे सभागृह मला तसे करू देणार नाही आणि मला माझ्या त्या कृत्याबद्दल या सभागृहाला जाब द्यावा लागेल. त्याचबरोबर मला कोणाची नेमणूकही करता येत नाही. अध्यक्ष महाराज, नेमणूक करणे आणि डिस्मिस् करणे ही किरकोळ स्वरूपाची सत्ता आहे. मुख्य सत्ता बजेट सँक्शन करणे आणि खर्च करणे हे आणि त्याचबरोबर कर लावणे, यालाच सत्ता म्हणतात. आता सत्ता दिली गेली नाही असे म्हणण्यात काय अर्थ आहे ? मी असेही म्हणू शकेन की, ह्या ज्या योजना आहेत त्यासंबंधी सर्व आर्थिक अधिकार त्यांना दिले गेले आहेत. अध्यक्ष महाराज, आपण जर असेच पुढे पाहात गेलो तर पान १७१ वर जे अपेंडिक्स ६ दिलेले आहे, त्यात या सर्व गोष्टी दिलेल्या आहेत. त्यानंतर अपेंडिक्स ७ मध्ये, A list of regulatory functions proposed to be entrusted to local bodies ही एक लांबलचक यादी या ठिकाणी दिलेली आहे. नंतर अपेंडिक्स ८ मध्ये, "Appendix VIII-powers and Functions of District Council, its Committees and Office-bearers-To sanction the annual budget." अध्यक्षाला ज्या पॉवर्स आहेत त्यांचे हे लिस्ट आहे. पैशांचे व्यवहार करण्याचे हे जे अधिकार दिलेले आहेत ते महत्त्वाचे अधिकार आहेत. बजेट करण्याचा अधिकार, पैसा खर्च करण्याचा अधिकार, ॲन्युअल बजेट सँक्शन करण्याचा अधिकार, हा सर्वात मोठा अधिकार आहे. यांना आपण पॉवर्स म्हणणार नसू तर लोकशाहीच्या कामाचे स्वरूप समजले नाही असे म्हणावे लागेल. शेवटी बजेट सँक्शन करणे ही बाब सर्वांत महत्त्वाची आहे.

ॲडमिनिस्ट्रेशन ही एक स्वतंत्र चीज आहे. व्यवहार चालविण्यासाठी, कारभार चालविण्यासाठी, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मशिनरी पाहिजे. यामध्ये काही आपण कमीपणाची गोष्ट करतो, असे मानण्याचे कारण नाही. शेवटी अशा कामाची जबाबदारी २४ तास सांभाळण्यासाठी ते काम करणारी यंत्रणा जरूर असायला पाहिजे. या दृष्टीने हे अधिकार दिले आहेत ते मी समजू शकतो. त्याबाबतीत पहाण्याचा प्रयत्न केला तर पान १८१ वर अपेंडिक्स त्याप्रमाणे प्रेसिडेंटला पॉवर्स आहेत.

"Powers and functions of the President of the District Council........(v) To submit the annual confidential report on the work of the Chief Administrator to the Commissioner. (vi) To submit all confidential reports on Class I Officers received from the Chief

Administrator with his remarks to authorities as may be prescribed.”

येथे थोडासा गैरसमज झालेला आहे. प्रेसिडेंट या व्यक्तीला दोन्ही तऱ्हेचे अधिकार आहेत, स्टँडिंग कमिटीचा चेअरमन आणि प्रसिडेंट म्हणून. १८१ पानावर क्रमांक पाच आणि सात याकडे आपण पहाल तर या दोन्ही तऱ्हेच्या पॉवर्स जबरदस्त पॉवर्स आहेत, त्यामुळे नोकरवर्गाबद्दल त्याला हे अधिकार मिळतात. नोकरयंत्रणेबाबत त्याला हे अधिकार मिळतात. कॉन्फिडेन्शनल लिहिण्याचा अधिकार, याच अधिकाराचा प्रश्न घेतला तर अधिकाऱ्यांची बदली करण्याचा अधिकार आहे आणि हा फार महत्त्वाचा अधिकार आहे. याच १८१ पानावर पाच आणि सहाकडे नजर वळविली तर -

“To submit the annual confidential report on the work of the Chief Administrator to the Commissioner, (vi) To submit all confidential reports on Class I Officers received from the Chief Administrator with his remarks to authorities as may be prescribed.”

ह्या कॉन्फिडेन्शल्स लिहिण्याच्या काय पॉवर्स आहेत, नक्की कशा लिहिल्या जातात, याचा सरकारी नोकरांशी चर्चा करून विचार करावा लागेल. ह्या कॉन्फिडेन्शल्स लिहिल्यामुळे त्याचे पुढे परिणाम काय होतात, याचाही विचार करावा लागेल. नोकरांवर संपूर्णपणे कंट्रोल ठेवावा यासाठी हे अधिकार आहेत, नंतर आयटेम्-

“Powers and functions of the Chairman of the Standing Committee- (i) To convene, preside over and conduct of the meetings of the Committee, (ii) To have full access to the records of the Committee, (iii) To sanctions works and schemes involving an estimated non-recurring expenditure of more than Rs.15,000 but not more than Rs.30,000 and/or recurring expenditure of more than Rs. 5,000, but not more than Rs. 10,000 per annum in case of any work or scheme which does not fall within the purview of any subject-matter committee,(iv) To acquire and hold moveable property of value exceeding Rs. 10,000 but not exceeding Rs. 15,000 in each case and immoveable property valued at an amount exceeding Rs 10,000 but not exceeding Rs. 25,000 in each case, (v) To sale or transfer moveable property of value exceeding Rs. 5,000 but not exceeding Rs. 7,500 in each case, (vi) To sanction tenders and contracts for sactioned works of schemes estimated to cost more than Rs. 30,000 but not more than Rs. 50,000 in each case, (vii) To write off irrcoverable dues and losses exceeding Rs. 100 but not exceeding Rs. 200 in each case.”

या सगळ्या पॉवर्स आहेत. हे अधिकार आहेत. या सगळ्या पॉवर्सच्या अधिकारांचा विचार केला तर मग पॉवर्स किंवा अधिकार कशाला म्हणावे ? अमुकच माणसाला, अ, ब, क, यांना पॉवर्स दिल्या म्हणजे त्या पॉवर्स आणि बाकींच्याकडे असल्या म्हणजे त्या पॉवर्स नाहीत असे कोणाला म्हणायचे आहे काय ?

अध्यक्ष महाराज, जिल्हा कौन्सिलकडे लॉ अँड ऑर्डर मेंटेन करण्याच्या पॉवर्स दिल्या नाहीत अशी टीका करण्यात आली तर मी काहीतरी समजू शकेन. माझ्या मताने त्यांना पुरेसे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यांच्याकडे सोपविण्यात आलेली विकासाची कामे परिणामकारकपणे पार पाडण्याकरिता आवश्यक ते निर्णय घेण्याचा अधिकार, पैसा मंजूर करण्याचा अधिकार, अंमलबजावणी करण्याकरिता लागणाऱ्या सर्व बाबींवर देखरेख करण्याचा, त्या गोष्टीत लक्ष घालण्याचा अधिकार, योजना कार्यान्वित करणाऱ्या अधिकाऱ्यांवर लक्ष ठेवण्याचा, ते चुकले तर रिपोर्ट करण्याचा अधिकार, हे सर्व अधिकार देण्यात आलेले आहेत. एवढेच नव्हे तर सरकारकडून मिळालेल्या पैशात भर घालण्याचाही अधिकार देण्यात आलेला आहे. कर जमा करण्याचा अधिकार एका बाजूला आणि खर्च करण्याचा अधिकार दुसऱ्या बाजूला असा समतोल साधला गेला पाहिजे. अध्यक्ष महाराज, माझ्या मताने कर बसविण्याचा अधिकार असणे ही अधिकाराची सगळ्यात मोठी कसोटी आहे. कर बसविल्याशिवाय खर्च करण्याची ज्याची हौस असेल त्याची थोडी गैरसोय होईल पण त्याला नाईलाज आहे. लोकशाहीप्रणीत घटनेत ही गोष्ट बसत नाही. या परिशिष्टात सर्व गोष्टी विस्तृतपणे दिलेल्या आहेत.

अध्यक्ष महाराज, परिशिष्ट बारा हे मुख्य प्रशासक, जिल्हा खातेप्रमुख आणि गट विकास अधिकारी यांच्या प्रशासकीय व आर्थिक अधिकारासंबंधी आहे. मुख्य प्रशासकाचे अधिकार सांगत असताना -

"(iii) to supervise and control the execution of all activities of the District Council, (vi) to take all measures needed for speedy execution of all schemes and works of the District."

असे सांगण्यात आले आहे. यात काय चूक आहे हे मला कळत नाही. तो जोपर्यंत जिल्हा कौन्सिलचा एक्झिक्युटिव्ह इन्स्ट्रूमेंट म्हणून रहाणार आहे, तोपर्यंत त्याला त्याकरिता योग्य ते अधिकार द्यावयास नकोत काय ? त्याच्यावर या जबाबदाऱ्या आलेल्या आहेत. जिल्हा कौन्सिल आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी यांचा एकमेकावर चेक असलाच पाहिजे. जिल्हा कौन्सिलकडे जी कामे सोपविण्यात आली

आहेत ती पार पाडण्याकरिता आवश्यक ते अधिकार न देता काही बाजूला राखून ठेवले तर सत्तेचे रिझर्वेशन केले आहे असे म्हणता येईल. अध्यक्ष महाराज, क्लास वन आणि क्लास टू चे अधिकारी नेमण्याचे अधिकार या विधानसभेलाही नाहीत. ते अधिकार त्या बॉडीला दिले नाहीत, ही गोष्ट त्या बॉडीच्या फायद्याची आहे. जिल्हा कौन्सिलला जेवढे अधिकार दिले आहेत तेवढे दुसऱ्या कोणत्याही डेमॉक्रॅटिक बॉडीला दिलेले नाहीत. रिक्रुटमेंटचे काम मात्र स्वतंत्र बॉडीकडूनच झाले पाहिजे. अध्यक्ष महाराज, समोरच्या माणसाला बाजूला ढकलण्याची सत्ता असली म्हणजेच खरी सत्ता आहे असे मानणे या प्रवृत्तीला मी Feudal notion of power असा शब्द वापरतो. योजना बनविण्याचा, खर्च करण्याचा, बजेट सँक्शन करण्याचा, आवश्यक तर टॅक्स बसविण्याचा व त्याचप्रमाणे दिमतीला दिलेल्या यंत्रणेवर आवश्यक तो अधिकार गाजविण्याच्या पॉवर्स देऊन आवश्यक ती लोकशाहीप्रणीत सत्ता त्या बॉडीला दिलेली आहे असे मला वाटते. अध्यक्ष महाराज, विकेंद्रीकरण हे अनियंत्रित सत्तेच्या अधिकारांचे नसून ते लोकशाही अधिकारांचे आहे. छोटी छोटी सुलतानेट्स तयार करण्यासाठी सत्ता नाही. ही गोष्ट कटाक्षाने लक्षात घ्यावयास हवी. ज्या ज्या ठिकाणी लोकशाही तत्त्वांवर चाललेल्या आणि लोकशाही विचाराशी बांधलेल्या संस्था उभ्या करावयाच्या आहेत त्या त्या ठिकाणी त्या संस्थांना पार्लमेंटरी डेमॉक्रसीची तत्त्वे लागू होतात.

नोकर नेमण्याचा अथवा ते काढून टाकण्याचा जिल्हा कौन्सिलला अधिकार नाही, या टीकेला अनुलक्षून मला एक गोष्ट नजरेस आणावयाची आहे. एक चांगला शब्द माझ्या वाचण्यात आला तो मला आता आठवत नसला तरी मी असे म्हणू शकेन की, ही विधानसभा म्हणजे एक उच्च सभा आहे. पार्लमेंट सॉव्हरिन असल्याने तिला सॉव्हरिन असे म्हणता येणार नाही, तरी या राज्यातील सार्वजनिक जीवनाची प्रातिनिधिक अशी हाय पॉवर असलेली ती सर्वश्रेष्ठ सभा आहे असे म्हणावयास काही हरकत नाही. नोकर नेमण्याच्या बाबतीत जो अधिकार या सभेलासुद्धा नाही तो जिल्हा कौन्सिलला कसा देणार असा प्रश्न निर्माण होतो.The Legislature cannot appoint anybody अर्थात् नेमलेल्या माणसांकडून त्यांना पैसा पुरवून चोखपणे काम करवून घेण्याची जी जबाबदारी आहे तिला अनुलक्षून जरूर ते अधिकार देण्यात आले आहेत. लोकशाही संस्था चांगल्या तऱ्हेने चालावयाच्या असतील तर अशा तऱ्हेने त्या ठिकाणीही कामाची व अधिकारांची वाटणी होण्याची आवश्यकता आहे. परंतु या अधिकारांच्या वाटणीच्या बाबतीत मी दोन-तीन सभासदांची जी भाषणे ऐकली

त्यात त्यांनी अशी टीका केली की हे अधिकार ब्युरॉक्रसीला देण्यात आले आहेत. वस्तुतः ब्युरॉक्रसी या शब्दाचा वाईट अर्थ नाही. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह अधिकाऱ्यांची कार्यक्षम यंत्रणा ती ब्युरॉक्रसी असा त्या शब्दाचा चांगला अर्थ आहे. परंतु ब्रिटिश अमदानीत त्या वेळच्या नोकरशाहीवर टीका करीत असताना ब्युरॉक्रसी अशा वाईट अर्थाने शब्दप्रयोग करण्यात आला व त्यानंतर वाईट अर्थाने तो शब्द वापरण्याचा प्रघात पडला. वस्तुतः कारभार करण्याचे शिक्षण घेतलेल्या तज्ज्ञाच्या संघटनेला थोडे फार अधिकार द्यावयास पाहिजेत. ते अधिकार नसून त्या जबाबदाऱ्या आहेत. त्या पार पाडल्या जातात की नाही हे पाहाण्याची मुख्य जबाबदारी लोकनियुक्त संस्थांना देण्यात आली आहे. त्यासाठी आम्ही रिझर्वेशन आणि नॉमिनेशन अशा गोष्टींचा अंगीकार केलेला नाही. मागासलेल्या लोकांसाठी आणि स्त्रियांसाठी कोऑप्शन न ठेवता रिझर्वेशन ठेवण्यात यावे अशी जी सूचना करण्यात आली तिला अनुलक्षून मला असे विचारावयाचे आहे की, रिझर्वेशन आम्ही किती दिवस ठेवावे ? रिझर्वेशनची आम्हाला फार भीती वाटत नसून ते आम्हाला मंजूर नाही. सन्माननीय सभासद श्री. भंडारे यांनी असे सुचविले की, अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून सुचविण्यात आलेली एकसदस्य मतदारसंघाची पद्धत बरोबर नसून बहुसदस्य मतदारसंघ व एका उमेदवारास एकच मत विभागून देण्याची सक्तीची पद्धत हीच चांगली आहे. अध्यक्ष महाराज, त्यांनी सुचविलेल्या पद्धतीशी मी फारसा अनुकूल नाही. याचे कारण असे आहे की, एकदा कम्युनॅलिझम हा ॲक्टिव्ह आहे असे मानल्यानंतर, सन्माननीय सभासद श्री. भंडारे यांची पद्धत अंमलात आणली गेली तर दोन किंवा अधिक जातीय गट एकत्र येतील व त्यांचे अलायन्सेस होतील. सन्माननीय सभासद श्री. एस्.एम्. जोशी यांनी जो एक प्रश्न उपस्थित केला त्याप्रमाणे जातीय गट एकत्र येऊन ५१ टक्के मेजॉरिटी करून निवडणुका आपल्या ताब्यात घेतील. आपल्यापुढे जो प्रश्न आहे तो असा की, आपणाला जातीयवादाशी झगडा करावयाचा असेल तर जो जातीयवाद आहे तो मनातून आणि विचारातून काढून टाकण्याचा कसोशीने प्रयत्न करणे हा एकमेव मार्ग आहे. अन्य मार्ग नाही. निवडणुकीच्या वेळी जातीयवादाचा वापर केला जाईल हे गृहीत धरल्यानंतर त्याचा पराभव करण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावयास हवा.

सन्माननीय सभासद, श्री. भंडारे यांनी असे सांगितले की, नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत मराठ्यांनी मराठ्यांना, आणि ब्राह्मणांनी ब्राह्मणांना मते दिली. मला असे विचारावयाचे आहे की, बौद्ध धर्म स्वीकारलेल्या लोकांनी बौद्ध उमेदवारांना मते दिली नाहीत असे सांगू शकतील काय ? फक्त नवबौद्ध मतदारांनी जर

नवबौद्ध उमेदवारांना मते दिली असली तर त्याला मात्र हरकत नाही, असे त्यांना सुचवावयाचे आहे ?

I do not belive in closed doors. कोणत्याही गोष्टीत सुधारणा करणे शक्य असेल तर ती झाली पाहिजे व त्याकरिता दरवाजा नेहमी उघडा ठेवला पाहिजे. मी कोणतीही गोष्ट आग्रहाने मांडली आणि नंतर जर चूक दिसून आली तर ती मान्य करण्यास मी तयार असतो. जातीयवादी वृत्तीवर बंधन घातले पाहिजे अशी विचारसरणी आम्ही ठेवली आहे, तेव्हा या गोष्टीला ज्यात वाव असेल ती गोष्ट आम्ही कशी मान्य करू ? एक गोष्ट मी स्पष्ट करू इच्छितो की, आम्ही जातीयवादावर निवडणुका लढविण्याचा केव्हाही प्रयत्न केलेला नाही. जातीयवाद जो आपल्या समाज जीवनात रुळलेला आहे तो एकदम जाणार नाही. ही गोष्ट खरी असली तरी जनतेला शिक्षण देऊन तो घालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जातीयवाद काढण्याकरिता जर जनतेला ट्रेनिंग देण्याची आवश्यकता असली तर तेही केले पाहिजे. १९३७ सालच्या आणि १९४६ सालच्या निवडणुकीत मी पाहिले की, त्यात जातीयवादाचा गंधसुद्धा दिसला नाही. म्हणून मी म्हणतो की, लोकांचे प्रश्न असले तर लोक जातीयवाद विसरतात आणि जो आपले प्रश्न सोडवील त्याला मतदान करतात. तेव्हा माझी अशी सूचना आहे की, ही गोष्ट एकदम टाकाऊ आहे असे न म्हणता यात जी सिस्टीम दिलेली आहे तिचा ५-२५ वर्षे प्रयोग करून पाहिला पाहिजे. आम्हाला सिंगल मेंबर काँस्टिट्युअन्सी नको म्हणून म्हणणे हाच एक डॉग्मा आहे. कारण जातीयवाद आहे व तो पुढे कधीच नष्ट होण्याची शक्यता नाही, अशा समजातून ही विचारसरणी निर्माण होते असे मला वाटते.

सन्माननीय सभासदांना माझी अशी विनंती आहे की, यात सत्तेचे विकेंद्रीकरण नाही असे आपण म्हणू नका. आपल्याला जर असे वाटत असेल तर सध्या करण्यात आलेली तरतूद कमी आहे, अपुरी आहे असे सांगा. मी जास्त वेळ इच्छित नाही. या रिपोर्टावर सन्माननीय सभासदांनी अनेक उपयोगी सूचना केल्या आहेत, त्याचप्रमाणे काही शंकाही प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. तेव्हा कोणत्याही तऱ्हेचा गैरसमज राहू नये या दृष्टीने काही शंकांचे निराकरण करण्याचा मी प्रयत्न केला आहे. इतके बोलून मी आपले भाषण संपवितो.

■ ■ ■

On the 7th April 1961, Shri Chavan, Chief Minister, presented the Report of the Democratic Decentralisation Committee to solicit the opinion of the House, stating that the Government had accepted the principle of decentralisation of power; Shri Chavan further said that the Government desired to introduce 'Panchayat Raj' so as to enable rural Maharashtra to modernize itself without breaking off from the good old traditions. He further stated that the Government wanted to give more power to Village Panchayats with a view to strengthening the position of stable Government and that fulfilment of the Governments' objectives should be the test of that programmes and that the new organisations should be the instruments of the fulfilment of the objectives. Replying to the discussion on the Report, he assured the House that the Government would consider all the suggestions made by the members. To the critics of the Report, he said that the proposed bodies would be given powers to prepare the budget, to sanction it and incur expenditure accordingly; and that no legislative body would be given the administrative powers of appointment and dismissal. Shri Y. B. Chavan, Chief Minister spoke on the report on 12th April 1961 also.

# दिवंगत मान्यवर व्यक्तींना आदरांजली*

**२७ नोव्हेंबर १९६१**

*कै. भाऊसाहेब हिरे, सर रेजिनाल्ड स्पेन्स, श्री. एल्.एन्. भोईर व डॉ.एम्.यू. मस्कारेन्यास यांच्या निधनाबद्दल मा.चव्हाण यानी शोक प्रस्ताव मांडला.*

---

अध्यक्ष महाराज, या सेशनच्या अगदी पहिल्याच दिवशी एका दुःखद प्रसंगाचा उल्लेख करण्याचा प्रसंग माझ्यावर आलेला आहे आणि तो म्हणजे श्री.भाऊसाहेब हिरे यांच्या दुःखद निधनाबद्दल. कै. भाऊसाहेब हिरे हे सध्याच्या विधानसभेचे सभासद होते व जुन्या मुंबई राज्याच्या मंत्रीमंडळात ते एक ज्येष्ठ मंत्री म्हणून काम करीत होते. यामुळे आपणा सर्वांचे त्यांना श्रद्धांजली वाहण्याचे कर्तव्य आहे. गेल्या महिन्याच्या ६ तारखेला अनपेक्षित रीत्या आम्हाला त्यांच्या मृत्यूची बातमी ऐकण्याचा प्रसंग आला. मृत्यूसमयी त्यांचे वय ५७ वर्षांचे होते. त्या दिवशी ते काही कामानिमित्त धुळ्याला जीपमधून चालले होते. त्यावेळी त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला व धुळ्याला पोचल्यानंतर त्यांना मृत्यू आला. त्यांच्या मृत्यूची बातमी आम्हाला इतक्या अनपेक्षितरीत्या ऐकावयास मिळेल अशी कोणालाही कल्पना नव्हती.

अध्यक्ष महाराज, कै. भाऊसाहेब हिरे यांचे जीवन अनेक कामांनी भरलेले आहे. त्यांच्या कोणत्या कामाला महत्त्व द्यावे आणि कोणत्या कामाला गौण लेखावे हेच समजत नाही. त्यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये फार मोलाची कामगिरी केली आहे. महाराष्ट्र निर्मितीचे त्यांनी प्रथमपासूनच समर्थन केले. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्राच्या

---

* Maharashtra Legislative Assemble Debates, Vol. V, Part II, 27th November 1961, pp. 1-2.

निर्मितीकरिता जे काही प्रयत्न केले त्या प्रयत्नांना महाराष्ट्राच्या इतिहासात अत्यंत मोलाचे स्थान आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीकरिता ज्या काही गोष्टी केल्या आहेत त्यांच्यापैकी काही केल्या नसत्या तर आज निर्माण झालेला महाराष्ट्र याच परिस्थितीमध्ये आपल्याला दिसला असता किंवा नाही याबद्दल मला शंका आहे. महाराष्ट्राची निर्मिती व्हावी याकरिता पहिली परिषद त्यांनीच घेतली. त्याचप्रमाणे नागपूर करार घडवून आणण्याच्या कामी आणि त्याला मूर्त स्वरूप देण्याच्या कामी त्यांनी अत्यंत महत्त्वाची कामगिरी केली आहे.

दुसरी गोष्ट अशी की, गेल्या चार-पाच वर्षांत ते सरकारच्या बाहेर असतानासुद्धा त्यांनी सरकारने केलेल्या कामाकडे पाहण्याचे धोरण अत्यंत उदात्त असे ठेवले होते; आणि त्यांनी असे धोरण ठेवल्यामुळेच सरकारला बरेच काम करता आले. या राज्याचा मुख्यमंत्री या नात्याने, राज्यकर्त्या पक्षाचा प्रमुख म्हणून आणि मी स्वतः व्यक्तिगतरीत्या त्यांनी महाराष्ट्र निर्मितीच्या चळवळीला जी जी काही मदत केली आहे त्याच्याबद्दल त्यांचा येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो, आणि असा उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजतो.

या व्यतिरिक्त कै. भाऊसाहेब हिरे यांनी शिक्षण क्षेत्रात आणि सहकार क्षेत्रात अत्यंत मोलाची अशी कामगिरी केली आहे. त्यांची शिक्षण क्षेत्रातील कामगिरी पाहावयाची असल्यास आपल्याला नाशिक जिल्ह्यात जावे लागेल. तेथे त्यांनी या क्षेत्रात फार मोठी कामगिरी करून ठेवली आहे. मागच्या तीन-चार वर्षांपासून ते सहकारी क्षेत्रात काम करीत होते आणि या क्षेत्रात त्यांनी महाराष्ट्रात अत्यंत मोलाची कामगिरी करून ठेवली आहे. त्यांच्या या प्रगतीमुळेच महाराष्ट्र सहकारी क्षेत्राची फार मोठी प्रगती करू शकला. त्यांच्या निधनामुळे आमच्यातील एक मोठा सहकारी क्षेत्रातील कार्यकर्ता एक थोर राजकीय नेता व एक थोर राज्यकर्ता आमच्यातून गेला असे म्हणावे लागते. त्यांच्या मृत्यूमुळे महाराष्ट्राचे जे नुकसान झाले आहे ते लवकर भरून निघणार नाही. गेल्या काही दिवसात आम्ही त्यांच्या आणखी जवळ जाण्याचा प्रसंग निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होतो, परंतु दुर्दैवाने काळाने त्यांना आमच्यापासून हिरावून घेतले. या सभागृहाच्या भावना त्यांच्या कुटुंबियांना कळविण्यात याव्यात, अशी मी विनंती करून त्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत असे जाहीर करतो.

यानंतर अध्यक्ष महाराज, आणखी काही व्यक्तींच्या मृत्यूबद्दल आम्हाला दुखवटा जाहीर करावयाचा आहे. सर रेजिनॉल्ड स्पेन्स ह्यांच्या मृत्यूसंबंधाने आम्हाला दुखवटा जाहीर करावयाचा आहे. हे गृहस्थ १९२२-२३ साली हिंदुस्थानात आले. ते जरी एका

व्यापारी कंपनीत काम करण्यासाठी हिंदुस्थानात आले तरी नंतर त्यांनी आपले इतर क्षेत्रात काम वाढविले आणि ते या शहराच्या सामाजिक कार्यक्षेत्रात काम करू लागले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८१ वर्षांचे होते. त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली नव्हती, पण मला माहीत आहे की, त्यांनी शिक्षण क्षेत्रात आणि विशेषतः नॅचरल हिस्ट्री या विषयात बरेच काम केले आहे. ते बरेच दिवस मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासद होते व येथे जेव्हा कौन्सिल स्थापन झाले तेव्हा येथील सभासदत्वसुद्धा त्यांना मिळाले होते. त्यांच्या मृत्यूबद्दल दुखवटा प्रदर्शित करणे आमचे कर्तव्य ठरते.

यानंतर श्री. नानासाहेब भोईर यांच्या मृत्यूबद्दल दुखवटा प्रदर्शित करावयाचा आहे. या विधानसभेचे ते बरेच दिवस सभासद होते. त्यांनी मुख्यतः ठाणे जिल्ह्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात प्रमुख कामगिरी केली आहे. त्याचप्रमाणे त्यांची सहकारी क्षेत्रातील कामगिरी उल्लेखनीय आहे. ते स्वतः शेतीच्या कामात देखील मन घालीत असत. म्हणजे ते जातीने शेतीच्या कामात भाग घेत असत. ते बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे डायरेक्टर होते, त्याचप्रमाणे ते ठाण्याच्या जिल्हा सहकारी बँकेचेदेखील डायरेक्टर होते. ठाणे डिस्ट्रिक्ट जिल्हा लोकल बोर्डाचे बरेच दिवस ते अध्यक्ष होते. त्यांच्या मृत्यूमुळे ठाणे जिल्ह्याचे फार मोठे नुकसान झाले आहे.

यानंतर डॉ. एम्. यु. मस्कारेन्यास यांच्या मृत्युबद्दल आपल्याला दुखवटा प्रदर्शित करावयाचा आहे. ते मुंबई शहरात एक डॉक्टर म्हणून जरी काम करीत होते तरी त्यांना मुंबईच्या सामाजिक जीवनात फार मोठे स्थान होते. ते मुंबई कायदेमंडळाचे सभासद होते. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांना मृत्यू आला.

अध्यक्ष महाराज, या सर्व मृतात्म्यांना शांती मिळो, अशी मी ईश्वराजवळ प्रार्थना करतो.

■ ■ ■

On 27th November ,1961, Shri Chavan, Chief Minister made condolatory references to the deaths of Shri B.S.Hiray,Sir Reginald Spence, Shri L.N.Bhoir and Dr.M.U.Mascarenhas. He said that all these distinguished men had contributed their mite in enriching the social and cultural life of the State.

# औद्योगिक विकास महामंडळ विधेयक*

**२७ नोव्हेंबर १९६१**

*राज्याचा औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी एका वैधानिक औद्योगिक विकास महामंडळाची आवश्यकता आहे असे मा. श्री. चव्हाण यांनी सांगितले.*

अध्यक्ष महाराज, या बिलाचा मसुदा प्रसिद्ध झाल्यापासून मध्यंतरी बराच अवधी लोटला आहे आणि त्यामुळे या बिलाचा सर्व दृष्टींनी साधकबाधक विचार करण्याची संधी सर्व सन्माननीय सभासदांना मिळाली असेल अशी माझी कल्पना आहे. या मसुद्यानुसार एका अत्यंत महत्त्वाच्या संस्थेला कायदेशीररीत्या जन्म मिळणार आहे. किंबहुना या राज्याच्या औद्योगिक विकासासाठी आणि प्रगतीसाठी एक महत्त्वाचे शस्त्र या बिलान्वये आपण निर्माण करीत आहोत अशी या बिलासंबंधाने माझी दृष्टी आहे. हे बिल या राज्याच्या औद्योगिक विकासाच्या बाबतीत महत्त्वाचे बदल करीत असल्यामुळे ते अत्यंत महत्त्वाचे असे पाऊल आहे. या मसुद्यातील ठळक तरतुदींविषयी या सभागृहाला मी सर्वसामान्यपणे माहिती सांगू इच्छितो.

अध्यक्ष महाराज, गेल्या दहा वर्षांत या देशामध्ये सर्वसामान्यपणे औद्योगीकरण झपाट्याने चालू आहे. त्याचा परिणाम स्वाभाविकपणेच या राज्यावरही झाला आहे. विशेषतः मुंबई शहरामध्ये आणि त्याच्या अवती-भोवतीच्या भागामध्ये औद्योगिक प्रगती फार वेगाने चालू आहे. परंतु त्याचबरोबर ही गोष्टही सर्वमान्य झाली आहे की, अशा तऱ्हेने काही ठिकाणी औद्योगिक प्रगती वेगाने चालू असली तरी काही विभागात

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. V. Part II (Inside No.1), Nov.-Dec. 1961. 27th November 1961. pp 12-15.

ती जास्त वेगाने करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी काही साधने असली पाहिजेत. या सर्व गोष्टी विचारात घेता यासाठी एक संघटना निर्माण करण्याची आवश्यकता आहे असे वाटते. ही परिस्थिती निर्माण करण्याच्या दृष्टीने ज्यांना आपण इंडस्ट्रिअल इस्टेटस् म्हणतो त्या निर्माण करण्याचा प्रयत्न आम्ही गेल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात केला होता. तो प्रयत्न फारसा यशस्वी झाला असे म्हणता येणार नाही. परंतु त्या निमित्ताने या प्रश्नाच्या मार्गात असणाऱ्या अडचणींची आम्हाला स्पष्टपणे जाणीव झाली आहे. या दृष्टीने औद्योगिक विकासासाठी एक स्टॅच्युटरी कॉर्पोरेशन निर्माण करणे आवश्यक वाटल्यावरून हे विधेयक आणले आहे.

अध्यक्ष महाराज, या संघटनेचा जन्म झाल्यानंतर औद्योगिक प्रगती आपोआप होणार आहे असे नाही. औद्योगिक विकासासाठी सुरुवातीला आपल्याला अनेक प्रयत्न करावे लागतील आणि त्या प्रयत्नातील हा एक महत्त्वाचा प्रयोग आहे एवढेच मी या संघटनेबाबत म्हणेन. असे दिसून आले आहे की, उद्योगधंदा करणारा जो माणूस असेल - मग तो सहकारी पद्धतीवर असो की खाजगी असो - त्याला तू अमुक ठिकाणी जाऊन धंदा सुरू कर असे सांगून भागत नाही व तेवढ्याने हा प्रश्नही सुटत नाही. त्यासाठी त्या ठिकाणी धंद्याला उपकारक परिस्थिती आहे किंवा काय याचाही विचार केला पाहिजे. ज्याला आपण लोकेशन ऑफ इंडस्ट्रीज म्हणतो त्याच्या पाठीमागे एक अतिशय शास्त्रीय असा विचार आहे. कोणत्याही धंद्यासाठी लागणारा कच्चा माल मिळण्यास तेथे अनुकूल परिस्थिती आहे काय, बाजारपेठ जवळ आहे काय, आवश्यक साधने उपलब्ध आहेत काय, आवश्यक ती जमीन, पाणी आणि वीज मिळण्याची शक्यता आहे काय, हे सर्व पाहिले पाहिजे. ते नसेल तर तेथे जाणार कोण आणि धंदा सुरू करणार कोण? या सर्व गोष्टींचा विचार करून अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना केल्याशिवाय निव्वळ उद्योगधंदे सुरू करावेत असा प्रस्ताव करून भागणार नाही. एकंदर परिस्थितीची जी व्यवहार्य बाजू आहे तिचाही विचार केला पाहिजे.

मुंबई शहराच्या बाहेर उद्योगधंदे जावे आणि सरकारने तसे धोरण जाहीर करावे अशी लोकांची इच्छा आहे. परंतु असे म्हणण्यात मुंबईचे आणि राज्याचेही हित होणार नाही. आज मुंबई शहराचे जे आकर्षण आहे ते महाराष्ट्र राज्याचे महत्त्वाचे सामर्थ्य आहे. या सामर्थ्याचा वापर आम्हाला कसा करता येईल याचा विचार करीत असताना आम्हाला असे आढळून आले की, मुंबई शहराच्या अवतीभवती उद्योगधंद्याची शहरे किंवा उपनगरे निर्माण केली पाहिजेत. मुंबई शहराच्या बाहेर उद्योगधंदा सुरू करणे

कठीण होत चालले आहे. कठीण होत चालले आहे हा शब्दप्रयोगसुद्धा वस्तुस्थिती निदर्शक नाही, अवघड झाले आहे. हळूहळू अशक्य होणार आहे असेच म्हटले पाहिजे. तेव्हा यातून मार्ग काढण्यासाठी हे उद्योगधंदे मुंबई शहराच्या परिसरात आहेत असे वाटले पाहिजे, परंतु प्रत्यक्ष ते शहराच्या बाहेर असतील असे प्रयत्न करणे हाच एक मार्ग आहे. या दृष्टीने औद्योगिक वसाहती निर्माण केल्या पाहिजेत असा विचार पुढे आला. या विचारातून हे बिल पुढे आले आहे.

या विधेयकामध्ये जी संघटना आम्ही निर्माण करीत आहोत ती निर्माण करण्यासाठी काय कारणे घडली याचे मी आपल्यापुढे दिग्दर्शन करणार आहे. सुमारे दीड वर्षापूर्वी अशा प्रकारचे एक इंडस्ट्रीयल बोर्ड निर्माण केले गेले आहे. ते बोर्ड हळूहळू आपल्या कामात प्रगती करीत आहे. त्यावेळी अशा प्रकारच्या कॉर्पोरेशनच्या स्थापनेची वाट पहात बसण्यापेक्षा काहीतरी सुरुवात करावी असे वाटले म्हणून ते निर्माण करण्यात आले. आतापर्यंत ज्या इस्टेटस् निर्माण झाल्या आहेत त्यांची वाढ करण्यासाठी काय करणे आवश्यक आहे याचाही विचार केला पाहिजे. उदाहरणार्थ वागळे इस्टेट आहे किंवा उल्हासनगर वसाहत आहे. तसेच पोफळी-चिपळूण भागामध्ये औद्योगिक वाढ कशी करता येईल या दृष्टीनेही सरकारने विचार केला आहे. पूर्वीचे जे बोर्ड आहे त्याच्या बाबतीत पैशाचा प्रश्न येतो. तेव्हा हे बोर्ड औद्योगिक वाढीच्या दृष्टीने विशिष्ट मर्यादेबाहेर जाऊन काम करू शकणार नाही. इंडस्ट्रिअल बोर्डाच्या कामाचा वेग निव्वळ सरकारकडून मिळणाऱ्या ग्रँटवर अवलंबून राहणार. औद्योगिक विकासाच्या कामाला वेग येण्यासाठी स्टॅच्युटरी कॉर्पोरेशनसारख्या संस्थेची आवश्यकता आहे; याशिवाय उद्योगधंद्याला आवश्यक असलेली साधने आणि सोयी उपलब्ध होऊ शकणार नाहीत. या दृष्टीने ही एक संघटना निर्माण करण्यात येत आहे. आपल्या राज्याच्या औद्योगिक विकासासाठी, औद्योगिक क्षेत्रातील वेगळे वेगळे प्रश्न हाताळण्यासाठी आपल्याला अनेक संघटनांची आवश्यकता लागेल यात शंका नाही. परंतु त्यातील ही एक महत्त्वाची अशी संघटना आपण निर्माण करीत आहोत. माझ्या या विधानाचे मी आणखी स्पष्टीकरण करू इच्छितो.

इंडस्ट्रिअल बोर्ड किंवा कॉर्पोरेशन निर्माण करून आणि त्याच्यावर सगळ्या औद्योगिक प्रश्नांची जबाबदारी टाकून भागणार नाही. त्याच्या मर्यादेचाही विचार केला पाहिजे. परंतु काहीही असले तरी एक महत्त्वाची संघटना आपण निर्माण करीत आहोत यात शंका नाही. या कॉर्पोरेशनच्या निर्मितीबाबत एका गोष्टीकडे लक्ष वेधून मी आपले भाषण संपविणार आहे. या संघटनेमध्ये किती सभासद असावेत, त्यांचे काम

काय असावे वगैरेबाबत ज्या तरतुदी आहेत त्यांचा मी थोडक्यात उल्लेख करतो.

या कॉर्पोरेशनची सभासद-संख्या साधारणतः सात असावी अशी व्यवस्था आहे. दोन सभासद हे शासनाकडून नियुक्त होतील. त्यातील एक सभासद हा आर्थिक सल्लागार असेल. एक सभासद इलेक्ट्रिसिटी बोर्डाचा असेल. हौसिंग बोर्डाचा सभासदही त्यावर राहील. दोन बिनसरकारी सभासद राहतील. आपण यातील कलमांकडे लक्ष दिले तर आपल्या लक्षात येईल की या संस्थेला अत्यंत विस्तृत अशा पॉवर्स दिलेल्या आहेत. या संस्थेचे काम अगदी नवीन तऱ्हेचे आहे. त्यांच्याकडून जशी कामाची अपेक्षा केली जाणार आहे तसेच त्यांना अधिकारही दिले आहेत. या अधिकाराचे वर्णन १४ आणि १५व्या कलमात केले आहे. त्यावरून या संस्थेकडे किती महत्त्वाचे काम सोपविले आहे ते आपल्या लक्षात येईल. या कामात वेग यावा आणि राज्याच्या औद्योगिक विकासाचा वेग वाढावा या दृष्टीनेच हे सर्व अधिकार कॉर्पोरेशनला देण्यात आले आहेत. इंडस्ट्रिअल बोर्डाचे अधिकारक्षेत्र मर्यादित होते परंतु आता एक स्टॅच्युटरी अशी बॉडी निर्माण करून तिला औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी विस्तृत असे अधिकार दिले आहेत.

यानंतर ह्या राज्याने एक गोष्ट हाती घेतली आहे, ती म्हणजे इंडस्ट्रिअल इस्टेट कोठे सुरू करावयाची याचा जो प्राथमिक निर्णय आहे तो शासन करील, परंतु तो निर्णय घेतल्यानंतर तिची वाढ करणे, तिची तयारी करणे हे सगळे काम त्या संस्थेवर सोपविले जाईल. यामध्ये हेतू असा आहे की, ह्या राज्यात इंडस्ट्रिअल इस्टेट डेव्हलपमेंटचे वेगवेगळे विभाग आहेत आणि त्या ठिकाणी विशिष्ट गोष्टी नजरेपुढे ठेवून प्रयत्न करावे लागतील. संस्था निर्माण झाली म्हणजे धंद्याच्या दृष्टीने, आर्थिक दृष्टीने त्यांच्याकडून विचार होण्याची अपेक्षा असते, पण त्यातल्या त्यात समतोल विचार करण्याची दृष्टी राज्याला स्वीकारावी लागणार असल्यामुळे त्यासंबंधीचा विचार ह्या राज्याला करावा लागणार आहे.

ह्यानंतर ह्या कलमातील जो महत्त्वाचा भाग आहे त्याकडे मी सन्माननीय सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. ह्या संस्थांचे जे स्वतःचे काम आहे त्याचबरोबर इतर लोकल ऑथॉरिटीज किंवा म्युनिसिपल कॉर्पोरेशन्स यांनाही ही कामे करण्याचा अधिकार दिलेला आहे व त्यादृष्टीने योजना अंमलात आणण्याचा अधिकार ह्या संस्थेला दिलेला आहे. हा जो अधिकार दिलेला आहे तो मी सन्माननीय सभागृहाच्या लक्षात आणू इच्छितो. अधिकारासंबंधीची माहिती मी सांगितलेली आहे. याशिवाय आणखी दोन महत्त्वाच्या गोष्टी ह्या कॉर्पोरेशनसंबंधी आहेत त्याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

इंडस्ट्रिअल इस्टेट स्थापन झाल्यानंतर आणि औद्योगिक विकास झाल्यानंतर त्या ठिकाणी म्युनिसिपल सर्व्हिस देण्याचे काम असते. तेथे घरे तयार होतात, रस्ते तयार होतात व त्यांना दिवाबत्ती देण्याचा प्रश्न निर्माण होतो. तसेच इतर ज्या आवश्यक गोष्टी असतात त्या बाबतीत कोणी काम करावे असा प्रश्न निर्माण होतो. तसेच इतर ज्या आवश्यक गोष्टी असतात त्या बाबतीत कोणी काम करावे असा प्रश्न निर्माण होतो. विशेषतः मध्यंतरीच्या काळात म्हणजे औद्योगिक अवस्था सुरू होऊन नगरपालिकेचे स्थान निर्माण होईपर्यंतच्या काळात अनिश्चितता असते आणि त्यामुळे एक प्रकारचा धोका निर्माण होतो. तेव्हा ही परिस्थिती राहू नये म्हणून मध्यंतरीच्या काळात कॉर्पोरेशनने सरकारी अधिकारी नेमून त्यांना हे अधिकार देण्यात यावेत अशी व्यवस्था केलेली आहे. हे जे अधिकार दिलेले आहेत ते मी सन्माननीय सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो आणि अधिकार देण्याची पद्धत निर्माण करीत आहोत हे सांगू इच्छितो.

त्यानंतर दुसरी एक गोष्ट कलम २२ मध्ये दिसून येते. ही जी कॉर्पोरेशन आहे तिला स्वतःचे कर्ज उभारता येते. स्वतःच्या पतीवर कर्ज उभारणे ही गोष्ट महत्त्वाची मानली आहे. नाहीतर आमचा विकासाचा प्रश्न आहे तो मर्यादित करावा लागेल. तेव्हा ह्या संस्थेचे सामर्थ्य, तिची पत, तिची शक्ती ह्या गोष्टी लक्षात घेऊन तिला कर्ज उभारण्याची परवानगी दिलेली आहे. इंग्लंडमध्ये न्यू टाउन ॲक्ट आहे त्याप्रमाणे ह्या देशात औद्योगीकरणाचे काम सुरू होत आहे. पाईप टाकण्याचा जो अधिकार आहे तो ह्या बिलात देण्यात आलेला आहे. मुंबई शहरामध्ये सामान्यतः दोन उद्योगधंदे प्रमुख मानले जातात. त्यापैकी एक टेक्सटाइल म्हणजे कापडधंदा आहे. आणि दुसरा प्रेसिशन इंडस्ट्री हा होय. तिसरी एक महत्त्वाची इंडस्ट्री आपल्या येथे वाढू पाहात आहे. पेट्रोकेमिकल व आणखी काही रासायनिक उद्योगधंद्यांचा विकास करण्यासाठी वायुरूप व द्रवरूप पदार्थांची ने-आण करण्यासाठी पाईप लाइन टाकण्याची आवश्यकता आहे. त्यासंबंधींचे काही अधिकार ह्या कॉर्पोरेशनला देण्यात आलेले आहेत. अर्थात्, गॅस कंपनीबाबत ज्या शर्ती आहेत,त्यांच्या अधीन राहूनच ही तरतूद करण्यात आली आहे. तेव्हा मुंबई शहराचाच नव्हे तर ह्या राज्याचा औद्योगिक विकास तयार करण्यासाठी आपण ही एक नवीन साधन शक्ती तयार करीत आहोत. मला असे वाटते की, सर्व विचारवंतांचा याला पाठिंबा मिळेल आणि त्यामुळे नवीन निर्माण झालेल्या महाराष्ट्रामध्ये विकासाच्या दृष्टीने हे एक नवीन साधन बनेल एवढेच मला सांगावयाचे आहे.

■ ■ ■

Shri. Y. B.Chavan, Chief Minister, presented to the House the Industrial Development Corporation Bill for discussion on 27th November 1962. He said that it was felt necessary to establish a statutory corporation so as to bring about the industrial development of the State. He added that the State would need many such bodies to tackle the multifarious industrial problems. The Industrial Development Corporation was vested with tremendous powers so as to accomplish industrial development. The Corporation would be empowered to raise loans to meet its requirements and would be responsible for the industrial development of the State.

# सरकार विरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव*

**४ डिसेंबर १९६१**

*पानशेत दुर्घटनेबाबत विरोधकांनी मांडलेल्या अविश्वासाच्या ठरावास मा.श्री.चव्हाण यांचे उत्तर.*

अध्यक्ष महाराज, जवळ जवळ चार-सव्वा चार तास या सरकारवरील अविश्वासाच्या ठरावावर या सभागृहात भाषणे झाली. सगळी चर्चा मी ऐकली नाही तरी महत्त्वाची भाषणे मी ऐकली. सर्व भाषणात उपस्थित करण्यात आलेल्या सगळ्याच प्रश्नांना उत्तरे देण्याचा मी प्रयत्न करणार नाही. सामान्यपणे या प्रश्नांच्या बाबतीत मला जी माहिती आहे ती सभागृहापुढे ठेवणे मी आवश्यक समजतो. सन्माननीय सभागृहाचे विरोधी पक्षाचे नेते आमदार श्री.भंडारे यांच्या सकाळच्या भाषणाचा महत्त्वाचा भाग मी ऐकला आणि आताही मी त्यांचे भाषण ऐकले. त्यांनी आपले म्हणणे ठासून सांगितले, यापेक्षा फारसे विचार करण्यासारखे त्यांच्या भाषणात अजूनही मला काही वाटत नाही. या चर्चेमध्ये एक दोन भाषणे अधिक जबाबदारपूर्ण झाली. ती भाषणे कोणाची हे मी सांगत नाही. आमच्यावर अन्याय झाला असे उगीच कोणाला वाटावयास नको. हे सभागृह म्हणजे काही कोर्ट नव्हे, सरकार हे आरोपी आहे असे विरोधी पक्षाने समजून वागण्याचे कारण नाही. त्यांनी सरकारवर पाच आरोप केले. हे पाच आरोप या अविश्वासाच्या ठरावाच्या ए, बी, सी, डी, आणि ई या पाच परिच्छेदांमध्ये दिले आहेत. परंतु प्रत्यक्ष तीन आरोपांवरच म्हणजे बी, सी, आणि ई या तीन परिच्छेदात दिलेल्या आरोपांवरच त्यांची भाषणे झाली आणि ए आणि डी या

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol.V, Part II, 4th December 1961. pp. 315 to 323.

परिच्छेदातील आरोप सोइस्करपणे टाळता यावे म्हणून त्यांनी पलायन केले असावे असे मला वाटते. हे माझे मत आहे, त्यांना जर सरकारवर आरोप करावयाचे होते तर त्यांनी सन्माननीय सभागृहात हजर राहून ते करावयाचे होते. तेव्हा, अध्यक्ष महाराज, हे दोन आरोप सोडल्यानंतर बाकीचे जे तीन आरोप राहतात त्यांच्याबद्दल मला जी माहिती आहे ती मी सन्माननीय सभागृहासमोर ठेवू इच्छितो. या प्रश्नाच्या बाबतीत माझी स्वतःची बाजू अशी काहीच नाही. फक्त जी वस्तुस्थिती आहे ती मी निवेदन करणार आहे.

ज्या दिवशी पानशेत धरण फुटले त्या दिवसापासून आज हा अविश्वासाचा ठराव या सन्माननीय सभागृहापुढे येण्याच्या दिवसापर्यंतच्या ज्या दोन महत्त्वाच्या पण दुर्दैवी घटना घडल्या आहेत त्यांचे चित्र आपल्या सर्वांच्या डोळ्यासमोर आहेच. या काळात ज्या निरनिराळ्या घटना घडल्या त्यांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न काही मंडळी करीत आहेत. सरकारने संशय निर्माण होण्यासारखे वर्तन केले असे त्यांचे म्हणणे आहे. या प्रश्नासंबंधी जनतेच्या मनात संशय निर्माण झाला ही वस्तुस्थिती आहे आणि ती स्वीकारल्यामुळेच यासंबंधी चौकशी करण्याचे मी मान्य केले. ही एक वस्तुस्थिती आहे आणि तिच्याबद्दल माझ्या मनात दुमत नाही. पानशेतचे धरण फुटल्यानंतर ते का फुटले, त्यात काय करण्याची आवश्यकता होती, ते केले गेले की नाही याबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण झाली व माझ्याही मनात अशी शंका निर्माण झाली आणि म्हणून दुसऱ्या कोणीही सूचना करण्यापूर्वीच सरकारचा चौकशी कमिशन नेमण्याचा उद्देश आहे हे मी जाहीर केले आणि मला संधी मिळाली तेव्हा मी विरोधी पक्षाच्या काही नेत्यांशी त्याबद्दल चर्चासुद्धा केली. लोकांच्या मनात या प्रश्नाबद्दल निर्माण झालेल्या शंका दूर करण्याकरिताच चौकशीचे एक फोरम मी नेमण्याचे ठरविले. परंतु हे केल्यानंतरसुद्धा हे कसे घडले याबद्दल मी माझे मत व्यक्त करावयास पाहिजे होते असे विरोधी पक्षाचे सन्माननीय नेते आग्रहाने कसे काय म्हणत आहेत हे मला समजत नाही. हे कसे काय घडले याची चौकशी करून सत्य लोकांसमोर ठेवण्यासाठी तर मी चौकशी कमिशन नेमले. त्यासाठी तंत्रज्ञ माणसांचे साहाय्य देण्याचे ठरविल्यानंतर पुनः सरकारने आपले मत सांगावयास पाहिजे होते असे म्हणणे कसे काय बरोबर आहे हे माझ्या लक्षात येत नाही. एकाच वेळी दोन फोरमवरून दोन प्रकारचे निर्णय करणे कसे शक्य होते? लोकांच्या मनात निर्माण झालेला संशय दूर करावा म्हणून सरकारने दोन प्रकारची चौकशी मंडळे नेमली. त्यापैकी एक तांत्रिक प्रश्नावर विचार करण्यासाठी चौकशी मंडळ नेमले होते आणि दुसरे बावडेकर कमिशन नेमलेले होते. अशा वेळी

सरकारने एखाद्या गोष्टीसंबंधी आपले एक स्वतंत्र मत देणे कितपत योग्य झाले असते? हे कसे शक्य झाले असते आणि लोकांनी ते कितपत मानले असते हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. अशा वेळी सरकारने आपले काही मत याबाबतीत मांडणे योग्य झाले नसते. ह्या प्रश्नाच्या तांत्रिक बाजूसंबंधी मी आपले मत देऊ शकत नाही. कारण मी तंत्रज्ञ नाही. मी ह्या राज्याचा मुख्यमंत्री झालो असलो तरी पानशेत धरणाचे किंवा अन्य कोणत्याही धरणाचे काम बरोबर झाले आहे किंवा नाही हे सांगण्याचे ज्ञान माझ्याजवळ नाही. माझ्यापेक्षा कदाचित् श्री. देशमुख यांना ते जास्त असेल. परंतु आज त्या क्षेत्रात जे लोक प्रत्यक्ष काम करीत आहेत त्यांना श्री. देशमुखांच्यापेक्षाही ह्याबाबतीत जास्त ज्ञान असेल हे श्री.देशमुखही मान्य करतील, आणि धरणाचे काम बरोबर झाले होते की नाही हे तेच तंत्रज्ञ जास्त चांगल्या प्रकारे सांगू शकतील. आता ह्या सर्व बाबतीत सरकारचे काय मत आहे हे मांडणे मला योग्य वाटत नाही, आणि ते मला शक्यही नाही.

ह्या सर्व बाबतीत निःपक्षपाती चौकशी व्हावी असे माझ्या मनात होते कारण त्याशिवाय लोकांच्या मनात निर्माण झालेला संशय दूर होणार नाही आणि म्हणूनच गेल्या नागपूरच्या अधिवेशनात मी एक सेवानिवृत्त न्यायाधीश **श्री.बावडेकर**[१०] ह्यांच्याकडे हे चौकशीचे काम सोपवून त्यांच्या मदतीला आणखी दोन अधिकारी दिल्याचे जाहीर केले होते.

दुसरी जी अत्यंत दुर्दैवी घटना घडली ती म्हणजे ज्यांच्या हातात ह्या चौकशीचे सर्व काम दिलेले होते त्या श्री.बावडेकर यांचा मृत्यू. मी जेव्हा ही हकीगत ऐकली तेव्हा माझ्या मनाला धक्का बसला. पानशेतपेक्षाही जास्त दुर्दैवी ही घटना घडली. निःसंशय ही अत्यंत दुर्दैवी घटना होय. आणि ह्याबाबत कोणाचेही दुमत होऊ शकणार नाही.

अध्यक्ष महाराज, न्यायमूर्ती बावडेकरांच्यासंबंधी माझ्या मनात पूर्वीपासूनच फार आदरभाव होता आणि पूर्वीपासूनच मी त्यांच्यासंबंधी आदरभावाने बोलत होतो. आज निदान विधानसभेत बोलताना तरी त्यांच्या मृत्यूनंतर बऱ्याच लोकांनी त्यांचे गुण स्वीकारलेले आहेत ही विशेष गोष्ट आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, हे सर्व गुण त्यांच्या मृत्यूनंतर स्वीकारण्यात येत आहेत. एखादा मनुष्य जिवंत असताना त्याच्यावर अनेक प्रकारचे आरोप करावेत आणि त्याच्या मृत्युनंतर मग त्या न्यायदेवतेची पूजा करावी हीच जर त्या बाजूच्या लोकांची पद्धत असेल तर मग आमच्यातील गुण त्यांना दिसण्यासाठी आम्हाला मृत्यूच यायला पाहिजे असा त्याचा अर्थ होईल.

मला वारंवार एक गोष्ट प्रामुख्याने विचारण्यात आली की, बावडेकरांचा राजीनामा

माझ्याजवळ आल्यावर मी तो प्रसिद्ध का केला नाही? श्री. भंडारे यांनीही हा प्रश्न त्यांच्या भाषणात विचारला की, श्री.बावडेकरांच्या मृत्यूनंतर तरी हा त्यांचा राजीनामा प्रसिद्ध का करण्यात आला नाही? अध्यक्ष महाराज, मला ह्याबाबतीत जी माहिती आहे ती मी आज सभागृहासमोर सांगणार आहे. १३ तारखेला रात्री ११ - ११.३० च्या दरम्यान चीफ सेक्रेटरी माझ्याकडे आले. मी दिवसभर काम करून थकून गेलो होतो. तरी इतक्या रात्री मुख्य सचिव येतात त्याअर्थी काही तरी महत्त्वाचे काम असले पाहिजे असे मला वाटले. आणि मी त्यांना भेटलो. त्यांनी मला त्या दिवशी श्री.बावडेकरांनी राजीनामा दिला असे सांगितले आणि त्यांचे राजिनाम्याचे पत्रही दाखविले. मुख्य सचिवांचे त्यांच्याशी यासंबंधी जे बोलणे झाले त्याविषयीसुद्धा मला त्यांनी माहिती दिली. आमदार श्री.भंडारे यांनी असे विचारले आहे की, चीफ सेक्रेटरींशी आपले बोलणे झाले त्यात ज्या डॉक्युमेंटचा संबंध आला होता व ज्यांचा राजिनाम्यात उल्लेख होता, असे आपले म्हणणे आहे त्याची आपण चौकशी का केली नाही किंवा त्या अधिकाऱ्याला त्या जागेवरून का काढले नाही? अध्यक्ष महाराज, ज्या कागदपत्रांचा उल्लेख करण्यात आला आहे ते कोठे मिस्प्लेस झाले असतील किंवा कोठे पडले असतील. ते गहाळ झाले असा त्यांनी संशय व्यक्त केला आहे. त्यात जे शब्द आहेत ते ''आय् बिलिव्ह'' असे आहेत. साधारणपणे कमिशनच्या ऑफिस प्रमुखाबद्दल त्यांना संशय आला पण त्याबद्दल त्यांनी राजीनामा का द्यावा? आणि सरकारने त्याला चौकशी वगैरे न करता काढून का टाकावे? त्यांनी नुसता संशय व्यक्त केला होता. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद श्री.भंडारे ही गोष्ट मान्य करतील की, कोणावरही संशय आला तर त्याला आपण एकदम शिक्षा देत नाही. त्याच्यावर प्रथम प्रायमाफेसी केस आहे किंवा नाही ही गोष्ट पाहावी लागते आणि त्यात जर असे दिसून आले की संशयाला बळकटी येण्यास जागा आहे तर त्याची इन्क्वायरी करावी लागते. आणि अशी प्रायमाफेसी केस आहे किंवा नाही हे पाहण्याकरिता आणि त्यानंतर इन्क्वायरी करण्यासाठी त्यांनी काम चालू ठेवले पाहिजे होते. त्यांनी आपले काम चालू ठेवण्यासंबंधी मंजुरी दिली होती ही गोष्ट मी सांगू इच्छितो. तेव्हा असे म्हणणे की, बावडेकरांना आपल्या कमिशनचे कार्य चालविण्याकरिता साधने दिली गेली नाहीत हे कितपत योग्य आहे? त्यांनी जर राजीनामा देण्यापूर्वी आपल्या काही अडचणी सरकारपुढे ठेवल्या असत्या आणि त्याची जर सरकारने दखल घेतली नसती तर असे म्हणणे मी समजू शकलो असतो; परंतु त्यांनी अशा काही अडचणी सरकारपुढे मांडल्या नाहीत आणि एकदम आपल्या पदाचाच

राजीनामा दिला व त्यात या गोष्टीचा उल्लेख केला. त्याचपूर्वी एक अक्षरदेखील माझ्या कानावर आले नाही. अध्यक्ष महाराज, श्री.बावडेकरांनी आपल्या राजीनाम्याचे पत्र डायरेक्टली महाराष्ट्र राज्याच्या चीफ सेक्रेटरींना अॅड्रेस केलेले आहे. मी प्रश्नोत्तरांच्या वेळेस आज सकाळी सांगितले की, श्री.बावडेकरांची या चौकशी समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यापासून दुर्दैवाने त्यांची व माझी एकदाही भेट झाली नाही. परंतु ते काहीही असले तरी जोपर्यंत त्यांना काही अडचणी आहेत हे सरकारला कळले नाही तोपर्यंत सरकारने कशाच्या आधारावर त्यांना अडचण आहे हे समजावे? माननीय सदस्य अशी अपेक्षा कशी करू शकतात हेच मला कळत नाही. आमचे गाऱ्हाणे मी या सभागृहापुढे मांडीत आहे. एका अत्यंत जबाबदार माणसाची या कामाकरिता नियुक्ती करण्यात आली होती. तेव्हा जोपर्यंत त्यांच्याकडून काही तक्रार येत नाही तोपर्यंत आम्ही धरून चालले पाहिजे की सर्व काही सुरळीत चाललेले आहे.

१३ तारखेला तक्रार केल्यानंतर कमिशनच्या कामाचे कागद त्यांच्या स्वतःच्या ताब्यात दिले, ते कागद ज्या कपाटात होते त्याची किल्ली त्यांच्याजवळ देण्यात आली. त्यांच्या मदतीकरिता जे अधिकारी देण्यात आलेले होते ते बदलले जावे अशी मागणी त्यांनी केलेली नाही. त्यांनी असे म्हटले असते तर प्रश्न निराळा होता. उगीच संशय आल्यामुळे एखाद्याला फाशी देणारा हा देश नव्हे.

अध्यक्ष महाराज, कमिशन नेमण्यात आल्यानंतर कमिशनचे एक स्वतंत्र ऑफिस होते. आवश्यक ते सर्व रेकॉर्ड कमिशनच्या ताब्यात देण्यात आले. त्याच्या कॉपीज आज येथे उपलब्ध नाहीत. कारण कोणतीही गोष्ट कमिशनच्या हुकुमाशिवाय करता येत नाही. मग किल्लीची चौकशी कशी करणार? उलट कमिशनच्या कामाबद्दल अकारण क्युरिऑसिटी दाखववयाची नाही हे पथ्य मी नेहमी पाळत आलेलो आहे. जोपर्यंत स्वतःच्या हाताखालची माणसे रिलायेबल नाहीत अशी शंका त्यांनी घेतली नाही तोपर्यंत ती रिलायेबल नाहीत असे आम्ही कसे म्हणू शकतो? उदाहरणार्थ श्री.व्ही.डी.देशपांडे हे रिलायेबल नाहीत, बोललेला शब्द पाळत नाहीत, पुरावा नसताना भरमसाट बोलतात असे जोपर्यंत दिसून येत नाही, अशी तक्रार जोपर्यंत कोणी करत नाही तोपर्यंत तसे कसे म्हणता येईल? ज्याचे पाठीमागचे रेकॉर्ड अतिशय चांगले आहे अशाच अधिकाऱ्यांना कमिशनच्या हाताखाली देण्यात आलेले होते. अध्यक्ष महाराज, सरकारी यंत्रणेतील प्रत्येक मनुष्य वाईट आहे असे धरून चालू लागलो तर अनवस्था प्रसंग निर्माण होईल, देशावर संकट येईल.

अध्यक्ष महाराज, श्री.बावडेकरांचा राजीनामा प्रसिद्ध का केला नाही असे

विचारण्यात आले. मला स्वतःला राजीनाम्याची हकीगत जेव्हा कळली, तेव्हा मनाला एक प्रकारचा धक्का बसला. राजीनामा स्वीकारावा किंवा नाही ही जोपर्यंत चर्चेतील बाब होती तोपर्यंत तो प्रसिद्धीला देण्याचा प्रश्न नव्हता. कारण सरकार काही बातम्या पुरवणारी यंत्रणा नाही. त्यांनी राजीनामा दिला आहे ही हकीगत लोकांना कळावी या एकाच कर्तव्याच्या भावनेने मी ती गोष्ट वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींना सांगितली. राजीनामा प्रसिद्धीला द्यावा किंवा नाही हा प्रश्न माझ्यापुढे होता. अध्यक्ष महाराज, दुसऱ्या दिवशी तास दोन तासापर्यंत मी माझ्या मनाशी या प्रश्नाच्या प्रॉस अँड कॉन्सचा विचार करीत होतो. काय करणे शक्य आहे, काय नाही याबद्दल मी माझ्या मंत्रिमंडळाच्या सदस्यांशीही या बाबतीत चर्चा केली. त्यांच्यापैकी बऱ्याच सदस्यांना तोपर्यंत ही गोष्ट माहीत नव्हती. ते काही साधे राजीनामा देणारे पत्र नव्हते. त्यात काहीतरी संशय प्रकट करण्यात आलेला होता, ज्याची चौकशी होणे जरूर होते. हे काम दुसऱ्या कमिशनकडे सोपविले पाहिजे ही जबाबदारी होती. ज्या अवस्थेतून तो प्रश्न निर्माण झाला त्या अवस्थेच्या प्रॉस व कॉन्सना मी जागलो. सत्य लपविण्याचा माझा हेतू असता तर मी तो नाहीसा केला असता. अर्थात् घटनात्मक पद्धतीने काम करण्यासाठी आपण रूल ऑफ दि लॉचे महत्त्व मानून ती पद्धत आपण स्वीकारली आहे परंतु त्याचबरोबर एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी ती अशी की, लोकशाहीत प्रायॉरिटीजना तितकेच किंबहुना फार महत्त्व आहे. ती गोष्ट स्वीकारली तर बरे होईल असे मला त्या वेळी वाटले. त्यांचा राजीनामा आम्ही त्याचवेळी जाहीर केला असता तर त्यातून अशी परिस्थिती निर्माण झाली असती की, नवीन येणाऱ्या स्वाभिमानी माणसाला त्यांची जागा स्वीकारू नये असेच वाटले असते. राजीनाम्याच्या प्रसिद्धीकरणाने त्यावर चर्चा सुरू झाली असती. आमच्यासमोर असा प्रश्न होता की, लेटर ऑफ् रेसिग्नेशन व जरूर ते रेकॉर्ड नवीन माणसाची नेमणूक करून त्याच्या ताब्यात दिले पाहिजे. ते केले तर आम्ही आमचे कर्तव्य शंभर टक्क्यांनी बरोबर केले या भावनेने आम्ही निर्णय घेतला. त्याप्रमाणे लेटर ऑफ् रेसिग्नेशन इन्क्वायरी कमिशनच्या ताब्यात दिले जाईल अशी आम्ही घोषणा केली आणि आमचे कर्तव्य बजावले. आजही माझ्यासमोर दोन प्रश्न आहेत. एक प्रश्न त्या पत्राची कॉपी सभागृहामध्ये ठेवण्यासंबंधी आहे. दुसऱ्या बाजूने असा प्रश्न निर्माण होतो की, कमिशन नेमल्यानंतर काही कर्तव्ये पाळावयाची आहेत. अर्थात् याबाबतीत सभागृहाला माहिती देणे माझे कर्तव्य ठरते. ही गोष्ट खरी असली तरी या दोन प्रश्नांच्या कठीण अवस्थेतून आपणाला जावयाचे आहे. परंतु हे काम फार जोखमीचे आहे. कमिशनला देण्यात आलेली लेटरची प्रत मी

जरूर देऊ इच्छितो. परंतु आजही माझे असे स्पष्ट मत आहे की, चौकशी चालू असताना पत्र प्रसिद्ध केले असते तर कोणत्याही जबाबदार स्वाभिमानी माणसाने चौकशीचे काम अंगावर घेण्यास नकार दिला असता. आज तर आपण न्यायालयीन किंवा तत्स्वरूप अशा तऱ्हेची चौकशी निःपक्षपाती माणसाकडून करण्यात यावी अशी मागणी करीत आहोत, तर त्या मागणीतून निर्माण होणाऱ्या ज्या जबाबदाऱ्या आहेत त्या आपण पाळल्या पाहिजेत.

अध्यक्ष महाराज, कमिशनच्या मताचा परिणाम स्वीकारून तो प्रसिद्ध करावा लागेल. तो परिणाम तिजोरीत बंद करून ठेवण्यात आला आहे या अभिरोखाने मी बोलत नाही. त्या राजीनाम्याचे पत्र कमिशनकडे गेले असून जरूर ती चौकशी होऊन कमिशनचा निर्णय सभागृहापुढे आणि जनतेसमोर येणार आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या स्वीकारण्यास आम्ही तयार आहोत. आम्ही लोकशाहीचे तत्त्व मानतो असा माझा प्रांजळ समज आहे. यातून ज्या जबाबदाऱ्या पुढे येतील त्यापासून एक इंचही मी मागे सरणार नाही असे मी ह्या ठिकाणी आश्वासन देऊ इच्छितो.

यानंतर इन् ए कॅल्क्युलेटेड मॅनर इंटरफिअर्ड विथ दि स्मूथ वर्किंग इत्यादीसंबंधीचा जो प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे त्यावर बोलताना आचार्य अत्रे यांनी पुण्यात घडलेला प्रकार सांगितला. या ठरावात निर्माण केलेल्या या प्रश्नाशी त्या गोष्टीचा संबंध नसल्याने मी त्या चर्चेत जात नाही. तो प्रकार पोलिसांनी केला असे त्यांनी सांगितले. मी त्यांचे भाषण ऐकत होतो. त्यांचे 'पत्र' वाचण्याची मला इच्छा नाही असे नाही. कारण आचार्य अत्रे यांची मते मला समजून घ्यावयाची असतात; पण मी नेहमीच वाचतो असे नाही. आचार्य अत्रे यांच्याविषयी माझे जे चांगले मत आहे ते वाईट होऊ नये म्हणून मी 'मराठा' नेहमी वाचत नाही. तेव्हा अशा तऱ्हेचे आरोप केले गेले आहेत हे मी वर्तमानपत्रातून वाचत होतो. वर्तमानपत्रातील सर्व आरोपांची चौकशी करू लागलो तर सरकारला दुसरी कामेच करता येणार नाहीत. कोणीतरी जबाबदारी घेऊन तक्रार करावी म्हणजे चौकशी करता येईल. चौकशी करण्यास मी तयार नाही असे मी म्हणत नाही. पण वर्तमानपत्रात आलेल्या वृत्तावरून या आरोपांची चौकशी मी करणार नाही. मोघम स्वरूपात केलेल्या या आरोपाची चौकशी मी करणार नाही, करणार नाही, करणार नाही. आपण या आरोपासंबंधात जबाबदारी घ्या, आपल्या सहीने माझ्याकडे पाठवा, केवळ सभागृहात स्टेटमेंट करून चालणार नाही. कमिशनपुढे सर्वच प्रकरणाची चौकशी चालू आहे. कोणी काय काय केले, कोठे गेले, यासंबंधीच्या सर्व गोष्टींची चिरफाड आपण कमिशनपुढे करू शकता. वकीलपत्र देण्याचा प्रश्न या

नव्या कमिशनसमोर आपण पुन्हा मांडू शकता. समितीला वकील नेमण्याचा आणि उलट तपासणी करण्याचा अधिकार दिला तर मला काहीही दुःख होणार नाही. कोणीही खोटे आरोप करावे आणि आपण या ठिकाणी चौकशीची मागणी करावी यात आपला उद्देश काय आहे हे समजण्यासारखे आहे.

आता प्रश्न राहिला श्री. बावडेकर यांच्या मृत्यूचा. अमुकच एका कारणामुळे ते मेले असे काही आमचे मत नाही. मला स्वतःला असे वाटते की, शक्यता आहे, त्यांनी आत्महत्या केली असावी. जे काही मी ऐकले त्यावरून मलाही अशी शंका येते की आत्महत्यामुळे त्यांना मृत्यू आला असावा. ते खाली पडले, पाय घसरून पडले, असेच काही वाटत नाही. त्यांच्या मनात संशयाचे काहूर निर्माण झाले असेल आणि त्यातून आत्महत्या त्यांना करावी लागली असेल. धरण फुटल्यानंतर जनतेत संशयाचे वातावरण निर्माण झाले ते दूर करण्याकरिता ज्या माणसांच्या हाती चौकशीचे काम सोपविण्यात आले त्यांचा मृत्यू अशा संशयास्पद स्थितीत झाला, त्यामुळे संशयात अधिक भर पडली. तो दूर करण्याकरिता काही पद्धत आपण स्वीकारली पाहिजे. पत्रके काढून व बोलून संशयात भर घालण्याने काय होणार आहे? संशयाचे वातावरण दूर करण्याकरिता सर्वमान्य अशी जी पद्धत आहे ती एकदा स्वीकारल्यानंतर तो प्रश्न आपण तेथेच सोडून द्यावा. कारण आम्ही अशी आशा करतो की, श्री. बावडेकरांना आत्महत्त्या करावी असे वाटले असेल व त्यांनी खरोखरीच आत्महत्त्या केली असेल तर त्याची कारणे कोठे तरी लिहिलेली आढळतील. एखाद्या माणसाला शिक्षा करावयाची असली तर न्यायाचे जे तत्त्व आपण स्वीकारले आहे ते असे आहे की, १०० गुन्हेगार सुटले तरी चालेल, परंतु एकाही निर्दोषी माणसाला शिक्षा होता उपयोगी नाही. आता संशय निर्माण झाला असेल तर तो दूर करण्याकरिता सर्वमान्य मेथड किंवा मार्ग स्वीकारला पाहिजे. तेव्हा सरकारने ही सर्वमान्य मेथड स्वीकारली आहे की नाही व ती स्वीकारल्यानंतर त्यातून येणारा निर्णय कसाही असला तरी तो स्वीकारण्याची सरकारने तयारी दाखविली आहे की नाही याचा विचार या सन्माननीय सभागृहाने करावा. सरकारने जर अशी मेथड स्वीकारली नसती तर आपण या सरकारविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याऐवजी मीच स्वतः तसा ठराव आणला असता. त्याचप्रमाणे विरोधी पक्षसुद्धा आपल्यावरील जबाबदारी ओळखून वागलेला आहे की काय याचाही सन्माननीय सभागृहाने विचार करावा. एका कागदाबद्दल संशय निर्माण झाल्याबरोबर फायलींच्या फायली गहाळ झाल्या आहेत किंवा कपाटातील सर्व कागदपत्र गहाळ झाले आहेत अशा अफवा उठविणे हे जबाबदारीला

धरून आहे काय असा माझा प्रश्न आहे. आता काही सन्माननीय सभासदांचे म्हणणे असे आहे की, या बाबतीत मी आपण होऊन त्यांच्याकडे जावयास पाहिजे होते किंवा खुलासा करावयास पाहिजे होता. परंतु कदाचित् मेंटल प्रेशरखाली असल्यामुळे मी काहीही बोललो नसेन. आता मी बोललो नसलो तर जाहीरपणे आरोप करण्यापूर्वी या बाबतीत आम्हांला असे वाटते, याबद्दल तुमचे म्हणणे काय आहे असे मला विचारण्याचे त्यांचे कर्तव्य होते की नाही? माझा जाब त्यांनी जसा आता विचारला आहे तसाच त्यांनी जाहीरपणे आरोप करण्यापूर्वी विचारला असता तरी त्यांचे समाधान करण्याचा मी प्रयत्न केला असता. सन्माननीय सभासद श्री.अत्रे किंवा **श्री. डांगे**[५१] हे माझ्यापेक्षा वयाने मोठे आहेत आणि ज्या वातावरणात मी वाढलो आहे त्यात वयाचा मोठेपणा मानावयास मला शिकविले गेले आहे. तेव्हा मी वयाचा मोठेपणा मानतो. तेव्हा शिवाजी पार्कवर जाहीर सभेत बावडेकरांचा मृत्यू हा राजकीय खून आहे असा आरोप करण्यापूर्वी ज्याच्याविरुद्ध आपण आरोप करीत आहोत तो आपल्याच राज्याचा मुख्यमंत्री आहे, तेव्हा त्याचे या बाबतीत काय म्हणणे आहे हे ऐकून घेण्याची तयारी दाखविली असती तर बरे झाले असते. लोकांच्या मनात संशय निर्माण झाला ही गोष्ट खरी आहे. परंतु तो दूर करण्याकरिता सरकारने काय करावयास पाहिजे होते व ते केले आहे की नाही हे पाहाणे ही कसोटी या सन्माननीय सभागृहाने या प्रश्नाला लावावी. या बाबतीत सर्वसामान्य मार्ग सरकारने जर स्वीकारला नसेल किंवा तो स्वीकारल्यानंतर त्यातून येणाऱ्या निर्णयाप्रमाणे वागण्याची तयारी जर सरकारने दाखविली नसेल तर आपण अविश्वासाचा ठराव पास करू शकता. यात बहुमताचा किंवा अल्पमताचा प्रश्न नाही. हा आपला हक्क आहे आणि तो आपण बजावू शकता. बावडेकरांचा मृत्यू झाला ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. त्यांचा मृत्यू किंवा त्यांचा राजीनामा या घटना पानशेतच्या आपत्तीपेक्षाही जास्त दुःखद व दुर्दैवी घटना आहेत असे मी एकदा म्हटले, परंतु त्यांचा मृत्यू झाला किंवा त्यांनी आत्महत्या केली म्हणून आपण दुसऱ्या कोणाला तरी केवळ संशयावरून दोषी ठरविणार आहात काय हा मुख्य प्रश्न आहे.

सन्माननीय सभासद श्री.एस्.एम्.जोशी यांनी म्हटल्याप्रमाणे या अविश्वासाच्या ठरावातील ए आणि बी ही कलमे जवळ जवळ गाळण्यात आल्यामुळे या ठरावाचा पायाच डळमळीत झाला आहे असे मला वाटते. श्री. देशपांडे यांनी फार जोर देऊन त्यांच्या भाषणात वारंवार हे सांगितले की डेलिबरेट इंटरफियरन्स, कॅल्क्युलेटेड इंटरफियरन्स आहे. ते जर म्हणत असतील की हे मुद्दे आमचे नव्हते तर ती गोष्ट मी सोडून देतो. परंतु मला येथे सांगितले पाहिजे की, श्री. बावडेकरांचा मृत्यू ही एक दुर्दैवी

घटना आहे. या दुर्दैवाचा उपयोग करून काँग्रेस सरकारला आणि महाराष्ट्र सरकारच्या सर्व यंत्रणेला बदनाम करण्याचा प्रयत्न चाललेला आहे. एक कागद गहाळ झाल्याचे ऐकताच फायली पळविल्या, कपाटे पळविली अशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रातून प्रसिद्ध व्हायला लागल्या. संशयाने संशय वाढतो. आणि आपण एक संशयाचे वातावरण निर्माण करीत आहोत.

मला असे सांगावयाचे आहे की, संशय निर्माण झाला आहे आणि संशयाचे परिमार्जन कसे करावयाचे आणि संशय दूर कसा करावयाचा हा मूळ प्रश्न आहे. आणि यासाठी आम्ही जी यंत्रणा उभारली आहे आणि ज्या पद्धतीने आम्ही काम करीत आहोत ती लोकशाहीला धरून आहे की नाही हे आपण पहा. लोकशाही पद्धतीत अशा वेळी ज्या मेथड्सचा अवलंब केला जातो त्या सर्व सरकारने स्वीकारल्या आहेत आणि आम्ही जे इन्क्वायरी कमिशन नेमले आहे त्याचा काय निर्णय होतो हे आपण पाहिले पाहिजे. माझ्याही पक्षातील लोकांना ह्या बाबतीत स्वतंत्र मतदान करण्याची इच्छा असेल तर ह्याच ठिकाणी उघडपणे मी माझ्या पक्षातील सदस्यांनाही अशा प्रकारचे स्वातंत्र्य देत आहे की, त्यांनी कोणत्याही बाजूने मतदान करावे. आणि ही गोष्ट मी येथे जाहीर करीत आहे.

■■■

On 4th December 1961, Shri Y.B.Chavan, Chief Minister, replied to the no-confidence motion which was brought against the Government for not protecting the precious lives of residents of Pune during the Panshet Dam disaster and the failure to persuade Mr.Justice Bavadekar, constituting the one man Enquiry Commission, from committing suicide. Shri Chavan, in his speech, gave details about the help and measures taken by the Government to rehabilitate the victims of calamity. He also assured the House that whoever would be found guilty in the enquiry would be given condign punishment. He said that Mr.Justice Bavadekar was given all facilities by the Government and the Government could not be censured for his suicide as it was purely his personal matter.

# म्हैसूर राज्यातील मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रात सामील करून घेण्यात अपयश आल्याबद्दल कपात सूचना *

## १७ डिसेंबर १९६१

*म्हैसूर राज्याच्या सीमेवरील मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रात सामील करून घेण्यास सरकार अपयशी ठरले; म्हणून विरोधी पक्षियांनी मांडलेल्या कपात सूचनेवर मा. चव्हाण यांचे निवेदन.*

अध्यक्ष महाराज, या प्रश्नासंबंधी या सन्माननीय सभागृहामध्ये मला पूर्वी एकदा बोलण्याचा प्रसंग आला होता. त्यावेळी या प्रश्नाकडे पहाण्याचा सरकारचा काय दृष्टीकोन आहे ते मी सन्माननीय सभागृहापुढे सांगितले होते. त्याचप्रमाणे हा प्रश्न सोडविण्यासाठी आजसुद्धा सरकारचे कोणते आणि काय प्रयत्न चालू आहेत त्याची सामान्य कल्पना सरकारवर टीका करणाऱ्यांना नसावी. आता या प्रश्नावर जी चर्चा झाली आहे तिच्यातून एक सामान्य अनुमान असे निघते की, हा प्रश्न सोडविण्याकरिता जी चौसदस्य समिती नेमली आहे तिचा अहवाल बाहेर यावयाला फार उशीर होत आहे व हे मला मान्य आहे. त्यामुळे हा प्रश्न लवकर सुटावा अशी ज्यांना आशा आहे - आणि ती तळमळ सर्वांनाच आहे - त्यांच्या मनात एक प्रकारची नैराश्याची भावना निर्माण होत आहे. आता आपल्याला जर इतकी निराशा वाटत असेल तर ज्या लोकांचा हा प्रश्न आहे त्यांच्या मनातील नैराश्याची भावना किती तीव्र असेल याची आपण कल्पना केलेली बरी. सन्माननीय सभासद श्री. भंडारे यांनी मला असे विचारले की, यासंबंधी आपण एक ठराव एकमताने पास केला होता. त्यानंतर सरकारने तातडीने असे कोणते प्रयत्न केले? या सन्माननीय सभागृहाने ठराव पास केल्यानंतर या सरकारने काय करावे याबद्दल त्यांची काय कल्पना आहे ते मला समजत नाही.

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. V, Part II (Inside No. 9), 7th December 1961, pp. 507-509.

चौसदस्य समितीच्या कामाला वेळ लागत असल्यामुळे त्यांच्या आणि लोकांच्या मनात जशी निराशा निर्माण होत आहे, त्याचप्रमाणे ती माझ्याही मनात निर्माण होत आहे व ही निराशा चौसदस्य समिती आणि आपल्या देशाचे नामदार गृहमंत्री यांच्यासमोर व्यक्त करण्याचे काम मी जरूर करीत आहे. परंतु अध्यक्ष महाराज, चौसदस्य समितीचे काम आता संपलेले आहे. आता आपण काही दुसरे केले पाहिजे असे जर कोणी समजत असेल तर ते मला मान्य नाही. ह्या सर्व प्रश्नांवर ह्या चौसदस्य समितीने जर एकमताने निर्णय घेतला तर ते फार चांगले, परंतु ह्या बाबतीत जरी त्यांच्यात एकमत झाले नाही व काही बाबतीत दुमत झाले असे जरी आपण गृहीत धरले तरी तो प्रश्न संपला असे मी मानत नाही. ह्या गुंतागुंतीच्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी अशी आमची इच्छा आहे. ह्या पक्षाच्या लोकांचीही इच्छा आहे. समजा, एखाद्यावेळी त्यांचा निर्णय एकमताने आला नाही तरी आमचा प्रश्न सुटत नाही. आम्ही ह्या सर्व प्रश्नांच्या बाबतीत जी एक विशिष्ट पद्धत अवलंबिली आहे आणि जी पद्धत योग्य आहे असे आजही आम्हास वाटते त्या पद्धतीचा पाठपुरावा केला गेला पाहिजे. आणि अशा प्रकारे पाठपुरावा करणे हा तो प्रश्न सोडविण्याचा लोकशाही मार्ग आहे अशी आमची श्रद्धा आहे. आमची ह्या बाबतची भूमिका स्पष्ट आहे.

ही जी समिती नेमली आहे ती हिंदुस्थान सरकारने नेमली आहे. आणि भारताचे गृहमंत्री पंडित पंत ह्यांच्या आशीर्वादाने ही नेमली गेली आहे. ह्या प्रश्नाच्या बाबतीत पंडित पंत ह्यांच्याशी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि म्हैसूरचे मुख्यमंत्री यांची संयुक्तपणे चर्चा झालेली आहे आणि त्यावेळी त्यांनी आम्हाला सांगितले की, असे जे दोन अथवा तीन राज्यांतील गुंतागुंतीचे प्रश्न असतात हे सर्व संबंधित राज्य प्रमुखांनी एकत्र बसून आणि आपसात विचारविनिमय करून सोडविले पाहिजेत. आणि अशा प्रकारचे प्रश्न घटनात्मक मार्गाने आणि विचारविनिमयाने सोडविले पाहिजेत ही गोष्ट आम्ही मानलेली आहे. आणि ह्या प्रश्नाच्या बाबतीतही मी हीच भूमिका स्वीकारलेली आहे.

मला ह्या गोष्टीची कल्पना आहे की, ह्या सीमा विभागातील जनता किती उत्कंठित आणि अगतिक झालेली आहे. आणि तेथील जनता आमच्यावर किती रागावलेली असेल याचीही मला कल्पना आहे. परंतु ह्याबाबत आम्ही जे काही करीत आहोत ते शांतपणे आणि निर्धारपूर्वक करीत आहोत. आणि तेथील जनतेच्या बाबतीत आमचे जे कर्तव्य आहे ते आम्ही विसरलेलो नाही.

आजकाल तेथे जी परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि तिकडच्या काही ज्या गोष्टी कानावर येत आहेत त्या ऐकल्यावर मनात चिंता वाटते. आणि मन उद्विग्न

झाल्याशिवाय राहत नाही. ह्या सर्व प्रकारांची माहिती हिंदुस्थान सरकारला करून घेणे आवश्यक आहे. आणि ही गोष्ट आम्ही त्यांच्या नजरेस आणलेली आहे.

फक्त मामुली लॉ अँड ऑर्डरचाच प्रश्न असता तर त्याच्याशी आमचा काही संबंध नव्हता. प्रत्येक राज्य सरकार आपल्या राज्यात लॉ अँड ऑर्डर ठेवण्यासाठी उपाय योजना करू शकते परंतु हा प्रश्न लॉ अँड ऑर्डरचा नाही. तर तेथील जनतेच्या एक विवक्षित मागणीतून हा प्रश्न निर्माण झालेला आहे. दोन समाजांच्या भिन्न भिन्न प्रकारच्या मागणीतून हा प्रश्न निर्माण झालेला आहे. लॉ अँड ऑर्डरचा प्रश्नच असला तर तो कोणीही कसाही सोडवावा परंतु केवळ लॉ अँड ऑर्डरचा हा प्रश्न नाही. आणि म्हणून ही गोष्ट हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणून देणे आवश्यक आहे. आणि आम्ही त्यांच्या नजरेस ही गोष्ट आणलेली आहे. ह्या प्रश्नाची तीव्रता किती आहे आणि हा प्रश्न लवकरात लवकर सोडविणे किती आवश्यक आहे ही गोष्ट त्यांना पटावयास पाहिजे आहे. हा प्रश्न एखाद्या पक्षाचा आहे असे मी मानत नाही. आज तेथील जनतेची इच्छा काय आहे हे हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणून देणे हे आपले कर्तव्य आहे आणि ह्या बाबतीत जनतेच्या इच्छेची तीव्रता त्यांच्या लक्षात यावयाला पाहिजे. चौसदस्य समितीच्या कामासंबंधी दिरंगाईची जी भावना जनतेच्या मनात निर्माण झालेली आहे ती बरोबर आहे असे भारत सरकारला वाटले पाहिजे आणि ह्या समितीच्या कामाचा वेग वाढविण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. आणि यातून आपण काहीतरी मार्ग काढला पाहिजे. अशा प्रकारची जनतेची मागणी आहे. आणि एकंदर ह्या सर्व प्रश्नांची तीव्रता भारत सरकारच्या नजरेस आणून द्यावी हाच या चर्चेमागील हेतू आहे असे मी मानतो. आणि याबाबतीत या सभागृहाची जी भावना आहे, जी येथे व्यक्त केली गेली आहे ती भावना हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणण्यात येईल आणि तसा प्रयत्न मी करेन एवढे आश्वासन देऊन मी आपले भाषण संपवितो.

■ ■ ■

On 7th December 1961, Shri Y.B.Chavan, Chief Minister, replied to the cut motion brought by the Opposition regarding what was described as Government's failure to get the Marathi-speaking border areas of Mysore State, included in Maharashtra State. He reminded the House about the unanimous resolution passed by the House to include border Marathi-speaking territories into Maharashtra. He also laid stress on the working of the four-member committee under the chairmanship of the Union Home Minister to find out a solution satisfactory to both the parties.

# निवडणुका व शासकीय वाहनांचा वापर*

**८ डिसेंबर १९६१**

*सार्वत्रिक निवडणुकीत सत्ताधारी पक्षाने शासकीय वाहने व यंत्रणा वापरू नये म्हणून आलेल्या प्रस्तावास ही यंत्रणा राबविण्यात येणार नाही असे मा.श्री.चव्हाणांचे आश्वासन.*

अध्यक्ष महाराज, हा ठराव या सन्माननीय सभागृहासमोर आल्यामुळे ज्या पक्षाचे सरकार आज अधिकाररूढ झालेले आहे त्या पक्षाने सार्वत्रिक निवडणुकीच्या बाबतीत आपल्यावर कोणती बंधने घालून घेतली आहेत हे सांगण्याची संधी मला मिळाली आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वी काही काळ कोणताही पक्ष अधिकारावर असता कामा नये या सूचनेचा उल्लेख केला होता. परंतु अशा दरम्यानच्या काळात जर कोणत्याही पक्षाचे सरकार अधिकारावर राहिले नाही तर एक प्रकारची राजकीय पोकळी निर्माण होईल.

विरोधी पक्षाच्या नेत्यांना ही सूचना मान्य नाही याचाच अर्थ मी असा करतो की अशा तऱ्हेची राजकीय पोकळी निर्माण होणे हे अनिष्ट आहे हे त्यांना पटलेले आहे. अशा काळात सरकारने अधिकारावर राहता कामा नये असे म्हणणे म्हणजे सरकारवर अविश्वास दाखविण्यासारखे आहे व लोकशाहीमध्ये अविश्वासावर अवलंबून राहून आपल्याला काम करता येत नाही. त्याचबरोबर मी हेही मान्य करतो की, सरकारला काही अधिकार असतात व ते अधिकार मिळाल्याबरोबर साहजिकच ते अधिकार कसे वापरावे याबद्दलच्या काही मर्यादा सरकारला पाळाव्या लागतात. या मर्यादा

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. V, Part II (Inside No.10), 8th December 1961, pp. 565-575.

पाळण्याची जबाबदारी सरकारवर असते हे मी गृहीत धरून चालतो. अधिकार वापरणे हा सरकारचा मूलभूत हक्क आहे परंतु हे अधिकार वापरीत असताना त्याबाबतीत योग्य त्या मर्यादा पाळण्याची जबाबदारीसुद्धा सरकारवर येतेच हे मी कबूल करतो. तेव्हा विरोधी पक्षाच्या नेत्यांना निवडणुकीच्या पूर्वी सरकारने राजीनामा दिला पाहिजे ही सूचना अमान्य केली आहे याचे कारण अशा सूचनेतून सरकारवरील अविश्वास व्यक्त होतो हे असले पाहिजे असे मी गृहीत धरतो. ज्या सत्तेचा वापर सरकारने आज साडेचार वर्षे केला तेच सरकार केवळ दोन महिन्यांकरिता या सत्तेचा दुरुपयोग करील असा अविश्वास प्रकट करणे बरोबर होणार नाही, हे तत्त्व त्यांना पटले असले पाहिजे. हे तत्त्व जर त्यांना पटले नसते तर त्यांनी ती सूचना स्वीकारली असती. यापेक्षा या चर्चेच्या खोलात मी जाऊ शकत नाही.

अध्यक्ष महाराज, निवडणुकीच्या काळात सत्ताधारी पक्षाने आपण होऊन आपल्यावर जास्त बंधने घालून घेतली पाहिजेत हे मला स्वतःला कबूल आहे. विरोधी पक्षानेसुद्धा तशाच तऱ्हेने आपल्यावर तशी बंधने घालून घ्यावीत व ती पाळावीत की नाहीत ते मी सांगत नाही. परंतु विरोधी पक्षातील सन्माननीय सभासद श्री.भापकर आणि श्री. आठले गुरुजी यांनी असे सांगितले की, विरोधी पक्षानेसुद्धा अशी बंधने घालून घेतली पाहिजेत. त्यांनी हे कबूल केले की, विरोधी पक्षाचेसुद्धा कधी कधी काही चुकले असेल. परंतु सत्ताधारी पक्षाने याबाबतीत जास्त काळजी घेतली पाहिजे, कारण त्यांच्या हातात सत्ता असते. याबाबतीत या सन्माननीय सभागृहाच्या नजरेस मला एवढेच आणून द्यावयाचे आहे की हल्ली जो पक्ष सत्तारूढ आहे त्या पक्षाने या तत्त्वाचा स्वीकार यापूर्वीच केला आहे. याच वेळी नव्हे तर गेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळीसुद्धा आम्ही या गोष्टीची काळजी घेतली होती. मध्यवर्ती सरकारने याबाबतीत सर्वच राज्य सरकारांना पहिल्यापासून मार्गदर्शन केले आहे. मी सन्माननीय सभागृहाच्या माहितीकरिता हे सांगू इच्छितो की, ता. २ फेब्रुवारी १९५७ ला मंत्रिमंडळाच्या सदस्यांवर याबाबतीत कोणती जबाबदारी येऊन पडते व ती त्यांनी कशी पार पाडली पाहिजे याबद्दल एक परिपत्रक काढले होते. तसाच निर्णय या वेळीसुद्धा सध्याच्या मंत्रिमंडळाने घेतलेला असून या मंत्रिमंडळाच्या सर्व नामदार मंत्र्यांना व उपमंत्र्यांना उद्देशून एक परिपत्रक काढण्यात आलेले आहे व ते परिपत्रकच मी येथे वाचून दाखवितो म्हणजे आजसुद्धा आम्ही याबाबतीत काय काळजी घेतलेली आहे ते या सन्माननीय सभागृहाला कळेल. फक्त आम्ही याची इतर काही राज्यांप्रमाणे जाहीरात मात्र केलेली नाही. हे परिपत्रक पुढील प्रमाणे आहे :-

"Dear Shri

We are on the threshold of General Elections. We, as Ministers and representatives of our Party, will be undertaking tours in different parts of the State. It is imperative that we should observe certain general principles while undertaking such tours till the General Elections are over. In this connection I am enclosing a copy of the late Shri Pantji's letter dated the 12th January 1957 and its accompaniments for your information. I have no doubt that you would observe in letter and in spirit the principles stated therein during pre-election tours.

The general basis of the principles seems to me to be not to mix election and official tours...An official tour can, however, be terminated at a convenient point and election tour started from that point. Travelling allowance should not be claimed for election tours of political or other non-official work. A point that was raised in this connection when we discussed that question on Wednesday was whether travelling allowance can be claimed for returning for official work from an election tour. This point seems to have been answered in the Office Memorandum No. 18/45/51 Public, dated the 13th December 1951 from the Government of India, Ministry of Home Affairs, which is in the accompaniments in this letter.

Another point made in the letters is not to use official machinery during election tours. This would include use of cars whether allotted to you or any other Government car, meeting of officials on arrival or at functions, police escort, etc. Police can and will provide such attendance as may be considered necessary by them for the purpose of protecting the Ministers.

I think it is also desirable that a Minister or Deputy Minister should not participate during his period in a formal official function like laying of a foundation stone, opening ceremony etc. irrespective of, whether such function is held in his constituency or not, as such a function is to be regarded as election propaganda and will put officials in an embarrasing position."

त्यासंबंधी लीगल इंटरप्रिटेशन पाठविले होते त्यावर हे आधारलेले आहे.

"As informally decided by us we would all ensure that decision regarding functions, etc., as mentioned in the above paragraphs is strictly observed from 25th December 1961 till the General Elections

are over."

दोन महिन्यांचा हा काळ ठेवलेला आहे. साधारण इलेक्शनपूर्वी एक महिना आणि इलेक्शननंतर एक महिना. २५ डिसेंबरपासून हे अंमलात आणावयाचे ठरविण्यात आले आहे. आणि त्याच हेतूने सर्व मंत्री व उपमंत्री ह्यांच्याकडे हे पत्र पाठविण्यात आले आहे.

मला या ठिकाणी एवढेच सांगावयाचे आहे की, आपण ज्या हेतूने येथे हा प्रश्न उपस्थित केलेला आहे तो हेतू लक्षात घेऊन त्याबाबतची उपाययोजना आम्ही आधीच केलेली आहे. आणि आम्ही काय केले हे मी ह्या सभागृहाला सांगितले आहे. आता यापेक्षा आणखी मी काय सांगू? आणखी या प्रश्नाबाबत तपशिलात जाण्याची माझी इच्छा नाही. आणि जास्त तपशिलात जाऊन मला येथे टेंपो वाढविण्याची इच्छा नाही. माझी अशी अपेक्षा होती की, इलेक्शनच्या वेळी या दृष्टीने काय उपाययोजना करावी यासंबंधी काही विधायक स्वरूपाच्या सूचना येथे करण्यात येतील. परंतु तसे काही करण्यात आले नाही. समजा, एखाद्याने एखादी गोष्ट चुकीची केली तर त्याबद्दल ह्या अधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला समज देणे आवश्यक असते आणि चुकीच्या गोष्टी पुन्हा होऊ नयेत म्हणून बरेच वेळा शासन करणेही आवश्यक असते, आणि अशा गोष्टी शासनाच्या नजरेला आणल्या पाहिजेत. ज्या गोष्टी आपल्याला चुकीच्या वाटतात त्याबद्दल टीका करण्याचा सदस्यांचा अधिकारच आहे असे मी मानतो. श्री.म्हाळगी यांनी आपल्या भाषणात एक तक्रार केली की मी पौड येथे गेलो असताना सभेच्या जागी लोकांना आणण्यासाठी पी.डब्ल्यु.डी.च्या ट्रक्स वापरण्यात आल्या. मला असा खुलासा करावयाचा आहे की, तेथे पी.डब्ल्यु.डी.च्या गाड्या वापरण्यात आल्या नाहीत. ह्या बाबतीत माझ्याकडे अशी तक्रार आली होती की, काही खाजगी माल ट्रक्स, आवश्यक ती परवानगी न घेता माणसे आणण्यासाठी वापरण्यात आल्या. मी ह्याबाबतीत चौकशी करविली आणि एक-दोन ट्रक्सवर ह्याबाबत खटलेही भरण्यात आले आहेत. मात्र पी.डब्ल्यु.डी.च्या गाड्या वापरल्याची जी तक्रार करण्यात आली ती खरी नाही. मी तेथे जाण्यापूर्वीच ह्या बाबतीत सावधगिरीची सूचना मी पोलिसांना दिलेली होती आणि त्याप्रमाणे त्यांनी तशा काही गाड्या पकडल्याही. सत्तेचा वापर करून किंवा सरकारी मशिनरीचा वापर करून इलेक्शनमध्ये यश मिळविता येते किंवा मिळते यावर माझा विश्वास नाही. आपले मतदार इतके अडाणी आहेत असे मी तरी मानत नाही. सत्तेचा वापर करून निवडणूक जिंकता येते असे जर म्हटले तर त्याचा अर्थ असा होईल की आपल्या येथील जे सुज्ञ मतदार आहेत त्यांच्याबद्दल माझ्या

मनात कमी प्रतीची भावना आहे. निदान मी तरी ही गोष्ट मानत नाही. मी असे मानणारा आहे की आपल्या देशातील मतदार हे सूज्ञ आहेत आणि ते अशा प्रकारची गोष्ट सहन करणार नाहीत. परंतु आपल्यावर जी जबाबदारी आहे तीही आपण विसरून चालणार नाही. आणि ही जबाबदारी ओळखूनच ह्याबाबतीत आम्ही योग्य ते पाऊल अगोदरच उचललेले आहे.

येथे सभासदांनी अगोदरच आपल्या भाषणातून अनेक गोष्टी मांडल्या. त्या सर्वांना येथे उत्तर देणे कठीण आहे. परंतु एक तक्रार अशी करण्यात आली की, डी.एल.बी.कडे गाड्या आहेत. त्यांचा वापर इलेक्शनकरिता करण्यात येतो. अशा प्रकारे जर सरकारी गाड्यांचा वापर होत असेल तर ते अगदी गैर आहे. प्रॉजेक्ट ऑफिसरनी निवडणुकीच्या कामासाठी गाड्या वापरता उपयोगी नाही, आणि मला वाटते की, अशा प्रकारे गाड्यांचा वापर होत नसावा. माझा एक हायपोथेटिकल प्रश्न असा आहे की, आता काही जिल्हा परिषदांत आपल्याही पक्षाचे सदस्य राहतील. त्यांनाही ह्या बाबतीत ठरवावे लागेल की, कँडिडेट्सनी ती वाहने वापरू नयेत.

इलेक्शनच्या कामासाठी सरकारी वाहनांचा वापर केला जाऊ नये ही गोष्ट मला मान्य आहेच, आणि तसे जर कोठे होत असेल तर ह्या बाबतीत स्पष्ट अशी सरक्युलर्स आणि आदेश काढण्यात येतील की इलेक्शनच्या कामासाठी किंवा इलेक्शनच्या प्रचारासाठी कोणाला जावयाचे असेल तर सरकारी वाहनांचा उपयोग करू नये आणि ऑफिसरनेही आपल्याबरोबर आपल्या मोटारीतून कँडिडेट किंवा प्रचारक यांना नेऊ नये, अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात येतील. मंत्री आणि उपमंत्री यांना मी जे पत्र पाठविले त्याची प्रत येथे ठेवलेली आहे.

श्री. म्हाळगी यांनी त्यांच्या भाषणात नरे पार्कवर झालेल्या आय.एन.टी.यू.सी.च्या सभेचा उल्लेख केला. मी तेथे आय.एन.टी.यू.सी.चा पुरस्कर्ता म्हणून गेलो होतो. त्यांनी मला कोणत्या कपॅसिटीत बोलावले होते हे मला माहीत नाही. परंतु मी मात्र इंटकचा पुरस्कर्ता म्हणून गेलो होतो. आणि सह्याद्री ते नरे पार्कपर्यंतचे टी.ए. बिल मी घेतलेले नाही.

मी आता आपल्यासमोर एक उदाहरणच ठेवतो. मी आता तारीख ९, १०, ११ व १२ रोजी निवडणुकीच्या प्रचारासाठी म्हणून मराठवाड्याच्या दौऱ्यावर जाणार आहे. तेथे मी निवडणुकीच्या प्रचारासाठी सार्वजनिक भाषणेही देईन. आता तेथे जर लोकांनी माझ्या भाषणाच्या सुरवातीला ''आता आपल्या राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण आपल्यासमोर भाषण करणार आहेत'' असे सांगितले तर मी त्याला काय

करू? मी माझ्या वतीने कोणत्याही सभेमध्ये भाषण सुरू करण्यापूर्वी पहिले वाक्य असे म्हणत जाईन की,''मी आपल्यापुढे या राज्याचा मुख्यमंत्री या नात्याने भाषण करीत नसून आपल्या पक्षाचा एक कार्यकर्ता या नात्याने भाषण करणार आहे.'' परंतु मी जर एखाद्या जिल्ह्यामध्ये किंवा तालुक्याच्या ठिकाणी निवडणुकीच्या दौऱ्यावर असताना तेथील अधिकाऱ्यांना एखाद्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह अडचणीवर माझा सल्ला पाहिजे असला किंवा त्यांच्या काही अडचणी मांडण्याकरिता ते माझ्याकडे आले तर त्यांना मी असे थोडेच सांगू शकणार आहे की, सध्या मी निवडणुकीच्या दौऱ्यावर आहे, तेव्हा तुम्ही कृपा करून माझ्याकडे येऊ नका. दुसरी गोष्ट अशी की, लॉ अँड ऑर्डर मेंटेन करण्यासाठी जर काही स्थानिक अधिकारी या सभेला हजर राहिले तर त्यांनाही मला नाही म्हणता येणार नाही. अर्थात् अधिकाऱ्यांनी निवडणुकीच्या सभांना हजर राहू नये ही गोष्ट मला मान्य आहे, परंतु काही अडचणी घेऊन कुणी डी.एस.पी. किंवा कलेक्टर माझ्याकडे आले तर त्यांना मार्गदर्शन मला करावेच लागणार आणि निवडणुकीच्या दिवसात स्थानिक अधिकाऱ्यांना लॉ अँड ऑर्डर मेंटेन करण्याची जबाबदारी येणार नाही. परंतु एका गोष्टीचे पथ्य आम्ही जरूर पाळू की, सरकारच्या कोणत्याही साधनांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उपयोग निवडणुकीच्या काळात निवडणुकीच्या कामासाठी आम्ही करणार नाही.

सन्माननीय सभासद श्री.म्हाळगी यांनी **श्री.बर्वे**[५२] यांच्यासंबंधी एक प्रश्न उपस्थित केला. याबाबतीत मी स्वतः फार जागरूक आहे. जेव्हा चीफ मिनिस्टर्स रिलिफ फंडाचे काम करण्यासाठी आम्हाला माणसांची गरज होती त्यावेळी मी स्पष्ट सांगितले होते की, ज्यांना निवडणुकीला उभे राहावयाचे असेल त्यांनी हे काम आपल्या शिरावर घेऊ नये आणि अध्यक्ष महाराज, मी आपणाला सांगू इच्छितो की, अशा लोकांना आम्ही हे काम दिले नाही. कारण हे काम दोनचार दिवसाचे नव्हते तर बरेच दिवस चालणारे असे हे काम आहे म्हणून जे लोक निवडणुकीला उभे राहणार असतील अशा लोकांना आम्ही हे काम दिले नाही. आज श्री.बर्वे हे निवडणुकीचे उमेदवार आहेत आणि त्यांच्याकडे कोऑर्डिनेशन कमिटीचे कोणत्याही प्रकारचे काम नाही. कोऑर्डिनेशन कमिटी डिफंक्ट झाली आहे, तेव्हा त्या कमिटीचे कोणत्याही प्रकारचे काम श्री.बर्वे करतील हे कसे संभवनीय आहे? सन्माननीय सभासद श्री.म्हाळगी यांनी येथे श्री.बर्वे यांच्या नावाचा उल्लेख केला तेव्हा ते त्यांच्याविरुद्ध उभे आहेत की काय असा मला संशय येत होता. सन्माननीय सभासद श्री.म्हाळगी यांच्याविरुद्ध कोण उभे आहे ही गोष्ट जरी मला माहीत नसली तरी असा संशय माझ्या मनात आल्यावाचून

राहिला नाही. श्री.म्हाळगी यांच्या माहितीकरिता मी पुन्हा सांगू इच्छितो की, कोऑर्डिनेशन कमिटी डिफंक्ट झाली आहे; तेव्हा श्री.बर्वे यांना कोऑर्डिनेशन कमिटीचे अध्यक्ष म्हणून कोणी मत देण्याचा प्रश्न उत्पन्न होत नाही. येथे श्री.बर्वे यांचे नाव घेऊन उल्लेख करण्यात आला म्हणून मी ह्या सर्व गोष्टींचा खुलासा केला.

अध्यक्ष महाराज, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, इलेक्शन कमिशन आणि हिंदुस्थान सरकार याबाबतीत फार जागरूक आहे, या देशातील मतदारसुद्धा फार जागरूक आहे आणि विरोधी पक्ष तर अत्यंत जागरूक आहे, तेव्हा कोणत्याही प्रकारे कोणाला तक्रार करावयास जागा राहणार नाही अशी सरकार खबरदारी घेईल इतके आश्वासन मी देऊ इच्छितो. हा ठराव सभागृहापुढे आणून सरकारला आपली भूमिका स्पष्ट करण्याची संधी दिल्याबद्दल मी सन्माननीय सभासदांचा आभारी आहे. इतके बोलून मी आपले भाषण संपवितो.

■ ■ ■

On 8th December 1961, the Opposition tabled a cut motion regarding use of Government vehicles and administrative machinery during General Elections. Replying, the Chief Minister, Shri Y.B.Chavan, said that Government had issued instructions by bringing out circulars that Ministers and representatives of the Congress Party should not use Government vehicles for the General Election purposes, and that this order would remain in force for two months, one month before and after the Elections.

# सभापती श्री. सिलम यांच्या कार्यांचा गौरव*

**८ डिसेंबर १९६१**

***मा. श्री. सयाजीराव सिलम सभापती असताना त्यांनी केलेल्या कार्याबद्दलचा गौरव मा. चव्हाण यांनी सभागृहापुढे ठराव मांडून व्यक्त केला.***

Mr. Speaker, Sir, I beg to move the following resolution, viz. -

"This House do place on record its high appreciation of the valuable services of the Hon. Shri. **S.L.Silam**[53], as its Speaker for the last over 5 years, the zeal, ability and impartiality with which he had discharged the duties of his high office, and the judgment and firmness with which he has maintained its privileges and dignity while presiding over its deliberations through a critical period of great importance."

अध्यक्ष महाराज, हा ठराव आपल्यासंबंधी असल्यामुळे आपल्याला कदाचित अवघड वाटणे संभवनीय आहे, परंतु हा ठराव मांडत असताना मी या सभागृहाच्या आपल्याबद्दलच्या भावना बोलून दाखवितो आहे अशी माझी श्रद्धा आहे. अध्यक्ष महाराज, आपण या सभागृहाचे पाच वर्षे काम पाहिले, परंतु त्याही अगोदर तीन-चार महिने आपण या सभागृहाचे काम पाहिले आहे म्हणजे आपली कारकीर्द जवळजवळ सव्वापाच वर्षे होती. या पाच-सव्वापाच वर्षांच्या काळामध्ये आम्हाला आपल्यासंबंधी जो अनुभव आला त्यापासून आम्ही आपल्याबद्दल श्रद्धा व्यक्त केली नाही तर आम्ही औपचारिकता पाळली नाही असे होईल, इतकेच नव्हे तर आम्ही

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. V, Part II, Nov. -Dec. 1961, 8th December 1961. pp. 572 to 575.

आपल्या कर्तव्याला चुकलो असेही होईल म्हणून हा ठराव या सभागृहापुढे मी मांडला आहे. अध्यक्ष महाराज, या सभागृहाची परंपरा फार थोर आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी आणि नंतर जी सभागृहे आपल्या देशात होती त्या सर्व सभागृहात मुंबईच्या सभागृहाला एक उच्च स्थान आहे. आणि या स्थानावर आपल्या पूर्वी काम केलेल्या व्यक्तींनी निर्माण केलेल्या उज्ज्वल परंपरा आपण जतन केल्या, एवढेच नव्हे तर स्वतःही तशा परंपरा निर्माण केल्या. अध्यक्ष महाराज, गेली पंधरा वर्षे आपण या विधानसभेचे सदस्य आहात. या अवधीत या सभागृहात निरनिराळ्या जबाबदारीच्या जागांवर काम करताना आपणास पाहण्याची संधी मला मिळालेली आहे. या विधानसभेत पंधरा वर्षे काम केलेले आणखीही काही चेहरे मला या सभागृहात दिसत आहेत. विरोधी पक्षात माननीय सदस्य श्री.दत्ता देशमुख यांचा एक चेहरा मला दिसतो आहे. या बाजूलाही दोन-तीन चेहरे दिसत आहेत. अध्यक्ष महाराज, अध्यक्षस्थानावर बसून या सभागृहाचे नियमन करणे किती अवघड आहे याची मला पूर्ण कल्पना आहे. गेल्या पाच वर्षांत सभागृहाबाहेर एका विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळे एक प्रकारचे तंग वातावरण, धूसर वातावरण निर्माण झाले होते. बाहेरील जनेतच्या प्रातिनिधिक स्वरूपात या सभागृहाचे अस्तित्व असल्यामुळे बाहेरील तंग वातावरणाचे, धूसर वातावरणाचे प्रतिबिंब या सभागृहात पडून सभागृहाची एकूण मानसिक प्रक्रिया आंदोलित होणे अगदी स्वाभाविक होते. अशा तंग परिस्थितीत सभागृहातील सगळ्या विचाराच्या लोकांना आपापले विचार व्यक्त करण्याकरिता वाव देऊनही स्वतःबद्दलचा आदर त्यांच्या मनात कायम ठेवणे हे काम किती कठीण होते याची जाणीव या सभागृहातील सर्वांना वाटे. अध्यक्ष महाराज, आपण हे काम अत्यंत साक्षेपाने आणि कुशलतेने पार पाडले आणि या सभागृहाचे नाव राखले. आपली निवड या स्थानाकरिता करण्यात या सभागृहाने कोणत्याही प्रकारची चूक केली नसून ती एक अत्यंत योग्य आणि अभिमानास्पद अशीच निवड होती याचे सार्थ प्रत्यंतर यामुळे या सभागृहाला येत आहे. आपण हे काम कुशलतेने पार पाडू शकला यामागे आपला सार्वजनिक जीवनातील विविध क्षेत्रातला विपुल अनुभव उभा आहे असे मला वाटते. गेली चाळीस वर्षे आपण महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात विविध क्षेत्रातून विविध पदांवर काम करीत आहात. लोकशाहीच्या जीवनात सर्व प्रवृत्तीच्या माणसांना सांभाळून घेऊन काय करावे लागते हा अनुभव आपण प्रत्यक्ष घेत आहात. म्हणून आपण या सभागृहाचे एक सदस्य म्हणून काम करीत असला काय किंवा सभापतींच्या स्थानावर बसून काम करीत असला काय, आपण सर्वांना सांभाळून घेऊनच काम करीत राहाल, कारण ही वृत्ती आपल्या

स्वभावातच आहे. मला वाटते की, सार्वजनिक जीवनात कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही पदावर मनुष्य काम करीत असो, तो जर ही मूलभूत गोष्ट विसरला नाही तर त्याला आपल्या कामात कधीही अपयश येणार नाही. अध्यक्ष महाराज, आपण कायद्याचा कधीही व्यवसाय केलेला नसला तरी आपणाला कायद्याचा व्यासंग आहे, परंतु कायद्याच्या प्रश्नावर चर्चा करताना जी सूक्ष्म आणि निस्पृह दृष्टी आपण ठेवलीत ती पाहिल्यानंतर ही दृष्टी कायद्याच्या व्यासंगामुळे निर्माण झालेली नसून ती आपल्या स्वभावातच असली पाहिजे असे वाटू लागते. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत सभागृहात अनेक प्रकारचे बिकट प्रसंग निर्माण झाले होते. सुरुवातीसुरुवातीला आम्ही या प्रसंगातून कसे काय पार पडू याची चिंता निदान मी तरी माझ्या मनाशी करीत असे, इतरही करीत असत, परंतु कितीही बिकट प्रसंग आला तरी आपण डगमगून न जाता या सभागृहाचे नियम कुशलतेने आणि शांतपणे करीत होता हे पाहिल्यानंतर आमच्या साऱ्या चिंतांचे ओझे आपल्या शिरावर टाकून आम्ही सर्व निश्चिंत राहत असू. म्हणून या सभागृहाच्या शेवटच्या दिवशी बोलत असताना सेन्स ऑफ फुलफिलमेंट ज्याला म्हणता येईल, कृतार्थतेची भावना जिला म्हणता येईल, अशी भावना अनुभविण्याचे काहीसे क्षण मनात येऊन जात आहेत.

अध्यक्ष महाराज, हे सभागृह विसर्जित होऊन निवडणुकीनंतर नवीन सभागृह अस्तित्वात आल्यावर आपल्या जागी कोण बसेल, आम्ही ज्या जागी बसलो आहोत त्या जागी कोण बसेल हे काहीच सांगणे आता शक्य नाही. ते सारे भविष्य जनतेच्या हातात आहे. परंतु गेल्या पाच वर्षांत ज्या उज्ज्वल परंपरा आपण निर्माण केल्या आहेत, ज्या मर्यादा आपण घालून दिलेल्या आहेत त्या पुढे येणाऱ्यांना निश्चितपणे मार्गदर्शक ठरतील. माणसे येतील आणि जातील परंतु हे सभागृह तसेच कायम राहील. एखाद्या नदीच्या वहात्या पाण्याप्रमाणे ही संस्था आहे. ती कधीच बंद होणार नाही. याच भावनेने आपण काम करीत असतो आणि कर्तव्यपूर्तीचा आनंद मिळवीत असतो. आपल्याबद्दलचे प्रेम आणि आपण केलेल्या कार्याबद्दलचा गौरव व्यक्त करणे सभागृहाचे कर्तव्य आहे, आणि ते व्यक्त करण्याकरिताच आपल्या परवानगीने मी हा प्रस्ताव सभागृहासमोर प्रस्तुत केला आहे.

■ ■ ■

On 8th December 1961, Shri Y.B.Chavan, Chief Minister, moved a resolution in the House placing on record its high appreciation of the valuable services of the Hon. Shri S.L.Silam as its Speaker for the last five years who he said, had discharged the duties of his high office with zeal, ability and impartiality and firmness. The resolution was unanimously accepted by the House.

# कोल्हापूर दत्तक विधान *

## २८ जून १९६२

***या विषयावरील विरोधी पक्षाच्या कपात सूचनेला उत्तर देताना या बाबतीत कोल्हापूरकर छत्रपतींचा मान राखला जाईल असे केंद्र शासनाच्या गृह मंत्र्याना कळविले असल्याचे मा. चव्हाण यांनी सांगितले.***

माझे सन्माननीय मित्र **श्री. कारखानीस**[५४] यांनी कोल्हापूरच्या दत्तक विधानासंबंधीच्या प्रश्नाचा येथे उल्लेख केला आहे. गेल्या काही दिवसात कोल्हापूरच्या दत्तक विधानाचा प्रश्न हा अत्यंत गंभीर होऊन बसला आहे व त्यामुळे माझे मनसुद्धा चिंताक्रांत झाले आहे. या प्रश्नाच्या बाबतीत कोणत्या कसोट्या सरकारने आपल्यापुढे ठेवल्या आहेत याची माहिती या सन्माननीय सभागृहाला असणे जरूर आहे. सन्माननीय सभासद श्री.कारखानीस असे म्हणाले की, कोल्हापूरच्या राजघराण्यासंबंधी एक आदराची भावना महाराष्ट्रात आहे. मी त्यांना हे सांगू इच्छितो की, हीच भावना माझ्या मनातसुद्धा आहे. या भावनेशी सुसंगत राहून मी या प्रश्नाचा विचार केला आहे. एखाद्या राजघराण्यात जर कौटुंबिक मतभेद निर्माण झाले तर त्याबाबतीत कोणती बाजू घ्यावी ही कठीण समस्या आहे. त्यामुळे अशा प्रश्नांच्या बाबतीत विचार करून निर्णय घेणे ही अत्यंत कठीण व जबाबदारीची गोष्ट होऊन बसते. लक्षावधी लोकांना राजघराण्यासंबंधी आदर वाटतो त्या राजघराण्याचे प्रश्न हे त्या घराण्याच्या लौकिकाला साजेल अशा पद्धतीनेच सुटले पाहिजेत. त्यामध्ये मतभेद, पक्षभेद, आंदोलन आणि उपवास यांचा अंतर्भाव होता कामा नये अशी आमची इच्छा

* **Maharashtra Legislative Assembly Debates, Vol.VII, Part II (Inside No. 15), 28th June 1962, pp. 770 to 773.**

आहे. ही गोष्ट खरी आहे की या प्रश्नासंबंधी हिंदुस्थानचे नामदार गृह मंत्री यांनी मला फेब्रुवारी महिन्याच्या २८ तारखेला एक डी.ओ.लिहून माझे मत विचारले होते. त्यावेळी मी त्या डी.ओ.लेटरला तातडीने उत्तर देऊ शकलो नाही कारण त्या वेळी आपण सर्वच आपआपल्या कामात गुंतलो होतो. त्यानंतर मी त्यांना एप्रिलच्या २३ तारखेला उत्तर दिले. म्हणजे जवळ जवळ दोन महिन्यांनी मी त्यांना उत्तर पाठविले. त्यात मी जे मत प्रदर्शित केले ते या सन्माननीय सभागृहाला कळावे म्हणून मी माझे उत्तरच संपूर्णपणे वाचून दाखवितोः

"My dear **Lal Bahadurji[55] -**

Kindly refer to your letter of 28th February regarding the request made by the Maharaja of Kolhapur for adoption of his daughter's son. As far as merits of choice between Kumar Rajwardhan and Kumar Dhulipsinghrao are concerned, it is hardly possible or necessary for me to express any views."

हे मी अगदी पहिल्या प्रथमच स्पष्ट केले. त्यानंतर मी आणखी एक वाक्य घातले ते असे की

"Personally I feel that this is a matter in which His Highness's wishes should be respected."

दत्तक विधानाचा प्रश्न हा शेवटी दत्तक घेणारा आणि दत्तक देणारा यांच्या इच्छेवरच अवलंबून राहतो. ॲडॉप्शनच्या कायद्याप्रमाणे हे मटेरियल आहे. अर्थात अशा वेळी संबंधित व्यक्तींनी लोकमताकडे दुर्लक्ष करावे असे मी म्हणणार नाही. सौ. पद्मा राजे यांच्यासंबंधी माझ्या मनात सदिच्छा आहे. आपल्या देशात जी अनेक राजघराणी आहेत त्यांची प्रतिष्ठा आपण राखली पाहिजे. त्यांचे परस्परांशी संबंध सलोख्याचे राहिले पाहिजेत. त्यासाठी मुख्यमंत्री या नात्याने योग्य तो सल्ला देणे माझे कर्तव्य आहे असे मी समजत आलो आहे. सौ. पद्मा राजे यांचे जीवन सुखाचे राहावे यासाठी मी अनेक वेळा प्रयत्न केले आहेत. मी काही वचन दिले होते व ते मी मोडले आहे असा माझ्यावर आरोप करण्यात येतो. याबाबतीत मी वादविवाद करू इच्छित नाही. परंतु जे प्रत्यक्ष घडले आहे ते अगदी मनमोकळेपणाने मी आपल्यापुढे मांडू इच्छितो. विजयमाला देवी या मला १९५९ च्या एप्रिल किंवा मे महिन्यात भेटल्या होत्या.

माझे ऑपरेशन झालेले असल्यामुळे त्या मला भेटावयास आल्या होत्या. त्यावेळी त्यांचे व माझे साधारणतः १० ते १५ मिनिटे बोलणे झाले. परंतु त्यावेळी त्यांचे व माझे जे बोलणे झाले त्याचे रेकॉर्ड काही मी ठेवलेले नाही. मी आपल्यापाशी सर्वच

मोकळेपणाने बोलावयाचे ठरविले आहे आणि म्हणून त्यावेळी जे काही बोलणे झाले ते सर्वच तपशीलवार सांगणे योग्य नसले तरी त्यातील महत्त्वाचा भाग मी सांगत आहे. त्यावेळी माझ्या पत्नी माझ्यापाशी होत्या. त्याप्रसंगी आमचे जे काही बोलणे झाले ते मला आठवत आहे परंतु त्याबद्दल खात्री करून घ्यावी म्हणून त्यावेळी आमचे काय बोलणे झाले याबद्दल माझ्या पत्नीलासुद्धा मी विचारले आहे. त्यावेळी पद्मा राजे यांच्यासंबंधी चिंता व्यक्त करण्यात आली. त्यांना भेटू देत नाहीत असाही उल्लेख करण्यात आला. त्याचप्रमाणे त्यांच्या विवाहासंबंधीसुद्धा चर्चा झाली. तो सर्वच तपशील येथे सांगणे बरोबर होणार नाही. परंतु एक गोष्ट महत्त्वाची आहे. ती अशी की त्यावेळी त्यांचे लग्नच झाले नव्हते आणि त्यामुळे त्यांच्या मुलाला दत्तक घेण्याचा प्रश्नच उपस्थित होणे शक्य नव्हते. तेव्हा अमक्याला दत्तक घ्या असा सल्ला देण्याचा प्रश्नच उद्भवणे शक्य नव्हते. परंतु याबाबतीत माझे मत असे आहे की, दत्तक विधानाच्या बाबतीत दत्तक घेणारा आणि दत्तक घेऊ इच्छिणारा यांच्या इच्छेशिवाय दुसरे काय महत्त्वाचे आहे? अर्थात महाराजांनी लोकमताचासुद्धा विचार केला तर ते जास्त बरे होईल. परंतु हा प्रश्न म्हणजे त्यांचे मन वळविण्याचा प्रश्न आहे.

हा त्यांच्यावर दडपण आणण्याचा प्रश्न नाही. त्याचप्रमाणे मी त्यांच्याशी काय बोललो आहे किंवा काय बोलू इच्छितो हा निराळा प्रश्न आहे. मी माझी या प्रश्नाच्या बाबतीत काय मनःस्थिती आहे ते सांगत आहे. याबाबतीत माझे मत असे आहे की, एखाद्या राजघराण्यात मतभेद निर्माण झाल्यानंतर त्यापैकी एक बाजू घेऊन वितंडवाद वाढविणे बरोबर होणार नाही. या घराण्यासंबंधी मला आदर आहे. लोकांनासुद्धा त्या घराण्यासंबंधी आदर असल्यामुळे लोकांच्या याबाबतीत काही भावना असणे स्वाभाविक आहे. या भावनांची तीव्रता किती आहे हे मला माहीत आहे. परंतु या राजघराण्याची महाराष्ट्रात प्रतिष्ठा राहील अशा पद्धतीने हा प्रश्न सुटला पाहिजे. तो एकमेकांचे मन वळवून सोडविला पाहिजे. एकमेकांवर दडपण आणण्याचा प्रयत्न करून तो सोडविण्याचा प्रयत्न होता कामा नये. याबाबतीत आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक आहे असे मला वाटते. सौ. पद्मा राजे यांचे लग्न झाल्यानंतर त्यांच्या नातेवाईकांना असे वाटले की त्यांना आता आर्थिक साहाय्य मिळणार नाही. त्या वेळी पुढाकार घेऊन व हिंदुस्थान सरकारशी पत्रव्यवहार करून व सरकारतर्फे काही आर्थिक जबाबदारी स्वीकारून त्यांना त्यांच्या लाइफ टाइमपर्यंत दरमहा काही तरी आर्थिक साहाय्य देण्याची व्यवस्था करण्याचे श्रेय माझ्याकडे येते. यावरून सौ. पद्मा राजे यांच्याबद्दल माझ्या स्वतःच्या भावना काय आहेत हे आपल्या लक्षात

येईल. या दत्तक प्रकरणामध्ये कोल्हापूर शहरात आणि महाराष्ट्रात ज्या भावना व्यक्त झाल्या त्या लक्षात घेतल्यानंतर महाराजे साहेबांनी दत्तक घेण्याची घाई करू नये असे माझे स्पष्ट मत झाले आहे आणि मी ते हिंदुस्थान सरकारला कळविलेले आहे. हिंदुस्थान सरकारला मी अशी विनंती केलेली आहे की त्यांनी महाराजे साहेबांना असा सल्ला द्यावा की अशा तंग वातावरणात दत्तक विधान करून लोकांच्या भावना अधिक तीव्र करण्याने त्यांच्या दृष्टीने, राजघराण्याच्या दृष्टीने आणि आमच्या राज्याच्या दृष्टीनेही अकारण प्रश्न निर्माण होत आहे, लोकांच्या आज ज्या भावना आहेत त्यांच्याविरुद्ध जाऊन दत्तक विधान करण्याचा प्रयत्न करणे बरोबर नाही. अशा प्रकारचे यासंबंधीचे मत आजच महाराष्ट्र सरकारने हिंदुस्थान सरकारला कळविलेले आहे. सध्या दत्तक विधान स्थगित झाले तर ते योग्य होईल अशी यासंबंधीची या राज्य सरकारची भूमिका हिंदुस्थान सरकारला कळविण्यात आलेली आहे. यापेक्षा जास्त मी काय सांगू शकणार? कोल्हापूरच्या जनतेला मी विनंती करीन की कोणाच्याही संबंधाने संशय किंवा राग तिने मनात धरू नये आणि आजचे आंदोलनाचे जे स्वरूप आहे ते तसे ठेवू नये. कोणाच्या तरी राजकीय रागालोभाचा फायदा याप्रसंगी घेतला जाऊ नये. सन्माननीय सभासद श्री.कारखानीस हे कोल्हापूरच्या जनतेचे प्रतिनिधी आहेत. तेव्हा मी त्यांना विनंती करीन की त्यांनी माझ्या या भावना कोल्हापूरच्या जनतेपर्यंत पोहोचवाव्यात. या प्रश्नाचे स्वरूप लक्षात घेऊन अशा प्रकारचा आंदोलनाचा मार्ग जनतेने स्वीकारू नये, कोणावर अकारण संशय किंवा राग धरू नये. यातून आपल्याला काही तरी मार्ग काढला पाहिजे. राजघराण्यातील एकी कायम राहिली पाहिजे, प्रतिष्ठा कायम राहिली पाहिजे या दृष्टीने यातून मार्ग काढला पाहिजे असे माझे मत आहे. या छोट्या प्रश्नाला वादंगाचे रूप देऊन संकट ओढवून घेणे योग्य नाही. हा काय प्रकार आहे हे बाहेरच्या माणसांना समजत नाही. त्यांना वाटते हे काय चालले आहे? हे काय चालले आहे हे मी समजू शकतो, पण बाहेरचा माणूस समजू शकत नाही. सौ. पद्मा राजे यांच्यासंबंधी जनतेच्या काही भावना आहेत. राजाराम महाराजांच्या या महान कन्येविषयी स्त्रियांच्या भावना फार प्रखर आहेत. मुंबईतील आणि कोल्हापुरातील स्त्रियांच्या ज्या भावना आहेत त्या मी समजू शकतो. घरोघरच्या स्त्रियांत त्यांच्याविषयी काही भावना असणे शक्य आहे, माझ्याही घरी त्या भावना आहेत. या भावना मी समजू शकतो. सन्माननीय सभासद श्री.कारखानीस हे कोल्हापूरचे प्रतिनिधी आहेत, तेव्हा मी त्यांना पुनः एकदा विनंती करीन की, मी ज्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत त्या माझ्यातर्फे कोल्हापूरच्या जनतेला जाऊन सांगाव्यात.

दुसरा जो एक मुद्दा या चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित करण्यात आला त्याविषयी थोडासा खुलासा करून मी आपले भाषण संपविणार आहे. हा मुद्दा जाहिरातीसंबंधी होता. सन्माननीय सभासद श्री. अत्रे यांनी या मुद्याचा या ठिकाणी उल्लेख केला. याबाबतीत या सभागृहात मागेही चर्चा झालेली होती आणि जाहिराती देताना कोणत्या गोष्टी विचारात घेतल्या जातात, कोणती कसोटी याबाबतीत ठरविण्यात आलेली आहे अशी विचारणाही करण्यात आलेली होती. जाहिराती देण्याच्या बाबतीत एक ॲप्रुव्हड् लिस्ट आहे यात काही शंका नाही. ही लिस्ट तयार करताना कोणत्या कसोट्या लावल्या जातात हा एक प्रश्न आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे वर्तमानपत्राचा खप हा एक महत्त्वाचा भाग, त्यानंतर त्या वर्तमानपत्राचा वाचकवर्ग कोणत्या स्वरूपाचा असतो, त्या वर्तमानपत्राचा दृष्टीकोन कितपत वास्तववादी आहे, या गोष्टी लक्षात घेतल्या जातात. निव्वळ निंदाव्यंजक स्वरूपाचा मजकूर असणारे, निव्वळ कुचेष्टा करणारे तर ते वर्तमानपत्र नाही ना, या गोष्टींचाही विचार जाहिराती देताना केला जातो. मी आता ज्या गोष्टी सांगितल्या त्या विचारात घेऊन वर्तमानपत्रांना जाहिराती दिल्या जातात. याबाबतीत महाराष्ट्र सरकारने असे धोरण ठेवलेले आहे की इंग्रजी भाषेच्या वर्तमानपत्रांच्या जोडीला देशी भाषेच्या - मराठी भाषेच्या - वर्तमानपत्रांकडेही अधिक लक्ष दिले पाहिजे. अशा प्रकारच्या सूचना जाहिरात देणाऱ्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जिल्हा वर्तमानपत्रांनाही जाहिराती देण्याबाबत अधिक लक्ष घातले गेले पाहिजे असा आमचा दृष्टीकोन आहे. वृत्तपत्रीय जीवनात पुणे, मुंबई, नागपूर या ठिकाणांहून निघणाऱ्या वृतपत्रांना जास्त महत्त्व आहेच, परंतु जिल्हा पातळीवर निघणाऱ्या वर्तमानपत्रांना आजच्या काळात फार महत्त्व आहे. त्यांचे आजपर्यंतचे कामही मोठे आहे. त्यांनी केलेली महाराष्ट्राची सेवा डोळ्यांत भरणारी आणि अंतःकरणाला भिडणारी आहे. या मोठ्या शहरातील वर्तमानपत्रांच्या खपाच्या मानाने त्यांचा खप कमी असला तरी त्यांना जाहिराती देण्यातून वगळता कामा नये असा दृष्टीकोन आम्ही ठेवलेला आहे.

श्री.अत्रे यांनी आणखी एका गोष्टीचा उल्लेख या संदर्भात केला. त्यांनी असे म्हटले की आम्ही ज्या काही गोष्टी वर्तमानपत्रात छापतो त्या जोपर्यंत सरकारकडून कॉन्ट्रॅडिक्ट होत नाहीत तोपर्यंत त्या खऱ्याच आहेत असे मानले पाहिजे. आम्ही शक्यतो कॉन्ट्रॅडिक्शन करण्याचा प्रयत्न करतो. परंतु मराठ्यातील किती बातम्या दुरुस्त करणार? म्हणून त्यांच्या वाट्याला मी जात नाही. अर्थात ते जे लिहितात ते सगळेच खोटे असते असे नाही, केव्हा केव्हा ते खरेही असते. आज त्यांनी जो उल्लेख केला तो

थोडा फार खरा आहे. त्यांनी आज ज्या गोष्टीचा उल्लेख केला ती गोष्ट त्यांनी आपल्या पत्रात टीकात्मक दृष्टीकोनातून लिहिलेली होती. 'महाराष्ट्र दर्शन' नावाचा एक अनुबोधपट महाराष्ट्र सरकारने श्री.के.जी.देशमुख आणि पार्टनर्स यांच्याकडून तयार करवून घेतला आहे. याच पद्धतीने इतरांकडूनही आम्ही अनुबोधपट तयार करवून घेत असतो. काही माणसांनी आपल्या कल्पना आणि अनुभव यांच्या साहाय्याने एखादा अनुबोधपट तयार केला किंवा करावयाचे ठरविले तर हे सरकार त्यांच्याकडून तो अनुबोधपट जरूर घ्यावयास तयार असते. या कंपनीचे पार्टनर्स कोण कोण व किती आहेत याची काही तपशीलवार माहिती मला नाही. या अनुबोधपटाची किंमत म्हणूनच त्या कंपनीच्या एका पार्टनरच्या नावाने महाराष्ट्र सरकारने एक चेक दिला. त्या कंपनीचा एक पार्टनर म्हणजे एक वर्तमानपत्राच्या संपादकाची मुलगी होती ही गोष्ट खरी आहे पण त्याला आम्ही काय करणार? त्या मुलीच्या नावाने आम्ही जर चेक दिला असेल तर त्यात बिघडले कोठे? श्री. अत्रे यांचा दुसरा प्रश्न असा की तो अनुबोधपट अजून दाखविला का नाही? तो अनुबोधपट अद्याप सेन्सॉरकडून पास होऊन यावयाचा आहे, तो तेथून आल्यानंतर जरूर दाखविण्यात येईल. झाकून ठेवण्याकरिता काही तो सरकारने विकत घेतलेला नाही. त्याचा आपल्या राज्याला उपयोग होणार असल्याने सरकारने तो विकत घेतलेला आहे. पूर्वीही 'मंगल कलश' नावाचा अनुबोधपट सरकारने घेतलेला आहे. रॉयल्टी देऊन या अनुबोधपटाच्या काही कॉपीज सरकारने घेतलेल्या आहेत. अनुबोधपटांच्या निर्मितीसाठी याच पद्धतीने काम करावे लागते. ही हकिगत यासंबंधात मी सभागृहासमोर ठेवलेली आहे.

सन्माननीय सभासद श्री. अत्रे यांनी **श्री.ह.रा.महाजनी**[५६] यांच्या नावाचा उल्लेख केला. त्यांना सरकारकडून भाषांतराचे काम देण्यात आले आहे अशा प्रकारचा उल्लेख त्यांनी केला. अशा प्रकारचे काम राज्यातील अनेक विद्वानांना दिलेले आहे. श्री. महाजनी यांची या क्षेत्रातील योग्यता श्री. अत्रे यांनी कबूल केलेली आहेच. श्री. महाजनी हे पहिल्या प्रतीचे संपादक आहेत, बुद्धिमान गृहस्थ आहेत, पंचवार्षिक योजनेसारखे महत्त्वाचे पुस्तक भाषांतरित करण्याकरिता त्यांनी आपली शक्ती दिली, आपल्या बुद्धीचा उपयोग करू दिला या गोष्टीचे आपण स्वागत केले पाहिजे. श्री. महाजनी हे एक स्वतंत्र बाण्याचे संपादक आहेत. त्यांच्याकडून भाषांतराचे काम करवून घेतले यात वाईट काहीच नाही. श्री. महाजनी यांच्यावर काही फेव्हर करावी म्हणून त्यांना काही हे काम दिलेले नाही. ते स्वतंत्र वृत्तीचे संपादक आहेत. ते मला कधी चांगले म्हणतात तर कधी वाईटही म्हणतात. ते स्वतंत्र बुद्धीचे आहेत. आजचा

अग्रलेख पाहा. त्यांनी काही आमच्या बाजूने लिहिलेले नाही. संपादकाने स्वतंत्र बुद्धीनेच लिहिले पाहिजे. संपादक हा असाच राहिला पाहिजे असे माझे मत आहे.

मी एवढेच सांगेन की जाहिराती देण्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची पक्षबाजी करून काम करावे असा आमचा दृष्टिकोन नाही. इतःपरही विरोधी पक्षाच्या माझ्या मित्रांना मी सांगेन की, यासंबंधी काही स्पेसिफिक सूचना त्यांच्याकडून आल्या तर त्याबाबतीत आम्ही जरूर विचार करू. विरोधी पक्षाच्या चांगल्या सूचनांचा सरकार सन्मान करू इच्छिते एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

■ ■ ■

On 28th June 1962, Shri Y.B.Chavan, Chief Minister, replying to the cut motion brought before the House regarding adoption of his daughter's son by the Maharaja of Kolhapur and Government's role in the matter. He informed the House that he had conveyed to the Home Minister that in the case of adoption His Highness's wishes would be respected.

# डॉ. बिधन चंद्र रॉय व श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव*

**२ जुलै १९६२**

***मा. यशवंतराव चव्हाण यांनी डॉ.बी.सी.रॉय व श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करणारा प्रस्ताव मांडून त्यांत या दोघांनी केलेल्या मौलिक राष्ट्रसेवेबद्दल गौरवोद्‌गार काढले.***

अध्यक्ष महाराज, आज सभागृहाचे कामकाज पुढे सुरू करण्यापूर्वी सभागृहासमोर मी एक सूचना मांडत आहे. आज सारा भारत देश अत्यंत दुःखी झालेला आहे. आपल्या देशातील दोन पहिल्या प्रतीची नररत्ने डॉ. बिधनचंद्र रॉय आणि श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांचे काल झालेले आकस्मिक निधन ही देशाची कधीही भरून न येणारी हानी झालेली आहे.

डॉक्टर बिधनचंद्र रॉय यांचा तर योगायोग असा की, कालच त्यांचा ८१वा वाढदिवस होता आणि त्यांचा हा वाढदिवस सर्व कलकत्ताभर साजरा होत असताना त्यांचा मृत्यू झाला. ही मोठी अनपेक्षित घटना होय. डॉक्टर बिधनचंद्र रॉय यांचे ८१ वर्षांचे जीवन कर्तृत्वाने भरलेले असे आहे. ते वैद्यकीय धंद्यात अत्यंत कुशल आणि तज्ज्ञ असे डॉक्टर होते. त्यांनी बंगालमध्येच नव्हे तर अखिल भारतात ह्या क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची अशी कामगिरी केलेली आहे. वैद्यकशास्त्रात संशोधनाची आणि त्यांच्या संवर्धनाची अत्यंत महत्त्वाची कामगिरी त्यांनी केलेली आहे. कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या कामातही त्यांचा संबंध होता. ह्या सर्व कामापेक्षा अध्यक्ष महाराज, गेल्या ५० वर्षांत हिंदुस्थानात ज्या निरनिराळ्या राजकीय चळवळी झाल्या, त्यात

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. VII, Part II (Inside No. 7), 17th July 1962, pp. 828 to 829.

त्यांनी अत्यंत मोलाची अशी कामगिरी केलेली आहे. ह्या देशात ज्या राजकीय चळवळी झालेल्या आहेत त्यांच्याशी डॉक्टर बिधनचंद्र रॉय यांचा फार निकटचा संबंध राहिलेला आहे. चित्तरंजनदास आणि महात्मा गांधी यांनी ज्या चळवळी केल्या, त्यात डॉक्टर रॉय यांनी फार मोलाची कामगिरी केलेली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गेली १५-१६ वर्षे ते बंगालचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहत होते. परंतु त्यांच्याकडे आपल्याला केवळ बंगालचे मुख्यमंत्री म्हणून पाहता येणार नाही. आपल्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीशी त्यांचा फार निकटचा संबंध आलेला आहे. त्यांच्या कामाचे स्वरूप अखिल भारतीय होते. त्यामुळे केवळ बंगालचाच नव्हे तर साऱ्या राष्ट्राचा एक मोठा पुढारी हरपला अशी सर्व जनतेची भावना असून त्यांची जागा आता कशी भरून निघेल असे जनतेला वाटणे स्वाभाविक आहे.

दुसरे श्री. पुरुषोत्तमदास टंडन, ज्यांनी आपले सबंध जीवन डेडिकेटेड लाइफ किंवा ज्याला त्यागमय जीवन म्हणता येईल असे घालविले आहे. त्यांनी आपले सबंध जीवन देशासाठी समर्पित केले होते. गेल्या तीन चार वर्षांपासून ते राजकारणापासून अगदी अलिप्त राहिले होते. त्यांनी अलाहाबाद म्युनिसिपालिटीत अध्यक्ष म्हणून काम केलेले होते आणि लाला लजपतरायांच्या वेळेपासून ते देशासाठी काम करीत आलेले आहेत. सन १९३० सालच्या करविरोधी आंदोलनात त्यांनी महत्त्वाचा भाग घेतलेला होता. नंतर ते भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष होते. श्री.पुरुषोत्तमदास टंडन हे गेली दोन-तीन वर्षे आजारी होते. त्यांनी सन १९२१ साली वकिली सोडली आणि १९२१ पासून शेवटपर्यंत ते हिंदुस्थानच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात काम करीत राहिले. सन १९२१ नंतर ते कित्येक वर्षे उत्तर प्रदेश विधानसभेत सदस्य म्हणून राहिले आणि कित्येक वर्षे उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. त्याचप्रमाणे हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. त्यांनी सतत ८० वर्षे देशाचे जे अमोल असे काम केले त्या त्यांच्या कामाचा गौरव म्हणून त्यांना भारतरत्न हा किताब बहाल करण्यात आला.

ह्या दोन भारत-रत्नांबद्दल आमच्या मनात अत्यंत आदराची भावना आहे आणि म्हणून या सभागृहात त्यांना श्रद्धांजली वाहण्यात यावी आणि आपली ही श्रद्धांजली त्यांच्या कुटुंबियांकडे पाठविण्यात यावी. या दोन थोर नेत्यांच्या आकस्मिक निधनामुळे आम्हांला अपार असे दुःख झालेले आहे आणि आमच्या मनात त्यांच्याविषयी वसत असलेल्या आदराच्या भावनेचे प्रतीक म्हणून आता आपण या सभागृहाचे आजचे कामकाज तहकुब करावे अशी माझी विनंती आहे. ▪▪▪

On 2nd July 1962, Shri Y.B.Chavan, Chief Minister, made a condolatory reference to the deaths of Dr.B.C.Roy and Shri Purushottamdas Tandon. He eulogised their services to nation and said that India was fortunate enough to give birth to such geniuses and dedicated persons.

# पोलीस प्रशासनावरील चर्चा *

## २ जुलै १९६२

***पोलीस प्रशासनावर खर्च का वाढला आहे याची कारणे सांगून पोलीस खात्यातील भ्रष्टाचाराला त्यांचे वेतन वाढवूनच आळा घालता येईल असे मा. श्री. चव्हाण यांनी प्रतिपादन केले.***

अध्यक्ष महाराज, या सभागृहातील पोलिसांच्या मागणीवरील चर्चा नेहमीच उद्‌बोधक स्वरूपाची होत असते आणि सरकारला आपले धोरण ठरविण्याच्या बाबतीत काही अंशी मार्गदर्शकही ठरत असते. आजची चर्चा अशाच प्रकारे मार्गदर्शक ठरेल असे मी धरून चालतो. सन्माननीय सभासद श्री. पाटकर यांनी अनेक महत्त्वाचे प्रश्न या चर्चेच्या अनुरोधाने उपस्थित केलेले आहेत आणि बहुशः त्यावरच या सभागृहात दोन-अडीच तास चर्चा झाली. दोन-तीन महत्त्वाच्या मुद्यांच्या बाबतीत मी या ठिकाणी चर्चा करणार आहे, या सभागृहात काही तपशिलाच्या गोष्टींचाही उल्लेख करण्यात आलेला आहे, या तपशिलाच्या गोष्टींना उत्तर देण्याची माझी इच्छा असूनही मला ते शक्य होणार नाही. तपशिलवार सांगण्यात आलेल्या सर्वच गोष्टींची माहिती सध्या माझ्याजवळ असेलच असे म्हणता येणार नसल्याने मी त्याबाबतीत काही बोलावयाचे म्हटले तर संबंधित लोकांवर काहीसा अन्याय होण्याचा संभव असल्याने मी तपशिलाच्या गोष्टीत जाणार नाही. या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या महत्त्वाच्या मुद्यांवरच मी आपले विचार व्यक्त करणार आहे. पोलिस खात्याच्या कारभाराबाबत जे सामान्य प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत त्याबाबत सरकारचे धोरण काय

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. VII, Part II (Inside No. 8), 3rd July 1962, pp. 889 to 890

आहे, सरकारचा विचार काय आहे याचे या सभागृहात स्पष्टीकरण झाले तर ते सभागृहाला, जनतेला आणि पोलिस खात्यालाही उपयोगी पडेल असे मला वाटत असल्याने काही महत्त्वाच्या मुद्यांना मी जरूर उत्तर देणार आहे.

सुरुवातीलाच सन्माननीय सभासद श्री. पाटकर यांनी एक प्रश्न अधिक तीव्रतेने मांडला आणि पोलिस खात्यात हे काय चालले आहे अशी विचारणा केली. पोलिसांची संख्या वाढलेली आहे, खर्च वाढलेला आहे परंतु त्या प्रमाणात गुन्हेही वाढलेले आहेत, दुप्पट झाले आहेत असे त्यांनी सांगितले. या दोन्ही गोष्टींचा परस्परांशी काही संबंध आहे किंवा नाही असा साधारण प्रश्न त्यांनी उपस्थित केला. जरूर ती माहिती जमविण्याचा आणि स्मृती उजळण्याचा प्रयत्न मी केला. गेल्या दोन-तीन वर्षांत पोलिसांची संख्या वाढलेली आहे आणि पोलिसांवरील खर्चही वाढलेला आहे या गोष्टी खऱ्या आहेत, काही प्रमाणात हेही खरे आहे की अपघातांची संख्या वाढली आहे, काही प्रमाणात हेही खरे आहे की प्रॉसिक्यूशनच्या केसेसच्या संख्येत वाढ झालेली आहे, या ठिकाणी जी आकडेवारी सांगण्यात आली ती खरी आहे, पोलिसांची संख्या वाढल्यावर गुन्ह्यांची संख्याही वाढावी हा थोडा चमत्कार आहे, पोलिसांची संख्या का वाढली आहे, पोलिसांचा खर्च का वाढला आहे, गुन्ह्यांची संख्या का वाढली आहे हा प्रश्न आपण समजावून घेतला पाहिजे, मी तरी तो स्वतः समजावून घेतलेला आहे, पोलीस कारभाराची जिम्मेदारी मी आमच्या पक्षाच्या वतीने आणि या सरकारच्या वतीने माझ्याकडे घेतलेली आहे, मी एवढेच स्पष्टपणे म्हणेन की, या दोन गोष्टींवरून पोलीस खात्याच्या कारभाराची कसोटी लावता येणार नाही, इकडे पोलिसांची संख्या वाढली की तिकडे अपघातांची संख्या वाढते असा संबंध आपण लावावयाचा असे ठरविले तर अपघातांची संख्या कमी होण्याकरिता पोलीस कमी करा, पोलीस कमी केले तर अपघातांची संख्याही कमी होईल असे तर आपण म्हणणार नाही ना? तर्काचा हा दुष्ट उपयोग आहे असे मी म्हणेन. अपघातांची संख्या आणि पोलिसांची संख्या यांचा काही संबंध नाही. पोलिसांची संख्या वाढलेली आहे याला काही कारणे आहेत, आपल्या नवीन महाराष्ट्र राज्यात तीन विभाग एकत्र आले याचा अर्थ तीन पोलीस ॲडमिनिस्ट्रेशन्स एकत्र आली असा आहे, या खात्यात सुसूत्रतता आणण्याच्या दृष्टीने पोलिसांच्या संख्येत वाढ करण्याची आवश्यकता या खात्याला वाटली. मराठवाडा, विदर्भ आणि मुंबई राज्याचा जुना विभाग यातील सगळ्या गोष्टींचा विचार करून, चर्चा करून एक गज (यार्डस्टिक) तयार करण्यात आला. प्रत्येक विभागातील लोकसंख्या विचारात घेऊन प्रत्येक विभागात किती पोलिस व पोलिस अधिकारी असावेत हे ठरविण्याच्या दृष्टीने एक गज तयार करण्यात आला आणि असा

निर्णय घेण्यात आला की, विदर्भ आणि मराठवाडा या ठिकाणच्या पोलीस स्टेशनमागे पोलिसांची संख्या वाढविली पाहिजे. त्याशिवाय पगारमान व इतर गोष्टींच्या बाबतीत सर्व ठिकाणच्या पोलीस दलात सुसूत्रता आणावयाची होती. त्यामुळे या खात्याच्या खर्चात वाढ झाली. या खात्याचा कारभार जसा पुढे चालत आहे तशी पोलिसांची संख्या वाढत आहे असा यातील हिशोब नाही. या खात्याच्या कारभारात मध्यंतरी महत्त्वाचे बदल घडले त्याचे ही वाढ म्हणजे थोडेसे प्रतिबिंब आहे असा याचा अर्थ लावावा लागेल. अपघातांची संख्या वाढली आहे हे मी कबूल केलेले आहे. पण त्याला पोलिस खात्याचा कारभारच जबाबदार आहे असे कसे म्हणता येईल? हल्ली अपघातांचे प्रमाण एवढे वाढले आहे की मला स्वतःला असे वाटू लागले आहे की, सुरक्षिततेच्या दृष्टीने पुण्या-मुंबईचा प्रवास मोटारने करण्यापेक्षा विमानाने करणे जास्त सोयीचे आहे. अपघातांची संख्या वाढत आहे याला कारण पोलिस ॲडमिनिस्ट्रेशन असे जर कोणी म्हणू लागले तर त्यांना अपघातांचा प्रश्नच समजलेला नाही असे म्हणावे लागेल. याला मूळ कारण असे की मुंबई शहरात नेहमीच लोकसंख्या वाढत असते आणि येथील विशिष्ट प्रकारचे जीवन पाहता ही लोकसंख्या नेहमी वाढतच राहणार अशी अपेक्षा आहे. आपण ज्या तऱ्हेचे औद्योगीकरण करीत चाललो आहोत आणि ज्या तऱ्हेचे औद्योगीकरण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत त्याचे स्वरूप लक्षात घेता या शहराची लोकसंख्या कमी होणार नाही ही गोष्ट आपल्याला गृहीत धरावी लागेल आणि त्या दृष्टीने या शहरातील वाहनांची संख्याही वाढतच जाणार आहे. मी आजच ह्या बाबतीत चौकशी केली आणि काही आकडे पाहून घेतले तेव्हा असे दिसून आले की मोटारसायकलींपासून तो ट्रक्स, टॅक्सीज, प्रायव्हेट मोटारी, बसेस इत्यादी जी वाहने आहेत, त्यांची संख्या मुंबई शहरात ७० हजार आहे आणि त्याशिवाय देशाच्या अन्य भागातून रोज येथे जी वाहने येतात त्यांची संख्या जवळ जवळ १० हजार इतकी होईल. म्हणजे मुंबई शहराच्या रस्त्यावर रोज ८० हजार वाहने धावत असतात. अर्थात हिंदुस्थानात जी इतर मोठी शहरे आहेत त्यांच्या तुलनेत येथे ॲक्सिडेंट्सचे प्रमाण जास्त आहे ही गोष्ट खरी आहे, आणि इतके असूनही दुसऱ्या मोठ्या शहरांतील लोक असे मानतात तेथील ट्रॅफिकची व्यवस्था इतर शहरांच्या मानाने चांगली आहे. ॲक्सिडेंट्सचे प्रमाण जास्त असूनही हे लोक ट्रॅफिकची व्यवस्था चांगली आहे असे म्हणतात याचा अर्थ असा की, शहराच्या विस्ताराच्या मानाने आणि येथील वाहनांची रोजची जा ये पाहता त्या मानाने ॲक्सिडेंट्स कमी होतात याचे लोकांना आश्चर्य वाटते.

हा जो ट्रॅफिकचा प्रश्न आहे, विशेषतः मुंबई शहरासंबंधीचा, तो प्रश्न तीव्र असा आहे. मुंबई शहराच्या कंजेशनसंबंधीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक बर्वे कमिटी नेमली होती. त्यांनी ह्याबाबतीत विचार करून आपला अहवाल सादर केला आहे. मुंबई शहराचे जीवन हे एक विचित्र प्रकारचे जीवन आहे. हे जीवन सकाळी उत्तरेकडून दक्षिणेकडे पळत असते आणि साधारणतः दुपारी तीन-चारच्या नंतर ते दक्षिणेकडून उत्तरेकडे पळू लागते. म्हणजे मुंबईच्या माणसाचा सकाळी एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे आणि दुपारनंतर दुसऱ्या बाजूकडून विरुद्ध दिशेने सर्व मुंबई शहराचा प्रवास चाललेला असतो. हा सर्व प्रवास एक किंवा दोन रस्त्यांवरून चाललेला असतो. ट्रॅफिकचा सर्व भार ह्या एक-दोन रस्त्यांवरच प्रामुख्याने पडतो. ह्या सर्व प्रश्नात संशोधनाची गरज आहे आणि काही एका शास्त्रोक्त पद्धतीने या सर्व प्रश्नांचा विचार व्हावयाला हवा आहे. एका ठराविक पीक-अवरला ट्रॅफिक फार वाढतो. काही ठिकाणी वन-वे-ट्रॅफिक करायला पाहिजे. वन-वे ट्रॅफिकची कल्पना आम्ही स्वीकारलेली आहे. मुंबईच्या ट्रॅफिकचा प्रश्न हा अत्यंत गुंतागुंतीचा असला तरी तो आपल्याला सोडवायला पाहिजे अशी माझी भावना आहे.

आपल्या राज्यात पोलिसांवरील खर्च वाढत चाललेला आहे. पोलिसांवर खर्च वाढणे हे काही चांगले आहे असे नाही. पोलिसांवरील खर्च वाढला म्हणजे ते एफिशियंट ॲड्मिनिस्ट्रेशन होते असे नाही. पोलिसांवर खर्च वाढत आहे यात मला काही आनंद वाटत नाही. पोलिस कमिशनसमोर मी जे भाषण केले त्यात मी ह्या गोष्टीचा उल्लेख केला होता. सर्वांना जर असे वाटत असेल की, पोलिसांवरील खर्च कमी करावयाला पाहिजे, आणि एकदा धोका पत्करूनही आपण पोलीस कमी केले तर काय होते ते पाहिले पाहिजे, तर त्याही गोष्टीला माझी तयारी आहे. पण आजच्या परिस्थितीत आपली याबाबत किती तयारी आहे याचा आपण विचार केला पाहिजे.

गुन्ह्यांत प्रोहिबिशनचे गुन्हे जास्त वाढलेले आहेत असे सांगण्यात आले आणि आकडे पाहिले तर ही गोष्ट खरी आहे असे दिसून येईल. परंतु त्याचबरोबर इंडियन पीनल कोडचे आकडे कमी झालेले आहेत असे दिसून येईल. प्रोहिबिशनचा जो प्रश्न आहे तो अगदी स्वतंत्र प्रश्न आहे.

ह्या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असल्याने मॅन-अवर्सही यात जास्त खर्च होत असतील. परंतु दुसऱ्या बाजूला ई.पी.सी.मधील गुन्ह्याचे प्रमाण कमी होत आहे त्यामुळे पोलिसांना ह्या गुन्ह्याकडे लक्ष द्यायला जास्त वेळ मिळत असेल. प्रोहिबिशनच्या केसेस वाढल्या आहेत याचे दोन अर्थ होऊ शकतात. एकतर प्रोहिबिशन मोडण्याचे

कार्य वाढले असेल किंवा गुन्हा शोधण्याचे कार्य वाढले असेल किंवा दोन्हीही होऊ शकते. आता सन्माननीय सदस्यांना याचा जो अर्थ घ्यावयाचा असेल तो त्यांनी घ्यावा.

कारण संघटित गुन्हा आणि तो मोठ्या प्रमाणावर करण्यात फायद्याचे प्रमाण वाढत असते. बिग-बिझिनेसमध्ये नेहमी रेट ऑफ इंटरेस्ट वाढतो असा सिद्धांत आहे. मी पक्षाच्या किंवा सरकारच्या दृष्टीने बोलत नाही पण प्रश्न असा आहे की, ह्या दारूबंदीबाबत आपल्याला अगदी स्वतंत्रपणे विचार करावा लागेल. हा एक नैतिक स्वरूपाचा प्रश्न आहे. प्रोहिबिशनच्या अंमलबजावणीत काही दोष असेल परंतु आपण जर एकदा दारूबंदी मान्य केली असेल तर आपल्याला काही अपरिहार्य अशा अडचणींना तोंड द्यावे लागेल. किंवा दारूबंदीचे धोरण तरी चूक आहे असे मानावे लागेल. परंतु मी मात्र ह्याबाबतीत पराभव मानायला तयार नाही. जराशा बिकट परिस्थितीला घाबरून सेनापतीने आपली सेना मागे घेणे केव्हाही योग्य होणार नाही. आपल्याला जर दारूबंदी यशस्वी करावयाची असेल तर त्याच्या अंमलबजावणीमध्ये काय दोष आहेत हे पाहिले पाहिजे. पोलीस कमिशनच्या टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये दारूबंदीच्या एनफोर्समेंटचा प्रश्न ठेवलेला आहे. आम्ही दारूबंदी ही श्रद्धापूर्वक स्वीकारलेली गोष्ट आहे. परंतु दारूबंदीचे काम एका रात्रीत सफल होईल असे मानणे योग्य होणार नाही. त्यासाठी लोकांना विशिष्ट प्रकारचे शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. आणि समाजात त्यासाठी विशेष रूपाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. त्या प्रयत्नात कायद्याची फक्त मदत मिळू शकते. सरकारकडून हा प्रश्न सर्वस्वी सुटू शकत नाही. त्यासाठी लोकांमध्ये विचारप्रचाराचे काम करण्याची गरज आहे. अध्यक्ष महाराज, आमच्याकरिता दारूबंदी हा श्रद्धेचा प्रश्न आहे. छोट्यामोठ्या अडचणींना सहजासहजी घाबरून हा कार्यक्रम सोडून देता कामा नये. एक गोष्ट कबूल केली पाहिजे, दारूबंदी मोडण्याचे प्रयत्न होत आहेत आणि गुन्हे वाढत आहेत त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ह्या प्रश्नाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन असा आहे की दारूबंदी घडवून आणणे ही जबाबदारी समाजाची आहे. पोलिस फक्त समाजाला ही जबाबदारी पार पाडण्याकरिता मदत करणारे आहेत.

सन्माननीय सभासद **श्री.पाटकर**[५७] यांनी एक मुद्दा उपस्थित केला. त्यांनी असे सांगितले की, आपल्याला आपल्या राज्यातून करप्शन पूर्णपणे घालवावयाचे असेल आणि विशेषतः पोलिस खात्यातून घालवावयाचे असेल तर त्याकरिता आपण पोलिसांना ते जो जीवनाचा दर्जा मागतात तो त्यांना दिला म्हणजे आपोआपच करप्शन

दूर होईल. अध्यक्ष महाराज, मी प्रथम हे स्पष्ट करू इच्छितो की, ही गोष्ट मान्य केली तरी करप्शन जाणार नाही. माणसाला किती पैसा मिळाला म्हणजे समाधान वाटेल याचे निश्चित गणित कोणी मांडू शकणार नाही. जीवनाचा दर्जा सुधारण्याकरिता त्यांना सरकारने जास्त पगार दिला पाहिजे असे सन्माननीय सभासद श्री.पाटकर यांनी सांगितले ते मी समजू शकलो नाही. बाहेर कारखानदाराशी बोलताना ते त्याला सांगतात की तुला अमुक इतका फायदा झालेला आहे, तेव्हा तू आपल्या कामगारांना इतका बोनस दिलाच पाहिजे. परंतु सरकारशी या विषयावर बोलताना त्यांची ही मूल्ये बदलतात काय? ते त्या कारखानदाराला असे सांगतात काय की, तुझ्या नफ्याशी आम्हाला काही कर्तव्य नाही. कामगारांना आपला जीवनाचा दर्जा सुधारण्याकरिता आवश्यक तितका पगार दिला पाहिजे. त्यांची जी मूल्ये आहेत ती कारखानदाराशी बोलताना आणि सरकारशी बोलताना बदलतात काय अशी शंका मला यावयास लागली आहे. शासन ही काही प्रॉफिट मेकिंग बॉडी नाही, की या बॉडीचा नफा वाढला म्हणून ती आपल्या कर्मचाऱ्यांना जास्त पगार देऊ शकेल. शासनाला ज्या गोष्टी करणे शक्य आहे त्या गोष्टी शासन करीत आहे. सन्माननीय सभासद डॉ. मंडलीक आपल्या भाषणात म्हणाले की ह्या पोलिस कॉन्स्टेबल्सना १८-१८ तास काम करावे लागते, त्यामुळे दुःख होते. अध्यक्ष महाराज, त्यांना किती काम करावे लागते ही गोष्ट मला जास्त चांगली माहीत आहे, कारण माझा स्वतःचा संबंध त्यांच्याशी चोवीस तास असतो. तेव्हा त्यांचे दुःख मला माहीत नाही असा सन्माननीय सभासदांनी आपला समज करून घेऊ नये. ह्या लोकांना जास्त पगार देण्याचा जो प्रश्न आहे तो बोनसचा प्रश्न नाही, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह प्रश्न आहे. त्यांच्या अडचणी आहेत ही गोष्ट मला मान्य आहे आणि सरकार त्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे; परंतु त्या प्रयत्नांना आर्थिक मर्यादा आहेत ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. मुंबई शहरात राहण्याच्या जागेचा प्रश्न आहे म्हणून १९५६ सालापासून सरकारने पोलिसांच्या राहण्याच्या जागेचा प्रश्न हा महत्त्वाचा प्रश्न मानला आहे. मागच्या वेळी त्यांच्या राहण्याच्या जागेचा प्रश्न सोडविण्याकरिता सरकारने ३ कोटी ६१ लक्ष रुपये खर्च केला आहे, त्यामुळे ४५०० लोकांच्या राहण्याची सोय सरकार करू शकेल. सध्या आम्हाला ९५००अधिकाऱ्यांच्या आणि १९००० कॉन्स्टेबल्सच्या राहण्याची सोय करावयाची आहे. सन्माननीय सभासद म्हणतील की, ही व्यवस्था अपुरी आहे, आणखी जास्त लोकांच्याकरिता व्यवस्था करावयास पाहिजे होती; तर मला असे म्हणावयाचे आहे की, पैशाची व्यवस्था अपुरी असल्यामुळे थोडी व्यवस्था होऊ शकली. या प्रश्नाला सरकारने महत्त्वाचा प्रश्न मानला आहे व त्याप्रमाणे हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न सरकार करील. निव्वळ एखाद्या समाजाची

किंवा वर्गाची सहानुभूती मिळवण्याकरिता त्यांच्या परिस्थितीचे वर्णन करणे वेगळे आणि त्यांचे प्रश्न समजून घेऊन ते सोडविणे वेगळे. अध्यक्ष महाराज, पोलिसांचे जे दुःख आहे ते मी बघतो. विरुद्ध पक्षाच्या सन्माननीय सभासदांमध्ये आणि माझ्यामध्ये फरक इतकाच आहे की, ते बोलून त्यांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करतात, मला तसे करता येत नाही. मी न बोलता त्यांचे दुःख कमी करण्यासाठी काम करण्यास लागतो. पोलीस संघटनेमध्ये असंतोष निर्माण करून त्यांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही असे मी माझ्या विरोधी पक्षाच्या सन्माननीय मित्रांना सांगू इच्छितो. पोलिसांचे प्रश्न सोडविण्याकरिता सरकारने पोलिस कमिशन नेमले आहे. त्यांच्यापुढे सर्व प्रश्न ठेवण्यात आले आहेत असे असूनही पोलिसांकरिता सरकार काही करीत नाही असे म्हणणे कितपत योग्य आहे? अध्यक्ष महाराज, पोलिसांवर या राज्यात शांतता आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याची जबाबदारी आहे. त्यांच्यात जर असंतोष निर्माण करावयाचा प्रयत्न करण्यात आला तर तो योग्य नव्हे. असे विचारण्यात आले की पोलीस कमिशनरसमोर पोलिसांच्या पगाराचा प्रश्न का ठेवण्यात आला नाही? अध्यक्ष महाराज, राज्याच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या प्रश्नाचा विचार होत असताना फक्त पोलिसांच्या पगाराच्या प्रश्नाचा विचार पोलिस कमिशनकडे कसा सोपविता येईल? विरोधी पक्षांच्या सन्माननीय सभासदांचे असे म्हणणे असेल की, सबंध स्टेटच्या नोकरवर्गाचा प्रश्न पे कमिशनकडे सोपवावा, परंतु पोलिसांच्या पगाराचा प्रश्न मात्र एका बॉडीकडे सोपविण्यात यावा तर ते म्हणणे बरोबर नाही. तरीसुद्धा पोलिसांना २४ तास ड्युटी करावी लागते हे लक्षात घेऊन त्यांच्या बाबतीत स्वतंत्र निर्णय घेण्यात आले आहेत व त्याप्रमाणे प्रपोझल्स ठेवण्यात आली आहेत. ती मंजूर झाल्यानंतर त्यांची अंमलबजावणी करण्यात येईल.

अध्यक्ष महाराज, संभाजी चव्हाण या पोलिस कॉन्स्टेबलसंबंधीही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. मी स्पष्ट करू इच्छितो की, पोलिस संघटनेमध्ये खीळ घालणारी कोणतीही गोष्ट सरकार चालू देणार नाही. मला महाराष्ट्र राज्याचा कारभार चालवावयाचा आहे. वाऱ्यावर सोडून द्यावयाचा नाही. संभाजी चव्हाणबरोबर वेगळ्या वेगळ्या रीतीने वागण्याचा सरकारने प्रयत्न केला तरी पण त्यात यश आले नाही. मी आताच सांगितल्याप्रमाणे पोलिस संघटनेमध्ये ट्रेड युनियन स्पिरिट चालू देणार नाही. आम्ही यासंबंधी गंभीर आणि स्वच्छ भूमिका जाहीर केली नाही तर आम्ही आमच्या कर्तव्याला चुकू आणि म्हणूनच आज मी यासंबंधी स्वच्छ भूमिका मांडू इच्छितो. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सभासदांनी जो प्रश्न उपस्थित केला तो निव्वळ या संघटनेची सहानुभूती मिळविण्याच्या दृष्टीने केला आहे असे मी म्हणत नाही. तरी पण

मी त्यांना सांगेन की, आपल्या राज्यात पोलिसांना मिळणारा पगार आणि महागाई भत्ता आणि इतर राज्यात मिळणारा पगार आणि महागाई भत्ता याची त्यांनी तुलना केली तर त्यांना असे दिसून येईल की, आपल्या राज्यात मिळणारा पगार आणि भत्ता कितीतरी जास्त आहे. तेव्हा त्यांना जास्त पगार दिला पाहिजे असे म्हणणे बरोबर नाही. तरीही आम्ही त्यांना जास्तीत जास्त पगार आणि सवलती देण्याचा प्रयत्न करतो आहोत. आम्हालाही पोलिसांच्या दुःखाची कल्पना आहे. या प्रसंगी मला जाहीरपणाने सांगावयाचे आहे की, राज्यातील पोलिस फोर्स कोणत्याही राजकीय संघटनेच्या प्रभावापासून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दूर ठेवावयाचा आहे आणि तसे जर आम्ही केले नाही तर ज्या लोकशाही मूल्यांची आपण जोपासना करू इच्छितो ते काही आपल्या हातून होणार नाही. ही एका पक्षाची जबाबदारी नाही तर सर्व सभागृहाची आहे.

असा प्रश्न विचारण्यात आला की, पोलिसांच्या बायकांचा जो मोर्चा आला होता त्याला भेट का दिली नाही? त्याचप्रमाणे आज असाही प्रश्न निर्माण करण्यात आला होता की, कलेक्टरला मोर्चाला भेटण्याची परवानगी नाही, तेव्हा त्याला लोकांचे गाऱ्हाणे कसे कळणार? यासंबंधी मी खुलासा करू इच्छितो की, कलेक्टरला जाऊन भेटण्याची मनाई नाही, परंतु कलेक्टरने ह्या लोकांना बाहेर येऊनच भेटले पाहिजे असा आग्रह का?

अध्यक्ष महाराज, पोलिसांच्या बायकांचा जो मोर्चा काही दिवसांपूर्वी निघाला होता त्याच्या प्रतिनिधींची मी भेट घेतली नाही अशी टीका माझ्यावर या ठिकाणी करण्यात आली. ही टीका तर निराधार आहेच परंतु या बाबतीत वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यात येत आहे असे मला सांगावयाचे आहे. अध्यक्ष महाराज, पोलिसांच्या स्त्रिया आपली गाऱ्हाणी घेऊन मला भेटावयास आल्या तर त्यांना एकदाच काय परंतु दहादा भेटण्यास मी तयार आहे आणि तयार होतो, परंतु त्यांचे प्रतिनिधित्व करण्याच्या निमित्ताने आलेल्या तथाकथित पुढाऱ्यांची भेट घेण्यास मात्र मी तयार झालो नाही आणि होणार नाही. मला या ठिकाणी ही गोष्ट आग्रहपूर्वक सांगावयाची आहे की, कोणत्याही पक्षाचे लोक, मग ते माझ्या पक्षाचे लोक का असेनात, अशा प्रकारे लोकांच्या गाऱ्हाण्यांचा फायदा घेऊन आपले पुढारीपण दाखवू लागले किंवा त्या गाऱ्हाण्यांचा आपल्या पक्षीय फायद्याकरिता उपयोग करू लागले तर ते मला कधीही सहन होणार नाही आणि त्याला उत्तेजन माझ्याकडून मिळणे शक्य नाही. पोलिसांच्या स्त्रिया आपल्या कुटुंबातील अडचणी सांगण्याकरिता मला भेटण्यास आल्या तर एकदाच काय अनेकदा त्यांची भेट घेण्यास मी तयार आहे आणि अशा प्रकारचा निरोपही मी त्या दिवशी पाठविला होता.

अध्यक्ष महाराज, या ठिकाणी चर्चेच्या ओघात असा एक आरोप करण्यात आला की, सत्ताधारी पक्षाचे स्थानिक कार्यकर्ते पोलिसांवर वजन आणून त्यांच्या कार्यवाहीवर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात जेणेकरून निरपराध लोकांना त्रास होतो. अध्यक्ष महाराज, पोलिसांवर असे वजन आणण्याचा प्रयत्न राजकीय कार्यकर्त्यांकडून होतच नसेल असे मला म्हणावयाचे नाही. परंतु फक्त सत्ताधारी पक्षाच्या लोकांकडून असे प्रकार होतात हे म्हणणे मात्र मला मान्य नाही. अर्थात या गोष्टी होऊ नयेत आणि त्याला आळा घातला पाहिजे याच्याशी मी सहमत आहे; परंतु माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की या ठिकाणी जेव्हा आपण कोणत्याही प्रकारचे गाऱ्हाणे मांडतो तेव्हा त्याबाबतच्या सर्व बाजू मोकळ्या मनाने सभागृहासमोर मांडणे आवश्यक आहे. जेव्हा एखाद्या बाबीसंबंधाने सत्ताधारी पक्षावर आपण आरोप करतो तेव्हा तशाच प्रकारच्या गोष्टी जर आपल्या पक्षाच्या लोकांकडून होत असल्या तर त्याही मोकळेपणाने या ठिकाणी नमूद करण्याचे धैर्य त्यांच्याजवळ असले पाहिजे. मी पुनः सांगू इच्छितो की, पोलिसांच्या यंत्रणेत कोणत्याही प्रकारचे दोष नाहीत अशा प्रकारचा दावा मी कधीही केलेला नाही; परंतु विरोधी पक्षाचे लोक ज्याप्रमाणे केवळ दोषच दाखवू शकतात त्याप्रमाणे करून मला चालावयाचे नाही. असलेले दोष दूर करण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे. म्हणून मी सभागृहाला विनंती करीन की पोलिसांच्या प्रश्नाकडे त्यांनी जरा वेगळ्या दृष्टीकोणातून पाहण्याची जरुरी आहे. पोलीस ही शक्ती अशी आहे की राज्याच्या प्रशासनात तिला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. तेव्हा या शक्तीचे सामर्थ्य कोणत्याही प्रकारे कमी होणार नाही असेच प्रयत्न आपले असले पाहिजेत.

माननीय सदस्य श्री. पाटकर यांनी आपल्या भाषणात मुंबईच्या सामाजिक जीवनात अस्तित्वात असलेल्या ॲन्टी-सोशल लाइफचे वर्णन केले. मुंबईमध्ये ॲन्टी-सोशल लाइफ किंवा ज्याला आपण रेड-लाइटचे क्षेत्र म्हणतो, अस्तित्वात आहे, नाही असे नाही. आता ते किती प्रमाणात आहे याबद्दल मतभेद होण्याची शक्यता आहे. अर्थात त्याची जाणीव कमी प्रमाणावर होणे अथवा जास्त प्रमाणावर होणे ही गोष्ट प्रत्येकाच्या निरीक्षणावर आणि अनुभवावर अवलंबून आहे. परंतु असा एक एरिया मुंबईमध्ये आहे ही गोष्ट मी नाकारीत नाही. हा एक मोठा जबरदस्त प्रश्न आहे. सामाजिक प्रश्न आहे. या प्रश्नाचे ओझे किंवा त्याची संपूर्ण जबाबदारी पोलिसांच्या शिरावर टाकून आम्हाला कधीच मोकळे होता यावयाचे नाही. या सामाजिक प्रश्नाची सोडवणूक कशा प्रकारे करता येईल याचा आम्हाला जरूर विचार करावा लागेल आणि थोड्या वेळात समजावून सांगण्याइतका सोपा असा हा प्रश्न नाही. आपण सर्वजण मिळून या

बाबतीत प्रयत्न केले पाहिजेत एवढेच मला या बाबतीत सध्या सांगावयाचे आहे. हा सामाजिक प्रश्न आहे हे श्री. पाटकर यांनीही कबूल केले आहे.

श्री. पाटकर यांनी अशा प्रकारची तक्रार केली की सामान्य मनुष्याची पोलीस स्टेशनवर दाद लागत नाही. त्यांनी असेही सांगितले की कोणता मनुष्य चांगला आहे, सभ्य आहे, शीलवान आहे आणि कोणता मनुष्य असभ्य आहे, वाईट आहे याचा निर्णय पोलीस अधिकाऱ्याने तात्काळ केला पाहिजे आणि आलेला मनुष्य जर चांगला असेल, सभ्य असेल तर त्याला नीट वागणूक दिली पाहिजे. म्हणजे कोणता मनुष्य चांगला आहे हे ठरविण्याचे एक प्रकारे कॅरॅक्टर सर्टिफिकेट देण्याचे अधिकारच पोलिसांना द्यावे लागतील. ही गोष्ट जरी बाजूला ठेवली तरी मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ती अशी असते की, दोन माणसे वेगवेगळ्या कारणास्तव त्याला जर भेटावयास आली असली आणि त्यापैकी एका माणसाचे कपडे मळके असले, फाटके असले आणि दुसऱ्या माणसाचे कपडे नीटनेटके व भारी असले तर तो त्याच माणसाला पहिल्या माणसापेक्षा जास्त मान देईल, त्याचे म्हणणे जास्त सहानुभूतीने ऐकेल. श्री. पाटकरही याला अपवाद असतील असे मला वाटत नाही. एखादा पायी चालणारा मनुष्य श्री. पाटकर यांच्याकडे आला आणि त्याच वेळेस एखादा मनुष्य मोटारीत बसून त्यांना भेटावयास आला तर मोटारीत बसून आलेल्याचे म्हणणे ते प्रथम ऐकतील असे मला वाटते. अर्थात ही स्वाभाविक प्रवृत्ती आहे आणि पोलिसही याला अपवाद नाहीत. ही प्रवृत्ती फार चांगली आहे असे मी म्हणत नाही आणि पोलिसांनी अगदी निःपक्षपातीपणे आलेल्या मनुष्याचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे अशा सूचनाही त्यांना आहेत. आलेला मनुष्य कोण आहे, त्याचा सामाजिक दर्जा काय आहे यावर त्याला मिळणारी वागणूक, त्याला मिळणारा न्याय अवलंबून असता कामा नये तर त्याचे दुःख काय आहे, त्याची अडचण कोणत्या प्रकारची आहे यावरच सर्व गोष्टी अवलंबून असल्या पाहिजेत अशा आमच्या आग्रहपूर्वक सूचना आहेत. माननीय सदस्य श्री. पाटकर यांनी सांगितले की, आता पोलिस अधिकारी पूर्वीपेक्षा किती तरी सौजन्यशील वागणूक देत असतात आणि ही गोष्ट खालच्या लोकांपर्यंतही आस्ते आस्ते जाईल याची मला खात्री आहे. वरचे पोलिस अधिकारी असे वागत आहेत. ते सांगतात की आम्ही कोणाच्या बाजूचेही नाही, आम्ही मालकाच्या बाजूचेही नाही आणि बिन-मालकांच्या बाजूचेही नाही. कोणावर अन्याय होऊ नये आणि शांतता भंग होऊ नये एवढेच आम्हाला पाहावयाचे आहे.

अध्यक्ष महाराज, पनवेलहून आलेले आमदार माननीय **श्री. पाटील**[५८] यांचे भाषण मी ऐकले आणि मला हे कबूल केले पाहिजे की त्यांचे भाषण मला आवडले. गेल्या

पाच वर्षांतील त्यांच्या भाषणात आणि आजच्या भाषणात मला क्वॉलिटेटिव्ह डिफरन्स आढळला. आजचे त्यांचे भाषण आर्जवाने भरलेले आणि वकिली थाटाचे होते, राग कमी होता, संताप कमी होता. अर्थात झालेला हा फरक चांगलाच आहे. स्वागतार्ह आहे. त्यांनी आपल्या भाषणात सांगितलेल्या काही मुद्यांचा जरूर विचार करावा लागेल. उदाहरणार्थ, इन्व्हेस्टिगेशनच्या पद्धतीत काय दोष आहेत ते पाहण्याकरिता डायरेक्टर ऑफ प्रॉसिक्यूशन म्हणून एक जागा आम्ही तीन-चार वर्षांपूर्वी निर्माण केली होती आणि **श्री. बखले**[१९] यांच्यासारख्या निवृत्त न्यायाधीशाला त्या जागेवर नेमले होते. त्यांनी खूप प्रयत्न करून अत्यंत चिंतनीय असा एक अहवाल तयार केला आहे. इन्व्हेस्टिगेशनमध्ये गुणवत्ता वाढली पाहिजे हे मलाही मान्य आहे. आजची कायद्याची स्थिती अशी आहे की लॉ ऑफ एव्हिडन्समध्ये पोलिसांची परिस्थिती फारशी प्रतिष्ठेची नाही. इतर देशात ज्याप्रमाणे पोलिसांपुढे केलेले स्टेटमेंट पुराव्यात दाखल करता येते त्याप्रमाणे आपल्या येथे परिस्थिती नाही. त्यांच्यापुढे केलेले निवेदन पुराव्याच्या दृष्टीने उपयोगाचे नसते. अर्थात या गोष्टीचा परिणाम इन्व्हेस्टिगेशनवर होतो. याबाबतीत दुरुस्ती होण्याची जरूरी आहे असे मला वाटते परंतु या बाबतीत लोकमत काय आहे हे जाणून घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारची पावले उचलणे योग्य ठरणार नाही. अर्थात इन्व्हेस्टिगेशन शक्य तितके निर्दोष असावे याकरिता आम्ही जागरूक आहोत व शक्य ते प्रशिक्षण पोलिसांना देण्याचेही प्रयत्न चालू आहेत.

अध्यक्ष महाराज, कुलाबा जिल्ह्यात एक दोन ठिकाणी प्युनिटिव्ह टॅक्स लावल्याचा उल्लेख त्यांनी केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, या टॅक्सच्या उत्पन्नाला सरकार सोर्स ऑफ रेव्हिन्यू मानीत नाही. संबंधित गावच्या लोकांची तयारी असेल तर तो पैसा त्या गावातील एखाद्या सामाजिक कार्याकरिता खर्च केला जाऊ शकेल. उरण पोलिस स्टेशनची हकीगत त्यांनी सांगितली. मला हे कबूल केले पाहिजे की, उरणची परिस्थिती मोठी चिंताजनक आहे. कोणत्या वेळेस काय परिस्थिती निर्माण होईल हे सांगता येत नाही. वारंवार चिंताजनक घटना त्या भागात घडत असतात. अर्थात या बाबतीत चर्चा करण्यास मी केव्हाही तयार आहे.

एका सन्माननीय सभासदांनी सोलापूरचे उदाहरण सांगितले. वृत्तपत्रामध्ये ते सर्व प्रकरण आलेले आहे परंतु ज्याला आपण सबज्युडिस म्हणजे न्यायप्रविष्ट म्हणतो असे हे प्रकरण आहे. त्या बाबतीत पोलिस इन्व्हेस्टिगेशन चालू आहे. ह्या बाबतीत मला काही माहिती मिळाली तर मी पाहीन आणि त्यातील काही मंडळींनी रिप्रेझेंटेशन दिले किंवा गाऱ्हाणी दिली तर त्या बाबतीत मी चौकशी करीन. ह्यामध्ये कोण काँग्रेसचे होते आणि कोण काँग्रेसचे नव्हते हा प्रश्न नाही. जे काँग्रेसच्या बाहेर होते त्यांना त्रास

दिला जातो आणि आत येणारांना प्रवेश दिला जातो व त्रास होत नाही असे समजण्याचे कारण नाही. मी कोणत्या अर्थाने हे बालतो ते सन्माननीय सभासदांनी लक्षात घ्यावे. ज्याअर्थी आम्ही लोकशाहीचे तत्त्व स्वीकारले आहे त्या अर्थी एक गोष्ट उघड आहे की, त्या लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणे मतांतर करण्याचे आणि मत बदलण्याचे स्वातंत्र्य असावे. एकदा जे मत बनले ते कायमचे मत असे जर आपण म्हणू लागलो तर ह्या सरकारला कायमच राज्यावर बसावे लागणार आहे. तशी माझी इच्छा नाही. मी असे म्हणतो की, ज्यांनी आम्हाला मते दिली त्यांचे देखील मतांतर होईल आणि समोरच्या मंडळींना ज्यांनी मते दिली त्यांचे देखील मतांतर होईल. मतांतर हा लोकशाहीच्या कल्पनेचा आत्मा आहे. कोण कोण काँग्रेसमध्ये आले आणि कोण बाहेर गेले याला महत्त्व नाही. कदाचित् आज जे काँग्रेसच्या बाहेर असतील ते देखील उद्या काँग्रेसमध्ये येतील पण त्यासाठी पोलिसांची मदत घेण्याचा विचार नाही. तेव्हा ह्या प्रकरणाबाबत पोलिस इन्व्हेस्टिगेशन चालू आहे तोपर्यंत निराळ्या रीतीने इन्व्हेस्टिगेशन करता येणार नाही. पाहिजे तर दुसऱ्या चांगल्या माणसाकडून इन्व्हेस्टिगेशन करून घेता येईल. अध्यक्ष महाराज, मला आपण थोडा जास्त वेळ दिला याबद्दल मी आपला आभारी आहे. ह्या मागणीच्या चर्चेमध्ये जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते त्यातील सर्वसामान्य मुद्यांना मी उत्तर दिलेले आहे. तपशिलाबाबत काही सांगितले तर मी अधिक चौकशी करीन. तेव्हा सभागृहासमोर जी मागणी आहे ती मंजूर व्हावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

■ ■ ■

On 3rd July 1962, while getting sanction of the House for the demands for the Police department, Shri Y. B. Chavan, Chief Minister, explained Government's policy about the Police Department. He admitted that there was an increase in the number of crimes, which influenced their detection, accidents and consequent expenditure on Police. He said that crimes and accidents were the result of ever increasing population in cities like Bombay. He further said, that prohibition crimes, which took much of the time of the Police could be checked only by educating the people. He emphasised that corruption was a tendency which could be eradicated by increasing emoluments. He added that the Government had appointed the Police Commission to look into their problems and was doing everything possible to solve them. Nevertheless, he maintained that trade unionism in the police department could never be tolerated.

# श्री. लक्ष्मण गोविंद पाटील यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव *

**११ जुलै १९६२**

***कुलाबा जिल्ह्यातील एक ज्येष्ठ निष्ठावान समाज कार्यकर्ते व माजी विधानसभा सदस्य कै. श्री.ल.गो.पाटील यांस मा.श्री. चव्हाण यांनी श्रद्धांजली वाहिली.***

अध्यक्ष महाराज, १९३७ साली या सन्माननीय सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून आलेले श्री. लक्ष्मण गोविंद पाटील यांच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. श्री. लक्ष्मण गोविंद पाटील यांचा जन्म १८८६ साली कुलाबा जिल्ह्याच्या वाघराम या गावी झाला. कुलाबा जिल्ह्याचे हे एक जुने कार्यकर्ते होते. ते मूळचे शेतकरी होते. नंतर ते वकील झाले. १९०७ साली त्यांनी राजकीय कार्यकर्ता या नात्याने कामास सुरुवात केली आणि त्या सालापासूनच त्यांनी काँग्रेसचे सभासदत्व स्वीकारले. कुलाबा जिल्ह्यातील अनेक सामाजिक आणि राजकीय संस्थांशी त्यांचा संबंध आला. कुलाबा जिल्ह्यातील पहिली राजकीय परिषद त्यांनी संघटित केली आणि मराठा आग्री विद्यार्थी आश्रम नावाची संस्था सुरू केली. मागासलेल्या वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने त्यांनी या संस्थेची स्थापना केली. शेतकी सुधारणेच्या बाबतीतही त्यांनी बरीच आत्मीयता दाखविली व शेतकी क्षेत्रात प्रगती केली. १९२१ साली त्यांनी शेतकरी व मीठ खात्याचे कामगार यांचा यशस्वी संप घडवून आणल्याचाही उल्लेख आहे. त्यांनी कायदेभंगाच्या चळवळीतही भाग घेतलेला होता. १९३७ साली ते कुलाबा जिल्ह्यातून विधानसभेवर निवडून आले. ३ एप्रिल

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. VII, Part II (Inside No. 24), 11th July 1962, p. 1136.

१९६२ रोजी वयाच्या ७५ व्या वर्षी ते मरण पावले.

या सन्माननीय सभासदांशी व्यक्तिशः माझा परिचय नव्हता किंवा त्यांच्याबरोबर काम करण्याचा प्रसंगही मला आलेला नव्हता. परंतु ज्या अनेक जुन्या माणसांनी आपल्या सार्वजनिक जीवनाचा पाया घालण्याचे काम केले त्यापैकी हे एक होते. त्यांच्याविषयी कृतज्ञता नोंदविणे हे सभागृहाचे कर्तव्य आहे. त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा ठराव या सभागृहाने पास करावा आणि या सभागृहातील सभासदांच्या भावना त्यांच्या कुटुंबियांना कळवाव्यात अशी मी विनंती करतो.

On 11th July 1962, Shri Y.B.Chavan, Chief Minister, requested the House to express its sincere condolences for the death of Shri L.G.Patil who belonged to a bygone generation which considered dedication to duty as sacred as scriptures.

# मान्यवरांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव*

## १९ नोव्हेंबर १९६२

*माजी राज्यपाल डॉ. सुब्बरायन, विधानसभा सदस्य डॉ. एस.बी.मांजरेकर व श्री. एम.टी.ठाकरे व माजी विधान परिषद सदस्य सर कावसजी जहांगीर यांच्या निधनाबद्दल या सर्व मान्यवरांसंबंधी गौरवोद्‌गार काढून मा. यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या कुटुंबियांना सांत्वनपर संदेश पाठवावे असे म्हटले.*

---

अध्यक्ष महाराज, आपल्या राज्याचे माजी राज्यपाल डॉ. सुब्बरायन हे आपल्या राज्याचे राज्यपाल असताना कालवश झाले आणि म्हणून त्यांच्या दुःखद निधनाबद्दल आपल्या ज्या भावना आहेत त्या व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आहे असे मी समजतो. कै. डॉ. सुब्बरायन हे जुन्या पिढीतील एक अत्यंत कर्तबगार आणि बुद्धिमान ॲडव्होकेट म्हणून मद्रास राज्यात पहिल्या प्रथम प्रसिद्धीस आले. त्यानंतर ते कॉन्स्टिट्युअंट असेंब्लीचे सभासद झाले. विशेषतः अलीकडच्या काळात केंद्र सरकारच्या वाहतूक खात्याचे मंत्री म्हणून त्यांचे नाव गाजले, हे सर्वांना माहीत असेलच. गेल्या सार्वत्रिक पार्लमेंटचे सभासद म्हणून निवडून आल्यानंतर पुढे महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून त्यांचे नाव सुचविण्यात आल्याबरोबर मोठ्या आनंदाने त्यांनी हे पद विभूषविण्याचे कबूल केले. असे एक थोर राजकारणी पुरुष आपल्या राज्याला राज्यपाल म्हणून लाभल्यामुळे त्यांच्या अनुभवाचा आपल्याला फायदा मिळेल अशी अपेक्षा सर्वांनी केली होती. परंतु माणसाच्या मनात एक असते आणि नियतीच्या मनात निराळेच असते असे पुष्कळ वेळा आपल्याला आढळून येते. येथे आल्यापासूनच त्यांचे प्रकृतिस्वास्थ्य ढासळू लागले आणि म्हणून विश्रांतीसाठी ते मद्रासला गेले. परंतु विश्रांतीसाठी म्हणून

---

* Maharashtra Legislative Assembly Debates, Vol. VIII, Part II, 19th November 1962, p. 31 to 33

ते जे मद्रासला गेले ते परत येथे येऊ शकले नाहीत. तेथेच ते कालवश झाले आणि त्यामुळे त्यांच्यासारखा एक थोर राजकारणी पुरुष आपल्या राज्याला राज्यपाल म्हणून लाभल्यामुळे आपल्या राज्याला त्यांच्या अनुभवाचा फायदा मिळेल अशी जी आशा आपल्या मनात निर्माण झाली होती ती नष्ट झाली.

डॉ. सुब्बरायन यांची कारकीर्द विविध तऱ्हेची होती. त्यांचा जन्म ११ सप्टेंबर १८८९ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक व कॉलेजचे शिक्षण हे मद्रास राज्यातच झाले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ऑक्सफर्डला गेले. त्यानंतर ते मद्रास लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद म्हणून बिनविरोध निवडून आले. त्यापूर्वीसुद्धा १९२६ ते १९३० या कालात ते मद्रासचे मुख्यमंत्री होते. ते हिंदुस्थानात व हिंदुस्थानच्या बाहेर जे प्रसिद्धीस आले ते त्यांना क्रिकेटच्या कलेबद्दल जे ज्ञान होते त्यामुळे आले. क्रिकेटच्या खेळाचे ज्ञान हे अष्टपैलू होते आणि म्हणूनच त्यांना क्रिकेट बोर्ड ऑफ कंट्रोलचे अध्यक्ष नेमण्यात आले होते. त्यामुळेच ते हिंदुस्थानातच नव्हे तर हिंदुस्थानच्या बाहेरसुद्धा मशहूर झाले. त्यांचे जीवन हे एका अर्थाने यशस्वी झाले असे म्हटले पाहिजे. त्यांच्या स्वतःच्या घरात विविध मतप्रणालीची माणसे होती. विविध मतप्रणालीची माणसे एकाच कुटुंबात सुखासमाधानाने कशी नांदू शकतात याचा त्यांचे घर हा एक उत्कृष्ट नमुना होता. आपल्या कुटुंबियांशी विविध विषयांवर चर्चा करताना ज्यांनी त्यांचे विचार ऐकले असतील त्यांना निश्चित आनंद वाटल्याशिवाय राहिला नसेल. त्यांची सहचारिणी हीसुद्धा एक कर्तबगार स्त्री होती. त्यांची पत्नी वारल्यानंतर तिच्या वियोगाचा धक्का त्यांना सहन झाला नाही असे दिसते. तिच्या वियोगामुळे त्यांचे मन अत्यंत दुःखीकष्टी झाले. ती निवर्तल्यानंतर त्यांचे सांत्वन करण्यासाठी त्यांची मित्रमंडळी त्यांच्याकडे गेली असताना त्यांनी त्यांच्या दिवाणखान्यात असलेल्या पत्नीच्या निर्जीव पुतळ्याकडे बोट दाखवून सांगितले की तिच्या वियोगामुळे मी किती दुःखी झालो आहे ते तिच्या पुतळ्याला विचारा. अशा तऱ्हेने ते एकपत्नित्वाचे एक आदर्श होते असे दिसून येते. असा दुर्लभ माणूस आपल्याला लाभला होता परंतु आपल्या दुर्दैवाने त्यांच्या अनुभवाचा लाभ फार वेळ मिळू शकला नाही. तेव्हा त्यांच्या निधनामुळे सबंध महाराष्ट्रातील जनतेला जे दुःख झालेले आहे ते या प्रातिनिधिक सभागृहामार्फत त्यांच्या परिवाराला कळविण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

डॉ. श्रीधर बाळकृष्ण मांजरेकर यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील बांदिवडे या गावी झाला. तेथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते मुंबईला आले आणि तेथे त्यांनी एल.सी.पी.एस.चा डिप्लोमा

मिळविला. पहिल्या प्रथम त्यांनी मुंबईत प्रॅक्टिस सुरू केली. परंतु नंतर १९४० मध्ये ते रत्नागिरीमध्ये गेले आणि तेथे त्यांनी प्रॅक्टिस सुरू केली व लौकरच ते लोकप्रिय डॉक्टर झाले. त्यानंतर ते मालवण म्युनिसिपल कमिटीवर निवडून आले व त्यानंतर ते ६ ते ७ वर्षे त्या म्युनिसिपल कमिटीचे अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे भंडारी एज्युकेशन सोसायटी, मालवण या संस्थेचे सुद्धा ते अध्यक्ष होते आणि अखेरपर्यंत त्यांनी त्या संस्थेचे काम पाहिले. या संस्थेच्या प्रगतीसाठी त्यांनी शेवटपर्यंत अत्यंत परिश्रम घेतले. ते १९५७ साली मालवण तालुक्यातून महाराष्ट्र विधानसभेचे एक सदस्य म्हणून निवडून आले. त्यांनी या सन्माननीय सभागृहात फारशी भाषणे केली नाहीत. परंतु ते जरी अबोल असले तरी आपल्या कामावर मात्र त्यांची अढळ श्रद्धा होती. त्यांच्या निधनामुळे आपल्याला जे दुःख झाले आहे ते त्यांच्या परिवाराला कळविण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. महादेव तुकाराम ठाकरे ह्यांचा जन्म १९१६ साली झाला. सन १९३६ पासून शेवटपर्यंत ते काम करीत राहिले होते आणि विशेषतः विदर्भ आणि वर्धा जिल्ह्यात त्यांनी काम केलेले आहे. वर्धा जिल्हा लोकल बोर्डाचे ते सन १९३८ ते ४० पर्यंत उपसभापती होते. सन १९५२ ते ५७ पर्यंत ते मध्य प्रदेश विधानसभेचे सभासद म्हणून काम करीत होते आणि त्यानंतर १९५७ पासून १९६१ पर्यंत ते मुंबई आणि महाराष्ट्र विधानसभेचे सभासद म्हणून राहिले. शेवटपर्यंत ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे चिटणीस म्हणून राहिले. खरोखरच कार्यकर्ता कसा असावा हे जर आपणास पाहावयाचे असेल तर आपण श्री. ठाकरे यांच्या जीवनाकडे पाहिले पाहिजे. त्यांचे जीवन अत्यंत त्यागमय होते. त्यांच्या त्यागी जीवनाची कल्पना आम्हाला त्यांच्या मृत्यूनंतर आली हीच दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आर्थिक परिस्थितीची जी माहिती मिळाली त्यावरून त्यांनी स्वतःसाठी अथवा स्वतःच्या कुटुंबासाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतूद करून न ठेवल्याचे दिसून आले आणि त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाची आणि खाण्यापिण्याची काय सोय करावी असा प्रश्न उपस्थित झाला. त्यांनी आपल्या आयुष्यात स्वतःविषयी कधीच विचार केला नाही. समाजसेवक जर असावा तर असा असावा. त्यांचे जीवन अत्यंत त्यागमय होते. ते कोणत्याही वेळी भेटायला आले असताना आपल्या स्वतःबद्दल कधी बोलत नसत. त्यांनी आपल्या स्वतःच्या अडचणी कधीच दुसऱ्यासमोर मांडल्या नाहीत. शेवटपर्यंत काम करीत असतानाच त्यांना मुंबई येथे मृत्यू आला. त्यांच्या मृत्यूमुळे सबंध राज्याचे आणि विशेषतः वर्धा जिल्ह्याचे नुकसान झालेले आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही

सर्व लोक सहभागी आहोत.

सर कावसजी जहांगीर ह्यांच्या निधनामुळेही आपले फार नुकसान झालेले आहे. त्यांचा जन्म मुंबई येथे सन १८७९ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण प्रथम मुंबईला आणि नंतर सेंट जॉन्स कॉलेज, केंब्रिज येथे झाले. ब्रिटिश राजवटीच्या काळातही ते एक फार थोर आणि प्रख्यात व्यक्ती म्हणून प्रसिद्ध होते.

त्यांनी आपले सार्वजनिक जीवन सन १९०४ पासून सुरू केले आणि प्रथम सन १९०४ मध्ये ते मुंबई कॉर्पोरेशनचे सभासद झाले. आणि तेव्हापासून त्यांच्या सार्वजनिक कार्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झालेली आहे. मुंबई कॉर्पोरेशनच्या कार्यात त्यांनी जवळ जवळ १७ वर्षे सक्रिय भाग घेतला आणि त्याच बरोबर इतर अनेक कार्यांशी त्यांचा संबंध आला. सन १९१४-१५ साली ते कॉर्पोरेशनच्या स्टँडिंग कमिटीचे चेअरमन होते आणि त्यानंतर सन १९१९-२० साली ते मुंबई कॉर्पोरेशनचे अध्यक्ष झाले. सन १९२१ आणि १९२३ साली ते मुंबई विधान परिषदेचे सभासद म्हणून निवडून आले एवढेच नव्हे तर सन १९२१ ते १९२३ पर्यंत ते त्यावेळच्या मुंबई राज्याच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर सभासद होते. त्यांनी सन १९३०-३१ व सन १९३३ साली लंडनमध्ये राउंड टेबल कॉन्फरन्सही अटेंड केली होती. सन १९३३ मध्ये लंडन मोनॅटरी आणि इकॉनॉमिक कॉन्फरन्ससाठी भारताचे प्रतिनिधी म्हणून त्यांना लंडनला पाठविण्यात आले होते. आर्थिक क्षेत्रातील त्यांची कामगिरीही उल्लेखनीय आहे. मुंबईच्या अनेक व्यापारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध आलेला आहे. मुंबईला शहरात एक कलाप्रेमी म्हणूनही ते प्रसिद्ध होते. कलाक्षेत्रातील त्यांनी अनेक महत्त्वाची पदे भूषविली आहेत. सन १९१४ मध्ये ते बॉम्बे आर्ट सोसायटीचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. सन १९५५ मध्ये रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ ब्रिटिश आर्टिस्ट्स ह्या संस्थेचे सभासदत्व लाभलेले ते पहिले भारतीय होत. कलेचे ते उपासक होते आणि कलेविषयी त्यांना विशेष आस्था होती. मुंबई शहरातील कलाविषयक गोष्टींशी त्यांचा कोणत्या ना कोणत्या प्रकारे संबंध येतच राहिला आहे.

माझा त्यांचा संबंध सन १९५५ नंतर विशेषकरून आला आणि सन १९६० साली महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्र राज्याला सर्व पार्शी जमातीचा संपूर्ण पाठिंबा दर्शविण्यासाठी त्यांनी एक समारंभ आयोजित केला होता. त्या समारंभास मी हजर होतो आणि त्यांची तब्येत बरी नसतानाही ते संपूर्ण समारंभ संपेपर्यंत माझ्या शेजारी बसून होते. आणि हा समारंभ संपेपर्यंत मी हालणार नाही असे ते माझ्याजवळ बोलले होते. महाराष्ट्र राज्याबाबत पार्शी समाजाची निष्ठा आणि सद्भावना व्यक्त करण्यासाठी

त्यांनी जो समारंभ आयोजित केला, त्यांची ती सद्भावना मी येथे व्यक्त केली पाहिजे. त्यांच्या निधनामुळे आपण मुंबईतील एका थोर कलोपासकाला आणि कर्तबगार व्यक्तीला मुकलो आहोत.

ह्या चारही व्यक्तींच्या निधनामुळे आपले नुकसान झालेले आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ह्या आमच्या भावना त्यांच्या कुटुंबियांपर्यंत आपल्याला पोहचविल्या पाहिजेत.

Shri Y.B.Chavan, Chief Minister, paying glowing tributes to Dr. P. Subbarayan, ex-Governor of Maharashtra, and other three ex-Members of the Assembly and Council, namely, Dr.S.B.Manjrekar, Shri M.T.Thakare and Sir Cowasji Jahangir suggested that the House should convey its sincere condolences to the bereaved families.

# गौरवोद्‌गारांबद्दल कृतज्ञता*

## १९ नोव्हेंबर १९६२

*संरक्षण मंत्रीपदाची सूत्रे हाती घेण्यासाठी दिल्लीस जाण्याच्या प्रसंगी सभागृहाने त्यांच्या कारकीर्दीचा गौरवपूर्ण शब्दांनी उल्लेख केला त्याबद्दल मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या भाषणात कृतज्ञता व्यक्त केली.*

अध्यक्ष महाराज, या प्रस्तावावर भाषण करताना मला जरा अवघडल्यासारखे होत आहे. या प्रस्तावावर जेव्हा भाषणे होत होती तेव्हा ती ऐकताना मला बरे वाटत नव्हते असे मी कसे म्हणू, कारण तसे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून होईल. आज मी सभागृहात जो उपस्थित राहिलो आहे तो दिल्लीला जाण्यापूर्वी या सभागृहाला अभिवादन करून जावे याच एका भावनेने प्रेरित होऊन उपस्थित राहिलो आहे. गेल्या सोळा वर्षांपासून मी या सभागृहात बसत आहे, येथे काम केले आहे. या कालावधीत माझी स्वतःची बसण्याची जागा अधिकारानुसार, कर्तव्यानुसार बदलत राहिली. परंतु १९४६ साली जेव्हा मी प्रथमतः या सभागृहात सदस्य या नात्याने प्रवेश केला तेव्हा एका छोट्या क्षेत्रात काम करणारा एक छोटासा कार्यकर्ता या नात्याने बुजऱ्या मनाने केलेला तो प्रवेश होता. आज या सभागृहातून बाहेर पडताना माझ्या मनात स्वतःबद्दल आत्मविश्वास जरूर आहे, परंतु ज्या बुजऱ्या मनाने मी या सभागृहात प्रवेश केला होता त्याच बुजऱ्या मनाने अधिक विशाल क्षेत्रात या संकटकालात मी प्रवेश करणार आहे. अध्यक्ष महाराज, या सभागृहातील प्रत्येक गोष्टीवर, प्रत्येक वस्तूवर माझे प्रेम आहे. येथे झालेले वाद, विवाद, झालेल्या चर्चा, येथे झालेली भाषणे, येथे येऊन

* Maharashtra Legislative Assembly Debates. Vol. VIII, Part II, 19th November 1962. pp. 53-54.

माझ्यावर रागावून बोलणारी, प्रेमाने बोलणारी माणसे, या सर्वांवर माझे प्रेम आहे. लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या मनुष्याच्या मनात असे प्रेम निर्माण होणे स्वाभाविक आहे असे मला वाटते. नव्या नव्हाळीचे प्रेम जसे उत्कट असते त्याचप्रमाणे हे प्रेमही उत्कट आहे. म्हणून येथून जाताना माझ्या मनात जे थोडेसे दुःख सलत आहे ते याच प्रेमामुळे. हे सभागृह ही एक अशी जागा आहे की जेथे आम्ही वाद केले, मित्र जोडले, चुका केल्या, चांगली कामे केली. इतिहास घडविला असे हे स्थान आहे. समाजजीवन घडविणारी अशी ही जागा आहे. अशा सभागृहातून जाताना विरह भावना मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. जाता जाता एक गोष्ट सांगणे मला आवश्यक वाटते. नकळत माझ्याकडून काही चुका झाल्या असतील, कोणाकडे दुर्लक्ष झाले असेल, कोणी दुखावले गेले असतील तर त्या सर्वांची मी माफी मागतो. वस्तुतः कोणाचाही अवमान करावा असा माझा स्वभावधर्म नाही, आणि तसे हे ठिकाणच नव्हे. लोकशाही जीवन सुफलित करण्याचे हे एक पवित्र तीर्थ आहे. या जागेवर भाषण करताना मी माझ्या दृष्टीसमोर नेहमी हीच गोष्ट ठेवलेली आहे. हेतुतः कोणालाही दुखविण्याचा उद्देश नसतानाही नकळत तसे काही झाले असल्यास त्याबद्दल मी माफी मागतो. आज माझ्याबद्दल ह्या सभागृहात ज्या भावना व्यक्त करण्यात आल्या त्यांची मला जाणीव आहे. ती जाणीव नसती तर मी गेलोच नसतो. मी जो जात आहे तो माझ्या वैयक्तिक सामर्थ्याच्या जोरावर जात नाही. देशाच्या संरक्षणाच्या कामासाठी नेत्याची हाक आली तर तिला उत्कटतेने साद देणे हा आमचा स्वभाव आहे. ही आमची परंपरा आहे, येथील मातीतच तो गुण आहे. याच मातीत आम्ही रांगलो आणि रंगलोही जास्त. वीरश्रीच्या भावना व्यक्त करण्याचे हे स्थळ नव्हे परंतु तरीही मला सांगावेसे वाटते या मातीत रंगलेला मनुष्य समोरच्या शत्रूला माती चारल्याशिवाय परत येणारा नव्हे. या आत्मविश्वासानेच मी जात आहे. एका अगदी अनोळखी क्षेत्रात जात आहे. ज्याच्याशी सामना द्यावयाचा आहे तो शत्रूही अवसानघातकी परंतु विश्वासघातकी जरूर आहे, जबरदस्त आहे. परंतु मला आत्मविश्वास वाटतो कारण तुम्हा सर्वांचे सामर्थ्य हेच माझे सामर्थ्य आहे. या सभागृहात आपल्यासंबंधात झालेली अशी भाषणे ऐकावयाला मिळतील असे मला वाटले नव्हते. वस्तुतः स्तुतिपर जी भाषणे होतात ती आपल्यानंतर होतात तसा आपला अनुभव असतो, परंतु आता झालेली भाषणे मी याची देही याच कानी स्वतः ऐकली आहे. १९४२ साली ज्या भावनेने माझे घर सोडले त्याच मनःस्थितीमध्ये मी आज आहे. मी अशी विनंती करीन की, मला ज्या प्रेमाने वागविले ते कायम ठेवा. महाराष्ट्र राज्याचे भावी मुख्यमंत्री **श्री. कन्नमवारजी**[६०] माझ्या

शेजारी बसलेले आहेत. त्यांच्यावरही तितक्याच प्रेमाचा आणि विश्वासाचा वर्षाव होऊ द्या. आपण ह्या ठिकाणी माझ्याबद्दल ज्या सद्भावना व्यक्त केल्या त्याबद्दल आभार मानून मी माझे भाषण पुरे करतो.

■ ■ ■

---

Before leaving for Delhi, to take charge of the post of the Defence Minister of India, in reply to the appreciative references to his services in Maharashtra, Shri Chavan, Chief Minister, expresed his gratitude to all the members for their co-operation during his tenure of 16 years and expected the same love and affection from them in future.

# भाग २

# विधानसभेतील भाषणे

# मुंबई विधान सभेचे पावसाळी अधिवेशन नागपूर येथे भरविण्याबाबतचा प्रस्ताव*

**१६ ऑक्टोबर १९५८**

*राज्य विधान सभेचे पावसाळी अधिवेशन नागपूर येथे भरविण्यासंबंधीच्या प्रस्तावाला मा.श्री. चव्हाण यांनी विरोध केला. प्रस्ताव फेटाळला गेला.*

---

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद **श्री. भिडे** [६१] यांच्या ठरावाबाबत बोलावयाचे तर मराठीतील म्हणीप्रमाणे त्यांनी शिळ्या कढीला ऊत आणला आहे. काही लोकांना शिळी कढी आवडत असेल तर त्याला माझी हरकत नाही, पण ह्या प्रश्नाकडे पाहण्याची माझी जी दृष्टी आहे ती मी सभागृहापूढे ठेवू इच्छितो.

ह्या प्रश्नाकडे आपण कोणत्या दृष्टीकोनातून पाहणार हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हा ठराव मांडताना आपण द्विभाषिक कसे चालू राहील याचा विचार केलेला नाही, ही गोष्ट सन्माननीय सभासद श्री. भिडे यांनी कबूल केली यामुळे मला एक प्रकारे बरे वाटले, कारण त्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली, पण त्यांचा आणि माझा जो मतभेद होतो तो नेमका ह्याच बाबतीत होतो की, ते ह्या प्रश्नाकडे द्विभाषिकाच्या बाजूने पाहात नाहीत तर मी हे द्विभाषिक चालविण्याला जबाबदार असल्यामुळे हे द्विभाषिक कसे व्यवस्थितपणे चालेल ह्या दृष्टीने ह्या प्रश्नाकडे पाहातो. ह्या प्रश्नाच्या बाबतीत नागपूरकरांच्या आणि एकंदरीत विदर्भीय जनतेच्या काही भावना आहेत आणि त्या महत्त्वाच्या आहेत एवढ्यापुरता त्यांच्यामध्ये आणि माझ्यामध्ये काही मतभेद नाही. मुंबई राज्याच्या १४ कोटीच्या बजेटमध्ये जर दोन राजधान्या होत्या तर ११० कोटीच्या

---

* B.L.C. Debates, Vol. VI, Part II, Aug.-Oct. 1958, pp. 837 to 840.

बजेटमध्ये किती राजधान्या असाव्यात असा हिशोब करण्याचा हा प्रश्न नाही. खरा प्रश्न असा आहे की, हे राज्य चालविण्याची जबाबदारी ज्यांनी आपल्या अंगावर घेतली आहे त्यांच्या दृष्टीने अनेक ठिकाणी असेंब्लीची अधिवेशने घेणे हे कितपत सोईचे होईल ? मी नागपूर कराराचा एक भागीदार आहे असे येथे सांगण्यात आले, पण हे सांगताना त्यानंतर जी परिस्थिती बदलली ती सन्माननीय सभासदांनी लक्षात घेतली नाही. भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वावर संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याची मागणी महाराष्ट्रीय जनतेकडून करण्यात आली होती, व तसे झाले तर राज्यकारभार चालविण्याच्या दृष्टीने त्या कराराला मी संमती दिली होती. पण आता त्या करारामागील संयुक्त महाराष्ट्राची पार्श्वभूमी बदलल्यानंतर त्या अर्थाने मी त्या कराराला बांधलेला नाही असे मी समजतो. नागपूरला अधिवेशन भरविणे किंवा त्यामागे असलेल्या भावनेचे महत्त्व कमी करण्याची माझी इच्छा नाही. सन्माननीय सभासद **श्री. दोंदे**[६२] यांनी एक मुद्दा असा उपस्थित केला की राज्यकारभाराच्या दृष्टीने लहान राज्य चांगले की मोठे राज्य चांगले ? ह्या बाबतीत जर कोणती कसोटी लावावयाची असेल तर ती माझ्या दृष्टीने ही आहे की, राज्यशासन ज्या प्रतिनिधींच्या मार्फत चालावयाचे ते प्रतिनिधी आणि जनता यांचा संपर्क ज्या प्रकारच्या राज्यात राहील ते राज्य चांगले. लोकशाहीच्या राज्यामध्ये ह्या शिवाय दुसरी कोणती कसोटी चांगल्या राज्यासाठी असू शकत नाही. सन्माननीय सभासद श्री. दोंदे यांनी रुलर्स आणि रुल्ड असा शब्दप्रयोग केला, पण लोकशाहीच्या राजवटीत मी हा शब्दप्रयोग वर्ज्य समजतो, कारण लोकशाहीमध्ये राज्यकर्ते आणि जनता यांचे संबंध रुलर्स आणि रुल्ड अशा स्वरूपाचे नसतात. एस्.आर्.सी. रिपोर्टातील काही सिद्धांतही सन्माननीय सभासदांनी येथे मांडले, परंतु एस्.आर्.सी.च्या सिद्धांताशी आज काही संबंध राहिलेला नाही, व म्हणून एस्.आर्.सी.च्या तत्त्वांचा उल्लेख करून आजच्या प्रसंगी चर्चा करावी असे मला वाटत नाही. आज हे राज्य चालवीत असताना आपल्याला जर प्रामुख्याने कोणता विचार करावयाचा असेल तर हे राज्य चालवीत असताना कोणत्याही प्रकारची अडचण न येताना लोक-कल्याणाकरिता काम करण्यासाठी आपण कसे समर्थ होऊ हा आहे. मी सुरुवातीला सांगितलेली कसोटी लावून जी जबाबदारी आपण अंगावर घेतली आहे ती जबाबदारी कशी पार पाडता येईल ह्या दृष्टीने ह्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे.

आता नागपूरला अधिवेशन भरविण्यात यावे अशी मागणी करीत असताना नागपूरला जे काही महत्त्व आहे असे सन्माननीय सभासदांचे म्हणणे आहे तितकेच

महत्त्व राजकोटला असू शकते. त्याचप्रमाणे बडोदा शहराला गेल्या १५०-२०० वर्षांचा इतिहास असल्यामुळे त्या शहराला महत्त्व आहे असे कोणी म्हटले तर शक्य आहे. औरंगाबाद शहर हे मध्यस्थानी असल्यामुळे तेथे अधिवेशन भरविण्यात आले तर ते सर्वांना सोईचे होईल असेही कोणी म्हणेल, व या सर्वांहूनही पुण्याचा ह्या बाबतीतला हक्कही मागे पडण्याचे कारण नाही. पण अध्यक्ष महाराज, खुद्द पुण्याला अधिवेशन भरत होते त्याबाबतसुद्धा अशी गोष्ट आहे की, पुण्याला अधिवेशन भरविले जाते ते बंद करावे अशी मागणी ह्याच सभागृहात करण्यात आली होती. तेव्हा ह्या प्रत्येक शहराला ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक परंपरा आहे म्हणून जर तेथे एक अधिवेशन भरविण्याचे ठरविले तर ते कितपत व्यवहार्य होईल याचा आपल्याला विचार केला पाहिजे.

व्यवहाराच्या दृष्टीने पाहिले तर ज्या ठिकाणी राज्यकारभाराचे मुख्य केंद्र म्हणजे सेक्रेटेरिएट असते तेथे जर अधिवेशन भरविले तर येथे अधिवेशनासाठी जे जनतेचे प्रतिनिधी येतात त्यांना हवी असलेली माहिती ताबडतोब मिळू शकते. राज्यकारभार पाहणारे मंत्री आणि जनतेचे प्रतिनिधी यांचा संबंध सातत्याने येतो आणि ज्या अडचणी असतील त्या शक्य तितक्या तातडीने सुटू शकतात. म्हणून माझे असे मत आहे की, ह्या बाबतीत राजधानीची कल्पना आणून चालणार नाही. शिवाय एखाद्या ठिकाणी अधिवेशन भरविण्यात आले म्हणजेच त्या शहराचे महत्त्व मान्य झाले असेही म्हणता येत नाही. नागपूर शहराचे महत्त्व मंजूर करूनसुद्धा आणि त्यामागे असलेले इतर नैतिक हक्क मान्य करूनसुद्धा राज्यकारभाराच्या सोईच्या दृष्टीने नागपूरला अधिवेशन भरविण्याला मी संमती देऊ शकत नाही.

एका सन्माननीय सभासदांनी असे सांगितले की, नागपूरला सभासदांसाठी जे रेस्ट हाऊस आहे ते येथल्या मॅजेस्टिक हॉटेलपेक्षा किती तरी पटींनी चांगले आहे, पण अध्यक्ष महाराज, मुंबईत रेस्ट हाऊस बांधण्याचे काम सरकारने पुरे केल्यानंतर सन्माननीय सभासदांना मुंबईच बरी असे वाटू लागेल असा मला विश्वास आहे. तेव्हा मला एवढेच सांगावयाचे आहे की, केवळ एखादा प्रश्न निर्माण करून त्यावर चर्चा करावयाची एवढाच सन्माननीय सभासदांचा हेतू असेल तर त्याचा व्यवहाराच्या दृष्टीने काही उपयोग नाही. विरोधी पक्षाचा आणि सरकारचा ह्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच मूलतः भिन्न आहे. ह्या सरकारला हे द्विभाषिक चालवावयाचे आहे, ते मोडावयाचे नाही. हे राज्य मोडण्याच्या अपेक्षा जे लोक करीत असतील त्यांना मी एवढेच सांगू शकतो की, त्यांचे ते एक वुईशफुल थिंकिंग आहे, त्यांना पाहिजे तर त्यांनी तसा विचार करावा, पण मी ह्या बाबतीत त्यांच्याशी सहमत होऊ शकत नाही.

तेव्हा सन्माननीय सभासद श्री.भिडे यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो. हा ठराव मागे घेण्यास त्यांची तयारी नसेल तर माझा ह्या ठरावाला विरोध आहे एवढे सांगून मी रजा घेतो.

■ ■ ■

Shri Y. B. Chavan, Chief Minister, in his speech on 16th October opposed a resolution moved by an opposition member requesting Government to hold a Session of the Bombay Legislature in Nagpur. He justified his opposition to the resolution with cogent arguments. The resolution was lost.

# सीमाप्रदेश वाद *

## २२ जुलै १९६०

*वरील विषयावर बोलताना मा. श्री. चव्हाण म्हणाले की सीमा प्रदेशाचा तंटा महाराष्ट्र-म्हैसूर पुरताच मर्यादित असून, महाराष्ट्राने पाटसकर फॉर्म्युला स्वीकारला असल्याने संघर्षाची भाषा उचित ठरणार नाही.*

---

अध्यक्ष महाराज, ह्या ठरावावर जी अनेक भाषणे झाली त्याच्यामागचा त्याचा प्लॅटफॉर्म मला मंजूर आहे. विशेषतः हा ठराव मांडणारे श्री. ओगले यांनी ठरावावर बोलताना विषयाची मांडणी अत्यंत विचारपूर्वक आणि भावनात्मक रीतीने केली आहे. तेव्हा ह्या ठरावामागचा त्यांचा सद्‌भाव मला मंजूर आहे. पण त्याच्यामागे असलेली त्यांची तर्कबुद्धी मला मान्य नाही. अध्यक्ष महाराज, मला माफ करा कारण मी जरा स्पष्टपणे बोलत आहे. कोणाला गैरशहाणे म्हणावे असे मला वाटत नाही. मला असे सुचविण्यात आले की ह्याबाबतीत त्यांचे आणि आमचे एकमत असल्यामुळे हा ठराव मागे घेण्याची विनंती मी त्यांना करू नये. त्यांनी जरी अशी विनंती केली असली तरी ती विनंती स्वीकारावयाची की नाही हा माझा प्रश्न आहे. ह्या ठरावात जो आवश्यक भाग आहे तो त्यांनी काढून टाकला असता आणि जर अशी विनंती केली असती तर कदाचित् मी त्या विनंतीचा विचार केला असता. उदाहरणार्थ, हा ठराव मांडणाऱ्यांनी आणि **श्री. गोगटे**[६३] यांनी मध्यप्रदेशचा उल्लेख केला आहे. ज्याबद्दल उल्लेख करावयाचा त्याबद्दल त्यांनी काही माहिती गोळा करून सभागृहापुढे मांडली असती तर मी समजू शकलो असतो. पण तसे न करता अशा विषयांचा उल्लेख केल्यामुळे

---

* B.L.C.Debates. Vol. I, Part II, 22nd July 1960. pp. 490 to 494

आपण नसलेले प्रश्न उपस्थित करतो याचा त्यांनी थोडासा विचार करावयास हवा होता. मूळ प्रश्न बेळगावचा म्हणजे महाराष्ट्र आणि म्हैसूर राज्यातील सीमेसंबंधीचा आहे आणि त्याचसंबंधाने प्रामुख्याने खालच्या सभागृहात ठराव संमत झालेला होता पण त्या प्रश्नाबरोबरच मध्यप्रदेश आणि गुजरातच्या सीमेचा प्रश्न उपस्थित केल्यामुळे जे नवीन प्रश्न निर्माण होतात त्यामुळे किती दूरवर परिणाम होतील यासंबंधीची जाणीव हा ठराव मांडणाऱ्यांमध्ये मला कमी दिसली. अध्यक्ष महाराज, ह्या विषयावर एक चांगले भाषण करावयाचे एवढेच काम असले तर मीही चांगले भाषण करू शकेन, पण प्रश्न असा आहे की, नुसते भाषण केल्यामुळे आपल्यापुढे जो प्रश्न आहे तो सुटण्याऐवजी जर जास्त गुंतागुतीचा होणार असेल तर त्यात काही अर्थ नाही. मध्यप्रदेशाविषयी आज असा काही प्रश्न उपस्थित करावा असे मला वाटत नाही. मुख्य प्रश्न आहे तो असा आहे की, बेळगावचा जो प्रश्न आहे तो आपल्याला सोडवावयाचा आहे. तो सोडविण्यासाठी काय केले पाहिजे व याबाबत जर कोणाला सूचना करता आल्या आणि त्या जर व्यवहार्य असल्या तर ह्या प्रश्नाची मर्यादा सांभाळून त्या सूचना केल्या पाहिजेत. बेळगावसंबंधी म्हणजेच महाराष्ट्र आणि म्हैसूर राज्याच्या सीमेसंबंधी मी खालच्या सभागृहात ठराव मांडला त्या वेळीही मी सांगितले होते की, आम्हाला काही मर्यादा सांभाळून हा प्रश्न सोडवावयाचा आहे. ह्या ठरावात मध्यवर्ती सरकारला हा प्रश्न सोडविण्यासाठी एक कमिशन नेमण्याची विनंती करावी, अशी मागणी केली आहे. कमिशन एक काय पण दहा नेमता येतील, पण ज्या प्रश्नाचा विचार आधीच चालू आहे त्याच्यासाठी आणखी कमिशन नेमून आपला हेतू कसा काय साध्य होणार आहे हे मला समजत नाही. बेळगावचा प्रश्न जरी घेतला तरी तेथील जनतेला, भावनाविवश करणारी भाषणे आणि घोषणा करून, मी संकटात टाकू इच्छित नाही. बेळगावचा प्रश्न सुटला पाहिजे असे म्हणत असताना आम्ही काहीतरी मोठे करावयास निघालो आहोत अशी माझी भावना नव्हती. त्याचबरोबर ह्या प्रश्नासंबंधाने माझ्या मनात तीव्रता कमी आहे असेही नाही. पण चळवळीच्या घोषणा आणि गोष्टी बोलून, एवढेच होते की,आम्ही येथे सुखात राहातो आणि तेथील जनतेला मात्र संकटात टाकतो. अशा प्रकारची भूमिका काँग्रेस पक्षाला आणि मला मान्य नाही. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, हा प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या चळवळी आणि घोषणा असंबद्ध आहेत.

अध्यक्ष महाराज, हा प्रश्न मुख्यतः दोन राज्यांच्या मधला आहे आणि साहजिकच तो प्रश्न दोन राज्यांच्या विचाराने आणि तडजोडीने सुटला पाहिजे, अशी ह्या शासनाची

दृष्टी आहे, हिंदुस्थानच्या शासनाची दृष्टी आहे. तेव्हा ह्या प्रश्नासंबंधाने ह्या बाजूच्या सभासदांना किंवा त्या बाजूच्या सभासदांना कितीही तीव्रता वाटत असली तरी मी वर सांगितलेल्या मर्यादेबाहेर जाऊन जर कोणी सूचना केली तर ती मी स्वीकारू शकत नाही. कारण काही झाले तरी ह्या राज्यशकटातील एक जबाबदार व्यक्ती ह्या नात्याने मला माझी जबाबदारी सांभाळली पाहिजे. ज्या रणक्षेत्रावर आपण जनतेला घेऊन जाणार त्या रणक्षेत्राची जर आपल्याला माहिती नसेल तर जनतेला तेथे नेण्याची जबाबदारी मी स्वीकारू शकणार नाही. आणि म्हणून आमच्या पुढे हा स्वच्छ मार्ग असा आहे की, म्हैसूर सरकार व महाराष्ट्र सरकार आणि म्हैसूरची जनता आणि महाराष्ट्राची जनता यांनी हिंदुस्थान सरकारचे आशीर्वाद घ्यावेत आणि त्यांच्या मदतीने हा प्रश्न सोडवावा. हा एकमेव मार्ग हिंदुस्थानच्या लोकशाही पद्धतीत बसू शकतो आणि तो उपलब्ध आहे असे मी मानतो व त्या दृष्टीने मी ही चर्चा करतो.

म्हैसूर सरकारची या प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टी अलग आहे, आमची दृष्टी अलग आहे, आणि आम्हा दोघांची या प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टी वेगळी असल्यामुळे यातून मार्ग कसा काढावयाचा हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. हा एक पेचप्रसंग (स्टेलमेट) निर्माण करणारा प्रश्न आहे आणि कोणाला वाटो न वाटो राजकीय पातळीवरून तो सोडवावयाचा तर त्यासाठी संयम पाळला पाहिजे. जर एखाद्या रोग्याला औषध द्यावयाचे असेल तर त्याच्या रोगाचे निदान करणे आणि त्याची शक्ती पाहून त्याला औषध देणे हे वैद्याचे काम असते आणि त्या बाबतीत आपण काही भरमसाट बोलून चालणार नाही. त्या दृष्टीने मी माझे म्हणणे आपल्यापुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ही गोष्ट खरी आहे की, म्हैसूरचे मुख्यमंत्री यांची आणि माझी भेट झाली होती, आणि आम्ही एक ॲग्रिमेंट केले होते. ते ॲग्रिमेंट एका विशिष्ट परिस्थितीत झाले असले तरी ५ मिनिटांनी मी ते जाहीरपणे वृत्तपत्रांत देऊन टाकले आहे. त्या ॲग्रिमेंटसंबंधी पुढे काय झाले आणि मेजर व मायनर प्रश्नांचे काय झाले असे विचारण्यात आले. मेजर आणि मायनर प्रश्नांचा आग्रह म्हैसूर सरकारने धरू नये, असे मी त्यांना आग्रहाने सांगितले आणि तो आग्रह मी धरून चालणार आहे. त्यांनी मेजर किंवा मायनर म्हटले असले तरी जी प्रगती झाली आहे आणि जी वस्तुस्थिती आहे ती आपण स्वीकारली पाहिजे. जूनच्या पहिल्या आठवड्यात हे ॲग्रिमेंट झाले आणि त्याप्रमाणे म्हैसूर सरकारला आपली केस तयार करण्यासाठी ३-४ महिन्यांचा काल पाहिजे होता. आमची केस तयार झाली आहे पण त्यांना आपली केस तयार करावयाची आहे. तुम्ही आपली केस तयार केली असेल अशी मला आशा आहे असे आम्ही त्यांना लिहिले

होते आणि परवा मला त्यांचे असे पत्र आले आहे की, त्यांनी या कामाला सुरवात केली आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात ही केस पुरी होईल आणि नंतर चर्चेस सुरुवात होईल अशी माहिती आलेली आहे. म्हणजे ऑक्टोबर महिन्यात ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी कमिटी बसू शकेल. तिचे सभासद म्हणून श्री. पाटसकर आणि श्री. एम्. डी. भट यांची नावे आम्ही सुचविली आहेत आणि ती नावे आम्ही आजही कायम ठेवली आहेत. ह्या प्रश्नाचा विचार करताना पाटसकर सूत्र अंमलात आले पाहिजे असे सांगण्यात आले. या चर्चेचा पाया पाटसकर सूत्र असला पाहिजे हे तत्त्व आम्ही स्वीकारले आहे आणि त्या सूत्राची चिंता वाहण्यासाठी श्री. पाटसकर यांना तेथे पाठविणार आहोत. यातून काय घडेल याचा स्वतंत्र विचार करावयास पाहिजे. मी असे म्हणतो की, आमची बाजू न्याय्य आहे आणि आमचे म्हणणे रास्त आहे. आम्ही आमच्या आखलेल्या मर्यादा आणि लोकशाही पद्धतीने आलेला संयम स्वीकारून पावले टाकू इच्छितो आणि आमची मागणी मिळवू इच्छितो. ही दृष्टी असल्यामुळे मी अशी आशा करतो की, हा प्रश्न सुटू शकेल. यापेक्षा मला आज काही जास्त सांगता येणे शक्य नाही. या बाबतीत मी भलती आश्वासने देऊ इच्छित नाही, पण जी वस्तुस्थिती आहे ती सांगतो. ज्यांनी आश्वासने दिली आहेत ते पंचायतीत पडणार असे मला वाटते. कोणी सत्याग्रहाची भाषा बोलतात, तर कोणी राजिनाम्याची भाषा बोलतात. त्यांच्या मार्गात मी आडवा येत नाही. त्यांनी काय करावे हा त्यांचा प्रश्न आहे पण मी त्यांना सांगू इच्छितो की, हा मार्ग बरोबर नाही. त्यांनी हा जो मार्ग स्वीकारला आहे तो प्रामाणिकपणे स्वीकारला आहे. आणि त्यातील प्रामाणिकपणा मला मान्य आहे, पण एकदा बोलून चुकलो म्हणून अगतिकतेने स्वीकारलेला हा मार्ग आहे. ह्या मार्गाने हा प्रश्न सुटणार नाही आणि ते सोडवू शकणार नाहीत.

दुसरी काही मंडळी डायरेक्ट ॲक्शनची भाषा नेहमी बोलतात आणि त्याप्रमाणे घोषणा करतात, पण त्या घोषणा निरर्थक आहेत असे माझे नम्र मत आहे. राजिनाम्याची आणि डायरेक्ट ॲक्शनची भाषा बोलून ही मंडळी लोकांच्या भावनेशी खेळ खेळत आहेत. लोकांना असे वाटते की, कोणीतरी मंडळी पराक्रमासाठी बाहेर पडली आहेत तेव्हा आपणही थोडा पराक्रम केला पाहिजे म्हणून लोक यामध्ये भाग घ्यावयास तयार होतात, पण शेवटी निराशा पदरी येते. वास्तविक हा प्रश्न आणि आपल्या मर्यादा काय आहेत यासंबंधी जनतेला माहिती सांगणे हे तेथील पुढाऱ्यांचे कर्तव्य आहे व त्यांनी ते कर्तव्य करावे असे मला सांगावयाचे आहे. सन्माननीय सभासद श्री. ओगले यांनी तेथील लोकांच्या भावना तीव्रतेने व्यक्त केल्या. ते त्या क्षेत्रात वाढलेले आहेत म्हणून

त्यांना प्रतिनिधित्व करण्याचा हक्क आहे. त्यांच्या भावना वास्तव आहेत म्हणून मी त्या स्वीकारतो पण त्या स्वीकारल्याने हा प्रश्न सुटत नाही. ही मागणी सभागृहाने स्वीकारली म्हणून लोकमत निर्माण होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. पण हा प्रश्न निर्माण झाल्यानंतर त्या निमित्ताने निर्माण होणारे प्रश्न पुढे मांडले पाहिजेत. लोकमत निर्माण करून हा प्रश्न सुटणार नाही आणि लोकमत निर्माण करावयाचे असेल तर ते समाजात करावयास पाहिजे, येथे निर्माण करून चालणार नाही. जसे इकडे लोकमत आहे तसे तिकडेही लोकमताचा प्रश्न आहे. तेव्हा लोकमत निर्माण करून हा प्रश्न कसा सुटू शकेल हे कळत नाही. या बाबतीत आम्ही आमची मागणी अद्यावत मांडण्याचा प्रयत्न केला आहे आणि हिंदुस्थान सरकारचे गृहमंत्री यांनी ह्या प्रश्नामध्ये लक्ष घातल्यामुळे म्हैसूर सरकारला पुढे यावे लागले. तेव्हा या बाबतीत प्रांतिक सरकारची जी जबाबदारी आहे ती आता आपण स्वीकारली पाहिजे. पुन्हा कमिशन नेमून काम सुरू करा अशी मागणी करावयाची आणि सुटत असलेला प्रश्न उचलून बाजूला ठेवावयाचा यात काही स्वारस्य आहे असे मला वाटत नाही. या एका प्रश्नाबरोबर आणखी इतर ठिकाणचे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. मध्यप्रदेशच्या सीमेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या बाबतीत आमची स्वच्छ भूमिका अशी आहे की, आम्ही तो प्रश्न आज उपस्थित करू इच्छित नाही. कोठले प्रश्न केव्हा उभे करावयाचे हा व्यावहारिक नीतीचा प्रश्न आहे. कारण आमची जबाबदारी उभे केलेले प्रश्न सोडविण्याची आहे.

गुजरातच्या सीमेसंबंधी या सरकारची भूमिका साफ आहे की आमच्यापुरता तो प्रश्न सुटला असे आम्ही मानतो आणि आम्ही तो प्रश्न पुनः ओपन करणार नाही. या सभागृहाच्या संमतीनेच आम्ही तो प्रश्न सोडविला आहे. तेव्हा आम्ही तो पुनः ओपन करू इच्छित नाही, इतरांनीही कोणी तो ओपन करू नये. कारण छोट्या छोट्या प्रश्नांच्या दिवट्या आमच्यापुढे नाचवीत ठेवण्यामुळे, प्रमुख प्रश्नांकडे आमचे दुर्लक्ष होते. आज महाराष्ट्राच्या सीमेवर असणारी जी इतर राज्ये आहेत त्या राज्यांशी आम्हाला चांगले संबंध प्रस्थापित केले पाहिजेत. सीमेवरील राज्यांशी चांगले संबंध ठेवून महाराष्ट्राची आणि भारताची समृद्धी कशी साधावयाची हा आमच्यापुढे प्रश्न आहे. गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये जे वादाचे प्रश्न होते ते सर्व आम्ही मैत्रीच्या भावनेने संपविले आहेत. आता त्यांच्या आणि आमच्या मैत्रीमध्ये बिघाड किंवा कोणत्याही तऱ्हेची शंका निर्माण होईल अशा तऱ्हेच्या कोणत्याही गोष्टी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षसुद्धा आम्हाला बोलावयाच्या नाहीत आणि करावयाच्या नाहीत. हीच दृष्टी सर्व महाराष्ट्रामध्ये

स्वीकारली जावी अशी माझी इच्छा आहे. परंतु कोठेतरी वादाचे वातावरण निर्माण केल्याशिवाय आपले चालत नाही अशी काही मंडळींची भूमिका आहे. शिकारीसाठी काही सावज उठविले नाही तर आपले काय होणार अशी भीती त्यांच्या मनात नेहमी असते. अर्थात् सन्माननीय सभासद श्री. ओगले यांच्या बाबतीत मी हा आरोप करू इच्छित नाही, कारण ते कोणत्याही पक्षाचे नाहीत. परंतु कदाचित् आपल्या या ठरावाला पाठिंबा मिळविण्याकरिता त्यांना या मोहात पडावे लागले असेल. त्यांची यातना फक्त बेळगाव आणि दक्षिण महाराष्ट्राच्या इतर सीमांच्या प्रश्नासंबंधी आहे. परंतु आपल्या म्हणण्याला सभागृहाचा पाठिंबा मिळविण्याकरिता काही वेळा काही गोष्टी कराव्या लागतात, म्हणून इतर सीमांचा प्रश्न त्यांनी यात आणला असेल. परंतु मी हे सांगू इच्छितो की, गुजरातला लागून असलेल्या सीमांचा प्रश्न आता संपला आहे.

आज माझ्यापुढे जो प्रश्न आहे तो सोडविण्याचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न मी करीत आहे. मी आज इतर प्रश्नात जाऊ इच्छित नाही. जर या सभागृहात बेळगाव आणि दक्षिण सीमेवरील इतर मराठी प्रदेशांचा समावेश महाराष्ट्रात करण्यापुरताच मर्यादित असलेला ठराव कोणी आणणार असेल तर तो मी स्वीकारावयाला तयार आहे. कारण त्यासंबंधी माझ्या मनात कसल्याही प्रकारची शंका नाही. परंतु या ठरावामध्ये इतर सीमा प्रश्नांचा अंतर्भाव करून त्याचे रूप विकृत आणि वेडेवाकडे केले गेले असल्यामुळे ही 'मुलगी' आम्हाला स्वीकारता येत नाही,आम्हाला तीच्याशी कर्तव्य नाही,असे सांगण्याची पाळी माझ्यावर आली आहे, यापेक्षा मला जास्त सांगावयाचे नाही. हा प्रश्न १९६१ च्या सेन्ससपूर्वी सोडवावा अशी माझी इच्छा आहे. पण समजा, त्यापूर्वी सुटला नाही तर हा प्रश्न सोडविण्यासाठी जी चर्चा होईल तिचा पाया १९५१ चा सेन्सस रिपोर्ट हाच राहील अशी आमच्या सरकारची त्यासंबंधीची भूमिका आहे. आमची चर्चा त्याच रिपोर्टावर आधारलेली राहील यासंबंधी कोणीही शंका घेऊ नये.

■ ■ ■

The Opposition Member, Shri S. L. Ogale, moved in the Legislative Council a resolution requesting the Government to recommend to the Government of India to appoint a commission for the purpose of preparing a scheme for exchange of territories situated on the borders between Maharashtra on the one Hand and Mysore, Gujarat and Madhya Pradesh on the other, on the basis of language. At the time of the debate on the resolution, Shri Y. B. Chavan, Chief Minister, gave an elaborate reply to the various points raised by the Opposition Members and discussed the pros and cons of the question. He also explained the Government's view point on the problem. He categorically told the House that the question was mainly between the two States (Maharashtra and Mysore) and that it was the view of the Government as well as that of the Government of India that the problem must be decided with mutual discussion and agreement between these two States. He further told the House that the Government had accepted the Pataskar formula in this respect but the Government intended to achieve its goal by adopting a policy of restraint, by following democratic principles. Shri Chavan pointed out that the talk of some Opposition Members of direct action in this context was counterproductive.

# राज्य विधान सभेचे एक अधिवेशन दर वर्षी नागपूरला भरविण्यासंबंधीचा प्रस्ताव *

**१२ ऑगस्ट १९६०**

*नागपूर कराराच्या परिपूर्ततेसाठी, नागपूर येथे दरवर्षी एक अधिवेशन भरवावे या प्रस्तावावर भाष्य करताना मा. श्री. यशवन्तराव चव्हाण म्हणाले की हा ठराव म्हणजे भावनात्मक ऐक्य साधण्यासाठी टाकलेले पहिले पाऊल आहे.*

अध्यक्ष महोदया, नागपूरच्या कराराप्रमाणे तेथील जनतेला जी आश्वासने दिलेली होती त्यांची परिपूर्तता करण्यासाठी हा प्रस्ताव ह्या सभागृहापुढे मांडलेला आहे, आणि त्याच्या संबंधाने जी अनुकूल आणि प्रतिकूल अशी चर्चा झाली ती चर्चा मनोरंजक आणि एकमेकांचे दृष्टिकोन समजून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्तही झाली.

अध्यक्ष महोदया, ह्या प्रश्नाच्या अनुरोधाने दोन तीन महत्वाच्या समस्या आहेत त्यांच्या मागचा मूलभूत दृष्टिकोन समजावून घेतला पाहिजे. नागपूरच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर ह्या कराराचा जो हा भाग आहे त्याला महाराष्ट्रातील सर्व विभागातील लोकांनी मान्यता दिलेली आहे. ह्या बाबतीत मला एका गोष्टीचा खुलासा केला पाहिजे. नागपूर ॲग्रिमेंट हा जो शब्द आहे तो केवळ नागपूरच्या प्रश्नासंबंधाने नव्हता, तर महाराष्ट्रातील एकीकरणासंबंधाने जे महत्वाचे प्रश्न निर्माण होत होते त्या सर्व प्रश्नांना उद्देशून तेथे विचार केलेला होता. ह्या करारामध्ये नागपूरसंबंधाने जो भाग होता तो ऐतिहासिक महत्त्वाच्या बाबतीत होता. याच्या पाठीमागे ॲपीजमेंट करण्याचा हेतू नव्हता. विदर्भाला काही सवलती देऊन आणि त्यांच्या काही विशिष्ट मागण्या मान्य करून त्यांना आम्ही बनवीत आहोत असे कोणी समजू नये. ज्याप्रमाणे एखाद्या घरचे

* (M.L.C.Debates, Vol. I, Part II, 12th August 1960, pp. 556 to 564.)

दोन भाऊ एकाच घरात एकत्र राहण्यासाठी आसुसलेले असतात आणि ते समाधान मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात, तीच भावना याच्यामागे आहे. पण याच्या पलीकडे जाऊन जास्त काही करून कोणाला तरी जिंकावयाचे आहे अशी भावना याच्यामागे नाही. त्या उद्देशाने ही गोष्ट स्वीकारलेली नाही.

नागपूरच्या ॲग्रीमेंटसंबंधी काही गोष्टींचा खुलासा मी करणार आहे. नागपूरच्या करारावर सह्या करणारांपैकी, हस्ताक्षरे करणारांपैकी, मी एक आहे आणि तेथे जी काही चर्चा झाली ती सर्व माझ्यासमोर आजही येत आहे. तेथे चर्चेसाठी बसणारी जी माणसे होती त्यात मराठवाडा, विदर्भ आणि महाराष्ट्र या विभागातील चांगली व्यासंगी माणसे होती. तेव्हा तेथे गेल्याबरोबर कोणतीही गोष्ट एकदम मान्य केली असे नाही, तर अनुकूल आणि प्रतिकूल अशा अनेक प्रश्नांची चर्चा कित्येक तासपर्यंत झाली.

राजधानीसंबंधाने हा करार काय म्हणतो याबद्दलचे मी माझे इंटरप्रिटेशन सभागृहाला सांगू इच्छितो. एका बाबतीत माझा आग्रह होता आणि त्या बाबतीत कसलेही कॉम्प्रॉमाइझ करू नये असे माझे ठाम मत होते. ती गोष्ट अशी की, आम्ही ह्या सगळ्या लोकांचे एकराज्य निर्माण करू इच्छितो. ह्या एकराज्याच्या कल्पनेला धक्का बसेल, ह्या एकराज्याच्या कल्पनेचा उपमर्द होईल, किंवा ह्या कल्पनेशी विसंगत होईल अशी कोणतीही गोष्ट स्वीकारली जाणार नाही. अशी विसंगती जर कोठे निर्माण झाली तर ती विदर्भ, मराठवाडा आणि महाराष्ट्र ह्या तीन विभागांच्या हिताची होणार नाही. नागपूर करारामध्ये दोन तीन ठिकाणी ही फ्रेज आलेली आहे आणि जेव्हा जेव्हा हे सांगण्याचा प्रश्न आला तेव्हा तेव्हा मी हे स्पष्ट केलेले आहे. त्यातील कलम ४ असे आहे :

"Subject to the requirements of a single Government"

१० व्या कलमाचा येथे उल्लेख करण्यात आलेला आहे तेव्हा ते सबंध कलम मी वाचून दाखवितो. ते असे आहेः

"We realise the long association of the people of Mahavidarbha with Nagpur as a capital of their State and the various advantages consequently derived by them from it. We are anxious that subject to the efficient conduct of administration of a single State those advantages should be preserved to the extent possible.

In the matter of services under Government or Government controlled enterprises--of all grades--recruitment will be in proportion to the population of the respective units."

म्हणजे हे नागपूर राजधानीचे शहर असताना नागपूरच्या किंवा विदर्भाच्या लोकांना जे

काही फायदे मिळत होते ते त्यांना शक्य तितक्या प्रमाणात ते महाराष्ट्रात आल्यानंतरही मिळावेत अशी आमची इच्छा आहे. परंतु त्याचबरोबर महाराष्ट्र राज्यामध्ये आम्हाला चांगल्या प्रकारची कार्यक्षम अशी कारभारयंत्रणा असलेले एक एकजिनसी एकराज्य उभे करावयाचे आहे ही गोष्टही विसरता कामा नये. या दृष्टीने एकराज्याच्या कल्पनेशी विसंगत किंवा त्या कल्पनेला ज्या योगे कोणत्याही प्रकारे तडा जाईल अशी कोणतीही गोष्ट महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री या नात्याने निदान मी तरी करणार नाही. हा ठराव म्हणजे महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वेळी या सरकारचे जे धोरण घोषित करण्यात आले होते त्या धोरणाच्या अंमलबजावणीचा एक भाग आहे. त्यामध्ये अधिकाधिक एकत्र येण्याचा आणि एकमेकांचे संबंध अधिकाधिक दृढ करण्याचा प्रयत्न आहे. त्यामध्ये आम्ही कोणाकरिता काही त्याग करीत आहोत किंवा कोणाला काही देऊन त्याच्याकडून त्याच्या मोबदल्यात आम्हाला परत काही मिळवावयाचे आहे किंवा आम्ही मुद्दामहून कोणाचे काहीतरी अपीजमेंट करीत आहोत किंवा कोणावर काहीतरी फेव्हरिटिझम करीत आहोत, अशी आमची मुळीच भावना नाही. त्या बाबतीत माझे मन अगदी साफ आहे. कारण अपीजमेंट करून किंवा फेव्हरिटिझम करून राज्य कार्यक्षमपणे चालत नाही याची मला जाणीव आहे. परंतु त्याचबरोबर सन्माननीय सभासद श्री. सुभेदार आणि श्री. देशपांडे यांनी आपल्या भाषणात जो एक उल्लेख केला तोही लक्षात घेतला पाहिजे. ते म्हणाले की, पश्चिम महाराष्ट्रातील आम्हा लोकांसंबंधी, म्हणजे साताऱ्यातील लोकांसंबंधी किंवा पुण्यातील लोकांसंबंधी - सन्माननीय सभासद श्री. गोगटे यांना या बाबतीत मी माझ्याबरोबर घेऊ इच्छितो - विदर्भातील लोकांच्या मनात काही गैरसमज आहेत. या गैरसमजांना जागा राहू नये म्हणून एक-दोन पावले पुढे यावयाला आम्ही तयार आहोत आणि हा ठराव आमच्या त्या भावनेचा थोडासा निदर्शक आहे असे म्हटले तरी चालेल. अर्थात् कसलेही राजकीय प्रपोझिशन मांडलेले नाही. किंवा मी आताच सांगितल्याप्रमाणे त्यामध्ये कोणाकरिता काही त्याग करण्याची किंवा कोणाला खरीदण्याची किंवा कोणाला खुश करण्याची भावना नाही.

इतके, अध्यक्ष महाराज, या कल्पनेसंबंधी बोलल्यानंतर बाकीचे जे प्रश्न आणि समस्या आहेत त्यांच्यासंबंधी मला बोलावयाचे आहे. पहिली गोष्ट म्हणजे माझे सन्माननीय मित्र **श्री. व्यास**[६४] यांचे भाषण कळकळीचे झाले. त्यांचा हेतू आणि सन्माननीय सभासद श्री. आवळे यांचा दृष्टीकोन यामध्ये तफावत आहे आणि ती स्वागतार्ह तफावत आहे असे माझे म्हणणे आहे. अध्यक्ष महाराज, माझ्या सगळ्या

प्रयत्नांचा उद्देश हा आहे की, महाराष्ट्राचे एकजिनसी एकराज्य निर्माण व्हावे आणि त्या दृष्टीने माझे एक स्वप्न आहे, महत्वाकांक्षा आहे, असे आपण म्हणा पाहिजे तर. ते स्वप्न किंवा ती महत्वाकांक्षा अशी आहे की, आज जे माझे मित्र स्वतंत्र विदर्भाची मागणी करीत आहेत त्यांना माझ्या या प्रयत्नात विलिंग पार्टनर्स करून घ्यावयाचे. त्या दिवसाची मी वाट पाहात आहे - आणि तो दिवस लवकर यावा अशी माझी इच्छा आहे - की, ज्या दिवशी माझे स्वतंत्र विदर्भवादी मित्र महाराष्ट्राचे एकजिनसी एकराज्य निर्माण करण्याच्या प्रयत्नात माझे विलिंग पार्टनर्स होतील. लोकशाहीवर निःसीम विश्वास असणारा मी मनुष्य आहे आणि त्या दृष्टीने या सभागृहात माझ्याचबरोबर बसणाऱ्या माझ्या काही मित्रांनी पृथक अस्तित्वाची इच्छा धरावी याचे मला दुःख होते. म्हणून त्यांचे मन माझ्या बाजूला वळविण्याचा आणि महाराष्ट्राचे एकजिनसी एकराज्य निर्माण करण्याचा माझा जो प्रयत्न आहे त्यामध्ये त्यांना विलिंग पार्टनर्स करून घेण्याचा माझा प्रयत्न आहे. कठीण प्रयत्न आहे, पण मी तो करणार आहे. अर्थात् मी म्हणजे सगळे राज्य, तुम्ही, आम्ही, सगळे लोक.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद श्री. आवळे यांचा या ठरावाला विरोध आहे याचे कारण त्यांची स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी आहे आणि म्हणून या ठरावात उल्लेखिलेल्या गोष्टी त्यांना करावयास नको आहेत, आणि त्यांना आपली ही भूमिका १९६२ च्या निवडणुकांपर्यंत तरी कायम ठेवावयाची आहे. अशी त्यांची नीती असल्यानंतर त्यांनी माझे म्हणणे इतक्यातच स्वीकारावे अशी मी अपेक्षा करणार नाही. मला पेशन्स आहे, मी वाट पाहणार आहे. त्यांच्या आणि सन्माननीय सभासद श्री. व्यास यांच्या दृष्टीकोनात मुळातच फरक आहे. श्री. व्यास यांचा दृष्टीकोन मोठा आहे आणि तसाच सगळ्या माणसांचा असावा अशी माझी इच्छा आहे. सगळ्यांना एकत्र घेऊन नांदले पाहिजे असा श्री. व्यास यांचा दृष्टीकोन आहे. जर आपण एकजिनसी भारत निर्माण करण्याची गोष्ट बोलत आहोत तर ते ध्येय साध्य करण्याचे एक पाऊल म्हणून एक भाषा बोलणाऱ्या लोकांचे एक एकजिनसी एकराज्य निर्माण करण्याचा प्रयत्न आपण यशस्वी केला पाहिजे. त्यासाठी या राज्याचे मुख्यमंत्रीपद स्वीकारताना एक कसोटी मी मनाशी ठरविली होती. आम्ही कोठे विकास योजना अंमलात आणीत आहोत आणि कोठे नाही, आणि कोठे त्या योजना कशा प्रकारे चालल्या आहेत याच्यावर टीका होईल, त्याच्यावर या राज्याचे यशापयश ठरेल, पण दूरदृष्टीने पाहताना जो मराठवाड्याचा भाग आहे, जो कोकणचा भाग आहे किंवा जो विदर्भाचा भाग आहे त्यांना या महाराष्ट्र राज्यात एकत्र ठेवण्याकरिता जे काही करणे आवश्यक होते ते केले

की नाही याच्यावर वस्तुतः आणखी काही पिढ्या या राज्याच्या यशापयशाची परीक्षा होणार आहे, आणि म्हणून त्याच एका दृष्टीने या प्रश्नाकडे पाहण्याचा प्रयत्न मी करीत आहे. आमच्या सद्‌हेतूविषयी त्या भागातील लोकांच्या मनात कोठल्याही शंकेला थारा राहू नये या दृष्टीने आम्ही या बाबतीत प्रयत्न करीत आहोत.

महाराष्ट्राचे एकजिनसी एकराज्य निर्माण करण्याकरिता आम्हाला महाराष्ट्रातील सर्व लोकांचे भावनात्मक ऐक्य साधावयाचे आहे. अर्थात् ही भावनात्मक एकीकरणाची किंवा ऐक्याची भाषा जेव्हा मी बोलतो तेव्हा आम्हाला मेंटल रेजिमेंटेशन करावयाचे आहे असा त्याचा अर्थ नाही. कारण प्रत्येकाला आपापल्या स्थानिक भूमीबद्दल जवळीक किंवा अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. मघाशी कोणा एका अधिकाऱ्याची अकोल्याहून इकडे बदली झाली तेव्हा त्याला काय वाटले याचा उल्लेख करण्यात आला. परंतु काही वर्षांपूर्वी कोकणचा अभिमान बाळगणाऱ्या कोकणातील एखाद्या माणसाची पुण्याहून मंडणगड, दापोली, वेंगुर्ले आदि अगदी कोकणातीलच एखाद्या ठिकाणी बदली केली तर त्यालासुद्धा असेच वाटत होते की, आणि तोदेखील हेच म्हणत होता. म्हणजे याचीदेखील कोकणात जाण्याची इच्छा नसे. नोकरीतील बदल्या आणि त्या निमित्ताने निर्माण होणारे प्रश्न हे कौटुंबिक प्रश्न आहेत. त्यात मूलभूत भावनांचा किंवा तत्त्वाचा प्रश्न येत नाही. मुलांचे शिक्षण, मुलीला योग्य स्थळ मिळेल की नाही, म्हातारपणी आपली प्रकृती बरोबर राहील की नाही, सरकारची नोकरी इतकी वर्षे केल्यानंतर पेन्शन भोगावयाला मिळेल की नाही इत्यादी गोष्टींचा विचार नोकरी करताना सरकारी नोकर करीत असतो, आणि ते मनुष्य स्वभावाला धरून आहे. त्याबद्दल मला कोणाला दोष द्यावयाचा नाही. परंतु मला जे सांगावयाचे आहे ते हे की, भावनात्मक ऐक्य झाल्यानंतरसुद्धा बदली झाल्यानंतर नाराजी उत्पन्न होणार नाही ही खोटी गोष्ट आहे. फार कशाला, स्वतंत्र विदर्भाचे राज्य झाले असते तरीदेखील नागपूरच्या माणसाची चांदा जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्याच्या एखाद्या कोपऱ्यात जर बदली झाली तर त्यालादेखील काय वाटेल ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. त्याच्या मनातदेखील नाराजी उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा बदल्यांचा प्रश्न किंवा नोकरीतील इतर गैरसोयी या छोट्या छोट्या गोष्टी आहेत. त्यावरून राज्याच्या मूलभूत स्वरूपाच्या प्रश्नांचा निर्णय करणे चुकीचे आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे प्रत्येकाला आपापल्या भूमीचा आणि तत्संबंधित गोष्टींचा अभिमान वाटणे साहजिक आहे.

पश्चिम महाराष्ट्रातदेखील मराठी भाषा १०-१० मैलांवर थोड्याशा निराळ्या पद्धतीने

बोलली जाते आणि प्रत्येक ठिकाणच्या लोकांना ते ज्या पद्धतीने मराठी बोलतात त्या पद्धतीचा अभिमान वाटतो. पुण्याची मराठी चांगली समजली जाते आणि इतर ठिकाणचे लोक पुण्याच्या मराठीसारखी मराठी बोलणे आपल्याला जमते काय हे पाहण्याचा प्रयत्नही करतात. परंतु असे असले तरी पुण्याला राहणाऱ्या प्रत्येक माणसाला आपल्या ठिकाणच्या मराठी बोलण्याच्या पद्धतीबद्दल एक बारीकसा का होईना पण अहंकार वाटतो. अभिमान वाटतो, जवळीक वाटते, सातारी पद्धतीने मराठी बोलणारी व्यक्ती भेटली तर मला हे कबूल केले पाहिजे की, त्या मराठीबद्दल अगदी पाच टक्के नाही तरी अर्धा टक्का तरी जवळीक मला वाटायला लागते. हा मनुष्यस्वभावाचा दुबळेपणा आहे. परंतु तो वीकनेस आहे, परंतु तो ह्यूमन वीकनेस आहे. तेव्हा अशी परिस्थिती राहणारच आणि ती राहणे स्वाभाविकच आहे. म्हणून विदर्भाचा अभिमान कोणाला वाटत असेल, विदर्भाच्या प्रश्नासंबंधी कोणाला आपुलकी आणि जिव्हाळा वाटत असेल तर त्यात काही गैर नाही. तशी ती आपुलकी किंवा जिव्हाळा वाटला पाहिजे. वाटला नाही तरच अडचण आहे. इतकेच नव्हे तर त्यात किंचितसा आरोग्यदायी स्पर्धेचा भाग असेल तर त्यातदेखील काही गैर नाही. म्हणूनच मी म्हटले की, आम्ही जेव्हा भावनात्मक ऐक्याची गोष्ट बोलतो तेव्हा आम्हाला मेंटल रेजिमेंटेशन किंवा युनिफॉर्मिटी किंवा एकसाचेपणा निर्माण करावयाचा आहे असा त्याचा अर्थ नाही. परंतु त्याचबरोबर एकजिनसी एकराज्य निर्माण करण्याकरिता ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्यांचादेखील आपण विचार केला पाहिजे आणि त्याच्याकडे आपले दुर्लक्ष होऊ देता कामा नये.

या सगळ्या पार्श्वभूमीवर या ठरावाचा आपण विचार केला पाहिजे. जेव्हा असेंब्लीचे अधिवेशन नागपूरला नेण्याचा आम्ही प्रयत्न करतो तेव्हा त्याच्यामध्ये हाही एक भाग आहे की, नागपूरमध्ये अधिवेशनासाठी लागणाऱ्या सगळ्या सोयी आहेत. एक राजधानीचे शहर म्हणून वाढल्यामुळे त्या ठिकाणी असेंब्लीचे अधिवेशन भरविण्याकरिता लागणाऱ्या वृत्तपत्रीय संघटनेचे क्षेत्र आहे. त्यासाठी आवश्यक असणारे सामाजिक जीवन तेथे तयार आहे आणि त्याचबरोबर त्यांची जी परंपरा चालत आली आहे किंवा त्यांचे जे प्रवाही जीवन चालत आले आहे, ते आज कुंठित झाले आहे अशी जी भावना तेथील लोकांमध्ये निर्माण झाली आहे तीही दूर केली पाहिजे. सन्माननीय सभासद **श्री. हॅरिस**[६५] यांनी आपल्या भाषणात नागपूरच्या जीवनाचा त्यांना जो अनुभव आला त्याचा उल्लेख केला. प्रत्येक वेळी नागपूरला जाऊन आल्यानंतर आपला काहीतरी फायदा झाला असे त्यांना वाटल्याचे त्यांनी

सांगितले. अशा तऱ्हेच्या काही चांगल्या गोष्टी नागपूरला जरूर आहेत. परंतु तशा काही गोष्टी मुंबईतसुद्धा आहेत, पुण्यामध्येसुद्धा आहेत, औरंगाबादमध्ये आहेत, अकोल्याला आहेत, सावंतवाडीला आहेत, मालवणला आहेत आणि कऱ्हाड, सातारा, सांगलीच्या बाजूलासुद्धा आहेत. (काही सन्माननीय सभासद - आहेत, आहेत.) तेव्हा नागपूरच्या जीवनामध्ये ज्या काही चांगल्या गोष्टी आहेत त्यांचा आम्हाला उपयोग करून घेतला पाहिजे आणि त्यांच्या साहाय्याने आम्हाला आमचे जीवन एनरिच केले पाहिजे. परंतु हे करीत असताना आपली एकराज्याची जी मूलभूत कल्पना आहे तिच्याशी कोठे काही विसंगती निर्माण होते की काय तेदेखील आपण पाहिले पाहिजे. त्या दृष्टीने त्यांची जी सूचना आहे की नागपूर शहराला पर्यायी राजधानीचा दर्जा दिला पाहिजे ती या एक राज्याच्या कल्पनेशी विसंगत आहे काय हे पाहिले पाहिजे. या राज्याच्या एकंदर ज्या भावना आहेत त्या विदर्भातील जनतेला समजल्या पाहिजेत आणि तिच्यामध्ये राज्याविषयी जिव्हाळा निर्माण झाला पाहिजे या प्रकारचा जो प्रश्न आहे तो सोडविण्यासाठी, नागपूरला अधिवेशनाच्या वेळी सरकारने काही महिने राहिले पाहिजे ही गोष्ट कबूल करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभासद श्री.व्यास यांनी शेवटी डीसेंट्रलायझेशनसंबंधी जी सूचना केली आहे तिच्या संदर्भात शासनाची जी कल्पना आहे तिचा अर्थ ह्या ठिकाणी स्पष्ट करावासा वाटतो. त्यांनी असे सुचविले आहे की, नागपूर येथे काही खाती व त्या खात्याचे सेक्रेटरी नेण्यात यावेत. सर्व दुनियेच्या शासनाबद्दल बोलण्याची हमी न घेता, हिंदुस्थानच्या शासनापुरती मर्यादित स्वरूपाची मला जी माहिती आहे ती मी सभागृहापुढे ठेवतो. सरकारकडे इन् दि लास्ट ॲनॅलिसिस पॉलिसी मेकिंगचा अधिकार असतो. अर्थात् सरकारने आखून दिलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणारी जी यंत्रणा असते ती दुसरी असते. सचिवालयाची यंत्रणा ही धोरण ठरविणारी यंत्रणा असून तिची वेगवेगळ्या ठिकाणी वाटणी झाली तर डिसेंट्रलायझेशन न होता डिस्इंटिग्रेशन होईल. सन्माननीय सभासद श्री. व्यास यांची डिसेंट्रलायझेशनची जी कल्पना आहे ती एकराज्याच्या कल्पनेशी विसंगत आहे म्हणून त्यांनी सुचविल्याप्रमाणे धोरण ठरविणाऱ्या यंत्रणेची वाटणी करण्याचे ''डिसेंट्रलायझेशन'' आम्ही स्वीकारू शकणार नाही. जेव्हा नागपूर ह्या ठिकाणी अधिवेशन भरविले जाईल तेव्हा सेक्रेटरीएटचा स्केलेटन स्टाफ जाईल परंतु त्या ठिकाणी अथवा औरंगाबादसारख्या ठिकाणी कायम स्वरूपात खाती ठेवून दौलताबाद ह्या ठिकाणी राजधानी नेण्याच्या ऐतिहासिक घटनेची पुनरावृत्ती आम्हाला करावयाची

नाही. ही गोष्ट करणेही चुकीचे आहे. ह्या बाबतीत शासनाने तपशीलवार विचार करून असे ठरविले आहे की, नागपूर येथे हेडस् ऑफ डिपार्टमेंटस् आणि एक्सपर्टस् ठेवले पाहिजेत. सन्माननीय सभासद श्री. व्यास यांनी मायनिंगच्या हेड ऑफ डिपार्टमेंटविषयी जी गोष्ट सुचविली तिला अनुलक्षून मला असे सांगावयाचे आहे की, मायनिगंचे हेड ऑफ दि डिपार्टमेंट हे आजही त्या ठिकाणी आहे. आणखी काही हेडस् ऑफ डिपार्टमेंटस् त्या ठिकाणी ठेवण्याची आवश्यकता वाटली तर ती जरूर ठेवण्यात येतील. त्या बाबतीत आपण चर्चाही करू शकतो. परंतु धोरण ठरविणाऱ्या खात्याची नागपूर येथे वाटणी करून मुख्यमंत्र्यांनी राहिलेल्या चार पाच खात्यांमार्फत येथे बसून कारभार करण्याचे ठरविले तर तो कारभार एकराज्याचा कारभार होणार नाही. ह्या गोष्टीला अनुलक्षून मी बिझनेस मॅनेजमेंटचे जे नवीन शास्त्र आहे त्याची कल्पना देतो. मॅनेजर व काम करणारी माणसे एकाच ठिकाणी असावीत हे शास्त्र आहे. आपण एखाद्या नवीन बिझनेस मॅनेजमेंटच्या ऑफिसात गेलो तर असे आढळून येईल की, सुपरिंटेंड अथवा फोरमन आणि इतर काम करणारा नोकरवर्ग यांच्यामध्ये भिंत ठेवण्याची जुनी कल्पना लुप्तप्राय झालेली आहे. देखरेख ठेवणारा माणूस व त्याच्या हाताखाली काम करणारे लोक यांची नजरभेट झाली पाहिजे, दृष्टीक्षेप टाकता आला पाहिजे, ह्या दृष्टीनेच नवीन बिझनेस ऑफिसेसची रचना करण्यात येत आहे. ह्या ठिकाणी सचिवालयाची जी सुंदर इमारत बांधण्यात आली आहे तीत जुन्या सचिवालयात विखुरलेली ऑफिसेसही नेण्यात आली आहेत. यामुळे एकमेकात एक प्रकारचा एकजिनसीपणा तयार होत असतो. सेक्रेटरीएटची सुंदर इमारत आम्ही मुद्दाम होऊन सोडावयास तयार नाही असे नाही तर आधुनिक राज्यशास्त्राला जबाबदार असणारी आणि धोरण ठरविणारी गुंतागुंतीची जी शासनयंत्रणा असते ती एका ठिकाणी व एकसारखी असली पाहिजे, त्याशिवाय कारभार किंबहुना त्या कारभाराचे महत्त्व टिकू शकणार नाही. या दृष्टीने नागपूरला सचिवालयाचा भाग न ठेवण्याच्या पाठीमागे एक बेसिक ॲप्रोच आहे. ज्या मंडळींच्या ॲग्रीमेंटमध्ये आम्ही एक आहोत या दृष्टीने ''सबजेक्ट टु दि आयडिया ऑफ् ए सिंगल स्टेट'' असे शब्द आलेले आहेत त्यांना जरूर ते श्रेय देऊ इच्छिणाऱ्यांपैकी मी एक आहे. सर्व मिळून एक राहू द्या, किंबहुना कोणत्याही कारणामुळे एकत्र राहता येणार नाही अशी प्रवृत्ती निर्माण होता कामा नये असे मला वाटते. सन्माननीय सभासद श्री. व्यास यांच्या ज्या भावना आहेत त्या मी समजू शकतो. त्यांनी सुचविल्याप्रमाणे डिसेंट्रलायझेशन केले तर त्याचा परिणाम असा होईल की, कोणते खाते काय ठरविते हे समजणार नाही. कोणत्याही खात्याचा कोणताही प्रश्न असो, सचिवालयाची खाती

एकमेकांपासून अलगपणे काम करू शकत नाहीत. अर्थात् कामाचा लवकर निर्णय लागावा म्हणून मी शक्यतोवर कागदपत्रांची वहिवाट दुसऱ्या खात्यात जाऊ नये या दृष्टीने जास्तीत जास्त प्रयत्न करतो, परंतु सरकारची यंत्रणाच अशी आहे की, प्रत्येक खाते हे अर्धवट शहाणे आहे. एका खात्याला दुसऱ्या खात्याचा विचार घेतल्याशिवाय निर्णय लावणे शक्य होत नाही ही वस्तुस्थिती असली तरी लोकशाहीतील ती एक चांगली गोष्ट आहे. डिस्ट्रिब्यूशन ऑफ पॉवर हे लोकशाहीच्या कारभाराचे सौंदर्य असून तिच्यानुसार जी खाती निर्माण करण्यात आली आहेत त्यांच्यात एकमेकांना सुधारण्याची आणि सावरून धरण्याची शक्ती निर्माण होते. आजच्या लोकशाहीत आवश्यक अशी ही शक्ती आहे. उदाहरणादाखल असे सांगता येईल की, कोणत्याही खात्याकडे कोणतेही काम असो, त्याला लागणारा जो नोकरवर्ग आहे त्याच्या बाबतीत योग्य तो सल्ला घेण्यासाठी त्या खात्याला जनरल ॲडमिनिस्ट्रेशन डिपार्टमेंटकडे जाण्याखेरीज गत्यंतर नाही. त्याचप्रमाणे जनरल ॲडमिनिस्ट्रेशन डिपार्टमेंटच्या कारभारात होणाऱ्या कामांच्या खर्चासाठी त्या खात्याने अर्थखात्याकडे गेल्याशिवाय चालणार नाही. ही दोन्ही खाती मुंबईला ठेवून दुसरी खाती इतर ठिकाणी ठेवली तर राज्यशासन होणार नाही. हे शासन टेलिफोनवरूनही होणार नाही. टेलिफोनचा वापर फक्त इमर्जन्सीच्या वेळीच केला जातो. लांबच्या अंतरावरून टेलिफोनचा तसा वापर करता येणार नाही.

मी ही केवळ तत्त्वाचीच बाजू सांगत आहे असे नाही. सचिवालयाच्या कामाची इतर ठिकाणी वाटणी करण्यात आली तर राज्यकारभार आणि व्यवहार या दृष्टीनेही ती चुकीची होईल. कोणी या राज्याला मान्यता देवोत अथवा न देवोत त्यांचा या विचारसरणीशी मतभेद असण्याचे काही कारण नाही, किंबहुना विदर्भवादीही हीच विचारसरणी मान्य करतील. तेव्हा अर्धे सचिवालय नागपूरला ठेवून चालणार नाही हा वादातीत विचार आहे. राज्यकारभार कसा चालवावा हा व्यवहाराचा प्रश्न आहे. या दृष्टीने पहाता मला असे म्हणावयाचे आहे की, सचिवालयाची मागणी तत्त्वतः आणि व्यवहारतः स्वीकारण्यासारखी नाही हा विचार सन्माननीय सभासद श्री. व्यास मान्य करतील अशी आशा आहे.

दुसरा प्रश्न उपस्थित करण्यात आला तो ठराविक मुदतीसंबंधीचा आहे. नागपूरच्या अधिवेशनाच्या वेळी मी कमीत कमी तीन महिने राहू इच्छितो. अर्थात् मी म्हणजे मी व्यक्तिशः नसून मुख्यमंत्री व त्याचबरोबर सरकार अशा अर्थाने मी सांगत आहे. आपण पार्लमेंटरी डेमॉक्रसी चालवीत असताना तीन ते चार अशी मुदत घातली गेली

तर सवलतीची शक्यता कमी न होता सन्माननीय सभासद श्री. देशपांडे यांनी सांगितल्याप्रमाणे, ती वाढत जाते. त्याप्रमाणे नागपूर येथे अधिवेशनाच्या वेळी पाच महिने राहावे असे मला वाटू लागेल. दोन वर्षाच्या कालावधीनंतर, दुसऱ्या कोणाकडे मुख्यमंत्रीपद गेले - त्यावर कदाचित् श्री. आवोडे आणि श्री. व्यासही येऊ शकतील- तर नागपूर येथे सहा महिने राहावे असे त्या मुख्यमंत्र्याला वाटेल ! मला असे म्हणावयाचे आहे की, सरकारच हलवावयाचे हे तत्त्व एकदा मान्य केल्यावर जरी करार झाला असला तरी पार्लमेंटरी डेमॉक्रसीच्या पाठीमागे काही नियम आणि परंपरा असतात त्या आपणाला निर्माण करावयाच्या असतात. त्या कायद्याने निर्माण होत नाहीत. ह्यासाठी काही आठवडे अथवा काही महिने अशी कालमर्यादा घालता येणार नाही. मी सर्वसाधारणपणे तीन महिन्यांचा काळ जाहीर केला आहे. तो कमी पडला तर फेरविचार करता येईल. परंतु एकदा गव्हर्नमेंट शिफ्ट करण्याचे तत्त्व मान्य केल्यानंतर पुढे ज्या गोष्टी करावयाच्या आहेत त्या काळावर ठेवल्या पाहिजेत. असे करण्याने महाराष्ट्र आणि विदर्भ या विभागातील जनतेचा व सर्वांचाच फायदा होणार आहे.

यानंतर, अध्यक्ष महाराज, नागपूर येथील महाराष्ट्र हायकोर्ट बेंचच्या कक्षेत मराठवाड्याचा अंतर्भाव व्हावा याद्दष्टीने जी मागणी करण्यात आली आहे ती चुकीची आहे. मराठवाड्याविषयी अध्यक्ष महाराज, मी म्हणू शकेन की, आम्ही त्या विभागातील जनतेचे मन वळविण्याचा प्रयत्न केला त्याप्रमाणे आम्हाला यश आले. मला मराठवाड्यातील जनतेविषयी संपूर्ण ॲडमिरेशन आहे. महाराष्ट्रात सामील होण्याच्या प्रश्नावर लटपटी खटपटी करणाऱ्या लहान कार्यकर्त्यांपासून ते पुढाऱ्यांपर्यंत सर्वांची एक भावना आहे. किंबहुना अट नाही. करार नाही, बिनतक्रार आणि बिनशर्त महाराष्ट्र व मराठवाडा यांनी एकजिनसीपणाने आणि प्रेमाने एकत्र राहिले पाहिजे अशा तऱ्हेचे मराठवाड्यात एक विशुद्ध वातावरण तयार झाले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या संपूर्ण इतिहासामध्ये मराठवाड्याचा उल्लेख अत्यंत आदराने आणि गौरवाने करावा लागेल. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्या प्रारंभापासून तो संयुक्त महाराष्ट्र पदरात पडेपर्यंत सामान्य जनतेच्या भावनांची एक वेगळीच जात, एक आगळाच प्रकार, मराठवाड्याने आम्हाला दाखविला आहे. त्यांच्या या भावनेला खरोखर तोड नाही. कोणतीही अपेक्षा नाही, कोणतीही मागणी नाही, केवळ महाराष्ट्राशी मिळून जाण्याची भावना, या लोकांच्या भावनांचा विचार न करता एखाद्या गोष्टीला अप्रत्यक्षरीत्या उत्तेजन देणेसुद्धा माझ्या शक्तीबाहेरचे आहे. आमच्या सोयीकरिता या लोकांच्या भावनांची कदर न करता आम्ही त्यांना नागपूरला घेऊन जावे काय ? औरंगाबादला

हायकोर्टाचे बेंच द्यावे अशी त्यांचीही इच्छा होती. परंतु मी त्यांना सांगितले आपण कशाकरिता अडचणी निर्माण करता ? एकंदर राज्याच्या हिताच्या दृष्टीने तुम्ही असा आग्रह धरू नका. मला सांगावयाला मोठा अभिमान वाटतो की, दुसऱ्या क्षणी त्यांनी आपली मागणी बाजूला हटविली. आता त्यांना हायकार्टासाठी नागपूरला चला असे मी तरी कसे सांगू, किंवा तुम्ही तरी तसे कसे सांगू शकाल? आपल्या सोयीकरिता नागपूरला आपल्याला बेंच हवे होते, सरकारने तशी व्यवस्था केली. आता वेगळेपणा निर्माण होईल असे काही करू नका. आपण एकत्र आलो आहोत तर एकत्र राहण्याच्या इच्छेने आणि एकत्र राहण्याच्या पद्धतीने एकत्र राहू या. यात देण्याघेण्याचा प्रश्न नाही. माझी काही दात्याची भूमिका नाही आणि तुमचीही नसावी. मी तर असे म्हणेन की, तुमचे प्रेम मागतो. तुम्ही दाते व्हा. जर कोणी कोणाला काही मागावयाचे असेल तर मी तुमच्याकडे तुमच्या प्रेमाची, तुमच्या सद्‌भावाची भीक मागतो. मला खात्री आहे की, माझे विदर्भातील मित्र मला ही भीक बिनतक्रार घालतील.

अध्यक्ष महाराज, आज प्रश्न आहे तो विदर्भाच्या भावनासंबंधीचा आहे. कायदेशीर तरतुदींचा जो प्रश्न आहे तो वेगळा आहे. त्यात आता जाण्याचे मला कारण नाही. त्यासंबंधात ज्यावेळी कायदा आणू त्यावेळी विचार करू. नागपूरला अधिवेशनासाठी आपण जाणारच आहोत. माझे सन्माननीय मित्र श्री. आवोडे यांनी सांगितले की, तुम्ही नागपूरला आला तर आम्ही तुमचे स्वागत करणार नाही. मला असे म्हणावयाचे आहे की, माणूस आपल्या घरातून दुसऱ्याच्या घरात गेला तर तो स्वागताची अपेक्षा करतो. परंतु आम्ही आपल्याच घरी, आपल्याच माणसाच्या घरी जात आहोत, तेव्हा आम्ही स्वागताची अपेक्षाच करीत नाही. माझे सन्माननीय मित्र श्री. आवोडे मुंबईला येतात तेव्हा त्यांचे स्वागत करण्यासाठी आम्ही स्टेशनवर हारतुरे घेऊन जात नाही. कारण ते स्वतःच्या घरीच येत असतात. स्वतःच्या घरी जाणाऱ्यांचे स्वागत कसले करावयाचे? तसेच आम्ही नागपूरला जाणार म्हणजे आपल्याच घरी, आमच्याच लोकांमध्ये जाणार, त्यासाठी स्वागत कशाला पाहिजे? हा, आमच्या जाण्यामुळे त्यांच्या मनाला प्रसन्नता राहणार नाही असे ते म्हणाले तर ते मी मान्य करीन. परंतु ती प्रसन्नता निर्माण कशी करावी याबद्दलचे आमचे प्रयत्न आहेत. हे प्रयत्न सफल होतील अशी मला आशा आहे.

जी गोष्ट लवकर घडेल असे वाटले नव्हते ती अनपेक्षितपणे लवकर घडून महाराष्ट्र राज्य निर्माण झाले आहे. तसेच याही बाबतीत आमचे प्रयत्न कधीतरी सफल होतील असा मला विश्वास आहे. मी थोडासा अदृश्य शक्तीवर विश्वास ठेवणारा आहे.

महाराष्ट्राचे स्वप्न साकार होण्याच्या मागे जनतेच्या मेहनतीचा भाग आहे आणि आमच्या राष्ट्रीय नेत्यांचे आशीर्वादही आहेत. परंतु जनतेच्या प्रयत्नामागे कोठली तरी अदृश्य शक्ती आहे असे मी मानतो. ही शक्ती महाराष्ट्राच्या याच भागात आहे आणि विदर्भात नाही असे मी समजत नाही. नागपुरमधील काही लोकांचा आमच्यावर राग आहे. त्यांच्या भावना तीव्र आहेत याची कल्पना मला आहे. परंतु त्याचबरोबर विदर्भातील काही जिल्ह्यांमधून आमच्याबद्दल सद्भाव आणि महाराष्ट्र राज्याबद्दलच्या श्रद्धेची भावनाही मी अनुभवली आहे. अध्यक्ष महाराज, राग आणि प्रेम यामधून कोणती गोष्ट टिकणारी आहे ? संशय आणि विश्वास यातून शेवटी कोणती गोष्ट टिकणारी आहे ? राग आलेला माणूस थोडा वेळ रागावतो, परंतु रागावतो, रागावतो म्हणजे किती वेळ ? पाच मिनिटे रागावेल, दहा मिनिटे रागावेल, अर्धा तास रागावेल, अगदी दुर्वासासारखा कोपिष्ट असेल तर तासभर रागावेल. परंतु तासानंतर रागावलेला माणूस जेवढे प्रेम करतो तेवढे दुसरा कोणीही करू शकत नाही हेही मला चांगले माहीत आहे. संशयाचे आणि विश्वासाचेही असेच आहे. मानवी मूल्ये ही विश्वासाची आहेत, बंधुभावाची आहेत. या विश्वासावर, या प्रेमावर आणि या बंधुभावावर आधार ठेऊन मी आशा करतो की आज ज्यांच्या मनात राग आहे, संशय आहे, त्यांचा तो राग आणि संशय लवकरच नष्ट होईल आणि या मराठी राज्याचे समान भागीदार या नात्याने काम करण्यास आमच्या या रागावलेल्या मंडळींना आम्ही तयार करू. त्यांचे प्रेम आणि सहकार्य आम्हाला या राज्यापुरते लाभेल असे नाही तर भारत वर्षाच्या क्षेत्रातही लाभेल याबद्दल मला शंका नाही.

या दृष्टीने विचार करता, मी सभागृहापुढे मांडलेला ठराव हे भावनात्मक ऐक्य साधण्याच्या दिशेने व्यवहारबुद्धीने टाकलेले पहिले पाऊल आहे, सभागृहाने त्याला आपले बहुमोल आशीर्वाद द्यावेत अशी माझी विनंती आहे.

■ ■ ■

Replying to the debate on the issue of holding of one Session of State Legislature every year at Nagpur Shri Chavan explained that opposition Member Shri Vyas's idea of "decentralisation" was against the basic idea of a "Single State" and as such could not be accepted. As regards the period of the Session of the Legislature at Nagpur, Shri Chavan made it clear that although it would not be feasible to fix a specific limit for the purpose, the Government would ordinarily be camping at Nagpur for about three months at the time of the Session there. Shri Chavan pointed out that the demand for the inclusion of Marathwada in the jurisdiction of the Nagpur Bench of the Bombay High Court was not justifiable. He told the House that Marathwada people had also wished to have a separate Bench of the Bombay High Court at Aurangabad. However, they had willingly given up their demand taking into consideration the general welfare of the whole State of Maharashtra. Shri Chavan concluded his speech by saying that the resolution placed before the House was a first practical step towards the achievement of emotional integration. Shri B. S. Vyas thereupon withdrew his amendment.

# तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या दृष्टीकोनासंबंधी चर्चा *

**२४ ऑगस्ट १९६०**

*ह्या चर्चेत भाग घेताना मा. श्री. चव्हाण म्हणाले की एका महत्त्वाच्या ध्येयवादी योजनेची जबाबदारी आपण अंगावर घेत आहोत व त्यातून आपण यशस्वी रीतीने बाहेर पडू असे मला वाटते.*

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसंबंधाने या शासनाचा कोणत्या प्रकारचा दृष्टीकोन आहे याचे प्राथमिक स्वरूपाचे दिग्दर्शन मी सभागृहापुढे ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत करावयाच्या प्रयत्नांचे निश्चित स्वरूप स्पष्ट होण्यासाठी गेले काही महिने प्रयत्न चालले होते व यासाठी हुकमी आराखडा किंवा तर्जुमा तयार करण्यासाठी संयुक्त मुंबई राज्यात आणि नवजात महाराष्ट्र राज्यात सखोल विचार झालेला आहे. ही तयारी करण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या रीतीने अभ्यास करण्यासाठी अभ्यास मंडळे नियुक्त झाली होती आणि ह्या मंडळांनी आपला अहवाल सरकारकडे सादर केलेला आहे. अध्यक्ष महाराज, त्यांनी दिलेल्या माहितीचा सारांश ''अप्रोच टु दि थर्ड फाइव्ह इयर प्लॅन ऑफ दि महाराष्ट्र स्टेट'' ह्या पुस्तिकेतून सभासदांना दिलेला आहे परंतु अजूनही ह्या पुस्तिकेचा अहवालामध्ये निर्देश केलेल्या काही बाबींचा खुलासा करावा लागतो. त्यांनी जे आकडे दाखविले आहेत ते आकडे त्यांनी ज्या दृष्टिकोनातून अभ्यास केला त्याचे दिग्दर्शक आहेत. ही पुस्तिका सभागृहापुढे मांडलेली आहे आणि ह्या योजनेकडे पाहण्याची शासनाची भूमिका मी व्यक्त केली आहे. एका विशिष्ट दृष्टिकोनातून हे

* M.L.C. Debates, Vol. I, Part II, July-August 1960, pp. 745 to 753, 835 to 841.

कार्यक्रम घेण्याची आवश्यकता होती व त्याप्रमाणे हे चित्र सभागृहापुढे मांडण्यात आले आहे. अभ्यास मंडळानी त्याचे स्वरूप रुपये, आणे, पै मध्ये व्यक्त केले आहे व ते येथे दिलेले आहे. परंतु अजूनही राष्ट्रीय योजनेचे तपशीलवार स्वरूप दृश्य झाल्याशिवाय ह्या राज्याचा जो अक्षरशः तिसरा प्लॅन होणार आहे त्याचा तपशीलवार आराखडा, त्यातील नियोजनाचा कार्यक्रम ठरविताना अनेक पेच निर्माण होतात. पहिला पेच असा की, योजना म्हटली की लोकांच्या ज्या गरजा आणि अपेक्षा आहेत त्या सर्व गरजा आणि अपेक्षा पुऱ्या करून देणारा कार्यक्रम म्हणजे योजना अशी सर्वसामान्य लोकांची समजूत असते. अर्थात लोकांची योजनेसंबंधी ही जी समजूत आहे ती एका अर्थाने बरोबर आहे. खेडोपाडी शाळा, विहिरी, रस्ते किंबहुना समाजाने सुखी राहण्याकरिता ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता लागेल त्या त्या मिळाव्यात अशी लोकांची जी अपेक्षा असते ती पुरी झाली की योजना झाली असे सर्वसामान्यपणे मानण्यात येते. माझ्या दृष्टीने ह्या सर्व गोष्टी आणि त्यांना अनुलक्षून असणाऱ्या अपेक्षा ह्या परिणाम स्वरूपाच्या गोष्टी असून समाजाला सर्व सुखसोयी आणि साधने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक अशी आर्थिक शक्ती निर्माण करणे हे योजनेचे महत्त्वाचे अंग आहे. याच्या अनुषंगाने पहिला पेच उभा राहतो तो असा की, कोणत्या गोष्टीला जास्त महत्व देण्यात यावे ? योजनेच्या भूमिकेत प्रोग्रॅम ऑफ सोशल सर्व्हिसेस, प्रोग्रॅम ऑफ इकॉनॉमिक ओव्हरहेड्स आणि प्रोग्रॅम ऑफ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट अशा प्रकारच्या तीन कॅटेगरीज देण्यात आल्या आहेत. अग्रहक्क देण्याच्या संदर्भात विचार केला तर मला असे म्हणावयाचे आहे की, ह्या गोष्टींची उलट्या क्रमाने मांडणी व्हावयास हवी होती. ह्या गोष्टींच्या संबंधांतच खरा पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. तृतीय पंचवार्षिक योजनेसंबंधीच्या भूमिकेत ह्या ज्या तीन गोष्टी निर्दिष्ट करण्यात आल्या आहेत त्या सर्वच महत्त्वाच्या असल्यामुळे पेचप्रसंग निर्माण झाला आहे. खेड्यापाड्यात प्राथमिक शिक्षण, हॉस्पिटल्सची व्यवस्था इत्यादी गोष्टी नको असे कोणी म्हणणार नाही. लोकांना ह्या सर्व साधनांची गरज आहे. परंतु ज्या अर्थी आपण सर्व राज्याच्या प्रश्नांचा उलगडा करण्यासाठी बसलो आहोत त्या अर्थी निश्चित प्रकारची मर्यादित अशी जी साधने आहेत त्यांच्या उपयुक्ततेच्या दृष्टीने कोणत्या गोष्टीला प्राधान्य द्यावे असा प्रश्न निर्माण होतो. इकॉनॉमिक ओव्हरहेड्स या शब्दप्रयोगाचा जो अर्थ आहे तो लक्षात घ्यावयास हवा. आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाला आवश्यक आणि साधनभूत असणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्यांना इकॉनॉमिक ओव्हरहेड्स म्हणतात. औद्योगिक प्रगती आणि शेतीचा विकास हा आर्थिक विकासाचा प्रत्यक्ष कार्यक्रम मानला तर शेतीच्या विकासाला उपयोगी पडणाऱ्या विजेच्या उत्पादनालाही तितकेच

महत्व आहे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या तऱ्हेच्या यंत्र स्वरूपाच्या उद्योगधंद्यांची वाढ करण्याकरिता आवश्यक असणारे तंत्रज्ञ उपलब्ध करून देणे ह्या कामाचाही इकॉनॉमिक ओव्हरहेड्समध्ये अंतर्भाव होतो. या दृष्टीने कोणत्या खर्चाचे आकडे किंवा जी टार्गेटस् असतील त्यांचे निश्चित रूप देणे कठीण आहे. म्हणून असे ठरविण्यात आले आहे की, प्रत्यक्ष तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा सभागृहापुढे विचारासाठी मांडण्याऐवजी ह्या योजनेसंबंधी जी दृष्टी आहे किंवा तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी म्हणून या राज्याचे जे प्रश्न आहेत त्याकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन आहे, जी भूमिका आहे तो दृष्टिकोन आणि ती भूमिका सभागृहापुढे विचारासाठी मांडावी म्हणजे सभागृहाला शासनाला योग्य ते मार्गदर्शन करता येईल. मार्गदर्शन करण्यासारखे प्रश्न कोणते याचा निर्देश ह्या पुस्तिकेत दिलेला आहे. त्या प्रश्नाकडे जाण्यापूर्वी मी माझे काही विचार सभागृहापुढे मांडू इच्छितो.

सामान्यतः योजना म्हणजे काय हे पाहण्याची जी पद्धत आहे त्या बाबतीत कदाचित मतभेद राहतील. योजनेची व्याख्या करणे ही अतिशय अवघड गोष्ट आहे. सगळ्याच गोष्टींची व्याख्या करणे अवघड आहे परंतु आपला आशय साध्य करण्याच्या दृष्टीने व्याख्या करणे सोयीचे आहे. आपण प्लॅन करावयास मागतो म्हणजे काय मागतो तर आमच्या देशात आणि आमच्या राज्यात उपलब्ध असलेल्या पार्श्वभूमीवर आम्ही आमच्या राज्यात काही गोष्टी करावयास मागतो हे स्पष्ट आहे.

मी असे मानतो की, प्लॅन ही एक पद्धत आहे, गतिमान पद्धत आहे तसेच आर्थिक विकास करण्याची ही पद्धत आहे. ही प्लॅनकडे पाहण्याची माझी दृष्टि आहे. अर्थात या आर्थिक विकासात सामाजिक विकास असावा लागतो. म्हणून सामाजिक उद्दिष्टासाठी आर्थिक विकास करण्याचे साधन म्हणजेच नियोजन असे मी मानतो. ही व्याख्या केल्यानंतर आमच्या देशात आम्हांला कोणती गोष्ट साधावयाची आहे ? सामान्यतः असे म्हटले तर हरकत नाही की जेव्हा स्वराज्यप्राप्ती झाली किंवा स्वराज्यप्राप्तीसाठी आम्ही सगळे लोक गुंतलो होतो तेव्हा आम्ही कशासाठी स्वराज्य मागत होतो, स्वराज्याची आवश्यकता निर्माण झाली ती कशासाठी ? केवळ परकीय लोकांना येथून घालवावयाचे होते एवढाच भाग नव्हता तर त्यातील तो एक मुख्य भाग होता, पण त्याचबरोबर जी काही सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे आहेत त्याचीही चर्चा आम्ही आपल्या मनाशी सर्वजण करीत होतो आणि ती जी सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे होती त्यांना निश्चित रूप देण्याचा प्रयत्न ह्या योजनांच्या रूपाने आपण करीत आहोत. आमचे सबंध जीवन, अर्थकारण, अर्थव्यवस्था ही एक प्रकारची ज्याला

स्टॅटिक इकॉनॉमी, स्थिर स्वरूपाचे अर्थजीवन मिळेल अशी करावयाची आहे. अर्थशास्त्रज्ञ जे बोलतात त्यांच्या भाषेत बोलावयास सुरुवात केली तर मी असे म्हणू शकेन की, ज्या अर्थकारणामध्ये नवीन उद्योगधंद्यांच्या कामासाठी सेव्हिंग होईल आणि राष्ट्रीय उत्पन्नात किमानपक्षी ५ टक्के वाढ होईल ते आम्हाला साधावयाचे आहे. आम्हांला देशामध्ये एक प्रकारचे प्रवाही, शक्तिशाली व गतिमान असे अर्थजीवन निर्माण करावयाचे आहे आणि ते करताना आमच्या पुढे काही उद्दिष्टे आहेत. थोड्या लोकांच्या हाती शक्ती केंद्रित व्हावी अशासाठी आम्हाला हे करावयाचे नाही, तर आमच्या पुढे जी सामाजिक उद्दिष्टे आहेत, ती सामाजिक उद्दिष्टे प्रस्थापित करण्यासाठी एक नवीन अर्थशाली व्यवस्था निर्माण करावयाची आहे व ती या नियोजनामुळे होणार आहे. हे प्राथमिक स्वरूपाचे विचार मांडल्यानंतर मी ह्या योजनेसंबंधी काही गोष्टी सांगणार आहे.

अध्यक्ष महाराज, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात आपल्यापुढे काही टास्क्स् म्हणजे कर्तव्ये आहेत. त्या कर्तव्यांमध्ये कोणती उद्दिष्टे आहेत याचा विचार करून त्यातील १, २ व ३ ची उद्दिष्टे ह्या पुस्तकामध्ये दिलेली आहेत. त्यातील पहिली तीन कर्तव्ये फार तर आर्थिक स्वरूपाची आहेत असे म्हणता येईल. चौथी आणि पाचवी कर्तव्ये सामाजिक उद्दिष्टांसंबंधी आहेत. आजच्या समाजात जी विषमता आहे ती दूर करण्यासंबंधीचे पहिले उद्दिष्ट असून दुसऱ्या उद्दिष्टानुसार उद्योगधंद्यांच्या संबंधात लोकांना रोजगार मिळण्याची परिस्थिती निर्माण करावयाची आहे. अशा प्रकारची जी दोन सामाजिक उद्दिष्टे डोळ्यांपुढे ठेवण्यात आली आहेत त्यानुसार प्रयत्न करावयाचा आहे. या प्रयत्नाच्या पाठीमागे जे तत्त्व आहे त्यावर पुढचे धोरण अवलंबून आहे ही भूमिका लक्षात घेऊन आम्ही आमच्या महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक नियोजनाचे जे उद्दिष्ट आहे ते तपासण्याचा प्रयत्न केला तर अनेक प्रश्न उभे राहतात. त्यापैकी एक प्रश्न असा आहे की आम्ही काय करीत आहोत ? आम्ही जो प्रयत्न करीत आहोत तो सर्व हिंदुस्थानच्या प्रयत्नाचा अथवा साधनशक्तीचा एक भाग आहे. या दृष्टीने सर्व हिंदुस्थानात नवीन रचनेचा जो प्रयत्न करण्यात येत आहे त्याच्याशी सुसंगत असा प्रयत्न या राज्यात केला जाणार आहे ही गोष्ट विसरून चालणार नाही. या पार्श्वभूमीवर कमीत कमी जे प्रश्न उभे राहतात त्यांचे चित्र तृतीय पंचवार्षिक योजनेसंबंधीच्या भूमिकेत व्यक्त करण्यात आले आहे. सर्वसाधारणपणे एकंदर योजनेचा विचार करताना, नंतर पोस्ट मॉर्टेम करण्यापेक्षा, काही महत्त्वाच्या गोष्टींच्या संदर्भात या सभागृहाला मार्गदर्शन व्हावयास पाहिजे असे मला वाटते. काही महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधी निर्णय घेत असताना

जे महत्त्वाचे पेच निर्माण होतात ते दूर करण्याच्या दृष्टीने काही तत्त्वांच्या बाबतीत जरूर ते मार्गदर्शन होण्याची आवश्यकता आहे. ज्या गोष्टीला अग्रहक्क देण्यात आला पाहिजे असा जो प्रश्न निर्माण होतो त्याचा आपणाला विचार करावा लागणार आहे. आमच्याजवळ जी काही साधने निर्माण होतील त्यांना मर्यादा आहे. ह्या बाबतीत स्टडी ग्रुपच्या अहवालात जो हिशेब करण्यात आलेला आहे त्यानुसार असे म्हटले आहे की तृतीय पंचवार्षिक योजनेवर या राज्याला ७९०.९१ कोटी रुपये खर्च करता येतील. या गोष्टीला अनुलक्षून मी खालच्या सदनात असे सांगितले की, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी आम्ही ७९० कोटी रुपयांची रक्कम उभी करू शकलो तर आम्हाला हत्तीवरून साखर वाटण्याइतका आनंद वाटेल. परंतु ही गोष्ट घडणार नाही हे निश्चित आहे. कारण आमच्या देशाचा जो सर्व प्लॅन आहे तोच मुळी दुपटीने वाढवावयाचा असून आम्हाला जी रक्कम उपलब्ध होणार आहे ती सर्वसामान्यपणे ४०० ते ६०० कोटींच्या दरम्यान असेल. मी हा उल्लेख एवढ्याचकरिता करतो की, निश्चित साधनांची परिस्थिती असताना कोणत्या गोष्टीला प्राधान्य द्यावे असा जो प्रश्न निर्माण होतो त्याचा आपणाला विचार करावा लागेल. या प्रश्नाचा विचार करीत असताना वैयक्तिक रीतीने मी असे म्हणू शकेन की, आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांना आणि इकॉनॉमिक ओव्हरहेड्सना आपणाला जास्तीत जास्त महत्त्व द्यावे लागेल. त्यासाठी सोशल सर्व्हिसेसच्या कार्यक्रमांचा थोड्या अंशाने त्यागही करावा लागेल, असे म्हणण्याची तयारी या सभागृहाला, राज्याला आणि राज्यातील जनतेला करावी लागेल. या दृष्टीने इकॉनॉमिक डेव्हलपमेंट आणि इकॉनॉमिक ओव्हरहेड्सच्या कार्यक्रमांना अग्रहक्क देण्यात आला तरी आपली जी सामाजिक उद्दिष्टे आहेत त्याकडे दुर्लक्ष होणार नाही असा एक उद्देश डोळ्यांपुढे ठेवण्यात आला पाहिजे. मध्यंतरीच्या काळात आपणाला राज्याच्या आर्थिक जीवनात एक जबरदस्त शक्ती निर्माण करावयाची आहे. शेतीच्या पोषणाकरिता लागणारी शक्तीही सेल्फ जनरेटिंग इकॉनॉमीवर आधारावयास हवी. अशा तऱ्हेची सेल्फ जनरेटिंग इकॉनॉमी अथवा स्वयंचलित अर्थव्यवस्था लौकरात लौकर निर्माण करावयाची असेल तर आमच्याजवळची सर्व साधनसामुग्री आणि शक्ती इकॉनॉमिक डेव्हलपमेंट आणि इकॉनॉमिक ओव्हरहेड्स या कार्यक्रमावर खर्च करावयास पाहिजे. अशा रीतीने या दोन गोष्टींना प्राधान्य देण्यात आले तर तेवढ्यानेच पेच संपतो असे नाही. इकॉनॉमिक डेव्हलपमेंटच्या कार्यक्रमानुसार इरिगेशन घेण्याचे ठरविले तर मोठ्या इरिगेशनच्या योजनांना महत्त्व द्यावयाचे का मध्यम प्रतीच्या व मायनर इरिगेशनच्या योजनांना महत्त्व द्यावयाचे असा आणखी एक पेच निर्माण होतो. महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांच्या

दृष्टीने हा खरा पेच आहे. ज्यावेळी एक चांगली गोष्ट व दुसरी वाईट गोष्ट असेल त्या वेळी सर्वसामान्य माणूस, किंबहुना वेडा माणूससुद्धा हे सांगेल की, चांगली गोष्ट पसंत करावयास हवी. कारण वाईट गोष्टीतून फायदा मिळू शकत नाही. परंतु ज्या वेळी दोन्ही गोष्टी चांगल्या आणि परिणामकारक असतात त्या वेळी कोणती गोष्ट निवडावयाची असा प्रश्न पडतो. ती निवड करण्यासाठी कोणत्या तरी तत्त्वाची कास धरावी लागते. मी हे सर्व इरिगेशनपुरते सांगत आहे. इरिगेशनच्या ज्या महत्त्वाच्या योजना आहेत त्यावर पाच ते दहा कोटी रुपये खर्च करावे लागतात. त्यात रिव्हर बेसिन्स आणि बागायती शेतीची वाढ करणाऱ्या योजनांचा अंतर्भाव केला जातो. दुसरी गोष्ट अशी की ज्यांना आपण दुष्काळी भाग म्हणतो अशा भागात महाराष्ट्राच्या भूमीवर शेकडो मैल लांबी आणि रुंदीचे पट्टे असून त्यात असलेल्या जमिनी लागवडीखाली आणण्याचा कितीही प्रयत्न करण्यात आला तरी त्या शेवटी कोरडवाहूच राहणार आहेत. अशा परिस्थितीत मोठमोठ्या इरिगेशनच्या योजना हाती घ्याव्या की कोरडवाहू जमिनीवर सॉइल कॉन्झर्वेशन व लँड डेव्हलपमेंट करण्याच्या दृष्टीने बंडिंग्ज, विहिरीसारखे मायनर इरिगेशनचे कार्यक्रम हाती घेऊन आपले सर्व सामर्थ्य खर्च करावे असा प्रश्न निर्माण होतो. इरिगेशनच्या ज्या मोठ्या योजना आहेत त्याची प्राथमिक तयारी, खर्च इत्यादी गोष्टी होऊन त्या पूर्ण झाल्यानंतर त्यांचा फायदा प्रत्यक्ष हाती पडेपर्यंत सात ते दहा वर्षांचा कालावधी लागणार असून त्या अवधीपर्यंत शेतकऱ्यांना वाट पाहावी लागणार आहे. तेव्हा मोठमोठ्या इरिगेशनच्या योजनांना प्राधान्य द्यावे का मायनर इरिगेशनच्या कार्यक्रमाला महत्त्व द्यावे असा जो पेचाचा प्रश्न निर्माण होतो त्यासंबंधी महाराष्ट्र राज्याच्या तृतीय पंचवार्षिक योजनेसंबंधीच्या भूमिकेत पॅरिग्राफ ९ मध्ये असा उल्लेख करण्यात आला आहे की, आर्थिक विकास आणि आर्थिक ओव्हरहेड्स यांच्या बाबतीत दीर्घ मुदतीचे कार्यक्रम आणि लौकर पूर्ण होणारे कार्यक्रम यामध्ये एक आंतरिक बॅलन्स, समतोलपणा आणि संविधानता निर्माण करावयास पाहिजे. तेव्हा एकमेकांशी विरोध असणारे हे जे प्रश्न आहेत त्यांच्यामध्ये सुसंवादीपणा निर्माण करण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे. असे जे महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांच्या बाबतीत एक निश्चित धोरण ह्या सभागृहाने सुचविले पाहिजे. मला तसे पाहिले तर मेजर इरिगेशनचे महत्त्व वाटते. त्याचप्रमाणे स्केअरसिटी विभाग आहेत त्यांचाही प्रश्न आपल्याला सारखा भेडसावीत आहे. ह्या दृष्टीने पाहिले तर हिंदुस्थानातील इतर राज्ये घोडदौडीने प्रगती करीत आहेत असे आपल्याला दिसून येते. ह्या बाबतीत काल मद्रासची माहिती मी वाचली. तेथे तामिळनाडूमध्ये असलेल्या सर्व नद्यांच्या पाण्याचा सरकारने शेतीच्या वाढीसाठी उपयोग केला आहे. पण एवढ्यावरच ते सरकार थांबले नाही, तर त्या

राज्याच्या आसपास ज्या नद्या आहेत त्यातील पाण्याचाही त्यांना उपयोग करून घेता यावा म्हणून सर्व देशातील नद्यांच्या पाण्याचे राष्ट्रीयीकरण करावे अशी सूचना त्या सरकारने केली आहे. केवढी महत्त्वाकांक्षी योजना आहे पाहा. म्हणजे आपल्या राज्यात असलेल्या नद्यांतील पाण्याचा तर त्यांनी संपूर्ण उपयोग केलाच आहे, पण दुसऱ्या राज्यातील पाणीही आपल्याला मिळावे अशी ही योजना आहे. फार वर्षांपूर्वी, रामस्वामी अय्यर यांनी गंगेच्या पाण्यासंबंधीही अशीच एक योजना सुचविली होती. नॅशनल सुपर ग्रीडसंबंधी आपण बोलतो त्याप्रमाणे कोयनेची वीज आसाममध्ये जावी आणि भाकरा नानगलची वीज कोल्हापूरला यावी ही कल्पना फार सुंदर आहे, पण प्रत्यक्षात ती कितपत व्यवहार्य आहे हेही पाहिले पाहिजे. आणि जर उद्या खरोखरीच देशामधील सर्व नद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे ठरले तर त्याच्या आधीच आपल्या राज्यातील नद्यांचे पाणी आपल्या राज्यासाठी वाचविण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. यामध्ये कोणाच्या विरुद्ध बोलावे असा माझा हेतू नाही, पण आपल्याजवळ असलेल्या साधनांचा उपयोग आपल्या राज्याच्या विकासासाठी व्हावा हा त्याला कोणी स्वार्थ म्हटले तरी तो दाखविणे चुकीचे होणार नाही. तेव्हा बागायत शेतीच्या बाबतीत काय करावयाचे हा आपल्यापुढे मोठाच प्रश्न आहे. सबंध महाराष्ट्रातील शेतीच्यासंबंधाने आपण येथे अनेक वेळा बोललो आहोत. सबंध महाराष्ट्रातील शेतीचा जो मूलभूत प्रश्न आहे तो कोरडवाहू शेतीचा आहे. कारण आपण ज्या योजना हाती घेतलेल्या आहेत त्यापासून मिळणारे सबंध पाणी जरी वापरले तरी २० ते २५ टक्क्यांपेक्षा जास्त बागायत शेती होणार नाही. अर्थात बाकीची जी शेती राहते ती कोरडवाहू शेती राहते. ह्या कोरडवाहू शेतीचा प्रश्न सोडविणे हा महाराष्ट्रातील शेतीचा मूलभूत प्रश्न आहे. यानंतर साहजिकच आपल्यापुढे असा प्रश्न उभा राहतो की आपण मेजर इरिगेशन आधी हाती घ्यावयाचे की मायनर इरिगेशन घ्यावयाचे? त्याचप्रमाणे लँड डेव्हलपमेंटचा कार्यक्रम आधी हाती घ्यावयाचा की मोठमोठ्या धरणांचा कार्यक्रम हाती घ्यावयाचा? तेव्हा ह्या प्रश्नांच्या बाबतीत काही तरी मार्गदर्शक तत्त्व ह्या सभागृहाने सुचविण्याची आवश्यकता निर्माण होते.

यानंतरचा दुसरा प्रश्न रीजनल डेव्हलपमेंटचा आहे. आपण सबंध महाराष्ट्राचे चित्र डोळ्यांपुढे ठेवले तर दोन तीन महत्त्वाचे प्रश्न उभे राहतात. आपल्या राज्यात काही उपेक्षित भाग राहिलेले आहेत. उदाहरणार्थ, मराठवाड्याचा भाग, त्याचप्रमाणे विदर्भाचा काही प्रमाणात भाग आणि कोकणचा भाग व त्यातील दुष्काळी पट्टे यांच्यासाठी आपल्याला काही तरी केले पाहिजे. मुंबई शहर वगळून बाकी जो विभाग आपल्या

राज्याचा राहतो त्यांच्या मागासलेल्या परिस्थितीचे चित्र नामदार अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात दिलेले आहे. इतर राज्यांच्या मानाने विचार करता आपल्याला असे दिसून येईल की, आपल्या राज्यात अर्बनायझेशन फार वाढलेले आहे. नागरी लोकसंख्या ह्या राज्यात जास्त आहे. तेव्हा हे अर्बनायझेशन वाढत आहे ही गोष्ट लक्षात घेऊन त्या जनतेशी आपले जे संबंध येतात त्याबाबत आपली जबाबदारी आपल्याला टाळता येणार नाही. तेव्हा बाकीचा मागासलेला ह्या राज्याचा हा जो भाग आहे त्याचा जसा विकास झाला पाहिजे त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे सामर्थ्य असलेले जे मुंबई शहर आहे त्या शहराला न विसरता त्या शहराचीही ताकद आपण वाढविली पाहिजे. त्या शहराच्या विकासासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. तेव्हा हे जे पेचप्रसंग आपल्यापुढे आहेत त्यातून यशस्वी रीतीने बाहेर पडावयाचे असेल तर त्यासाठी काही तरी मार्गदर्शक तत्त्वांची आवश्यकता आहे.

यानंतर विदर्भाचा प्रश्न आपल्यापुढे आहे. त्या विभागात सुरेख कापसाची शेती आहे. त्या भागात सिंचाईची शेती होणे कठीण आहे. ज्या नद्या त्या विभागात आहेत त्यांचा उपयोग होतच आहे व शक्यतो मोठमोठ्या योजनांना प्राधान्य दिले पाहिजे. उद्योगधंद्यांची वाढ केल्याशिवाय आपल्याला दुसरा मार्ग नाही. महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांच्या बाबतीत दोन जबाबदाऱ्या ह्या सरकारवर पडतात त्यांचा उल्लेख मी करतो. प्राधान्य दिले इकॉनॉमिक डेव्हलपमेंटला, आणि सोशल सर्व्हिसेसवर कमी भर दिला पाहिजे. याला कारणे काय आहेत तेही मी सांगतो. आपल्या देशाचे जे संविधान आहे त्याप्रमाणे देशामध्ये जी राज्ये आहेत त्यांच्यावर सोशल सर्व्हिसेसची जबाबदारी जास्त टाकलेली आहे. उदाहरणार्थ, एज्युकेशन ही राज्य सरकारची जबाबदारी आहे, हेल्थ ही राज्य सरकारची जबाबदारी आहे, आणि त्यासंबंधाने अपेक्षाही फार मोठ्या आहेत. प्राथमिक शिक्षण, दुय्यम शिक्षण, टेक्निकल शिक्षण, विद्यापीठे यांची जबाबदारी राज्य सरकारवर असल्यामुळे कोणाला आणि कोठे आणि कसे नाही म्हणावयाचे हा प्रश्न पडतो. तेव्हा हा मोठा जबाबदारीचा प्रश्न आहे. मेडिकल सर्व्हिसेसचा विचार केला तरी खेड्यांतून तो मोठाल्या शहरापर्यंत याच्या अनेक डेव्हलपमेंटच्या लेव्हल्स आहेत. तेव्हा मुळात परिस्थितीत अनेक अडचणी आहेत. बरे ह्या सोशल सर्व्हिस ज्या राज्य सरकारवर आहेत त्यांच्याजवळ जी साधने आहेत तीही पाहण्यासारखी आहेत. विक्री कर सोडला तर मात्र असे एकही प्रभावी साधन राज्य सरकारच्या हातात नाही. विक्री कर मात्र असे एक साधन आहे की वाढत्या आर्थिक शक्तीबरोबर त्याचे उत्पन्नही वाढत्या प्रमाणावर आहे. पण याखेरीज बाकीची

जी साधने आहेत ती आक्रसलेली आणि शक्ती न देणारी आहेत. तेव्हा अशा ह्या सीमित परिस्थितीत आपल्याला मोठ्या थोरल्या ध्येयवादी योजनेची जबाबदारी आपल्या अंगावर घ्यावयाची आहे. मला आशा आहे की, आपण ह्यासाठी जर एखादे मार्गदर्शक तत्त्व स्वीकारले तर आपण ह्या जबाबदारीतून यशस्वी रीतीने पार पडू शकू. मी सगळ्याच प्रश्नांची उत्तरे देऊ इच्छित नाही. मी फक्त ह्या चर्चेच्या रूपाने कोणत्या दृष्टिकोनातून कसे प्रश्न उभे राहिले आहेत ते प्रश्न ह्या सभागृहापुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मला आशा आहे की ह्या चर्चेतून शासनाला उपयुक्त आणि मार्गदर्शक असे एखादे तत्त्व निघेल. एवढी आशा व्यक्त करून मी रजा घेतो.

■ ■ ■

Shri Y. B.Chavan placed before the Assembly the draft of 3rd Five Year Plan of Maharashtra State which included technical education, transport and power generation and economic growth and expressed the hope that Maharashtra would emerge successful from this experiment.

# कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षांचे सदस्य होण्यावर असलेल्या निर्बंधांचे शिथिलीकरण *

**१६ डिसेंबर १९६०**

*वर उल्लेखिलेले निर्बंध सध्या उठविणे किती धोकादायक ठरेल हे मा. श्री. चव्हाण यानी आपल्या भाषणात सांगितले.*

अध्यक्ष महाराज, एका महत्त्वाच्या ठरावाची चर्चा थोडा वेळ झाली आणि त्या ठरावावर झालेली सर्व भाषणे मी काळजीपूर्वक ऐकण्याचा प्रयत्न केला. अर्थात जेवढे ऐकण्यासारखे होते तेवढेच मी ऐकले आहे. अडचण अशी आहे की ज्यांनी हा ठराव मांडला त्यांची आपल्या शब्दाबद्दल खात्री नाही. तेव्हा कल्पनेने मी उत्तर देणार आणि ते उत्तर ते स्वीकारणार याला माझा नाइलाज आहे. त्यांचा हा ठराव एक तात्त्विक भूमिका उभी करतो. ती उभी केल्यानंतर त्यामध्ये व्यवहाराकरिता मांडलेली भूमिका निराळी आहे आणि त्यांच्या मनात असलेली दुसरी कोठली तरी भूमिका आहे. मल्टी-पार्टीज ही तात्त्विक भूमिका झाली, परंतु ठरावात ती अजिबात आढळत नाही. त्यांचा मल्टी-पार्टीजवर विश्वास आहे असे मी धरून चालतो, त्या बाबतीत शंका निर्माण करावयाची तर तसे म्हणता येणार नाही. परंतु जी शंका निर्माण होते ती अशी की ते ज्या पद्धतीने बोलतात आणि ठरावामध्ये शब्दांची रचना करतात त्यावरून त्यांच्या मनात, मी असा शब्द वापरतो की, काहीतरी डाव असला पाहिजे असे सिद्ध होते. प्रश्न असा आहे की ह्या राज्याचा मल्टी-पार्टीज सिस्टिमवर विश्वास आहे. अनेक पक्षांचे अस्तित्व व आवश्यकता यावर आमच्या लोकशाही पक्षाचा विश्वास आहे. तेव्हा त्यांच्या मनात जी तात्त्विक भूमिका आहे ती माझ्या मनात नाही आणि त्यांच्या विचारात

* M.L.C.Debates, Vol. II, Part II, 16th December 1960, pp. 519 to 522.

आणि माझ्या विचारात मुळात फरक आहे. आपली राज्यपद्धती जर एकपक्षीय असती तर सरकारी आणि बिनसरकारी अधिकारी कोण आहेत, राजकीय पक्षाचे सभासद कोण आहेत किंवा कोण नाही हा प्रश्न उत्पन्न होऊ शकत नाही. असले तर ते सर्व एकाच पक्षाचे असले पाहिजेत आणि तसे असले तर या तात्त्विक भूमिकेला अर्थ राहात नाही. तेव्हा प्रश्न असा उपस्थित होतो की ज्या सिस्टिममध्ये आपण कार्य करतो ती यशस्वी करण्याचा हेतू आहे हे यातून दिसून येत नाही. त्यांनी सूचना मांडली ती मनोरंजक आहे आणि त्या बाबतीत जे बोलले गेले तेही मनोरंजकपणाचे आहे. आपल्यापुढे जो प्रश्न आहे त्या बाबतीत डेमॉक्रॅटिक कंट्रीजमधून विचार जनतेमध्ये चालू आहे. इंग्लंड-अमेरिका या देशामध्ये कमिटी नेमून या बाबतीत विचार चालू आहे आणि त्या कमिटीचा रिपोर्ट देखील प्रसिद्ध झालेला आहे. त्या रिपोर्टाचे मी आकलन केले आहे असा माझा दावा नाही, पण त्यांनी ज्या शिफारशी केल्या आहेत त्याच्याशी मी परिचित आहे. मूळ प्रश्न फंडामेंटल राइटस्‌चा आहे आणि सर्वसामान्य मास्तरांच्या भूमिकेतून त्या बाबतीत बोलले गेले. प्रत्येकाला नागरी हक्क असावा आणि प्रत्येकाला पक्षाचा सभासद होण्याचा अधिकार असावा तर सरकारी नोकरांना तो का नसावा? हा प्रश्न दिसावयास ठीक दिसतो, पण हिंदुस्थान सरकारच्या दृष्टीने विचार केला तर आपल्या येथील श्रीगणेशः लिहू शकत नाही असा सर्वसामान्य शेतकरी किंवा उदाहरण म्हणून सांगतो की चांदा येथील एखादा आदिवासी शेतकरी किंवा कोकणामधील एखादा खेड्यातील शेतकरी हा त्या त्या कॉन्स्टिट्यूअन्सीमधील मताचा अधिकारी असणार आणि त्या जिल्ह्यातील डी.एस्‌.पी.चे अधिकार भोगणारा इसम हाही मताचा अधिकार असलेला असणार आणि ते दोघेही राजकीय पक्षाचे सभासद असावेत असे म्हणण्यात मोठी क्रांती आहे. देशात समानता निर्माण झाली पाहिजे या दृष्टीने हिंदुस्थानातही आपल्याला विचार केला पाहिजे, परंतु या स्टेजला यावयास आपल्याला बराच अवकाश आहे. हा विचार करताना आपण किती मर्यादेपर्यंत जावे अशी भूमिका मी घेतलेली नाही किंवा त्या बाबतीत कालखंडाची भूमिका घालूनही मी बोलणार नाही. त्याचप्रमाणे आपण म्हणता त्याप्रमाणे आताच सुधारणा झाली पाहिजे असेही नाही. हिंदुस्थानमध्येही या प्रश्नाचा विचार करावा लागेल, पण त्यासाठी थांबावे लागेल आणि किती वेळ थांबावे लागेल हे सांगता येणार नाही.

यामध्ये दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यांनी सांगितले की ह्या देशात प्रत्येक माणसाला राजकीय पक्षामध्ये किंवा ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये मत व्यक्त करण्याचा आणि

त्या दृष्टीने आचार करण्याचा अधिकार आहे. ही फंडामेंटल राइटस्‌ची भूमिका त्यांनी घेतली. त्याचबरोबर दुसरा एक अधिकार आहे. घटनेमध्ये त्याचा उल्लेख नसला तरी मला असे सांगावयाचे आहे की राजकीय कारभार आणि दैनंदिन शासन निःपक्षपाती असणे आवश्यक आहे. ते नुसते तसे असून भागत नाही तर ते तसे आहे असा विश्वास जनतेमध्ये निर्माण होणे अवश्य असते. अशा प्रकारच्या न्यायालयीन कोर्टाचाही निर्णय आहे. तेव्हा अशा तऱ्हेचा विश्वास होण्याच्या दृष्टीने दैनंदिन कारभार ज्यांच्याकडून व्हावयाचा त्या माणसाच्या डोक्यावर लाल, तांबड्या किंवा काळ्या रंगाच्या टोप्या घालावयाच्या आणि भिन्न  भिन्न टोप्यांचे सरकारी अधिकारी आहेत असे म्हटल्यावर काय परिस्थिती निर्माण होईल याची मला कल्पना येत नाही. विनोदाने बोलावयाचे तर एकमेकांला टोप्या घालण्याचा ते प्रयत्न करतील. दुसरी गोष्ट अशी की आपण ज्युडिशिअरी आणि एक्झिक्युटिव्ह निराळे केले आहे, तेव्हा अशा तऱ्हेचे बोलल्यामुळे एक प्रकारचा विरोधाभास निर्माण होतो. चीफ जस्टिस हा पार्लमेंटचा किंवा या सभागृहाचा सभासद झाला तर काय आपत्ती ओढवेल हे कळणार नाही. फंडामेंटल राइटस्‌संबंधी आपण बोलतो त्यावेळी ते तितके सोपे नाही हे लक्षात घेतले पाहिजे. जसे फंडामेंटल राइटस् आहेत तशा फंडामेंटल रिस्पॉन्सिबिलिटीजही आहेत. ज्यावेळी आपण समाजामध्ये एखादी जिम्मेदारी पत्करतो त्यावेळी आपल्याला दुसऱ्या काही गोष्टींचे दान द्यावे लागते. लोकशाहीमध्ये सरकारी यंत्रणा ही जबाबदारी पेलणारी यंत्रणा आहे. ह्या यंत्रणेमध्ये महत्त्वाच्या जागी येताना दुसऱ्या महत्त्वाच्या गोष्टीचे दान करावे लागते तेव्हाच हा अधिकार प्राप्त होतो. एखादा सरकारी नोकर मंत्री झाल्यानंतर त्याला सरकारी नोकर म्हणून आपल्या जागेवर राहता येणार नाही. आपल्या जागेचा त्याग केल्याशिवाय त्याला या दुसऱ्या गोष्टीची जबाबदारी स्वीकारता येणार नाही. नागरी हक्काचे संरक्षण करण्यासाठी ही यंत्रणा तयार झालेली आहे. तेव्हा या दोन तत्त्वामध्ये बॅलन्स ठेवावा लागेल. परंतु त्याचबरोबर आपण एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे व ती अशी की, आपल्या देशातील प्रत्येक माणसाला - मग तो सरकारी अधिकारी असो किंवा नसो - कोणत्याही राजकीय पक्षाबद्दल आपले मत प्रदर्शित करण्याचा अधिकार आहे. ही गोष्ट अगदी साफ आहे. प्रत्येकाला अगदी स्वतंत्रपणे विचार करण्याचा अधिकार आहे, एवढेच नव्हे तर एका अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगी आपला हा विचार अंमलात आणण्याचासुद्धा अधिकार आहे. आपल्या देशातील लोकांना डिफ्रँचाइज केलेले नाही. त्यांचा मतदानाचा हक्क काढून घेतलेला नाही. इतर सामान्य मनुष्याप्रमाणे प्रत्येक सरकारी नोकरसुद्धा आपला हक्क अंमलात आणू शकतो.

सन्माननीय सभासद श्री. भिडे हे समजा आपल्या राज्याचे नामदार मुख्यमंत्री आहेत. आपल्याला अशी कल्पना करण्यास काहीच हरकत नाही. तेव्हा सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी समजा एखाद्या सरकारी नोकराला असे वाटले की हे मुख्यमंत्री असता कामा नयेत तर त्याला त्यांच्याविरुद्ध मत देता येईल व तेसुद्धा त्यांच्या किंवा इतर कोणाच्याही नकळत देता येईल. अशा रीतीने आजसुद्धा प्रत्येक सरकारी नोकराला या पोलिटिकल ॲक्टिव्हिटीमध्ये भाग घेता येतो. राजसत्तेला जन्म देण्याजोगी इफेक्टिव्ह ॲक्टिव्हिटी आहे ही. इतका मोठा हा अधिकार आहे आणि त्यामुळेच एका तऱ्हेचा बॅलन्स साधलेला आहे. हा फंडामेंट्‌ल राइट प्रत्येकाला दिलेला असून ते याचा वापर मर्यादित प्रमाणात करू शकतात. पे कमिशनच्या अहवालात याबद्दल एक स्वतंत्र चॅप्टर आहे.

हा चॅप्टर त्यांनी वाचण्यासारखा आहे. तो त्यांनी स्वीकारावा असा माझा आग्रह नाही. या चॅप्टरमध्ये यु.के. आणि यु.एस्.ए. मध्ये कोणत्या गोष्टी स्वीकारण्यात आलेल्या आहेत त्यांचाही उल्लेख केलेला आहे. त्या देशामध्ये सरकारी नोकरवर्गाचे तीन भाग पाडण्यात आले असून त्यापैकी पहिल्या भागात येणाऱ्या सरकारी नोकरांनी कोणत्याही राजकीय ॲक्टिव्हिटीमध्ये भाग घेता कामा नये असे कंप्लीट रिस्ट्रिक्शन आहे, दुसऱ्या भागात येणाऱ्या सरकारी नोकरांवर याबाबतीत पार्शल रिस्ट्रिक्शन आहे व तिसऱ्या भागात येणाऱ्या नोकरांवर अजिबात बंधन नाही. परंतु ही पद्धत स्वीकारण्याजोगी परिस्थिती आज हिंदुस्तानात नाही. आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या आपला देश तितका परिपक्व आहे की नाही हे सुद्धा आपल्याला पाहिले पाहिजे. परंतु त्या पद्धतीतील सामान्य तत्त्व मात्र आपण स्वीकारले आहे. त्याचप्रमाणे योग्य वेळी ती पद्धत आपल्या येथेसुद्धा संपूर्णपणे अंमलात आणण्याबद्दल आपल्याला विचार करावा लागेल. काही सरकारी नोकर असे असतात की त्यांच्यावर सरकारी धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असते. तेव्हा अशा प्रकारच्या नोकरांनी कोणत्याही राजकीय चळवळीत भाग घेता कामा नये असे बंधन घातलेच पाहिजे. परंतु ज्यांच्यावर अशी जबाबदारी नाही त्यांच्यावर असे बंधन घालण्याची तितकीशी जरूरी नाही हे मीसुद्धा कबूल करतो. सन्माननीय सभासदांनीसुद्धा असा उल्लेख केला की, आता तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात पब्लिक सेक्टरचे फील्ड हे वाढत जाईल. या क्षेत्रात काम करणारा माणूस हा डायरेक्टली सरकारी नोकर आहे असे मानता येणार नाही. आता हे क्षेत्र वाढणार याचा अर्थ असा की, जास्त जास्त लोक या क्षेत्रात येणार. तेव्हा राजकीय चळवळीपासून बाजूला

सारणारा असा एक वाढता वर्ग आपण निर्माण करणार आहोत की काय असा प्रश्न उपस्थित होतो. अशा तऱ्हेच्या नोकरांना या बंधनातून मुक्त करण्याची आवश्यकता आहे असे तत्त्वतः मान्य करावयास हरकत नाही असे मला वाटते व या गोष्टीचा योग्य वेळी विचारही केला जाईल असा मला विश्वास आहे.परंतु मूलतःच या पोलिटिकल सिस्टिमवर ज्यांचा विश्वास नाही त्यांना ही सूचना करण्याचा नैतिक अधिकार कसा काय पोहोचतो ते मला समजत नाही. मी त्यांच्या कायदेशीर अधिकाराबद्दल बोलत नाही. या सन्माननीय सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सभासदाला कोणताही ठराव आणण्याचा कायदेशीर अधिकार आहे. त्याप्रमाणे त्यांनी हा ठराव येथे मांडला आहे व त्यावरील माझे विचारही मी व्यक्त केले आहेत. परंतु ज्या शब्दांत हा ठराव मांडला आहे ते शब्द त्यांना पसंत नाहीत. या ठरावात जे तत्त्व आहे त्यावर त्यांचा विश्वास नाही. अशा परिस्थितीत या ठरावाला विरोध न करता दुसरे काय करता येईल ते मला समजत नाही. हा ठराव मी मान्य करू शकत नाही, किंबहुंना तो विचार करण्यासारखा ठराव नाही असे माझे मत आहे.

▪▪▪

On 16th December 1960, Shri V.G.Phatak, M.L.C. brought a resolution in the Legislative Council regarding removal of restrictions on employees of Government and semi-Government institutions on their becoming members of political parties, to which Shri Y.B.Chavan, Chief Minister expressed his opposition. He gave reasons for not removing such restrictions on Govt. and semi-Government employees on their becoming members of political parties. The resolution was lost.

# राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा*

**१६ डिसेंबर १९६०**

*वरील चर्चेतून निर्माण झालेल्या कांही प्रश्नांवर*
*मुख्यमंत्री मा. श्री. यशवंतराव चव्हाण यानी तपशीलवार खुलासा केला.*

अध्यक्ष महाराज, माननीय राज्यपालांच्या भाषणावर या ठिकाणी तपशीलवार चर्चा झाली आहे. ही चर्चा उद्‌बोधकही झाली आहे. ही चर्चा जशी सभागृहाला उपकारक ठरली आहे तशीच ती शासनालाही उपकारक ठरेल अशी मला आशा आहे. या चर्चेमध्ये निर्माण झालेल्या काही प्रश्नांवर तपशीलवार खुलासा करण्याची आवश्यकता आहे.

सामान्यतः राज्यपालांच्या भाषणावरील चर्चा म्हणजे आपापले दृष्टिकोन मांडण्याची एक संधी आहे. परंतु हे दृष्टिकोन मांडीत असताना राज्यपालांच्या भाषणांमध्ये असलेल्या एखाद्या घोषणेवर किंवा ज्या शब्दांच्या सहाय्याने विचार मांडलेले असतील त्या शब्दांवर टीका करीत असताना टीका वास्तववादी असली पाहिजे असे मला म्हणावयाचे आहे. उदाहरणार्थ, शेवटच्या माननीय सभासदांचे भाषण मी आता ऐकत होतो. त्यांनी मराठी भाषेबद्दल उल्लेख केला. मराठी भाषेच्या उत्थानाचे आणि विकासाचे धोरण महाराष्ट्र सरकारने जाहीर केले आहे, नव्हे त्या धोरणाला हे सरकार बांधले गेले आहे. त्यासाठीच महाराष्ट्र सरकार जन्माला आले आहे. महाराष्ट्र सरकारने हे धोरण जाहीर केल्यानंतर सहा महिन्यांनी या सरकारने त्याबाबत कोणती पावले टाकली आहेत असा प्रश्न केला तर ते स्वाभाविक म्हणता येईल. तो प्रश्न योग्य

* M.L.C.Debates, Vol. III, Part II, Feb.-April 1961, pp. 143 to 153.

आहे असेच मी म्हणेन. परंतु अमुक वेळेला मराठीत पत्रव्यवहार का केला नाही अशा प्रकारचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करणे म्हणजे आपल्याला हा प्रश्न नीट समजलेला नाही असे मला म्हणावे लागते. अध्यक्ष महाराज, राज्यपालांच्या भाषणामध्ये साधारणतः सरकारच्या धोरणाची दिशा दाखविण्याचा प्रयत्न असतो. या धोरणाला अनुसरून सरकार निश्चित कोणत्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करणार आहे या बाबतीतल्या काही गोष्टींचा उल्लेख असतो. काही गोष्टींचा उल्लेख अर्थमंत्र्यांच्या भाषणात असतो. सामान्यतः कार्य करण्याची दिशा कोणती राहील हे सांगत असताना गतवर्षी केलेल्या काही महत्त्वाच्या गोष्टींचा अहवाल त्यांत मांडण्याची प्रथा असते. या दृष्टिकोनातून राज्यपालांच्या भाषणावर टीका व्हावयास पाहिजे. तपशीलवार गोष्टी त्यामध्ये आपल्याला सापडणार नाहीत.

या सभागृहात शिक्षणाच्या प्रश्नावर नेहमीच उद्‌बोधक अशी चर्चा होते. या विषयावर चर्चा होत असताना विद्यार्थ्यांना एन्.सी.सी. सक्तीची असावी असा मुद्दा अधूनमधून मांडला जात असतो. माझे सन्माननीय मित्र, श्री गोगटे यांनी आपल्या भाषणात हा मुद्दा मांडला. त्यांनी सक्तीच्या लष्करी शिक्षणाची कल्पना मांडली. लष्करातील ऑफिसर्सच्या केडरसाठी लोक पुढे यावेत यासाठी सैनिकी शिक्षणाच्या शाळा काढण्याचाही उल्लेख त्यांनी केला आहे. सैनिकी शिक्षणाच्या शाळेचा उल्लेख राज्यपालांच्या भाषणात आहेच. सातारा येथे डिफेन्स मिनिस्ट्रीच्या सल्ल्याने अशा प्रकारची एक शाळा सुरू होत आहे. आमच्या मनात बरेच दिवसांपासून ही कल्पना होती व त्या दिशेने हे पहिले पाऊल पडत आहे. हे पाऊल संपूर्णपणे समाधानकारक आहे की नाही याबद्दल चर्चा होऊ शकते. परंतु, संपूर्ण सक्तीच्या लष्करी शिक्षणाची कल्पना ज्यावेळी पुढे येते त्यावेळी आमच्या डोळ्यापुढे त्यांची शिक्षणाची कल्पना काय आहे, आजच्या परिस्थितीचे त्यांचे निदान काय आहे यासंबंधी मूलभूत असा प्रश्न उभा राहतो. मला असे वाटते की, आजच्या वास्तव परिस्थितीचे चित्र काही लोकांपुढे नाही. काही गोष्टी घोषणा बनतात, घोषवाक्ये बनतात, शब्द बनतात. परंतु या सभागृहाने कोणत्याही प्रश्नाची चर्चा करीत असताना आजच्या परिस्थितीचे वास्तव मूल्यमापन करून दैनंदिन अंमलात येणाऱ्या कार्यक्रमासंबंधी निर्णय घेण्याची जिम्मेदारी या सभागृहाची आणि शासनाची आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मीदेखील अशी घोषणा करू शकेन की, लष्करी शिक्षण जिकडेतिकडे झाले पाहिजे. परंतु, हे करण्यासाठी लागणारी साधने आमच्याजवळ आहेत की नाहीत. आमची परिस्थिती त्यासाठी अनुकूल आहे की नाही याचा वास्तववादी भूमिकेवरून विचार करणे ही मोठी

जबाबदारी आहे. एन्.सी.सी. मध्ये प्रत्येक मुलगा गेला तर मला आनंदच होईल. परंतु मला असे म्हणावयाचे आहे की, महाराष्ट्रातील मुलांवर लष्करी शिक्षण घेण्यासाठी सक्ती करावी लागणार असेल तर ती काही मोठी चांगली गोष्ट होणार नाही. लष्करी शिक्षणाबद्दल आम्ही जरूर अभिमान बाळगतो. परंतु, ते लोकांना ओढून आणून सक्तीने देण्याची पाळी या महाराष्ट्रात आली तर तो महाराष्ट्राचा विजय आहे की पराजय आहे? आम्हाला प्रयत्न जरूर केले पाहिजेत. आज एन्.सी.सी.च्या दोन ब्रँचेस आहेत. आमच्या शिक्षणमंत्र्यांचे या बाबतीत प्रयत्न चालले आहेत. आताच मी डिफेन्स मिनिस्टरशी चर्चा केली. त्यावरून हिंदुस्थान सरकारच्याही अडचणी आहेत असे दिसून आले. आपल्या राज्यात जशा अडचणी आहेत, तशाच इतर राज्यातही आहेत. महाराष्ट्रापुढेच या अडचणी आहेत असे नाही. परंतु सरकारने लष्करी शिक्षण सक्तीचे केले पाहिजे आणि आम्ही मात्र काही करू नये अशी परिस्थिती येते. आम्ही सक्तीचे लष्करी शिक्षण करण्याची भाषा बोलणार व ते करण्याची जबाबदारी शासनाची आहे असे म्हणून आम्ही स्वस्थ बसणार असे करून चालणार नाही. हा ॲप्रोचचा प्रश्न आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, ॲडमिनिस्ट्रेशनवर किंवा पॉलिसीवर जेव्हा टीका होते तेव्हा त्यातून शासनाला काही मार्गदर्शन झाले पाहिजे या भूमिकेतून ती टीका झाली पाहिजे. नुसती घोषवाक्ये किंवा घोषणा फेकल्या तर त्यामुळे निराशा येते. यातून काही निर्माण होणार नाही. या ठिकाणी शिक्षण तज्ज्ञ आहेत त्यांनी कॉलेजमधील मुलांनी एन्.सी.सी. घेण्याच्या मार्गातील या ज्या अडचणी आहेत आणि त्या या मार्गांनी दूर केल्या पाहिजेत. या पद्धतीने ॲप्रोच केला तर विद्यार्थी लवकर तयार होतील अशा काही सूचना आल्या असत्या तर मी त्यांचे स्वागत केले असते. परंतु ते करता नुसते एन्.सी.सी. सक्तीचे झाले पाहिजे असे घोषवाक्य कोणी या ठिकाणी बोलले तर मी असे म्हणेन की, या माणसांना एन्.सी.सी.चा प्रश्न कळलेला नाही. वास्तविक ॲडमिनिस्ट्रशनचे जे दैनंदिन प्रॉब्लेम्स आहेत त्यातून निर्माण होणारी जी इम्प्लिकेशन्स आहेत त्यांच्या बाबतीत या ठिकाणी काही मार्गदर्शन होईल अशी माझी अपेक्षा होती. परंतु हा दृष्टीकोन न ठेवता जी टीका केली जाते तीमुळे प्रश्न समजावयाला मदत होत नाही. त्यातून मार्ग निघत नाही. प्रश्नांची गुंतागुंत होण्यापलीकडे त्यातून काही निघत नाही.

शिक्षणाच्या प्रश्नांसंबंधी आणखीही दोन तीन मुद्यांचा उल्लेख करण्यात आला. माननीय सभासद श्री. देशपांडे यांच्या भाषणात बरीच निराशा- एक प्रकारची फ्रस्ट्रेशनची वृत्ती दिसली. ती मीही शेअर करतो. परंतु ध्येयवादी माणसाने या दृष्टीने या प्रश्नाकडे

पाहता कामा नये. ते या क्षेत्रातले एक चांगले आणि कळकळीचे कार्यकर्ते आहेत. त्यांना असे वाटते की शिक्षण वाढते आहे. परंतु त्याचबरोबर गुणाची वाढ होत नाही. शासनाला या प्रश्नाचा वारंवार विचार करावा लागेल. शिक्षणाने अनेक साधने उपलब्ध होतात. सामर्थ्य खुले होण्याचे रस्ते सापडतात. परंतु यामध्ये निराशा उपयोगी नाही. आपण एकमेकांच्या जागा बदलल्या तरी त्यातून मार्ग निघणार नाही. हा सबंध समाजाचाच प्रश्न आहे. या प्रश्नाकडे कोणत्या दृष्टीने पहावे याची चर्चा होणे चांगले. मला स्वतःलाही सरकारच्या या बाबतीतल्या जबाबदारीची आठवण करून दिली पाहिजे असे वाटते. त्यामुळे ज्याला आपण ''लाऊड थिंकिंग'' म्हणता ते होते. जेव्हा जेव्हा ह्या बाबतीत मला बोलावे लागले तेव्हा तेव्हा मी असे म्हटले आहे की, जर अशा तऱ्हेचे तरुण नागरिक आपण ह्या शिक्षण पद्धतीतून निर्माण करू शकलो नाही तर सक्तीने ती पद्धत बंद करावी लागेल. तेव्हा त्यांचा दृष्टिकोन मला समजू शकतो. पण काही झाले तरी ह्या बाबतीत निराशेने विचार करून चालणार नाही. आपण आशावाद बाळगला पहिजे आणि प्रयत्न करीत राहिले पाहिजे. आजपर्यंत आपल्याला ज्याप्रमाणे विनोबाजींसारखी माणसे मिळाली तशीच यापुढेही अधिक माणसे निर्माण होतील अशी मला जरूर आशा वाटते. म्हणून सन्माननीय सभासद श्री. देशपांडे यांना मी असे सांगेन की, कृपा करून ध्येयवाद टिकवून धरावा, निराशावाद सोडून द्यावा. शिक्षणाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सभासदांनी आपली पोटतिडीक येथे बोलून दाखविली. प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्था आणि त्यात शिक्षण घेत असलेले विद्यार्थी यांच्या काही अडचणी आहेत हे मी समजतो. त्याचप्रमाणे सन्माननीय सभासद कदाचित असे म्हणतील की, तुम्ही तत्त्व मान्य आणि तपशील अमान्य असे करता, हेही मला मंजूर आहे.

शिक्षणाचा विचार करताना मी शिक्षण आणि शेती हे दोन विषय एकत्र करतो, कारण हा बिगर इन्व्हेस्टमेंटचा प्रश्न आहे. जो शिक्षक आपल्या मुलांना शिक्षण देऊन उत्तम नागरिक करणार आहे तो अधिक समाधानी झाला तर मलाही हवा आहे. आणखी काही दिवसांनी आपण अंदाजपत्रकावर चर्चा करणार आहोत त्यावेळी सन्माननीय सभासदांच्या ही गोष्ट लक्षात येईल की, महाराष्ट्र सरकार गेली एक दोन वर्षे शिक्षणावरील खर्च सारखा वाढवीत आहे, शिक्षणाच्या बाबतीत थोडासा रेकलेस प्रयत्न होत आहे असे मला वाटते. अगदी पब्लिक फायनान्सची जी सगळी तत्त्वे आहेत ती ह्याही बाबतीत लावण्याचे ठरविले असते तर कदाचित आजपर्यंत शिक्षणाच्या बाबतीत हे सरकार जी पावले टाकू शकले ती टाकणे शक्य झाले नसते. इकॉनॉमिक कन्सेशन्स

सरकार देते हा सरकार एक प्रकारचा परोपकार करते असे श्रीमती शकुंतलाबाई म्हणाल्या, पण मला तसे वाटत नाही. सरकार हा परोपकार करीत नसून सरकारचे एक कर्तव्य ह्या नात्यानेच करीत आहे. दुसरी गोष्ट त्यांनी सुचविली की, कोणत्याही पालकाच्या मुलांना हे इकॉनॉमिक शैक्षणिक कन्सेशन्स देताना अशी अट घालण्यात यावी की, फक्त तीन मुलांपर्यंतच हे कन्सेशन देण्यात येईल. पण असे करणे योग्य होईल असे मला वाटत नाही. पहिल्या तीन मुलांना ही कन्सेशन्स द्यावयाची आणि चौथ्या मुलाला द्यावयाची नाहीत असे करणे योग्य होणार नाही. कारण एखाद्या पालकाचा चार किंवा पाच मुले असली तर तो आईबापांचा दोष आहे, मुलांचा नाही, मग आईबापांच्या चुकीबद्दल मुलांना शिक्षा करणे कसे योग्य होईल ? असे केले तर चोराला सोडून संन्याशाला फाशी दिल्यासारखे होईल. ही जी कन्सेशन्स दिली जातात ती कन्सेशन्स म्हणजे सवलती म्हणून असतात, त्यासाठी दुसरा शब्द सरकारने कधीही वापरलेला नाही. कारण समाजाचे बौद्धिक आणि सांस्कृतिक परिपोषण करणे हे सरकार आपले कर्तव्य समजते आणि ही जबाबदारी शासनाने स्वीकारलेली आहे, आणि ही कमिटमेंट दरसाल वाढत आहे. ही कमिटमेंट याच्यापुढे किती वाढेल याचाही मी हिशोब केलेला नाही. ह्या वर्षाचे रिव्हाइज्ड बजेटची चर्चा करीत असताना मी ते वाचले तेव्हा मला असे दिसून आले की, शिक्षणावरील खर्च ७० टक्क्यांनी वाढलेला आहे आणि मी हे सांगतो की मला त्याबद्दल मुळीच दुःख झाले नाही.

मी असे सांगत होतो की, शिक्षण आणि शेती हे विषय लार्जर इन्व्हेस्टमेंटचे प्रश्न आहेत. माध्यमिक शिक्षक काय किंवा प्राथमिक शिक्षक काय ह्या दोन्ही प्रकारच्या शिक्षकांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. लक्षावधी मुलांना योग्य शिक्षण देवून त्यांना उत्तम नागरिक बनविण्याचे काम त्यांच्यावर अवलंबून आहे. कोणत्या मॅनेजमेंटचा राग आहे किंवा लोभ आहे ह्या वादात मी शिरत नाही. काही मॅनेजमेंटस्‌मध्ये अलीकडे जरी बिझिनेसची वृत्ती आली असली तरी त्या संस्था ज्यांनी काढल्या ती ध्येयवादी माणसे होती. यापैकी काही थोडीशी बिझिनेसवाली मंडळी असली तरी पुष्कळशी मंडळी शिक्षणाचा प्रसार व्हावा ह्या ध्येयवादाने पुढे आली होती व त्यांनी स्वार्थत्याग करून व वेळप्रसंगी हालअपेष्टा सहन करून ह्या संस्था स्थापल्या व नावारूपास आणल्या अशा एका संस्थेची पर्सनल सिक्युरिटी घेतलेला मी एक मनुष्य आहे हे मी मुद्दाम येथे सांगतो. हे करीत असताना कोणती बिझिनेस दृष्टी होती ? दुसऱ्यांची मुले शिकून वर यावीत हाच या मागे हेतु होता. अशा रीतीने ध्येयवादाने प्रेरित होऊन काही मंडळी पुढे आल्यामुळे महाराष्ट्रात अशा अनेक संस्था निघालेल्या आहेत. सहा

महिन्यांपूर्वी आपले राष्ट्राध्यक्ष **डॉ. राजेंद्र प्रसाद**[६६] हे महाराष्ट्रात आले होते तेव्हा त्यांनी असे उद्‌गार काढले की, महाराष्ट्रात खाजगी शिक्षण संस्थांनी शिक्षण संस्था काढून शिक्षणाच्या क्षेत्रात फार मोठे कार्य केले आहे. हिंदुस्थानात कोठेही इतक्या मोठ्या प्रमाणावर शिक्षणाचा प्रयत्न झालेला नाही. राष्ट्राध्यक्षांचे हे उद्‌गार ऐकल्यानंतर आपल्या शिक्षण संस्थांमध्ये असलेले दोष दिसत असूनही माझ्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखे मला वाटले. याचे कारण असे आहे की, मीही ध्येयवादाने काम करणारा माणूस आहे.

यानंतर सरकारने जी एक ग्रांट इन कोड कमिटी नेमली आहे तिच्यावर शिक्षकांपैकी एकही प्रतिनिधी घेण्यात आला नाही अशी तक्रार येथे करण्यात आली. ह्या कमिटीवर शिक्षक घेण्यात यावा अशी ह्या सभागृहाची इच्छा असली तर माझी तिला हरकत नाही. ह्या कमिटीवर शिक्षक का घेतला नाही किंवा घेणे शक्य नव्हते याचे कारण मला माहीत नाही. अर्थात ह्या कमिटीवर शिक्षक घेतला नाही म्हणून ती सदोष आहे असेही मी म्हणत नाही. सध्या जो प्रतिनिधी आहे तो सुपरिंटेंडेंट किंवा हेडमास्तर आहे, शिक्षक नाही, हीच मुख्य तक्रार आहे. शिक्षण मंत्र्यांनी ह्या सूचनेचा विचार करून असा एखादा प्रतिनिधी घेणे शक्य असेल तर त्यांनी जरूर घ्यावा. शिक्षण संस्थांमध्ये काय चालते याची मलाही थोडीशी माहिती आहे. अशाच एका शिक्षण संस्थेचे आणि शिक्षकांचे भांडण होऊन शिक्षक संपावर गेले. शिक्षकांवर अन्याय झाला होता हे मला पटल्यामुळे मी त्या संपाचे पुढारीपण घेतले आणि त्या शिक्षकांकरिता दुसरी शाळा काढली. परंतु ही गोष्ट १५-२० वर्षांपूर्वीची आहे. परंतु ही शाळा काढल्यानंतर मी केलेल्या पुढारीपणाचा पश्चात्ताप झाला. हाच अनुभव सर्वत्र येत असेल असे मी म्हणत नाही. पण यातील एक धोका मी दाखविला इतकेच. जेथे मॅनेजमेंटकडून संस्था चालविण्यात येतात तेव्हा अधिकार मॅनेजमेंटचा आणि जबाबदारी कोणाची तर इतर माणसांची अशी कामाची वाटणी होता कामा नये. महाराष्ट्रामध्ये माध्यमिक शिक्षण अत्यंत गतीने वाढत आहे. ते वाढले पाहिजे, आणि ते वाढत असतानाच त्याची संघटना आणि गुणवत्ता यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. मी यासंबंधाने अत्यंत जागरूक आहे. निदान बोलण्यात तरी जागरूक आहे, कारण मला असे वाटते की, मी अशा रीतीने बोलत राहिले पाहिजे व जेव्हा संधी मिळेल तेव्हा मी बोलत राहिले पाहिजे. प्राथमिक शिक्षण आता अशा अवस्थेला पोहोचले आहे की आता आम्ही त्यांच्या क्वाँटिटीपेक्षा त्याच्या क्वॉलिटीकडे, गुणवत्तेकडे लक्ष दिले पाहिजे आणि त्याप्रमाणे हे सरकार काळजी घेत आहे. नामदार शिक्षणमंत्रीही या बाबतीत माझ्याशी सहमत

आहेत. तसेच माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीतही ते शिक्षण आता यापुढे जलद गतीने वाढणार आहे, तेव्हा त्याच्या गुणवत्तेची चिंता सरकारला आतापासूनच केली पाहिजे आणि त्याकरिता प्रसंग सापडेल तेव्हा, अगदी इन सीझन आणि आउट ऑफ सीझनदेखील, मला त्याच्या गुणवत्तेविषयी बोलत राहिले पाहिजे. त्या शिक्षणाचा दर्जा आणि त्यामध्ये जाणारा शिक्षकवर्ग या दोन्ही गोष्टींची काळजी सरकारला आतापासूनच केली पाहिजे. त्याकरिता यामध्ये अधिक इन्व्हेस्टमेंट करण्याला मी मुळीच मागेपुढे पाहणार नाही.

दुसरा प्रश्न सोशालिझमबद्दल उपस्थित करण्यात आला. आम्ही एक शब्द वापरला. अगदी हेतुपुरस्सर वापरला, कारण आमच्या राज्याचे अधिकृत धोरण सोशालिस्ट आहे. परंतु आम्ही सोशालिझमबद्दल बोलावयाला लागल्यानंतर काही माणसांना थोडे अवघडल्यासारखे वाटू लागले. त्यांना वाटू लागले की हे लोक सोशालिझमबद्दल बोलावयाला लागले तर आमचे सगळे संपलेच की. हे लोक सोशालिझमबद्दल बोलू लागले तर आम्ही काय बोलावयाचे ? परंतु अध्यक्ष महाराज, मी सांगू इच्छितो की त्यांचा सोशालिझम वेगळा आहे आणि आमचा सोशालिझम वेगळा आहे. आम्ही जो सोशालिझम मानतो तो त्यांच्या सोशालिझमसारखा नाही. ते म्हणतात त्यांचा सोशालिझम खरा आहे. ठीक आहे, त्यांचा सोशालिझम त्यांना लखलाभ होवो. आमची जी सोशालिझमची कल्पना आहे ती मी मांडण्याचा प्रयत्न करतो. पहिली गोष्ट म्हणजे आम्ही ग्रंथनिष्ठ लोक नाही. मार्क्सने काय सांगितले हे पाहून आणि त्यावर बोट ठेवून चालणारे ग्रंथनिष्ठ लोक आम्ही नाही. मार्क्सने सांगितलेले सगळेच खरे असे मानणारे आम्ही नाही. ग्रंथांत सांगितलेले सगळेच खरे नव्हें असे मार्क्सनेच सांगितले आहे. मी मार्क्स थोडाफार वाचला आहे. मी त्यातील तज्ज्ञ आहे असे मी म्हणणार नाही. असे एक वय असते की ज्यावेळी मनुष्य असे ग्रंथ वाचतोच. त्याप्रमाणे मी देखील वाचण्याचा प्रयत्न केला, समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये त्याचे काही दृष्टिकोन बरोबर आहेत. त्यांच्याकडे आजकालचा कोण आधुनिक माणूस दुर्लक्ष करू शकेल ? पण डॉक्ट्रिन या दृष्टीने त्याने सांगितलेली समाजवादाची कल्पना सगळीच खरी आहे असे म्हणून चालणार नाही. तशा तऱ्हेची मार्क्सिझमची कल्पना आमची नाही. ज्यांनी हा वाद उपस्थित केला ते सन्माननीय सदस्य सध्या येथे हजर नाहीत. परंतु इतर सन्माननीय सदस्यांच्या माहितीकरिता मला सांगितले पाहिजे की माझी समाजवादाची कल्पना मार्क्सने सांगितलेल्या तराजूवर जोखून घेणारा मी नाही. हिंदुस्थानातील समाजवादाची कल्पना हिंदुस्थानातील जनतेच्या विशिष्ट अनुभवावरच

आधारावी लागेल. येथे जेव्हा आर्थिक विकास आणि परिवर्तन होण्याची अत्यंत वेगवान प्रक्रिया सुरू झाली तेव्हा दुनियेच्या इतिहासामध्ये इतर ठिकाणी तेथील लोकांना जे धडे शिकावे लागले त्यांची पुनरावृत्ती आम्ही येथे करू इच्छित नाही. आम्ही हे करीत असताना, आमच्या देशातील अर्थरचनेची, आर्थिक शक्तीची, आर्थिक सामर्थ्याची जी नवीन वेगवान गती सुरू झाली आहे तिला योग्य ते वळण देत असताना इतिहासामध्ये इतर देशांना शिकावा लागलेला अनुभव लक्षात ठेवून आमच्या देशाच्या विशिष्ट परिस्थितीला अनुरूप अशा पद्धतीने आम्ही ते करणार आहोत आणि आमच्या या सगळ्या प्रयत्नांच्या पाठीमागचा खरा उद्देश प्रायव्हेट प्रॉफिट्सच्या जागी सोशल प्रॉफिटस् स्ट्रेंग्दन करण्याचा आहे. हे करीत असताना दोन गोष्टी कराव्या लागतात. एक म्हणजे भिन्न भिन्न व्यक्तींच्या आर्थिक परिस्थितीमध्ये असणारी मोठी दरी, डिस्प्यारिटीज आणि इनईक्वॉलिटीज जास्तीत जास्त कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तो कसा करावयाचा हा दुसरा प्रश्न आहे. दुसरी गोष्ट म्हणजे समाजातील सर्व वर्गांना एक प्रकारची, एकसारखी आणि समान तऱ्हेची संधी मिळेल अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. समाजवादी जीवनाकडे घेऊन जाणारे हे दोन मार्ग आहेत. मी जे समाजवादाचे चित्र पाहतो त्यामध्ये कोठलीही एक व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह अथवा गट अगर वर्ग दुसऱ्याची पिळवणूक करीत नाही. घोडेस्वारासारखा एक दुसऱ्याच्या पाठीवर बसला आहे अशी परिस्थिती असू नये अशा तऱ्हेचे आर्थिक समतेवर आधारलेले समाजवादाचे चित्र माझ्यासमोर आहे. ते चित्र केव्हा येईल, कोणत्या परिस्थितीत येईल, कोणत्या मार्गाने येईल हा दैनंदिन अनुभवाचा प्रश्न आहे. अमुकच मार्गाने ते येईल किंवा त्याने आले पाहिजे असा आग्रह धरणारा मी नाही. कारण इतिहास ठराविक मार्गाने जात नाही. इतिहास आंधळा पीर नाही. कोणीतरी सांगितलेल्या ठराविक मार्गाने तो जात नाही. घाण्याचा बैल जसा ठराविक मार्गानेच घाण्याभोवती धावतो तसा इतिहास जात नाही. इतिहासाची स्वतंत्र अशी प्रक्रिया असते आणि त्यानुसार त्याचा प्रवास चाललेला असतो. मार्क्सने सांगितलेला तोच समाजवाद आहे. अशी माझी कल्पना नाही असे मला त्यासंबंधी म्हणावे लागेल आणि ते म्हणत असताना मला यत्किंचितही शरम वाटत नाही. आमचा समाजवाद हिंदुस्थानच्या विशिष्ट अनुभूतीतून निर्माण झालेला, ऐतिहासिक परिस्थितीतून घेतलेला आणि लोकशाही मूल्यांवर आधारलेला असा आहे. माझे मित्र श्री. व्यास यांनी अशी अमेंडमेंट मूव्ह केली की, यामध्ये समाजवाद घातला आहे, पण डेमॉक्रसी घातली नाही. नामदार राज्यपालांच्या भाषणात उल्लेख करताना नवीन कल्पनेचा उल्लेख

करावयाचा असतो. डेमॉक्रसी आता स्वीकारावयाची राहिली नाही. त्यासंबंधी आता काही संदेह राहिला नाही. डेमॉक्रसीचे मूलभूत तत्त्व संविधानामध्ये स्वीकारले आहे आणि त्या मूलभूत तत्त्वावर आमचे पाऊल पक्के आहे. सन्माननीय सभासद श्री. व्यास यांनी त्याची आठवण करून दिली हे त्यांनी फार बरे केले. त्यामुळे त्यांना निदान त्याची आठवण राहील.

तेव्हा ही समाजवादासंबंधीची आमची कल्पना आहे. हे सरकार जे काही करते त्याची पारख करण्याच्या कसोट्या मी विधानसभेत भाषण केले तेव्हा मुद्दाम त्या भाषणात स्पष्ट केल्या. आम्ही जेव्हा आमचे धोरण जाहीर करतो, शासन जेव्हा आपले धोरण जाहीर करते तेव्हा त्याने जाहीरपणे स्वतःच्या परीक्षेच्या कसोट्या जनतेच्या ताब्यात दिल्या आहेत. आम्ही जनतेला सांगितले की आम्हाला या दिशेने जावयाचे आहे, आमची पावले त्या दिशेने व्यवस्थितपणे पडतात की नाही हे पाहण्याच्या अमुक अमुक कसोट्या आहेत आणि त्या आम्ही तुमच्या हातात दिल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या कार्याची योग्य परीक्षा व्हावयाची असेल, योग्य असेसमेंट किंवा मूल्यमापन व्हावयाचे असेल तर ते आम्ही जाहीरपणे दिलेल्या कसोट्यांवरून जनता करू शकते. त्या कसोट्या आम्ही जनतेच्या हातात दिल्या आहेत. परंतु आम्ही समाजवादाचे धोरण जाहीर केल्याबरोबर ताबडतोब कोठे आहे समाजवाद असे विचारून चालणार नाही. कारण हे एक लक्षावधी माणसांच्या दैनंदिन जीवनातून घडणाऱ्या प्रयत्नातून हळूहळू निर्माण होणारे चित्र आहे. विणकर जेव्हा एखादे महावस्त्र विणण्यासाठी बसतो तेव्हा ते महावस्त्र ताबडतोब तयार होत नाही. सुरुवातीला तो आपल्यासमोर सगळे गुंतागुंतीचे लांब धागे टाकून बसतो तेव्हा आपल्याला सगळा गोंधळ दिसतो. एका धाग्याशी दुसरा धागा समांतर अशा पद्धतीने टाकलेला असे अनेक धागे आपल्याला दिसतात. त्यावरून आपल्याला वाटते की यातून हा कसले महावस्त्र निर्माण करणार? परंतु हळूहळू तो जेव्हा त्या समांतर धाग्यांमधून आडवे धागे टाकण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याच्यातून हळूहळू सुंदर महावस्त्र तयार होत चालल्याचा प्रत्यय आपणास येतो. समाजवाद आणण्यासाठी अशाच तऱ्हेचा प्रयत्न हिंदुस्थानामध्ये करावा लागेल आणि तो सर्वांना करावा लागेल. आमची अशी इच्छा आहे की तो समाजवाद लौकरात लौकर यावा, परंतु त्याची काही विशिष्ट प्रक्रिया आहे आणि त्या प्रक्रियेतून आपल्याला जावे लागेल. मला असे वाटत नाही, अध्यक्ष महाराज, की या प्रश्नावर मी सभागृहाचा अधिक वेळ घ्यावा.

तिसरी महत्त्वाची अमेंडमेंट सीमा प्रश्नासंबंधी आहे. सन्माननीय सभासदांनी ज्या

आग्रहाने आपले विचार मांडले तो मी समजू शकतो. त्यांच्या याबाबतीतील भावना मी समजू शकतो, त्यांची तितीक्षा मी समजू शकतो, तिडीक समजू शकतो. पण एका सन्माननीय सभासदांनी जो वाकड्या बोटाचा सिद्धांत सांगितला त्याच्याशी मी सहमत होऊ शकत नाही. आम्हाला कोणाच्या बरणीत बोट घालावयाचे नाही, तर आम्हाला आमची बरणीच परत घ्यावयाची आहे. आम्हाला कोणाकडे वाकडे बोट करावयाचे नाही की वाकडी नजर टाकावयाची नाही. आम्हाला सगळे न्यायाने आणि सरळपणाने करावयाचे आहे. चळवळीची निंदा केली असे म्हटले जाते. चळवळीची निंदा मला करावयाची नाही. हा एक विश्वासाचा प्रश्न आहे. परंतु काय केले असता मार्ग सोपा होईल हे मला सांगितले पाहिजे. तुमच्या चळवळीने हा प्रश्न सुटणार नाही असा माझा विश्वास असेल तर सांगण्याचा मला जरूर अधिकार आहे व माझा असा विश्वास आहे की हा प्रश्न चळवळीने सुटणार नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची परिस्थिती वेगळी होती. त्याबाबतीत महाराष्ट्रातील जनता एकमताची होती. हा बॉर्डरचा जो प्रश्न आहे तो वेगळा आहे. बंगलोरमध्येही काँग्रेस सरकार आहे आणि येथेही काँग्रेस सरकार आहे असा प्रश्न यामध्ये नाही. हा एक प्रश्न आहे याबद्दल दुमत नाही.

मी असे सांगू इच्छितो की, त्या भागातील जनतेची ही चळवळ आहे हे मी समजू शकतो. तेथील जनतेला वाटल्यास तिने चळवळ जरूर करावी. परंतु त्या जनतेलासुद्धा मी सल्ला देईन की, तिने आपली सर्व शक्ती खर्च होईल असा मार्ग पत्करू नये. येथे काँग्रेस सरकार आहे आणि तेथेही काँग्रेस सरकार आहे असे सांगून हा प्रश्न सुटत नाही. हे निव्वळ काँग्रेसमधील भांडण आहे असे नाही. दिल्लीमध्ये समाजवादी आहेत. येथेही समाजवादी आहेत. दिल्लीमध्ये जनसंघीय आहेत. येथेही आहेत. दिल्लीमध्ये कम्युनिस्ट आहेत. येथेही आहेत. या सर्वच पक्षाचे लोक ते एकाच पक्षाचे असले तरी निरनिराळ्या भूमिकेतून या प्रश्नाचा विचार करीत आहेत. बंगलोरच्या समाजवाद्यात आणि तेथील समाजवाद्यात तरी या प्रश्नाबाबत एकमत आहे काय? म्हणूनच मी असे म्हणतो की हा काँग्रेस पक्षातील भांडणाचा प्रश्न नाही. बेळगावातील जनतेच्या भावना मी समजू शकतो. त्यांच्या चळवळीवर मला टीका करावयाची नाही. परंतु या सभागृहात बसलेल्या तुम्ही आम्ही काय केले पाहिजे हे मला सांगितले पाहिजे. राजीनाम्याच्या गोष्टी करणाऱ्यांनी नीट विचार केलेला नाही असे मी म्हणतो. राजीनाम्याचा मार्ग आपला आहे, तो आपण जरूर स्वीकारावा. मला राजीनामा द्यावयाचा असेल त्यावेळी मी इतरांचा सल्ला घेणार नाही. महाराष्ट्र राज्याचा कारभार आम्ही अंगावर घेतला आहे तो राज्य चालविण्यासाठी घेतला आहे, पळून जाण्यासाठी नाही. बेळगावचा

एक प्रश्न सोडविण्यासाठी बाकीचे प्रश्न सोडून देवून चालणार नाही. तुम्ही सल्ला दिला आणि मी तो ऐकला तर त्यामध्ये शहाणपणा कोठेच दिसणार नाही. अध्यक्ष महाराज, या राजीनाम्याच्या गोष्टी महाराष्ट्रामध्ये आता जुन्या झाल्या आहेत. या सर्वांतून तुम्ही आम्ही चांगले तावून सुलाखून बाहेर पडलो आहोत. आमचे जे विचार आहेत ते प्रामाणिकपणे जनतेसमोर ठेवले पाहिजेत. जी गोष्ट या सरकारला झेपणार नाही, जी गोष्ट करणे सरकारला शक्य नाही त्या गोष्टीबद्दल खोटी आशा या सरकारने दिलेली नाही. जनतेचा जो कौल येईल तो कौल स्वीकारावा अशी नम्र भूमिका या राज्य सरकारची आहे. जनतेचा येणारा निर्णय आनंदाने स्वीकारण्याची या सरकारची तयारी आहे. त्याबाबतीत कोणतीही खळबळ आम्ही करणार नाही. परंतु आमच्या ज्या मर्यादा आहेत त्या मर्यादा ओळखून काय करता येईल ते जनतेसमोर स्पष्टपणे ठेवण्याची आमची भूमिका आहे. मी असा सेनापती नाही की आपल्या मर्यादा न ओळखता सैन्याला भलत्या ठिकाणी घेऊन जाईन. मी मागे एक व्यंगचित्र पाहिले होते. युद्धाच्या काळातील ते व्यंगचित्र होते. कोणाबद्दलचे ते होते ते मी सांगत नाही. या व्यंगचित्रामध्ये जो प्रमुख नायक आहे तो सैन्याला ''क्विक मार्च'' म्हणून ऑर्डर करतो आहे. त्याप्रमाणे सैन्य चालले आणि प्रवास करीत करीत ते सैन्य समोर असलेल्या एका कड्यापर्यंत पोहोचले. एका माणसाने त्या प्रमुखाला सांगितले, सैन्य कड्यापर्यंत पोहोचले आहे आता पुढची ऑर्डर द्या. त्या प्रमुखाने ऑर्डर दिली. ''गुड बाय''. अध्यक्ष महाराज, आपले सैनिक कोणत्या तरी खड्ड्यात जाऊन पडण्यासाठी ''गुड बाय'' ऑर्डर देणारा मी सेनापती नाही. मला जनतेचे प्रश्न सोडवावयाचे आहेत. जेथपर्यंत जाणे शक्य असेल तेवढ्याच मर्यादेपर्यंत जाण्याचा मार्ग मला स्वीकारला पाहिजे. सीमा प्रश्नाबाबत माझ्या या मर्यादा ओळखून मला असे सांगावयाचे आहे की, हा प्रश्न एकमेकांच्या विचारानेच सुटेल. अर्थात थोडासा वाद करावा लागेल. परंतु काही हरिभाऊ पाटसकर यांच्यासारख्या अनुभवी माणसांच्या हातात हा प्रश्न सोपविल्यानंतर, आणि एका राज्याचे राज्यपाल असूनही त्यांनी जी भूमिका पत्करली आहे ती पाहिल्यानंतर, त्यांना त्यांच्या कामात मदत मिळेल असे आपण केले पाहिजे अशी माझी भावना आहे. या प्रश्नाबाबत दिरंगाई होत आहे, यासाठी चळवळच केली पाहिजे अशा प्रकारच्या घोषणा राजकीय व्यासपीठावरून किंवा सभातून केल्या म्हणून त्या करणाऱ्यांच्या पोटीच हा प्रश्न सुटण्याची तिडिक आहे असे म्हणता येत नाही. म्हणून या प्रश्नाबाबत व्यवहारी विचार या ठिकाणी मांडले गेले नाहीत अशी दुःखाची भावना मनात आल्याशिवाय राहत नाही.

त्यानंतर पंचायतीबद्दल टीका करण्यात आली. कोणत्या प्रिन्सिपलवर पंचायत राज्ये निर्माण केली जाणार आहेत ते आम्ही जाहीर केलेले आहे. यासंबंधीचा एक आराखडा तयार करण्यासाठी आम्ही एक कमिटी नेमली आहे. या कमिटीचा अहवाल ज्यावेळी चर्चेला येईल त्यावेळी त्यातील मूल्यांबाबत आपण चर्चा करावी. सभागृहापुढे तो अहवाल येईलच. सभागृह यासंबंधात अंधारात राहणार नाही. परंतु राज्यकारभाराचे शासन लोकांपर्यंत जावे असा सरकारचा निर्णय आहे. त्याचा फॉर्म, कन्टेन्ट किंवा तपशील हा चर्चेचा प्रश्न आहे. ही भूमिका लक्षात घेऊन टीका होण्यास हरकत नाही. पंचायतीबद्दल टीका करताना अशी भूमिका घेऊन टीका झाली तर मी समजू शकतो. नॉमिनेशनचे जे तंत्र आहे ते अयशस्वी झाले आहे. नॉमिनेशनची दुनियादारी संपली आहे. ज्यामध्ये सरकारचे भांडवल आहे अशा सहकारी चळवळीतही आम्ही नॉमिनेशन बंद केले आहे. हा जो प्रयोग आम्ही करीत आहोत त्यामध्ये धोकेही आहेत आणि कदाचित त्याविरुद्ध मला टीकाही ऐकावी लागेल. परंतु हे सर्व पत्करूनही लक्षावधी रुपये सरकारचे भांडवल आहे अशा सहकारी सोसायट्यातही आम्ही नॉमिनेशन करणार नाही. संपूर्ण लोकशाहीने कामे कशी होतात हे आम्हाला पहावयाचे आहे. ज्यावेळी पंचायत राज्य बनेल त्यावेळी नेमणुकीचा जमाना बदललेला आपल्याला दिसेल. समाजवादाच्या दिशेने आपल्याला जावयाचे असेल तर आपल्याला लोकांच्या मताप्रमाणेच चालले पाहिजे.

किंमती नियंत्रित करण्याचा जो प्रश्न आहे तो स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. मी जी भाषणे ऐकली त्यामध्ये या संबंधात एका वाक्याखेरीज दुसरी टीका ऐकली नाही. ह्या बाबतीतली आर्ग्युमेंटस् मी ऐकलेली नाहीत तर मी उत्तर कशाला द्यावयाचे हा माझ्यापुढे प्रश्न आहे. तो एक पासिंग रेफरन्स होता असे मला वाटते. तरीही ह्याबाबतीत सांगावयाचे तर असे सांगता येईल की, आपल्या देशातील इकॉनॉमी डेव्हलप करण्यासंबंधीची ही एक मूलभूत समस्या आहे. ज्यावेळी विकासक्षम अर्थरचना बनविण्याचा प्रश्न येतो त्यावेळी नवीन भांडवल शक्ती आपल्याला निर्माण करावयाची असते. आणि इकॉनॉमीचा हा एक सर्वसाधारण नियम आहे की, अशी अर्थरचना करीत असताना आणि नवीन नवीन डेव्हलपमेंटल् वर्क्स हातात घेतली जातात त्यावेळी सुरुवातीला काही काळ वस्तूंच्या किंमती वाढतात. अमेरिकेचे नवे अध्यक्ष श्री.केनेडी यांना कोणी तरी माहिती विचारली असताना त्यांनी असे सांगितले की माझ्यापुढे दोन प्रश्न आहेत. मी याचा उल्लेख अशासाठी करतो की, अमेरिका हे राष्ट्र इकॉनॉमिकली अत्यंत पुढारलेले असे राष्ट्र आहे. पहिला मार्ग असा की, इकॉनॉमी अधिक मजबूत

करावयाची आणि दुसरा मार्ग असा की, प्राइसेस वाढू द्यावयाच्या नाहीत. यापैकी मी पहिला मार्ग स्वीकारीन. आपला हिंदुस्थान देश हा गरीब लोकांचा देश आहे, त्यामुळे त्यांच्या ज्या मूलभूत मागण्या आहेत त्यांचा आपल्याला विचार करावयाचा आहे. आपल्याला त्यांचे जीवनमान वाढवावयाचे आहे हे आपले प्रमुख उद्दिष्ट आहे व त्या दृष्टीने आपल्याला हा प्रश्न सोडवावा लागेल. हा जनरल इकॉनॉमीचा प्रश्न आहे. प्रामुख्याने अन्नधान्य, कपडालत्ता, गरीब लोकांच्या मुलांचे शिक्षण आणि शेती ह्या चार गोष्टी आपल्या जनतेच्या बेसिक गरजा आहेत. घरांचीही मागणी काही कमी महत्त्वाची नाही आणि ह्या मागण्या शक्य तो भागविण्याचा प्रयत्न हे सरकार नेहमीच करीत आले आहे. त्याचप्रमाणे सरकारी नोकरांना जास्त पगार देण्याचाही प्रयत्न होत आहे. याशिवाय, शिक्षणाचेही थोडेफार ओझे आपल्या अंगावर घेण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. कर न वाढविता हे कसे काय साध्य होईल हे मला समजत नाही. हेच राज्य नव्हे तर हिंदुस्थानातील कोणतेही राज्य कर न वाढविता जनतेसाठी काही करू शकणार नाही. आता ह्या बजेटमध्ये केरोसीनवर कर बसविण्यात आला आहे याबद्दल कोणाला म्हणावयाचे असेल तर मी असे म्हणेन की, केरोसीन ही वस्तू गरीबांना घरात दिवा लावण्यासाठीच लागते असे नाही तर इंडस्ट्रीजमध्येही केरोसीन फार मोठ्या प्रमाणावर लागते. हल्ली जेट विमानही केरोसीनवरच चालते. तेव्हा केरोसीन ही वस्तू केवळ गरीबांना लागणारीच वस्तू आहे असे नाही. बरे, यावर कर वाढविला आहे तो तरी किती वाढविला आहे? इतर राज्यात ७ टक्के आहे तर आपल्या राज्याने ३ टक्के वाढविला आहे. तेव्हा आपल्याला जर पुढे जावयाचे असेल, निरनिराळ्या सुधारणा करावयाच्या असल्या तर आवश्यक तेवढे कर बसविल्याशिवाय चालणार नाही. बरे, कर बसविताना केवळ मध्यम वर्गावरच परिणाम होतो असे नाही, भांडवलदारांच्याही खिशाला थोडाफार हात लावण्याचा सरकारने प्रयत्न केलेला आहे. पॅसेंजर टॅक्सही अशाच प्रकारचा आहे. पण तो तपशिलाचा प्रश्न आहे. तेव्हा आपला जोपर्यंत डेव्हलपमेंट प्रोग्राम चालू आहे तोपर्यंत सुरुवातीला पाच दहा वर्षे किंमती वाढण्याच्या बाबतीत शर्यत लागणे साहजिक असले तरी ह्या वाढत्या किंमती ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न हे सरकार नेहमी करीत राहील एवढेच मी ह्या प्रसंगी आश्वासन देऊ इच्छितो.

यानंतर दुसरी एक उपसूचना सुचविण्यात आली आहे. ह्या उपसूचनेवर कोणी बोलले की नाही मला माहीत नाही. पण एकंदर मुसलमान समाजासंबंधीची ही उपसूचना आहे. राष्ट्रविरोधी घोषणा करण्याची प्रवृत्ती काही लोकांमध्ये आहे व

त्याबाबतीत शासनाने सक्त आदेश दिलेले आहेत, आणि अशा बाबतीत कडक इलाज केले पाहिजेत हेही मला मान्य आहे. राष्ट्राचा अपमान सहन करून कोणाचे लाड करावेत अशी ह्या सरकारची दृष्टी नाही. पण मी सभागृहाला हेही सांगू इच्छितो की, ह्या प्रश्नाचा वापर करून जशा घोषणा झाल्या अशा तऱ्हेचे वातावरण करण्याचा प्रयत्न काही ठिकाणी होत नाही अशी मला खात्री देता येत नाही. आपल्या राज्यात थोडे कोणी जातिनिष्ठ असतील आणि त्यात काही मुसलमानही असण्याचा संभव आहे, पण त्यामुळे सर्वसामान्य मुसलमान समाजात भीती निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण होता कामा नये. मी ह्या सभागृहाला विनंती करीन की, ह्या राज्यात जो मुसलमान समाज आहे त्याचे जीवित आणि मालमत्ता यांचे संरक्षण करण्याची आपली सर्वांची जबाबदारी आहे अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले पाहिजे. पण त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, अशा प्रकारच्या प्रवृत्तीच्या लोकांमुळे खचून जाणारा हा देश नाही. ह्या बाबतीत मी असे सांगतो की, देशाचा मान, देशाची एकी यांच्याकडे जर आपण दुर्लक्ष केले तर पुढे इतिहासात आपण गुन्हेगार ठरू. म्हणून आपल्या देशात ज्या वेगवेगळ्या जाती व जमाती आहेत त्यांनी आपसात ॲमिटी, एकता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि ह्या बाबतीत महाराष्ट्रीय जनता सहकार्य करील अशी मला आशा आहे.

अध्यक्ष महाराज, आणखी अनेक प्रश्नांच्या बाबतीत उपसूचना आहेत, पण त्या सर्वांना उत्तर देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. तेव्हा नामदार राज्यपालांनी केलेल्या भाषणाबद्दल आभार मानणारा हा जो ठराव आपल्यापुढे आहे तो ह्या सभागृहाने एकमताने मंजूर करावा एवढेच मला सांगावयाचे आहे. नागपूर कराराच्या बाबतीत जी आश्वासने सरकारकडून देण्यात आली आहेत त्यांना स्टॅट्युटरी रेकग्निशन देण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. अशा तऱ्हेची रिप्रेझेंटेशन्स टाळण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. पण ती एक मागणी आहे आणि ह्या सगळ्या मागण्यांच्या मागे एक प्रकारचा संशय आणि अविश्वास काही लोकांच्या मनात असतो तो दूर करण्याचा प्रयत्न ट्रँझिशनच्या पिरियडपुरता करण्यासाठी काही गोष्टी करण्याची आवश्यकता भासते. पण मला खात्री आहे की, ज्यावेळी सर्व लोकांचे भावनात्मक ऐक्य प्रस्थापित होईल त्यावेळी ज्याप्रमाणे पिकलेला आंबा आपोआप गळून पडतो त्याप्रमाणे हे सगळे संशय आणि भीती नाहीशी होईल, आणि मग कायद्यात अशा प्रकारची रिप्रेझेंटेशन्स देण्याची गरज राहणार नाही.

■ ■ ■

Discussion on the Governor's address took place in the Council on 16th February 1961, in which several members participated. The gravamen of the charges appeared to be that Government only gave promises without fulfilling them. Opposition members also drew the attention of the Council that they did not find any mention of boundary dispute, Krishna-Godavari water dispute etc. in the address.

Shri Chavan, Chief Minister, replied to these points in a cogent manner.

# मुंबईतील बेल्जियन वाणिज्य दूतावासासमोर निदर्शने करणाऱ्यांवर पोलिसांकडून लाठीहल्ला *

**२२ फेब्रुवारी १९६१**

*वरील लाठीहल्ल्याच्या चौकशीच्या मागणीबाबतच्या चर्चेस उत्तर देताना मा. यशवंतराव चव्हाण म्हणाले की, निदर्शकानी दगडफेक केल्यामुळे पोलिसांकडून जो लाठीहल्ला झाला तो समर्थनीय होता.*

अध्यक्ष महाराज, या सभागृहाने या प्रश्नाची चर्चा केली याबद्दल मला समाधान वाटते. कारण या निमित्ताने सरकारचा दृष्टीकोन सभागृहासमोर ठेवण्याची संधी सरकारला मिळते. या विषयावर आणखी काही सभासदांची भाषणे होऊ शकली असती तर जास्त चांगले झाले असते. परंतु वेळेच्या मर्यादेमुळे ते होऊ शकले नाही.

यासंबंधीची संपूर्ण हकीकत खालच्या सभागृहापुढे मी ठेवली आहे, आणि तिला प्रसिद्धीही मिळाली आहे. त्यातील काही गोष्टींचा उल्लेख मी पुन्हा करतो. या बाबतीत माननीय सभासद, श्री. देशपांडे, यांच्या मताशी मीही सहमत आहे. कोणत्याही राजकीय निदर्शनाच्या वेळी पोलिसांचा लाठीमार व्हावा ही गोष्ट अभिमानास्पद नाही या मताचाच मी आहे. उलट त्यामुळे माझी शोभा कमी झाली असे मी समजतो. हे झाले नसते तर चांगले झाले असते अशीच माझी मनातली भावना आहे. बेल्जियम आणि कांगोमधील जो झगडा आहे त्यामध्ये आमच्या सहानुभूती निश्चितपणे कांगोच्या जनतेच्या बाजूच्या आहेत. पॅट्रिस लुमुम्बा हे अतिशय दृढनिश्चयी नेते होते. आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडीत असताना त्यांना हौतात्म्य प्राप्त झाल्यामुळे त्यांच्याविषयी असलेला आमचा आदर दुणावला आहे. कोट्यावधी जनतेचे नेतृत्व त्यांनी केले आहे आणि त्यांच्यासंबंधी

* M.L.C. Debates, Vol. III. Part II,22nd Feb. 1961,pp. 251 to 254.

आमच्या मनात आदराची भावना कायम आहे. अशा नेत्याला सहानुभूती दाखविण्यासाठी जी निदर्शने झाली त्यावेळी लाठीमार झाला नसता तर चांगले झाले असते. लाठीमार झाला ही एक दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा गोष्टी घडू नयेत म्हणून मी या पूर्वी राजकीय चळवळीसंबंधी एक कोड ऑफ् कॉन्डक्ट सर्व पक्षांनी बसून तयार करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती. माझी अजूनही तशी इच्छा आहे. मी असे मानतो की, गेल्या चार पाच महिन्यांच्या अनुभवावरून या सभागृहात तशा प्रकारचे एक अंडरस्टँडिंग निर्माण झाले आहे. गेल्या चार पाच महिन्यात विरोधी पक्षाचे लोकही समजुतीने वर्तन करीत होते. अशा परिस्थितीत असे काही घडेल अशी शंकासुद्धा मनात येत नव्हती. परंतु एकाएकी घडली ही दुःखाची आणि दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा प्रसंगाच्या वेळी कोड ऑफ् कॉन्डक्ट नसेल तर आपल्या अनुयायांना आवरण्याच्या बाबतीत मोठा प्रश्न निर्माण होतो. हा मोर्चा निघण्यापूर्वी तीन मोर्चे बेल्जियन वकिलातीवर गेले होते. त्यावेळी अत्यंत शांतपणे कार्यक्रम पार पडला. आफ्रिकन विद्यार्थ्यांच्या मोर्च्याच्या वेळी थोडीशी बोलाचाली झाली आणि काही विद्यार्थी रागाच्या भरात पोलीस अधिकाऱ्यांना बोलले एवढाच संघर्षाचा भाग त्यामध्ये होता. परंतु त्याही बाबतीत मी असे म्हणेन की, आमच्या पोलीस अधिकाऱ्यांनी आफ्रिकन विद्यार्थ्यांचा राग समजावयास पाहिजे होता. नको ते शब्द जरी ते बोलले तरी ते सहन करावयास पाहिजे होते. पोलीस कमिशनरनी यासंबंधी चौकशी केली आणि संबंधित अधिकाऱ्याने झाल्या प्रकाराबद्दल माफी मागितली आहे. सन्माननीय सभासद, श्री. गोगटे, यांनी असा मुद्दा उपस्थित केला की अधिकाऱ्याला पुन्हा तेथे ठेवण्यात का आले ? मला असे म्हणावयाचे आहे की, एखाद्या ऑफिसरचा एखाद्या वेळी तोल गेला याचा अर्थ नेहमीच तोल जातो असा करता येत नाही. जे लोक असा अर्थ काढतात त्यांनी मनुष्य स्वभाव ओळखला नाही असे म्हणावे लागेल. मुख्य गोष्ट अशी आहे की, हा ऑफिसर त्या एरियाला अटॅच केलेला अधिकारी आहे. त्यामुळे तेथे राहणे हे त्याचे कर्तव्य होते. दुसरी गोष्ट अशी की, या अधिकाऱ्याकडून जरी चूक झाली असली तरी ती कबूल करून क्षमा मागण्याइतकी मनाची तयारी त्याच्याजवळ आहे हीसुद्धा गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. जो माणूस मुद्दामहून चूक करीत नाही अशा माणसाकडून आम्हाला काम करून घेतले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, माझे सन्माननीय मित्र, श्री. रसिक भट, यांचे भाषण मला थोडेसे राजकीय भाषण वाटले. अशा भाषणांचा माझ्या मनावर परिणाम होत नाही. प्रचाराच्या सभेत बोलल्यासारखे ते बोलले. कोणत्याही परराष्ट्रीय वकिलातीचे संरक्षण करणे हे

आमचे काम आहे. बेल्जियमप्रमाणे चीनची वकिलातही येथे आहे. वस्तुतः या देशाने आमच्या देशावर आक्रमण केले असल्यामुळे त्या देशाबद्दल आमच्या मनात आदराची भावना नाही. परंतु म्हणून चीनच्या वकिलातीच्या संरक्षणाची जबाबदारी आम्ही टाळू शकत नाही. ते जोपर्यंत आमचे मित्र राष्ट्र म्हणून आपला प्रतिनिधी मुंबईच्या भूमीवर ठेवत आहे तोपर्यंत त्या राष्ट्राशी आम्ही माणुसकीचे व्यवहार केले पाहिजेत. बेल्जियमचा वकील जसा येथे आहे तसा या देशाचा वकील बेल्जियममध्ये आहे. आम्ही आंतरराष्ट्रीय जीवन जगण्याचा प्रयत्न करीत आहोत. अशा परिस्थितीत आमच्याही काही जबाबदाऱ्या आहेत की नाहीत? निदर्शने करावयाची, दगडफेक करावयाची आणि मग पोलिसांना लाठीमार करावा लागला तर चौकशी करा म्हणून मागणी करावयाची अशा मंडळींच्या चर्चेला उत्तर देण्याचीही इच्छा होणार नाही.

आता पोलिसांना लाठीमार का करावा लागला या मुद्याकडे मी येतो. खालच्या सभागृहात मी जी हकीगत सांगितली त्यातील मुख्य भाग असा आहे. त्या दिवशी चौपाटीवरून निघालेला मोर्चा ६.५० ला तेथे पोहोचला. पोलिसांची साखळी तयार होईपर्यंत सात वाजण्याची वेळ आली होती. माझे सन्माननीय मित्र, श्री. गायकवाड, यांनी १०० यार्डांची बंदीची जी मर्यादा होती तेथपर्यंत मोर्चा पोहोचलाच नव्हता असे सांगितले. माझ्या माहितीप्रमाणे पोलिसांनी मोर्च्याला ८० यार्डांपर्यंत येऊ दिले होते. काही तरी कुभांड रचावयाचे आणि पोलिसांच्या कृत्याची चौकशी करण्याची मागणी करून पोलिसांमध्ये शिथिलता आणावयाची असे काही लोकांच्या मनात आहे की काय अशी मला शंका येते. आपल्याला ही गोष्ट स्वीकारावी लागेल की बंदीची मर्यादा होती तेथेच पोलिसांनी मोर्च्यातील लोकांना अडविले होते. त्यानंतर लाठीमार झाला. काही लोकांना जखमा झाल्या हे मी कबूल करतो. परंतु सुरुवातीला ज्या अधिकाऱ्याने मोर्च्यातील लोकांना तुमच्यापैकी दोघांना तुमचे म्हणणे बेल्जियन वकिलातीच्या इमारतीवर लावण्यासाठी मी घेऊन जातो असे शांतपणे सांगितले त्या अधिकाऱ्याला लाठीमार करावयाला कारण काय घडले याचाही विचार करणे आवश्यक आहे. सुरुवातीला काय घडले हे चौकशीतही सापडणे कठीण आहे. कारण त्या ठिकाणी पोलीस आणि कम्युनिस्ट एवढीच मंडळी होती. चौकशीचे काम ज्यांच्यावर तुम्ही सोपविणार त्यांनासुद्धा शेवटी सर्कमस्टॅन्शिअल एव्हिडन्सवर आपला निर्णय द्यावा लागेल. त्या ठिकाणी पोलिसांची सुरुवातीची भूमिका मोर्चा गडबड न करता शांततेने कसा परत पाठविता येईल एवढीच होती. लोकांना मारावयाचे अशी त्यांची नीती नव्हती. गोड बोलून हा होईना दंगा न करता त्यांनी घातलेल्या

लक्ष्मण रेषेच्या पलीकडे लोकांना नेणे हीच त्यांची सुरुवातीची भूमिका होती. त्यासाठी श्री.मिरजकर आणि श्री. वैद्य यांच्याशी पोलीस अधिकाऱ्यांचे बोलणे झाले आणि त्या दोघांना घेऊन हा अधिकारी त्यांना त्यांचे म्हणणे वकिलातीवर लावू देण्यासाठी घेऊन चालला. परंतु त्या दोघांना घेऊन तो पाठमोरा होतो न होतो तोच त्याच्या डोक्यावर दगड पडून त्याला जखम झाली. ही एकच हकीगत असे दाखविते की, कोणीतरी दगड घेऊन आले होते. त्या माणसाचे नाव मी या ठिकाणी घेत नाही. यासंबंधीची केस कोर्टापुढे जाईलच. तेव्हा त्या व्यक्तीचे नाव मी सांगत नाही. ज्याने दगड मारला त्याच्याबद्दल पोलिसांजवळ पुरावा आहे. प्रथम दोन माणसांना घेऊन जावयाचे असे ठरले. त्यांनी ते कबूलही केले आणि त्याप्रमाणे त्यांना घेऊन पोलीस अधिकारी जातही होता, परंतु एवढ्यात पाठीमागून ''आणखी लोक जावयास पाहिजेत'' अशा घोषणा लोकांनी केल्या आणि पुढे घुसण्याचा प्रयत्न सुरू केला आणि मागून दगड पडतात असे पाहिल्यानंतर पोलिसांनी लाठीहल्ला केला. ह्या लाठीहल्ल्यामध्ये काही लोकांना लागले, काही कम्युनिस्ट सभासदांना जखमा झाल्या, मनस्ताप झाला त्याबद्दल मला फार वाईट वाटले आणि मी त्यांची माफी मागितली. पोलीस चांगले काम करतात आणि डेमॉनस्ट्रेटर्सकडून दंगा होत असताना उघड्यावर त्यांना तोंड देतात ही परिस्थिती पाहून दुसऱ्या आणि तिसऱ्या रांगेत अशी अनेक माणसे होती की, त्यांना ते सहन होत नव्हते म्हणून त्यांच्यापैकी एका माणसाने दगडफेक केली व इतरांनी त्याला उत्तेजन देण्यास सुरुवात केली. असे काही न होता आणि पोलिसांनी हात न उगारता मिरवणुकीचे विसर्जन झाले असते तर मला आनंद झाला असता. पोलिसांकडून थोडा एक्सेस झाला की, त्यांच्याबद्दल इन्क्वायरी करा अशी मागणी केली जाते पण बेल्जियन कॉन्सुलेटचे काही कमी जास्त घडले असते तर त्याबद्दल चौकशीची मागणी करण्यात आली नसती. याच्या उलट चीन कॉन्सुलेटवर काही कमी जास्त घडले असते तर मात्र त्या बाबतीत चौकशीची मागणी करण्यात आली असती, आणि पोलीस आपल्या कर्तव्यात चुकले असे सांगण्यात आले असते. तेव्हा मला असे सांगावयाचे आहे की, पोलीस ज्या वेळी अशा ठिकाणी काम करतात त्या वेळी त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध केव्हा केव्हा काम करावे लागते आणि हे काम ते स्वतःचे म्हणून करीत नाहीत तर स्टेटचे म्हणून करतात. त्यांना परिस्थिती लक्षात घेऊन जजमेंट वापरावे लागते. त्या ठिकाणी प्रव्होकेशन होते ह्याबद्दल माझ्या मनात बिलकुल संदेह नाही आणि म्हणून मी या बाबतीत इन्क्वायरी करू इच्छित नाही. पोलिसांनी जाणून बुजून कोणावर सूड घेण्यासाठी हा लाठीहल्ला केला अशी माझी कोणीही खात्री पटवून दिलेली नाही.

अजूनही तशी कोणी खात्री पटवून दिली आणि प्रव्होकेशन नसताना पोलिसांनी सूड घेण्यासाठी हा लाठीहल्ला केला असे सिद्ध करून दिले तर मी ही मागणी मान्य करीन; पण ते जोपर्यंत तशी खात्री करून देऊ शकत नाहीत तोपर्यंत त्यांनी अशी मागणी करू नये. माहिती असेल ती आपण द्या. मी ऐकून घ्यावयास तयार आहे, परंतु माझे मित्र त्यांच्या बाजूतील माणसासंबंधी कारवाई करावयास तयार नाहीत आणि पुढारीपण घेऊन ते जे करतात ते रास्त करतात असे म्हणतात तोपर्यंत मी त्यांचे रक्षण करू शकत नाही. राजकीय पक्षातील लोक दगडफेक करतात तेव्हा त्यांना रस्त्यावर उभे राहू न देणे हे त्यांचे काम आहे. त्याची जबाबदारी राजकीय पक्षाने घेतली पाहिजे. पोलिसांच्याबद्दल चौकशी करण्याची आपण मागणी करता तेव्हा आपल्या पक्षातील लोकांबद्दल आपण काय करता हे मी पहातो. ती जबाबदारी आपण स्वीकारणार आहात काय ? तेव्हा तुम्ही काय करता ते पाहू आणि नंतर तुम्ही काय म्हणता त्याचा आपण विचार करू.

अध्यक्ष महाराज, पोलिसांना मी धन्यवाद दिलेले नाहीत उलट या बाबतीत चौकशी केली आहे आणि ती अशाकरता की, ह्या गोष्टी घडल्या नसत्या तर मला आनंद वाटला असता. खऱ्या लोकशाही राज्यात पोलिसांच्या फीलिंग्ज प्रोटेक्शन देण्याच्या असाव्यात आणि हात वर करण्यापूर्वी १०० वेळा त्यांनी विचार करावा अशा भावनेचे पोलिस निर्माण करावेत अशी माझी इच्छा आहे. ह्या बाबतीत मी जरूर ते प्रयत्न करीन पण याचा अर्थ पोलिसांना घालवावे अशी भूमिका असता कामा नये. राजकीय धोरणाबाबत ते एक अंग आहेत आणि ते शासनाचे एक निःपक्षपाती साधन बनावे, रक्षणाचे साधन असावे अशी माझी इच्छा आहे. तुमची आणि तुमच्या पक्षाची तशी भावना असेल तर लोकांच्या भावनेचा असा गोंधळ करू नका. मी तुमची मागणी का नाकारावी याचे सन्माननीय सभासद श्री. भिडे यांनी मार्गदर्शन केल्यामुळे मी या बाबतीत अधिक बोलत नाही.

■ ■ ■

Shri Y.B.Chavan, Chief Minister, on 22 February 1961. defended the lathi charge by the Police on demonstrators near the Belgian Consulate in Bombay.

# लोकशाही विकेंद्रीकरण समितीच्या अहवालावरील चर्चा *

## ११ एप्रिल १९६१

*वरील चर्चेस उत्तर देताना मा. यशवंतराव चव्हाण यांनी असे म्हटले की विकेंद्रीकरण लोकशाही पद्धतीने अंमलात आणण्यात येईल आणि पंचायत राज्य व सहकारी संस्था यांचा हा कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठी सहाय्य घेण्यात येईल.*

अध्यक्ष महाराज, लोकशाही विकेंद्रीकरण समितीच्या अहवालावर या सन्माननीय सभागृहातील सभासदांनी चर्चा करावी अशी विनंती करण्यासाठी मी उभा राहिलो आहे. खालच्या सन्माननीय सभागृहात या अहवालावर चर्चा झाली असून या सन्माननीय सभागृहात या अहवालावर आज चर्चा होत आहे. लोकशाही विकेंद्रीकरण हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. गेल्या काही वर्षांत सत्तेच्या विकेंद्रीकरणासंबंधी विचार या देशात अनेक वेळा अनेक मंडळींनी मांडले आणि दोन वर्षांत त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणीसुद्धा आपल्या देशातील निरनिराळ्या राज्यात सुरू झाली. या राज्यातसुद्धा हा प्रयोग तातडीने सुरू करावा असा विचार पुढे मांडण्यात आला, परंतु १९५८-५९ सालात दुसऱ्या काही गोष्टीत आपण गुंतलो असल्यामुळे हा प्रश्न जरा लांबणीवर पडला. परंतु आता महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर या प्रश्नाकडे तातडीने लक्ष पुरविले पाहिजे असे ठरविण्यात आले व त्यासाठी एका समितीची नेमणूक करण्यात आली. या राज्याच्या मंत्रीमंडळातील राजस्व मंत्री हे या समितीचे अध्यक्ष होते. त्यानंतर ग्रामीण विकास मंत्री श्री.गाढे, शिक्षण मंत्री श्री. बाळासाहेब

* M.L.C. Debates, Vol. III. Part II, 13th April 1961, pp. 775 to 779.

देसाई, अर्थ खात्याचे सचिव श्री.यार्दी, सहकार व ग्रामीण विकास खात्याचे सचिव आणि विकास कमिशनर श्री.डी.डी.साठे, पुणे विभागाचे कमिशनर श्री.एस.पी.मोहिते हे या समितीचे सदस्य होते. डेप्युटी डेव्हलपमेंट कमिशनर श्री.पी.जी.साळवी यांनी या समितीच्या सचिवाचे काम केले. जवळ जवळ ४-६ महिने या समितीने सर्व प्रश्नांचा सखोल अभ्यास करून आणि वेगवेगळ्या कार्यकर्त्यांशी व नेत्यांशी या प्रश्नासंबंधी सविस्तर चर्चा करून, आपल्या देशातील ज्या इतर राज्यामध्ये हा प्रयोग चालू करण्यात आला आहे त्याचे निरीक्षण करून, हा अहवाल तयार केला आहे व तो आता आपल्यापुढे सादर करण्यात आलेला आहे; ही सामान्य पार्श्वभूमी मी या सन्माननीय सभागृहाच्या निदर्शनास अशासाठी आणीत आहे की या कामामध्ये कोणत्या व किती अनुभवी लोकांनी किती परिश्रम घेतले आहेत हे या सन्माननीय सभागृहाच्या लक्षात यावे. त्याचप्रमाणे या अहवालावर या सन्माननीय सभागृहात आज चर्चा करण्याचा उद्देश असा आहे की, या वर्षी या अहवालावर आधारलेला एक कायदा या सन्माननीय सभागृहापुढे आणावा असा सरकारचा विचार आहे. परंतु त्या कायद्याचा मसुदा तयार करण्यापूर्वी ज्या काही गोष्टींच्या बाबतीत निर्णय घेतला पाहिजे तो त्या प्रश्नांच्या बाबतीत या सन्माननीय सभागृहाच्या सदस्यांची त्याबद्दल काय अपेक्षा आहे याची ओळख किंवा माहिती करून घेतल्यानंतर घेणे जास्त योग्य होईल असे वाटल्यामुळे हा अहवाल या सभागृहापुढे चर्चेसाठी ठेवला आहे. मला आशा आहे की, सामान्यपणे विकेंद्रीकरणाच्या प्रश्नावर मूलभूत मतभेद होणार नाहीत. असे मतभेद असले तर त्यांची चर्चा व्हावी, परंतु एक गृहीत कृत्य म्हणून मी असे धरून चालतो की असा मतभेद होणार नाही. त्याचप्रमाणे मी हेही स्पष्ट करू इच्छितो की, विकेंद्रीकरण करावयाचे हे तत्त्व या सरकारने मान्य केले आहे. आता हे विकेंद्रीकरण कोणत्या पद्धतीने करावयाचे किंवा कोणत्या स्तरावर करावयाचे हा तपशिलाचा प्रश्न आहे. परंतु अशा कामात सिद्धांतापेक्षा तपशिलाचाच प्रश्न फार त्रास देतो. विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा एक प्रयोग आहे अशा अर्थानेच हे तत्त्व स्वीकारण्यात आले आहे. परंतु ते तत्त्व आचरणात आणताना कालमानपरिस्थितीप्रमाणे ज्या संस्थांकडून हे आचरण घडावयाचे असते त्यांच्या आचरणात फरक पडण्याची शक्यता असते. आजच्या जागतिक परिस्थितीकडे पाहिल्यानंतर हिंदुस्थान हा एक अविकसित देश आहे यात शंका नाही, परंतु तो जरी आज अविकसित असला तरी इतिहासाच्या दृष्टीने आणि परंपरेच्या दृष्टीने आपल्या देशाला एक चांगली सांस्कृतिक पार्श्वभूमि आहे. अशा ह्या देशामध्ये आपल्याला लोकशाहीचा विचार आचाराच्या रूपाने साकार

करावयाचा आहे. तेव्हा ह्या देशातील परिस्थिती, ह्या देशातील अनुभव यांच्याशी सुसंगत राहून आपल्याला हा प्रयोग करावा लागेल. म्हणून आपण जेव्हा सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा विचार करतो तेव्हा ती यशस्वी करण्याच्या दृष्टीने आपल्याला सर्वसामान्य माणसाच्या अगदी जवळ गेले पाहिजे. त्याच्या संमतीने आणि विचारानेच आपल्याला हे पाऊल टाकले पाहिजे. ह्या प्रश्नासंबंधी अंतिम निर्णय घेण्यापूर्वी आपल्याला जनतेमध्ये जायला पाहिजे हा यामागे मूलभूत विचार आहे आणि त्याला अनुसरून आम्ही हा प्रयोग करण्याचे ठरविले आहे.

यानंतर, अध्यक्ष महाराज, दुसरा एक मूलभूत मुद्दा आहे. ह्या एकंदर प्रयोगाचा गाभा जर कोणता असेल तर तो हा आहे की, आपल्याला खेड्यांमध्ये पंचायत राज्य निर्माण करावयाचे आहे. ही कल्पना पुढे मांडल्याबरोबर अशी एक रास्त शंका उपस्थित केली जाते की ज्या खेड्यातील लोकांना आपण ही सत्ता देणार ते खेडे कोणते असेल? ज्या खेड्यांमध्ये जुन्या परंपरेमुळे अनेक दोष तेथील समाजात आहेत व जेथे दांडगेपणाने गोष्टी होण्याचा धोका आहे अशा अवस्थेत असलेल्या लोकांना सत्ता देऊन लोकशाही खरोखरी समर्थ होणार काय? ज्यावेळी पंचायत राज्याच्या हातात सत्ता देण्याचा विचार आम्ही करतो तेव्हा आमच्या डोळ्यासमोर भूतकालातील खेडे आहे. मध्यंतरीच्या काळात जे दोष खेड्यातील जीवनात शिरले ते नाहीसे होऊन नवीन विचार खेड्यातील लोकांमध्ये शिरू लागले आहेत आणि ते शिरावे यासाठीच आजपर्यंत आम्ही प्रयत्न करीत आलो आहोत. अर्थात आमचे हे सर्व प्रयत्न संपूर्णपणे यशस्वी झाले आहेत असा आमचा दावा नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की, खेड्यातील जीवनामध्ये नवीन शक्ती शिरत आहेत, त्या वाढत आहेत, आणि त्या खऱ्या अर्थाने शक्ती आहेत. जनतेची विचारसरणी विचारात घेऊन आणि त्यांची मने समजावून घेऊन बहुमताने जे योग्य ठरेल त्याप्रमाणे राज्य चालणे हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे. खेड्यामध्ये आता शिक्षणाचा प्रसार होत आहे त्यामुळे तेथील लोकांच्या विचारसरणीतही बदल होत आहेत, सहकारी चळवळीनेही खेड्यांपर्यंत प्रवास केलेला आहे. अर्थोत्पादनाच्या दृष्टीने, विजेच्या रूपाने खेड्यात नवीन शक्ती निर्माण होऊ पाहात आहेत तेव्हा ह्या सर्व लोकशाहीचा विचार पंचायत संघटनेच्या रूपाने, शिक्षणाचा प्रसार शाळांच्या रूपाने आणि अर्थोत्पादनाचा विचार अर्थोत्पादक संघटनांच्या रूपाने खेड्यात शिरल्यानंतर आणि खेड्यातील जीवनात बदल घडवून आणणाऱ्या महत्त्वाच्या आणि क्रांतिकारक शक्तीने खेड्यात प्रवेश केल्यानंतर खेड्यातील एकंदर वातावरण ही नवी शक्ती कमकुवत करील अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. दुधाने तोंड भाजल्यानंतर मनुष्य ताकसुद्धा

फुंकून पितो अशी म्हण आहे, पण आजच्या परिस्थितीत अशा गोष्टीला पुरावा नाही. उलट मी तर असे म्हणेन की, खेडी सुधारत आहेत याचा शहरांनी विचार केला पाहिजे. हाच प्रयोग इतरत्र जेथे चालू आहे तेथे किरकोळ जरी एखादे उदाहरण आपल्याला चिंता करण्यास लावणारे असले तरी अशा एखाद्या उदाहरणाने आपण घाबरून जाण्याचे कारण नाही. मी हे खेड्यातील परिस्थितीसंबंधाने बोलत आहे. कोणत्याही सुधारणेच्या क्षेत्रात नव्याने पाऊल टाकताना ते पाऊल सांभाळून टाकावे लागते हे खरे आहे, कारण सुरुवातीला आपण जे नवे पाऊल टाकीत आहोत ते यशस्वी होईल की नाही अशी एक प्रकारची हुरहूर मनात वावरत असते. ह्या योजनेवर कोणी टीका करणार आहे असे समजून मी बोलत नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, जरी यात धोका वाटत असला तरी तो पत्करला पाहिजे. कारण हा धोका पत्करण्यातच लोकशाहीची वाढ होण्याची शक्यता आहे. म्हणूनच ह्या बाबतीत सरकारने हा निर्णय घेतलेला आहे की, ह्या मार्गाने पुढे जावयाचे आहे व ह्या मार्गाने जाऊनच ह्या देशातील लोकशाहीची वाढ होणार आहे. अर्थात शेवटी यातून निष्पन्न काय होते ह्यावर ह्या प्रयोगाचे यश अवलंबून आहे. आमचा हेतू असा आहे की, सर्वसामान्य माणसाच्या विकासाचे काम करण्याचे एक साधन म्हणून ह्या संस्था चालाव्यात. आपला हा प्रयोग यशस्वी रीतीने पार पडला तर ठीकच आहे नाही तर आपल्याला टाकलेली पावले बदलावी लागतील. पण एवढा निर्णय आम्ही घेतलेला आहे की, एकदा पुढे टाकलेले पाऊल पुढेच जाईल, मागे घेतले जाणार नाही. ह्या पावलाने यश प्राप्त झाले नाही तर जास्त लांब पाऊल टाकल्यामुळे आम्हाला अपयश आले असे मी मानणार नाही, तर ते पाऊल अपुरे पडले म्हणून अपयश आले असे समजून त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जाईल. तेव्हा ह्या दृष्टीने ह्या विकेंद्रीकरणाची वाटचाल होणार आहे.

अध्यक्ष महाराज, ह्या योजनेच्या तपशिलाच्या बाबतीत मी बोलणार नाही. कारण ह्याचे स्पष्टीकरण केले पाहिजे असे नाही. हे सभागृह सूज्ञ आहे. मी सांगितल्याप्रमाणे सिद्धांताबाबत सरकारने निर्णय घेतलेला आहे. तपशिलाच्या बाबतीत सरकारने अजून निर्णय घेतलेला नाही. किंबहुना ज्या पक्षातर्फे आम्ही हा निर्णय घेतलेला आहे त्या पक्षातील लोकांनीही ह्याबाबतीत आपली मने अगदी मोकळेपणाने येथे उघड करावीत अशी आमची भूमिका आहे. ह्या महत्त्वाच्या प्रश्नावर अगदी स्पष्ट आणि मोकळी चर्चा व्हावी अशी आमची इच्छा आहे. हा प्रश्नच इतका महत्त्वाच्या आहे की ज्यामुळे लोकशाहीच्या आचाराच्या स्वरूपात क्रांतिकारक बदल होणार आहे आणि असा बदल व्हावा अशी आमची इच्छा आहे. त्याचप्रमाणे हे पाऊल टाकीत असताना ते

विचारपूर्वक टाकावे अशीही आमची इच्छा आहे. म्हणून ह्या प्रश्नावर संपूर्ण विचार व्हावा, सखोल विचार व्हावा हा ह्या चर्चेच्या मागचा आमचा उद्देश आहे.

अध्यक्ष महाराज, मी शेवटी एवढेच सांगणार आहे की जो दृष्टिकोन समोर ठेवून हा अहवाल तयार करण्यात आला आहे तो दृष्टिकोन लक्षात घेऊन ह्या अहवालाची तपासणी व्हावी, त्यावर टीका व्हावी आणि पाहाणी व्हावी अशी ह्या सभागृहाला शिफारस करून मी रजा घेतो.

■ ■ ■

---

On 28th March, 1961, the House (Legislative Council ) took up the Report of the Committee on Democratic Decentralisation for discussion.

Several members raised some points to which Shri. Y. B. Chavan, Chief Minister, replied that the Government had decided to implement the decentralisation of power in a democratic way. He observed that a Panchayat Raj could be established through co-operative movement and that education must spread in the villages, so that the benefits of decentralisation can be spread by the Panchayat Raj and such other organisations working in the villages.

# डॉ. भास्कर पटेल यांच्या निधनाबाबत शोकप्रस्ताव *

## १७ मार्च १९६२

*माजी दारुबंदी उपमंत्री डॉ. भास्कर पटेल यांच्या निधानासंबंधी मा.श्री. यशवंतराव चव्हाण यांनी शोक प्रस्ताव मांडून त्यांच्या कर्तृत्वपूर्ण कारकीर्दीबद्दल गौरवोद्‌गार काढले.*

ह्या सन्माननीय सभागृहाचे माननीय सभासद आणि मागील मंत्रिमंडळातील उपमंत्री डॉ. भास्करभाई पटेल यांच्या दुःखद मृत्यूसंबंधाचा उल्लेख करण्याचा कठोर प्रसंग ह्या वेळी माझ्यावर आलेला आहे. डॉ. भास्करभाई पटेल यांचा आणि माझा पहिला संबंध ते १९५२ साली मुंबई विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले तेव्हा आला. आपल्या विषयातील तज्ज्ञ व्यक्ती, स्वातंत्र्याच्या चळवळीशी अगदी निकटचा संबंध असलेले आणि मुंबई शहरातील व गुजरातमधील एक प्रमुख कार्यकर्ते म्हणून ते १९२० सालापासून सर्वांना माहीत आहेत. त्यानंतर १९५४ सालापासून पुढे ते जुन्या मुंबई राज्याच्या मंत्रिमंडळात दारूबंदी खात्याचे उपमंत्री म्हणून काम करीत होते. अध्यक्ष महाराज, मी ह्या सभागृहाला सांगू इच्छितो की, केवळ माझ्या आग्रहाला मान देऊनच त्यांनी हे उपमंत्रीपद स्वीकारले होते. तसे पाहिले तर मुंबई शहरात हजारो रुपयांची त्यांची प्रॅक्टिस होती, पण केवळ माझ्या आग्रहाखातर त्यांनी उपमंत्रीपदाची ही जिम्मेदारी स्वीकारली. एकदा कोणतेही काम पत्करले म्हणजे ते अत्यंत निष्ठेने पार पाडण्याचा त्यांचा स्वभाव होता आणि त्या स्वभावाला अनुसरून ते आजारी पडले

* M.L.C. Debates. Vol. VI. Part II (Inside No.2), 19th March 1962, pp. 17-18.

त्या क्षणापर्यंत त्यांनी आपले काम निष्ठापूर्वक, एकमार्गीपणे आणि अत्यंत सरळपणे केले. खरोखरी त्यांच्यासारखा कार्यकर्ता मिळणे ही अत्यंत दुर्मिळ अशीच गोष्ट आहे. त्यांच्या मृत्यूने वैद्यकीय क्षेत्राचे त्याचप्रमाणे मुंबई शहरातील राजकीय आणि सामाजिक जीवनाचे फार मोठे नुकसान झाले आहे. असा अत्यंत कार्यदक्ष असा एक सहकारी गमावल्याबद्दल मला अत्यंत दुःख होत आहे.

डॉ. भास्करभाई पटेल यांचे आयुष्य अतिशय कर्तृत्वपूर्ण घटनांनी भरलेले होते. सन १८९७ साली गुजरातमधील कैरा जिल्ह्यातील सोजिरा गावी त्यांचा जन्म झाला. त्यांनी आपले सुरुवातीचे शिक्षण आपल्या गावी घेतले व ते १९१२ साली ग्रँट मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी म्हणून दाखल झाले. पुढे १९२० साली महात्मा गांधींनी हाक दिल्यावरून ते राष्ट्रीय चळवळीत भाग घेण्यासाठी आपले शिक्षण सोडून पुढे आले. १९२१-२२ साली त्यांनी रावजीभाई पटेल यांच्याबरोबर साबरमती आश्रमात काम केले. १९२६ सालच्या सुमारास राष्ट्रीय चळवळीचे वातावरण थोडेसे थंड झाले तेव्हा त्यांनी आपल्या अभ्यासक्रमास पुन्हा सुरुवात केली. १९२२ साली ते वैद्यकीय अभ्यासासाठी जर्मनीला गेले व त्यांनी १९२७ साली एम्.डी.ची पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी आपली प्रॅक्टिस सुरू केली. इतक्यात १९३० साली देशात असहकार चळवळीचे आंदोलन सुरू झाले व त्यांनी ह्या चळवळीत भाग घेतला. १९३० ते १९३४ सालापर्यंत त्यांनी अनेक वेळा तुरुंगवास पत्करला होता. १९३४ साली तुरुंगातून बाहेर आल्यानंतर उच्च वैद्यकीय अभ्यासासाठी ते परदेशी गेले व वेल्सच्या कार्डिफ युनिव्हर्सिटीचा टी.बी.चा स्पेशल डिप्लोमा संपादन करून परत स्वदेशी आले. तेव्हापासून टी.बी. स्पेशालिस्ट म्हणून ते नावाजले गेले. मुंबईत जे.जे.हॉस्पिटलमध्ये ऑनररी टी.बी.स्पेशालिस्ट म्हणून त्यांनी काम केले व पुढे १९४० साली ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून त्यांची नेमणूक झाली. पण पुढे लौकरच १९४२ साली क्विट इंडियाची चळवळ सुरू झाली तेव्हा त्यांनी आपला व्यवसाय सोडून ह्या चळवळीत भाग घेतला. ह्या वेळी त्यांनी पुन्हा ९ महिनेपर्यंत तुरुंगवास भोगला. नंतर १९४७ साली त्या वेळच्या मुंबई सरकारने एक वर्षासाठी स्पेशल टी.बी. ऑफिसर म्हणून त्यांची नेमणूक केली.

अध्यक्ष महाराज, अशा रीतीने त्यांचे सगळे जीवन पाहिले तर व्यवसाय वैद्यकीय असूनही जेव्हा जेव्हा राष्ट्राची हाक आली तेव्हा तेव्हा ते धावून आले व त्यांनी आपल्या आयुष्याची ४० वर्षे एक प्रकारची तपश्चर्या केली. अशा प्रकारचा एक अत्यंत तळमळीचा कार्यकर्ता आणि आपला सहकारी आपल्यामधून गेल्यामुळे ह्या सभागृहाचे

फार मोठे नुकसान झालेले आहे. डॉ. भास्करभाई पटेल यांच्या निधनामुळे त्यांची उपमंत्री या नात्याने आपल्याला उणीव भासेलच. पण त्याहीपेक्षा डॉ. भास्करभाई ह्या व्यक्तीची उणीव अधिक भासेल.

अध्यक्ष महाराज, डॉ. भास्करभाई पटेल यांच्याबद्दल मी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या त्यांच्या कुटुंबियांना कळविण्यात याव्यात अशी विनंती करून मी रजा घेतो.

■ ■ ■

On Monday, 19th March 1962, Shri Y. B. Chavan. Chief MInister, moved a condolatory resolution in the Council regarding the sad demise of Dr. Bhaskar R. Patel. M.L.C. and ex-Deputy Minister for Prohibition.

# राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा*

## २० मार्च १९६२

*चर्चेस उत्तर देताना मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सरकारच्या धोरणाचे समर्थन केले व ग्रामीण विकास व समाजवादी समाजरचनेवर भर दिला जाईल असे आश्वासन दिले.*

अध्यक्ष महाराज, नामदार राज्यपाल महोदयांचे त्यांच्या अभिभाषणाबद्दल आभार मानणाऱ्या ठरावावरील काही भाषणे मी प्रत्यक्ष ऐकली आहेत आणि काही भाषणांचा सारांश मी पाहिला आहे. या भाषणांचा सामान्यपणे जो सूर होता त्यामध्ये राज्यपाल महोदयांच्या भाषणातील महत्वाच्या गोष्टींचे स्वागतच केले आहे. अर्थात काही टीकाही केली गेली आणि त्या टीकेचा विचार केला पाहिजे. या भाषणाच्या स्वरूपाबद्दल सरकारची जी भूमिका आहे ती मी स्पष्ट करू इच्छितो. सार्वत्रिक निवडणुकीनंतर होणारे राज्यपाल महोदयांचे हे पहिलेच भाषण आहे. अशा वेळी महत्त्वाच्या प्रमुख अशा धोरणांचे यामध्ये स्पष्टीकरण असावे अशी अपेक्षा असते. परंतु निवडणुकीत मतदारांनी यापूर्वीचे असणारे सरकार परत अधिकारावर आरूढ करण्याचा आदेश दिल्यामुळे महत्त्वाच्या क्षेत्रातील कामे जुन्या वळणानेच चालू राहणार आहेत. फक्त मतदारांशी निवडणुकीत प्रत्यक्ष संबंध आल्यामुळे ज्या प्रश्नांची तीव्रतेने जाणीव झाली किंवा दरम्यानच्या काळात जे नवीन प्रश्न, नवीन समस्या निर्माण झाल्या त्यांच्या आधारावर काही गोष्टींचा उल्लेख करण्याची गरज होती तो उल्लेख राज्यपाल महोदयांनी आपल्या भाषणात केला आहे. त्या दृष्टीने राज्यपाल महोदयांच्या सबंध

* M.L.C. Debates, Vol. VI. Part II, 20th March 1962, pp. 62-69.

भाषणाचे स्ट्रक्चर, रचना पाहिली तर त्यामध्ये निवडणुकीसंबंधीचा पहिल्या परिच्छेदामधील उल्लेख संपल्यानंतर या निवडणुकीच्या निमित्ताने जनतेशी प्रस्थापित झालेल्या संपर्कातून जे महत्वाचे प्रश्न पुढे आले त्यांचा उल्लेख करण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसून येईल. त्यासंबंधी जी टीका झाली तिचा मी जरूर उल्लेख करणार आहे. काही सन्माननीय सभासदांनी धोरणाच्या मूलभूत प्रश्नासंबंधी चर्चा केली. सन्माननीय सभासद श्री. फाटक यांनी सैद्धांतिक समाजवादाचा उल्लेख करून सरकारच्या धोरणावर टीका केली. त्यांना काय म्हणावयाचे होते हे माझ्या लक्षात आले नाही. परंतु सरकार ज्या मार्गाने समाजवाद प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे तोच मार्ग योग्य आहे असा सरकारचा विश्वास आहे. त्यांनी आपल्या भाषणात ''सधन शेतकरी'', ''सधन शेतकरी'' असा शब्दप्रयोग केला आणि म्हटले की सहकारी चळवळीचा प्रमुख ''सधन शेतकरी'' आहे. कोणत्या अर्थाने त्यांनी हा शब्दप्रयोग केला हे मला समजत नाही. ५-१० एकर जमिनीचा मालक जो शेतकरी आहे त्याला कोणी सधन शेतकरी म्हणणार नाही. तेव्हा सधन शेतकरी असे म्हणण्यात काही अर्थ आहे काय? महाराष्ट्रातील शेतकरी समाजाबद्दल त्यांच्या काहीतरी चुकीच्या कल्पना आहेत. कारण महाराष्ट्रामध्ये सधन शेतकरी नाहीत. कदाचित ते महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबद्दल बोलले नसावेत. परंतु महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना उद्देशून त्यांनी तो शब्दप्रयोग केला असला तरी मी जरूर असे म्हणेन की, आम्ही त्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहोत आणि यापुढेही त्यांचे प्रतिनिधी राहू इच्छितो आणि आम्हाला शेतकऱ्यांचे कल्याण करावयाचे आहे. अर्थात शेतकऱ्यांचे कल्याण करीत असताना इतरांचे अकल्याण होणार नाही, इतरांचाही फायदा व्हावा अशी आमची भूमिका आहे. सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्र पुढे आहे असे जेव्हा आम्ही म्हणतो तेव्हा ते केवळ साखर कारखान्यांच्या दृष्टीने म्हणतो असे नाही. महाराष्ट्रात सहकारी चळवळीने अनेक क्षेत्रात प्रवेश केला आहे. इंडस्ट्रियल किंवा बँकिंग सिस्टिम या सगळ्या क्षेत्रामध्ये गेल्या पाच वर्षांत सहकारी चळवळीने महाराष्ट्रात प्रवेश केला आहे. तेव्हा महाराष्ट्रातील आर्थिक प्रश्नांचा निःपक्षपातीपणाने विचार करावयाचा असेल तर तो पूर्वग्रहरहित दृष्टीने केला पाहिजे. सहकारी साखर कारखान्यांचे जे शेअर होल्डर्स आहेत त्यांची सामाजिक परिस्थिती आपण जरूर पाहिली पाहिजे. कोणत्याही अर्थाने आपण म्हणता तशी तुलना करता येत नाही. तेव्हा चुकीच्या कल्पना मनात ठेवून परिस्थितीचे अनुमान करू नये असे मला म्हणावयाचे आहे. आपण महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे सार कृपा करून समजून घ्यावे म्हणजे विरोधी पक्षाला आपले काम करताना सामर्थ्य

वाढविता येईल. आज त्यांचे सामर्थ्य वाढत नाही याचे कारण चुकीचे पूर्वग्रह मनात ठेवून तो पक्ष विरोध करीत आहे.

अध्यक्ष महाराज, रूरल इलेक्ट्रिफिकेशन म्हणजे नुसते इंडस्ट्रियलायझेशन नव्हे. शेतीशी संबंधित नसणाऱ्या बेकार माणसाला उद्योग देण्याची शक्ती निर्माण करणे हा रूरल इलेक्ट्रिफिकेशनच्या मागचा महत्त्वाचा उद्देश आहे. नुसते कोट्यावधी रुपयांचे भांडवल निर्माण करणे हा रूरल इलेक्ट्रिफिकेशनचा अर्थ नाही. खेड्यांतील बेकारीमुळे खेड्यांचे जीवन सध्या एकाएकी बंद झाल्यासारखे जे झाले आहे त्यात नवीन अर्थोत्पादनाचे साधन त्यांना देऊन त्यांच्यामध्ये सामर्थ्य निर्माण करावे हा दृष्टिकोन त्याच्या पाठीमागे आहे. बेकारीचा जो प्रश्न आहे तो सबंध हिंदुस्थानचाच प्रश्न आहे. अजूनही बेकारीचा प्रश्न तुम्ही सोडविलेला नाही असे कोणी म्हटले तर मी म्हणेन, ''होय, खरे आहे.'' परंतु नुसते प्रश्न सुटला नाही अशी टीका करून काम संपणार नाही. हा प्रश्न सोडविण्याचे मार्ग सांगितले पाहिजेत, आर्थिक कार्यक्रम सुचविला पाहिजे. रूरल इलेक्ट्रिफिकेशन हा आर्थिक कार्यक्रमाचा पाया आहे. रूरल इलेक्ट्रिफिकेशनचा जो उल्लेख भाषणामध्ये आहे त्या पॅरिग्राफकडे आपण पाहिले तर त्यात पुढीलप्रमाणे म्हटले आहेः

the need of expanding technical education with a view to rapid industrialisation of the vast countryside taking advantage of availability of electricity....

त्याच्यापुढे असे आहे की,

....and thus meeting rural underdevelopment; intensification of agriculture by accelerating the progamme of irrigation....

इन्टेन्सिफिकेशन ऑफ् ॲग्रिकल्चर असे आम्ही म्हणतो त्यावेळी फक्त ॲग्रिकल्चरमधून निर्माण होणाऱ्या सगळ्या प्रॉडक्शनचे इन्टेन्सिफिकेशन असा अर्थ आम्ही गृहीत धरीत नाही. अन्नधान्याचा व इतर उत्पादनाचा त्यामध्ये अंतर्भाव आहे. या प्रश्नामध्ये अत्यंत तपशीलवार जाऊन प्रत्येक गोष्टीचा खुलासा करण्याचा प्रयत्न नामदार राज्यपालांच्या भाषणात केलेला नाही ही गोष्ट खरी आहे. परंतु त्याच त्याच गोष्टी पुन्हा पुन्हा सांगितल्या असत्या किंवा तोच तोच खुलासा पुन्हा केला असता तर विरोधी पक्षाचे लोक म्हणाले असते राज्यपालांच्या भाषणात त्याच त्याच गोष्टी किती वेळा ऐकावयाच्या? लहान भाषण करण्याचा हाच उद्देश होता. सध्या जे नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत त्याकडेच फक्त राज्यपालांनी सभासदांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न

केला आहे.

नवीन जे प्रश्न निर्माण झाले आहेत त्यामध्ये बेळगांवचा प्रश्न आहे. बेळगांवच्या बाबतीत नवीन परिस्थिती निर्माण झाली आहे. बेळगांवच्या बाबतीत जी ताजी घटना घडली तिचे राज्यपालांनी स्वागत केले आहे. या सभागृहातील सर्व माननीय सदस्यांनीही या घटनेचे स्वागत केले आहे. या प्रश्नासाठी चार लोकांची समिती नेमली होती. मी असे धरून चाललो नव्हतो की आपण यामध्ये १०० टक्के यशस्वी होणार आहोत. मी या सभागृहात एवढेच सांगितले होते की, म्हैसूर सरकार हा प्रश्न अजिबात अस्तित्वातच नाही अशी भूमिका घेऊन जे बसले होते ते चार माणसांच्या समितीकडे हा प्रश्न सोपविण्यास तयार झाले आणि हा प्रश्न आहे एवढे मान्य करू लागले हे आमच्या दृष्टीने पुढे पाऊल पडले आहे. विरोधी पक्षाने हा प्रश्न आहे ही गोष्ट मान्य केल्यामुळे आमची बाजू मजबूत झाली आणि त्यामुळे या प्रश्नाच्या बाबतीत प्रगती होत आहे असे मी म्हटले होते. या समितीने त्यानंतर रिपोर्ट दिला आहे आणि त्यानंतर जी नवीन घटना झाली ती म्हणजे या सीमा विभागातील जनतेने गेल्या निवडणुकीत पुन्हा एकदा आपले मत महाराष्ट्राच्या बाजूने व्यक्त केले हा होय. तेथील महाराष्ट्र एकीकरण समितीने केलेले काम आणि घेतलेली भूमिका विचारात घेता त्यातून निर्माण झालेल्या शक्तीची जाणीव केंद्रापर्यंत पोहोचविणे, हे महाराष्ट्र सरकारचे कर्तव्य होते आणि मला वाटते विठोबाचे पाय घट्ट धरण्यापैकीच हा एक प्रकार आहे. मला नाही वाटत की, आम्ही विठोबाचे पाय सोडले आहेत. लोकशाहीमध्ये निवडणुकांच्या निमित्ताने व्यक्त झालेल्या लोकमतामुळे निर्माण झालेली शक्ती वापरण्याचा प्रकार वेगळा आहे.

यानंतर, अध्यक्ष महाराज, पुणे तालुक्यात घडलेल्या एका गुन्हेगारीचे एक उदाहरण देऊन ह्या सबंध राज्यात गुन्हेगारी वाढली आहे असे सांगण्यात आले. गुन्हेगारी खरोखरीच वाढली आहे असे आढळून आले तर त्या गोष्टींचा तपास करून विचार केला पाहिजे हे मला मान्य आहे, पण कोणते तरी एक उदाहरण सांगून त्यामुळे गुन्हेगारी वाढली आहे असे म्हणणे योग्य होणार नाही.

सन्माननीय सभासद **श्री. एन्.डी.पाटील**[६७] यांनी एका सोसायटीने केलेल्या पत्रव्यवहाराला सरकारकडून उत्तर देण्यास फार विलंब लागला असे सांगितले. ह्याही बाबतीत चौकशी करून योग्य ती काळजी घेतली जाईल, असे मी त्यांना सांगू इच्छितो.

शिक्षकांच्या बाबतीत जे मुद्दे ह्या ठिकाणी उपस्थित करण्यात आले होते त्यांना नामदार शिक्षण मंत्र्यांनी उत्तर दिलेच आहे. युनिव्हर्सिट्यांच्या बाबतीत जो प्रश्न आहे

त्या बाबत सरकारकडे रिपोर्ट आलेला आहे. ह्या बाबतीत सरकारने शेवटचा निर्णय घेतल्यानंतर तो निर्णय ह्या सभागृहाला कळविण्यात येईल. इंजिनिअरिंग युनिव्हर्सिटीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मी एक वास्तववादी मनुष्य आहे. तुमच्या आमच्या जीवनाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मी युनिव्हर्सिटयांच्या प्रश्नाकडे पहात असतो. त्या दृष्टिकोनातून इंजिनिअरिंग युनिव्हर्सिटी काढण्यासाठी आपण काय केले पाहिजे, त्यासाठी लागणारी तांत्रिक माणसे पुरेशा प्रमाणात मिळू शकतील की नाही, त्यासाठी आवश्यक असलेले सामान मिळू शकेल की नाही, ह्या गोष्टींचा आपल्याला विचार करून मग हा निर्णय घ्यावा लागेल. आपल्यापुढे मुख्य प्रश्न आहे तो हा आहे की, एक्स्पान्शन ऑफ् एज्युकेशन आणि त्यातून निर्माण होणारे जे प्रश्न आहेत त्यांचा व्यवहाराच्या दृष्टीने युनिव्हर्सिटीजनी विचार केला पाहिजे. ह्या बाबतीत शिक्षण तज्ज्ञांचा सल्ला घ्यावयाचा म्हटले तर एका तज्ज्ञाचा आणि दुसऱ्या तज्ज्ञाचा विचार एक असू शकत नाही. तेव्हा सर्व विचारांची गोळाबेरीज करूनच सरकारला निर्णय घ्यावा लागणार आहे.

यानंतर एक मुद्दा असा उपस्थित करण्यात आला की, खडकवासला डॅमसाठी जो खर्च केला जाणार आहे तो प्लँड एक्स्पेंडिचरमधून केला जाणार आहे की नॉन-प्लँड एक्स्पेंडिचरमधून केला जाणार आहे? याला उत्तर अगदी सरळ आहे. हा खर्च प्लँड एक्स्पेंडिचरमधून केला जाणार. हा खर्च नॉन-प्लँडमधून कसा केला जाईल? खडकवासला धरण हीसुद्धा एक प्लँड योजना आहे, तेव्हा हा खर्च प्लँड एक्स्पेंडिचरमधूनच करावा लागणार. अर्थात याचा परिणाम इतर योजनांवर होईल आणि त्यांच्यासाठी कदाचित पैसा कमी पडेल की काय अशी भीती व्यक्त करण्यात आली. कदाचित तसे होईलही. एखादी योजना स्टेजेसनी होणार असेल तर त्या योजनेच्या एखाद्या स्टेजवर याचा परिणाम होईल, नाही असे नाही. पण खडकवासल्याची योजना ही प्लँड योजना आहे. नॉन-प्लँड नाही एवढे मात्र खरे.

यानंतर सन्माननीय सभासद श्री. गोगटे यांचे भाषण नेहमीप्रमाणेच झाले. आम्ही काम करण्याची पराकाष्ठा करीत असताना त्यांनी ते काम टोट्ल फेल्युअर झाले आहे असा शब्द वापरला. मला असे म्हणावयाचे आहे की, एखाद्या प्रश्नाबाबत कोणाच्या कितीही तीव्र भावना असल्या तरी शब्द वापरताना त्याचा अर्थ समजून वापरला पाहिजे. ह्या रीहॅबिलिटेशनचे काम चालू असताना काही लोकांना त्रास सोसावा लागला असेल, नाही असे मी म्हणत नाही. सन्माननीय सभासद श्री. गोगटे हे पुण्यातलेच आहेत, त्यांना सगळ्या गोष्टी माहीत आहेत. प्रश्न असा होता की, पावसाळा सुरू

होण्यापूर्वी हे काम पुरे झाले पाहिजे. पण तेथे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांपुढे असा प्रश्न निर्माण झाला की, रीहॅबिलिटेशन म्हणजे काय करावयाचे? रीहॅबिलिटेशन म्हटले की नुसती घरबांधणी झाली की काम संपत नाही. घरबांधणी बरोबरच रस्तेबांधणी व ड्रेनेज ही आनुषंगिक कामे येतात. तेव्हा आधी घरबांधणी की आधी रस्ते असा प्रश्न निर्माण झाला असता, आधी घरबांधणी पुरी करण्याचा निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला, आणि तोच निर्णय बरोबर आहे. हवामान हे काही तुमच्या आमच्या कल्पनेप्रमाणे चालत नाही तेव्हा रस्ते आणि ड्रेनेज हे काम एप्रिलच्या अखेरीस पुरे हाईल. मी असे काही म्हणत नाही रीहॅबिलिटेट् झालेली सर्व माणसे सुखी आहेत. त्यांच्यापुढे अनेक अडचणी आहेत हे मला माहीत आहे. त्यांच्या ज्या काही छोट्या छोट्या तक्रारी आहेत त्या नेहमीच राहणार आहेत आणि नेहमीच त्यांची दुरुस्ती करावी लागणार आहे. पण त्यामुळे रीहॅबिलिटेशनचे काम हे टोट्ल फेल्युअर आहे असे सन्माननीय सभासद श्री. गोगटे म्हणाले हे बरोबर नाही. त्या ठिकाणी हजारो लोक राहात आहेत आणि त्यांच्या डोक्यावर निवारा आहे. अर्थात हा निवारा शंभर टक्के चांगला आहे असे मी म्हणत नाही. त्यात दोष असतील, पण म्हणून हे टोट्ल फेल्युअर आहे असे म्हणणे बरोबर होणार नाही. श्री. ए.आर्.भट म्हणाले की, पूरग्रस्तांना उद्योगधंदे काढण्यासाठी ज्या सवलती पाहिजेत त्या समाधानकारक रीतीने पुरविल्या जात नाहीत. आम्हाला शक्य आहे तेवढे सर्व प्रयत्न होत असताना ते होत नाहीत असे म्हणावयाचे असेल तर यशाचे सूत्र तरी काय? आम्ही एक सूत्र ठरवून त्याप्रमाणे हजारो लोक काम करीत आहेत. पण हा प्रश्नच इतका मोठा आहे की, त्याला आणखी किती तरी काल लागेल. आमच्या दृष्टीने एक सूत्र घेऊन आम्ही हजारो लोकांना निवारा देण्याचा प्रयत्न करीत आहोत, त्यांना शक्य तितकी मदत करीत आहोत. हे आमचे मानवी सूत्र आहे. आम्ही इतके केले आहे. सर्व माणसांना निवारा आहे. प्रत्येकाला खोली मिळाली आहे. काही म्हणतात अजिबात पत्रे नाहीत. हे खरे नाही. पुष्कळ घरांवर पत्रे आहेत. जी माणसे अजून मंडपात राहतात त्यांच्या बाबतीत तशी स्थिती असेल. परंतु या माणसांनाही मे अखेरपर्यंत बंदिस्त घरांमध्ये नेले जाईल. त्यासाठी जे बांधकाम चालू आहे ते लवकरच पुरे होईल. मी नुकताच पुण्याला गेलो होतो तो एवढ्यासाठीच. गेल्या दोन-अडीच महिन्यात गेलो नव्हतो. कारण इलेक्शनच्यावेळी मंत्री आले अशी टीका झाली असती. आता इलेक्शननंतर गेलो तर इलेक्शननंतरही पुण्याच्या जनतेला आम्ही विसरलो नाही हे दाखविण्यासाठीही मी तेथे गेलो असेही म्हटले जाईल. पुण्याला एप्रिल मे मध्ये वादळ झाल्यास लोकांना त्रास होईल म्हणून काय करणे आवश्यक

आहे याचा विचार आम्ही केला आहे. मंडपात रहात असलेली माणसे तातडीने बंदिस्त घरात जावी म्हणून महाराष्ट्र हौसिंग बोर्डाकडून घरे बांधण्याचे काम चालू आहे. आपण त्या ठिकाणी जाऊन पहा. इतके आम्ही केले आहे व करीत आहोत तरी आमचे सन्माननीय मित्र श्री. गोगटे म्हणतात की टोट्‌ल फेल्युअर आहे. कितीही प्रयत्न केले तरी श्री. गोगटे यांचे समाधान आपण करू शकणार नाही अशी भावना माझ्या मनामध्ये निर्माण होणे बरे नाही. सन्माननीय सभासद श्री. गोगट्यांचे समाधान आपण करू शकू ही भावना माझ्या मनात निर्माण झाली तर ती चांगली गोष्ट होईल. गेल्या पाच वर्षांत आम्ही चांगला कारभार करण्याचा प्रयत्न केला आहे आणि करीत आहोत. श्री. गोगटे हे एक जबाबदार गृहस्थ आहेत. तेव्हा आम्ही जे प्रयत्न करीत आहोत, त्या प्रयत्नांच्या बाबतीत प्रती सहकाराची भावना ते ठेवतील अशी मला आशा आहे.

त्यानंतर रत्नागिरी येथे नाविक शाळा काढण्यासंबंधीचा उल्लेख झाला. हा प्रश्न अनेक वेळा चर्चेला आला होता. रत्नागिरी येथे नाविक शाळा पाहिजे ही मागणी पूर्वीही केली आहे. परंतु त्यात काही अडचणी आल्या. द्विभाषिक असतानाच प्रथम ही मागणी करण्यात आली. ही मागणी मला मंजूर आहे. या क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळविण्याचे गुणधर्म तेथील लोकांमध्ये आहेत हे खरे आहे. तेव्हा याचा जरूर विचार केला जाईल.

निवडणुकीच्या काळात आणि निवडणुकीसंबंधी उल्लेख करण्यात आला. त्याबाबत कोठे काय झाले ते मला माहीत नाही. परंतु ॲडमिनिस्ट्रेशन हे निवडणुका आल्या आणि नाही आल्या तरी काम करीत राहणार. निवडणुकीच्या काळात ॲडमिनिस्ट्रेशनचे काम थांबविता येत नाही. डिसेंबर जानेवारीत काही प्रश्न निर्माण झाले तर ते सोडवावेच लागतील. निवडणूक आली म्हणून काम करू नये असे होऊ शकत नाही, निवडणुकीच्या वेळी लोकांचे बरे केले तर ते उगाच आपल्याला मते देतील म्हणून बरे करू नये असे करता येणार नाही. परंतु या सर्व टीकेच्या बाबतीत माझा मोठा आक्षेप आहे. बऱ्याच वेळा बोलले जाते की लोकांनी अमुक केले, तमुक केले, दडपशाही झाली, लाचलुचपत झाली वगैरे. असे बोलणाऱ्यांना मला असे विचारावयाचे आहे की यामध्ये महाराष्ट्रातील जनतेची निंदा होत नाही काय? दडपशाहीला भिऊन किंवा लाचलुचपतीला बळी पडून मते देईल इतकी महाराष्ट्रातील जनता अवनतीला गेली आहे काय? गेल्या निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्रातील जनतेने आम्हालाही बाजूला फेकले होते. आता त्या जनतेने काँग्रेसचा स्वीकार केल्याबरोबर ती इतकी बिघडली आहे असे म्हणणे बरोबर होईल काय? याचा अर्थ महाराष्ट्राच्या

जनतेचे अंतःकरण त्यांना समजले नसले पाहिजे. विरोधी पक्षांचे लोक काँग्रेसवाल्यावर टीका करतात तेव्हा ती गोष्ट मी समजू शकतो. परंतु निवडणुकीत आम्ही जो विजय मिळविला तो सरकारी यंत्रणेचा दुरुपयोग करून आणि पैशाचा उपयोग करून मिळविला असे म्हणणे म्हणजे त्या जनतेचा अपमान आहे. सरकारी यंत्रणेबद्दलही अशा तऱ्हेने बोलणे बरोबर नाही. सरकारी यंत्रणा निःपक्षपाती आहे हे मी सांगू शकतो. मला तिचा अभिमान आहे. आपण जर व्होट्स पाहिली आणि त्यांचे ॲनालिसिस करून पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की सरकारी अधिकाऱ्यांनी जरूर मंत्र्यांच्या विरुद्धदेखील मते दिली आहेत. तेव्हा असे म्हणणे की काँग्रेस पक्षाने सरकारी यंत्रणा वापरली, मतदारांना धाकदपटशा दाखविला हे मुळीच बरोबर नाही. असे म्हणणे म्हणजे इलेक्शनचा अर्थ समजून घेण्याचे नाकारणे किंवा जनमनाचा कानोसा समजून घेण्याचे नाकारणे होय. अशा तऱ्हेने निवडणुकीचा वास्तविक अर्थ समजून घ्यावयाचा नाही असे जर विरोधी पक्षांनी ठरविले तर ती लोकशाहीला पोषक अशी गोष्ट होणार नाही. निवडणुकीत पराभव झाला तरी तो धैर्याने स्वीकारला पाहिजे आणि त्याचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यावेळी आमच्या पक्षाचा जय झाला असला तरी मागच्या निवडणुकीत आम्हालादेखील कित्येक ठिकाणी पराभव पत्करावा लागला होता. परंतु आम्ही तो धैर्याने स्वीकारला, आम्ही त्या निवडणुकीत जे लोकमत प्रकट झाले त्याचा अर्थ समजून घेतला आणि तो समजून घेतल्यामुळे आमचा यावेळी विजय झाला. विरोधी पक्षांनीदेखील आपल्या पराभवाचा अर्थ अशाच तऱ्हेने समजून घेतला पाहिजे. कशामुळे आपला पराभव झाला, त्याची काय कारणे आहेत हे विरोधी पक्षांनी समजून घेतले पाहिजे. त्या पराभवाला काहीतरी पॉझिटिव्ह अर्थ आहे. हा अर्थ त्यांनी समजून घेतला पाहिजे. त्यांच्याविरुद्ध एवढे जे लोकमत तयार झाले त्याला काहीतरी अर्थ आहे. आमच्यावर जी टीका होते ती आम्ही सहन करतो. परंतु निवडणुकीत जनतेने जो कौल दिला त्याचा राजकीय अर्थ समजून घेतला नाही तर त्यामुळे जनतेवर अन्याय केल्यासारखे होईल आणि ते एक देशाचे दुर्दैव ठरेल.

निवडणुकीच्या काळात सारा सूट का दिली असे त्यांनी म्हटले. अशी सूट पूर्वी दिली नसती आणि केवळ त्याच वेळी दिली असती तर कदाचित त्यांच्या आक्षेपात काही तथ्य आहे असे मी समजलो असतो. परंतु तशी परिस्थिती मुळीच नाही. ज्या ज्या वेळी अशी सूट देण्यासारखी परिस्थिती निर्माण होते त्या त्या वेळी सूट द्यावी लागते आणि त्याप्रमाणे ती देण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. आता निवडणुकी आहेत, तेव्हा विरोधी पक्षाचे लोक काय म्हणतील या भीतीने सूट दिली नसती तर ते

योग्य झाले असते काय असे मी त्यांनाच विचारतो. तेव्हा त्यांच्या त्या आक्षेपात काही अर्थ आहे असे मी मानत नाही.

श्री. एन्.डी.पाटील यांनी अल्पबचत योजनेसंबंधीही टीका केली ती मी ध्यानात घेतली आहे.

कोकणामध्ये दळणवळणाची जी अडचण आहे तिच्याही बाबतीत सरकार जागरूक आहे हे मी सांगू इच्छितो. कोकणातील वादळपीडित जनतेला मदत मिळाली नाही अशीही टीका केली गेली. पण ती मोघम टीका होती. वादळपीडित जनतेला मदत देण्याची सरकारने पराकाष्ठा केली आहे. शेतकी मंत्री श्री.पी.के.सावंत यांनी जातीने त्या बाबतीत लक्ष घातले हाते आणि जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न केला. रत्नागिरी आणि कुलाबा जिल्ह्यातील मच्छीमारांच्या अडचणींचा उल्लेख करण्यात आला. त्याचा विचार करण्यात येईल एवढेच मी सांगतो.

यानंतर मंत्रिमंडळासंबंधीचा एक मुद्दा उपस्थित करण्यात आला. मी याचा खुलासा पूर्वी केलेला आहे आणि यापुढे ह्या सभागृहापुढेही वारंवार करावा लागणार आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, मंत्रीमंडळ वाढलेले आहे. मंत्रीमंडळ बनविताना अनेक प्रश्नांचा विचार करावा लागतो. मंत्रीमंडळ लहान असावे की मोठे असावे, लहान असावयास पाहिजे असेल तर ते किती लहान असावे आणि मोठे किती असावे असे वाटत असेल तर ते किती मोठे असले म्हणजे त्याला चांगले आणि आदर्श मंत्रीमंडळ म्हणावयाचे असा कोणत्याही प्रकारचा सिद्धांत लोकशाहीत ठरलेला नाही. लहान मंत्रीमंडळ असले म्हणजे ते जास्त कार्यक्षम असते आणि मोठे झाले म्हणजे कार्यक्षम नसते असे काही आपल्याला म्हणता येणार नाही. एवढी गोष्ट खरी की, हे मंत्रीमंडळ पूर्वीच्या मंत्रीमंडळापेक्षा थोडेसे मोठे आहे. मंत्रीमंडळ मोठे असले म्हणजे काम करण्याच्या दृष्टीने सुलभता येते हा माझ्यापुढे दृष्टिकोन होता. ऑफिसमध्ये स्टाफ वाढवायचा झाला म्हणजे प्रत्येक क्लार्क किंवा सुपरिटेंडेंट दररोज किती फायली चाळतो याचा आढावा घेऊन मग निर्णय घेतला जातो. आता तीच टेस्ट मंत्रीमंडळ बनविताना लावावी असे कोणाला म्हणावयाचे आहे काय? जो जास्त फायली डिस्पोझ ऑफ करतो तो कार्यक्षम मंत्री आणि कमी फायली चाळतो तो कमी कार्यक्षम असे तर कोणाला म्हणावयाचे नाही ना? याचा अनुभव पाहावयाचा असेल तर कालवे मंत्री दररोज मला वाटते फार तर पाच किंवा दहा फायली पाहात असेल, दुसऱ्या खात्याचे मंत्री जास्त फायली पाहात असतील. पण यावरून मंत्र्यांची कार्यक्षमता ठरविणे चुकीचे होईल. आता यात दुसराही प्रश्न येतो आणि तो म्हणजे इकॉनॉमीचा. असे पाहू लागलो

तर मंत्रीमंडळ नसणे हेच जास्त इकॉनॉमिक होईल. जास्त मंत्री असले म्हणजे जास्त पैसा खर्च करावा लागतो असे नाही. हे मंत्रीमंडळ बनविताना माझ्या मनात दुसराच विचार होता, आणि तो म्हणजे कामाच्या सुलभतेचा. ह्या सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सभासद अनेक विषयासंबंधी प्रश्न विचारतात आणि त्यांची उत्तरे मंत्र्यांना द्यावी लागतात. विदर्भात काय झाले, कोकणाच्या विकासासाठी सरकारने काय केले आहे? तेव्हा हे मंत्रीमंडळ मोठे आहे हे कबूल करण्यात मला मुळीच लाजल्यासारखे वाटत नाही. आहे ती वस्तुस्थिती कबूल करूनच आपल्याला पुढे गेले पाहिजे. विरोधी पक्षातल्या लोकांनी आपल्या जागा बदलल्या तर त्यांना हे सगळे अनुभव येतील. अर्थात असा प्रसंग त्यांच्यावर येणार आहे की नाही हे मला सांगता येणार नाही पण मंत्रीमंडळ लहान आणि मोठे यातले नेमके चांगले कोणते हे ठरविणे कठीण आहे. लहान मंत्रीमंडळ असले म्हणजे प्रश्नांचे निकाल तडकाफडकी लागतात आणि मोठे मंत्रीमंडळ असले तर काम होणार नाही असे म्हणणे धाडसाचे होईल. मी लहान मंत्रीमंडळातही काम केलेले आहे. मंत्रीमंडळ मोठे की लहान यापेक्षा मंत्रीमंडळात असलेल्या लोकांमध्ये असलेली गुणवत्ता, गरज आणि शक्ती हा दृष्टीकोन विचारात घेऊन मी हा निर्णय घेतलेला आहे.

त्यानंतर कामगार आणि मालक यांच्यासंबंधी. त्रिपक्ष परिषद का भरविली नाही असे विचारले गेले. मी सांगितले आहे की, इंडस्ट्रियल पीसचा दृष्टीकोन ठेवूनच आम्ही काम करीत आहोत. तेव्हा ते करण्यासाठी चर्चा केलीच पाहिजे. योग्य परिस्थिती निर्माण झाली आणि यश येण्याची शक्यता दिसली तर त्रिपक्ष परिषद जरूर भरेल.

सरकारी नोकरांच्या पगारासंबंधी उल्लेख करण्यात आला. त्यासंबंधी उपसूचना दिली आहे. सरकारी नोकरांच्या पगारासंबंधी विचार करून आमच्या अर्थखात्याने एक रिपोर्ट तयार केला आहे. तो रिपोर्ट निवडणुकीच्या काळात मंत्रीमंडळ पाहू शकले नाही. त्यामुळे त्या रिपोर्टावर मंत्रीमंडळाने विचार केलेला नाही. तो रिपोर्ट मी स्वतः पाहिलेला नाही. अशा परिस्थितीत मी त्याबद्दल काय मत देणार? परंतु हा प्रश्न कोणत्या परिस्थितीत आहे याचा मी फक्त उल्लेख केला. यापेक्षा तूर्त मला जास्त सांगावयाचे नाही.

नामदार राज्यपालांच्या भाषणाचे सामान्यपणे सर्वांकडून स्वागतच झाले आहे अशी माझी भावना आहे. राज्यपालांच्या बाबतीत ज्या सदिच्छा माननीय सभासद श्री. देशपांडे यांनी व्यक्त केल्या आणि त्यांनी ज्या भावना बोलून दाखविल्या आहेत त्यांच्याशी मी संपूर्णपणे सहमत आहे. आमच्याबरोबर पाच सहा वर्षे राहून अत्यंत

कठीण अशा काळात जे सहकार्य त्यांनी दिले आणि मार्गदर्शन केले त्याबद्दल श्री. देशपांडे यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. एक सुसंस्कृत, थोर आणि देशभक्त असे राज्यपाल आपल्याला लाभलं ही एक प्रकारे या राज्याच्या दृष्टीने भाग्याची गोष्ट समजली पाहिजे. इतके सांगून मी आपले भाषण पुरे करतो.

■ ■ ■

On 20th March, 1962, Shri Y. B. Chavan, Chief Minister, defended the Government's policy outlined in the Governor's address and added that in accordance with this policy emphasis would be on rural development and establishing socialist pattern of society.

# डॉ. बिधनचंद्र रॉय व श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव*

### ९ जुलै १९६२

*वरील दोन प्रमुख आणि मान्यवर नेत्यांच्या मृत्यूबद्दल दुखवट्याचा ठराव मा. यशवंतराव चव्हाण यांनी सभागृहात मांडला.*

अध्यक्ष महाराज, या महिन्याच्या पहिल्या तारखेला या देशातील दोन प्रमुख आणि पहिल्या दर्जाचे नेते मृत्यूने आपल्यातून ओढून नेले आहेत. डॉ. बिधनचंद्र रॉय आणि श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांच्या निधनामुळे देशाची अपरिमित हानी झाली आहे. दोघेही थोर नेते ''भारत रत्न'' या अत्युच्च पदवीने विभूषित झाले होते. अशी दोन थोर माणसे आपल्यातून गेली याबद्दल दुःख होते.

श्री.पुरुषोत्तमदास टंडन हे खऱ्या अर्थाने पुरुषोत्तमाला साजेसे जीवन जगले. त्यांच्या जीवनाची ओळख प्रत्येकाला आहे, त्यांनी आपले सबंध जीवन देशासाठी समर्पित केले होते. १९३० सालापासून त्यांनी देशातील विविध चळवळीत भाग घेतला आणि मोठा त्याग केला. ते संपूर्णपणे राष्ट्रीय जीवन जगले. त्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीतच भाग घेतला असे नव्हे तर इतर महत्त्वाच्या चळवळीचेही त्यांनी नेतृत्व केले. लाला लजपतराय यांच्या बरोबर त्यांनी काम केले. हिंदी साहित्य सम्मेलनाचे ते अध्यक्ष होते आणि ह्या क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी ही हिंदुस्थानच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याइतकी महत्त्वाची आहे. हिंदी भाषेबद्दलचा त्यांचा अभिमान जाज्वल्य होता आणि त्या क्षेत्रात त्यांनी फार मोठी कामगिरी केलेली आहे. त्यांनी आपले जीवन ज्याला आपण डेडिकेटेड लाइफ म्हणजे त्यागमय जीवन म्हणतो असे घालविले

* M.L.C. Debates. Vol. VII, Part II, 9th July 1962, pp. 390-391.

आहे. १९३७ साली जेव्हा पहिल्या प्रथम काँग्रेस पक्षाने अधिकार-ग्रहण केले त्यावेळी उत्तरप्रदेशच्या विधानसभेचे ते अध्यक्ष होते आणि स्वतंत्र हिंदुस्थानमध्ये आजच्या पार्लमेंटरी क्षेत्रामध्ये जे काही काम झालेले आहे त्यामध्ये काही मौलिक परंपरा निर्माण करण्याचे अतिशय उत्कृष्ट काम त्यांनी चांगल्या रीतीने केलेले आहे. ते अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते आणि खऱ्या अर्थाने हिंदुस्थानच्या पहिल्या प्रतीच्या राजकारणात त्यांनी कार्य केले होते. गेली कित्येक वर्षे ते आजारी होते आणि ३-४ वर्षे अंथरुणाला खिळून होते, परंतु त्यांचे लक्ष देशहिताच्या दृष्टीने निरनिराळ्या गोष्टींकडे होते. ८० वर्षांचे संपूर्ण जीवन त्यांनी राष्ट्रोपयोगी कार्याकडे खर्च केले असून त्यांचे त्यागमय जीवन भारताला आदर्श असेच होते.

दुसरे नेते बंगालचे मुख्यमंत्री कै. डॉ. बिधनचंद्र रॉय यांच्या मृत्युमुळे बंगालचीच काय पण भारताची हानि झालेली आहे. त्यांचे सबंध जीवन हे राष्ट्रसेवा करण्यासाठी खर्च झालेले आहे. गेल्या १५-१६ वर्षांत त्यांनी बंगालच्या राजकारणात खेळीमेळीचे वातावरण निर्माण केले आणि बंगालच्या राजकारणात समतोलपणा राखण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. डॉ. बिधनचंद्र रॉय हे बंगालचे मोठे पुढारी असून राष्ट्रपुरुष होते. गेल्या ३०-४० वर्षांत राजकीय क्षेत्रात काम करणारी जी मंडळी होती त्यामध्ये त्यांचे स्थान अग्रगण्य होते. डॉ. बिधनचंद्र रॉय हे एक नाणावलेले डॉक्टर होते आणि त्या क्षेत्रात त्यांनी मोठे मानाचे स्थान मिळविलेले होते. कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या क्षेत्रात त्यांनी विधायक स्वरूपाचे काम केलेले आहे आणि भारताच्या इतिहासातही त्यांनी बहुमोल कामगिरी केलेली आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. त्यांच्यासारखा थोर पुरुष ज्या दिवशी जन्मास आला त्याच दिवशी म्हणजे ८१ व्या वाढदिवसादिवशी मृत्यु पावला हा एक योगायोग आहे.

ह्या दोन थोर पुरुषांच्या मृत्युमुळे आपली असीम हानि झालेली आहे. तेव्हा त्या बाबतीत दुःख प्रदर्शित करावे आणि ह्या सभागृहाच्या भावना त्यांच्या नातेवाईकांना आणि ते ज्या क्षेत्रात काम करीत होते तेथील प्रमुखांना कळवाव्यात अशी मी विनंती करतो.

■ ■ ■

On 9th July 1962, Shri Y. B. Chavan, Chief Minister, paid tributes to the memory of Dr. Bidhanchandra Roy and Shri Purushottamdas Tandon, in the Maharashtra Legislative Council and observed that in their death the country had lost two stalwarts of freedom struggle and added that they fully deserved the title 'Bharat Ratna'.

# कोकण विकास प्राधिकरण-प्रस्ताव*

## १९ जुलै १९६२

*विरोधी पक्षाच्या ह्या ठरावावरील चर्चेस उत्तर देताना मा. श्री. यशवंतराव चव्हाण म्हणाले की राज्यातील अविकसित प्रदेशाचा उत्कर्ष साधण्याकरिता राज्याच्या पंचवार्षिक योजनेत या आधीच उपाययोजना केलेली आहे.*

या ठरावाची मूळ कल्पना सन्माननीय सभासद श्री. शिवाजी पाटील यांनी जी सांगितली तिला माझा पाठिंबा आहे - म्हणजे डेव्हलपमेंटला पाठिंबा आहे, ऑथॉरिटीला नाही. ही माझी या ठरावासंबंधी मूळ भूमिका आहे. त्यांनी मागितले म्हणून नाही म्हणावयाचे असा यामध्ये दृष्टिकोन नाही. परंतु मला या बाबतीत असे म्हणावयाचे आहे की, जे कोकणसाठी स्वतंत्र डेव्हलपमेंट ऑथॉरिटीची मागणी करतात त्यांना डेव्हलपमेंटचे सूत्रच समजले नाही. मुख्य गोष्ट शासनाने स्वीकारली आहे ती ही की, महाराष्ट्रातील आर्थिक दृष्ट्या अविकसित असलेले जे भाग आहेत, मागासलेला असा शब्द मी लावीत नाही, तुलनात्मक दृष्ट्या अविकसित किंवा अंडर-डेव्हलप्ड असे जे भाग आहेत ते - त्यामध्ये कोकणचा समावेश होतो, मराठवाड्याचा समावेश होतो, विदर्भाचा समावेश होतो, दुष्काळी विभागांचा समावेश होतो. अर्थात याखेरीज राहिलेला भाग प्रगत आहे असा याचा अर्थ नाही, परंतु तुलनात्मक रीत्या काही भागांकडे जास्त लक्ष दिले पाहिजे या दृष्टिकोनातून याचा उल्लेख केला जातो. ही दृष्टि महाराष्ट्र राज्याने आपल्या सबंध राज्यकारभारामध्ये ध्येय आणि उद्देश म्हणून ठेवली आहे आणि तिसरी पंचवार्षिक योजना आखीत असताना दिलेली आश्वासने डोळ्यांपुढे

* M.L.C. Debates. Vol. VII, Part II, 9th July 1962, pp. 684-88.

ठेवून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची रचना त्या पद्धतीने केली. कोकणच्या अविकसित परिस्थितीचे वर्णन करावयाचे म्हटले तर ते सन्माननीय सभासद श्री. शिवाजी पाटील यांच्याइतकेच मी चांगले करू शकेन, कदाचित जास्त चांगले करू शकेन. अध्यक्ष महाराज, माझ्या एका विधानाचा अर्थ काय होता याबद्दल आपण उत्सुकता व्यक्त केली. माझ्या म्हणण्याचा आशय असा होता की, कोकणामधील सगळ्या समाजातील सगळे कर्तबगार लोक बाहेर आहेत. बुद्धिमान समाज बुद्धीचे क्षेत्र निवडायला बाहेर गेला. तेव्हा मी एवढेच म्हटले की, बुद्धिमान माणसांना त्यांच्या बुद्धीसाठी रत्नागिरीचे क्षेत्र अपुरे वाटले म्हणून ते बाहेर गेले. पण म्हणूनच देशासाठी काही महान् कर्तबगार माणसे लाभू शकली. क्षात्रधर्मीयांच्या बाबतीत कोणी मिलिटरीत गेले, कोणी पोलीस खात्यात गेले. अशा रीतीने कर्तृत्ववान आणि कर्तबगार माणसे बाहेर पडल्यामुळे कोकणच्या विकासामधील गतिमानता कमी झाली. थोड्याफार प्रमाणात ही गोष्ट सगळीकडे आहे पण कोकणच्या बाबतीत ती विशेष प्रमाणात आहे, तेव्हा याला मार्ग काय आहे? ही परिस्थिती लक्षात आल्यानंतर ती बदलली पाहिजे आणि ती बदलण्याचा उद्देश आपल्या डोळ्यांपुढे ठेवला पाहिजे. एक गोष्ट मला कबूल केली पाहिजे की, आतापर्यंत समतोल विकासाची बाब टाळलेली आहे आणि समतोल विकास करावयाचा तर विकासाच्या प्रक्रिया सुरू केल्या पाहिजेत. मी असे म्हणणार नाही की, खर्चाचा समतोल आपण पाच दहा वर्षांत सारखा करू. परिस्थितीचा समतोल हादेखील अमक्या वर्षांत दूर करू असे सांगणे अवघड आहे परंतु आपण त्या दिशेने प्रवास सुरू केला आहे की नाही ते पाहू. त्या दृष्टीने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची जी पुस्तिका आहे तिच्या १३२-३३ पानावर जो उल्लेख आहे तो सन्माननीय सभासदांनी जरूर पाहावा. त्यावरून असे दिसून येईल की, ह्या तीन जिल्ह्यामध्ये इतर जिल्ह्यांच्या तुलनेने जवळ जवळ ३.७१ कोटी रुपये इतकी जादा रक्कम देण्याचा प्रयत्न केला आहे. इतर जिल्ह्यांची तुलना केली तर ह्या तीन जिल्ह्यांत जास्त पैसे देण्याचा प्रयत्न केला आहे याचा उल्लेख आपणाला रिजनल इम्बॅलेन्सेस या सदराखाली जो १४ वा पॅरिग्राफ आहे त्यामध्ये दिसून येईल. त्याचबरोबर रेल्वेचा प्रश्न, विजेचा प्रश्न, कम्युनिकेशनचा प्रश्न हे तीन प्रश्न महत्त्वाचे आहेत. कोठल्याही समाजाची आणि आर्थिक विकासाची गति वाढवावयाची असेल तर ह्या तीन क्षेत्रात कार्यक्रमाची योजना करावी लागेल. त्या दृष्टीने पाहिले तर आपण ही योजना सुरू केलेली आहे असे दिसून येईल. उत्तर कोकणात विशेषतः ठाण्याचा जो भाग आहे - उत्तर कोकण म्हटल्यानंतर कदाचित आपल्या डोळ्यांसमोर वारली भाग येईल त्यासंबंधी मी बोलत नाही परंतु जो प्रामुख्याने

ठाण्याचा भाग आहे - तेथे विकास झालेला आहे. तेथे मुंबई शहरातील विजेची शक्ती निर्माण होत आहे. कोकण म्हटल्यानंतर रत्नागिरी डोळ्यांपुढे येते म्हणून मी तीन जिल्ह्यांसंबंधी बोलतो. दक्षिण कोकणात विजेची कमतरता आहे परंतु कोयना योजना परिपूर्ण झाल्यानंतर कोकणचा विजेच्या क्षेत्रात जो दुबळेपणा आहे तो दूर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आपण सांगितले की पश्चिम किनारा हा महत्वाचा भाग आहे. कोकणचा किनारा चांगला विकसित झाला तर त्यामुळे देशाचेही चांगले होणार आहे आणि ह्या गोष्टीला गेल्या तीन वर्षांत एक चांगले स्वरूप येऊ लागले आहे. ह्या राज्याच्या महत्त्वाच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून ही योजना स्वीकारावी लागेल. त्याचबरोबर कोकणातील बंदरांच्या विकासाचाही प्रश्न आहे आणि त्याला चालना द्यावी याचा साकल्याने विचार करून त्या स्वरूपाची योजना महाराष्ट्र राज्यापुढे तयार आहे. हा प्रश्न पूर्वी मनामध्ये येत नव्हता परंतु आता रत्नागिरीतील बंदरासंबंधी निर्णय झालेला आहे. कोयनेची वीज येण्यामुळे उद्योगधंदे सुरू करण्याची परिस्थिती निर्माण होऊन धंदे सुरू होत आहेत. पंचवार्षिक योजनेच्या पुस्तिकेतील जो महत्वाचा भाग आहे त्यामध्ये आमचा जो हंबल क्लेम आहे तो मी दोन ओळीत सभागृहाला वाचून दाखवितो. पान १३३ वर दुसऱ्या पॅरिग्राफमध्ये असे म्हटले आहे की,

"It will be seen from the above that the Third Plan is likely to initiate a radical change in the economy of the Konkan area."

येथे रॅडिकल चेंज होईल आणि कोकणच्या परिस्थितीत बदल होईल अशी आमची अपेक्षा आहे. याचा अर्थ ताबडतोब ५० कोटी रुपये खर्ची पडणार आहेत असा नाही परंतु त्यासंबंधी जो ॲप्रोच आहे त्या दृष्टीने पावले टाकण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्याला निश्चित स्वरूपाचे रूप येत आहे. कोकणच्या प्रश्नाला किती प्राधान्य दिले जात आहे, ह्यासाठी ऑथॉरिटी आहे की नाही हा प्रश्न राहतो. माझ्या काही मित्रांनी हा प्रश्न उपस्थित केला, परंतु आपण जो विचार केला तो सबंध महाराष्ट्राचा प्रश्न या दृष्टीने विचार केलेला नाही. मग जिल्हा परिषदा आणि पंचायतीची कल्पना कशासाठी निर्माण केली आहे? आपली जी दृष्टी आहे ती रिजनल डेव्हलपमेंट म्हणजे प्रादेशिक विकासाची दृष्टि आहे. सबंध राष्ट्राच्या विकासाची योजना प्रादेशिक विकास योजनेच्या दर्जातून करणार आहोत. अध्यक्ष महाराज, प्रादेशिक विभागामध्ये समतोलपणा निर्माण करण्यासाठी आणि जो इम्बॅलन्स असतो तो दूर करण्यासाठी हा एक मार्ग आहे ह्या दृष्टिने आपण जिल्हा परिषदेकडे पाहिले पाहिजे. आपण जिल्हा परिषदांची संघटना निर्माण केली ती कशासाठी तर ह्या सबंध कामाची जिम्मेदारी घेण्यासाठी त्याची आवश्यकता आहे म्हणून.

विकासाच्या ध्येयामध्ये डेव्हलपमेंटचा जसा प्रश्न येतो तसा काजूच्या लागवडीच्या स्कीमचाही प्रश्न येतो. आपण उल्लेख केला म्हणून सांगतो की, विकास योजनेमध्ये शिक्षणाचाही प्रश्न येतो त्यासाठी आपण योजना पाठवून दिल्या पण माणसे मिळाली नाहीत. आपण ह्या राज्याच्या विकास योजनेचा प्रश्न घेतला आणि ह्या कामासाठी सरकार आणि सरकारी नोकर आहेत म्हणून या कामापासून आपण जर बाजूला राहिलो तर काम होणार नाही. सरकारी यंत्रणा आणि कर्मचारी यामध्ये असले तरी ही योजना सर्वस्वी प्रयत्नाने होत नाही तर त्यासाठी स्थानिक संस्थांनी आणि पुढाऱ्यांनीही प्रयत्न करावा लागतो. तसा प्रयत्न झाला तरच ह्या योजना पूर्ण होतील. तेव्हा यामधील महत्त्वाचा प्रश्न कोणता असेल तर तो हा की, विकासाच्या कामाची गति वाढवावयाची असली तरी कम्युनिकेशन, वीज, रेल्वे आणि रस्ते ह्या सर्व प्रश्नांचा त्यामध्ये अंतर्भाव होतो. विहिरीचा प्रश्न निर्माण होतो म्हणून येथे उल्लेख केला गेला परंतु त्यासाठीही प्रमुख स्वरूपाची आम्ही पावले टाकलेली आहेत. ही पावले टाकताना तीन जिल्ह्यांच्या ऑथॉरिटीना निरनिराळा विचार करता येणार नाही. मी हे मान्य करतो की, अशा तऱ्हेच्या जिल्ह्यांनी एकत्र येऊन ह्या प्रश्नांचा विचार करावा लागेल. पंचायत ॲक्टच्या ११० कलमाप्रमाणे जिल्हा परिषदांनी एकत्र येऊन त्यांनी नेमलेल्या कमिट्या, त्यांचे बजेट या सर्वांचा विचार करून राज्याच्या गरजेप्रमाणे कसा पैसा खर्च केला जाईल याचा विचार करावयाचा आहे. त्या दृष्टिने ह्या गोष्टी अपेक्षून ह्या तीन जिल्ह्यांनी आपापल्या प्रश्नांचा विचार करावा लागेल. त्यासाठी कमिटी नेमण्याचा आणि तिचा चेअरमन नेमण्याचा व त्यांनी एकत्र बसून विचारविनिमय करण्याचा अधिकार दिलेला आहे. अशा तऱ्हेच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी एकत्र बसून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्याची सर्वांत जास्त आवश्यकता कोणत्या जिल्ह्यांच्या बाबतीत असेल तर तो कोकणच्या सर्व जिल्ह्यांच्या बाबतीत आहे. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, ह्या बाबतीत आपण सर्व राज्यांच्या दृष्टिने विचार केला पाहिजे. आपल्यापुढे नॅशनल इंटिग्रेशनचा प्रश्न आहे तो सोडविण्याऐवजी छोटे छोटे प्रश्न घेऊन त्यांचा विचार करण्याकडे अलीकडे प्रवृत्ती दिसून येते ती चांगली नाही. मी केवळ कोकणसंबंधानेच हे बोलत नाही. विद्यापीठाच्या स्थापनेच्या बाबतीतही वर्तमानपत्रात जे लेख येतात त्यातही हीच वृत्ती दिसून येते. यामुळे एक होते की सबंध महाराष्ट्रामध्ये दुर्लक्ष केले जात आहे. महाराष्ट्राची चिंता मला आहे तशी विरोधी पक्षातील लोकांनाही आहे, पण आपण जेव्हा एखाद्या लहान गोष्टीसाठी ऑथॉरिटी निर्माण करण्याची भाषा करतो तेव्हा आपण खरोखरी काय बोलतो याचा विचार केला पाहिजे. अशा रीतीने बारीक

सारीक प्रश्नासाठी आपण जर स्वतंत्र ऑथॉरिटीज निर्माण करू लागलो तर सबंध महाराष्ट्राच्या इंटिग्रेशनच्या दृष्टीने ते योग्य होणार नाही. सबंध महाराष्ट्राचे जीवन ज्या प्रश्नाशी निगडित आहे अशा प्रश्नासाठी स्वतंत्र ऑथॉरिटीज निर्माण करण्याचा प्रश्न वेगळा आहे. उदाहरणार्थ, एस्.टी.कॉर्पोरेशन आपण स्थापन केली आहे. त्याचप्रमाणे घरांच्या टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी हौसिंग बोर्डाची स्थापना केली आहे. पण ह्या ठरावात ज्या कारणासाठी ऑथॉरिटी निर्माण करण्याची सूचना करण्यात आली आहे ती निर्माण केल्यास सबंध महाराष्ट्राच्या एकत्रीकरणाच्या आड येण्याचा संभव आहे, ही गोष्ट मी ह्या सभागृहाच्या नजरेस आणू इच्छितो. हा जो धोका आहे तो जर मी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला नाही तर मी माझ्या कर्तव्यात चुकलो असे होईल. आपल्याला सबंध महाराष्ट्राचा विकास करावयाचा आहे आणि त्या दृष्टिने सरकार प्रयत्न करीत आहे. हे प्रयत्न करीत असताना एखाद्या भागाकडे दुर्लक्ष होत आहे असे जर कोणाला म्हणावयाचे असेल तर तसे सभागृहापुढे मांडणे ही गोष्ट वेगळी आहे, जर कोठे उणीव पडत आहे असे सरकारला आढळून आले तर सरकार याचा विचार करील. ह्या दृष्टिने विचार करूनच सरकारने कोकण विभागात निरनिराळ्या विकास योजना आखलेल्या आहेत, उदाहरणार्थ, काजूच्या झाडांची लागवड ही एक स्कीम सरकारने हाती घेतलेली आहे. जवळ जवळ ८० हजार एकर जमिनीत ही लागवड केली जात आहे. कोणी कदाचित असे म्हणेल की, यात सरकारच्या पैशाचा अपव्यय होत आहे. पण जेव्हा एखादा प्रयोग म्हणून केला जातो तेव्हा त्यात सुरुवातीला थोडेसे वेस्टेज हे होतेच. माझे सहकारी श्री.पी.के.सावंत हे पूर्वी काम पाहात हाते. त्यांनी ह्या बाबतीत स्पष्टीकरण करताना सांगितल्याप्रमाणे सुरुवातीला काजूचे बी लावून झाडे निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. तो प्रयत्न तितकासा यशस्वी झाला नाही असे दिसून आल्यानंतर प्रथम काजूची रोपे तयार करून ती लावण्याचा उपक्रम सुरु करण्यात आला आणि ह्या प्रयत्नात आपल्याला यश येत आहे. जंगलांची वाढ करण्याचा प्रश्न घेतला तरी तोही असाच प्रश्न आहे. नवीन नवीन झाडे लावल्यानंतर त्यासाठी सगळीच झाडे जगतील असे आपल्याला सांगता येणार नाही. पण अशा प्रश्नांसाठी जर आपण स्वतंत्र ऑथॉरिटी निर्माण करू म्हटले तर ते योग्य होणार नाही. जंगलांमध्ये राहणारा जो समाज आहे त्या समाजात विकासाची एक नवी दृष्टि निर्माण केल्याशिवाय हा प्रश्न सुटणे शक्य नाही. कारण झाडे लावल्यानंतर प्रत्येक झाडावर लक्ष ठेवणे एखाद्या अधिकाऱ्याला किंवा ऑथॉरिटीला शक्य होणार नाही. फॉरेस्टसंबंधी मला अतिशय तपशीलवार माहिती आहे. कारण ह्या खात्याच्या कामाशी

माझा दैनंदिन संबंध येत होता. जंगलात कोळसा तयार केला जातो आणि काही लोक कोळसा चोरतात. पण कोळसा चोरणाराला मदत करणारी माणसे मदत का करतात, याचाही विचार केला पाहिजे. याच्या बुडाशी काहीतरी हेतु असतो. तेव्हा मला एवढेच सांगावयाचे आहे की, फॉरेस्टवर ज्यांचे जीवन अवलंबून आहे, असा जो समाज आहे, त्यांच्यामध्ये आपण एक नवीन दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे. काजूची जी योजना आपण सुरू केली आहे तिच्यासंबंधी येथे बोलताना टीका केली जाते. पण टीका करण्यापलीकडे विधायक अशा सूचना केल्या जात नाहीत. आपण इतकी झाडे लावली आणि त्यापैकी इतकी मेली, तेव्हा ती का मेली, जास्तीत जास्त झाडे जगण्यासाठी काय केले पाहिजे ह्या प्रश्नाचा मूलगामी विचार करून जर विधायक सूचना करण्यात आल्या तर त्या आपल्याला हव्या आहेत.

तेव्हा अध्यक्ष महाराज, शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की, कोणत्याही प्रश्नाचा विचार करताना सबंध महाराष्ट्राच्या जीवनाचा विचार करून विशाल दृष्टिकोनातून टीका झाली पाहिजे. छोटे प्रश्न मांडून त्यांचा अलग अलग विचार करण्याने आपले नुकसान होणार आहे. ह्या ठरावावर बोलत असताना थोडेसे विषयांतर झाले ही गोष्ट खरी आहे. मी एक गोष्ट मान्य करतो की, कोकणच्या विकासाकडे महाराष्ट्र सरकारचे लक्ष असले पाहिजे आणि त्या दृष्टीने सरकारचे प्रयत्न चालू आहेत. कोकणविषयी सन्माननीय सभासदांना तळमळ आहे व त्यामुळे त्यांनी जो विषय मांडला त्याबद्दल सरकारला सहानुभूति आहे, पण हा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी जो मार्ग सुचविला आहे त्याच्याशी मी सहमत होऊ शकत नाही, कारण त्यामुळे कोकणचेही हित होणार नाही. कोकणच्या हिताच्या दृष्टीनेच हा जो ठराव आहे तो मी स्वीकारू शकत नाही. एवढे सांगून मी रजा घेतो.

■ ■ ■

Opposing the proposition of a separate Development Authority for Konkan as suggested by Shri Shivaji Patil, Shri Chavan assured that steps had been taken in 2nd and 3rd Five Year plans for the development of underdeveloped regions like Konkan and that, therefore, creation of an Authority for the purpose would be superfluous.

# काँग्रेस पक्षाकडून धाकदपटशा दाखविला गेल्यामुळे विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये पसरलेल्या घबराटीसंबंधी नियम ९६ नुसार चर्चा *

**२५ जुलै १९६२**

*वरील चर्चेला उत्तर देताना मा. चव्हाण यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांवर विरोधी पक्षीयांनी केलेल्या सर्व आरोपांचे खंडन केले व याउलट विरोधी पक्षीयांनीच काँग्रेस जनाना कशा धमक्या दिल्या हे सोदाहरण सांगितले.*

अध्यक्ष महाराज, ह्या चर्चेपैकी मला एक मुद्दा मान्य आहे आणि त्या बाबतीत सरकारचा आणि विरोधी पक्षाचा मतभेद नाही. ह्या राज्यात लोकशाहीला पोषक असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न प्रत्येक पक्षाने केला पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. ही परिस्थिती निर्माण करण्याच्या दृष्टिने लोकशाहीत एकापेक्षा अधिक पक्ष असणे अपरिहार्य आणि आवश्यक आहे. मी ज्या पक्षाचा प्रतिनिधी आहे आणि हे सरकार चालविण्याची जबाबदारी अंगावर घेतली आहे त्या पक्षाचा आणि सन्माननीय सभासद श्री. राजहंस यांच्यामध्ये ह्याबाबत काही मतभेद नाही. प्रश्न आहे तो यापुढेच आहे. प्रश्न निर्माण होतो तो असा की खरे काय आहे ? तत्त्वाच्या बाबतीत एकवाक्यता आहे. परंतु तपशिलाच्या बाबतीत मात्र अर्थाचा अनर्थ आणि अनर्थाचा अर्थ होतो अशी परिस्थिती आहे. त्यांनी साताऱ्याबद्दल, पुण्याबद्दल, नाशिकबद्दल कहाण्या सांगितल्या. ही सूचना माझ्याकडे आली तेव्हा वृत्तपत्रातील माहितीच्या सत्यासत्यतेबद्दल माहिती जमविण्याचा मी प्रयत्न केला. मला जी माहिती मिळाली ती सगळी सांगून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु मला जी माहिती मिळाली आहे ती पाहता या सूचनेमध्ये जो आक्षेप घेण्यात आला त्याचा मला संपूर्णपणे इन्कार केला पाहिजे असे मला वाटते. या ठिकाणी जी हकीगत सांगितली गेली तिचा मला स्पष्ट शब्दात इन्कार केला पाहिजे. सरकारी यंत्रणेने काँग्रेसपक्षाची बाजू घेतली असा जो आक्षेप घेण्यात आला तो आक्षेप कोणत्याही प्रकारे स्वीकारण्यास मी तयार नाही.

*M.L.C. Debates, Vol. VII, Part II, 25th July 1962, pp. 771 to 775.

कोणी असे सांगितले की दारू पिणारी माणसे पकडली जातात आणि काँग्रेसवाला असेल तर त्याला सोडून देण्यात येते. त्यांनी दोन तीन उदाहरणे दिली, नाशिकच्या शिवाजी मोऱ्यांचे उदाहरण दिले. ते शेतकरी कामकरी पक्षाचे होते. मला हे सांगावयाचे आहे की, यामध्ये पक्षाचा संबंध नाही. कोणत्याही पक्षाच्या कार्यकर्त्याला खासगी जीवन असते. या खासगी जीवनामध्ये दुसऱ्या काही खासगी कारणामुळे दोन पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये वैमनस्य असू शकते. तसेच आपण हे लक्षात घेतले पाहिजे की प्रत्येक पक्षात बरेवाईट लोक असतात. आमचा पक्ष प्रचंड असल्यामुळे त्या पक्षात कदाचित इतर पक्षांपेक्षा जास्त बरीवाईट माणसे असू शकतील. त्याबाबत आमचा वाटा कदाचित मोठा असेल. शेवटी पक्षातील माणसे झाली तरी ते समाजाचेच चित्र असते. तेव्हा प्रत्येक माणसाची जिम्मेदारी घेणे शक्य नाही. तथापि राज्ययंत्रणेचा ज्या ठिकाणी संबंध येतो त्या ठिकाणी राज्ययंत्रणा कोणत्याही पक्षाची बाजू घेत नाही हे पाहण्याची माझी जिम्मेदारी आहे. म्हणून मला या ठिकाणी स्पष्टपणे असे सांगावयाचे आहे की, ज्या ठिकाणी शासनयंत्रणेने विशिष्ट पक्षाची बाजू घेतली आहे किंवा विशिष्ट पक्षाला संरक्षण दिले आहे अशी एक जरी केस कोणी पुराव्यानिशी माझ्या निदर्शनास आणून दिली तर मी सरकारच्या वतीने माफी मागावयास तयार आहे.

या ठिकाणी काँग्रेसपक्षाकडून झालेल्या अन्यायाची माहिती सांगण्यात आली. परंतु काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांवर झालेल्या अन्यायाची मोठी थोरली यादी माझ्याजवळ आहे. पण मला त्याला वाचा फोडावयाची नाही. कारण जो विजेता आहे त्याने आरडाओरड करणे बरोबर नाही. मी आमच्या कार्यकर्त्यांना सांगितले की आपण हे सगळे विसरले पाहिजे. जो जिंकला आहे त्याने विनय दाखविला पाहिजे आणि टीका सहन केली पाहिजे. काही ठिकाणी राजकीय क्षेत्रात काम करणारी माणसे निवडणुकामध्ये खासगी सूड उगविण्याचा प्रयत्न करतात. निवडणुकीला मोठ्या यात्रेसारखे स्वरूप येत असल्यामुळे अनेक प्रकारची माणसे त्यात येतात. मराठ्यातून अशीच एक बातमी प्रसिद्ध झाली होती. परंतु निवडणुकीचा संधीकाल असल्यामुळे आम्ही गप्प बसलो होतो. कर्मधर्मसंयोगाने असे झाले की, एका काँग्रेसवाल्यावरही तसाच प्रसंग आला. यामध्ये काही खासगी वैर होते. तेव्हा अशा प्रकारच्या गोष्टी दोन्हीकडून होत असतात. परंतु सरकारी यंत्रणेने कोणत्याही एका पक्षाची बाजू घेतली असे आपल्याला पुराव्यानिशी माप टाकता येणार नाही. निवडणुकीपूर्वीही अशाच गोष्टी होत होत्या. शिवाजी मोऱ्यांचे नाव सांगण्यात आले. परंतु काकासाहेब वाघांना त्यांनी निवडणुकीत विरोध केला म्हणून असे झाले असे नाही. विशेषतः मी या बाबतीत फार जागरूक आहे की मला माहीत असलेल्या सार्वजनिक कार्यकर्त्यांविरुद्ध काही घडले तर यामध्ये काही राजकारण आहे की काय हे प्रथम शोधण्याच मी प्रयत्न करतो. या दृष्टीने मी या सभागृहातील आणि खालच्या सभागृहातील सभासदांशी संबंध ठेवून माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो. असे असताना कोणत्याही पुराव्याचा आधार न घेता मोघमपणे असे बोलावयाचे की या राज्यात दहशतीचे वातावरण आहे, हुकूमशाहीचे वातावरण आहे, हे अन्यायाचे आहे. या बाबतीत सहिष्णुतेची भूमिका आपण घेतली पाहिजे. मी असे म्हणेन की, लोकशाही

वृत्ती फक्त विजयी झालेल्या पक्षानेच दाखवावी हे बरोबर नाही. पराजित झालेल्या पक्षानेही ती दाखविली पाहिजे. या दृष्टीने माननीय सभासद श्री. गोगटे यांनी ''विजयोन्मत्त झालेला पक्ष'' असे जे म्हटले ते बरोबर नाही, असे मला म्हणावयाचे आहे. माननीय सभासद श्री. सोहनी यांनीही काही तक्रारी मांडल्या. जनसंघाच्या लोकांचा पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोन आहे. त्यांना वाटते की, राजकारण हा विशिष्ट लोकांचा मक्ता आहे. खालचा समाज अजून भोळा, अज्ञ आहे. जनसंघाची जनतेबद्दलची ही जी भावना आहे ती चुकीची आहे. आज खालचा समाज ते समजतात तितका भोळा राहिलेला नाही. कोणी कितीही मोठा असला तरी त्याचे राजकारण जोखून पाहिल्याशिवाय जनता आंधळेपणाने त्याच्या मागे जाणार नाही. जनसंघाने समाजाची ही परिस्थिती न ओळखल्यामुळेच जनतेमध्ये त्या पक्षाची शक्ती वाढत नाही. त्या पक्षामध्ये काही शक्ती आहे हे मी जरूर मानतो. परंतु जनता अज्ञ आहे आणि तिला भिवविण्याचा प्रयत्न केला जातो अशी जी त्यांची समजूत आहे ती चुकीची आहे. विजयी पक्षाकडून इन्टिमिडेशन होते अशा प्रकारची हवा पसरविण्याचा जो प्रयत्न केला जात आहे ती एक प्रकारची आसुरी भावना आहे असे मी म्हटले तर कोणी राग मानू नये. या सभागृहात ज्यावेळी गंभीर आरोप केला जातो त्यावेळी तो आरोप सिद्ध झाला तर ज्या सरकारवर आरोप केला जातो त्या सरकारला स्वतःला सरकार म्हणवून घेण्याचा नैतिक अधिकार राहत नाही. इतके मौलिक महत्त्व मी या प्रश्नाला देतो. लोकशाहीत विरोधी पक्षाचे संरक्षण करण्यास असमर्थ ठरलो तर सरकारचे प्रतिनिधी म्हणून राहण्याचे आमचे हक्क आम्ही सोडून दिले पाहिजेत. परंतु त्याचबरोबर हेही खरे की, वर्तमानपत्रात आलेली प्रत्येक हकीगत बरोबर असते असे धरून चालता येत नाही.

काँग्रेसपक्षाकडून झालेल्या अपराधांचा पाढा वाचला गेला. परंतु विरुद्ध पक्षाकडून काँग्रेस कार्यकर्त्यांवर झालेल्या अन्यायाचा पाढा मी वाचू शकतो. गेल्या १९६२ च्या निवडणुकीत माझा स्वतःचा जो अनुभव आहे तो मी या ठिकाणी सांगत बसत नाही.परंतु त्या अनुभवावरून काँग्रेसपक्षातील माणसेच तेवढी दडपशाही करतात आणि इतर पक्षाची करीत नाहीत असे म्हणता येणार नाही. मला अनुभवास आलेल्या सगळ्याच गोष्टी मी सांगत नाही. तथापि एक अनुभव मी पोलीस ऑफिसरना सांगितला तो या ठिकाणी सांगतो. निवडणुकीच्या आदल्या दिवशी माझ्या शहरात मी प्रचारासाठी हिंडत असताना विरोधी पक्षातील एक चांगले कार्यकर्ते रस्त्यातच माझ्या अंगावर येऊन आदळले. त्यांच्या तोंडाला दारूचा वास येत होता. माझ्या गळ्यात येऊन पडल्यानंतर त्यांनी मला विचारले, ''मी दारू प्यालो आहे असे तुम्हाला वाटते काय ?'' या कार्यकर्त्यांच्या तोंडाला दारूचा वास तर येत होता, अशा परिस्थितीत काय करावे असा माझ्यापुढे प्रश्न होता. दुसऱ्या दिवशी निवडणूक होती आणि मी आज काही केले असते तर त्यांचा गैर रीतीने अर्थ लावला जाण्याचा संभव होता. शेवटी मी त्याला म्हटले, ''बाबा रे, तू दारू प्यालेला नाहीस, आता घरी जाऊन स्वस्थ झोप.'' मी त्यावेळी या राज्याचा मुख्यमंत्री होतो तरी असहाय्य होतो. त्या वेळच्या राजकीय वातावरणात मी काही केले असते तर गैरसमज निर्माण झाला असता. तेव्हा मी विचार केला की आज या गोष्टीकडे दुर्लक्ष केले पाहिजे. मी हा माझा

अनुभव सांगितला. अशा परिस्थितीत मी काय करणार ? सन्माननीय सभासद खासगी चर्चा करणार असतील तर मी अशा अनेक मनोरंजक हकिगती सांगेन. मी असे म्हणत नाही की काँग्रेसच्या बाहेरचेच लोक चुकीचे वर्तन करतात. परंतु कृपा करून असेही समजू नका की लोक काँग्रेसमध्ये आले म्हणजेच त्यांच्या या भावना होतात. विजय मिळाल्यानंतर सगळ्याच माणसांच्या मनात अशा तऱ्हेची वृत्ती निर्माण होण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे जे पराजित झालेले असतात त्यांच्याही मनात अशा तऱ्हेची भावना निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून समतोल सांभाळण्याचे काम तुम्हा आम्हाला, शासनयंत्रणेला, केले पाहिजे आणि म्हणून या बाबतीत नुसते मोघम बोलण्यामध्ये अर्थ नाही. सहा महिन्यानंतर अशा तऱ्हेचे मोघम आरोप करण्यापेक्षा त्याचवेळी निश्चित आणि स्पष्ट शब्दात तक्रारी केल्या पाहिजेत, म्हणजे त्यांची चौकशी करून आवश्यक ती उपाययोजना करणे शक्य होते. ज्यावेळी अशा घटना घडल्या असतील आणि त्यात गुन्हेगारांना शासनयंत्रणेने प्रोटेक्शन देण्याचा प्रयत्न केला असेल त्यावेळी त्या माझ्या किंवा त्या त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांच्या नजरेला आणल्या पाहिजेत. ते न करता सवडीनुसार आणि सोयीस्कर वाटेल तेव्हा अशा तऱ्हेच्या भावना पसरविण्याने दुसऱ्या पक्षावर अन्याय होतो आणि म्हणून मला साफ सांगितले पाहिजे की, एखाद्या पक्षाविरुद्ध किंवा शासनयंत्रणेविरुद्ध अशा तऱ्हेची सरसकट टीका करण्याची दृष्टी बरोबर नाही. निवडणुका झाल्यानंतर मी आमच्या पक्षातील कार्यकर्त्यांना आणि विजयी उमेदवारांना कटाक्षाने सांगितले होते की, विजय विनयाने घ्या. त्यानंतर ज्या ज्या वेळी भाषणे करण्याची मला संधी आली आणि आमच्या प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांना बोलण्याचा प्रसंग आला त्या त्या वेळी त्यांनी आग्रहाने हीच गोष्ट मांडली. सन्माननीय सभासदांनी त्या वेळचे वृत्तपत्रांचे रकाने शोधून काढले तर त्यांना हे सापडेल. आम्ही निव्वळ एका पक्षाचे सरकार म्हणून या ठिकाणी काम करीत नाही. सरकार लोकांचे, सर्व जनतेचे आहे, म्हणून सरकारने जनतेच्या मूलभूत हक्कांचे रक्षण केले पाहिजे असे आम्ही मानतो. या प्रांतात कायद्याचे राज्य राहिलेले नाही असा आरोप करण्यात आला. तो ऐकून मला खरोखर आश्चर्य वाटले. अध्यक्ष महाराज, I must repudiate this allegation with all the emphasis at my command. मी निषेध करीत नाही, कारण निषेधाची भाषा मला मंजूर नाही. परंतु आपण मोघम बोलू नका हे मला सांगितले पाहिजे. आपल्या काही तक्रारी असतील तर आपण मला त्या निश्चित स्वरूपात सांगा. शासनयंत्रणेतील त्या त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांना सांगा, कलेक्टर, डी.एस.पी. आदी अधिकाऱ्यांना सांगा. त्या तक्रारीचे निवारण करण्याच्या कामी शासनयंत्रणेची संपूर्ण ताकद मदतीला येईल असे मी सांगू इच्छितो. परंतु केवळ संशयाने असे खोटे वातावरण निर्माण करू नका असे मला सांगावयाचे आहे. दुसरे असे की आम्ही नेहमीच प्रचंड बहुमताने निवडून येऊ असे नाही, आज विरोधी पक्ष दुबळा आहे, पण गेल्या वेळी आम्ही दुबळे होतो आणि विरोधी पक्ष सबळ होता. पण त्यावेळी आम्ही तक्रार केली नाही. रागावलो नाही, तर लोकांची सेवा करीत राहिलो. विरोधी पक्षाचे लोक आमच्यावर दडपण आणतात अशी तक्रार केली नाही. त्यावेळी विरोधी पक्षांनी स्वीकारलेले मार्ग आणि पद्धत यांची

आठवण झाली की त्यावेळी लोकशाही कोठे गेली होती असे वाटू लागते. त्यावेळी आम्हालाही काही मते होती आणि ती मांडण्याचा आम्हाला हक्क होता. परंतु आम्ही आमची मते जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न करीत असताना विरोधी पक्षांच्या लोकांनी आमच्याशी कसे वर्तन केले, ते आमच्याविरुद्ध काय काय बोलले, काय प्रचार केला, याची त्यांनी आपल्या मनाशी आठवण करावी, हे जे सहन करावयाला शिकतात त्यांना लोकमताला मार्ग दाखविण्याचा अधिकार मिळतो. त्यावेळी आमची मते आमच्या विरोधी पक्षांच्या मित्रांना मंजूर नसतील. आमची ती मते कदाचित खरी किंवा खोटी ठरली असतील. पण आम्हाला आमची मते मांडण्याचा अधिकार होता. तो अधिकार आम्हाला वापरू दिला का ? मते मांडण्याचा अधिकार हा लोकशाहीचा आत्मा आहे. परंतु त्या आत्म्याची त्यावेळी काय थट्टा केली गेली याचा विचार केला पाहिजे. अर्थात त्यावेळी विरोधी पक्षांच्या लोकांनी काही गोष्टी केल्या असतील म्हणून आम्ही त्या आज केल्या तर क्षम्य आहे असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. परंतु मी हे सांगू इच्छितो की, जेव्हा आम्ही दुबळे होतो तेव्हा कधीही असे झाले नाही अशी तक्रार केली नाही, आम्ही त्यावेळी विचार केला की आपण काम केले पाहिजे, लोकांची आणखी सेवा केली पाहिजे आणि आपली शक्ती वाढविली पाहिजे. आजही आमच्या पक्षात काही माणसे अशी असतील की, जी योग्य रीतीने वागत नसतील. ती जबाबदारी मी टाळू इच्छित नाही. परंतु कृपा करून असे समजू नका की अशा माणसांचा मक्ता आमच्याच पक्षाने घेतला आहे. कोणत्या पक्षातील कोणती माणसे काय करतात हे मी खाजगी रीत्या नावनिशीवार सांगू शकेन. गेली पंधरा वर्षे मी राज्यकारभारात आहे. तसेच, वयाच्या १६ व्या वर्षापासून मी राजकारणामध्ये वाढलो आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षातील व्यक्तींना मी नावाने आणि कामाने ओळखतो. केवळ पोलिसांच्या रिपोर्टावर काम करणारा मी मनुष्य नाही. माझ्यातील दोषांची आणि गुणांची जशी मला जाणीव आहे तशीच त्यांच्यातीलही दोषांची आणि गुणांची मला माहिती आहे. तेव्हा एकाच पक्षामध्ये वाईट गोष्टी आहेत अशा कल्पनेने किंवा भावनेने चुकीचे वातावरण निर्माण करू नका. काहीतरी चुकीच्या कल्पना मनाशी धरून महाराष्ट्रात न्यायाचे वातावरण नाही, कायद्याचे राज्य राहिलेले नाही, असे वृथा आरोप करून महाराष्ट्रावर, महाराष्ट्राच्या जनतेवर, महाराष्ट्राच्या सरकारवर अन्याय करू नका, असे मला सांगावयाचे आहे.

प्राचार्य खर्डेकर यांच्याबद्दल मला आदर आहे. ज्या कॉलेजात मी शिक्षण घेतले त्या कॉलेजात ते प्राध्यापक होते. आजही मला कळले की ते मुंबईत आले आहेत तर वेळात वेळ काढून मी त्यांना भेटण्याचा प्रयत्न करतो. अशा माणसासंबंधी कोणी वाईट घोषणा केल्या असतील तर त्याला मी केव्हाही चांगले म्हणणार नाही. पण कोणी घोषणा केल्या, काय म्हटले, कसे म्हटले हे निश्चित माहिती असल्याशिवाय त्याबाबत काही करणे कठीण आहे. विजयी झाल्यानंतरसुद्धा त्या लोकांच्या मुखातून अशा घोषणा निघाल्या नसतील असे नाही. सांगलीला व औरंगाबादला जेव्हा काही प्रकार घडले तेव्हा **श्री. वसंतराव पाटील**[६८] आणि **श्री. केशवराव सोनवणे**[६९] यांच्यासारख्या मंडळींनी त्या लोकांना आवरण्याचा प्रयत्न केला आणि तो सर्व

ठिकाणी केला पाहिजे. परंतु यावरून असे सिद्ध होत नाही की सर्व गैरप्रकार करण्याचा मक्ता फक्त या पक्षाकडे आला आहे. असे म्हणून त्यातून कोणी सुटू शकणार नाही. वास्तविक, असले प्रश्न - सार्वजनिक जीवनात नेहमी उद्‌भवणारे प्रश्न - तुम्ही आम्ही सगळ्यांनी विचार करून सोडवावयाचे आहेत. अर्थात जजेस् म्हणून कोणाला दोषी ठरविण्याकरिता म्हणून बसत असाल तर आम्ही बसू इच्छित नाही. तुम्ही स्वतः न्यायाधीश होणार आणि आम्ही तुमच्यापुढे आरोपी म्हणून उभे राहणार हे मला मान्य नाही. सार्वजनिक जीवनात प्रत्येकाने कसे वागावे यासंबंधी आचारसंहिता निश्चित करण्याकरिता बसण्याची आमची तयारी आहे. अर्थात ते एकमेकांच्या उणीवा काढण्याच्या दृष्टीने नव्हे तर सार्वजनिक जीवन अधिक सुरळीत करण्याच्या दृष्टीने. परंतु तुम्ही स्वतः न्यायाधीश होणार आणि आम्हाला आरोपी करणार हे आम्हाला अमान्य आहे. अशा तऱ्हेची जिम्मेदारी कोणत्या माणसावर द्यावी यासंबंधी चर्चा झाली होती. ट्रिब्युनल नेमावे अशी चर्चा झाली होती, परंतु असे ट्रिब्युनल नेमणे शक्य नाही अशा निर्णयाला ती मंडळी आली. कारण न्यायाधीश बनणे फार कठीण आहे. कारण ती व्यक्ती संपूर्णपणे राजकारणाच्या बाहेर असली पाहिजे, तिच्या मनातील राग, लोभ, पूर्वग्रह तिने विसरले पाहिजेत आणि राजकारणासंबंधीचे रागलोभ नसणारी माणसे महाराष्ट्रात आहेत असे मी आग्रहाने म्हणणार नाही, मी म्हणू इच्छित नाही. ती चांगली माणसे आहेत, मोठी माणसे आहेत, पण सर्वोदयवादीसुद्धा राजकारणी नाहीत असे मी मानीत नाही. अर्थात ती मोठी माणसे आहेत, चांगली माणसे आहेत. पण ते राजकीय पक्षात नसले तरी राजकारणात आहेत. **श्री. जयप्रकाश नारायण**[७०] यांनी सांगितले की मी कोणत्याही राजकीय पक्षात नाही, पण तेही राजकारणावर मधून मधून बोलत असतात. या देशामध्ये सगळ्यांना राजकीय दृष्टिकोन आहे. तेव्हा राजकारणापासून संपूर्णपणे अलिप्त असे जजेस् तुम्हाला मिळणार नाहीत. तेव्हा याबाबत एकच मार्ग उरतो आणि तो म्हणजे काही सिद्धांत मान्य करून त्यांचे पालन कोणत्या पक्षाकडून किती प्रमाणात होते हे पाहाण्याचे काम लोकांवर सोपविणे. या बाबतीत लोकांचे, जनतेचे, जे काही व्हर्डिक्ट असेल ते स्वीकारावयाला मी तयार आहे. I am prepared to accept the verdict of the people. आपण मार्ग काढण्यासाठी, चर्चेसाठी बसावयाला हरकत नाही. परंतु काँग्रेस हा राज्यकर्ता पक्ष आहे म्हणून सगळे आरोप त्याच्याविरुद्ध करण्याचे आणि तोच विजयोन्मत्त पक्ष आहे असे म्हणण्याने एकत्र बसण्याची भूमिकाच नाहीशी होते. काही माणसांना विजयाने, तर काहींना पराजयानेही उन्माद चढतो. पराजित माणसाच्या मनातही द्वेषाची, उन्मादाची भावना निर्माण होऊ शकते. हे एक ऐतिहासिक सत्य आहे. द्वेष व उन्माद विजयामुळे निर्माण होण्याची शक्यता आहे, त्यापेक्षा पराजयातून तो निर्माण होण्याची जास्त शक्यता आहे. ती एक मानसिक प्रक्रिया आहे. अर्थात याकडे दुर्लक्ष करता कामा नये. पण त्यासाठी मला आपण सांगितले पाहिजे, निश्चित स्वरूपात सांगितले पाहिजे की, अशा एक, दोन, तीन केसेस आहेत, त्यासंबंधी कारवाई करा, मी जरूर करीन ही यासंबंधी सरकारची भूमिका आहे, एवढे नम्रपणे सभागृहापुढे मांडण्याव्यतिरिक्त मी काय करणार ?

■ ■ ■

Shri Y. B. Chavan, Chief Minister, while replying to the discussion regarding the alleged panicky situation created by the Congress Party Workers, refuted the charges levelled by the Opposition members against the Congress workers. He cited, on the other hand various cases of intimidation on the part of the Opposition workers threatening the Congressmen, after the elections.

# संरक्षण मंत्रीपदाची सूत्रे घेण्यासाठी दिल्लीस जाण्यापूर्वी मा. यशवंतराव चव्हाण यांनी केलेले भाषण*

**१९ नोव्हेंबर १९६२**

*मा. श्री. चव्हाण यांनी त्यांच्याबद्दल ज्यानी प्रशंसोद्गार काढले त्यांचे मनःपूर्वक आभार मानले व त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात त्यांना दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली; त्याचप्रमाणे त्यांनी सर्वसामान्य जनांचेही आपण ऋणी आहोत असे म्हटले.*

अध्यक्ष महाराज, गेला अर्धा तास मी भावनापूर्ण भाषणे ऐकत आहे. गेले दोन चार दिवस मी अशाच प्रकारची भाषणे ऐकत आहे, परंतु आज दुपारी खालच्या सभागृहात आणि आता ह्या सभागृहात होणारी सन्माननीय सभासदांची आणि सहकार्यांची भाषणे ऐकत असताना माझ्या मनात गहिवरून येते. आज आपल्या भारतामध्ये एक गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि ह्या गंभीर परिस्थितीत एका अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी मी जात असताना लांबलचक भाषण करणे मला शोभून दिसणार नाही. हा भाषणाचा प्रसंग नाही, सभेचा प्रश्न नाही, तर एक प्रकारे गांभिर्याचा प्रश्न आहे. एका अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी प्रतिनिधित्व करण्याची संधी मला मिळालेली आहे आणि यामध्ये यशापयशाचा प्रश्न आहे, तो दूरचा प्रश्न आहे, परंतु आपल्या सगळ्यांची सहानुभूती आणि शक्ती माझ्या पाठीशी उभी आहे त्यामुळे मला सामर्थ्य वाटते. ज्या प्रेरणेने मी तिथे जावयाचे ठरविले आहे ती प्रेरणा माझ्या मनात कायम राहील आणि तुम्ही ज्या भावनेने मला पाठवीत आहात त्या भावनेला खंत वाटेल असे माझ्या हातून काहीही घडणार नाही. आज आपल्यापुढे जो प्रश्न आहे तो सबंध देशाच्या गुंतागुंतीचा

* M.L.C. Debates, Vol. VIII, Part II, 19th November 1962, pp. 34 -35

प्रश्न आहे तेव्हा उद्या सकाळपासून मी असे ठरविले आहे की राजकीय भाषणे करावयाची नाहीत. संरक्षण मंत्र्यांनी राजकीय भाषणे करू नयेत असा सिद्धांत आहे तो मला पाळावयाचा आहे. ज्याला प्रश्न सोडवावयाचे आहेत त्याच्या भागात त्यामुळे अडचणी येतात तेव्हा त्या जागेवर जात असताना मी माझ्यावर भाषणबंदी घालून जात आहे. आपण आज माझ्याबद्दल ज्या सदिच्छा व्यक्त केल्या त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मला खात्री आहे की, महाराष्ट्राबद्दल चिंता वाटणारी अनेक माणसे ह्या ठिकाणी आहेत. माझ्या जाण्यामुळे महाराष्ट्र दुबळा होईल असे मला वाटत नाही. एक व्यक्ती गेली म्हणून महाराष्ट्र कदापि दुबळा होणार नाही तर ह्या ठिकाणी अनेक कार्यकर्ते निर्माण होतील आणि महाराष्ट्रातील जागृत जनतेची सेवा करतील अशी मला खात्री आहे. महाराष्ट्रातील जनता सुशिक्षित आहे, जागृत आहे, जाणती आहे आणि त्यागाची भावना तिच्या मनात रुजली असल्यामुळे मी निश्चिंतपणे जात आहे. महाराष्ट्रातील राजकीय पक्ष आणि विरोधी पक्ष जाणता आणि जागृत आहे म्हणून निश्चिंत मनाने मी येथून जात आहे. माझ्या भावनांची आपण आठवण ठेवाल आणि तुमच्या भावना माझ्याजवळ राहतील एवढे या प्रसंगी मी सांगू इच्छितो.

■ ■ ■

---

Before leaving for Delhi to become the Union Defence Minister, the members of the House praised Shri Chavan, for his services to Maharashtra and showed confidence in him by moving a resolution to that effect. Replying to the appreceative references about him, he explained the House the national emergency in which he was called upon to hold the reins of Defence Ministry. He gave an assuarance to the people of Maharashtra that he would certainly keep in mind the feelings of and inspiration which he received from the people. Shri Chavan expressed his gratitude to all the Members of the House for their co-operation during his tenure as Minister, Chief Minister and expected the same love and affection in future from the people and their representatives.

# Fragmentation of land - a disaster

On 12 February 1947, Shri Morarji R. Desai, 1 Minister for revenue, moved* in the Bombay legislative Assembly Bill No. XVII of 1946 to provide for the prevention of the fragmentation of agricultural Holding and provide for the consolidation of Agricultural Holdings for the purpose of better cultivation thereof.

On 14 February 1947, Shri. Y.B. Chavan, then parliamentary Secretary, rose to speak in support of the Bill.

He brought to the notice of house that not many of the speakers might have tried to touch even the fringe of the problem of poverty in India which has no relevance to the prevention of Fragmentation Bill. He expressed the view that the real problem was to improve Indian agricultural economy. After tracing the history of agricultural reforms in western countries in the last century, he quoted the statistics of land in Bombay Presidency for the year 1936-37 and said that there was no case for the redistribution of land in this Province. Here be related bow in Russia, the Communist Party tried to collectivise agriculture and bow they met with disastrous results. He spelled out three principles on which the redistribution of land in foreign countries was based and concluded that the agrarian reforms as suggested in the Bill of Prevention of Fragmentation was the best solution.

(‘Consolidation of boldings’ means the amalgamation and where necessary the redistribution of boldings or portions of boldings in any village, Mabal or Taluka or any part thereof.)

---

Mr. Speaker[2] Sir, of course I rise in support of the Bill. I was hoping to hear some relevant criticism from the hon. Leader of the Opposition, but let me tell you frankly that I am completely disappointed. I must, however, try to confine myself to the actual

facts and the real case of the Bill. Many of the speakers who opposed the Bill have tried to touch the problem of poverty of India. Everybody tries to see the problem of poverty from his own point of view. This reminds me of an old story of six blind men and their efforts to see what the elephant was like.

The problem of poverty of India is not a one-point proposition. We cannot say that it is a problem of population. We cannot say that it is a problem of the absence of this or that particular thing. The problem of India is a problem which has been brought about by many contributory factors which, I think, we have to consider if at all we want to solve it. And coming to that, I would say that if India's agricultural economy and its problem is to be solved, then the problem will have to be seen and faced in its reality. Some people try to suggest that redistribution is the real solution and the hon. Member of Mr. Dange3 who unfortunately is not present here now, while advocating the cause of redistribution referred to the reforms in some of the continental countries. The history of agricultural reforms in the continental countries is very interesting and I think I may contribute something to the debate if I place some facts in this connection before the House.

The history of agricultural reforms in continental countries in the last century reveals three distinct types or categories of reforms according to the different blocs of countries and the nature of the reforms which they introduced. The Continent can be classified into the following three distinct groups: (1) The Western European countries, which are really speaking industrial countries where essentially the problem was quite different; (2) The Central and Southern European countries (the Baltic and the Balkan countries), where the problem was of quite a different type; and (3) Russia, the home of collectivisation as they call it. The method of redistribution was tried in the Central and Southern European countries; and it will be interesting to see why they tried it there. The hon. Member Mr. Dange while advocating this cause has given a very sound proposition and I am prepared to accept it. He said that before accepting the

method of redistribution there ought to be some sort of polarisation of the classes. Yes, that is true, but is there that type of polarisation existing in the Province? I am afraid there is not.

Sir, I am not trying to reply to one particular member. I am trying to meet the argument that he (Mr Dange) has advocated. In Czechoslovakia and in other countries of Central Europe there was that type of rural polarisation. For example, I would given the statistics of Finland about land positions. Out of the total land only 7.5 percent was under cultivation, and the remaining was either forest or pasture land. Then what was the positions of the rural families? Twenty-three per cent owned the land, 34 per cent rented the land, while 43 per cent had no land at all. I think this position existed in all other countries in the Central Zone. Even in Poland the same thing existed. It was quite all right in those countries, but is it necessary in our Bombay Province? It is not. I can give you some statistics. If I am repeating certain things, I hope I shall be excused. I shall now quote from the statistics relating to the Bombay Presidency pertaining to the year 1936-37 which have been referred to by the Indian Famine Commission. The number given is in millions of holdings. Up to 5 acres, it is 1.13; between 5 and 15 acres, it is .67; between 15 and 25, it is .25; between 25 and 100, it is .22 and over 100 acres, it is .02. If these figures are accepted as correct, we will have to accept that there is absolutely no case for redistribution. Under these circumstances, if anybody tries to redistribute the land or expropriates ownership, the results that followed in Russia are likely to be met with here in India also. In Russia the Communist Party tried to collectivise and they met with disastrous results. The peasantry opposed it, and opposed it tooth and nail. They resorted to the tactics of sabotage. They tried to kill all the live-stock and non-co-operated with the Government. The results was that 50 per cent of the horses, 55 per cent of the cattle, 66 per cent of the sheep and 43 per cent of the pigs were completely destroyed. Is it not a thing from which we can take a lesson? I think we should take a

lesson. Sir, I would here read a warning which the leader of the Communist party gave to his own comrades. The leader whose quotation I am giving is no less a person that Lenin, the Father of Soviet Russia. He said 'Nothing is more stupid', - stupid is his word, not mine,- 'than the very idea of applying coercion in economic relations with the middle-class peasant'. If this warning has any significance, I think it should be accepted by those who claim to be Communists, and also by those who are their strange bed-fellows. The case for redistribution of land has absolutely no ground in this Province. Even in those countries where redistribution was tried, the problem of fragmentation still persisted. Therefore, redistribution of land is not a solutions to the problem of fragmentation. Where there is inequity of distribution, redistribution may be a solution, but fragmentation of land is a problem by itself, which will require a solution of its own, namely consolidation. Even in those countries where redistribution was tried, for instance in Poland, Czechoslovakia, Bulgaria and all the Baltic countries, simultaneously they had to enact the type of legislation we are enacting to-day. Unfortunately, while quoting the history of agricultural reform in other countries, the members opposite never tried to see the real light in it. The principles on which those reforms have been based are, I think, three. One is to stabilise the cultivator on the land which he cultivates. The second si to discourage unprofitable small holdings; and the third is linking up the notion of absolute ownership with the interest of the community. These are the three principles on which all those reforms were based, and what is the programme or the agrarian policy which this Government is following is based on these very three fundamental principles of agrarian reform. The Tenancy Act, the Money-lenders' Act, the Debt Relief Act and the Bill that we are now considering are all aiming at the same objective.

Sir, I would like to bring one more fact to the notice of the hon. Members who tried to put forward the case for redistribution, and that is from the statistics for the year 1936-37. It will be seen that the land given out by the absentee landlords

to the tenants is 30 per cent absentee landlords are secured of their tenancy. They are cultivating the land without any danger of being evicted. Is it not a sort of redistribution? If at all redistribution is to be there, this process of redistribution in a legitimate form is already there, and I think it will evolve itself out to such a state that there will be absolutely no cause for complaint. If all these things are taken into consideration, I think there will be wholehearted support to the Bill, not only from this side of the House, but even from those who have tried to find fault with the Bill only because they had to do so.

Sir, with these words, I support the Bill.

■ ■ ■

# Role of the Police praised, better deal recommended

*After explaining* some of the remarks made by the hon. Member Shri Tulsidas Jadhav[4], regarding the alleged meeting in Kanna Chowk in connection with the elections to the Sholapur Municipality, Shri Y. B. Chavan said that he had never gone there nor did be address any meeting there. He clarified that while addressing the meeting at the Patryachi Talim, a young man tried to disturb the meeting which, however, passed off peacefully and he hoped that the hon. Member would accept this as true and would correct himself. Shri Chavan observed that the propaganda which he (Shri Jadhav) was carrying on would kill democracy.*

---

Mr. Speaker, Sir, I am taking this opportunity to explain some of the remarks my hon. Friend Shri Jadhav has made regarding me yesterday. Unfortunately I was not present in the House yesterday, but I am glad that he has given me this opportunity to explain myself. It is a fact that I had been to Sholapur in connection with the elections to the Sholapur Municipality. I addressed some four meetings is Sholapur. One was in Phaltan Galli, the second was in Patryachi Talim, the third was in Subhash Chowk and the fourth was in Vijapur Ves. I tried to remember all the details of what had happened at those meetings, and I do

* BLA Debates, Vol. 16, Part I, 16 March 1950, pp. 1515-16

not remember to have mentioned the name of one Shri Sattha[5]. I do not know why his name has been brought in by my hon. Friend here. Really speaking I had no reason to mention the name of Shri Sattha. I personally asked the hon. Member this morning to which particular meeting he wanted to refer. He told me that it was the meeting in Kanna Chowk. Let me tell him that I never addressed any meeting in Kanna Chowk. I do not know about the Kanna Chowk meeting. In fact, I do not know what the Kanna Chowk is like. I had never gone there nor did I address any meeting there. I hope he will correct himself about this statement. The only incident which I remember took place in the meeting which I addressed at the patryachi Talim. While I was addressing the meeting one young man sitting in a motor-car with a microphone attached to it came shouting all sorts of slogans in vulgar language near the meeting. I thought he was in a mood to disturb the meeting and, if possible, to break it up. I saw some policemen also moving about there. I told the audience - it was a largely attended, meeting- that it was better the young man was given an opportunity to go away and so I sat down. The police escorted him out. When he turned round the corner, I again started the meeting and then the meeting was a peaceful affair. That was the only thing that happened there and the police had to escort him. This is all that happened in Sholapur and this, I hope, that hon. Member, Shri Tulsidas Jadhav will accept as true. I believe he has respect for the truth and if he has, he should correct himself. But, unfortunately, he has developed a new art to be a democrat and I hope he is a democrat. But this is not the way of carrying on a propaganda for democracy. The propaganda which he is carrying on its propaganda for killing democracy. Let him not at least in the name of democracy carry on propaganda to kill democracy. Sir, this is all that I have to say.

■ ■ ■

# Police force in districts

*On 10 March 1951, the Government placed before the Assembly a demand of Rs. 6,06,75,600 to be voted by the Assembly for the expenditure on District Executive Force and District Police Force. There were several Cut Motions. Shri Chavan, as Parliamentary Secretary, replied* to the discussion on 12 March 1951.*

*He gave reasons for the increase in, the expenditure on Agriculture, the Police, Civil Administration, stating the circumstances requiring it. He asserted that the success of the novel experiment introduced in the Police Department would depend on (1) the appreciation of that method by the Legislature, (2) the proper guidance and support of the administration and (3) the active co-operation of the people.*

---

Mr. Speaker, Sir, I shall try to classify the arguments that have been advanced by my hon. Friends, Shri Jadhav and Shri Bhapkar[6] and the hon. Mover of the Cut Motion into two or three categories. They have exhausted all their information about what is happening in the State in their speeches which took up practically three hours. I, however, find that there are only a very few of their arguments which need to be replied to.

The first argument that was advanced by my hon. Friend, Shri Bhapkar was regarding the disproportionate expenditure on the police item. The hon. Member Shri Jadhav also referred

---

* BLA Debates, Vol. 18, Part II, (Inside No. 23), 12 March 1951, pp. 1394-98.

to this point. I shall take up that point first. The question of expenditure on the police by itself is an interesting subject for study. I had a look at the expenditure on this item for the last 10 years and I came across some very interesting information.

In 1940-41 the expenditure was about 1 crore and 57 lakhs. It is true that in 1951-52 the expenditure has come to 9 crores and 8 lakhs. No doubt, it appears to be a very stupendous increase, but we must try to examine why this increase has come about. Those who have tried to study this aspect have divided this period into two parts, namely, the period upto 1945-46 and the period from 1946-47 to 1951-52. In the first period, the increase is from 1 crore and 57 lakhs to 4 crores and 92 lakhs. This is the period when the Second World War was on. Anyone who has tried to look into the increase in the revenue resources of our State in this period would have marked that the revenue resources shot up from nearly 12 crores to 45 crores. The expenditure on every item, namely, agriculture, police, civil administration, etc., also went on increasing in this period. This question was examined by the Administrative Enquiry Committee and it gave its verdict upon the reason for the increase in the revenue resource as well as expenditure. The Administrative Enquiry Committee has said that because the scope of activities of these departments was naturally widened and because of the circumstances then prevailing, this increase in expenditure was inherently justified. So, we have got the opinion of experts as regards the increase in expenditure in the first period and that goes to show that we have tried to look at things from a scientific point of view.

In the latter part of the period, that is to say, from 1946-47 to 1951-52, the expenditure went up from 5 crores and 72 lakhs to 9 crores and 8 lakhs. The explanation that my hon. Friend Shri Bhapkar tried to give in this connection is rather unfair to himself. If we try to go into the cause of this increase in expenditure, it will be seen that the explanation that he gave was incorrect. It was a too simplified explanation. This process of increase in expenditure during an exceptional period is not

such a process that it can be explained away by such a simple explanation. It is a process the reason for which are economic, social and political. If the hon. Member realises that these are the reasons for the increase in expenditure during this period, I am sure he will come for the and say that this increase is certainly justifiable. What are these reasons? After 1946-47, the area and population of Bombay State have increased by nearly one-third. As a result of that we had to increase the establishments and increase the number of police stations. Then again, there was the question of revising the pay-scales and dearness allowance. The hon. Member Shri Jadhav who preceded me just now complained that the lower staff of the Police Department is not well paid. I think that is a hackneyed argument that is usually advanced without looking into facts. If he compares what is paid to the lower staff in this State with what is paid in other States and also compares what was paid before 1946-47 and what is paid now, he will have to admit, if he has any regard for truth, that what is being paid today is certainly reasonable. This is one of the causes why the expenditure on the police has increased. If the police force which is an instrument of law and order in any State is to be efficient, then such an increase in expenditure on the police is justifiable. This point was discussed in this House on a previous occasion and then many of us were convinced that the increase in expenditure on the police force on account of the increase in pay-scales and dearness allowance that were sanctioned to them was certainly reasonable. This is one of the reasons why the expenditure on the police has gone on increasing.

There is the third reason for the increase in the expenditure. In order to make our police force more efficient and effective we must allow it to have modern, scientific and mechanical instruments. Our police is equipped with the wireless, motor units, finger-print bureaux, etc. Expenditure on this account has gone on increasing. During this period there were disturbances of peace and there was the threat of a railway strike. On these occasions additional expenditure on the police had to be met. It

can be seen that this additional expenditure, as compared with the general increase in the police expenditure, is negligible. The implication of my hon. Friend Shri Bhapkar's repeated stress on the increase in police expenditure seemed to be that social services in this State are being starved. The hon. Finance Minister has in this budget speech dealt with this question at great length. However, since the hon. Member Shri Bhapkar tried to compare the police expenditure in Madras State with the expenditure on police in this State, I should like to place before the House the per capita expenditure on social services in this State and in Madras State. Let him compare these figures also. In 1949-50 the per capita expenditure on social services in Bombay was Rs 7-12-0, in Madras it was Rs. 3-5-0 in U.P., it was Rs 2-15-0; in 1948-49 in Bombay it was Rs 6-15-0, in Madras Rs 3-3-0, in U.P. Rs 2-8-0; in 1947-48 in Bombay it was Rs 5-6-0, in Madras Rs 2-12-0 and in U.P. Rs 1-9-0. I would like the hon. Member to compare these figures for his own satisfaction and I am sure he will have to admit that though expenditure on the police in this State increased and the increase was reasonable and necessary, items of social service not starved.

Sir, I must say that this cry that expenditure on police in this State is more is made out of ignorance. My hon. Friend Shri Bhapkar advanced an argument which is, I should say, unfair to himself. He said that the justification for this increased expenditure lies in the international situation. He said that the world is divided into blocs-Anglo-American bloc and Russian bloc-that the Anglo-American bloc has created certain artificial conditions in this country and that this Government and the Government of India have been following the Anglo-American bloc and that is why this Government has to spend more on police. The fallacy of this argument is obvious. The hon. Member said that Madras with Communist disturbances is spending less on the police while Bombay, without any such Communist disturbances is spending more on the police. If the logic of his argument is accepted, then in Madras too, by following the police of the Anglo-American bloc expenditure on the police should have been more. Sir, it

was quite unnecessary to link up the expenditure on police with the international situation. To explain away a complex social phenomenon by such a simple explanation is to deceive oneself. I hope the hon. Member Shri Bhapkar will see the fallacy of his argument.

The hon. Member complained that the police force was used to suppress an ideology. He paid compliments to his own memory by reminding himself that he was once a Congressman. I am glad that he remembers that he was once a Congressman. He told us that even when he was a Congressman he had been detained once.

If the hon. Member Shri Bhapkar has eyes to see, he can easily see that there is the Congress. If he wants to shut his eyes and does not want to see the world before him, I cannot help it. I cannot help it if he sees only darkness before him when the sun is shining bright before his eyes. The hon. Member Shri Bhapkar said that he had to go to jail when he was a Congressman. I would say, Sir, that this is conclusive proof of the bonafides of this Government. Even when he was a member of this party and when he tried to tread on the path of violence, he was made to pay for it even though he was a member of this party.

I know he has a sort of fascination for Courts because he is a pleader. He can take his chances outside. As regards his allegation that the police are used to suppress an ideology, I may inform the House that many times the Government has on the floor of this House declared that it has no quarrel with any ideology as such, whether it is Communism, Socialism or any other ism, including the ideology of the Hindu Mahasabha of establishing a Hindu Raj in this country, but that it has a quarrel only with the means employed to implement such ideologies. If in carrying out the ideologies, they resort to violence, subversive activities and sabotage, then no Government worth the name can allow it for a moment. The police force must be used to prevent such things from happening. If such things are prevented from happening, then my hon. Friend Shri Bhapkar says that the

police are used to suppress an ideology. To say so is to misuse the word 'ideology'. Ideology is always associated with creating something new and noble. Nobody can have any quarrel with such an ideology.

My hon. Friend Shri Jadhav said that we should be able to do without the police. I should very much like to share that dream with him. That dream might be realised one day if he desists from preaching to the people as he does now and instigating them to do things which they are doing now. It is no use indulging in dreams. Nobody unnecessarily wants to spend more on the police. The happy days which my hon. Friend is dreaming of are still long to come.

Then Sir, the hon. Members of the Opposition went on telling us tales about the inefficiency of the police administration. Both the hon. Mover of the Cut Motion and the hon. Member Shri Jadhav were telling us many tales which were doubtful and vague. I would invite the attention of the House to certain references which these hon. Members made. They made some allegations against some of the hon. Members of this House who belong to Satara District. I have the honour to belong to Satara district. The hon. member Shri Hujare[7] made some allegations against hon. Members belonging to Karad town in the district of Satara. If the hon. Member had the courage and the honesty of purpose, then he would have mentioned the specific name out of those four or five hon. Members coming from this town against whom he has made certain allegations. I may mention that one of the hon. Members from the Opposition also belongs to this town. Therefore, the hon. Members Shri Hujare ought to have mentioned the name of the hon. Member against whom he wanted to make the allegations. He has not mentioned the name and that is the way he has tried to create a bitter atmosphere by making vague allegations. He went on telling very vague things. He went on describing in a graphic manner of things, and made them appear as if they have taken place just now. Then hon. Member Shri Jadhav's complaint is that he does not feel that there is a change for the better so far

as the police administration is concerned. Well, Sir, he will certainly feel that there is a change for the better if he looks beneath, but he wants to create an atmosphere- an unhappy atmosphere- in which he feels that all is not well. There may be certain individual officers who may be committing mistakes. But if he had tried to approach somebody superior to these officers, or if he had tried to approach the hon. Home Minister[8] and complained about the individual officer, the hon. Home Minister would have looked into the matter. But the hon. Members of the Opposition said that they saw a certain officer making unnecessary investigations. What further action the officer took was not disclosed by these hon. Members. They conveniently forgot to disclose that. In this way they create an atmosphere in which they want to feel that all is not well. Nothing is farther from the truth. Let me tell the non. Members, Sir, that we are making an experiment to see that the administration is made more efficient. The scientific methods which the police were using in the last regime to keep us in bondage are now sought to be changed and we are now trying to use those methods be brought into force, patience and strength are necessary. There should also be co-operation from the people to bring about that change, but unfortunately the necessary co-operation from the hon. Members of the Opposition like the hon. Members Shri Hujare and Jadhav is not forthcoming. I am sure that this new experiment will be a success. It is a great experiment on the success of which depends the future of this country. There are three or four factors on which depends the success of that experiment. The first of such factors is the appreciation of these methods by the Legislature. The second one is the patient but strong guidance by the administration; and the third is the actual co-operation from the people. These are the three factors and I hope that, if hon. Members will keep these factors in mind and act accordingly, then they will have no further cause for making any grievances about the police administration.

■ ■ ■

# टिपा

**१. श्री. भाऊसाहेब हिरे :** नाशिक जिल्ह्यातील एक जबरदस्त वजनदार काँग्रेस कार्यकर्ते. सुरुवातीस गृहमंत्री श्री. के. एम्. मुनशींचे पार्लमेंटरी सचिव म्हणून काम केले. इ. स. १९५२ च्या निवडणुकीनंतर महसूल, वन व कृषी मंत्री झाले. १९५७ च्या निवडणुकीत ते विजयी झाले होते. महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये यांनी फार मोलाची कामगिरी केली. पृ. ३०

**२. श्री. एस्. एम्. जोशी :** श्री. श्रीधर महादेव जोशी हे एस्. एम्. या नावाने ओळखले जात. तरुणांचा नेता या नात्याने त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीस सुरुवात केली आणि ते काँग्रेसमधील समाजवादी विभागाचे सदस्य झाले. ''चले जाव'' चळवळीमध्ये त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राजकारणापासून ते अलिप्त राहिले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात आचार्य अत्रे यांच्याबरोबर भाग घेतला. बेळगांव-गोवा इ. भाग महाराष्ट्रात सामील झाला पाहिजे ह्या सीमा आंदोलनात त्यांनी महत्त्वाचा वाटा उचलला. पृ. ३४

**३. श्री. लल्लुभाई पटेल :** श्री. लल्लुभाई माकनजी पटेल यांचा जन्म करडी-माळवद, जिल्हा सुरत येथे इ. स. १९१८ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.एल.एल.बी. पर्यंत झाले होते. इ. स. १९३० मधील मिठाच्या सत्याग्रहात, इ. स. १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहात आणि १९४२ च्या ''छोडो भारत'' चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. ते प्रथम १९४६ मध्ये, नंतर पुन्हा १९५२ मध्ये नवसारी मतदार संघातून विधानसभेवर निवडून आले. विधानसभेतील घडामोडींवर त्यांचे प्रभुत्व होते. पृ. ३४

**४. श्री. पुरुषोत्तमभाई पटेल :** श्री. पुरुषोत्तमदास रणछोडदास पटेल हे मुंबई विधानसभेवर कडी,(गुजरात राज्य), महिसाणा जिल्हा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून १९५२ मध्ये निवडून आले. पृ. ३६

**५. श्री. देशमुख :** श्री. दत्ता आप्पाजी देशमुख हे १९५२ व १९५७ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर मतदार संघातून मुंबई विधानसभेवर कामगार किसान पक्षाचे व अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आले. पृ. ३७

**६. श्री. जाधव :** श्री. तुळशीदास जाधव जन्म २५ जानेवारी १९०५; इ.स.१९२१-१९४७ पर्यंत ते काँग्रेस पक्षात होते. १९३७-१९३९ व १९४६-१९५१ मध्ये ते मुंबई विधानसभेचे सदस्य होते. भारतीय शेतकरी व कामगार पक्षाच्या तिकिटावर ते बार्शी-माढा मतदार संघातून निवडून आले होते. पृ. ४०

**७. श्री. भरुचा :** श्री. नौशेर करसेटजी भरुचा हे अत्यंत व्यासंगी आणि अभ्यासू वादविवादपटू सदस्य होते. १९३९ पासून तेरा वर्षांच्या काळात ते मुंबई महानगर पालिकेचे सभासद होते. चौपाटी-ग्रँट रोड-ताडदेव या मतदार संघातून ते काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत मुंबई विधानसभेवर निवडून आले. पृ.४३

**८. मोरारजीभाई देसाई :** श्री. मोरारजी रणछोडजी देसाई. प्रथमतः सनदी नोकर (I.C.S) होते. पुढे कट्टर गांधीवादी बनले. आपल्या राजकीय जीवनात ते अनेक वादविवादांचे केंद्रस्थान बनले. ते प्रथम मुंबई राज्याच्या प्रांतिय सरकारमध्ये विधानसभेवर निवडून आले. श्रीमती गांधींच्या मंत्रिमंडळात ते अर्थमंत्री होते. ते जनता पक्षाच्या मंत्रीमंडळात पंतप्रधान होते. अत्यंत स्वमताग्रही राजकारणी म्हणून त्यांचा लौकिक आहे. पृ. ५०

**९. डॉ. अमूल देसाई :** डॉ. अमूल मगनलाल देसाई हे मूळचे काँग्रेस कार्यकर्ते. पण नंतर ते प्रजा समाजवादी पक्षास मिळाले. श्री. मोरारजीभाई देसाई यांच्या बलसाड मतदारसंघातून त्यांचा पराभव करून प्रजा समाजवादी पक्षाच्या तिकिटावर १९५२ मध्ये मुंबई विधानसभेवर निवडून आले. पृ.५९

**१०. श्री. कांबळे :** श्री. बी. सी. कांबळे पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून पदवीधर झाल्यानंतर डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीचे मुखपत्र असलेल्या ''जनता'' या मराठी साप्ताहिकाचे ते संपादक झाले. १९५२ मध्ये ते मुंबई विधानसभेवर निवडून आले. ते एक प्रसिद्ध वकील असून दलित समाजाचे नामवंत नेते आहेत. पृ.६५

**११. श्री. साने:** श्री. गोविंद दत्तात्रय साने हे १९५२ मध्ये दक्षिण सोलापूर शहर

मतदार संघातून विधानसभेवर निवडून आले. ते कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होते. पृ. ६९

**१२. कै. वर्तक :** कै. गोविंद धर्माजी तथा भाऊसाहेब वर्तक. विल्सन कॉलेजमधून बी.ए. पर्यंतचे शिक्षण घेतलेले गो. ध. तथा भाऊसाहेब वर्तक हे व्यवसायाने शेतकरी होते. निःस्वार्थीपणे राजकारण व सामाजकार्य करून त्यांनी ठाणे जिल्ह्यात १९२० च्या सुमारास अमाप लोकप्रियता मिळविली. ते दारूबंदीचे कट्टर पुरस्कर्ते असल्यामुळे स्वतःची ताडीची झाडे ताडी बनविण्यासाठी भाड्याने देण्याचे नाकारून त्यांनी वैयक्तिक नुकसान सोसले. काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यावर त्यांनी अनेक वेळा तुरुंगवास भोगला व उच्च पदे भूषविली. शेतकऱ्यांच्या हितासाठी ठाणे जिल्ह्यात त्यांनी भरीव कार्य केले. १९४६ मध्ये ते खेर मंत्रीमंडळात स्थानिक स्वराज्य संस्था मंत्री झाले. हरिजनांच्याबद्दलही त्यांना किती आपुलकी वाटत होती हे त्यांनी स्वतःचे राममंदिर त्यांना खुले करून देऊन दाखविले. पृ. ८५

**१३. श्री. व्ही.डी. देशपांडे :** श्री. विठ्ठलराव देवीदास देशपांडे हे १९५७ साली नांदेड मतदार संघातून मुंबई विधानसभेवर निवडून आले. ते कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होते. पृ. ९१

**१४. श्री. मेहताब :** डॉ. हरेकृष्ण मेहताब यांचा जन्म इ.स. १८९९ मध्ये ओरिसा प्रांतातील बालासोर जिल्ह्यातील आगरपारा येथे झाला. सुभाषचंद्र बोस यांच्या विचारांची पकड त्यांच्यावर होती. त्यांनी १९२१ पासून असहकार चळवळीत भाग घेतला. अनेक वर्षे ते काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य होते. इ.स. १९४६ ते १९५० पर्यंत ओरिसाचे मुख्यमंत्री होते. केंद्रीय मंत्रीमंडळात १९५०-१९५२ या काळात उद्योग व व्यापार खात्याचे मंत्री, १९५५ ते १९५६ मध्ये मुंबई प्रांताचे गव्हर्नर होते. पुन्हा ते १९५६ ते १९६१ मध्ये ओरिसाचे मुख्यमंत्री होते. एक व्यासंगी, विद्वान, इतिहास तज्ञ व मनस्वी लेखक व साहित्यिक होते. ''ओरिसाचा इतिहास'' हे त्यांनी लिहिलेले चिरस्मरणीय असे त्यांचे पुस्तक आहे. पृ.९६

**१५. श्री. नाईक-निंबाळकर :** श्री. मालोजीराजे नाईक-निंबाळकर हे फलटण संस्थानचे शेवटचे अधिपती. त्यांना दि.१५ नोव्हेंबर १९१७ रोजी फलटण संस्थानचे संपूर्ण अधिकार देण्यात आले. त्यांनी इ.स. १९१७ ते १९४८ या कालात फलटण संस्थानचा लोककल्याणकारी असा कारभार केला. दि. ८ मार्च १९४८ रोजी हे संस्थान मुंबई प्रांतात विलीन करण्यात आले. ते फलटण-माण मतदार संघातून काँग्रेस पक्षातर्फे

विधानसभेवर १९५२ मध्ये निवडून आले. पृ.९७

**१६. श्री. व्ही. एन्. पाटील :** श्री. विठ्ठलराव नानासाहेब पाटील हे कामगार किसान पक्षाच्या तिकिटावर व अपक्ष म्हणून १९५२ व १९५७ मध्ये मुंबई विधानसभेत पूर्व सातारा मतदार संघातून निवडून आले. पृ. ९८

**१७. श्री. अत्रे :** श्री. प्रल्हाद केशव अत्रे हे आचार्य अत्रे या नावाने ते प्रसिद्ध. शिक्षणतज्ञ, साहित्यिक, कवि, नाटककार, राजकारणपटू व अष्टपैलू पत्रकार म्हणून गाजले. साहित्य, नाट्य व सिनेक्षेत्रात त्यांनी अमाप लोकप्रियता मिळविली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी सक्रीय भाग घेतला. ''मराठा'' या त्यांच्या दैनिकातून या चळवळीचा त्यांनी धूमधडाक्याने प्रचार केला. पृ. १०१

**१८. श्री. सथ्था :** श्री. नौशेरवान नवरोजजी सथ्था हे अपक्ष उमेदवार म्हणून अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा मतदार संघातून १९५७ मध्ये निवडून आले. पृ. १०४

**१९. श्री. बर्धन :** श्री. अर्धेंदुभूषण हेमेंद्रकुमार बर्धन हे नागपूर जिल्ह्यातील नागपूर मतदार संघातून अपक्ष उमेदवार म्हणून १९५७ मध्ये निवडून आले. पृ.१०५

**२०. श्री. उद्धवराव :** श्री. उद्धवराव साहेबराव पाटील हे शेतकरी कामगार पक्षाच्या तिकिटावर उस्मानाबाद मतदार संघातून १९५७ मध्ये निवडून आले. पृ. १०६

**२१. श्री. वैराळे :** श्री. मधुसूदन आत्माराम वैराळे हे अकोला मतदार संघातून काँग्रेस तिकिटावर निवडून आले. ते बी.ए.एल.एल.बी. होते. १९४२ ते १९४५ या कालखंडात स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला व २ वर्षे त्यांनी तुरुंगात घालविली. अकोल्यातील ''मातृभूमी'' या दैनिक वृत्तपत्राचे ते सहायक संपादक होते. त्यांनी आपले शिक्षण वृत्तपत्रात आणि मासिकात लेख लिहून त्यावर मिळालेल्या मोबदल्यावर पूर्ण केले. १०० च्या वर त्यांनी लघुकथा व लेख लिहिले आहेत. विदर्भ प्रदेश काँग्रेस कमिटीचे ते उपाध्यक्ष व मुंबई लेजिस्लेटिव्ह काँग्रेस पार्टीचे ते सेक्रेटरी होते. १९५७ मध्ये ते अकोला मतदार संघातून व १९६२ मध्ये बाळापूर मतदार संघातून काँग्रेस उमेदवार म्हणून निवडून आले.  पृ.१०६

**२२. श्री. ब्रिजलाल बियाणी :** श्री. ब्रिजलाल बियाणी हे अकोल्यातील काँग्रेसचे प्रसिद्ध नेते. मध्य प्रदेशचे १९२६ ते १९२९ या काळात ते लेजिस्लेटिव्ह

कौन्सिलचे सदस्य; घटना समितीचे व संसदेचे ते सदस्य; वऱ्हाड काँग्रेस कमिटीचे ते १३ वर्षे अध्यक्ष होते. १९५२ ते १९५६ या कालात मध्य प्रदेश मंत्रीमंडळात अर्थमंत्री म्हणून त्यांनी काम केले. कामगार चळवळीमध्ये त्यांना विशेष रस होता. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे ते पुरस्कर्ते होते. त्यांची हिंदी व मराठीत पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांचा सहभाग नाही अशी विदर्भातील एकही राजकीय वा सामाजिक चळवळ नव्हती. १९५७ मध्ये ते अकोला मतदार संघातून काँग्रेस उमेदवार म्हणून निवडून आले. पृ. ११३

**२३. श्री. हांडे :** श्री. विठ्ठलराव हांडे हे नाशिक मतदार संघातून शेतकरी कामगार पक्षाच्या तिकिटावर १९५७ मध्ये निवडून आले. पृ. ११८

**२४. श्री. कानडे :** श्री दगू शंकर कानडे हे प्रजा समाजवादी पक्षाचे सदस्य म्हणून नाशिक जिल्ह्यातील येवला मतदार संघातून १९५७ मध्ये निवडून आले. पृ. १२१

**२५. श्री. निजलिंगप्पा :** श्री. एस्. निजलिंगप्पा हे काँग्रेसचे एक ज्येष्ठ नेते. १९५६ मध्ये ते कर्नाटकचे मुख्यमंत्री झाल्यानंतर कर्नाटकात त्यांनी काँग्रेस पक्षाची घडी बसविली. १९६८ पर्यंत राज्यातील घडामोडीमध्ये त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. काही काळ त्यांनी काँग्रेस पक्षाचे अध्यक्षपद भूषविले. पृ. १२५

**२६. श्री. जत्ती :** श्री. बसाप्पा धनाप्पा जत्ती हे कर्नाटकातील विजापूर येथील काँग्रेसचे अनुभवी नेते होते. त्यांनी जमखिंडी संस्थानाद्वारे काँग्रेस राजकारणात प्रवेश केला. ते म्हैसूर राज्यनिर्मितीनंतर कर्नाटकचे मुख्य मंत्री बनले. तत्पूर्वी ते मुंबई राज्याच्या मंत्रीमंडळामध्ये उपमंत्री होते. नंतर भारताचे उपराष्ट्रपती झाले. पृ. १२६

**२७. श्री. व्ही.डी.चितळे :** श्री. विष्णू दामोदर उर्फ भाई चितळे यांचा जन्म ४ जाने. १९०६ मध्ये कोल्हापूर येथे ब्राह्मण कुटुंबात झाला. शिक्षण एम.ए. हे कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीचे होते. १९३४ मध्ये ते कम्युनिस्ट पक्षात सामील झाले. स्वातंत्र्य आंदोलनात भाग. १९३०-३१ चा जंगल सत्याग्रह व १९४२ च्या ''भारत छोडो'' आंदोलनात व गोवा मुक्ती संग्रामात त्यांनी भाग घेतला. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या तिकिटावर ते कसबा पेठ मतदार संघातून विधानसभेवर निवडून आले. शेतकरी व कामगारांचे कनवाळू नेते व विचारवंत लेखक. पृ. १२७

**२८. श्री. पाटसकर :** पाटसकर फार्म्युला या नावाने ओळखल्या जाणाऱ्या राज्यांच्या भाषावार फेर आखणीसाठी आदर्श म्हणून मानल्या जाणाऱ्या योजनेचे

जनक; ना. हरिभाऊ पाटसकर यांचा जन्म पुण्याजवळील इंदापूर गावी १५ मे १८९२ रोजी झाला. ते एक हुशार विद्यार्थी होते. त्यांचे शिक्षण पुण्यास झाले. फर्ग्युसन कॉलेज मधून ते बी.ए. झाले आणि १९१६ साली वकील झाले. इ.स. १९२० पासून ते चाळीसगावला राहू लागले. नंतर मुंबई कौन्सिलचे सभासद. १९३० मध्ये म. गांधींनी दांडी मोर्चा सुरू केल्यानंतर हरिभाऊंनी आपल्या कौन्सिलर पदाचा राजीनामा दिला. सरदार वल्लभभाईंच्या नजरेस त्यांची कामगिरी आली. स्वातंत्र्य संग्रामात त्यांना तुरुंगवास घडला. इ.स. १९४५ नंतर हरिभाऊ घटना समितीचे सदस्य झाले. इ.स. १९४७ व १९५२ मध्ये ते लोकसभेचे सभासद झाले. त्यांनी लोकसभेत हिंदू कायदा सुधारणा बिल पास करून घेतले. आंध्र मद्रासचा सीमा तंटा सोडविण्यासाठी सुप्रसिद्ध पाटसकर फॉर्म्युला अमलात आणला. १९५७ मध्ये ते निवडणूक हरल्यावर त्यांना मध्यप्रदेशचे गव्हर्नर नेमण्यात आले. पृ. १२८

**२९. श्री. लाड :** श्री. गणपती दादा लाड, दक्षिण सातारा जिल्ह्यातील तासगाव मतदार संघातून शेतकरी कामगार पक्षाचे सदस्य म्हणून १९५७ च्या मुंबई विधानसभेवर निवडून आले. पृ. १३०

**३०. श्री. टिळक :** श्री. जयंत श्रीधर टिळक (श्री. जयंतराव टिळक) लोकमान्य टिळकांचे नातू. जन्म १२-१०-१९२१. शिक्षण बी.एस्सी., एम्.एससी.साठी संशोधन. १९४५ मध्ये ''केसरी''चे उपसंपादक. १९५० पासून प्रमुख संपादक. ''सह्याद्री'' मासिकाचे संपादक (१९६२) आणि मराठा या इंग्रजी मासिकाचे संपादक. १९८० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात समावेश. सप्टेंबर १९८२ मध्ये विधान परिषदेच्या सभापती पदी निवड. जुलै १९८६ मध्ये फेरनिवड. अनेक सार्वजनिक संस्थांशी संबंध. १९६१ मध्ये पानशेत पुराचेवेळी महिलांची शर्थीने सुटका केल्याबद्दल गायधनी पारितोषिक. पृ. १३४

**३१. पंडित पंत :** पंडित गोविंद वल्लभ पंत थोर मुत्सद्दी, राजकारणी, संसदपटू, धिप्पाड शरीरयष्टीचे; त्यांचा जन्म १० सप्टेंबर १८८७ चा. शिक्षण एल.एल.बी. पं. मदनमाहेन मालवीय यांचे शिष्य. कुशाग्र बुद्धीमत्तेचे श्री. पंत इ.स. १९१२ पासून राजकारणात भाग घेऊ लागले. उत्तर प्रदेश लेजिस्लेचरचे ते सदस्य झाले. त्यांची गणना भारतातील श्रेष्ठ पुढाऱ्यात होऊ लागली. १९३९ मध्ये ते उत्तर प्रदेशचे पहिले मुख्यमंत्री झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर ते पुनःश्च मुख्यमंत्री झाले. वल्लभभाई पटेल निधन पावल्यानंतर केंद्र सरकारमध्ये गृहमंत्री झाले. दि. ७ मार्च १९६१ मध्ये ते निधन

पावले. पृ. १३९

**३२. श्री. शिर्के :**श्री. दादासाहेब मल्हारराव शिर्के. कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले मतदार संघातून शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन पक्षातर्फे हे १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेवर निवडून आले. पृ. १४३

**३३. श्री. जसवंत मेहता :** श्री. जसवंतराय नानुभाई मेहता, हे प्रजा समाजवादी पक्षातर्फे गुजरातमधील गोहिलवाड जिल्ह्यातील महुवा मतदार संघातून विधानसभेवर १९५२ व १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आले. पृ.१४७

**३४. डॉ. जीवराज मेहता :** शिक्षण-१९१४ मध्ये एम.डी. ही वैद्यकीय पदवी मिळविली. १९१५ मध्ये ते एम.आर.सी.पी. झाले. सयाजीराव गायकवाडांचे वैयक्तिक डॉक्टर म्हणून १९२१ मध्ये त्यांची नेमणूक झाली. कांही दिवस ते जी.एस. मेडिकल कॉलेज व के.इ.एम्. हॉस्पिटलचे डीन होते. १९३०-३२ च्या मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. म. गांधींबरोबरच त्यांना १९३२ मध्ये कारावासाची शिक्षा झाली. १९४२ च्या ''भारत छोडो'' आंदोलनामध्ये त्यांनी सक्रीय भाग घेतला. १९४६ मध्ये ते मुंबई विधान सभेवर निवडून आले. १९४९ मध्ये ते सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री झाले. १९५२ पासून ते वित्त मंत्री झाले. नव गुजरात राज्य निर्माण झाल्यावर १९६० मध्ये ते गुजरात राज्याचे मुख्यमंत्री झाले. १९६३ मध्ये पं. नेहरूनी त्यांची लंडन येथील भारतीय राजदूत म्हणून नेमणूक केली. या पदावरून ते १९६६ मध्ये निवृत्त झाले. लोकसभेचेही ते १९७१ मध्ये सदस्य होते. पृ. १५०

**३५. श्री. खोडाभाई पटेल :** श्री. खोडाभाई शिवराम पटेल, गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातील चाणस्मा मतदारसंघातून अपक्ष म्हणून मुंबई विधानसभेवर १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आले. पृ. १५१

**३६. श्री. जयंतीलाल दलाल :** श्री. जयंतीलाल घेलाभाई दलाल अपक्ष उमेदवार म्हणून अहमदाबाद शहरातील काळुपूर मतदारसंघातून मुंबई विधानसभेच्या १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आले. पृ.१५१

**३७. श्री. गंगाराम रावळ :** श्री. गंगाराम चुनिलाल रावळ गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातील विजापूर उत्तर या मतदार संघातून अपक्ष म्हणून मुंबई विधानसभेवर १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आले. पृ. १५१

**३८. श्री. माधवलाल शहा :** श्री. माधवलाल भाईलाल शाह हे गांधीवादी

कार्यकर्ते. महात्माजींच्या दांडी यात्रेमध्ये सहभागी झाले होते. गुजरात राज्यातील खेडा जिल्ह्यातील सहकारी चळवळीशी श्री. शाह यांचा घनिष्ट संबंध. १९५२ व १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते खेडा जिल्ह्यातील मातर या मतदार संघातून काँग्रेस पक्षातर्फे मुंबई विधानसभेवर निवडून आले. पृ. १५१

**३९. श्री. सानप :** श्री. पांडुरंग रामाजी सानप हे कुलाबा जिल्ह्यातील (रायगड) रोहा व माणगाव या मतदार संघातून शेतकरी कामगार पक्षातर्फे इ.स. १९५७, १९६२ व १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत मुंबई व महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले. पृ. १५३

**४०. श्री. भापकर :** श्री. प्रभाकर कोंडाजी भापकर यांचा जन्म १५ डिसेंबर १९०३ रोजी भातोडी येथे झाला. १९४६ मध्ये ते मुंबई विधानसभेवर अहमदनगर या मतदार संघातून काँग्रेस उमेदवार म्हणून निवडून आले. पुढे ते १९५७ व १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्याच मतदार संघातून अपक्ष उमेदवार म्हणून विधान सभेवर निवडून आले. पृ. १५३

**४१. श्री. माने :** श्री माधवराव गणपतराव माने हे मुंबईतील माटुंगा मतदार संघातून प्रजा समाजवादी पक्षाचे उमेदवार म्हणून १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेवर निवडून आले. पृ. १५९

**४२. श्री. म्हाळगी :** श्री. रामचंद्र काशिनाथ म्हाळगी यांचा जन्म ९ जुलै १९२१ रोजी पुणे जिल्ह्यातील कडूस येथे. शिक्षण एम्.ए.एल्.एल्.बी. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक; संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात त्यांनी सक्रीय भाग घेतला होता. इ.स. १९५७, १९६७ व १९७२ मध्ये ते जनसंघ आमदार म्हणून निवडून आले होते. इ.स. १९७७ व १९८० च्या मध्यावधी निवडणुकीत ते खासदार म्हणून निवडून आले होते. पृ. १६३

**४३. श्री. वसंतराव नाईक :** जन्म दि. १ जुलै १९१३ रोजी. मॉरीस कॉलेजमधून शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी नागपूर महाविद्यालयाची कायद्याची पदवी संपादन केली. ग्रामोद्धार चळवळीत लक्ष घातले. पुसद तालुक्याचे रूपांतर करून टाकले. शेतकी विषयाची त्यांना विशेष आवड; पुसद शेतकी संघाचे अध्यक्ष; मध्यप्रदेश सहकारी बँकेचे संचालक; त्यानंतर राजकारणात प्रवेश करून ते मध्यप्रदेश सरकारचे उपमंत्री झाले; द्विभाषिक मुंबई राज्यात महसूल व सहकार मंत्री होते, कै. श्री. कन्नमवार निवर्तल्यावर १९६२ ते १९७५ पर्यंत ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. पृ. १६७

**४४. श्री. गाढे (घाडे):** श्री. भगवंतराव गंभीरराव घाडे यांचा जन्म १९१२ त झाला. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत औरंगाबादमधून काँग्रेस सदस्य म्हणून निवडून आले. त्यांचा अनेक सामाजिक संस्थांशी संबंध होता. हैद्राबाद राज्यात डेप्युटी मिनिस्टर-को ऑपरेशन, फिशरी मार्केटिंग व व्हिजीटरी ही खाती त्यांजकडे होती. मुंबई राज्याच्या पुनर्रचनेनंतर ते १९५७ मध्ये वनमंत्री झाले. तदनंतर ग्रामीण विकास मंत्री झाले. पृ. १६७

**४५. श्री.डी.एस्.देसाई :** उर्फ बाळासाहेब देसाई यांचा जन्म १९१० मध्ये झाला. शिक्षण बी.ए.एल.एल.बी. पाटण येथे वकिलीस सुरुवात. सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे सतत अकरा वर्षे त्यांनी अध्यक्षपद भूषविले. या काळात त्यांनी गरीब मुलांसाठी वसतिगृहे बांधली. काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यावर पाटण मतदारसंघातून १९५२ पासून १९७० पर्यंत ते काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून विधानसभेवर निवडून आले. सार्वजनिक बांधकाम, शिक्षण, गृह व महसूल मंत्री म्हणून त्यांनी कामगिरी बजावली. पृ. १६७

**४६. श्री. यार्दी :** श्री. एम्.आर्. यार्दी, आय्.सी.एस्. यांचा जन्म २२-८-१९१६ रोजी झाला. आय्.सी.एस्. झाल्यावर यांची सेवा मुंबई राज्याकडे सोपविण्यात आली. यांनी सेक्रेटरी म्हणून सचिवालयात अनेक पदांवर काम केले. काही काळ ते वित्त विभागाचे सचिव होते. १९६२ मध्ये ते दिल्लीला वित्त विभागाचे सचिव म्हणून गेले. पृ.१६७

**४७. श्री. साठे :** श्री. डी. डी. साठे यांचा जन्म २३-९-१९१८ मध्ये झाला. आय.सी.एस्. झाल्यानंतर १९४० पासून मुंबई राज्याच्या शासकीय सेवेत हे रुजू झाले. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाचे प्रमुख असता त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. काही वर्षे ते केंद्र शासनाच्या सेवेत होते. महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव म्हणून ते निवृत्त झाले. पृ. १६७

**४८. श्री. पी.जी. साळवी :** श्री. पु.गो.साळवी, आय्.ए.एस्. यांचा २३-६-१९२३ रोजी जन्म. ते १९५७ पासून मुंबई राज्याच्या प्रशासकीय सेवेत रुजू झाले. त्यांनी शासनाच्या अनेक खात्यात सचिव म्हणून काम केले. पृ. १६७

**४९. श्री. भंडारे :** श्री. आर्.डी. भंडारे शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षातर्फे वरळी मतदारसंघातून विधान सभेवर १९५७ मध्ये निवडून आले. इ.स. १९६० मध्ये ते विधान सभेत विरोधी पक्ष नेते होते. पृ. १७२

**५०. श्री. बावडेकर :** श्री. आर्.एन्. बावडेकर हे आय्.सी.एस्. होते. यांनी ४० वर्षे सरकारी नोकरी केली. ते मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून निवृत्त झाले. १२ जुलै १९६१ रोजी पानशेत प्रलय झाला, त्यांची न्यायालयीन चौकशी करण्यासाठी पानशेत आयोगाचे मुख्य म्हणून शासनाने त्यांची नियुक्ती २५ जुलै १९६१ रोजी केली होती. ही चौकशी तीन महिन्यात पुरी व्हावयाची होती. ह्यापूर्वी त्यांनी मुंबईतील लालबाग गॅस टाकीचा स्फोट होऊन जी दुर्घटना झाली त्याची न्यायालयीन चौकशी केली होती. पानशेत प्रकरणी चौकशी करत असता १० नोव्हेंबर १९६१ रोजी त्यांनी चवथ्या मजल्यावरून उडी घेऊन आत्महत्या केली. पृ. १९३

**५१. श्री. डांगे :** भारतातील समतावादाचे प्रवर्तक असलेले श्री. श्रीपाद अमृत डांगे, यांचा जन्म १८९९ मध्ये नाशिक येथे झाला. मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. १९१८ च्या एन्फ्ल्युएंझाच्या साथीमध्ये कामगार विभागात त्यांनी मदतीचे काम केले. १९२० नंतर असहकार आंदोलनात भाग घेतला. त्यांचा लेनिन, एम.एन. रॉय यांच्याशी परिचय झाला व ते मार्क्सवादी कम्युनिस्ट बनले; कामगार चळवळीत पुढाकार घेऊन त्यांनी १९२८ मध्ये गिरणी कामगारांचा त्यांच्या न्याय्य मागणीसाठी संप घडवून आणला. मीरत कटात त्यांना तुरुंगवास घडला. आयटकचे व कम्युनिस्ट पक्षाचे ते अध्यक्ष होते. त्यांनी सर्व जगभर प्रवास केला. मुंबई असेंब्ली व लोकसभेचे सदस्य म्हणून त्यांनी काही काल काम केले. पृ. १९९

**५२. श्री बर्वे :** श्री. सदाशिव गोविंद बर्वे, आय.सी.एस. बुद्धिमान विद्यार्थी; शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात व केंब्रिज विद्यापीठ येथे. सर्वप्रथम अहमदाबादला डेप्युटी कलेक्टर. त्यांनी १९५८-५९ पर्यंत नोकरीत अनेक कामगिऱ्या पार पाडल्या. यशवंतराव चव्हाणांनी त्यांच्या अनेकविध भरीव कामगिरीचे मोल ओळखले व त्यांना लोकशाही राजकारणात ओढून घेतले. महाराष्ट्र मंत्रिमंडळात श्री. बर्वे हे अर्थमंत्री व उद्योगमंत्री म्हणून तीन वर्षे राहिल्यावर ते दिल्लीस नियोजन मंडळावर गेले. लोकसभेची निवडणूक त्यांनी व्ही. के. कृष्णमेनन यांच्याविरुद्ध लढवून ते विजयी झाले. पृ. २०९

**५३. श्री. सिलम :** श्री. सयाजीराव लक्ष्मण सिलम यांचा जन्म दि. १८-५-१८९६ रोजी झाला. बी.ए., एल्एल्.बी.पर्यंत शिक्षण झाल्यावर ते मुंबई प्रदेश काँग्रेस समितीचे प्रमुख कार्यवाह झाले व नंतर उपाध्यक्ष झाले. दारुबंदीविषयक व युद्धोतर काळातील अनेक कार्यांच्या समित्यांमध्ये त्यांनी काम केले. १९४१-४२ च्या स्वातंत्र्य

आंदोलनात तुरुंगवासही भोगला. मुंबई महानगरपालिकेचे ते सदस्य व स्टँडिंग कमिटीचे चेअरमन होते. तसेच काँग्रेस पक्षाचे ते प्रतोद होते. १९५६ मध्ये त्यांची विधिमंडळाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली व १९६१ मध्ये ते निवृत्त झाले. पृ. २११

**५४. श्री. कारखानीस :** त्र्यंबक सीताराम कारखानीस हे कोल्हापूर मतदारसंघातून शेतकरी व कामगार पक्षाचे उमेदवार म्हणून विधानसभेवर निवडून आले. पृ. २१५

**५५. लाल बहादूरजी :** यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी मोगलसराई येथे झाला. पदवी शिक्षण बनारस येथे झाले. गांधीजींच्या असहकार चळवळीत हे सामील झाले व कारावास भोगला. १९४६ पासून उत्तर प्रदेशच्या मंत्रिमंडळात यांचा समावेश झाला. १९५१ नंतर ते रेल्वेमंत्री झाले. १९६४ मध्ये ते भारताचे पंतप्रधान झाले. ११ जानेवारी १९६६ ला ताश्कंद येथे मृत्यू. पृ. २१६

**५६. श्री. ह.रा. महाजनी :** 'लोकसत्ता'चे संपादक श्री.ह.रा.महाजनी हे मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांचे एकवेळचे सहकारी होते. श्री. महाजनी यांचे सार्वजनिक राजकीय कार्य सातारा जिल्ह्यात सुरू झाले. स्वातंत्र्य लढ्यात एक काँग्रेस कार्यकर्ता म्हणून त्यांनी भाग घेतला व नंतर ते मानवेंद्रनाथ रॉय यांच्या अनुयायी वर्गात सामील झाले. रॉयपंथीय चळवळीमुळे मार्क्सवादी व आधुनिक विचारसरणीशी त्यांचा परिचय व अभ्यास होता. पृ. २२०

**५७. श्री. पाटकर :** श्री. सावळाराम गोपाळ पाटकर हे १९५७ आणि १९६२ साली कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार म्हणून मुंबईतील शिवडी ह्या मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले होते. ते पूर्णवेळ सामाजिक कार्यकर्ते होते. पृ. २२९

**५८. श्री. पाटील :** श्री. दिनकर बाळू पाटील शेतकरी कामगार पक्षातर्फे पनवेल मतदारसंघातून इ.स. १९५७ व १९६२ साली विधानसभेवर निवडून आले. पृ. २३४

**५९. श्री. बखले :** श्री. व्ही.एस्. बखले, निवृत्त न्यायाधीश यांची नेमणूक पानशेत इन्क्वायरी कमिशनला मदत करण्यासाठी १३ डिसेंबर १९६१ च्या सा.प्र.वि.च्या शासन निर्णय क्र. सीआए १०६१ डीनुसार करण्यात आली. पृ. २३५

**६०. श्री. कन्नमवारजी :** श्री. मारोतराव कन्नमवार यांचा जन्म इ.स. १९०० मध्ये चांदा जिल्ह्यात. प्रथमपासून स्वातंत्र्य लढ्यात भाग. अनेकदा कारावास. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सदस्य; १९३८ पासून नागपूर प्रदेश काँग्रेस समितीचे सेक्रेटरी

व वृत्तपत्रकार; पार्लमेंटचे सदस्य. मध्यप्रदेशातील मंत्रिमंडळावर १९५२ मध्ये सार्वजनिक आरोग्य, तुरुंग ह्या खात्याचे मंत्री. राज्य पुनर्रचनेनंतर मुंबई राज्यात त्याच खात्याचे मंत्री. इ.स. १९६२ मध्ये मुख्यमंत्री. पृ. २४५

**६१. श्री. भिडे :** श्री. हरि भास्कर भिडे यांना मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंम्ब्लीने मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर फेब्रुवारी १९५८ मध्ये निवडून दिले. पृ.२४८

**६२. श्री. दोंदे :** श्री. मोरेश्वर वासुदेव दोंदे हे गोखले एज्युकेशन सोसायटीच्या आर्.एम्. भट हायस्कूलचे प्राचार्य होते. शिक्षण तज्ज्ञ म्हणून ते ओळखले जात. मुंबई महापालिकेमध्ये ते १९३० ते १९६१ या काळात सदस्य. माध्यमिक शिक्षक संघाचे ते अनेक वर्षे पदाधिकारी. १९५२ ते १९६० एप्रिलपर्यंत ते कौन्सिलचे सभासद होते. मुंबई महापालिकेचे ते महापौर होते. अनेक सार्वजनिक कामांमध्ये ते रस घेत असत व हाती घेतलेले काम तळमळीने पुरे करीत असत. पृ. २४९

**६३. श्री. गोगटे :** श्री. वासुदेव बळवंत गोगटे हे महाराष्ट्र पदवीधर मतदार संघातून विधान परिषदेवर निवडून आले होते. पृ. २५२

**६४. श्री. व्यास :** श्री. बच्छराज श्यामलाल व्यास हे भारतीय जनसंघाचे सदस्य. विदर्भ पदवीधर मतदार संघातून विधान परिषदेवर निवडून आले. पृ.२६१

**६५. श्री. हॅरिस :** श्री. मोहिनुद्दिन बऱ्हानुद्दिन हॅरिस हे प्रजा समाजवादी पक्षाचे उमेदवार म्हणून विधान परिषदेवर निवडून आले. पृ. २६४

**६६. डॉ. राजेंद्रप्रसाद :** जन्म ३ डिसेंबर १८८४, बिहारमधील सरन जिल्ह्यात. शिक्षण कलकत्त्यास. एम.ए. आणि मास्टर ऑफ लॉ. तिथेच वकिलीस सुरुवात. वकिलीत चांगला जम. इ.स. १९१६ च्या लखनौ येथील काँग्रेस अधिवेशनात महात्मा गांधींशी भेट. इ.स. १९२० पासून गांधींच्या असहकार चळवळीत सामील. त्या वेळेपासून काँग्रेस श्रेष्ठींमध्ये त्यांची गणना होऊ लागली. अनेक वेळा कारावास झाला. १९३९ मध्ये ते अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष. स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात ते अन्न व कृषी मंत्री झाले. पुढे घटना समितीचे ते अध्यक्ष झाले. १९५० मध्ये ते राष्ट्राध्यक्ष झाले. पृ. २९१

**६७. श्री. एन.डी.पाटील :** जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्याच्या ढवळी गावी दि. १५ जुलै १९२९ रोजी. शिक्षण एम.ए., प्रथमतः काँग्रेस व राष्ट्रदलाशी संबंध. कोल्हापूर विद्यार्थी संघाचे नेते; रयत शिक्षण संस्थेचे सदस्य. इस्लामपूर येथे

महात्मा फुले शिक्षण संस्था सुरू केली. शिक्षण पूर्ण होताच नोकरी सोडून शेतकरी कामगार पक्षाचे राजकीय कार्य. १९६० मध्ये विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर निवड. काही काळ विधान परिषदेचे नेते व उपनेतेपद भूषविले. पृ. ३१७

**६८. श्री. वसंतराव पाटील :** सहकार चळवळीचे निष्णात संघटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री. वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्रात पहिल्या सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. १९५२ पासून शेवटपर्यंत ते मुंबई विधानसभेचे सदस्य होते. ते चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. पृ. ३३७

**६९. श्री. केशवराव सोनावणे :** श्री. केशवराव सोनावणे हे जुन्या हैद्राबाद संस्थानचे रहिवासी होते. त्यांनी निजामविरोधी चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत त्यांनी पुढाकार घेतला. लातूर मतदार संघातून १९५७ व १९६२ मध्ये काँग्रेस उमेदवार म्हणून ते विधानसभेवर निवडून आले. पृ. ३३७

**७०. श्री. जयप्रकाश नारायण :** यांचा जन्म ११ ऑक्टोबर १९०२ रोजी बिहारमध्ये सुशिक्षित कुटुंबात झाला. अमेरिकेत शिक्षणासाठी आठ वर्षे वास्तव्य. एम.ए. पदवी संपादन. एम.एन. रॉय, महात्मा गांधी, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या सहवासात. काँग्रेसच्या लाहोर काँग्रेस अधिवेशनापासून ते जवाहरलाल नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झाले. 'छोडो भारत' आंदोलनात हिरिरीने भाग घेतला. त्यांचा पिंड समाजवादी होता. भारतीय समाज जीवनाच्या अनेकविध पैलूंवर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. प्रजा समाजवादी पक्षाचे नेते होते. भूदान चळवळीत त्यांनी भाग घेतला. पृ. ३३८

# संदर्भ ग्रंथ


## मराठी

(१) अर्वाचीन चरित्र कोश, भा. ३, सं. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.
(२) नवभारत, एप्रिल १९६७
(३) नवाकाळ (दै.) १९४६-१९६०
(४) मराठी विश्वकोश-सर्वभाग
(५) दै. मराठा १९५५-६१
(६) महाराष्ट्रातील खेड्यांची व शहरांची वर्णक्रमी
(७) महाराष्ट्र विधानसभा सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ, मुंबई १९८८
(८) वृत्तपत्रांचा इतिहास, ले. रा. के. लेले.
(९) हंस, एप्रिल १९६७.

## अिंग्रजी

(10) All India Civil List February 1964. Printed and Published under the Authority of Government of India, 1964.
(11) Bombay Legislature Congress Party Directory, Sept.1958.
(12) Bombay/Maharashtra Legislatives Assembly Debates Volumes from 1946 to 1962.
(13) Bombay/Maharashtra Legislatives Council Debates Volumes from 1946 to 1962.
(14) Civil List of Indian Administrative Service as on 1.1.1964.
(15) --do-- as on 1.1.1964.
(16) Dictionary of National Biography, Volume 1 to 4, Edited by S.N.Sen.
(17) Directory of the Bombay Legislature 1946-47, 52-53.
(18) Eminent Indians: who was who. 1900-1980. Durga Das Pvt. Ltd., New Delhi. 110001. 1985.
(19) Indian who's who, 1974-75. INFA Publication, New Delhi.
(20) The Times of India. Directory and year book.

भारताचे भूतपूर्व उपपंतप्रधान व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचा जन्म शेतकऱ्याच्या गरीब कुटुंबात झाला. बालपणी वडील निवर्तल्यामुळे दारिद्र्याचे चटके सहन करत ते मातोश्रीच्या खंबीर पाठिंब्याने बी.ए., एल.एल.बी. झाले. शालेय जीवनात झपाट्याने वाचन केले. मित्रांबरोबर अनेकदा वादविवाद केले. इ. स. १९४० पर्यंत यशवंतरावांना बुद्धीवंतांच्या सान्निध्यातून व उदंड ग्रंथाध्ययनातून भरपूर वैचारिक खुराक मिळाला. त्यांनी केलेल्या विविधांगी वाचनामुळे राजकीय विचारांच्या विविध छटा आणि त्यांचा परस्परांशी असलेला संबंध त्यांना उमगला. शेवटी त्यांनी आपल्याला इ. स. १९४० पासून कॉंग्रेसच्या वैचारिक बैठकीत झोकून दिले ते शेवटपर्यंत. वैचारिक ज्ञानाची एवढी शिदोरी बरोबर घेऊन यशवंतराव लोकशाही तंत्राने राज्यकारभार करण्यासाठी विधानसभेत १९४६ मध्ये निवडून आले आणि पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. स्वातंत्र्यप्राप्तीबरोबर यशवंतरावांचा प्रवास सत्ताधारी या नात्याने सुरू झाल्यावर ते द्विभाषिकाचे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावरही ते मुख्यमंत्री राहिले. तदनंतर हिमालयाच्या रक्षणासाठी दिल्लीचे बोलावणे आल्यावर ते धावून गेले. ''यशवंतराव'' हा महाराष्ट्राच्या राजकारणाचा जवळजवळ दोन तपे परवलीचा शब्द झाला होता. यशवंतराव हे एक अत्यंत सौजन्यशील, संयमी आणि सुसंस्कृत असे भारदस्त व्यक्तिमत्त्व होते. ह्या भाषणात यशवंतराव चव्हाणांच्या संसदपटूत्वाच्या अनेक छटा आढळतात. वादविवाद-पटुत्वाने प्रतिपक्षीयांस लीलया नामोहरम केले. विरोधकांस आपल्या नर्म विनोदाने आपलेसे करून आपले म्हणणे त्यांना पटवून दिले. विषयाचे सखोल ज्ञान, राजकारणात जाती धर्म निरपेक्ष असे उदार धोरण, गरीबदलितांविषयी कणव, रंजलेल्या गांजलेल्या दलित समाजाच्या हितासाठी कायदे करण्याचे धाडस केले. कृषी-औद्योगिक समाजाची कल्पना उचलून धरली. सहकाराची कास धरली. ग्रामीण व शहरी परिसरात औद्योगीकरण व्हावे यासाठी ते झटले. शिक्षण क्षेत्रात त्यांनी क्रांतीकारक बदल केला.

जमीनजोड कायद्याचा हिरीरीने पुरस्कार केला. खंडकरी व शेती जमीनविषयक कायद्यासंबंधी विधेयक आणले, शेतकी सुधारणा, कूळकायदा, सावकारी नियंत्रण कायदा आणि कर्जमुक्ति कायदा हे सर्व कायदे शेतकऱ्यांच्या कल्याणाचे आहेत हे त्यांनी विधानसभेत सांगितले.

लोकशाही विकेंद्रीकरण करून पंचायत राज्य निर्माण करण्याचा हेतू, त्यासाठी ग्रामीण जीवनातील लोकशाही संघटना उभी करण्यावर दिलेला भर, ग्रामसंघटना ही शेवटची संघटना आणि राज्यसंघटना ही सर्वात वरची संघटना, या संघटनांना सत्ता दिली पाहिजे, त्यासाठी ग्रामीण भागांचा विकास व समाजवादी समाजरचना हे सरकारचे ध्येय असल्याचे प्रतिपादन करून तरुण पिढीतून नेतृत्व पुढे येण्यासाठी जिल्हा परिषदा स्थापण्याचे विधेयक मांडले.